# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या सामान्य आणि
सामाजिक क्षेत्र अहवालामधील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.३),
विधि व न्याय विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१) व
गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४) यावरील

# सत्तेचाळीसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास
दिनांक नोव्हेंबर, २०१८ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
नोव्हेंबर, २०१८

# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.३), विधि व न्याय विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१) व गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४) यावरील**

# सत्तेचाळीसावा अहवाल

एचबी १४९०—१

## लोकलेखा समिती

## २०१७-२०१८

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

* (२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

** (२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

*** (२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

**निमंत्रित :**

****(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

** श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

*** श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे जागा रिक्त झाली.

**** श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.३), विधि व न्याय विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१) व गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४) यावर विचार करून लोकलेखा समितीचा सत्तेचाळीसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २ व २९ मे, दिनांक ६, १२ व २७ जून, दिनांक ३१ जुलै दिनांक १३ ऑगस्ट २०१८ रोजी प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग तसेच सचिव, गृहनिर्माण विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन, महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट 'ब' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २८ व २९ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या बैठकीत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, विधि व न्याय विभाग तसेच गृहनिर्माण विभागासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन :**
मुंबई/नागपूर,
दिनांक २९ नोव्हेंबर २०१८.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** ... ... ... ... ... | (पाच) |
| (१) | **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग** ... ... ... ... (परिच्छेद क्र. २.३) | १ |
| (२) | **विधि व न्याय विभाग** ... ... ... ... (परिच्छेद क्र. ३.१) | १०८ |
| (३) | **गृहनिर्माण विभाग** ... ... ... ... (परिच्छेद क्र. ३.४) | १४४ |

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. २.३ "मध्यान्ह आहार योजनेची अंमलबजावणी"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

# शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील **"परिच्छेद क्रमांक २.३ मध्यान्ह आहार योजनेची अंमलबजावणी"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

| अ क्र | परिच्छेद क्रमांक | मुद्दा | विभागाचे अभिप्राय | मा. महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २.३.२.१ | **दुष्काळग्रवण जिल्ह्यांना लाभ न मिळणे / जिल्ह्यांचा समावेश नसणे**<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद ५.१ नुसार दुष्काळ बाधित क्षेत्रांमध्ये उन्हाळी सुट्टयांच्या दरम्यान मुलांना पुरक पोषण आहार द्यावयाचा होता. जर उन्हाळी सुट्टया सुरु झाल्यावर किंवा अगदी सुरु व्हायच्या वेळी एखादया क्षेत्राला दुष्काळ बाधित क्षेत्र घोषित करणारी अधिसूचना जारी करण्यात आली तर अशा वेळी राज्य शासनाने केंद्रिय अर्थसहाय्य मुक्त होईल असे गृहीत धरुन अशा क्षेत्रांमध्ये MDM चा पुरवठा करावा.<br>२०१०-१५ दरम्यान GoM च्या महसूल व वन विभागाने अधिसूचित केलेले दुष्काळ बाधित जिल्हे, योजनेत समाविष्ट न झालेले दुष्काळ बाधित जिल्हे आणि ज्या जिल्ह्यांचा चुकीने दुष्काळ बाधित जिल्हे म्हणून या योजनेत समावेश करण्यात आला ते तक्ता २.३.१ मध्ये दर्शविले आहे.<br>**तक्ता २.३.१ - २०१०-१५ दरम्यान योजनेत समावेश न झालेले राज्यातील दुष्काळ बाधित जिल्हे**<br>वर्ष / GoM च्या अधिसूचने नुसार एकूण दुष्काळ बाधित जिल्हे / MDM योजने अंतर्गत समावेश करण्यासाठी SNA ने विचारात घेतलेल्या दुष्काळ बाधित जिल्ह्यांची संख्या / MDM योजनेतंर्गत समावेश न झालेले दुष्काळ बाधित जिल्हे / MDM योजनेत चुकीने दुष्काळ बाधित म्हणून समावेश झालेले जिल्हे<br>२०१०-११ / २५ / ०८ / सातारा, नाशिक, नंदुरबार, जळगांव, अमरावती, बुलढाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली आणि बीड (१७ जिल्हे) / --- | शालेय पोषण आहार योजनेंतर्गत राज्याचे वार्षिक कार्य व अंदाजपत्रक केंद्र शासनाच्या मंजूरीसाठी साधारणपणे दरवर्षी माहे जानेवारी मध्ये दाखल करण्यात येते. तथापि, जानेवारी पर्यंत राज्य शासनाद्वारे दुष्काळग्रस्त जिल्हे घोषित करण्यात येत नाहीत. त्यामुळे जिल्हयांकडून दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांना ऊन्हाळी सुट्टीत शालेय पोषण आहार मिळण्याबाबतचा प्रस्ताव वेगळयाने समाविष्ट होत नाही.<br>तथापि, ऊन्हाळी सुट्टीत विद्यार्थ्यांची उपस्थिती नगण्य असल्याने दुष्काळी भागात विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार उपलब्ध करुन देण्यासाठी नियमित अर्थसंकल्पातील तरतूदीचा वापर करण्यात येतो.<br>सन २०१५-१६ मध्ये राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये दुष्काळ जाहीर झालेला होता. यामुळे सन २०१५-१६ साठीच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीमध्ये दुष्काळी भागासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला होता. व यास केंद्र शासनाने मंजूरी देवून दुष्काळग्रस्त भागासाठी रु.१३२.२७ कोटी इतका केंद्र हिस्सा व रु. ४४.०९ कोटी इतका राज्य हिस्सा अशा एकूण रु. १७६.३६ कोटी इतकी योजना मंजूर केली होती.<br>सन २०१६-१७ मध्ये दुष्काळग्रस्त भागातील एकूण २२९४८०२ विद्यार्थ्यांना लाभ दिलेला असून त्यावर एकूण रु. १५९०.१९ लक्ष एवढा निधी खर्च झालेला आहे.<br>तसेच, सन २०१७-१८ मध्ये एकूण ४४८४७१ लाभार्थी असून त्यावर एकूण रु. १९.५३ लक्ष एवढा निधी खर्च झालेला आहे. | शासनाच्या महसुल व वन विभागाने दुष्काळग्रस्त गावे कोणत्या महिन्यात जाहीर केली हे नमूद करावे व सदर गावासाठी लागणाऱ्या निधीचा समावेश केंद्र शासनास वार्षिक कार्य व अंदाजपत्रक सादर करताना का केला नाही, याची कारणमिमांसा लोकलेखा समितीस सादर करावी. | महसूल व वन विभाग कडून दुष्काळग्रस्त गावे जाहीर केल्याचा दिनांक व केंद्र शासनास वार्षिक कार्य अंदाज पत्रक सादर केल्याची वर्ष निहाय माहिती<br>दुष्काळग्रस्त जाहीर झाल्याचा दिनांक / माहिती सादर दिनांक<br>१९/४/१० / २६/२/१०<br>- / १५/३/११<br>३१/३/१२ / १५/२/१२<br>२५/१०/१२ ३०/१०/१२ ६/२/१३ / ८/२/१३<br>३०/४/१४ / १६/२/१४<br>२५/११/१४ / ३/३/१५<br>२०/१०/१५, ९/११/१५ / २९/३/१६<br>२३/३/१६ / ३०/१/१७<br>सन २०१०, २०१२ व २०१४ मध्ये केंद्र शासनास वार्षिक कार्य योजना व अंदाजपत्रक सादर केल्यानंतर राज्य शासनाने दुष्काळ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०११ -१२ | ० | ०६ | -- | धुळे, अहमदनगर, सातारा, लातूर, बुलढाणा आणि गडचिरोली (०६ जिल्हे) | | |
| | | २०१२ -१३ | १५ | १० अधिक ०१ अतिरिक्त जिल्हा | नंदूरबार, गडचिरोली, बुलढाणा, उस्मानाबाद आणि पुणे (०५ जिल्हे) | जालना (०१ जिल्हा) | | |
| | | २०१३ -१४ | १४ | १३ अधिक ०१ अतिरिक्त जिल्हा | जालना (०१ जिल्हा) | बुलढाणा (०१ जिल्हा) | | |
| | | २०१४ -१५ | १३ | ०२ | नाशिक, सातारा, सांगली, अमरावती, यवतमाळ, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर (११ जिल्हे) | -- | | |
| | | स्रोत - महसूल व वन विभागाने जारी केलेला शासन निर्णय आणि SNA ने सादर केलेली माहिती | | | | | | |

तक्ता २.३.१, वरुन असे दिसून येते की, २०१०-१५ दरम्यानच्या कालावधीत ३४ दुष्काळ बाधित जिल्ह्यांचा योजनेत समावेश करण्यात आला नव्हता, त्याचवेळी आठ जिल्हे दुष्काळ बाधित असल्याचे अधिसूचित झालेले नसतानाही या कालावधीत त्यांचा योजनेतर्गत समावेश करण्यात आला होता. दुष्काळ बाधित जिल्ह्यांचा समावेश न होणे व दुष्काळ बाधित म्हणून अधिसूचित झालेले नसतानाही काही जिल्ह्यांचा योजनेत समावेश होणे यावरुन दुष्काळ प्रवण जिल्ह्यांमध्ये योजनेची अंमलबजावणी करताना पर्याप्त नियोजनाचा तसेच SNA आणि महसूल व वन विभाग यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दर्शविला गेला.

शासनाने सांगितले (ऑक्टोबर २०१५) की, या विषयी दुष्काळ बाधित जिल्ह्यांकडून स्पष्टीकरण मागविण्यात येईल.

**शिफारस क्रमांक - १**

दुष्काळ बाधित म्हणून अधिसूचित केलेल्या जिल्ह्यामधील सर्व शाळांचा मध्यान्ह आहार योजनेत खात्रीने समावेश होईल याची सुनिश्चिती करण्यासाठी

शालेय पोषण आहार योजनेकरिता केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वामधील परिच्छेद क्र. ५.१ नुसार दुष्काळ बाधीत

कोणत्या दिवंसास केंद्र शासनास वार्षिक कार्य व अंदाजपत्रक मंजूरीसाठी सादर केले याची माहिती लोकलेखा समितीस सादर करावी.

सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ या वर्षामध्ये राज्य शासनाने किती जिल्हे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले होते व त्यापैकी किती जिल्हयात शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी केली याची माहिती लोकलेखा समितीस सादर करावी.

जाहिर केला आहे.

सन २०१५-१६ मध्ये २२ जिल्हे, सन २०१६-१७ मध्ये २२ जिल्हे व सन २०१७-१८ मध्ये ७ जिल्हे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले होते. सदर जिल्ह्यामध्ये दुष्काळग्रस्त कालावधीत शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी केली आहे.

सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये केंद्र शासनास सादर केलेल्या वार्षिक कार्य व अंदाजपत्रकात दुष्काळ ग्रस्त जिल्हयांची माहिती समाविष्ट करण्यात आलेली होती. तथापि सन २०१७-१८ मध्ये दुष्काळग्रस्त जिल्हे जाहीर करण्याचा शासन निर्णय हा AWP & B केंद्र शासनास सादर केल्यानंतर निर्गमित झाल्यामुळे त्याबाबतचा प्रस्ताव नंतर केंद्र शासनास

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महसूल व वनविभागाशी अत्यत समन्वयाने कामकाज करावे. | क्षेत्रामध्ये उन्हाळी सुट्टीच्या दरम्यान मुलांना पोषण आहार दयावयाचा आहे.<br>दरवर्षी महसूल व वन विभागामार्फत ५० पैशापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांची यादी प्रसिध्द केली जाते. राज्यामध्ये सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये महसून विभागाशी समन्वय साधून दुष्काळग्रस्त भागामध्ये उन्हाळी सुट्टीमध्ये शालेय पोषण आहार दिला जात आहे. | तसेच, सदर जिल्हे केंद्र शासनास सादर केलेल्या वार्षिक कार्य व अंदाजपत्रकात समाविष्ट केले होते किंवा कसे. | पाठविण्यात आला होता. |
| | २.३.३ | वित्तीय व्यवस्थापन<br>GoI ने AWP&B ला मंजूरी दिल्यावर प्रत्येक वर्षी एप्रिल, मे मध्ये केंद्रिय अर्थसहाय्याचा पहिला हप्ता राज्य शासनाला मुक्त करण्यात येतो आणि मागील अनुदानाच्या विनियोगाच्या प्रगतीच्या आधारावर दुसरा हप्ता सप्टेंबर, ऑक्टोबर मध्ये मुक्त केला जातो. केंद्रिय अर्थसहाय्य प्राप्त झाल्यावर केंद्राच्या अनुदानाबरोबर राज्य शासन त्यांचा तेवढाच किमान अनिवार्य हिस्सा (२५ टक्के) योजनेच्या अंमलबजावणीसाठी SNA ला मुक्त करते.<br>२०१०-१५ दरम्यान केंद्र व राज्य शासनाने मुक्त केलेली अनुदाने आणि योजनेवर झालेला खर्च तक्ता २.३.२ मध्ये दर्शविला आहे.<br>तक्ता २.३.२ - २०१०-१५ दरम्यान राज्यात प्राप्त झालेली अनुदाने आणि झालेला खर्च<br>(रु. कोटीत)<br>तक्ता २.३.२ दर्शवितो की २०१०-११ दरम्यान एकूण रु. १४८०.३० कोटी | दि.२४/११/२००९ च्या केंद्र शासनाच्या पत्रान्वये अन्न शिजविण्याचा खर्च सुधारित करण्यात आला होता. तसेच, सदर योजनेचे निधीचे प्रमाण केंद्र : राज्य हे ७५ : २५ करण्यात आले होते. त्यानुसार केंद्र शासनाने अन्न शिजविण्याचा खर्च आणि स्वंयपाकी तथा मदतनीस यासाठी लागणारा अतिरिक्त निधी केंद्र शासनास मागणी करण्याबाबत तसेच, राज्य शासनास तरतूद करण्याबाबत कळविले होते. यानुषंगाने शासनाने दि.१९/०१/२०१० च्या पत्रान्वये केंद्र शासनास अतिरिक्त तरतूदीची मागणी केली. तसेच, वित्त विभागास खर्चाच्या सुधारित दरास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव आणि रु.१२१.०४ कोटी इतक्या अतिरिक्त पूरक मागणीचा प्रस्ताव दि.२५/०५/२०१० रोजी सादर केला. सदर पूरक मागणीच्या प्रस्तावास पावसाळी अधिवेशन २०१० मध्ये विधान मंडळाद्वारे मान्यता देण्यात आली. त्यानंतर खर्चाच्या सुधारित दरास मान्यता देण्याच्या शासन निर्णयाच्या मसूद्यास वित्त विभाग आणि मा.मंत्री (शिक्षण) यांच्या मान्यतेसाठी दि.११/११/२०१० रोजी सादर करण्यात आला. मान्यतेनंतर शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खर्चाच्या सुधारित दरामध्ये वाढ करण्याबाबतचा शासन निर्णय दि.०२/०२/२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आला. यामध्ये नमूद करण्यात येते की, वित्त विभागाने शासन निर्णय | केंद्र शासनाने नोव्हेंबर २००९ मध्ये आहार शिजविण्याचा खर्च सुधारित करण्याबाबत च्या सूचना निर्गमित करुनही राज्याने १२ महिन्यांनतरही सदर दर सुधारित न करण्याबाबतचे स्पष्टीकरण लोकलेखा समितीस द्यावे. | योजनेच्या निधीचे प्रमाण केंद्र सरकारने २४ नोव्हेंबर, २००९ मध्ये बदल्यानंतर त्याप्रमाणे अतिरिक्त निधी मागणी प्रस्ताव केंद्र व राज्य शासनास सादर करण्याबाबत केंद्र शासनाने निर्देशित केले होते.<br>त्यानुसार केंद्रास दि.१९/०१/२०१० रोजी प्रस्ताव सादर केला. तसेच, राज्य हिस्स्याचा निधी रु.१२१.०४ कोटी वित्त विभागाकडून मिळण्यासाठी दि.२५/५/२०१० रोजी पुरक मागणीच्या प्रस्ताव सादर केला. |

| वर्ष | मुक्त अनुदाने | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र | राज्य | एकूण | केंद्र | राज्य | एकूण |
| २०१०-११ | ११५६.८७ | ३२३.४३ | १४८०.३० | ५५३.३३ | १४७.२० | ७००.५३ |
| २०११-१२ | ८९८.९५ | २६०.४३ | ११५९.३८ | ८९०.८९ | २६२.१९ | ११५३.०८ |
| २०१२-१३ | ९५४.०९ | २७३.५४ | १२२७.६३ | ९११.३६ | २५७.७३ | ११६९.०९ |
| २०१३-१४ | ९०५.४२ | २४८.६७ | ११५४.०९ | ९८९.७७ | २७०.४२ | १२५२.१९ |
| २०१४-१५ | १०१२.११ | २८३.८९ | १३७६.०० | १०८७.८९ | २८३.६८ | १३७१.५७ |
| एकूण | ५००७.४४ | १३८९.९६ | ६३९७.४० | ४४२५.२४ | १२२१.२२ | ५६४६.४६ |

स्रोत - SNA ने सादर केलेली माहिती

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **अनुदानापैकी फक्त रु. ७००.५३ कोटी (७७ टक्के) खर्च झाले होते. ज्याचे मुख्य कारण म्हणजे नोव्हेंबर २००९ मध्ये GoI ने सूचना जारी करुनही विभागाने १२ महिन्यांपेक्षा जास्त काळात स्वयंपाकावरील खर्च सुधारित केला नव्हता.**<br>शासनाने सांगितले की स्वयंपाकावरील खर्चाचे दर सुधारित करण्याच्या प्रस्तावास आणि वित्त विभागाला सादर केलेल्या पुरवणी मागणीस (मे २०१०) जुलै, २०१० मध्ये मंजूरी मिळाली होती. त्यानुसार यापुढे स्वयंपाकावरील खर्चाचे सुधारीत दर लागू करण्यासाठी फेब्रुवारी २०११ मध्ये शासन निर्णय जारी करण्यात आला होता. | निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून खर्चाचे सुधारित दर लागू करण्याबाबत निर्देश दिले होते. | | सदर पुरक निधी मागणीच्या प्रस्तावास पावसाळी अधिवेशन २०१० मध्ये विधी मंडळाची मान्यता मिळाली.<br>केंद्र शासनाने सुधारित केलेल्या दराप्रमाणे वाढ करण्याबाबतचा शासन निर्णय वित्त विभाग यांच्या मान्यतेसाठी दि.११.११.२०१० रोजी सादर करण्यात आला. वित्त विभागाकडून त्यास दि.२३.११.२०१०रोजी मान्यता दिलेली आहे. तद्नंतर सदर प्रस्ताव मा.मंत्री (शा.शि) यांच्या मान्यतेसाठी दि.१५.१२.२०१० रोजी सादर केला. सदर प्रमाणे प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झाल्या नंतर दि.२/२/२०११ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.३.३.१ | **निधी मुक्त करण्यातील विलंब**<br>GoI च्या अनुदान मुक्तता आदेशात नमूद केलेल्या अटीनुसार GoI ने योजनेसाठी अनुदान मुक्त केल्यावर त्वरीत राज्य शासनाने केंद्राकडून प्राप्त झालेल्या अनुदानावरोबर त्यांचा स्वत:चा किमान अनिवार्य तेवढाच हिस्सा SNA ला मुक्त करावा, ज्यांनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी तो आठवडयाच्या आत जिल्हे / गट / शाळा यांना मुक्त करावा. लेखापरिक्षेत खालील बाबी आढळून आल्या :<br>जिल्ह्यांना SNA कडून प्राप्त होणारी अनुदाने मुख्य लेखे व वित्त अधिकारी यांच्याकडील ZP च्या जिल्हा निधीत जमा केली जातात. ही अनुदाने नंतर शाळांना वितरीत करण्यासाठी गटांना मुक्त केली जातात. लेखापरिक्षेत असे आढळून आले की, निवड केलेल्या आठ जिल्ह्यांमध्ये (मुंबई व्यतिरिक्त) २०१०-१५ दरम्यान SNA कडून जिल्ह्यांना आणि पुढे जिल्ह्यांकडून गटांना अनुदाने मुक्त करण्यात मोठया प्रमाणात विलंब झाला होता. तक्ता २.३.३ मध्ये अनुदाने मुक्त करण्यातील विलंबाचे प्रमाण दर्शविले आहे.<br>तक्ता २.३.३ - निवड केलेल्या जिल्ह्यांमध्ये (मुंबई व्यतिरिक्त) २०१०-१५ दरम्यान अनुदाने मुक्त करण्यात झालेला विलंब<br>**जिल्हा** \| **SNA कडून जिल्ह्यांना अनुदाने मुक्त करण्यातील विलंब (आठवडयात)** \| **जिल्ह्यांकडून गटांना अनुदाने मुक्त करण्यातील विलंब (आठवडयात)**<br>चंद्रपूर \| १-११ \| ३-१२<br>धुळे \| २-२७ \| २-१३<br>जळगांव \| २-२७ \| ३-२३<br>नांदेड \| २-२७ \| १-२८<br>परभणी \| २-२७ \| ४-३४<br>पुणे \| २-२४ \| १-३१<br>सातारा \| १-२९ \| १-१९<br>सोलापूर \| १-१८ \| ३-२२<br>स्रोत - SNA व ZPs मधील शिक्षण अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती | शालेय पोषण आहार योजनेतर्गत निधी वितरण्याच्या धोरणात्मक निर्णयातील बदलामुळे सन २०१३-१४ मध्ये निधी वितरणामध्ये काही प्रमाणात उशिर झाला.<br>शाळा स्तरावर निधी वितरित करताना बऱ्याच टप्प्याद्वारे निधी वितरित होत होता. त्यामुळे शाळास्तरावर निधी मिळण्यास विलंब होत होता. त्यामुळे शिक्षण आयुक्त यांनी दि. ०३/११/२०१६ च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हयांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना इंधन-भाजीपाला अनुदान आणि स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन थेट जिल्हास्तरावरुन शाळास्तरावर RTGS द्वारे करण्याचे निर्देश दिले आहेत. सन २०१५-१६ पासून वित्त विभागाने निधी वितरणाचे अधिकार संबंधित विभागांना दिले आहेत.<br>सदर योजनेंतर्गत अन्न शिजविण्याचा खर्च संबंधित अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांना आगाऊ स्वरुपात देण्याबाबत वित्त विभागाची मंजूरी मिळू शकलेली नाही. तथापि, सन २०१८-१९ पासून इंधन व भाजीपाला यासाठीचा निधी प्राथमिक शिक्षण संचालनालयास्तरावरुन थेट शाळा व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने दि. ०२/०४/२०१८ च्या पत्रान्वये घेतला आहे. यामुळे प्रत्येक जिल्ह्यात एकाच वेळी इंधन व भाजीपाला यासाठीचा निधी जलद गतिने वितरीत करणे शक्य होणार आहे.<br>तसेच, निधी वितरण PFMS प्रणालीद्वारे होणार असल्याने याबाबत होणाऱ्या विलंबावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. | राज्यस्तरीय सनियंत्रण समितीने ऑगस्ट २०१० मध्ये आहार खर्चाची रक्कम शाळांना आगावू देण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे काय? नसल्याची त्याची कारणमिमांसा लोकलेखा समितीस सादर करण्यात येणाऱ्या उत्तरात समाविष्ट करावी.<br><br>प्रतिभा निकेतन | योजनेंतर्गत अन्न शिजविण्याचा खर्च संबंधित अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांना आगावू स्वरुपात देण्या बाबतच्या प्रस्तावास वित्त विभागाने मान्यता दिलेली नाही.<br>तथापि, सध्या इंधन-भाजीपाला अनुदान आणि स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन थेट जिल्हास्तरावरुन शाळास्तरावर RTGS द्वारे होत आहे. यामध्ये शासनाने आणखी सुधारणा केली असून सन २०१८-१९ पासून इंधन व भाजीपाला यासाठीचा निधी प्राथमिक शिक्षण संचालनालयास्तरा वरुन थेट शाळा व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.<br><br>प्रतिभा निकेतन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि सांगितले की बऱ्याच मध्यस्त पातळया असल्याने अनुदाने मुक्त करण्यात विलंब झाला होता आणि म्हणूनच सर्व ZPs ना अशा सूचना देण्यात आल्या आहेत की,** Real Time Gross Settlement (RTGS) व्दारे थेट जिल्ह्यांकडून शाळांना स्वयंपाकाचा खर्च व मानधन यासाठी अनुदाने मुक्त करावी.<br>• योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या वेगवेगळया विभागांबरोबर समन्वय प्रस्थापित करणे, धोरणात्मक निर्णय घेणे, अन्नधान्याचे वाटप व उचल यावर संनियंत्रण ठेवणे, जिल्हास्तरीय संनियंत्रण समित्यांना मागदर्शन समिती (SSMC) गठीत केली (मार्च २००५) . ऑगस्ट २०१० मध्ये मुलांना विहित दर्जा आणि मात्रेत शिजलेले अन्न देता यावे यासाठी SSMC ने शाळांना स्वयंपाकासाठीचा खर्च आगावू देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. परंतू धोरणात्मक निर्णयाच्या विरुध्द जिल्हा / गट अधिकाऱ्यांनी मात्र प्रत्यक्ष खर्च झाल्यावरच शाळांना रक्कम प्रदान करणे सुरु ठेवले. निवडक २३९ शाळांपैकी १८० शाळांमध्ये परिस्थिती अधीकच दयनीय होती कारण स्वयंपाकावरील खर्च आणि स्वयंपाकी नि सहाय्यकांचे मानधन यांची प्रतिपूर्ती करण्यात एक महिना ते २४ महिन्यांचा विलंब झाला होता. स्वयंपाकावरील खर्च व मानधनाचे प्रदान विलंबाने होण्यामुळे आवश्यक दर्जा व मात्रेत शिजवलेले अन्न पुरविण्यात तडजोड केली जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. शासनाने सांगितले की, शाळांना स्वयंपाकावरील खर्चाची रक्कम आगावू मुक्त करण्याचा निर्णय विभागाकडून वित्त विभागाशी विचारविनिमय करुन घेतला जात होता. | | प्राथमिक शाळा होळी या शाळेस २४ महिन्यासाठीची आहार खर्चाची रक्कमेची प्रतिपूर्ती न करण्याची कारणे लोकलेखा समितीस देण्यात यावीत. | प्राथमिक शाळेने दि. १५/०७/२०१३ पासून शालेय पोषण आहार योजनेचा लाभ घेण्यास सुरवात केली आहे. सदर शाळेत योजना सुरु झाल्यानंतर शासनाच्या नियमानुसार देय रक्कम संबंधित शाळेस वर्ग केली आहे. |
| | २.३.३.२ | **रोख पुस्तिका आणि बँकेची विवरणे यामधील शिल्लकींचा ताळमेळ न घेणे**<br>MCGM मुंबई येथील MDM कक्ष प्राप्त व संवितरीत अनुदानांचे लेखांकन करण्यासाठी प्राथमिक वर्गांसाठी एक आणि उच्च प्राथमिक वर्गांसाठी दुसरे अशा दोन रोख पुस्तिका ठेवते. २०१०-१५ या कालावधीसाठीच्या रोख पुस्तिकांच्या चाचणी तपासणीत सुरुवातीच्या आणि अंतिम शिल्लकींमध्ये विसंगती आढळून आल्या ज्या तक्ता २.३.४ मध्ये दर्शविल्या आहेत. | या संदर्भात मुंबई महानगरपालिकेकडून खुलासा घेण्यात आला असून सध्या मुंबई महानगरपालिके मार्फत योजनेचा निधी NEFT द्वारे वितरित करण्यात येत आहे. त्यामुळे रोख पुस्तिका व बॅक विवरण यामध्ये तफावत राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.<br>जिल्हा परिषद स्तरावर अनेक योजनांचा निधी जिल्हयाच्या जिल्हा फंडामध्ये जमा होत असतो. शालेय पोषण | सन २०१०-१५ या वर्षामध्ये खर्चाच्या ताळमेळ घेतला आहे किंवा कसे | मा. महालेखापरिक्षक यांनी सन २००९-१० ते सन २०१४-१५ या कालावधीच्या लेखा परिक्षणावेळी उपस्थित केलेल्या लेखा आक्षेपा |

**तक्ता २.३.४ रोख पुस्तिकेत नोंदलेल्या आकडेवारीतील विसंगती**

| अ क | दिनांक | अंतिम शिल्लक (रु. लाखात) | दिनांक | पुढील कामकाजा च्या दिवशीची सुरुवातीची शिल्लक (रु. लाखात) | फरक (रु. लाखात) (+) अधिक्य / (-) तूट |
|---|---|---|---|---|---|
| | प्राथमिक वर्गाची रोख पुस्तिका | | | | |
| १ | ३१-३-२०१२ | १६२८.६८ | २-४-२०१२ | १६३७.७१ | (+) ९.०३ |
| २ | ३०-३-२०१३ | १६२८.१९ | १-४-२०१३ | १६२१.८३ | (-) ६.३६ |
| | उच्च प्राथमिक वर्गाची रोख पुस्तिका | | | | |
| ३ | ३१-१२-२०११ | १८४९.५६ | २-१-२०१२ | १८१६.२२ | (-) ३३.३४ |
| ४ | ३१-१-२०१२ | १६१२.१२ | १-२-२०१२ | १६२५.३५ | (+) १३.२३ |
| ५ | २९-२-२०१२ | १४६८.८७ | १-३-२०१२ | १४८५.०३ | (+)१६.१६ |
| ६ | ३१-३-२०१२ | १२२४.२३ | २-४-२०१२ | १२३६.९३ | (+) १२.७० |
| ७ | ३०-४-२०१२ | २१११.४१ | २-५-२०१२ | १९८४.५६ | (-) १३०.८५ |
| ८ | ३१-५-२०१२ | १८९७.७५ | ४-६-२०१२ | १७८४.४७ | (-) ११३.२७ |
| ९ | ३०-०६-२०१२ | १६६१.९३ | ३-७-२०१२ | १६६१.९२ | (-) ०.०१ |
| १० | ३०-७-२०१२ | १७६९.९३ | १-८-२०१२ | १७८०.४५ | (+) १०.५२ |
| ११ | ३०-८-२०१२ | १५४०.२६ | १-९-२०१२ | १५११.४१ | (-) २८.८५ |

स्रोत - MCGM कडे ठेवलेल्या रोख पुस्तिकांमधून संकलीत केलेली माहिती

तसेच, वरील अनुक्रमांक ३ ते १० समोर नमूद केलेल्या नोंदी लेखा अधिकाऱ्याने साक्षांकीत करुनही त्यांना विसंगतीचा तपास लागला नव्हता. ३१ मार्च २०१५ रोजी प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गासाठीच्या रोख पुस्तिकेतील शिल्लकी आणि बँक विवरणे यातील फरक अनुक्रमे रु. ७.६४ कोटी व रु. ८.७७ कोटी होता ज्याचा डिसेंबर, २०१५ पर्यंत ताळमेळ घेतला गेला नव्हता.

**शिफारस क्रमांक -२**

शासनाने (i) स्वयंपाकावरील खर्च व मानधन अदा करण्यातील अडचणींवर तोडगा काढण्यासाठी शाळांना निधीचे थेट हस्तांतरण करण्यासाठी त्वरीत

आहार या योजनेसह इतर सर्व योजनांचा जिल्हा स्तरावर आलेला निधी जिल्हा फंडामध्ये जमा होतो. सदर योजनेकरिता स्वतंत्र खाते जिल्हास्तरावर उपलब्ध नाही.

जिल्हा फंडातील जमा रक्कमेवर व्याज मिळत नसल्याने व्याजाच्या खर्चाबाबत प्रश्न उद्भवत नाही.

शालेय पोषण आहार योजनेतंर्गत अन्न शिजविणे याकरिताचे अनुदान आणि स्वयंपाकी मदतनीस यांचे मानधन निधी वितरण विविध टप्यावरुन होत होते. त्यामुळे काही जिल्ह्यामध्ये अनुदान

याची माहिती लोकलेखा समितीस सादर करावी. आकडेवारीच्या विसंगतीबाबत च्या नोंदी लेखा अधिकाऱ्याने साक्षांकित करुनही त्यांना विसंगतीचा तपास लागत नव्हता याची कारणे लोकलेखा समितीस सादर करावी.

नुसार सन २००९-१० ते सन २०१४-१५ या कालावधीतील कॅश बूकचे ताळमेळ विवरणपत्र (Reconciliation) घेण्यात आलेले आहे.

सप्टेंबर २०१५ पर्यंत नियुक्त संस्थांच्या देयकांचे अधिदान धनादेशाव्दारे करण्यात येत होते. तयार करण्यात आलेल्या अधिदानाच्या रक्कमेचा धनादेश नियुक्त संस्था ज्यावेळी येतील त्यावेळी त्यांना देण्यात येत असे. ज्या दिवशी संस्थेस धनादेश देण्यात आला त्या दिवशी कॅशबूकमध्ये नोंद घेण्यात येत असे. परंतू सदरचा धनादेश संबंधित संस्था त्यांच्या सोयीनुसार बँक खात्यामध्ये जमा करत असत. त्यामुळे बँक स्टेटमेंट व कॅशबुक यांच्या शिल्लकीमध्ये तफावत दिसून आली.

शालेय पोषण

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | उपाययोजना करावी. (ii) शासकीय रक्कमेचा दुर्विनियोग होण्याचा धोका टाळण्यासाठी रोख पुस्तिकेतील शिल्लक रक्कमा आणि बँक विवरणपत्रे यामधील फरकाचा ताळमेळ घ्यावा. | वितरणास विलंब होत होता.<br>सन २०१६-१७ पासून सदील निधी जिल्हास्तरावरुन शाळास्तरावर RTGS व्दारे वितरीत करण्याचे निर्देश सर्व जिल्ह्यांना देण्यात आले आहेत. तसेच, योजनेतंर्गत अन्न शिजविण्याकरिता येणाऱ्या खर्चाचे अनुदान सन २०१८-१९ पासून राज्यस्तरावरुन थेट शाळाव्यवस्थापन समितीच्या खात्यावर PFMS प्रणालीव्दारे जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुळे एकाच वेळी सर्व शाळांना निधी वितरीत करणे शक्य झाले आहे. PFMS प्रणालीव्दारे निधी वितरण होत असल्याने रोख पुस्तिकेतील शिल्लक रक्कम व बँक विवरणपत्रामधील शिल्लक रक्कम यामधील ताळमेळ ठेवणे सुलभ झाले आहे.<br>तसेच दरवर्षी प्रत्येक जिल्ह्याकडून प्राप्त निधी खर्च निधी व अखर्चित रक्कम याबाबतचा अहवाल घेण्यात येतो. | | आहार योजनेकरीता शासनाकडून तसेच बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून पूर्णवेळ लेखाधिकारी उपलब्ध करुन दिलेला नाही. त्यामुळे कॅश बूक लेखाधिकारी यांनी तपासणी केले नव्हते. परंतु आता लेखाधिकारी यांनी ते तपासणी करुन स्वाक्षरी केली आहे. |
| | २.३.४ | योजनेची अंमलबजावणी | | | |
| | २.३.४.१ | सर्व शालेय दिवसांत शिजवलेले अन्न पुरविण्यातील तूट<br>MDM योजनेतील तरतूदीनुसार शाळेत उपस्थित असलेल्या आणि योजने अंतर्गत लाभ मिळण्यास पात्र असणाऱ्या प्रत्येक बालकाला सर्व शालेय दिवशी मध्यान्ह आहार देण्यात यावा. निवडक २६९ शाळांमधील अन्नधान्य साठा नोंदवह्या आणि इतर संबंधीत दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की, २०१०-१५ दरम्यान १७५ शाळांनी (६६ टक्के) प्रत्येक वर्षी सरासरीने सर्व शालेय दिवशी मुलांना शिजवलेलो आहार दिला नव्हता. तसेच, १७५ पैकी १८ शाळांनी प्रत्येक वर्षी ८६ शालेय दिवस व १७५ पैकी चार शाळांनी १४६ शालेय दिवस शिजवलेला आहार दिला नव्हता. नांदेड जिल्ह्यातील दोन शाळांनी २०१२-१४ व २०१४-१५ दरम्यान मुलांना कोणताही आहार पुरविला नव्हता.<br>सर्व शालेय दिवशी मुलांना शिजवलेला आहार न देण्याबद्दल २३९ शाळांपैकी ७९ शाळांनी (i) SNA ने नियुक्त केलेल्या कंत्राटदाराकडून तांदूळ मिळण्यातील विलंब आणि (ii) स्वयंपाकावरील खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यातील | शाळास्तरावर २० शालेय दिवस पुरेल इतका धान्य साठा शिल्लक असताना शाळांनी तांदुळ व धान्यादि मालाची मागणी पुरवठा दाराकडे नोंदविण्यात येते. पुरवठेदारानी मागणी नोंदविल्यानुसार २० कार्य दिवसाच्या आत मालाचा पुरवठा न केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.<br>विहित कालावधीत पुरवठा न केलेल्या खंडीत पुरवठयापोटी खुल्या बाजारातून धान्यादी मालाचे खरेदी शाळांनी केल्यास त्यासाठी येणारा अतिरिक्त खर्च पुरवठेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल, अशी तरतूद करारानाम्यात नमूद आहे. तसेच, पुरवठेदाराने तांदूळ व धान्यादी मालाचा उशिरा पुरवठा केल्यास त्यास दंड आकारण्याची तरतूद करारनाम्यात नमूद केली आहे. | सन २०१०-१५ या कालावधीत १६१ शाळामध्ये सर्व शालेय दिवशी आहार न पुरविण्याची कारणे अभिप्रायामध्ये नमूद केलेली नाहीत व याबाबत दिलेले उत्तर समाधानकारक | बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील अशाप्रकारे आहार वितरीत न केल्याबाबत ज्या शाळांची नावे नमूद करण्यात आली होती अशा शाळांकडून खुलासा मागविण्यात आला असता सदर शाळांनी एप्रिलमध्ये परिक्षा झाल्यानंतर विद्यार्थी शाळेत न येणे, स्वाईन फ्ल्युमुळे शाळा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **विलंब ही कारणे दिली होती. उर्वरित १६१ शाळांनी सर्व शालेय दिवशी आहार न पुरविण्यासाठी कोणतीही विशिट कारणे दिली नाहीत.**<br>**तसेच, योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये (परिच्छेद ३.३) विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे राज्यांनी** प्रत्येक शाळेत अन्नधान्याचा किमान एक महिन्याचा राखीव साठा ठेवण्यात येत असल्याची खात्री करावी. २३९ शाळांमधील ३१ मार्च रोजी असलेला तांदूळाचा शिल्लक साठा तपासला असता असे आढळून आले की तांदूळ मिळण्यास विलंब झाल्यास मध्यान आहार पुरविण्यात खंड पडू नये यासाठी राखून ठेवावयाचा एक महिन्याचा राखीव साठा २०१०-१५ दरम्यान सरासरी १३८ शाळांमध्ये ठेवण्यात आला नव्हता.<br>शासनाने सांगितले की सर्व शालेय दिवशी आहार पुरविण्यात न आल्याबद्दल संबंधित जिल्ह्यांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. | पुरवठेदाराने मालाचा पुरवठा न केल्यास व त्यामुळे विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहिल्यास विद्यार्थ्यांना अन्न सुरक्षा भत्ता देण्याची तरतुद दि. २/२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.<br>तसेच, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांच्या आहारात खंड पडणार नाही, याची दक्षता घेण्याबाबत सर्व क्षेत्रिय यंत्रणांना निर्देश देण्यात आले आहेत. | नाही.<br><br>मध्यान्ह भोजन आहार पुरविण्यात खंड पडू नये यासाठी राखून ठेवायचा एक महिन्याचा राखीव साठा सन २०१०-१५ दरम्यान सरासरी १३८ शाळामध्ये ठेवण्यात आला नव्हता. याची कारणे देण्यात यावीत. | बंद असणे, अतिवृष्टी, स्थानिक दुर्घटना, अनध्यायन दिन, शालेय सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय क्रिडास्पर्धा, शैक्षणिक सहल इत्यादी कारणांमुळे आहार वितरीत केले नसल्याचे नमूद केले आहे.<br>शाळांमध्ये किमान २० दिवस धान्यसाठा शिल्लक असताना शाळांकडून धान्यादी मालाची मागणी देणे आवश्यक आहे. मागणी प्राप्त होताच पुढील ५ दिवसात पुरवठेदारा कडून धान्यादी मालाचा पुरवठा होणे आवश्यक आहे.<br>काही जिल्हयातील शाळांमध्ये विलंबाने पुरवठा झाला असल्याने संबंधित पुरवठेदारा कडून दंड वसूल करण्यात आला आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.३.४.२ | **स्वयंपाकाच्या खर्चाच्या प्रदानात आणि तांदूळाची उचल / वापर करण्यातील अपर्याप्तता / त्रुटी**<br>**योजनेत प्राथमिक व उच्च प्राथमिक** वर्गातील प्रत्येक बालकासाठी अनुक्रमे १०० ग्रॅम आणि १५० ग्रॅम इतका तांदूळ पुरविण्याची तरतूद होती. २००८-०९ पासून प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळामधील मुलांना शिजवलेले अन्न देण्याचे कार्य MCGM ने मुंबईतील ISKCON फूड रिलिफ फाउंडेशन वर सोपविले.<br>नोव्हेंबर २०१२ मध्ये (i) GoI चे १०० ग्रॅम आणि १५० ग्रॅम हे प्रमाणक अधिक असल्याच्या सबबीवर प्रती बालक प्रती दिवस सरासरी ४० ग्रॅम तांदूळाची उचल करण्यास परवानगी दयावी आणि (ii) तांदूळ शिजवताना त्यात इतर पदार्थ मिसळले जाणार असल्याने स्वयंपाकावरील खर्चात त्या प्रमाणात कपात केली जाऊ नये अशी ISKCON ने MCGM ला विनंती केली.<br>MCGM ने ही बाब विभागाकडे संदर्भित केली आणि विभागाने त्याचे पुनर्विलोकन केल्यावर GoI ने विहित केलेल्या उष्मांक व प्रथिने घटकांचे प्रमाण कायम रहावे यासाठी तांदूळात डाळी, शेंगदाणे इत्यादी अतिरिक्त पदार्थ मिसळले जाणार असतील तर प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांसाठी प्रती बालक प्रती दिवस अनुक्रमे ५० ग्रॅम व ७५ ग्रॅम तांदूळ वापरण्यास ISKCON ला परवानगी दिली (मे २०१३).<br>MCGM मधील दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की २०१०-१५ दरम्यान MCGM ने ६.८५ कोटी भोजनांच्या स्वयंपाकाच्या खर्चापोटी ISKCON ला ₹. २३.५१ कोटी अदा केले. प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांसाठी रु. १०० ग्रॅम व भात शिजवण्यासाठी निश्चित केलेल्या तत्कालीन दराने रु. २३.५१ कोटी इतका स्वयंपाकावरील खर्च अदा करण्यात आला होता. शासनाने सांगितले की, ISKCON ने तांदूळ शिजवताना त्यात इतर पदार्थ मिसळल्याने १०० ग्रॅम व १५० ग्रॅम साठीच्या संपूर्ण स्वयंपाकाचा खर्च अदा करण्यात आला होता.<br>स्वयंपाकावरील रु. २३.५१ कोटीचा संपूर्ण खर्च अदा करणे आणि त्याच्या समर्थनार्थ शासनाने दिलेले स्पष्टीकरण तर्कसंगत नव्हते कारण MCGM ने २०१०-१५ दरम्यान ISKCON च्या मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून प्राप्त केलेले तयार अन्नाचे सर्व २३६ नमूने त्यांच्यातील उष्मांक व प्रथिने घटक GoI | शासन निर्णय दि. १८ जून, २००९ अन्वये प्राथमिकसाठी विविध केलेली पाककृतीनुसार शिजविलेल्या आहाराचे वजन 300 ते 325 ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी ४५० ते ४७५ ग्रॅम असे नमूद केले होते.<br>शासन निर्णय दिनांक ०२/०२/२०११ नुसार शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खर्चाचे सुधारित दर लागू करुन मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. प्रस्तुत शासन निर्णयामध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत द्यावयाच्या पाककृतीचा तपशिल परिशिष्ट-अ मध्ये नमूद केला आहे. सदर तपशिलामध्ये विहित पाककृती नमूद करुन पाककृती निहाय तांदूळ व धान्यादी माल वापरण्याचे प्रमाण दिले आहे. सदर शासन निर्णयानुसार इयत्ता १ ली ते ५ वीसाठी १०० ग्रॅम तांदूळ व इतर आवश्यक पूरक पदार्थ (कडधान्य, भाजीपाला) वापरुन प्रतिविद्यार्थी २५० ते २७५ ग्रॅम वजनाचा ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार आणि इयत्ता ६ वी ते ८ वीसाठी १५० ग्रॅम तांदूळ व इतर आवश्यक पूरक पदार्थ (कडधान्य, भाजीपाला) वापरुन प्रतिविद्यार्थी ३७५ ते ४०० ग्रॅम वजनाचा ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार द्यावयाचा आहे.<br>शासनाने विहित केलेली पाककृती व वापरावयाचे धान्यादी मालाचे घटक यानुसार प्रत्यक्षात अन्न शिजविले असता त्याचे वजन प्रस्तुत शासन निर्णयात नमूद केलेल्या वजनापेक्षा जास्त येत असल्याचे दिसून आले आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत शासनाने विहित केलेले पाककृती नुसार अन्न शिजविल्यास त्याचे वजन प्राथमिकसाठी ४२५ ते ४६० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी ७६४ ग्रॅम इतकी येत असल्याचे आढळून आले आहे. शिजविलेल्या अन्नाचे वजन हे त्यामध्ये वापरलेले अन्न, भाजीपाला व पाण्याचे प्रमाण यावर बऱ्याच अंशी अवलबून असते. | केंद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेतर्गत विहित केलेल्या उष्मांक व प्रथिने या घटकाचे प्रमाण कायम रहावे यासाठी तांदूळात डाळी, शेंगदाणे इ. अतिरिक्त पदार्थ मिसळले जाणार असल्याच्या अटीवर ईस्कॉन या संस्थेस प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गासाठी प्रती बालक प्रति दिवस अनुक्रमे ५० ग्रॅम व ७५ ग्रॅम तांदूळ वापरण्यास परवानगी दिली होती हा विभागाचा खुलासा | केंद्र शासनाने विहित केलेल्या प्राथमिक साठी १०० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी १५० ग्रॅम तांदूळापासून तयार केलेली खिचडी विद्यार्थ्यांना जास्त होत असल्याने पोषण व आरोग्य क्षेत्रातील तज्ञांनी समिती स्थापन करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.<br>त्यानुसार प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाने विहित केलेल्या तांदूळाऐवजी प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांना अनुक्रमे ५० ग्रॅम व ७५ ग्रॅम तांदूळ शिजवून त्यामध्ये डाळी, शेंगदाणे, भाजीपाला इ.प्रमाण वाढविल्यास त्यानुसार केंद्र शासनाच्या निकषानुसार उष्मांक व प्रथिने देता येतील, असे अभिप्राय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ने विहित केलेल्या प्रमाणात नसल्याने प्रयोगशाळेतील चाचण्या अनुत्तीर्ण पोषणमुल्य कायम ठेवण्यासाठी त्यामध्ये डाळी, शेंगदाणे इत्यादी अतिरिक्त पदार्थ मिसळले गेले नव्हते अशी धारणा होण्यास कोणतीच शंका नव्हती आणि म्हणूनच २०१०-१५ दरम्यान ISKCON ने उचल केलेल्या प्रत्यक्ष तांदूळाच्या मात्रेच्या (२४,३११.६० क्विंटल) आधारावर रक्कम प्रमाणशीर कमी करुन ISKCON ला स्वयंपाकासाठी अदा करावयाची रक्कम रु. ६.८२ कोटी इतकी मर्यादित ठेवण्यासाठी MCGM कडे सबळ कारण होते. परंतु अशी कोणतीही कारवाई MCGM ने केली नाही. तसेच MCGM ने ISKCON शी शिजवलेले अन्न पुरविण्याविषयी केलेल्या करारामध्ये (प्रत्येक वर्षी पुनरुज्जीवीत करावयाचा) जर ISKCON कडून आवश्यक दर्जाचे व वैशिष्ठयपूर्ण अन्न पुरविले गेले नाही तर अशा प्रसंगी दंड आकारण्याविषयी कोणतीही अट समाविष्ट नव्हती. लेखापरीक्षकांच्या असे निदर्शनास आले की, २०१०-१५ दरम्यान २३६ नमूने चाचणीत अनुत्तीर्ण झाल्यावर MCGM ने अशा प्रत्येक अनुत्तीर्ण नमून्यासाठी ISKCON वर फक्त रु. २००० दंड आकारला परंतू २०१०-१५ दरम्यान ISKCON ला अदा केलेल्या वाढीव स्वयंपाक खर्चाच्या (रु. २३.५१ कोटी) वैधतेचे किंवा आवश्यकतेचे मूल्यमापन केले नव्हते. | उपरोक्तप्रमाणे प्रत्यक्षात केलेल्या प्रात्यक्षिकाच्या आधारे प्राथमिकसाठी ४०० ते ४५० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी ७०० ते ७५० ग्रॅम येत असल्याचे दिसून आल्याने प्रस्तुत शासन निर्णयात बदल करुन दि.२८/११/२०१७ च्या शासन निर्णयान्वये इयत्ता १ ली ते ५ वीसाठी शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ४०० ते ४५० ग्रॅम वजनाचा ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार आणि इयत्ता ६ वी ते ८ वी साठी शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ७०० ते ७५० ग्रॅम वजनाचा ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार द्यावयाचा आहे, अशी सुधारणा करण्यात आली.<br><br>मुंबई मधील सर्व मध्यवर्ती स्वयंपाकगृहातील तांदूळाचा साठा तपासण्यासाठी मुंबई महानगरपालिकेमार्फत तपासणी पथकाची स्थापना करुन त्यामार्फत प्राप्त तांदूळ, वापरात आलेला तांदूळ व शिल्लक तांदूळ यांचा आढावा घेण्यात आला आहे.<br><br>ईस्कॉन या सेवाभावी संस्थेकडून शालेय पोषण आहार योजना राबविण्यासाठी वेगवेगळया परदेशी तसेच भारतीय संस्थाकडून देणग्या घेतल्या असल्याने याबाबत खुलासा सादर करण्यास शासनाने दि. ११/०३/२०१५ च्या पत्रान्वये ईस्कॉन या संस्थेस कळविले होते. त्यावर ईस्कॉनने दि. ०८/०४/२०१५ च्या पत्रान्वये याबाबत केंद्र सरकारने दि.१२/०२/२०१५ रोजीच्या पत्रानुसार आपल्या संस्थेस अशाप्रकारे देणग्या गोळा करण्यास अनुमती दिल्याचे शासनास कळविले आहे. | समाधानकारक नाही.<br><br>तसेच, MCGM ने २०१०-१५ या वर्षात ईस्कॉनच्या केंद्रीय स्वयंपाकगृहात शिजवलेल्या २३६ अन्नाचे नमूने केंद्र शासनाने विहित केलेले आवश्यक उष्मांक व प्रथिने घटक याबाबतीत प्रयोगशाळा चाचणीमध्ये अनुत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे पोषणमुल्य कायम ठेवण्यासाठी ईस्कॉन ने आहार शिजविताना डाळी, शेंगदाणे | सदर समितीने सादर केले होते.<br><br>यानुसार ज्या संस्था आहारात डाळी, शेंगदाणे, भाजीपाला इ. प्रमाण वाढवून किंवा तत्सम प्रथिने व कॅलरीयुक्त घटक खिचडीमध्ये घालून शासनाने विहित केलेल्या अनुदानात प्राथमिक वर्गासाठी ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिने तसेच उच्च प्राथमिक वर्गासाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिनयुक्त आहार पुरविण्यास तयार असतील त्यांना प्राथमिकसाठी १०० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी १५० ग्रॅम पेक्षा कमी म्हणजे आवश्यक तेवढा तांदूळ उचलण्यास शासनाने दि.०७/०५/२०१३ च्या पत्रान्वये परवानगी दिली आहे.<br><br>शालेय पोषण आहार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | विभागाने ISKCON च्या बाबतीत ज्यावेळी प्रती बालक प्रती दिवस ५० ग्रॅम तांदूळाची (प्राथमिक वर्गांसाठी) आणि ७५ ग्रॅम तांदूळाची (उच्च प्राथमिक वर्गांसाठी) उचल अशी प्रमाणकातील घट मान्य केली होती त्याचवेळी मुंबईतील ३,४१९ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना जी २८८ इतर मध्यवर्ती स्वयंपाकगृहे शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करीत होती ती मात्र GoI च्या प्रमाणकानुसार प्रतीबालक प्रती दिवस १०० ग्रॅम व १५० ग्रॅम तांदूळाची उचल करीत होती हे आश्चर्यकारक होते. परंतु या २८८ मध्यवर्ती स्वयंपाकगृहांनी तांदूळाच्या साठा नोंदवह्या न ठेवल्यामुळे प्राप्त झालेला व वापरलेला तांदूळ यांचे प्रत्यक्ष प्रमाण विभागाला पडताळता न आल्याने ही समस्या आणखीन वाढली. योगायोगाने, वाहतूक कंत्राटदाराने बेकायदेशीररित्या आर्थिक लाभ प्राप्त करण्यासाठी वेगवेगळया मध्यवर्ती स्वयंपाकगृहातील (२८८ पैकी) तांदूळ मोठया प्रमाणात खुल्या बाजारात वहवल्याच्या तक्रारीबद्दल विभागाने आधीच तपासणी सुरु केली होती. यावरुन मुंबईतील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील मुलांना किती तांदूळाची प्रत्यक्षात आवश्यकता आहे याचा आढावा घेण्यासाठी विभागाने त्वरीत हस्तक्षेप करण्याची गरज आधोरेखीत होते.<br><br>ISKCON च्या २००९-१४ च्या वार्षिक लेख्यांवरुन असे आढळून आले की ISKCON ने MDM योजनेसाठी वेगवेगळया परदेशी तसेच भारतीय संस्थांकडून रु. ३६.०८ कोटीच्या देणग्या प्राप्त केल्या होत्या. या योजनेसाठी केंद्र / राज्य शासनाकडून संपूर्णपणे निधी प्राप्त होतो आणि मुलांना शिजविलेले अन्न पुरविण्यासाठी विहीत प्रमाणकांनुसार निधी मुक्त केला जात होता म्हणून MDM योजनेसाठी ISKCON ने देणग्या स्वीकारणे अयोग्य होते. शासनाने सांगितले की ISKCON कडून स्पष्टीकरण मागवण्यात आले होते व ISKCON ने सादर केलेले उत्तर पुढील कारवाईसाठी GoI कडे पाठविण्यात आले होते (ऑक्टोबर २०१५). | | इत्यादी अतिरिक्त पदार्थ मिसळले नव्हते हे स्पष्ट होते. त्यामुळे ईस्कॉनने उचल केलेल्या प्रत्यक्षा तांदळाच्या मात्रेच्या आधारावर प्रमाणशीर रक्कम कमी करुन स्वयंपाकासाठी अदा करावयाची रक्कम मर्यादित ठेवण्यासाठी MCGM कडे सबळ कारण होते. महाराष्ट्र शासनाने सदर रक्कम मर्यादित ठेवण्याबाबत अथवा याबाबत कोणत्याही सूचना MCGM | योजने अंतर्गतच्या शासन निर्णयानुसार इतर जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात आहार तयार करण्यासाठी धान्यादी माल पुरविण्यासाठीचा खर्च आणि इंधन व भाजीपाला यासाठी लागणार खर्च असे अनुदान दिले जाते. सदर शासन निर्णयानुसार वृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आहार पुरवठा करणाऱ्या ईस्कॉन फूड रिलिफ फाऊंडेशन व इतर महिला संस्था यांना करण्यात आलेले अधिदान हे त्यांनी उचल केलेल्या तांदूळाच्या प्रमाणात न करता त्यांनी प्रत्यक्षात आहार शिजवून वितरीत केलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार करण्यात आले आहे.<br><br>दि.०२/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार इयत्ता १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ला दिलेल्या नाहीत. | ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी १०० ग्रॅम तांदूळामध्ये इतर अावश्यक (कडधान्य, भाजीपाला, इत्यादी) मिसळून साधारण वजन २५० ते २७५ ग्रॅम एवढया वजनाचे ५५० उष्मांक व १२ ग्रॅम वा त्यापेक्षा जास्त प्रथिनेयुक्त आणि इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी १५० ग्रॅम तांदूळामध्ये इतर आवश्यक (कडधान्य, भाजीपाला इ.) मिसळून साधारण वजन ३७५ ते ४०० ग्रॅम एवढया वजनाचे ७०० उष्मांक व २० ग्रॅम वा त्यापेक्षा जास्त प्रथिनेयुक्त आहाराचे वितरण करावयाचे होते. पुरवठा करावयाच्या आहाराचे प्रमाण लक्षात घेता प्रचलित पध्दतीने आहार , नमून्याची तपासणी महापालिका प्रयोगशाळेत केली असता दिनांक |
| | | | मुंबईतील २८८ केंद्रिय स्वयंपाकगृहां नी केंद्र शासनाच्या निकषानुसार प्राथमिकसाठी १०० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी १५० ग्रॅम तांदूळ प्रमाणे तांदळाची उचल केली आहे. याची कारणमीमांसा देण्यात यावी. शासनाच्या उत्तरात याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. ईस्कॉनला देशातून व परदेशातून वेगवेगळ्या संस्थाकडून | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | देणग्या घेण्याबाबत केंद्र शासनाने दिलेल्या परवानगीबाबत ची माहिती लोकलेखा समितीस देण्यात यावी. | ०२/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील विहित प्रमाणाप्रमाणे भरत नसल्यामुळे इतर पुरवठादार संस्थांप्रमाणे ईस्कॉन फूड रिलिफ फाऊंडेशन यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. सदर बाबत मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार दिनांक २१/०६/२०१७ रोजी महापालिका प्रयोगशाळेत नमुना आहार तयार करुन पाहण्यात आला. त्यावेळी शासन निर्णयात नमूद वजन व प्रत्यक्षात तयार केलेल्या आहाराचे वजन यात तफावत आढळून आली. यासंदर्भात निर्माण होणाऱ्या विसंगती दूर करण्यासाठी प्रयोगशाळेत प्रत्यक्ष बनविलेल्या खिचडीच्या वजनाबाबतचे निकष संदर्भ म्हणून वापण्यात |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | यावेत अशी शिफारस मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग याना करण्यात आली होती. सदर शिफारशीनुसार दिनांक २८/११/२०१७ रोजी शासनाने शुध्दीपत्रक निर्गमित करुन शिजविलेल्या आहाराच्या वजनामधील बदल दिनांक ०२/०२/२०१९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचे निर्देश दिले. दिनांक २८/११/२०१७ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकातील नमूद आहार वजनाप्रमाणे पोषण मूल्याचे परिगणन केले असता २३६ पैकी १९५ नमुने पात्र ठरतात.<br>शासन निर्णयानुसार प्राथमिक गटाकरिता (इयत्ता १ ली ते ५ वी) १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक गटाकरिता (इयत्ता ६ वी ते ८ वी) १५० ग्रॅम कच्चा तांदूळ पाहून |

| | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | गुंतवणूक केली आहे. याकरिता अनुदान किंवा सवलत घेतलेली नाही. तसेच, शालेय पोषण आहार योजना सुरवातीला राबविणेकरिता व विदयार्थ्यांना आहार पुरवठा करणेकरिता आवश्यक असलेला भाजीपाला व इतर सामान खरेदीकरिता सोशल ऑर्गनायझर, महामंडळ व वैयक्तिकरित्या देणगी स्विकारुन कारभार चालविला जातो. पोषण आहार शिजविण्याकरिता मिळणारे अधिदान मिळणेकरिता ६ ते ८ महिने उशीर होत आहे. त्यामुळे कामकाज सुरळीत ठेवणेकरिता देणगी स्वरुपात किंवा बँकेकडून कर्ज घेऊन वापर करावा लागत आहे, असे त्यांनी त्यांच्या ०२/१२/२०१६ रोजीच्या पत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | तसेच, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या सूचनापत्राव्दारे ईस्कॉन फूड रिलिफ फाऊंडेशन यांना देणगी स्विकारण्यात परवानगी दिली आहे. सदर पत्राची प्रत ईस्कॉन फूड रिलिफ फाऊंडेशन यांच्याकडून देण्यात आलेली आहे. |
| | २.३.४.३ | **शिजविलेल्या आहाराचे नमूने अनुत्तीर्ण ठरण्याची मोठया प्रमाणातील टक्केवारी**<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये विहित केल्यानुसार MDM मधील पोषण घटक प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गासाठी अनुक्रमे (i) उष्मांक ४५० ते ७०० आणि (ii) प्रथिने १२ ग्रॅम व २० ग्रॅम असणे आवश्यक होते. २०१०-१५ दरम्यान मुंबईमधील २८९ मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून घेतलेल्या आणि MCGM ने त्यांच्या दादर येथील महापालिका प्रयोगशाळेत चाचणी केलेल्या शिजविलेल्या अन्नांच्या १६०० नमुन्यांपैकी १५४६ नमूने (९७ टक्के) त्यातील उष्मांक व प्रथिनांच्या प्रमाणासाठी GoI ने विहीत केलेली मात्रा पूर्ण करण्यात अपयशी ठरले होते. उत्तीर्ण न झालेल्या नमुन्यांची अतीव जास्त टक्केवारी ही मुलांना देण्यात येणारे शिजवलेले अन्न, दर्जा, योजनेतंर्गत निश्चित केलेल्या पोषण मुलांच्या प्रमाणकांशी समतूल्य नव्हते याचे निदर्शक होती. तसेच MCGM व्यतिरिक्त राज्यातील ३३ ZPs पैकी एकही ZP ने २०१०-१५ दरम्यान शिजविलेल्या अन्नातील उष्मांक मुल्य व प्रथिनाची मात्रा तपासण्यासाठी त्याची चाचणी केली नव्हती. जर शिजविलेल्या अन्नाची चाचणी केली गेली असती तर त्याचे अधिक चांगले परिणाम प्राप्त झाले असते कारण ZPs नियंत्रणाखालील बहुसंख्य शाळा ग्रामीण भागात चालवल्या | शालेय पोषण आहार योजनेतंर्गत तयार अन्नाचे नमूने अन्न प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्याबाबत स्वतंत्र आर्थिक तरतूद उपलब्ध नाहीत.<br>ग्रामीण भागातील शाळांमध्ये आहार शिजविण्याचे काम गरजू महिला किंवा महिला बचत गट यांच्याद्वारे होत असून निधी अभावी तसेच, स्थानिक पातळीवर शासकीय प्रयोगशाळा उपलब्ध नसल्याने त्यांना तयार आहाराचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे शक्य होत नाही. तथापि, नागरी भागातील शाळांमध्ये केंद्रीय स्वयंपाकगृह पध्दतीने आहार दिला जात असल्याने केंद्रीय स्वयंपाकगृह चालविणाऱ्या संस्थाद्वारे अन्नांचे नमूने नियमितपणे तपासण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.<br>क्षेत्रिय यंत्रणेमार्फत अन्न शिजविण्यासाठी लागणारा धान्यादी माल व भाजीपाला प्रमाणानुसार वापरतात किंवा कसे याची वेळोवेळी तपासणी केली जाते.<br>अन्नाचे नमूने तपासणीमध्ये अनुत्तीर्ण ठरल्यास शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई यांना नियमानुसार अन्न शिजविणाऱ्या | २८९ केंद्रीय स्वयंपाकगृहावर कोणती कारवाई केली याची माहिती देण्यात यावी. ग्रामीण भागात शिजवलेल्या अन्नाची तपासणी करण्यासाठी विभागाने काही यंत्रणा उभी केली असल्यास त्याची माहिती दयावी. | शासन निर्णयानुसार रासायनिक विश्लेषणामध्ये अनुत्तीर्ण ठरलेल्या आहाराच्या नमुन्यांबाबत संबंधित आहार वितरण करणाऱ्या संस्थेला प्रती नमूना रु. २०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच, त्यांनी शासनाने विहित केलेल्या उष्मांक व प्रथिनेयुक्त आहाराचे वितरण न केल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | जातात आणि त्यांच्याकडे मुबईतील मध्यवर्ती स्वयपाकगृहात उपलब्ध असणाऱ्या आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध नसतात.<br>शासनाने सांगितले की, ज्या मध्यवर्ती स्वयपाकगृहातून प्राप्त करण्यात येणारे नमूने वाचणीत वारंवार अपयशी ठरत होते त्याव्याविरुध्द सक्त कारवाई करण्याच्या सूचना MCGM ला दिल्या जात होत्या. | यंत्रणावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. | | शासन निर्णयानुसार आहारामध्ये विहित प्रमाणात प्रथिने व उष्मांक प्राप्त होतील यासाठी प्रशिक्षण देण्यात आले आहे.<br>स्थानिक पातळीवर शासकीय प्रयोगशाळांचा अभाव व अन्न नमूने तपासणीसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद नसल्याने प्रत्येक शाळेतील शिजविलेल्या अन्न नमूना तपासणीसाठी पाठवता येत नाही. तथापि, शिजविलेल्या अन्नाची प्रथमत: अन्न शिजवणाऱ्या यंत्रणा, शिक्षक, नागरिक यांच्यामार्फत चव घेतली जाते. तदनंतर विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप करण्यात येते. शिजविलेल्या अन्नाचा नमूना रोज दुसऱ्या दिवसापर्यंत जतन केला जातो. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.३.४.४ | मुलांच्या आरोग्य तपासणीतील तूट / कमतरता<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये (परिच्छेद २.५) इतर विकास कार्यक्रमांशी एककेंद्राभिमुखतेने मुलांची नियमीत आरोग्य तपासणी करण्याची तरतूद आहे. लेखापरीक्षकांच्या असे निदर्शनास आले की, २०१०-१५ दरम्यान निवडक २६९ शाळांपैकी ६४ शाळांनी अनिवार्य असूनही वार्षिक आरोग्य तपासण्या केल्या नव्हत्या. तसेच, निवडक २६९ शाळांपैकी ३९ शाळांनी २०१०-१५ दरम्यान एकही आरोग्य तपासणी केली नव्हती. तसेच, निवडक २६९ शाळांपैकी ज्या ८१ शाळांमध्ये आरोग्य तपासण्या केल्या गेल्या होत्या त्यांच्याकडील मुलांच्या तपासणी व संदर्भपत्रामध्ये त्यांची उंची, वजन, शरीर वस्तूमान निर्देशांक इत्यादी महत्वपूर्ण तपशील नोंदला जात नव्हता. यावरुन असे दर्शविले गेले की शिजवलेले अन्न / सूक्ष्मपोषण द्रव्ये आणि इतर पूरक आहाराचा मुलांच्या एकंदर पोषण आणि आरोग्यविषयक स्थितीवर होणारा परिणाम मोजण्यासाठी राज्य शासनाकडे सुयोग्य कार्यतंत्र नव्हते.<br>शासनाने सांगितले की, सर्व शाळांमध्ये आरोग्य तपासण्या केल्या जातील याची खात्री करण्यासाठी आरोग्य विभागाला सर्व शाळांची यादी देण्याच्या सूचना जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. शासनाने पुढे असेही सांगितले की, सर्व शाळांमध्ये वार्षिक आरोग्य तपासणी केली जाईल याची खात्री करण्यासाठी अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण यांना देखील विनंती करण्यात आली आहे. | शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळांची यादी संबधित जिल्हयांच्या आरोग्य विभागास देऊन आरोग्य विभागामार्फत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याबाबत सर्व संबधित शिक्षणाधिकारी यांना दि.०३/१२/२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br>तसेच, याबाबत केलेल्या तपासणीचा आढावा सर्व जिल्हयातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्याबाबत दि.२४/११/२०१४ च्या पत्रान्वये घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>अतिरिक्त संचालक, कुंटूब विकास यांना मानकानुसार आरोग्य तपासणी करण्याबाबत दि.१४/०३/२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br>सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये जिल्हयांमध्ये झालेल्या आरोग्य तपासणीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.<br>शाळा स्तरावर पुरविण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये प्रत्येकी ३ महिन्याला विद्यार्थ्यांच्या वजन व उंचीची मापे घेऊन नोंद केली जाते. त्याआधारे मुलांचा BMI परिगणित केला जातो. | सन २०१०-१५ मध्ये ३९ शाळांमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी का करण्यात आलेली नाही याची माहिती लोकलेखा समितीस देण्यात यावी. | शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याबाबत वेळोवेळी संबधित शिक्षणाधिकारी व आरोग्य विभागास निर्देश देण्यात आलेले होते. तथापि, काही शाळातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आलेली नाही.मात्र यापुढील काळात सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.<br>शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याबाबत सर्व शिक्षणाधिकारी यांना दि.३/१२/२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळाची यादी संबंधित |

| वर्ष | एकूण शाळा | विद्यार्थी संख्या | आरोग्य तपासणी झालेली शाळा | आरोग्य तपासणी झालेली विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| सन २०१४-१५ | ८१४१० | ९५५३९२८ | ६४४२८ | ६८००३४० |
| सन २०१५-१६ | ८२०९८ | ९०२२९०७५ | ६७४६४ | ८०९१५८४ |
| सन २०१६-१७ | ८४५५३ | १००५४८०६ | ६८९९३ | ७८५१२८९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | जिल्हयाच्या आरोग्य विभागास देऊन आरोग्य विभागामार्फत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याबाबत सर्व संबंधित शिक्षणाधिकारी यांना दि.०३/१२/२०१४ व दि.२४/११/२०१४ च्या पत्रान्वये आरोग्य विभागास कळविण्यात आले आहे.<br>तसेच, याबाबत केलेल्या तपासणीचा आढावा सर्व जिल्हयातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्याबाबत दि.२४/११/२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.<br>शाळा स्तरावर पुरविण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये प्रत्येकी ३ महिन्याला विद्यार्थ्यांच्या वजन व उंचीची मापे घेऊन नोंद केली जाते. त्याआधारे मुलाचा BMI परिगणित केला जातो. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २.३.४.५ | **दुय्यम दर्जाची स्टेनलेस स्टिलची खणाची ताटे खरेदी करणे**<br>मुलांना शिजवलेला आहार वाढण्यासाठी SNA ने फेब्रुवारी व ऑगस्ट २०१३ दरम्यान रु. ५३.४९ कोटी रक्कमेची स्टेनलेस स्टीलची खणाची ५२.७५ लाख ताटे पुरविण्यासाठी DGS&D कडून मान्यताप्राप्त चार दर कंत्राटदारांना १२ खरेदी आदेश दिले. खरेदी आदेशातील शर्ती व अटींनुसार भारतीय मानक विभागाने विहित केलेल्या IS १४७५६:२००० एवढी स्टील पट्टयांची (०.७ मी.मी) व ताटाची (०.५५ मी.मी.) किमान जाडी असावयाची होती. तसेच, प्रत्येक ताटावर उत्पादकाचे नाव किंवा आदयाक्षरे किंवा उत्पादन चिन्ह यासह "स्टेनलेस स्टील" किंवा "SS" असा सुवाच्य/ठळक आणि पक्का शिक्का असावयाचा होता. एप्रिल, २०१३ ते नोव्हेंबर, २०१३ दरम्यान सर्व ताटांचा पुरवठा केला गेला आणि एप्रिल, २०१३ व मे २०१४ दरम्यान कंत्राटदाराला रु. ५३.४९ कोटी अदा केले गेले. या व्यवहाराशी संबंधित खरेदी / प्रदानांच्या नस्ती व इतर दुय्यम दस्तावेजांच्या तपासणीत खालील बाबी आढळून आल्या.<br>सुपरीटेंडंस कंपनी ऑफ इंडिया (प्रायव्हेट) लिमिटेड, मुंबई (राज्य शासनाची अधिकृत प्रमाणन संस्था) ने केलेल्या पुरवठापूर्व व पुरवठापश्चात निरीक्षणांमधून ही ताटे फक्त व्यास व उंचीच्या बाबतीत तांत्रिक परिमाणांशी सुसंगत असल्याचे दर्शविले गेले होते. परंतु, संस्थेने दिलेल्या निरीक्षण / चाचणी प्रमाणपत्रात ०.५५ मी.मी. इतक्या किमान जाडीच्या अनिवार्य परिमाणाएवढी या ताटांची जाडी असल्याविषयी कोणताही उल्लेख नव्हता. अशाप्रकारे अनिवार्य परिमाण पूर्ण न करणारी ही ताटे कोणत्या परिस्थितीत स्वीकारली गेली तिचे आकलन होणे कठीण होते.<br>निवडक नऊ जिल्ह्यांपैकी सहा जिल्ह्यांमधील दस्तऐवजांच्या तपासणीत तीन खरेदी आदेशांनुसार पुरवठा केलेल्या ताटांचे २२ नमूने लेखापरीक्षकांनी यादृच्छीक पध्दतीने निवडले आणि शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था (IT), मुंबई येथे त्यांची जाडी तपासली. IT मुंबई ने सादर केलेल्या (सप्टेंबर, २०१५) चाचणीच्या निष्कर्षांवरुन असे सिध्द झाले की सर्व २२ ताटांची जाडी ०.५५ मी.मी. पेक्षा कमी (०.३० मी.मी. ते ०.५० मी.मी. अशा प्रमाणात जाडी होती) होती. तसेच, २२ नमून्यांपैकी एकावरही उत्पादकाचे नाव किंवा आदयाक्षरे किंवा उत्पादन चिन्ह यासह "स्टेनलेस स्टील" किंवा "SS" असा शिक्का नव्हता. | सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या कालावधीत पर्यंत केंद्र शासनाच्या "डायरेक्टर जनरल ऑफ सप्लाय अँड डिस्पोजल" (D.G.S.&D.) याच्या दरकरारावर शालेय पोषण आहार योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त निधीमधून शाळांना स्टेनलेस स्टीलची कप्पा ताटे पुरविण्यात आलेली आहेत. सदर ताटांचा पुरवठा दरकरारामध्ये नमूद तरतूदींनुसार करण्यात आला आहे. कप्पा ताटांचा पुरवठा झाल्यानंतर यादृच्छिक पद्धतीने ताटांचे नमूने घेवून ताटांची प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली होती. सदर तपासणी अहवालामध्ये ताटे D.G.S.&D. दर करारामध्ये नमूद परिमाणांची पूर्तता करतात, असे नमूद केलेले आहे.<br>सन २०१३-१४ पर्यंत D.G.S.&D. व्दारे करण्यात आलेल्या दरकरारामध्ये ताटाचा आकार, उंची, खोली इ. परिमाणे नमूद होती. सदर दरकरारामध्ये ताटांचे वजन नमूद केलेले नव्हते. यानंतर करण्यात आलेल्या दरकरारामध्ये इतर परिमाणासोबत ताटाचे वजन ही नमूद केलेले आहे. यामुळे या नवीन दर करारानुसार मार्च, २०१५ मध्ये खरेदीचे आदेश दिल्यानंतर त्या आदेशानुसार झालेल्या ताटांच्या पुरवठयामधून यादृच्छिक पध्दतीने ताटांचे नमूने घेवून प्रयोशाळा तपासणी करत असताना इतर परिमाणांसोबतच ताटांचे वजनही मोजण्यात आले. सदर तपासणीमध्येही ताटे D.G.S.&D. दर करारामधील परिमाणांची पूर्तता करत असल्याचे अहवालामध्ये नमूद आहे.<br>सन २०१४ पर्यंतच्या दरकरारामध्ये ताटांचे वजन नमूद केलेले नव्हते. यामुळे सन २०१४ पर्यंत पुरवठा करण्यात आलेल्या ताटांचे वजन त्यावेळी प्रयोगशाळेत मोजले असते तरीही, प्रमाणीत वजन किती असावे हे निश्चित नसल्याने वजन विचारात घेवून पुरविण्यात आलेल्या ताटांचा दर्जा सुमार होता, असे निष्कर्ष काढता आले नसते.<br>केंद्र शासनाकडून भांडी खरेदीसाठी निधी प्राप्त होतो. | RITES ने तपासणी केलेल्या पाच ते सहा ताटांच्या नमुन्याची जाडी ०.४३ मिमि ते ०.५१ मिमि.दरम्यान आढळून आली. जी किमान विहित केलेल्या ०.५५ मिमि जाडीपेक्षा कमी आहे.<br>भारतीय मानक विभागानुसार (IS १४७५६ : २०००) ०.७ मी.मी. जाडीच्या पत्र्यापासुन तयार केलेल्या अंतिम उत्पादन (स्टेनलेस स्टीलचे ताट) + ०.१० मी.मी. इतका फरक | सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या कालावधीपर्यंत केंद्र शासनाच्या D.G.S.& D. यांच्या दरकरारावर योजनेतंर्गत प्राप्त निधीमधून शाळांना स्टेनलेस स्टीलची कप्पा ताटे पुरविण्यात आलेली आहेत. कप्पा ताटांचा पुरवठा झाल्यानंतर यादृच्छिक पद्धतीने ताटांचे नमूने घेवून ताटांची प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली होती. सदर तपासणी अहवालामध्ये ताटे D.G.S.&D. दर करारामध्ये नमूद परिमाणांची पूर्तता करतात, असे नमूद केलेले आहे.<br>सन २०१३-१४ पर्यंत D.G.S.& D. व्दारे करण्यात आलेल्या दरकरारामध्ये ताटाचा आकार, उंची, खोली इ. परिमाणे नमूद होती. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शासनाने सांगितले की दुबार निरिक्षणासाठी ताटांचे नमूने RITES (GoI चा उद्योग) कडे पाठविण्यात आले (ऑक्टोबर २०१५) होते व ते विशिष्ठ मानकांनुसार असल्याचे आढळून आले होते. त्यांनी असेही सांगितले की भारतीय मानक विभागाने IS ५१२२:१९९२ मध्ये भांड्यासाठी स्टेनलेस स्टील पत्र्याच्या विहीत केलेल्या वैशिष्ठयपूर्ण मापामध्ये पत्र्याच्या जाडीसाठी ०.४० मी.मी. पेक्षा + ०.१० मी.मी. इतका फरक ०.८० मी.मी. पर्यंत ग्राहय होता. म्हणूनच जर स्टीलच्या पत्र्याच्या उत्पादकाने -०.१० मी.मी. ग्राह्य फरकाचा लाभ घेतला असेल तर अशा पत्र्यांचा वापर केलेल्या अंतिम उत्पादनासाठी (स्टेनलेस स्टीलचे ताट) देखील असा -०.१० मी.मी. आनुशगीक फरक ग्राह्य ठरला असता. परिणामी ताटाची जाडी ०.४५ मी.मी. (०.५५ मी.मी. वजा ०.१० मी.मी.) झाली असती जी भारतीय मानक विभागाने विहीत केलेल्या (IS १४७५६:२०००) वैशिष्ठयपूर्ण मापांच्या मर्यादेत होती.<br><br>खालील दोन कारणांमुळे शासनाचे उत्तर योग्य ठरत नाही, (i) भारतीय मानक विभागानुसार (IS१४७५६:२०००) + ०.१० मी.मी. इतका ग्राह्य फरक लावूनही अंतिम उत्पादन (स्टेनलेस स्टीलचे ताट) किमान ०.५५ मी.मी. जाडीचे असावयास हवे होते आणि (ii) शासनाने उत्तराबरोबर जोडलेल्या RITEs च्या चाचणी अहवालात असे दिसून आले की सहापैकी पाच नमूने प्रत्यक्षात ०.४३ मी.मी. व ०.५१ मी.मी. जाडीचे होते जे माप ०.५५ मी.मी. या विहीत किमान जाडीपेक्षा लक्षणीय कमी होते. वरील वस्तुस्थिती विचारात घेता मुलांना शिजवलेले अन्न वाढण्यासाठी रु. ५३.४९ कोटी खर्च करुन खरेदी केलेली ५२.७५ लाख स्टेनलेस स्टीलची खणाची ताटे सकृतदर्शनी दुय्यम दर्जाची ठरली. | तथापि, सदर निधी विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात नसतो. केंद्र शासनाच्या निकषानुसार प्रतिशाळा रु. ५००० इतका निधी भांडी खरेदीसाठी प्राप्त होतो. ५ वर्षानंतर सदर शाळांकरिता भांडी बदलीसाठी पुन्हा रु. ५०००/- प्रतिशाळा इतका निधी प्राप्त होतो. एकदा निधी प्राप्त झाल्यानंतर त्या भांड्यांच्या बदलीसाठी (replacement) ५ वर्षानंतर पुन्हा केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होतो. या ५ वर्षाच्या कालावधीत दररोज शाळेत ताटांचा वापर होतो. यामुळे ताटांची काही प्रमाणात झीज होते. शालेय पोषण आहार योजनेकरिता पात्र शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता, सदर रु. ५०००/- प्रतिशाळा हा निधी खूपच कमी आहे. यामुळे या निधीतून पुरेशी ताटे / भांडी खरेदी होत नाहीत. यामुळे ५ वर्षानंतर बदलीसाठी (replacement) निधी प्राप्त झाल्यानंतर सरसकट सर्व ताटे / भांडी बदली न करता जुन्या ताटांपैकी वापरण्यास योग्य ताटे शाळास्तरावर वापरली जातात. या योजनेतर्गत सन २००७ पासून शाळांमध्ये कप्पा ताटांचा पुरवठा करण्यात येत आहे. मा. महालेखापाल कार्यालयाने नमून्यादाखल तपासलेली ताटे नियमित वापरातील होती. यामुळे याची काही प्रमाणात झीज झालेली होती.<br><br>D.G.S.& D. दरकरारामध्ये नमूद मानकानुसार (IS १४७५६ : २०००) ०.७ मी.मी. जाडीच्या पत्र्यापासून सदर कप्पा ताटे बनविल्यास ताटांची जाडी ०.५५ मी.मी. इतकी होते. तथापि, या मानकामध्ये पत्र्याच्या जाडीसाठी +०.१ मी.मी इतका फरक (tolerance) दिला आहे. या फरकाचा लाभ उत्पादकाने घेतल्यास तो ०.६ मी.मी. जाडीच्या पत्र्यापासून ताट बनवू शकतो व अशावेळी कप्पा ताटाची जाडी ०.४५ मी.मी. पर्यंत येवू शकते.<br><br>मा. महालेखापाल कार्यालयाने नमून्यादाखल तपासलेल्या ताटांची जाडी ०.३ मी.मी. ते ०.५ मी.मी इतकी होती. मा. महालेखापाल कार्यालयाने तपासणी केल्यानंतर शासनानेही काही शाळांमधील कप्पा ताटांचे नमूने घेवून Rail India Technical & Economic Services (RITES), मुंबई या | ग्राह्य धरुनही त्याची जाडी किमान ०.५५ मी.मी. इतकी असायला हवी.<br><br>त्यामुळे मुलांना अन्न शिजविण्यासाठी रु. ५३.४९ कोटी खर्च करुन खरेदी केलेल्या ५२.७५ लाख स्टेनलेस स्टीलची ताटे सकृतदर्शनी दुय्यम दर्जाची ठरली आहेत. | सदर दरकरारामध्ये ताटांचे वजन नमूद केलेले नव्हते. यानंतर करण्यात आलेल्या दरकरारामध्ये इतर परिमाणासोबत ताटाचे वजन ही नमूद केलेले आहे. यामुळे या नवीन दर करारानुसार मार्च, २०१५ मध्ये खरेदीचे आदेश दिल्यानंतर त्या आदेशानुसार झालेल्या ताटाच्या पुरवठयामधून यादच्छिक पध्दतीने ताटांचे नमूने घेवून प्रयोशाळा तपासणी करत असताना इतर परिमाणांसोबतच ताटाचे वजनही मोजण्यात आले. सदर तपासणीमध्येही ताटे D.G.S.&D. दर करारामधील परिमाणांची पूर्तता करत असल्याचे अहवालामध्ये नमूद आहे.<br><br>सन २०१४ पर्यंतच्या दरकरारामध्ये ताटांचे वजन नमूद केलेले नव्हते. यामुळे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | केंद्र शासनाचा उपक्रम असलेल्या संस्थेकडे कप्पा ताटे तपासणीसाठी पाठविली होती. सदर तपासणीमध्ये ताटांची जाडी ०.४३ मी.मी. ते ०.५१ मी.मी. असल्याचे दिसून आले.<br>यर नमूद केल्याप्रमाणे ताटांचा नियमित वापर होत असल्याने ताटांची झीज होऊन जाडी काही प्रमाणात कमी झालेली आहे. तथापि, महालेखापाल कार्यालयाने केलेली तपासणी तसेच BITES या संस्थेकडून करण्यात आलेल्या तपासणीमध्ये काही ताटांची जाडी ०.४५ मी.मी. पेक्षा जास्त असल्याचे दिसून येत आहे. यावरुन शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुरविण्यात आलेली ताटे डी.जी.एस.अँड.डी. दरकरारामध्ये नमूद केलेल्या परिमाणाची पूर्तता करणारी होती, असे दिसून येते.<br>सन २०१४-१५ पासून करण्यात आलेल्या D.G.S.& D. च्या दरकरारामध्ये वजन नमूद केल्याने ताटांच्या दर्जाच्या अनुषंगाने तपासणी करावयाच्या परिमाणांची स्पष्टता आली आहे. यामुळे मार्च २०१५ मध्ये शासनाने खरेदी केलेल्या ताटांच्या दर्जाबाबत कोणताही मुद्दा उपस्थित झालेला नाही. मार्च, २०१५ नंतर या योजनेतंर्गत कप्प ताटांची खरेदी करण्यात आलेली नाही.<br>तसेच, सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, राज्य शासनाने उद्योग विभागाच्या दि. ३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये नवीन खरेदी धोरण लागू केलेले आहे. तसेच, याबाबतचे सुधारीत धोरण उद्योग विभागाच्या दि. ०१ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेले आहे. या धोरणानुसारच विभागामार्फत सद्यस्थितीत कोणत्याही वस्तूची खरेदीची प्रक्रिया करण्यात येते. | | सन २०१४ पर्यंत पुरवठा करण्यात आलेल्या ताटांचे वजन त्यावेळी प्रयोगशाळेत मोजले असते तरीही, प्रमाणीत वजन किती असावे हे निश्चित नसल्याने वजन विचारात घेवून पुरविण्यात आलेल्या ताटाचा दर्जा सुमार होता, असे निष्कर्ष काढता आले नसते.<br>केंद्र शासनाकडून भांडी खरेदीसाठी निधी प्राप्त होतो. तथापि, सदर निधी विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात नसतो. केंद्र शासनाच्या निकषानुसार प्रतिशाळा रु. ५००० इतका निधी भांडी खरेदीसाठी प्राप्त होतो. ५ वर्षानंतर सदर शाळाकरिता भांडी बदलीसाठी पुन्हा रु. ५०००/- प्रतिशाळा इतका निधी प्राप्त होतो. एकदा निधी प्राप्त झाल्यानंतर त्या भांड्याच्या बदलीसाठी (replacement) ५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | वर्षानंतर पुन्हा केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होतो. या ५ वर्षांच्या कालावधीत दररोज शाळेत ताटांचा वापर होतो. यामुळे ताटांची काही प्रमाणात झीज होते. शालेय पोषण आहार योजनेकरिता पात्र शाळामधील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता, सदर रु. ५०००/- प्रतिशाळा हा निधी खूपच कमी आहे. यामुळे या निधीतून पुरेशी ताटे / भांडी खरेदी होत नाहीत. यामुळे ५ वर्षानंतर बदलीसाठी (replacement) निधी प्राप्त झाल्यानंतर सरसकट सर्व ताटे / भांडी बदली न करता जुन्या ताटांपैकी वापरण्यास योग्य ताटे शाळास्तरावर वापरली जातात. या योजनेतंर्गत सन २००७ पासून शाळांमध्ये कप्पा ताटांचा पुरवठा करण्यात येत |

आहे. मा. महालेखापाल कार्यालयाने नमून्यादाखल तपासलेली तारे नियमित वापरातील होती. यामुळे यांची काही प्रमाणात झीज झालेली होती.

D.G.S.&D. दरकरारामध्ये नमूद मानकानुसार (IS ५४७५६ : २००० ) ०.७ मी.मी. जाडीच्या पत्र्यापासून मदर कण्या तारे बनविल्यास ताटाची जाडी ०.५५ मी.मी. इतकी होते. तथापि, या मानकामध्ये पत्र्याच्या जाडीसाठी +०.१ मी.मी. इतका फरक (tolerance) दिला आहे. या फरकाचा लाभ उत्पादकाने घेतल्यास तो ०.६ मी.मी. जाडीच्या पत्र्यापासून ताट बनवू शकतो व अशावेळी कण्या ताटाची जाडी ०.५५ मी.मी. पर्यंत येवू शकते.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | मा.महालेखापाल कार्यालयाने नमून्यादाखल तपासलेल्या ताटाची जाडी ०.३ मी.मी. ते ०.५ मी.मी इतकी होती. मा. महालेखापाल कार्यालयाने तपासणी केल्यानंतर शासनानेही काही शाळांमधील कप्पा ताटांचे नमूने घेवून Rail India Technical & Economic Services (RITES), मुंबई या केंद्र शासनाचा उपक्रम असलेल्या संस्थेकडे कप्पा ताटे तपासणीसाठी पाठविली होती. सदर तपासणीमध्ये ताटांची जाडी ०.४३ मी.मी. ते ०.५१ मी.मी. असल्याचे दिसून आले. वर नमूद केल्याप्रमाणे ताटांचा नियमित वापर होत असल्याने ताटाची झीज होऊन जाडी काही प्रमाणात कमी झालेली आहे. तथापि, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | महालेखापाल कार्यालयाने केलेली तपासणी तसेच BITES या संस्थेकडून करण्यात आलेल्या तपासणीमध्ये काही ताटाची जाडी ०.४५ मी.मी. पेक्षा जास्त असल्याचे दिसून येत आहे. यावरुन शालेय पोषण आहार योजनेतर्गत पुरविण्यात आलेली ताटे डी.जी.एस.अँड.डी. दरकरारामध्ये नमूद केलेल्या परिमाणांची पूर्तता करणारी होती, असे दिसून येते.<br>सन २०१४-१५ पासून करण्यात आलेल्या D.G.S.& D. च्या दरकरारामध्ये वजन नमूद केल्याने ताटाच्या दर्जाच्या अनुषगाने तपासणी करावयाच्या परिमाणांची स्पष्टता आली आहे. यामुळे मार्च २०१५ मध्ये शासनाने खरेदी केलेल्या ताटाच्या दर्जाबाबत कोणताही |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुद्दा उपस्थित झालेला नाही. मार्च, २०१५ नंतर या योजनेतर्गत कप्प ताटांची खरेदी करण्यात आलेली नाही. तसेच, सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, राज्य शासनाने उद्योग विभागाच्या दि. ३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये नवीन खरेदी धोरण लागू केलेले आहे. तसेच, याबाबतचे सुधारीत धोरण उद्योग विभागाच्या दि. ०५ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेले आहे. या धोरणानुसारच विभागामार्फत सद्यस्थितीत कोणत्याही वस्तूची खरेदीची प्रक्रिया करण्यात येते. |
| | २.३.४.६ | **सूक्ष्मपोषणद्रव्यांची अविवेकी खरेदी**<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद ४.५ नुसार MDM योजनेत स्थानिक क्षेत्रात आढळून येणाऱ्या सामान्य कमतरतांनुसार राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तांत्रिक सल्ल्याने किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र / शासकीय रुग्णालयाकडून साप्ताहीक लोह फॉलिक ॲसिड (IFA) ची पूरक | केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये (२००६ Guidelines) विद्यार्थ्यांना सूक्ष्मपोषण द्रव्ये व आयर्न फोलीक ॲसिड पुरविण्याची तरतूद आहे. | IFA कॅप्सूलबाबत खरेदी आदेश देण्यापूर्वी | ZIM Laboratories या संस्थेने ESIC दरकरारावर IFA गोळयापुरविण्याबाबतचा प्रस्ताव सन २०१० मध्ये |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | औषधे आणि इतर योग्य पूरक पोषणे देऊन त्याव्दारे पूरक सूक्ष्मपोषणद्रव्यांची पूरक मात्रा देखिल देण्यात यावी. केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने देखिल IFA पुरक पोषणाविषयी धोरणात्मक मार्गदर्शके जारी केली (एप्रिल २००७) ज्यानुसार ६-१० वर्षे वयोगटातील मुलांना प्रत्येक वर्षी १०० दिवस प्रतीबालक प्रती दिवस ३० मी ग्रॅम मुलतत्तव लोह आणि २५० मायक्रोग्रॅम फॉलिक ॲसिड तसेच किशोरवयीन (११-१८ वर्षे) मुलांना प्रौढांच्या मात्रेत व कालावधीत म्हणजेच प्रत्येक वर्षी १०० दिवस प्रती दिवस प्रती बालक १०० मी ग्रॅम मुलतत्तव लोह आणि ५०० मायक्रोग्रॅम फॉलीक ॲसिड द्यावयाचे होते.<br><br>झिम लॅबोरेटरीज, नागपूर (ESIC चा दर कंत्राटदार) यानी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या (विभाग) मंत्र्यांची भेट घेऊन (०५ मार्च, २०१०) IFA पुरक पोषण द्रव्यांची मध्यवर्ती घाऊक खरेदी करण्यासाठी स्वाधिकारे प्रस्ताव ठेवला. महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालकांच्या दर कंत्राटदाराच्या दराबरोबर झिम लॅबोरेटरीज ने प्रस्तावित केलेल्या दरांची तुलना करता त्यांचे प्रस्तावित दर कमी असल्याचे आढळून आले. त्यानुसार विभागाने झिम लॅबोरेटरीजचा प्रस्ताव मान्य केला आणि SNA ने इयत्ता I ते VIII (६-१४ वर्षे) मध्ये शिकणाऱ्या मुलांसाठी एकूण रु. २९.५● कोटी किमतीच्या ४१.९९ कोटी IFA कॅप्सूल्स पुरविण्यासाठी झिम लॅबोरेटरीजला खरेदी आदेश दिले (३१ मार्च २०१०). SNA ने देखिल इयत्ता VI ते VIII (११-१४ वर्षे) मध्ये शिकणाऱ्या मुलांसाठी फेब्रुवारी, २०११ मध्ये रु. १७.४२ कोटीच्या २४.५४ कोटी कॅप्सूल्स आणि ऑक्टोबर, २०११ मध्ये रु. १०.१२ कोटीच्या १४.२६ कोटी कॅप्सूल्स पुरविण्यासाठी पूर्ण आदेश दिले. अशाप्रकारे २००९-१२ दरम्यान झिम लॅबोरेटरीजकडून रु. ५७.०६ कोटी किमतीच्या एकूण ८०.७९ कोटी कॅप्सुल्स खरेदी करण्यात आल्या. विभाग SNA आणि संचालक, आरोग्य सेवा यांच्या दस्तऐवजांच्या तपासणीत खालील बाबी आढळून आल्या.<br>• पहिल्या मागणीसमोर झिम लॅबोरेटरीजने पुरवठा केलेल्या IFA कॅप्सूलमध्ये (४१.९९ कोटी) ४८.५३ मिग्रॅम मुलतत्व लोह आणि ५०० मायक्रोग्रॅम फॉलिक ॲसिड होते. संचालक, आरोग्य सेवा (DHS), मुंबई यांनी SNA ला असे कळविले (एप्रिल २०१०) की खरेदी करण्यात येत | दिनांक २३/०२/२००५ रोजी मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय होऊन शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना कॅलशियम व आयर्नच्या गोळया देण्यासाठी या योजनेतंर्गत खर्च करण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला आहे. दिनांक ३१/०३/२००५ च्या शासन निर्णयान्वये शालेय पोषण आहार योजनेच्या लाभार्थ्यांना या योजनेतंर्गत कॅल्शियम व आर्यनच्या गोळया देण्यास मंजूरी देण्यात आली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयानेही जनहितार्थ रिट याचिका क्र. ११३/२००८ मध्ये या योजनेच्या लाभार्थ्यांना मायक्रोन्युट्रियन्टस् पुरविण्याचे आदेश दिलेले आहेत.<br><br>केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालयाने दि.२३/०४/२००७ च्या आदेशानुसार लोह व फॉलिक ॲसिड ६ ते १२ महिन्याच्या मुलांना, ६ ते ६० महिन्याच्या मुलांना आणि त्यावरील वयाच्या मुलांना मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनानुसार विभागाने योजनेतील पात्र विद्यार्थ्यांना लोह व फॉलिक ॲसिड गोळया दिलेल्या आहेत.<br><br>केंद्र शासनाने दि. ०१/०४/२०१० च्या पत्रान्वये राज्याने आरोग्य विभागाचा सल्ला घेऊन त्यानुसार आवश्यक असणारी सूक्ष्मपोषण द्रव्ये पुरवावीत असे कळविले आहे.<br><br>शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यानुसार दि. ०३/०८/२०१० रोजी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संनियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये विद्यार्थ्यांच्या शारिरिक वाढीला पूरक आहार उदा. कॅलशियम, आयर्न , फोलिक ॲसिड इ. देण्यात यावे. त्यासाठी आरोग्य विभागाचा सल्ला घेऊन कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.<br><br>ZIM Laboratories या संस्थेने ESIC दरकरारावर IFA गोळया पुरविण्याबाबतचा प्रस्ताव सन २०१० मध्ये शासनाकडे | विभागाने आरोग्य सेवा संचालनालयाचा कोणताही तांत्रिक सल्ला घेतला नव्हता. IFA कॅप्सूलची खरेदी आदेशापश्चात केवळ ११ ते १४ या वयोगटातील विद्यार्थ्यांना IFA कॅप्सूलचा वापर करण्याबाबत तांत्रिक मत दिले होते.<br><br>केंद्र शासनाने विहित केलेल्या निकषानुसार पहिला पुरवठा नसल्याने पुनश्च रु. २७.५४ कोटी किमतीच्या रु. ३८.८० लाख | शासनाकडे सादर केला होता. ESIC दरकरारानुसार IFA गोळयांचा दर DMER दरकरारावरील दरापेक्षा कमी असल्याने शासनाने ESIC दरकरारावर IFA गोळया पुरविण्याचा निर्णय दि.३१/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये घेतला होता. तथापि, विद्यार्थ्यांना आर्यनयुक्त गोळया देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना आरोग्य सेवा संचालनालयाचे मार्गदर्शन घेवून त्यानुसार निर्गमित कराव्यात, असे शासन निर्णयामध्ये नमूद होते. यानुसार आरोग्य संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त झाल्याशिवाय शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी पुरवठेदारास पुरवठा आदेश दिले नाहीत. आरोग्य संचालनालयाने |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | असलेल्या IFA कॅप्स्यूल्स ११ वर्षे वयाखालील मुलांसाठी योग्य नव्हत्या आणि म्हणून या कॅप्स्यूल्सचे वाटप इयत्ता VI ते VIII (११-१४ वर्षे) मध्ये शिकणाऱ्या मुलांना करण्याचा सल्ला दिला (ऑगस्ट २०१०). DHS च्या तांत्रिक सल्ल्यानुसार विभागाने IFA कॅप्स्यूल्स ११-१४ वर्षे वयोगटातील मुलांना देण्याचा निर्णय घेतला (ऑगस्ट २०१०). त्यानुसार फेब्रुवारी व ऑक्टोबर २०११ मध्ये केलेल्या पुनर्मागणीसाठी निर्धारित लाभार्थींच्या वयोगटातही फेरफार / बदल करण्यात आला.<br><br>वरील घटनाक्रमावरुन हे स्पष्टपणे दर्शविले जाते की विभागाने झिम लॅबोरेटरीजला खरेदी आदेश देण्यापूर्वी DHS चा कोणताही तांत्रिक सल्ला घेतला नव्हता किंवा योग्य वयोगटासाठी योग्य मात्रेच्या IFA कॅप्स्यूल्सची खरेदी करताना GoI च्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला नव्हता. अशाप्रकारे DHS च्या तांत्रिक सल्ल्यापश्चात प्राप्त झालेल्या औषधांच्या मात्रेनुसार (४८.५३ मिग्रॅम मुलतत्व लोह) विभागाला त्यानुरुप वयोगटात तडजोड/बदल करावा लागला हे स्पष्ट दिसते.<br><br>एप्रिल २००७ च्या GoI च्या विहितकाच्या अनुषंगाने पहिले तर प्राप्त झालेल्या मात्रेतील औषण (४८.५३ मिग्रॅम मुलतत्व लोहयुक्त) ६-१० वर्षे वयोगटासाठी किंवा ११-१४ वर्षे वयोगटासाठी योग्य नव्हते. प्राप्त केलेल्या औषधाची मात्रा (४८.५३ मि.ग्रॅम. मुलतत्व लोह) ११-१४ वर्षे वयोगटासाठी देखिल इच्छित प्रमाणात गुणकारक ठरणार नव्हती कारण ही मात्रा GoI ने विहित केलेल्या मात्रेपेक्षा (१०० मि.ग्रॅम मुलतत्व लोह) लक्षणीय प्रमाणात कमी होती.<br><br>शासनाने सांगितले की DHS ने ESIC च्या दर करारानुसार IFA कॅप्स्यूलचा पुरवठा करण्यासाठी मंजूरी दिली होती तसेच वयोगटांनुसार योग्य मात्रेची औषणे देण्याचा सल्ला दिला होता त्यामुळे ही बाब निकालात निघाली होती. शासनाने पुढे असेही सांगितले की, DHS ने ESIC च्या दर करारानुसार IFA कॅप्स्यूलचा पुरवठा करण्यासाठी मंजूरी दिली असल्याने पुढील दोन वर्षांसाठीची गरज मागविण्यासाठी पुनर्मागणी आदेश देण्यात आले होते.<br><br>हे उत्तर पटण्यासारखे नाही कारण, (i) DHS ने ESIC च्या दर करारावर खरेदी आदेश देण्यासाठी हिरवा कंदली दाखविला नव्हता तर | सादर केला होता. ESIC दरकरारानुसार IFA गोळयांचा दर DMER दरकरारावरील दरापेक्षा कमी असल्याने शासनाने ESIC दरारावर IFA गोळया पुरविण्याचा निर्णय दि.३१/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये घेतला होता. तथापि, विद्यार्थ्यांना आर्यनयुक्त गोळया देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना आरोग्य सेवा संचालनालयाचे मार्गदर्शन घेवून त्यानुसार निर्गमित कराव्यात, असे शासन निर्णयामध्ये नमूद होते. यानुसार आरोग्य संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त झाल्याशिवाय शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी पुरवठेदारास पुरवठा आदेश दिले नाहीत. आरोग्य संचालनालयाने ११-१८ वर्षे वयोगटातील मुलांना IFA गोळया ESIC दरकरारावर पुरविण्याबाबत तसेच, यासाठी डोसचे प्रमाण इ. चे अभिप्राय दि.०४/०८/२०१० च्या पत्रान्वये दिले आहेत. आरोग्य संचालनालयाचे अभिप्राय दि. ०४/०८/२०१० रोजी प्राप्त झालेनंतर दि. ०५/०८/२०१० रोजी शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी पुरवठेदारास IFA गोळया पुरविण्यासाठी पुरवठा आदेश दिले.<br><br>तसेच, प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना IFA औषध द्रवस्वरुपात देण्याबाबत अभिप्राय आरोग्य संचालनालयाने दिले आहेत.<br><br>आरोग्य संचालनालयाने केवळ उच्च प्राथमिकच्या विद्यार्थ्यांना (इ. ६वी ते ८ वी) IFA गोळया पुरविण्यास मान्यता दिल्याने त्यानंतर पुढील २ वर्षाकरिता उच्च प्राथमिकच्या विद्यार्थ्यांना ESIC दरकरारावर IFA गोळया पुरविण्यात आल्या. प्राथमिकच्या (इ. १ ली ते ५वी) विद्यार्थ्यांना आरोग्य संचालनालयाच्या सल्ल्यानुसार द्रव स्वरुपात IFA पुरविण्यात आले.<br><br>केंद्र शासनाने सन २०१२-१३ पासून Weekly Iron and Folic Acid Supplementation Scheme (WIFS) ही योजना सुरु केली आहे. या योजनेतंर्गत १८ वर्ष वयोगटापर्यंतच्या विद्यार्थ्यांना Iron & Folic Acid (IFA) गोळयांचे वाटप करण्यात | कॅप्सुलची पुर्नमागणी देण्याची कारणे देण्यात यावीत. | ११-१८ वर्षे वयोगटातील मुलांना IFA गोळया पुरविण्यासाठी डोसचे प्रमाण दि.०४/०८/२०१० च्या पत्रान्वये दिले आहे. आरोग्य संचालनालयाचे अभिप्राय दि. ०४/०८/२०१० रोजी प्राप्त झालेनंतर दि. ०५/०८/२०१० रोजी शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी पुरवठेदारास IFA गोळया पुरविण्यासाठी पुरवठा आदेश दिले. यामुळे आरोग्य विभागाच्या सल्ल्याशिवाय गोळयांची खरेदी केली, असे म्हणता येणार नाही.<br><br>विद्यार्थ्यांना ESIC दरकरारावर आयर्न व फॉलिक ॲसिडच्या गोळया पुरविल्याबाबत निर्विकार प्रतिष्ठाण, अहमदनगर यांनी माहे जून २०१० मध्ये राष्ट्रीय मानवाधिकार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | खरेदी आदेशापश्चात केवळ त्यांचे तांत्रिक मत मांडले होते, आणि (ii) झिम लॅबोरेटरीजकडून पहिल्या मागणीत खरेदी केलेल्या IFA कॅप्स्युल्स GoI ने विहित केलेल्या मात्रे बरहूकूम नसल्याने त्यानंतर रु. २७.५४ कोटी किंमतीच्या ३८.८० लाख कॅप्स्युल्सची पुनर्मागणी टाळणे शक्य झाले असते.<br>अशाप्रकारे झिम लॅबोरेटरीजकडून २००९-१२ दरम्यान रु. ५७.०६ कोटीच्या ८०.७९ कोटी कॅप्स्यूल्सची खरेदी विवेकहीन होती. | येते. या योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात येते. यामध्ये शालेय पोषण आहार योजनेसाठी पात्र इ. ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांचाही समावेश होता. यामुळे सन २०१२-१३ पासून ESIC दरकरारावर IFA गोळयांचा पुरवठा शालेय पोषण आहार योजनेतंर्गत करण्यात आलेला नाही.<br>तत्कालीन केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्री, भारत सरकार यांनी दि. ११ जुलै, २०१४ रोजी सर्व राज्यांना पत्र लिहून काही राज्यांमध्ये या योजनेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या Best Practices ची माहिती दिली आहे. सदर पत्रामध्ये हि राज्य शासनामार्फत पुरविण्यात आलेल्या सूक्ष्मपोषण द्रव्ये / IFA पुरविण्याच्या योजनेचा समावेश Best Practices म्हणून केला आहे.<br>वर नमूद केल्याप्रमाणे मा. मंत्रिमंडळाचा निर्णय, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व मा. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेवून, आरोग्य संचालनालयाच्या सल्ल्याने शालेय पोषण आहार योजनेतंर्गत पात्र विद्यार्थ्यांना आयर्न व फॉलिक ॲसिड (IFA) पुरविण्यात आले आहे. | | आयोगाकडे तक्रार केलेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे उत्तर पाठविण्यापूर्वी शासन स्तरावरुन आरोग्य विभागाचे तत्कालिन अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि. २०/१०/२०१० रोजी बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीमध्ये शिक्षण संचालक (प्राथ.), संचालक (आरोग्य सेवा), मुंबई तसेच शालेय शिक्षण विभाग व आरोग्य विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये ESIC दरकरारावर आयर्न व फॉलिक ॲसिड गोळया पुरविण्याच्या मुद्दयाबाबत सविस्तर चर्चा झाली होती. यानुसार तक्रारदार निर्विकार प्रतिष्ठाण, अहमदनगर यांच्या तक्रारीमध्ये तथ्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | नसल्याचे दिसून आले होते. सदर बाबी उत्तरामध्ये नमूद करुन यास तत्कालिन मा. मुख्य सचिव यांची मान्यता घेवून राज्य स्तरावरुन दि. १४/०९/२०११ रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगास उत्तर पाठविले आहे. यानंतर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून या प्रकरणी कोणतेही प्रतिकूल आदेश झालेले नाहीत.<br><br>आरोग्य संचालनालयाने दि.४/०८/२०१० च्या पत्रान्वये इ. ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना आयर्न व फॉलिक ॲसिड गोळया पुरविण्यास मान्यता दिल्यानंतर वर नमूद केल्याप्रमाणे अपर मुख्य सचिव (आरोग्य विभाग) यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये याविषयी सविस्तर चर्चा झाली व |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | सदर चर्चेबाबत तत्कालिन मा.मुख्य सचिव यांना ही अवगत करण्यात आले. यावरुन आरोग्य विभागाने ESIC दरकरारावर इ. ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना आयर्न व फॉलिक ॲसिड पुरविण्यास मान्यता दिलेली असल्याचे दिसून येत आहे. यामुळे त्यापुढील वर्षाकरिता म्हणजेच सन २०१०-११ व सन २०११-१२ करिता ESIC दरकरारावर आयर्न व फोलिक ॲसिड गोळ्यांची खरेदी करण्यात आली. |
| | | | | | | केंद्र शासनाने सन २०१२-१३ पासून Weekly Iron and Folic Acid Supplementation Scheme (WIFS) ही योजना सुरु केली आहे. या योजनेतंर्गत १८ वर्ष वयोगटापर्यंतच्या विद्यार्थ्यांना Iron & Folic Acid (IFA) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | गोळयांचे वाटप करण्यात येते. या योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात येते. यामध्ये शालेय पोषण आहार योजनेसाठी पात्र इ. ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांचाही समावेश होतो. यामुळे सन २०१२-१३ पासून ESIC दरकरारावर IFA गोळयांचा पुरवठा शालेय पोषण आहार योजनेतंर्गत करण्यात आलेला नाही.<br><br>तत्कालीन केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्री, भारत सरकार यांनी दि. ११ जुलै, २०१४ रोजी सर्व राज्यांना पत्र लिहून काही राज्यांमध्ये या योजनेतंर्गत राबविण्यात येत असलेल्या Best Practices ची माहिती दिली आहे. सदर पत्रामध्ये हि राज्य शासनामार्फत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुरविण्यात आलेल्या सूक्ष्मपोषण द्रव्ये / IFA पुरविण्याच्या योजनेचा समावेश Best Practices म्हणून केला आहे.<br><br>वर नमूद केल्या प्रमाणे मा. मंत्रिमंडळाचा निर्णय, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेवून, आरोग्य संचालनालयाच्या सल्ल्याने शालेय पोषण आहार योजनेतंर्गत पात्र विद्यार्थ्यांना आयर्न व फॉलिक ॲसिड (IFA) गोळया पुरविण्यात आल्या आहेत. |
| | २.३.४.७ | **शिजवलेले अन्न चाखण्यात कमतरता / तूट**<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (परिच्छेद ४.३) आणि GoI ने दिलेल्या (जुलै २०१३) सूचनांनुसार प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गातील मुलांना अन्न वाढण्याच्या अर्धा तास आधी प्रत्येक दिवशी आळीपाळीने किमान एका शिक्षकाने आणि शालेय व्यवस्थापन समिती (SMC) च्या सदस्यांपैकी एकाने शिजवलेल्या अन्नाची चव बघावी. तसेच, डिसेंबर, २००५ च्या GoI च्या मार्गदर्शनानुसार दररोज मुलांना आहार देताना देखरेख ठेवण्यासाठी व पर्यवेक्षण करण्यासाठी आणि दररोज कोणत्याही व्यत्ययाविना चांगल्या दर्जाचा आहार दिला जाईल याची खात्री करण्यासाठी देखिल किमान एक | शालेय पोषण आहार योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आहार देण्यापूर्वी किमान अर्धातास अगोदर संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / शिक्षक / स्वयंपाकी तथा मदतनीस / पालक / शाळा व्यवस्थापन समितीतील सदस्य यांच्याद्वारे प्रत्यक्षात खावून त्याची चव बघून वितरीत केला जातो.<br>सदर योजनेंतर्गत शाळांमध्ये जेवण तयार करते वेळी आणि जेवण वाढताना पालकांची उपस्थिती असल्यास जेवणाचा दर्जा निश्चितच सुधारण्यास मदत होत असल्याने सदर योजनेत | सन. २०१४-१५ दरम्यान शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी शिजवलेले अन्न चाखण्यात | शाळा व्यवस्थापन समिती सदस्य हे नियमितपणे शाळेत उपस्थित राहून आहाराची चव घेऊ शकत नाहीत परंतु ज्या दिवशी सदस्य शाळेत उपस्थित असतात तेव्हा |

माता आळीपाळीने शाळेत उपस्थित असावी.

२०१५-१६ च्या AWP&B मधून आहाराचा दर्जा, सुरक्षा आणि स्वच्छता याविषयी प्राप्त केलेल्या माहितीमधून असे उघडकीस आले की, २०१४-१५ दरम्यान शिक्षक व SMC सदस्य यांनी शिजलेले अन्न चाखण्यात कमतरता /तूट होत्या. तक्ता २.३.५ मध्ये तपशील दिला आहे.

तक्ता २.३.५ : मुलांना वाढण्यापूर्वी आहाराची चव बघण्यातील कमतरता / तूट

| तपशील | | मुलांना वाढण्या आधी शिक्षकांनी अन्न चाखले अशा शाळा | शिक्षकांनी अन्न चाखले नाही अशा शाळांची टक्केवारी | मुलांना वाढण्याआधी SMC च्या सदस्यांनी अन्न चाखले अशा शाळा | SMC सदस्यांनी अन्न चाखले नाही अशा शाळांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| २०१४-१५ दरम्यान राज्यातील शाळांची संख्या | ८३२९३ | ६७९१५ | १८ | ४६१६८ | ४५ |
| निवडक जिल्ह्यांतील शाळांची संख्या | २४६६० | १९४५३ | २१ | १४२५७ | ४२ |

स्रोत : २०१५-१६ च्या AWP&B मधून प्राप्त झालेली माहिती

निवडक नऊ जिल्ह्यांपैकी चार जिल्ह्यांमध्ये सर्व शाळांमध्ये शिक्षकांनी अन्न चाखले होते व उर्वरीत पाच जिल्ह्यांमध्ये ज्या शाळांमध्ये शिक्षकांनी अन्न चाखले नव्हते त्यांची टक्केवारी नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक ६३ टक्के होती.

पालकांना सहभागी करुन घेण्याबाबत क्षेत्रिय स्तरावर वेळोवेळी सूचना दिल्या जातात.

शिजविलेल्या अन्नाची चव घेतल्यानंतर त्याप्रमाणे चव रजिस्टर मध्ये नोंद घ्यावी अशा सुचना सर्व शाळांना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

अन्नाची चव चाखण्याबाबत मुख्याध्यापकावर दिलेल्या जाबाबदारीतून मुक्त करण्याबाबत काही मुख्याध्यापकांनी केलेल्या विरोधाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने शासनाची बाजू योग्य ठरविली आहे.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत वारण्यात येणाऱ्या धान्यादि मालाची गुणवत्ता व सुरक्षितता तसेच अन्न शिजविणाऱ्या यंत्रणामार्फत अन्न शिजविताना घ्यावयाची काळजी, परिसराची स्वच्छता इत्यादीबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या दि. ०७/०९/२०१६ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत.

कमतरता तूट असण्यामागची विशिष्ट कारणे देण्यात यावीत.

अन्न शिजवण्यापूर्वी वैयक्तीक स्वच्छता, स्वयंपाकगृहातील स्वच्छता, अन्नधान्य व भाजीपाला धुवून घेणे याबाबत शाळांना दिलेल्या सूचनांचा तपशील विभागाने लोकलेखा समितीस सादर करावा. दोन प्रकरणातील तपासणी अहवाल प्राप्त झाला किंवा कसे याची माहिती उतरात

सदस्य स्वत: अन्नाची चव घेऊन त्याची नोंद नोंदवहीमध्ये करतात.

तथापि, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आहार देण्यापूर्वी किमान अर्धा तास अगोदर संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / शिक्षक / स्वयंपाकी तथा मदतनीस / पालक / शाळा व्यवस्थापन समितीतील सदस्य यांच्याद्वारे प्रत्यक्षात खावून त्याची चव बघून वितरीत केला जातो.

सर्व शाळांमधुन दररोज अन्नाची चव घेतल्यानंतरच विदयार्थ्यांना आहाराचे वाटप करण्यात येत असते.

शासन परिपत्रक दि २२/०७/२०१६, शिक्षण संचालक प्राथमिक यांचे परिपत्रक दि २२/३/२०१२ व

पुढे, निवडक नऊ जिल्ह्यांपैकी तीन मध्ये सर्व शाळांमध्ये SMC सदस्यांनी अन्न चाखले होते, त्यावेळी चंद्रपूर व मुंबई जिल्ह्यांमध्ये मात्र एकाही शाळेत ते चाखले नव्हते. पुढे निवडक २६९ शाळांनी सादर केलेल्या माहितीवरुन असे उघडकीस आले की, १७४ शाळांमध्ये (६५ टक्के) माध्यान्ह आहाराचे वाटप करताना पाल्यांच्या माता उपस्थित होत्या.

शासनाने सांगितले की सर्व शाळांमध्ये मुलांना आहाराचे वाटप करण्यापूर्वी अर्धातास आधी ते चाखले जाते. पुढे असेही सांगण्यात आले की, पालकांच्या सहभागामुळे आहाराचा दर्जा सुधारण्यास निश्चितच हातभार लागेल, म्हणून आहार तयार करताना आणि त्याचे वाटप करताना शाळेत उपस्थित राहण्यासाठी पालकांना प्रोत्साहीत करण्याच्या सूचना नियमीतपणे दिल्या गेल्या होत्या.

हे उत्तर पटण्यायोग्य नाही कारण, लेखापरिक्षकांनी AWP&B मधून याविषयी प्राप्त केलेल्या माहितीमधून खूप समाधानकारक स्थिती दिसून येत नाही. पुढे योजना आवाका लक्षात घेता, शिक्षक, SMC चे सदस्य आणि माता यांचा सक्रिय सहभाग सर्वोत्तम आहे कारण त्यामुळे बाहेरील पर्यवेक्षक / निरिक्षक यांच्यावर संनियंत्रणासाठी असलेली अवलंबिता कमी होण्यास मदत होणार होती कारण एरवी दररोज सर्व शाळांवर देखरेख ठेवण्यास ते असमर्थ ठरत होते.

पुढे, दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की, २०११-१५ दरम्यान राज्यात अन्नविषबाधेची १३ प्रकरणे SNA ला कळविण्यात आली होती. ज्यामध्ये ९९६ मुलांना बाधा झाली होती, त्याचा तपशील तक्ता २.३.६ मध्ये दिला आहे.

तक्ता २.३.६ : २०११-१५ दरम्यान राज्यातील अन्न विषबाधेच्या प्रकरणांचा तपशील

| वर्ष | घटना | बाधित मुलांची संख्या |
|---|---|---|
| २०११-१२ | २ | ७० |
| २०१२-१३ | १ | ०९ |
| २०१३-१४ | २ | ४५९ |
| २०१४-१५ | ८ | ४५८ |
| एकूण | १३ | ९९६ |

समाविष्ट करावी.

३१/७/२०१३ नुसार अन्न शिजवण्यापूर्वी वैयक्तीक स्वच्छता, स्वयंपाकगृहातील स्वच्छता, अन्नधान्य व भाजीपाला धुवून घेणे याबाबत शाळांना निर्देश देण्यात आलेले होते तसेच वेळोवेळी शालेय पोषण आहार योजनेच्या आढावा बैठकांमधुन अन्न सुरक्षा व गुणवता याबाबत निर्देश देण्यात येत असतात.

पुणे व यवतमाळ जिल्हयातील घडलेल्या विषबाधा प्रकरणातील तपासणी अहवाल प्राप्त झाले असून अहवालानुसार सदरील विषबाधा शालेय पोषण आहारातून झाली नसल्याचे स्पष्ट होते. अहवालानुसार दूषित पाण्यामुळे विषबाधा झाल्याचे निदर्शनास आले आह.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | स्रोत - SNA नी पुरविलेली माहिती<br><br>१३ प्रकरणांपैकी सहा प्रकरणात अन्नाचे नमूने तपासणीसाठी प्रयोगशाळांमध्ये पाठविण्यात आले होते. सहापैकी दोन प्रकरणात, डिसेंबर २०१५ पर्यंत प्रयोगशाळांचे अहवाल प्राप्त झाले नव्हते. तीन प्रकरणात अन्नविषबाधेचे कारण अहवालातून स्पष्ट होऊ शकले नव्हते, तसेच एका प्रकरणात (सोलापूर जिल्हा) अन्नात किटकनाशकाचा अंश आणि केरोसिनचा तीव्र गंध असलेले खनिज तेल असल्याचे सिध्द झाले होते. BDO सोलापूर यांनी केलेल्या चौकशीत असे आढळून आले की स्वयंपाकघर घाणेरडे आणि अस्वच्छ होते आणि शिजलेले अन्न मुख्याध्यापक किंवा शिक्षकांकडून चाखले गेले नव्हते. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी शिक्षण अधिकाऱ्यांना या प्रकरणात चौकशी करण्याचे निर्देश दिले (मार्च २०१५) परंतू डिसेंबर २०१५ पर्यंत चौकशीचा अहवाल प्राप्त झाला नव्हता. उर्वरित सात प्रकरणात, जेथे अन्नाचे नमूने प्रयोगशाळांना पाठविण्यात आले नव्हते तेथे पोलीस तक्रार दाखल करणे, मध्यवर्ती स्वयंपाकगृहांना दिलेले कार्यादेश रद्द करणे, शिक्षक /मुख्याध्यापकांना निलंबीत करणे अशा स्वरुपाची कारवाई करण्यात आली होती.<br>शासनाने सांगितले की, बहुतांश प्रकरणांत स्वच्छता न ठेवल्यामुळे आणि स्वयंपाकी संस्थांच्या निष्काळजीपणामुळे अन्नविषबाधा झाली होती. स्वयंपाकघर व आसपासच्या क्षेत्रात वैयक्तीक आरोग्य आणि स्वच्छता पाळावी आणि अन्नधान्य व भाज्या शिजवण्याआधी धुवाव्या याविषयी सविस्तर सूचना शाळांना देण्यात आल्या होत्या. | | | |
| | २.३.४.८ | **स्वयंपाकी नि सहाय्यक यांना प्रशिक्षण देण्यात व आरोग्य तपासणी करण्यात कमरता / तूट**<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद ४.२ नुसार मुलांना द्यावयाचा मध्यान्ह आहार तयार करताना आणि त्याचे वाटप करताना स्वच्छता आणि आरोग्यपूर्णता राखणे आवश्यक आहे. याविषयी, शालेय स्तरावरील स्वयंपाकगृहांसाठी अन्न सुरक्षा आणि आरोग्य पूर्णता यासाठी GoI ने मार्गदर्शक तत्वे जारी केली (फेब्रुवारी २०१५) ज्यानुसार प्रत्येक राज्याने | सदर योजनेंतर्गत सर्व जिल्हयांच्या शिक्षणाधिकारी यांना योजनेतील स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या आरोग्य तपासणी करण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात येतात.<br>स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून योजनेतील समाविष्ट स्वयंपाकी तथा मदतनीस यांना सन २०१४-१५ मध्ये प्रशिक्षण देण्यात | स्वयंपाकी व मदतनीस यांचे प्रशिक्षण व आरोग्य तपासणीबाबत | स्वयंपाकी व मदतनीस यांचे प्रशिक्षण व आरोग्य तपासणीबाबत प्रमाणित कार्यवालन पध्दती (SOP) तयार करण्याचे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | स्वयंपाकी नि सहाय्यक आणि SMC चे सदस्य यांच्यासह वेगवेगळया कार्याधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी स्वत:ची एक कायमस्वरुपी प्रमाणित कार्यचालन पध्दती (SOP) विकसीत करावी. तसेच, स्वयंपाकी नि सहाय्यकांच्या पदासाठी त्यांच्या तंदुरुस्तीची/ पात्रतेची खात्री करण्यासाठी त्यांची द्वैवार्षिक आरोग्य तपासणी करण्यासाठी राज्याने प्रभावी कार्यतंत्र विकसीत करण्याचीही आवश्यकता होती.<br>लेखापरिक्षकांना असे आढळून आले की, GoM विभागाने स्वयंपाकी नि सहाय्यक यांच्या प्रशिक्षण किंवा वैद्यकीय तपासणीसाठी कोणतीही SOP तयार केली नव्हती आणि याविषयीची व्यवस्था अगदी तात्पुरती / कामचलाऊ होती. हा निष्कर्ष निवडक २३९ शाळांपैकी ४२ शाळांमध्ये स्वयंपाकी नि सहाय्यक यांना कोणतेही प्रशिक्षण दिले गेले नव्हते आणि ८१ शाळांमध्ये २०१०-१५ दरम्यान स्वयंपाकी नि सहाय्यक कोणत्याही वैदयकीय तपासणीला सामोरे गेल नव्हते, यावरुन काढण्यात आला आहे.<br>शासनाने सांगितले की, स्वयंपाकी नि सहाय्यकांकडून आरोग्य तपासणी प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी सर्व शिक्षण अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील. अन्न सुरक्षा व आरोग्यपूर्णता कायम राखण्यासाठी स्वयंपाकाच्या प्रक्रियेत गुंतलेल्या सर्व संबंधितांना याविषयी जागरुक / सचेतित करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याचे प्रधान सचिवांनी अंतिम बैठकीत मान्य केले (नोव्हेंबर, २०१५). | आलेले आहे. तसेच, सन २०१८-१९ मध्ये स्वयंपाकी तथा मदतनीस यांना तसेच, योजनेचे कामकाज पाहणारे अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.<br><br>शालेय पोषण आहार योजनेंतर्गत धारण्यात येणाऱ्या धान्यादि मालाची गुणवत्ता व सुरक्षितता तसेच अन्न शिजविणाऱ्या यंत्रणामार्फत अन्न शिजविताना घ्यावयाची काळजी, परिसराची स्वच्छता इत्यादीबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या दि. ७/९/२०१६ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत. | प्रमाणित कार्यचालन पध्दती (SOP) तयार केली किंवा कसे? जर केली नसल्यास त्याची कारणे द्यावीत. | काम अंतिम टप्प्यात आहे. |
| | २.३.४.९ | **अन्नपदार्थांच्या "सेवनासाठीच्या निर्धारित तिथी" नंतर त्यांचा वापर केला जाणे**<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (परिच्छेद ४.२) शाळांना वाटप करण्यात येणारे अन्नघटक चांगल्या दर्जाचे व आरोग्यपूर्ण असावे. ZPs मधील मध्यान्ह आहाराचे अधिक्षक आणि निवडक २६९ शाळांचे केंद्र प्रमुख यांच्यासह लेखापरिक्षकांनी संयुक्तपणे केलेल्या प्रत्यक्ष पडताळणीमध्ये असे आढळून आले की, १० शाळांमध्ये (पुणे:चार आणि धुळे : सहा) खाद्यतेल आणि मसाले यासारखे वेष्टनयुक्त पदार्थ त्यांच्या सेवनासाठीच्या निर्धारित तिथी पासून एक महिना ते २० महिन्यांनंतरही वापरले जात होते, जे असे मुदतबाह्य झालेले पदार्थ वापरण्यातील छुप्या धोक्यांविषयी संबंधितांना जागरुक / सचेतित करण्यात विभागाला आलेले अपयश तसेच वेगवेगळया पातळयांवर शाळांवर | शासन निर्णय दिनांक २५/०३/२०१४ नुसार शालेय पोषण आहार योजनेतंर्गत केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणाली तपासणीसाठी महानगरपालिका व नगरपालिका स्तरावर स्वंतत्र यंत्रणा गठित करण्यात आल्या आहेत.<br><br>पुरवठेदाराने ग्रामीण भागात पुरवठा केलेल्या मालाची तपासणी जिल्हास्तरीय / तालुकास्तरीय अधिकाऱ्याकडून करण्यात येते. तसेच, तपासणीसाठी तालुकानिहाय नमुने प्रथम शासकीय प्रयोगशाळेत पाठवून प्रयोगशाळेकडून समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मालाचे देयके अदा करण्यात येतात. | शिक्षणाधिकारी पुणे व धुळे यांचा खुलासा उतरामध्ये समाविष्ट करावा. | पुरवठेदाराने ग्रामीण भागात पुरवठा केलेल्या मालाची तपासणी जिल्हास्तरीय / तालुकास्तरीय अधिकाऱ्याकडून करण्यात येते. तसेच, तपासणीसाठी तालुकानिहाय नमुने प्रथम शासकीय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | संनियंत्रण ठेवणे आणि त्यांची तपासणी करणे यातील कमतरता दर्शविते.<br>पुणे आणि धुळे येथील शिक्षण अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आल्याचे शासनाने सांगितले. | शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहाराची गुणवत्ता, धान्यादी मालाची सुरक्षितता व आहार शिजविण्याच्या प्रक्रियेअंतर्गत ठेवावयाची स्वच्छता या संदर्भात दक्षता घेण्याबाबत दि.०७/०९/२०१६ रोजी सविस्तर परिपत्रक निर्गमित करण्यात आले असून यासंदर्भात वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. | | प्रयोगशाळेत पाठवून प्रयोगशाळेकडून समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मालाचे देयके अदा करण्यात येतात.<br>शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहाराची गुणवत्ता, धान्यादी मालाची सुरक्षितता व आहार शिजविण्याच्या प्रक्रियेअंतर्गत ठेवावयाची स्वच्छता यासंदर्भात दक्षता घेण्याबाबत दि.०७/०९/२०१६ रोजी सविस्तर परिपत्रक निर्गमित करण्यात आले असून यासंदर्भात वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.<br>शिक्षणाधिकारी पुणे व धुळे यांनी सादर केलेल्या खुलाश्यामध्ये निर्धारित तिथी नंतर आढळलेले साहित्य संबधित पुरवठादारा कडून बदलून घेतले असल्याचे कळविले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.३.४.१० | **मुलांनी वापरावयाच्या द्रवरुप साबणाचा (hand wash) असंबध्द पुरवठा**<br>GoI ने सर्व राज्य शासनांना द्रवरुप साबणाचा पुरवठा होण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या (जुलै २०१२) जेणेकरुन मुले जेवणापूर्वी आणि जेवणानंतर खात्रीने त्यांचे हात स्वच्छ करतील. २०१०-१५ दरम्यान विभागाने शाळांना वाटप करण्यासाठी द्रवरुप साबणाच्या एकूण रु. १०.३१ कोटी किमतलच्या २०.०४ लाख बाटल्या (प्रत्येकी २५० मि.ली. क्षमतेच्या) खरेदी केल्या. तक्ता २.३.७ मध्ये २०१०-१५ दरम्यान द्रवरुप साबणाची खरेदी आणि पुरवठा यांची राज्यातील स्थिती दिली आहे.<br>**तक्ता २.३.७ : २०१०-१५ दरम्यान राज्यातील द्रवरुप साबणाची खरेदी आणि पुरवठा**<br>तक्ता २.३.७ दर्शवितो की शाळांसाठी द्रवरुप साबणाची खरेदी व पुरवठा अतिशय असंबध्द रितीने केला जात होता. उदाहरणार्थ, विभागाने २०१२-१३ मध्ये ८५०३१ शाळांसाठी द्रवरुप साबणाच्या ८.९३ लाख बाटल्या खरेदी | सदर योजनेतर्गत मुलांना हात धुण्यासाठी हात धुण्याचा साबण पुरविण्याबाबत केंद्र शासनाने स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन दिलेला नाही.<br>योजनेसाठी व्यवस्थापन, संनियंत्रण व मूल्यमापन या घटकाखाली उपलब्ध असलेल्या निधीतून पात्र शाळांना सन २०१५-१६ मध्ये द्रवरुप साबणाचा पुरवठा केला आहे. | द्रवरुप साबणाचा पुरवठा अपुरा करण्यात आला व त्यामध्ये सातत्य नव्हते, ही वस्तुस्थिती आहे.<br>विद्यार्थ्यांना हात धुण्यासाठी सातत्यपूर्ण व पुरेशा द्रवरुप साबण पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली / कोणती बाब प्रस्तावित केली याची माहिती द्यावी. | सदर योजनेतर्गत केंद्र शासनाकडून व्यवस्थापन सनियंत्रण व मूल्यमापन (MME) यासाठी प्रतिवर्षी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर निधीतून झालेल्या वजातीमधून सन २०११-१२, सन २०१२-१३ व सन २०१४-१५ या वर्षात शाळांना द्रवरुप साबणाचा पुरवठा केला आहे.<br>द्रवरुप साबण पुरविण्यासाठी केंद्र / राज्य शासनाकडून स्वतंत्र निधी दिला जात नाही.<br>विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सवयी लावण्यासाठी प्रत्येक शाळेत लोकसह भागातून Hand Wash Station उभारण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्याप्रमाणे बहुतांशी शाळांमध्ये कार्यवाही करण्यात आलेली आहे. |

| वर्ष | एकूण शाळा | खरेदी केलेल्या बाटल्या (लाखात) | खरेदी आदेशाची किंमत (रु.कोटीत) | द्रवरुप साबणाच्या बाटल्या पुरविण्यात आलेल्या शाळा | प्रती शाळा प्रती वर्ष पुरविलेल्या बाटल्यांची सरासरी संख्या | द्रवरुप साबणाच्या बाटल्या न पुरविलेल्या शाळा |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१०-११ | ८८६४१ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | ८८६४१ |
| २०११-१२ | ८९३३८ | २.५३ | १.२० | ६०३४८ | ४ | २८९९० |
| २०१२-१३ | ८५०३१ | ८.९३ | ४.६५ | ८४७८० | १० | २५१ |
| २०१३-१४ | ८६०२८ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | ८६०२८ |
| २०१४-१५ | ८६३०१ | ८.५८ | ४.४६ | ८५८२० | १० | ४८१ |
| एकूण | | २०.०४ | १०.३१ | २३०९४८ | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | केल्या परंतू २०११-१२ मध्ये मात्र ८९३३८ शाळांसाठी फक्त २.५३ लाख बाटल्या खरेदी केल्या होत्या. २०१०-११ व २०१३ १४ दरम्यान अनुक्रमे ८८६४१ आणि ८६०२८ शाळांसाठी द्रवरुप साबणांची कोणतीही खरेदी करण्यात आली नव्हती. ज्या वर्षात (२०११-१२) द्रवरुप साबण खरेदी करण्यात आला होता, तेव्हाही सर्व शाळांना पुरवठा करण्यासाठी तो अपर्याप्त होता. द्रवरुप साबणाची खरेदी व पुरवठा करण्याचा आराखडा विषमतौल होता कारण, सरतेशेवटी प्रत्येक शाळेला वर्षभरात फक्त चार ते १० बाटल्याच प्राप्त होणार होत्या हे चमत्कारीच होते कारण ही संख्या इतकी नगण्य होती की मुलांमध्ये आरोग्य व स्वच्छतेच्या वांगल्या सवयी बिंबवण्याची मूळ कल्पना त्यामुळे धोक्यात आली होती.<br>शासनाने सांगितले की द्रवरुप साबणाची खरेदी करण्यासाठी GoI कडून निधीची कोणतीही स्वतंत्र तरतूद करण्यात आली नव्हती आणि योजनेच्या व्यवस्थापन, संनियंत्रण आणि मूल्यमापन या घटकांसाठी उपलब्ध असलेला निधी उपलब्धतेनुसार यासाठी वापरण्यात येत होता. | | | |
| | २.३.४.११ | **आपत्कालीन वैद्यकीय आराखडयाचा अभाव**<br>GoI ने जारी केलेल्या (जुलै २०१३) सूचनांनुसार, अन्नविषबाधा, आग, नैसर्गिक आपत्ती इत्यादी आकस्मिक समस्यांना तोंड देण्यासाठी प्रत्येक शाळेकडे आपत्कालीन वैद्यकीय आराखडा तयार असावा. २६९ शाळांच्या संयुक्त तपासणीत असे आढळून आले की, १७१ शाळांमध्ये (६४ टक्के) रुग्णवाहीका सेवा, अग्निशमनकेंद्रे, पोलिस स्थानके आणि रुग्णालये यांचे दूरध्वनी क्रमांक दर्शविले नव्हते. पुढे २६९ पैकी १८३ शाळांमध्ये जी अग्नीशमन उपकरणे बसविली होती त्यांचा वैधतेचा कालावधी संपल्यावरही त्यामध्ये अग्नीशमन द्रव्यांचा पुनर्भरणा करण्यात आला नव्हता. शासनाने सांगितले की शाळांमध्ये मोक्याच्या जागी औषधालये, जिल्हा रुग्णालये, रुग्णवाहीका सेवा, डॉक्टर्स इत्यांदीचे संपर्क क्रमांक दर्शविण्याच्या / बालगण्याच्या आणि शाळेत वालूच्या बादल्या ठेवण्याच्या सूचना देण्यात येत होत्या. | सदर योजनेच्या पात्र शाळेमध्ये मोक्याच्या जागी औषधालये, जिल्हा रुग्णालये, रुग्णवाहीका सेवा, डॉक्टर्स इत्यांदीचे संपर्क क्रमांक दर्शविण्याच्या / बालगण्याच्या आणि शाळेत वालूच्या बादल्या ठेवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.<br>सन २०१४ मध्ये योजनेबाबतची माहिती देणारे बॅनर्स पुरविण्यात आलेले आहेत. सन २०१८-१९ मध्ये आपातकालीन सेवा दूरध्वनी क्रमांक व योजनेबाबत माहिती देणारे फ्लेक्स बोर्ड सर्व शाळांना देण्यात येणार आहेत. | अपात्कालीन परिस्थितीत लागणारे दूरध्वनी क्रमांक शाळेमध्ये मोक्याच्या ठिकाणी लावणे याबाबत शासनाने दिलेल्या सूचनाबाबत महालेखापाल यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत. | सन २०१४ मध्ये योजनेबाबतची माहिती देणारे बॅनर्स पुरविण्यात आलेले आहेत. सन २०१८-१९ मध्ये अपात्कालीन सेवा दूरध्वनी क्रमांक व योजनेबाबत माहिती देणारे फ्लेक्स बोर्ड सर्व शाळांना देण्यात येणार आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.३.४.१२ | **गोणपाटाच्या पोत्यांची विल्हेवाट न लावल्यामुळे महसूलाची हानी**<br>डिसेंबर, २०१२ मध्ये, तांदूळाच्या रिकाम्या पोत्यांची गट पातळीवर विल्हेवाट लावण्याविषयी विभागाने SNA ला निर्देश दिले होते. परंतू सप्टेंबर, २०१४ मध्ये गट पातळी ऐवजी GoM च्या महिला व बाल विकास विभागाशी सल्लामसलत करुन निश्चित केलेल्या दराने प्रत्येक तीन महिन्यांनी एकदा शाळेच्या पातळीवरच रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट लावण्याचे आणि त्यातून मिळणारी रक्कम शासकीय खात्यात जमा करण्याचे निर्देश विभागाने SNA ला दिले.<br>निवडक २३९ शाळा व ३० पैकी २३ मध्यवर्ती स्वयंपाकगृहे यांच्याकडील दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की एकही शाळा किंवा मध्यवर्ती स्वयंपाकगृह रिकाम्या पोत्यांचा हिशोब ठेवत नव्हते. पुढे, डिसेंबर, २०१२ व सप्टेंबर, २०१४ मध्ये विभागाने निर्देश जारी केले असतानाही गट किंवा शाळा पातळीवर रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट लावली जात नव्हती. केंद्रीय अनुदानातून तांदूळाची खरेदी केली जात असल्याने, रिकाम्या पोत्यांच्या विक्रितून मिळणारी रक्कम योजनेच्या लेख्यांमध्येच जमा करावयास हवी होती. म्हणूनच रिकाम्या पोत्यांच्या विक्रीतून मिळणारी रक्कम शासकीय लेख्यांत जमा करण्याचे विभागाने दिलेले निर्देश (सप्टेंबर, २०१४) देखील उचीत नव्हते.<br>या योजनेतंर्गत २०१२-१५ दरम्यान भारतीय अन्न महामंडळांच्या वखारींमधून प्रत्येकी ५० कि. ग्रॅम वजनाच्या १.५५ कोटी पोत्यांमधून ७.७६ लाख मेट्रीक टन तांदूळाची उचल करण्यात आली होती. परंतू रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट न लावल्यामुळे विभागाने अंदाजे रु. ७.७६ कोटी रक्कम या कालावधीत गमावली.<br>संबंधित जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून रिकाम्या पोत्यांचे दर निश्चित करण्याच्या आणि शाळेच्या स्तरावर त्यांची विक्री करण्याच्या सूचना सर्व शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे (मार्च २०१५) शासनाने सांगितले.<br>**शिफारस क्रमांक - ३**<br>शासनाने (i) मध्यान्ह आहाराचा पुरवठा होण्यातील अडथळे तसेच शाळांनी राखिव साठा न ठेवल्याची कारणे तपासावी. (ii) मुंबईतील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील मुलांना खाण्यासाठी प्रत्यक्षात किती तांदूळाची | संबंधित जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून रिकाम्या पोत्यांचे दर निश्चित करण्याच्या आणि शाळेच्या स्तरावर त्यांची विक्री करण्याच्या सूचना सर्व शिक्षण अधिकाऱ्यांना प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या दि. ११/०३/२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.<br><br>i) शाळास्तरावर २० दिवस पुरेल एवढा तांदूळ व धान्यादी माल शिल्लक असतांना पुढील दोन महिन्याकरिता आवश्यक तांदूळ व धान्यादी मालाची मागणी तालुकास्तरावरुन पुरवठेदाराकडून नोंदवावी आणि जिल्ह्याच्या पुरवठादाराने | संबंधित जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यां कडून रिकाम्या पोत्यांचे दर निश्चित करुन आणि शाळा स्तरावर त्याची विक्री करण्याच्या सूचना सर्व शिक्षणाधिका ऱ्यांना शासनाने दि. ११/०३/२०१५ च्या पत्रान्वये दिल्या असल्या तरी सन २०१२-१५ या कालावधीत रिकामी पोत्यांची विल्हेवाट न लावल्याने सुमारे रु. ७.७६ कोटी महसूलाची हानी झाली आहे, ही | रिकाम्या पोत्याबाबत काही अभिलेख शाळास्तरावर ठेवण्यात आलेले नाहीत परंतु संबंधित जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून रिकाम्या पोत्यांचे दर निश्चित करण्याच्या आणि शाळेच्या स्तरावर त्यांची विक्री करण्याच्या सूचना सर्व शिक्षण अधिकाऱ्यांना प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या दि. ११/०३/२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आवश्यकता आहे याचा आढावा घ्यावा व त्यानुसार मुंबईतील मध्यवर्ती स्वयंपाकगृहांना पुरवठा केल्या जाणाऱ्या तांदूळाचे नियमन करावे. (iii) स्वयंपाकी नि सहाय्यक यांचे प्रशिक्षण व आरोग्य तपासणी यासाठी एक कायमस्वरुपी प्रमाणित कार्यचालन पध्दती तयार करावी. आणि वेष्टनयुक्त खाद्यपदार्थ त्यांच्या सेवनासाठीच्या निर्धारीत तिथीच्या पर्याप्त आधी वापरले जातील याची खात्री करावी. | मागणी नोंदविल्यापासून २० कार्यदिनाच्या आत शाळांना तांदूळ व धान्यादी मालाचा पुरवठा करावा, असे निर्देश देण्यात आलेले आहे. विलंबाने पुरवठा करणाऱ्या पुरवठेदारावर प्रती आठवडा ०.५ टक्के याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, विलंबाने पुरवठा केल्यामुळे विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहिल्यास विद्यार्थ्यांना अन्न सुरक्षा भत्ता देण्याची तरतूद दि. २ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे. सदरील अन्न सुरक्षा भत्याची रक्कम पुरवठेदाराच्या देयकामधून वसूल करण्याची तरतूद करण्यात आली आहे.<br>ii) मुंबईमध्ये विविध स्वयंसेवी संस्था / बचत गट यांच्या माध्यमातून मध्यवर्ती स्वयंपाकगृहामधून अन्न शिजवून विद्यार्थ्यांना शाळा स्तरावर दिले जाते. त्यामुळे संबधीत स्वयंसेवी संस्था / बचत गट यांचेकडे असलेल्या विद्यार्थी संख्या विचारात घेवून आणि संबंधीत स्वयंसेवी संस्था / बचत गट यांचेकडे शिल्लक असलेल्या तांदूळाचा आढावा मुंबई महानगरपालिकेकडून घेतला जातो. तसेच, संबंधीत स्वयंसेवी संस्था / बचत गट यांच्या मध्यवर्ती स्वयंपाकगृहाची तपासणी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत केली जाते.<br>iii) स्वयंपाकी / मदतनीस यांना तसेच शालेय पोषण आहार योजनेचे पर्यवेक्षीय यंत्रणेस प्रशिक्षण सन २०१८-१९ मध्ये देण्याची कार्यवाही सुरु आहे. | वस्तुस्थिती आहे.<br>रिकाम्या पोत्याबाबत काही अभिलेख शाळास्तरावर ठेवण्यात येते किंवा कसे याची माहिती दयावी व सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षात रिकामे पोती विक्रीतून किती उत्पन्न प्राप्त झाले याची माहिती लोकलेखा समितीस सादर करावी. | - |
| | २.३.५ | संनियंत्रण | | | |
| | २.३.५.१ | संनियंत्रणातील त्रुटी<br>एखादी योजना, कार्यक्रम किंवा प्रक्रिया यातील तफावतींचा त्यांच्यावर लवकरात लवकर सुधारणात्मक कार्यवाही करण्यासाठी आणि भावी नियोजनात त्यातून बोध घेण्यासाठी शोध घेण्याच्या उद्देशाने त्यांच्या प्रगतीचा माग घेण्यासाठी संनियंत्रण अत्यंत महत्वपूर्ण असते. योजनेच्या संनियंत्रणात | क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी (शिक्षणाधिकारी / गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक (शापोआ) / विस्तार अधिकारी / केंद्र प्रमुख) नियमितपणे शाळांना भेटी देऊन योजनेची तपासणी करीत असतात. | जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची स्थापना केली | शासनाने दि.३१ मार्च, २००५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांच्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखापरिक्षकांना खालील कमतरता आढळून आल्या :<br>• MDM योजनेसह इतर वेगवेगळ्या केंद्रिय योजनांच्या राज्य प्रकल्प संचालकांना योजनेवर संनियंत्रण ठेवण्यासाठी एक जिल्हास्तरीय समिती गठित करण्यासाठी GoI ने सूचना जारी केल्या (एप्रिल, २०१३). केंद्र / राज्य विधानमंडळाचे सदस्य, जिल्हाधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, ZPs चे सदस्य परिसरात प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या दोन NGOs इत्यादींच्या एकत्रित सहभागाने समिती गठित करायची होती. बैठकीच्या वेळी सर्वात वरिष्ठ विधानमंडळ सदस्याने समितीचे अध्यक्षपद भुषवायचे होते. परंतु, डिसेंबर, २०१५ पर्यंत GoM ने अशी कोणतीही समिती गठित केली नव्हती.<br>• निवड केलेल्या नऊपैकी फक्त दोन जिल्ह्यांनी (धुळे आणि सोलापूर) MDM योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या शाळांची आकस्मिक तपासणी करण्यासाठी भरारी पथके तयार केली होती. विभागाने मंजूरी दिल्यानंतर (जून २००९) सहा वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटूनही उर्वरीत सात जिल्ह्यांनी अद्याप भरारी पथके तयार केली नव्हती. भरारी पथकांनी प्रत्येक महिन्यात किमान दहा शाळांची तपासणी करणे आवश्यक होते आणि संबंधित ZPs आणि शिक्षण अधिकाऱ्यांना अहवाल सादर करावयाचे होते. अशाप्रकारे योजनेवर प्रभावी संनियंत्रण ठेवण्यासाठीच्या कार्यतंत्रांपैकी एक कार्यतंत्र पूर्णपणे प्रस्थापित झाले नव्हते.<br>• विभागातील सार्वजनिक तक्रार निवारणाची व्यवस्था खूप प्रभावी नव्हती कारण टोल फ्री क्रमांकावरुन (१८०० २३३ ९९८८) दाखल केलेल्या तक्रारींची नोंद जर नोंदवहीत घेण्यात आली होती तरी या तक्रारींवर केलेल्या अंतिम कारवाईची नोंद नोंदवहीत घेतल्याचे आढळून आले नव्हते. तसेच, पर्याप्त संनियंत्रणासाठी SNA कडून प्रलंबित तक्रारींचा मासिक किंवा वार्षिक संक्षिप्त गोषवारा देखील तयार करण्यात येत नव्हता.<br>• तसेच, सामान्य पध्दतीने प्राप्त होणाऱ्या लेखी तक्रारींची नोंद घेण्यासाठी विभागाकडे तक्रारींची नोंदवही ठेवण्यात आली नव्हती. | शासन निर्णय दिनांक २५/०३/२०१४ नुसार शालेय पोषण आहार योजनेतंर्गत केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणाली तपासणीसाठी महानगरपालिका व नगरपालिका स्तरावर स्वंतत्र यंत्रणा गठित करण्यात आल्या आहेत.<br><br>विभागाने दि. २२/०४/२०१५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा स्तरीय संनियंत्रण समिती गठित करण्यात आली असून सदर समितीचे अध्यक्ष संबंधित जिल्हयाचे सर्वात वरिष्ठ खासदार आणि सदस्य सचिव हे संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी आहेत. प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या दि.०८/०६/२०१५ च्या पत्रान्वये उपरोक्त गठित केलेल्या समितीनुसार (दक्षता समिती) वेळोवळी आढावा घेण्यात येत आहे. | आहे किंवा कसे. तसेच जर केली नसल्यास त्याची कारणमिमांसा समितीस सादर करावी.<br><br>शाळांच्या आकस्मिक तपासणीसाठी भरारी पथकांची निर्मिती सर्व जिल्हयांमध्ये केली आहे किंवा कसे ?<br><br>खालील मुद्यांची माहिती व लोकलेखा समितीस सादर करावी. | अध्यक्षतेखाली जिल्हा संनियंत्रण समितीची स्थापना केली आहे.<br><br>-<br><br>सर्व जिल्ह्यामध्ये भरारी पथकांची निर्मीती केली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखापरिक्षकांना असे आढळून आले की, २०१०-१५ दरम्यान विभागामध्ये ७९ लेखी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या ज्यापैकी १८ प्रकरणांमध्ये कारवाई केली गेली होती आणि ६१ प्रकरणे डिसेंबर, २०१५ रोजी प्रलंबित होती. २०११-१४ मधील ४१ प्रकरणांत चौकशी अधिकाऱ्यांनी कोणतीही चौकशी केली नव्हती. अशाप्रकारे तक्रार नोंदवहीत तक्रारींची नोंद घेण्याची कोणतिही व्यवस्था नसल्यामुळे संनियंत्रण कार्यतंत्र निष्प्रभ ठरले.<br>• SNA ने राज्यासाठी तयार केलेल्या आणि GoI ला सादर केलेल्या तांदूळाची सुरुवातीची शिल्लक SNA कडून अधिमान्यता प्राप्त झाल्यावर वाहतुकदारांनी उचल केलेला तांदूळ वापरलेला तांदूळ आणि तांदूळाची अंतिम शिल्लक यांची स्थिती दर्शविणाऱ्या त्रैमासिक प्रगती अहवालांवरुन (QPR) २०१०-१५ दरम्यानच्या प्रत्येक वर्षात सुरुवातीच्या आणि अंतिम शिल्लकींमध्ये मोठया प्रमाणात विसंगती आढळून आल्या होत्या.<br>• शासनाने सांगितले की, गट जिल्हा आणि राज्य पातळयांवर माहितीचे एकत्रिकरण केले जात असल्याने एका शाळेच्या माहितीतील चुकीमुळे राज्यस्तरीय माहितीमध्ये परिणाम होतो आणि पुढील QPRs मध्ये या चुका दुरुस्त केल्या जातात. पुढे वेगवेगळी युनिटस् (कि.ग्रॅ./मे.टन) वापरल्यामुळे काही वेळा अंतिम व | | १) शालेय पोषण आहार कक्ष कार्यान्वित झाला आहे काय ? त्याचे कार्य विषद करावे.<br>२) टोल फ्री क्रमांकावर दाखल झालेल्या तक्रारीवर दखल घेतली जाते किंवा कसे, तसेच प्रलंबित तक्रारीचा गोषवारा तयार करण्यात आला आहे काय ?<br>३) लेखी तक्रारीची नोंद घेण्यासाठी विभागाकडे तक्रार नोंदवही ठेवली आहे काय. | १) शालेय पोषण आहार कक्षातील अधिकारी संवर्गातील पदे प्रतिनियुक्तीने व कंत्राटी तत्वावरील पदे बाह्य यंत्रणेमार्फत भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.<br>२) संचालनालयाच्या टोल फ्री क्रमांकावर प्राप्त तक्रारीची दखल घेण्यात येते. सदर टोल फ्री क्रमांकावर एकूण १०६ तक्रारी प्राप्त झालेल्या असून त्या प्रलंबित तक्रारीचा गोषवारा तयार करण्यात आला आहे.<br>३) लेखी तक्रारीची नोंद घेण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयस्तरावर तक्रार नोंदवही ठेवली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सुरुवातीच्या शिल्लकी जुळत नाहीत, परिणामी QPR मध्ये चुकीचा अहवाल दिला जातो.<br>**शिफारस क्रमांक - ४**<br>शासनाने (i) जिल्हास्तरीय समितीची स्थापना करुन (ii) सार्वजनिक तक्रार निवारण व्यवस्थेत सुधारणा करुन आणि (iii) संपूर्ण सहाय्यासाठी भरारीपथके गठीत करुन संनियंत्रण कार्यतंत्र बळकट करावे. | i) केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजनेच्या कामकाजाचा आढावा घेण्याकरिता दि. २२/०४/२०१५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती (दक्षता समिती) गठीत करण्यात आली असून सदर समितीचे अध्यक्ष संबंधीत जिल्ह्याचे सर्वात वरिष्ठ खासदार आणि सदस्य सचिव संबंधीत जिल्हाधिकारी आहे.<br>ii) प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावर शालेय पोषण आहार योजनेकरिता एक टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यावरती प्राप्त झालेल्या तक्रारीची नोंद घेण्यात येते आणि सदरील तक्रार ज्या जिल्ह्याशी संबंधीत आहे त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी यांना तक्रारीच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतात.<br>iii) प्रत्येक जिल्हास्तरावर भरारी पथकांची स्थापना करुन पथकामार्फत यादृच्छीक शाळांना भेटी देवून शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याची खात्री केली जाते. तसेच, राज्यस्तरावर सुध्दा भरारी पथकांची स्थापना करुन शालेय पोषण आहार योजनेच्या कामकाजाचे सनियंत्रण केले जाते. तसेच, शिक्षणाधिकारी, लेखाधिकारी शापोआ, गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक शापोआ, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख शाळाभेटी शालेय पोषण आहार योजनेचा कामकाजाचा आढावा घेत असतात. | | |
| | २.३.६ | **मूल्यमापन** | | | |
| | २.३.६.१ | **मुलांच्या भरतीच्या संख्येत घट**<br>मुलांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी आकर्षित करण्यासाठी आणि त्यांच्या भरतीच्या संख्येत सुधारणा करण्याच्या उद्देशाने MDM योजना सुरु करण्यात आली होती. SNA निवडक २६९ शाळा आणि निवडक आठ जिल्हे यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या विश्लेषणात असे निदर्शनास आले की, २०१०-११ शी तुलना करता २०१४-१५ मध्ये शासकीय, अनुदानीत आणि | शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येते. सदर योजनेतर्गत शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा, खाजगी अनुदानित शाळा, बालकामगार प्रकल्प, शासन अनुदानित मदरसा, मक्ताब इ. मधील १ ली ते ८ वी च्या | प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सुरु झाल्यापासून विद्यार्थी पट | प्रगत शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत २५ निकषांनुसार प्रगत प्राथमिक शाळांची संख्या माहे जानेवारी, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | स्थानिक संस्थांच्या शाळांमध्ये भरतीच्या संख्येत घट आली होती जे आलेख २ मध्ये दर्शविले आहे.<br>**आलेख २ : २०१०-११ शी तुलना करता २०१४-१५ मधील भरती संख्येतील घट**<br> <br>२०१०-११ च्या तुलनेत २०१४-१५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात भरतीमध्ये सार्वधिक २५.०२ टक्के इतकी घट झाली होती त्याचवेळी निवडक नऊ जिल्ह्यांपैकी मुंबईमध्ये भरतीमधील घट सर्वाधिक होती (११ टक्के).<br>पालकांनी त्यांच्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत, विना-अनुदानीत शाळेत प्रवेश घेण्यास पसंती देणे आणि जन्मदर कमी होणे ही कारणे भरतीच्या संख्येत घट होण्यासाठी शासनाने दिली.<br>हे उत्तर दर्शविते की, लोकसंख्येतील एक वाढता हिस्सा मोफत आहारापेक्षा दर्जेदार शिक्षणाला प्राधान्य देत आहे म्हणून अध्यापन / अध्ययनाच्या परिणामांमधील सुधारणांची जोड दिल्याशिवाय फक्त मोफत MDM मुलांना शाळेमध्ये टिकवून ठेवण्यास पुरेसे नाही.<br>दुष्काळबाधित म्हणून घोषित केलेल्या जिल्ह्यांमधील शाळांचा या योजने अंतर्गत समावेश झालेला नसल्याने माध्यान्ह आहार योजनेचे नियोजन आणि व्याप्ती कमकुवत ठरली. SNA कडून जिल्हे, गट आणि शाळांना अनुदाने मुक्त करण्यात मोठया प्रमाणात विलंब झाला होता. मुलांना सर्व शालेय दिवशी शिजवलेला आहार देण्यात आला नव्हता. मुंबईतील प्राथमिक | विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ देण्यात येतो. तथापि, काही वर्षापासून पालकांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे ओढा अधिक असून विद्यार्थी विनाअनुदानित तसेच, स्वयंअर्थसहाय्यीत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. सदर शाळांमध्ये शालेय पोषण आहार देण्यात येत नाही. त्यामुळे योजनेतील पात्र विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. तसेच, राज्यातील जन्मदर सातत्याने कमी होत आहे. त्यामुळे देखील विद्यार्थी संख्या कमी होत आहे.<br>प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियानातंर्गत डिजीटल शाळा, तंत्रस्नेही शिक्षक यांच्याआधारे राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थी प्रभावीपणे गुणात्मक व दर्जात्मक शिक्षण घेत आहेत. | नोंदवहीबाबत ची स्थितीची माहिती समितीस देण्यात यावी. | २०१६ रोजी २४६८७ (३६.७६%) होती त्यामध्ये वाढ होऊन माहे मार्च, २०१८ अखेर कालावधीत ती संख्या ३६३२५ (५४.८१%) झालेली आहे. तर प्रगत उच्च प्राथमिक शाळांची संख्या माहे जानेवारी, २०१६ मधील ३६.३१ % यामध्ये वाढ होऊन माहे मार्च २०१८ रोजी ५४.९२% इतकी म्हणजेच १२२३६ झालेली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आणि उच्च प्राथमिक शाळांमधील मुलांसाठी ISKCON आणि २८८ इतर मध्यवर्ती स्वयंपाकगृहांनी उचल केलेल्या तांदूळाच्या प्रमाणात मोठया प्रमाणात विसंगती असूनही राज्य शासनाने या परिस्थितीचा आढावा घेतला नव्हता. GoI ने विहित केलेल्या मात्रेपेक्षा (१०० मि.ग्रॅ.) खरेदी केलेल्या मुलतत्तव लोहाची मात्रा (४८.५३ मि.ग्रॅ.) लक्षणीयरित्या कमी असल्याने रु. ५७.०६ कोटी खर्च करुन लोह फॉलिक ॲसिडच्या ८०.७९ कोटी कॅप्स्युल्सचे प्रापण अविवेकी ठरले आणि म्हणूनच ११-१४ वर्षे वयोगटातील निर्धारित लाभार्थ्यांसाठी त्या इच्छित प्रमाणात गुणकारक ठरल्या नाहीत. राज्यात २०१४-१५ दरम्यान १८ टक्के शाळांमध्ये शिक्षकांनी आणि ४५ टक्के शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी माध्यान्ह आहार चाखला नव्हता. स्वयंपाकी नि सहाय्यक यांच्या प्रशिक्षणात आणि आरोग्य तपासणीत कमतरता होत्या. शाळांकडून खाद्य तेल आणि मसाले यासारख्या वेष्टनयुक्त खाद्य पदार्थांचा वापर त्यांच्या सेवनासाठीच्या निर्धारीत तारखेनंतरही केला जात होता. जिल्हास्तरीय समितीची स्थापना न करणे आणि भरारी पथकांची निर्मिती न करणे यामुळे योजनेचे संनियंत्रण कमकुवत राहिले. मोफत मध्यान्ह आहार देऊनही २०१०-११ च्या तुलनेत २०१४-१५ मध्ये शासकीय, अनुदानीत आणि स्थानिक संस्थांच्या शाळांमध्ये मुलांच्या भरतीमध्ये घट झाली होती.<br><br>**शिफारस क्रमांक - ५**<br>भरती मोहिमांसारख्या सामाजिक चळवळी आयोजित करुन आणि मोफत माध्यान्ह आहारापेक्षा इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाला पालक प्राधान्य देत असल्याने त्यावर जोर देऊन शिक्षणाचा दर्जा उंचावून मुलांची गरती आणि पटसंख्या कायम राहील याची शासनाने सुनिश्चित करावी. | सन २०१५ मध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि. २२ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सुरु केला आहे व दि. ०९ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सुरु केला असून या कार्यक्रमातंर्गत ज्ञानरचना कृतीयुक्त अध्यापन पध्दतीने विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. तसेच, शहरी व ग्रामीण शाळांमध्ये मागणीनुसार सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरु केले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा खाजगी अनुदानित शाळा शासकीय शाळांमधील पटसंख्येमध्ये मागिल दोन वर्षामध्ये वाढ झालेली आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या शालेमधील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमामुळे गुणवत्ता वाढ झालेली असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मोठया प्रमाणात प्रवेश घेतले आहे. | | |

**साक्ष :**

**महालेखापालांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २९ मे, दिनांक २७ जून, दिनांक ३१ जुलै व १३ ऑगस्ट २०१८ रोजी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग व विभागीय प्रतिनिधींनी साक्ष घेतली.**

**परिच्छेद क्रमांक २.३.२.१—दुष्काळप्रवण जिल्ह्यांना लाभ न मिळणे/ जिल्ह्यांचा समावेश नसणे—**

१.१ साक्षीच्या वेळी या परिच्छेदाबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, दुष्काळी काळात उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन अनुज्ञेय असल्याबाबत हा परिच्छेद असून यामध्ये कार्यक्षमता लेखापरिक्षण असते. मध्यान्ह आहार योजनेंतर्गत समावेश न झालेले दुष्काळबाधित जिल्हे आहेत. महसूल व वन विभागाकडून दुष्काळ जाहीर झाल्यानंतर योजनेचा लाभ त्याच वर्षी मिळाला नसल्याचा आक्षेप लेखापरीक्षकांनी घेतला होता. सध्या या योजनेचा पुरवठा सुरू झालेला आहे.

सन २०१० ते सन २०१५ पर्यंतचा अहवाल आता घेण्यात आलेला आहे. विभागाने सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ मध्ये योजना सुरू केली. त्याबद्दल समितीचा कोणताही आक्षेप नाही. विभागाचा अहवाल केंद्र सरकारला पूर्वी पाठविण्यात आला होता. परंतु तो दुष्काळानंतरच्या काळामध्ये जाहीर करण्यात आला होता. सन २०१३ व सन २०१५ मध्ये दुष्काळ जाहीर झाल्यानंतर अहवाल देण्यात आलेला आहे. या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवित असताना विभागाने चूक केलेली आहे, असा निष्कर्ष विभागाने दिलेल्या अभिप्रायावरुन दिसून येत असल्याचे मत समितीने मांडले असता, समिती जे सांगत आहे ते योग्य आहे. परंतु मुलांना मध्यान्ह भोजन मिळू नये, अशा प्रकारचा हेतू नव्हता. मध्यान्ह भोजनाबाबत केंद्र सरकारचे स्पष्ट धोरण आहे. त्यामध्ये जेवढे ताटे लागत असतील तेवढे मिळतील. ज्यावेळी एखादया भागामध्ये दुष्काळ पडल्याचे जाहीर होण्यापूर्वीच विभागाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेला असतो. सदर प्रस्ताव हा जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये पाठविण्यात येत असतो. प्रस्ताव केंद्र शासनाला पाठविल्यानंतर जर एखाद्या गावामध्ये दुष्काळ पडला तर त्या गावाचा समावेश त्या प्रस्तावामध्ये करता येत नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २०१३ आणि सन २०१५ मध्ये दुष्काळ अगोदरच जाहीर झालेला आहे. त्यानंतर विभागाने अहवाल पाठविलेला आहे. सन २०१३ आणि सन २०१५ मध्ये दुष्काळ जाहीर झाल्यानंतरदेखील विभागाने दुष्कळाग्रस्त जिल्ह्यांना समाविष्ट केले नाही, ही वस्तुस्थिती विभागाला मान्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१३ आणि सन २०१५ मध्ये केंद्र शासनाकडे राज्य शासनाचा अहवाल केव्हा गेला, हा मूळ मुद्दा नाही. उन्हाळ्याच्या सुट्टयांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय मध्यान्ह भोजन मिळावयास पाहिजे, हा मूळ मुद्दा आहे. परंतु त्यामध्ये काही ठिकाणी तफावत आढळून येत आहे. सन २०१२-१३ मध्ये जालना जिल्हा वगळण्यात आला होता. फेब्रुवारी महिन्यापर्यंत जर दुष्काळ जाहीर होऊ शकला नाही, तर विभागाकडून बजेटची मागणी करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येत असतो. जर दुष्काळ विलंबाने जाहीर झाला तर उन्हाळी सुट्टीमध्ये शासकीय यंत्रणेमार्फत योजनांचा आदेश शाळापर्यंत पोहचत नसल्यामुळे त्यांची अंमलबजावणी होत नाही. काही वेळा जास्त प्रमाणात दुष्काळ पडल्याचे जाहीर झाल्यानंतर पालक आणि विद्यार्थ्यांचे स्थलांतर होत असते. त्यामुळे काही शाळांमध्ये मध्यान्ह भोजन सुरू होत नाही. परंतु मागील दोन ते तीन वर्षापासून ऑक्टोंबर, नोव्हेंबर महिन्यामध्ये दुष्काळ जाहीर होत आहे, त्यासाठी निधी, देखील विहित वेळेत मिळत आहे. उन्हाळी सुट्टीच्या पूर्वी जर दुष्काळ जाहीर केला तर याबाबतची माहिती शाळांपर्यंत पोहचत असते. परंतु आता ह्या सर्व बाबी सुरळीत सुरू आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

केंद्र शासनाचा निधी उपलब्ध झाला किंवा झाला नसला तरीही मध्यान्ह भोजनाचा पुरवठा सर्व शाळांना केला आहे, असे विभागाचे मत आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विद्यार्थ्यांना जेवण दिल्यानंतर केंद्र शासनाकडून निश्चितपणे निधी मिळत असतो. त्यामुळे केंद्र शासनाकडे मागणी करण्याचा कोणताही प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु दुष्काळ जाहीर होऊनही जिल्हा पातळीवर मध्यान्ह भोजनाचा लाभ दिला गेला नाही किंवा काही ठिकाणी जास्त दिला गेला, अशा प्रकारची तफावत आढळून येत आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

जे जिल्हे दुष्काळग्रस्त आहेत अशा जिल्ह्यांची माहिती केंद्र शासनाकडे पाठविली नसल्यास त्यांना फायदा मिळतो काय? अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाल्यानंतरही विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचा लाभ मिळालेला नाही, अशा प्रकारची माहिती समितीकडे उपलब्ध आहे. त्यामुळे काही जिल्ह्यांना शालेय पोषण आहाराचा लाभ मिळाला किंवा मिळाला नाही, अशा प्रकारची जी माहिती आहे, ती योग्य आहे किंवा अयोग्य आहे, याबाबत विभागाच्या अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी असे समितीने निदेशित केले असता, राज्य शासनाकडून महसूल व वन विभागाच्या माध्यमातून दुष्काळ जाहीर केला जातो. संपूर्ण जिल्हाच दुष्काळग्रस्त जाहीर होतोच, असे नाही. काही वेळा एखादया जिल्ह्यातील तालुका किंवा काही विशिष्ट गावे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर होतात असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने समितीला जी माहिती सादर केली आहे, त्यामध्ये ज्या जिल्ह्यांच्या नोंदी केल्या आहेत. त्यामध्ये सातारा, नाशिक, नंदुरबार, जळगाव, अमरावती असे जिल्हे समाविष्ट आहेत. त्यामध्ये तालुक्यांचे नावे दिलेली नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता, सदर अभिप्राय हा लेखा परिक्षकांनी दिलेला आहे. अशा प्रकारचा अभ्रिपाय का दिला ? याबाबत विभागामार्फत लेखापरिक्षकाकडे विचारणा केली होती. या वर्षी अकरा तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ऑडीटरने जी माहिती दिलेली आहे त्याच आधारे प्रश्न विचारण्यात येत असतात. ऑडिटरने दिलेल्या माहितीकडे दुर्लक्ष करता येत नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागांतर्गत येत असलेल्या कार्यालयास विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की, संचालक पातळीवर ज्या जिल्ह्यांमधून बिल क्लेम केले त्यामध्ये संपूर्ण जिल्ह्याने बिल दाखल केले नसले तरी काही शाळांचे बिल दाखल करण्यात आले होते. त्यामुळे सदर शाळा ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्याचे नाव यामध्ये आलेले आहेत. ऑडिटरने ज्या जिल्ह्यातील शाळांचे बिल प्राप्त झालेले आहेत, त्या जिल्ह्याचे नाव दिलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु उन्हाळी सुट्टीमध्ये शाळांना सुट्टी असते. असे असताना मध्यान्ह भोजनाची सुविधा कशा प्रकारे देण्यात येते? अशी विचारणा समितीने केली असता, उन्हाळी सुट्टीत शाळा केवळ शिक्षणासाठी बंद असते. दुष्काळ जर जाहीर झाला असेल तर मध्यान्ह भोजन सुरू असते असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

काही जिल्ह्यांमध्ये दुष्काळ जाहीर झालेला आहे. दुष्काळ जाहीर झालेल्या जिल्ह्यांमध्ये किंवा तालुक्यांमधील शाळांमध्ये सद्य:स्थितीत शालेय पोषण आहार सुरू आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवून सध्या अकरा तालुक्यांमध्ये शालेय पोषण आहार सुरू आहे व गोंदिया, तिरोडा व गोरेगाव या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे तेथे मध्यान्ह भोजन वाटप करणे अपेक्षित आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

उन्हाळी सुट्टीमध्ये शाळेत शिक्षक उपस्थित नसतात, त्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार कोणामार्फत देण्यात येतो? व मध्यान्ह भोजन वाटप होत असल्याचे समितीला कोठेच दिसून आले नाही. मध्यान्ह भोजन वाटपाचे बिल तयार करण्यात येत असेल तर ते थांबविण्यात यावे. सुटीच्या दिवसांमध्ये मुले शाळेत येत नाहीत. दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमधील व तालुक्यांमधील विद्यार्थ्यांना सुटीमध्ये मध्यान्ह भोजन वाटप करण्यात येणार अशी माहिती शिक्षण विभागाने विद्यार्थी व पालकांना देणे गरजेचे आहे, असे समितीने सूचित केले असता, सन २००६ पासून सदरहू योजना लागू करण्यात आली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सदरहू योजनेद्वारे लाभ देण्यात येतो, याची समितीला माहिती नाही, असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, सदरहू प्रकरणी दोन प्रकारच्या प्रक्रिया शालेय पातळीवर अवलंबिण्यात येतात. गावामध्ये दुष्काळ असल्याने उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये मध्यान्ह भोजन वाटप करण्यात येणार आहे, असे एसएमसीच्या (SMC) बैठकीमध्ये सांगण्यात येते. तसेच, शाळेच्या फलकावरही सूचना लिहिण्यात येते. सदरहू माहिती संचालक महोदयांनी विभागास दिली असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले. दुष्काळी जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये राबविण्यात येणारी सदरहू योजना अतिशय चांगली असल्याने त्याबाबत शिक्षण विभागाने जनजागृती केली पाहिजे. उक्त योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळाला पाहिजे, असे समितीने सूचित केले असता, सुमारे ११ दुष्काळी तालुक्यांमध्ये उक्त योजना राबविण्यात येत आहे. गोंदिया येथे उक्त योजना सुरू असल्याचे आता दुरध्वनीद्वारे समजले आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**परिच्देछ क्रमांक २.३.३ वित्तीय व्यवस्थापन**

१.२ सदरहू परिच्छेद वित्तीय व्यवस्थापनाच्या संदर्भातील असून सन २०१० मध्ये अन्न शिजवण्याच्या दराचे मापदंड बदलण्यात आले होते, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले त्यावर केंद्र शासनाने सन २००९ मध्ये सुधारित दर जाहीर केल्यानंतर राज्य शासनाने सन २०११ मध्ये सुमारे दीड वर्ष उशिराने निर्णय जाहीर केला आहे, हा मूळ आक्षेप आहे. तो प्रॉस्पेक्टिव्ह लागू केल्याने सन २०१०-११ मध्ये ७०० कोटी रुपये बचत झाली, याबाबत विभागाचे काय मत आहे? अशी विचारणा समितीने केली असता, मध्यान्ह भोजन मुलांना देण्यासाठी तो आहार शिजविण्याकरिता जुन्या दराने रक्कम वाटप करण्यात येत होती, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

जुन्या दरामध्ये व नवीन दरामध्ये किती रुपये तफावत होती? अशी विचारणा समितीने केली असता, आहार शिजविण्याचा प्रती विद्यार्थी प्राथमिकसाठी २.०८ रुपये दर होता तो २.६९ रुपये व उच्च प्राथमिकसाठी २.६० रुपये दर होता तो ४.०३ रुपये इतका वाढविण्यात आला होता. अशा प्रकारे अनुक्रमे ६१ पैसे व १.४३ रुपये फरक दोन्ही दरामध्ये होता, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सन २००९ मध्ये केंद्र शासनाने निर्णय जाहीर केल्यानंतर शिक्षण विभागाने त्यासंदर्भात माहे मे, २०१० मध्ये पुरवणी मागणी सादर केली. सदरहू पुरवणी मागणीस वित्त विभागाने माहे जुलै, २०१० रोजी मान्यता दिली होती. शालेय शिक्षण विभागाने सांगितले की, पुरवणी मागणी माहे डिसेंबर मध्ये मान्य झाली. याबाबत स्पष्टीकरण देण्याबाबत समितीने निदेशित केले असता, पुरवणी मागणी पावसाळी अधिवेशनामध्ये मान्य करण्यात आली, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

पावसाळी अधिवेशनामध्ये मान्यता मिळाली परंतू समितीला माहिती देण्यात आली की, माहे डिसेंबर मध्ये मंजूरी देण्यात आली. पुरवणी मागणी मंजूर झाल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने ८ महिने उशिराने सन २०११ मध्ये शासन निर्णय निर्गमीत केला. माहे जुलै, २०१० मध्ये पुरवणी मागणी मान्य झाल्यानंतर लगेच शासन निर्णय निर्गमित केला पाहिजे होता. शासन निर्णय त्या वर्षामध्ये निर्गमित करावयाचा नव्हता तर पुरवणी मागणी सादर करण्याची आवश्यकता का भासली ? विभागाने योजनेचे पैसे वाढीव दरानुसार देण्यासाठी पुरवणी मागणी सादर केली होती ती मंजूर झाल्यानंतर शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक होते, असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शवून तसे घडले नसल्याचे विदित केले.

शालेय शिक्षण विभागास शासन निर्णय निर्गमित करण्यास विलंब लागण्याची कारणे काय ? अशी विचारणा प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या माध्यमातून केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, उक्त निर्णय निर्गमीत करण्यापूर्वी वित्त विभागाच्या निदर्शनास आणून देण्यात आला. उक्त प्रकरणीच्या सर्व कार्यवाहीमुळे विलंब झाला होता. वित्त विभागाने मंजूरी दिल्यानंतर शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी पुन्हा परवानगी घ्यावी लागते का ? अशी विचारणा करून माहे जुलै मध्ये निधी उपलब्ध झाल्यानंतरही शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी ७-८ महिने विलंब केला आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, केंद्र शासनाने सुधारित केलेल्या दराप्रमाणे सुधारित दराने वाढ करण्यासाठीचा शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेसाठी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१० रोजी सादर करण्यात आला होता, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

पुरवणी मागणी कोणत्या आधारावर मंजूर करून घेण्यात आली होती ? अशी विचारणा समितीने केली असता, भारत सरकारने योजनेचे अन्न शिजविण्याच्या दरामध्ये वाढ केल्यानंतर लाभार्थी मुलांच्या संख्येनुसार फरकाची रक्कम अदा करण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती ती मंजूर झाल्यानंतर शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

पुरवणी मागणी सादर करण्यापुर्वी त्यास वित्त विभागाची मंजूरी घ्यावी लागते, असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली. Without sanctioning the Scheme, how do dept go to the Finance Department for Supplementary ? शासनाची योजना कार्यान्वित आहे त्यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाचे धोरण स्वीकारलेले आहे. त्या अनुषंगाने पुरवणी मागणी सादर करण्यात येते. ती मंजूर झाल्यानंतर शिक्षण विभागाने तातडीने शासन निर्णय निर्गमीत करणे आवश्यक होते परंतु त्यासाठी ७ महिने विलंब झाला आहे. त्यामुळे उक्त प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर विभागीय कारवाई करण्यात यावी, असे समितीने निदेशित केले व उक्त विलंबामुळे शालेय शिक्षण विभागाने केंद्र शासनाचा निधी गमावला आहे असे प्रधान महालेखाकांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले.

**परिच्छेद क्रमांक २.३.३.२ (रोख पुस्तिका आणि बँकेची विवरणे यामधील शिल्लकींचा ताळमेळ न होणे.)**

१.३ लेखापरीक्षकांना प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गासाठीच्या रोख पुस्तक व बँकेच्या विवरणामध्ये फरक आढळून आला आहे. त्यासंदर्भात विभागाने दिलेल्या लेखी उत्तरात नियुक्त केलेल्या संस्थांना देण्यात येणाऱ्या धनादेशाची नोंद कॅशबुक मध्ये घेण्यात येत असे परंतु संबंधित संस्थांनी त्याच दिवशी धनादेश सादर न केल्यामुळे फरक दिसून येत आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यावेळी रिकन्साईल करण्यासाठी अधिकारी हजर नव्हते, ते नंतर आले व त्यांनी रिकन्साईल केले आहे. आता पीएफएमएस आल्यामुळे अशा प्रकारचे मुद्दे येत नाहीत. संगणकामुळे २-३ मुद्दांच्या संदर्भातील अडचणी दूर झाल्या आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

पीएफएमएस म्हणजे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, पीएफएमएस म्हणजे पब्लिक फायनान्स मॅनेजमेंट सिस्टम. प्रत्येक शाळेकडून त्यांनी केलेल्या खर्चाची ऑनलाईन नोंद इंटरनेटच्या माध्यमातून संगणकाद्वारे करण्यात येते. भारत सरकारपासून संबंधित शाळेपर्यंत खर्चाची व शिलकेची माहिती सर्व पाहू शकतात. या सुविधेमुळे अकाऊंटंट यांची आवश्यकता भासत नाही, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

दिल्ली (केंद्र शासनाकडून) येथून निधी वितरित करण्यात येतो का ? या निधीवर नियंत्रण कोणाचे आहे ? केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर राज्य शासनाकडून राज्याचा हिस्सा जमा करण्यात येतो. Is everything going on that system ? अशी विचारणा समितीने

केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व केंद्र शासनाचे नियंत्रण आहे. निधी वितरित केल्यानंतर तो सिस्टममध्ये जातो व खर्चाची व शिलकेची माहिती शाळास्तरापर्यंत सर्व जण पाहू शकतात असे सांगितले.

अन्न शिजवण्यासाठी थेट निधी शाळा व्यवस्थापन समितीला देण्यात येतो का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवून विदित केले की, पूर्वी निधी कॅफो पातळीवरुन देण्यात येत होता. सन २०१५ मध्ये तालुका पातळीवरुन उक्त निधी देण्यासाठी उशीर होत असल्याने जिल्हा पातळीवरुन देण्या सुरुवात करण्यात आली होती. यावर्षीपासून राज्यस्तरावरुन थेट शाळेला निधी देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. केंद्र शासनाची शिफारस होती की, उक्त निधी ॲडव्हान्समध्ये वितरित करण्यात यावा, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी त्यास होकारार्थी उत्तर देऊन, सदरहू प्रकरणी पाठविलेली नस्ती वित्त विभागाने मान्य केली नाही. त्याची आता आवश्यकता नाही कारण उक्त प्रकरणी संगणकामुळे गती प्राप्त झाली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

धुळे, जळगाव, नांदेड, परभणी, पुणे, सातारा, सोलापूर इत्यादि जिल्ह्यांना निधी देण्यासाठी २७ आठवड्यांचा विलंब झाला आहे त्याबाबत विभागाचे काय मत आहे? अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, यासंदर्भात स्पष्टीकरण देण्यासारखे काही नसल्याने सर्व सिस्टममध्ये सुधारणा करण्यात येत आहे. सदरहू प्रकरणी विलंब होत असल्याने सिस्टमध्ये सुधारणा करण्यात येत आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सदरहू प्रकरणी २७ आठवडे म्हणजे जवळपास ६ महिने विलंब झाला आहे, असे समितीने निदर्शनास आणून प्रतिभा निकेतन या प्राथमिक शाळेला निधी देण्यास २ वर्ष विलंब झाला आहे. विलंबाचे कारण काय? अशी विचारणा केली असता, प्रत्येक शाळेकडून निधीच्या खर्चाचा व शिलकीचा हिशोब मागविण्यात येत होता. त्यावेळी शाळांकडे आधुनिक तंत्रज्ञान नव्हते. त्यामुळे प्रत्येक शाळेचा हिशेब येईपर्यंत वाट पहावी लागत होती. त्यानंतरच निधी वितरित करण्यात येत होता. त्यावेळी विलंब होत असल्याने तालुकास्तरावरुन निधी वितरित करणे बंद करून जिल्हास्तरावरुन निधी वितरित करण्यास सुरुवात करण्यात आली होती. आता राज्यस्तरावरुन निधी वितरित करण्यात येत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

But that is not as per the Scheme guidelines. योजनेच्या मार्गदर्शिकेमध्ये नमूद आहे की, " As soon as the grants for the Scheme are released by Govt. of India, the State Government must release the grants received from the Centre alongwith its minimum mandatory matching share immediately to the SNA". असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, सदरहू निधी एसएनएकडे प्राप्त झाल्यानंतर तो जिल्हा, त्यानंतर तालुक्याला व त्यानंतर शाळेला वितरित करण्यात येत होता. उक्त प्रकरणी एसएनएकडून जिल्ह्यास व जिल्हास्तरावरुन गटांना निधी देण्यास विलंब झाल्याचे दिसून येत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

जिल्हास्तरापर्यंत निधी पोहोचला नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, जिल्हास्तरापर्यंत निधी पोहोचण्याकरिता ६-६ महिने विलंब झाल्याचे दिसून येत आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले. एसएनए म्हणजे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एसएनए म्हणजे स्टेट नोडल एजन्सी, उक्त एजन्सी शिक्षण संचालक कार्यालय आहे. विभागाने माहिती दिली की, सर्व शाळांकडून खर्चाची माहिती घेऊन निधी वितरित करण्यात येत असतो त्यामुळे विलंब होत होता. परंतु सदरहू कार्यपद्धती योजनेच्या गाईडलाईनमध्ये नमूद नाही, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवून सांगितले की, शासनाकडून अगोदर वितरित केलेली रक्कम खर्च झाल्याशिवाय पुढील निधी वितरित करण्यात येत नाही ही महत्त्वाची बाब आहे. केंद्र शासनाच्या गाईडलाईननुसार विभागाने कार्यवाही केली पाहिजे, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून सूचित केले असता, आता पीएफएमएस सिस्टम सुरू केल्यामुळे सदरहू अडचण दूर झाली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. (विवरणपत्र क्र. १ वर समाविष्ट)

विभागाच्या अगोदरच्या अधिकाऱ्यांनी अडचणी निर्माण करून ठेवल्या त्याचे काय? अशी विचारणा समितीने केली असता, आता संगणक प्रणालीचा वापर सुरू करण्यात आला आहे पुर्वी संगणक नव्हते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**परिच्छेद क्रमांक २.३.४.१ : सर्व शालेय दिवसांत शिजवलेले अन्न पुरविण्यातील तूट**

**१.४** मध्यान्ह आहार पुरविण्यात खंड पडू नये यासाठी शाळांमध्ये एक महिन्याचा शिल्लक धान्यसाठा उपलब्ध असला पाहिजे तो १३८ शाळांमध्ये दिसून आला नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, सदरहू प्रकरणी अधिकाऱ्यांकडून चौकशी करून माहिती घेतली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, उक्त प्रकरणी संबंधित शाळांकडून खुलासा मागविण्यात आला आहे, त्यामध्ये अनेक कारणे नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थी उपस्थित नव्हते, असेही एक कारण दिले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व सांगितले की, त्यामुळे तेवढ्या दिवसांचा धान्यसाठा कमी मिळाला आहे. शाळांनी धान्यसाठ्याची मागणी किमान २० दिवस अगोदर मागणी करण्याची आवश्यकता आहे. सदरहू कालावधी २० दिवसांचा आहे की १ महिन्याचा आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, आताच्या गाईडलाईननुसार शाळांनी धान्यसाठ्याची मागणी करण्याचा कालावधी २० दिवसांचा आहे. त्यावेळी १ महिन्याचा कालावधी होता, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

शाळांकडून मागणी प्राप्त झाल्यानंतर पुरवठादाराने पुढील ५ दिवसांच्या कालावधीत धान्याचा पुरवठा केला पाहिजे. त्यास विलंब झाल्यास पुरवठादारास दंड आकारण्यात आला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली. त्यावर किती रुपये दंड आकारण्यात आला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, निविदा करारानुसार त्यावेळी करावयाच्या एकूण पुरवठ्याच्या किंमतीच्या ०.५ टक्के दंड आकारण्यात येतो, असे विभागीय सचिवांनी विदित केले. १६१ शाळांनी मध्यान्ह भोजन दिले नाही, विभागाने लेखी उत्तरामध्ये विद्यार्थी शाळेत येत नाहीत, असे नमूद केल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, जेवढे दिवस शाळा सुरू असते तेवढे दिवस मध्यान्ह भोजन दिले पाहिजे, माहे एप्रिल मध्ये विद्यार्थी शाळेत येत नाहीत. अतिवृष्टी झाल्यानंतरही विद्यार्थी शाळेत येत नाहीत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

स्वाईन फ्लू, अतिवृष्टी, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय क्रीडा स्पर्धा अशी कारणे विभागाने दिली असून त्यामुळे एवढे दिवस खंड पडला आहे, परंतु उक्त सर्व कारणे योग्य वाटत नाहीत. खूप मोठा खंड पडला आहे. १७५ पैकी ८६ दिवस मध्यान्ह भोजन देण्यात आले आहे. काही शाळांनी १४६ दिवस मध्यान्ह भोजन दिले आहे. तसेच, नांदेड जिल्ह्यातील दोन शाळांनी १२ ते १४ व १४ ते १५ दरम्यान मुलांना कोणताही आहार पुरविला नव्हता, याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सदरहू दोन शाळांपैकी एका शाळेच्या संदर्भातील उत्तर दिसून येत नाही. तर प्रतिभा निकेतन या शाळेने सन २०१३ नंतर मध्यान्ह भोजन देण्याचे मान्य केले होते. त्यापूर्वी उक्त शाळेने मध्यान्ह भोजन न देण्याचा ठराव केला होता, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. अशा प्रकारे ठराव करण्याचा अधिकार शाळांना आहे काय ? व शाळांनी मध्यान्ह भोजन दिले पाहिजे, हे बंधनकारक आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सर्व शाळांनी मध्यान्ह भोजन देण्याची योजना आहे. परंतु त्यानुसार मुंबई व इतर जिल्ह्यातील काही शाळा मध्यान्ह भोजन योजना स्वीकारत नसल्याने सदरहू प्रकरणी विभागाकडून शासनास शिफारस करण्यात येते, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सदरहू शाळा उच्च दर्जाच्या आहेत अथवा त्या भागातील शाळेमध्ये शिक्षण घेणारे जास्तीत जास्त विद्यार्थी उच्चभ्रू घरातील आहेत म्हणून उक्त योजना त्या शाळेकडून स्वीकारण्यात येत नाही काय ? असे असेल तर त्या शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांवर अन्याय होत नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता, याच विचाराने भारत सरकार या विषयाला ऑप्शनल करण्यासाठी मान्य करीत नाही. पण हे विभागाला नको, अशी काही शाळा मागणी करतात, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. पण ज्या शाळा अनुदानित आहेत त्यांना शासनाचे धोरण मान्य करावेच लागणार आहे. मुळात यामुळे मुलांचे नुकसान होते. शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी होत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा हे धोरण नाकारीत नाहीत तर अनुदानित शाळा हे नाकारत असतात, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अनुदानित शाळांचे अनुदान बंद करण्यात यावे. शासनाच्या आदेशाचे पालन जर शाळा करीत नसतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सिस्टिमचे अधिकार विभागाचे आहेत. शासन त्यांना पगार देतो, त्या पगारावरच ते मुलांना शिकवतात आणि मग शासनाच्या आदेशाने त्यांना खाऊ घालणे हे अनिवार्य आहे. पण ते असे करीत नाहीत तर आतापर्यंत अशा शाळांवर शिक्षण अधिकाऱ्यांनी काय कारवाई केलेली आहे, अशी विचारणा समितीने केली असता, ज्या शाळा ते धोरण नाकारण्याच्या मनस्थितीत होत्या त्या शाळांनाविभागाने विश्वासात घेतले त्यामुळे आता त्या शाळांनी ते धोरण सुरू केले आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाच्या प्रयत्नांना यश आले ते ठीक आहे पण आधी इतके वर्ष त्या शाळांनी ते धोरण अवलंबले नाही, विद्यार्थ्यांना त्याचा लाभ दिला नाही, ते उपाशी राहिले असतील याची कारणे अनेक असू शकतात. परंतु या सर्वांमुळे त्या मुलांच्या हक्कावर गदा आली आहे. विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे, धोरणाप्रमाणे जेवण देणे आवश्यक होते. पालन-पोषण आहारासाठी त्या विद्यार्थ्याच्या घरचे लोक सक्षम असतील, ते बाहेरचे जेवण खात नसल्यामुळे त्यांना घरुन डब्बा दिला जात असेल अशी अनेक कारणे असू शकतात. याबाबतची माहिती विभागाने घ्यायला पाहिजे. तसेच विभागाने त्यांना कारणे दाखवा नोटीस द्यायला पाहिजे, असे समितीने सूचित करून, दोन शाळांनी लोकांना मालच दिला नाही तर

त्यांच्यावरची काही कारवाई एकदा महालेखाकारांच्या सूचनांमध्ये आल्यानंतर dept have not given a reply, dept are silent over that, असे समितीने निदर्शनास आणले असता, काही ठिकाणी एखादी अडचण असेल तर ती सोडवून सर्व जागी योजना सुरळीत चालावी याच प्रयत्नामध्ये विभाग असतो, असे विभागीय सचिवांनी विदित केले. याबाबत समिती सहमत आहे पण नांदेड जिल्ह्यातील दोन शाळांनी सन २०१२-२०१४ व २०१४-२०१५ दरम्यान विद्यार्थ्यांना कोणताही आहार पुरविला नव्हता. त्या दोन शाळांची काय कारणे आहेत ? या दोन शाळांव्यतिरिक्त अशा आणखी काही शाळा असतील. इंदिरा गांधी गर्ल्स प्रायमरी स्कूल आणि प्रतिभा निकेतन प्रायमरी स्कूल, नांदेड, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणून दिले असता, या दोन्ही शाळा एकाच संस्थेच्या आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

राज्यातील किती शाळा अशा आहेत की, ज्यांनी ही योजना राबवली नाही ? It is not optional, it is mandatory by the Central Government. ज्याशाळा मध्यान्ह भोजन देण्यासाठी तयार नाहीत आणि ग्रॅन्टेड आहेत त्यांच्यावर तरी कमीत कमी विभाग दंडपणा आणू शकतो. तसेच त्यांचे अनुदान बंद करण्यात यावे. मेंडेटरी असेल किंवा इतर कोणत्याही शाळा असतील अशा योजनेचा लाभ न घेणाऱ्या किती शाळा आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, आता अशा काही शाळा नाहीत, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

महालेखाकार कार्यालयाकडे २३९ शाळांचा जे नमुने आहे त्यापैकी ७९ शाळांनी असे उत्तर दिले आहे की, "Delay in receipt of rice from the Contractor." It is one of the reasons for not providing the midday meals. म्हणून त्यांनी मध्यान्ह भोजन पुरविले नाही आणि दुसरे कारण असे दिले आहे की, "Delay in reimbursement of cooking cost." मध्यान्ह भोजन योजना न पुरविण्यासाठी दोन कारणे होती. त्याबद्दल विभागाने उत्तर द्यावे, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून सूचित केले असता, पेमेंटमध्ये जो डिले होत होता त्यासाठी विभाग पीएफएमएसमध्ये गेलो त्यामुळे आता उशिर होणार नाही. दुसरे असे की, पुरवठ्यामध्ये जर उशिर झाला तर विभाग पुरवठादारांवर कारवाई करण्यात येते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

शेवटी या शाळांमध्ये खंड का पडला, असा विषय महालेखाकारांनी मांडला. शाळेत विद्यार्थीच नाही म्हणून विभागाने योजनेचा लाभ नाही दिला अशी काही इतर कारणे दिली आहेत. पण जेव्हा विभागपुरवठा करणार नाही, जेव्हा अन्न शिजवण्याचे पैसेच देणार नाही तर ते मर्यादाबाहेर पैसे न मिळाल्याने त्यांनी अन्न शिजवणे बंद केले. पुरवठादारांनी सामुग्रीचा वेळेवर पुरवठा केला नाही तरी देखील खंड पडला आहे. त्यामुळे या दोन्ही विषयांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. सन २०१५ नंतर विभागाने सर्व सुरळीत केले असेल पण आता जर सन २०१० ते सन २०१५ दरम्यानचा आढावा घेतला तर त्यावेळेच्या चुकांवर जबाबदारी निश्चित केली नाहीतर महालेखाकारांच्या या परिच्छेदाचा काही उपयोगच होणार नाही. Committee wasting her time. कारण विभागाने सर्व दुरुस्त केले आहे. हे दुरुस्त केले ते चांगले आहे पण ज्यांनी दुरुस्त केले नाही किंवा आपली कर्तव्य पार पाडली नाही त्यांच्यावर विभाग काय कारवाई करणार आहे ? त्याचप्रमाणे विभागाने दंड वसुल केला, दंड कमी केला किंवा जास्त केला तरी मुलांना अन्न मिळत नाही. शिजवण्याचे पैसे वेळेवर दिले नाही किंवा पैसे मागण्यात आले नाही, पुरवठादारांनी पुरवठा केला नाही यासाठी जबाबदार कोण आहे ? इतके दिवस विभागाने जी कारणे सांगितली त्या पलिकडे आणखी कारणे आहेत. स्वाईन फ्ल्यू झाला म्हणून ते आले नाही हे कारण देखील विभागाने सांगितले याला समिती सहमत आहे. पण त्याचबरोबर ही दोन महत्त्वाची कारणे आहेत की, मालच आला नाही किंवा तो शिजवला नाही, त्यासाठी लागणारा पैसा व सामुग्री आणून दिली नाही. यासाठी जबाबदार असणाऱ्या माणसावर विभागाने काही कारवाई प्रस्तावित केली आहे काय ? विभागाने आता चांगले सुरू केले आहे त्यामुळे committee won't have any audit para in future but what about the period 2010 to 2015 ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाच्या समजूतीप्रमाणे हे परफॉरमन्स ऑडीट आहे. त्यामुळे सॅम्पलींग केलेले आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

The Performance audit is a scheme audit over a period of five years. Obviously, A.G. has to pick up a sample. Based on that sample these are A.G's findings. समितीचे असे मत आहे की, या नमून्यामध्ये ही कारणे समोर आलेली आहेत तर यावर विभागाने काय कारवाई केलेली आहे ? Can department now say that at present the Contractors are supplying the rice correctly to the Committee ? Here the point is why did they fail in that period ? तसेच कुकिंग कॉस्टचा विषय देण्यामध्ये विभागाने विलंब केलेले आहे. हे कारण देखील सांगितलेले आहे, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, ज्या ठिकाणी विभागाने तपासणी केली त्या ठिकाणी काही अडचणी होत्या त्यामुळे सिस्टिमच अपयशी आहे म्हणून त्या सर्व अडचणी सुधारणे ही विभागाची जबाबदारी आहे. एका मंत्र्यावर कारवाई होऊन चालणार नाही कारण प्रत्येक ठिकाणी अशा अडचणी दिसतच आहेत तर त्या विभाग दुरुस्त करीत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने योग्यवेळी त्या ठेकेदाराकडून दंड वसूल केला असता, त्यावेळी योग्य कारवाई केली असती तर या योजनेला पडलेला खंड हा कमी झाला असता, असे मत समितीने व्यक्त केले असता, पुरवठादारांवर कारवाई केलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. ही योजना कधी सुरू झाली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सन १९९५ साली ही योजना सुरू झाली आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले. सन १९९५ साली ही योजना सुरू झाली आणि त्यामध्ये सुधारणा करत करत सन २०१५ मध्ये विभागाने त्याला अंतिम रुप दिले. परंतु मधल्या काळामध्ये गेल्या १५ वर्षाचा या योजनेचा डाटा विभागासमोर आहे. तरी देखील १५ वर्षांमध्ये विभाग अंमलबजावणी करू शकला नाही, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण ही काही नवीन योजना सुरू झालेली नाही तर त्यामध्ये टप्याटप्याने काही सुधारणा करण्यात आली. Dept. have a raised a new issue before this Committee that it is not a general audit but it is a performance audit. When committee got a sample before her, committee will only ask the department about it. या विषयावर विभाग पुढे काय करणार आहे हाच प्रश्न जर विचारायचा असेल तर यापुढे साक्ष घेण्याची गरज नाही. परफॉरमन्स म्हणजे ज्या काही चुका झाल्या आहेत त्याला विभागाने दुरुस्त करावे, ही एक अपेक्षा आहे. त्याचबरोबर ज्यांनी चुका केल्या आहेत त्यांच्यावर पण जबाबदारी निश्चित करण्यात यावी. आतापर्यंत विभागाने ही जबाबदारी निश्चित करून समितीला परफॉरमेन्स दाखवायला पाहिजे होता. विभागाने फक्त योजना दुरुस्त केली आहे, असे समितीने मत मांडले. ज्यांनी उशिर केला आहे त्यांना विभागाने दंड लावला आहे काय? अशी विचारणा वित्त सचिवांनी केली असता, कंत्राटदारांना विभागाने दंड लावलेलाच आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

यामध्ये अधिकारी किंवा कर्मचारी कोणीतरी जबाबदार असतील कारण कंत्राटदार एकटाच जबाबदार असू शकत नाही. आता सन २०१५ पासून या योजनेमध्ये दुरुस्ती करून विभागाने जो पारदर्शक कारभार केला आहे, त्याबद्दल समिती विभागाचे अभिनंदन करते. परंतु पहिल्या अधिकाऱ्यांनी जर गुन्हा केला तर गुन्हेगारावर तरी कारवाई व्हायला पाहिजे. चूक केली असेल तर त्यांच्यावर देखील दंडात्मक कारवाई व्हायला पाहिजे. परफॉरमन्स ऑडीटला कारवाई अपेक्षित करू नये असे विभागाचे उत्तर समितीला मान्य नाही. शेवटी विभाग म्हणत असेल की, System was not proper at that time तर सचिव यासाठी जबाबदार असतील, असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

१६० शाळांनी मध्यान्ह भोजन का पुरविले नाही याचे उत्तर दिले नाही. त्याचे कारण विभागाने समितीला सांगायला हवे, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून सूचित केले की, त्यावर शाळांना विभागाने कारण विचारले आहे पण प्रत्येक शाळांचे कारण वेगवेगळे पाहिजे असेल तर ते विभागाकडून समितीला देण्यात येईल. १६० शाळांनी उत्तरच दिलेले नाही विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. विभागाने त्या शाळांना माहिती मागितल्यानंतर शाळांनी विभागाला माहिती दिली नाही आणि विभागाने देखील समितीला माहिती दिली नाही, हे खरे आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने जर या शाळांचा पाठपुरावा केला तर त्याची माहिती येईलच, यामध्ये काही प्रश्न नाही. पण जेव्हा यांची टीम तिथे माहितीसाठी गेली तेव्हा काय झाले हा मुद्दा वेगळा आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. The sample was of 239 schools, महालेखाकार कार्यालयातून जी कारण सांगितली आहेत ती ७९ शाळांचीच कारणे आहेत. बाकीच्या शाळांनी का विलंब केला किंवा जेवण का पुरविले नाही याची माहिती विभागाने समितीला द्यावी असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून सूचित केले असता, प्रत्येक शाळा निहाय माहिती गोळा करून विभागाकडून समितीला देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

**परिच्छेद क्र. २.३.४.२ स्वयंपाकाच्या खर्चाच्या प्रदानात आणि तांदूळाची उचल/वापर करण्यातील अपर्याप्तता/त्रुटी-**

१.५ या परिच्छेदात सतत वेगवेगळी कार्यवाही होत गेली आहे. महालेखाकांराच्या कार्यालयाने विभागाला आणखी एक अर्ध शासकीय पत्र लिहिले विभागाने उत्तर दिले तेव्हा काही गोष्टींची माहिती द्यावी असे महालेखाकार कार्यालयाने विभागाला सांगितले.

यामध्ये इस्कॉनचा मुद्दा आहे तर समितीला त्याची थोडक्यात माहिती द्यावी असे समितीने निदेशित केले असता, त्यावर माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, इस्कॉनचा मुद्दा आहे त्यामध्ये आता नव्याने महालेखाकांरानी लोकलेखा समितीला सांगण्यासाठी माहिती सांगितली आहे, "शिजवलेल्या अन्नामध्ये विहित उष्मांक व प्रथिने तपासण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शिजवलेल्या अन्नाच्या नमुन्याची नियमीत तपासणी करण्यात येते किंवा कसे तसेच सदर अन्नाचे नमुने खाण्यायोग्य असतात किंवा कसे. आधी जे नमुने तपासण्यात येत होत त्यावरुनच ऑडीटचे परिच्छेद झालेले आहेत आणि ते आता तपासण्यात येतात. त्यामध्ये दुसरे असे की, १९५ अन्न नमुन्याची तपासणी अहवाल लोकलेखा समितीस देण्यात यावेत. १९५ हे अन्न नमुने योग्य सापडले होते आणि तेव्हा ते वेगळ्या पद्धतीने तपासणी करीत होते म्हणून सर्व काही अयोग्य दिसत होते. त्या अहवालाचा गोषवारा विभागाने माहितीमध्ये समाविष्ट केला. प्रयोगशाळा तपासणी केलेली नमुना संख्या १८४ आहे त्यापैकी पात्र १५७ आणि अपात्र २७, टक्केवारीमध्ये ८५.३३ हे इस्कॉनकडून दिले गेले आहे.

यावर प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून नमूद केले की, मध्यान्ह भोजन आहार योजनेचा प्रश्न आहे तर योजनेच्या गाईडलाईन्सप्रमाणे सर्व शाळांना म्हणजे प्राथमिक शाळांना १०० ग्रॅम तांदूळ आणि माध्यमिक शाळांना १५० ग्रॅम पुरविण्याची तरतूद आहे. या योजनेसाठी मुंबईच्या भागात बृहन्मुंबई महानगरपालिकेने काही एजन्सी नियुक्त केल्या आहेत. त्यामध्ये इस्कॉन एजन्सीला या योजनेसाठी सन २००८ पासून कॉन्ट्रेक्ट दिले होते. इस्कॉनने बृहन्मुंबई महानगरपालिकेला रिप्रेझेंटेशन दिले की, १०० ग्रॅम आणि १५० ग्रॅम हे जे नॉर्म्स आहेत ते खूप जास्त आहेत. ५० आणि ७५ ग्रॅम तांदूळ पुरवू आणि योजनेमध्ये जेवढया कॅलरीचे मध्यान्य भोजन असायला हवे ते पलसेस आणि पालेभाज्या ॲड करून ते भोजन पुरवू, अशी परवानगी बृहन्मुंबई महानगरपालिकाने इस्कॉनला दिली. बृहन्मुंबई महानगरपालिकेला जे नमुने काढते त्याप्रमाणे २३६ नमुने होते त्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला म्हणालो की, या कॅलरी इफेक्ट व्हॅल्यूप्रमाणे पुरविण्यात येतील. पण हे सर्व नमुने अपयशी झाले. २३ कोटी रुपये एवढी पूर्ण कुकींग कॉस्ट त्यांना दिलेली आहे. त्यांचे उत्तर असे होते की, "कुकींग कॉस्ट कमी करण्याची कुठेही तरतूद नाही. It is based on the number of meals provided म्हणून ती कॉस्ट कमी केली नाही. But we replied to the government that your reply is silent on the samples which have failed. या अपयशी नमुन्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने काय सूचना दिल्या आहेत ? If after providing 40 gms, 50 gms, 75 gms rice, it appears that ISCON did not add any further value to that sample. Otherwise, the samples would not have failed.

महालेखाकारांच्या म्हणण्यानुसार २३६ नमुने अपात्र आहेत पण सचिवांचे म्हणणे आहे की, २५५ नमुने पात्र आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने हा तपशिल ठेवलेला आहे. यावर विभागाचे काय मत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक २ फेब्रुवारी, २०११ ला शासन निर्णय काढला आहे, त्यानुसार प्राथमिक शाळांतील मुलांना १०० ग्रॅम तांदूळ द्यायचे आहेत आणि उच्च प्राथमिक शाळांतील मुलांना १५० ग्रॅम तांदूळ द्यायचे आहेत. तांदळामध्ये बाकीचे साहित्य मिळविल्यानंतर आणि नंतर ते शिजविल्यानंतर वजन कोरड्या तांदळासारखे राहणार नाही, ते वजन वाढते. शिजविलेल्या धान्याचे वजन प्राथमिक स्तरावर २५० ते २७५ ग्रॅम राहील, असा शासन निर्णय काढण्यात आला, मात्र प्रत्यक्षात शिजवून पाहिले तर वजन ४०० ते ४५० ग्रॅम होते. उच्च प्राथमिकचेही धान्य शिजविल्यानंतर ते ३७५ ते ४०० ग्रॅम होईल, असा शासन निर्णय होता. मात्र ते ७०० ते ७५० ग्रॅम होते. विभागाने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ ला या संदर्भात शुद्धीपत्रक काढले. प्रयोगशाळा २५० ग्रॅम नमुने घ्यायची आणि ४०० ग्रॅममध्ये मिळणारी कॅलरी मिळाली पाहिजे, असे पहायची. त्यामुळे सर्व नमुने अपात्र व्हायचे. असे प्रकार होत होते, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सर्वेक्षण अहवाल कोणत्या तरी प्रमाणित एजन्सीकडूनच आले असतील, अशी विचारणा समितीने केली असता, त्यावर महानगरपालिकेची प्रयोगशाळा आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. विभागाने नमूद केले आहे की, ४०० ग्रॅमच्या आधारे इस्कॉनने कॅलरी फिक्स केली आहे. विभागाचे असेच म्हणणे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शवून इस्कॉनने २५० ग्रॅम नमुने घेतले आणि त्यामध्ये तेवढी कॅलरी शोधत होते. १०० ग्रॅम तांदूळ शिजवून तो ४०० ग्रॅम होतो, असे समितीस अवगत केले.

मुळात इस्कॉनने १०० ग्रॅमचे ७५ ग्रॅम केले आहे, १५० ग्रॅमचे १०० ग्रॅम केले आहे. इस्कॉनने सांगितले आहे की, यामध्ये पल्सेस, व्हेजिटेबल्स टाकून आणि कॅलरी मिळविण्यात येईल. महत्त्वाची बाब कॅलरी आहे. त्यामुळे विभागीय सचिवांनी सांगितलेला निकष न्याय वाटत नाही. असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुख्य म्हणजे इस्कॉनने शिजविलेले अन्न किती घेतले हा मुद्दा आहे. ४०० ग्रॅमऐवजी २५० ग्रॅम घेतले आहे. इस्कॉनने वेगळे केले आहे. त्यांनी तांदूळ कमी घेतले, विभागाने ७५ ग्रॅम व ५० ग्रॅम देण्यास मान्यता दिली होती.मात्र त्यांनी ४० ग्रॅम व ६० ग्रॅम घेण्यास सुरुवात केली. इस्कॉननेच ते परिमाण लावले आहे. इस्कॉनने ५० ग्रॅम व ७५ ग्रॅम घेणार आहोत, असे म्हटले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, ५० ग्रॅम व ७५ ग्रॅम यांबाबत इस्कॉनने त्यास होकारार्थी उत्तर देऊन परवानगी मागितली व शासनाने परवानगी दिली. मात्र त्यांनी ४० ग्रॅम व ६० ग्रॅम घेण्यास सुरुवात केली, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

५० ग्रॅमचे ४० ग्रॅम केले आणि ७५ ग्रॅमचे ६० ग्रॅम केले तर आणखी कमी होईल, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, ते बरोबर आहे. ते तांदूळ ४० ग्रॅम, मूग डाळ ३० ग्रॅम टाकतात. बाकीच्या ठिकाणी कमी टाकले जाते. सोया ५ ग्रॅम, भाजीपाला ८० ग्रॅम, गाईचे तुप १६ ग्रॅम, शेंगदाणे ६ ग्रॅम, टाकण्यात येत तसेच मीठ मसाला व इतर साहित्य ४ ग्रॅम मिसळण्यात येते आणि ५५० ग्रॅम पाणी टाकण्यात येते. एका मुलाच्या त्या जेवणाचे वजन ३५९ ग्रॅम होते आणि त्यामध्ये कॅलरी ४५० ग्रॅमची होते, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

Sir, MCGM has to explain on what basis they are saying that all the samples checked by them did not meet the standards, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून सूचित केले असता, ३६० ग्रॅमचे नमुने घेतले पाहिजे होते, बृहन्मुंबई महानगरपालिकेने २५० ग्रॅमचे नमुने घेतले आहे, म्हणून कॅलरी कमी दिसत आहे. अन्न शिजवून किती होते ते पाहिलेच नाही. शासन निर्णयात २५० ग्रॅम होईल, असे लिहिले होते, त्याप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेने नमुने तपासले असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाचे म्हणणे आहे की, सर्व ठीक आहे, मग इस्कॉनला लागलेला दंड त्यांनी का दिला ? २ हजार रुपये दंड लावला, ४ हजार रुपये, ६६ हजार रुपये, १२ हजार रुपये, २ लाख ३४ हजार रुपये, १ लाख ५६ हजार रुपये इतका दंड भरला. ४ लाख ८२ हजार रुपये दंड लावला आहे. विभागाच्या म्हणण्याप्रमाणे २५० ग्रॅम न घेता, ३७५-४०० ग्रॅम घेतले पाहिजे होते. दंड का भरला आहे ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, दंड पेमेंटमधून वसूल केला आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

इस्कॉन आक्षेप घेतच नाहीत, त्यांनी गुन्हा केला आहे, असे त्यांनी मान्य केले आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने सर्व बाबी सांगितल्या आहेत, झालेल्या बाबी विभाग येथे स्पष्ट करू शकत नाही. शासन निर्णय काढण्यात आला की, १०० ग्रॅम तांदूळ शिजविल्यानंतर २५० ग्रॅम होईल. प्रयोगशाळेच्या प्रतिनिधींनी शिजविलेल्या तांदळाच्या २५० ग्रॅमचे नमुने घेतले, मुलांना मिळणारी कॅलरी तेवढी असणार आहे, असे सांगण्यात येत आहे. शासनाने तेव्हाच सांगितले पाहिजे होते की, शिजवून ४०० ग्रॅम होणार आहे आणि त्यामध्ये कॅलरी मिळणार आहे. तुम्ही जेवढे घातले, तेवढीच कॅलरी मिळणार आहे, असेच मशिन सांगणार आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने सादर केलेल्या अहवालामध्ये कुठेही २५०-४०० ग्रॅम असे लिहिलेले नाही. Dept has saying that sample was taken for २५० gms, but it is not recorded in this Report, असे समितीने निदर्शनास आणले असता, महानगरपालिकेमध्ये नमुने घेण्याची पद्धत आहे. सुपरव्हाईजर शाळांमधून नमुने गोळा करतात. नमुनेमधील १०० ग्रॅम नमुनेचे कंटेन्ट एका बाजूला काढून प्रयोगशाळेत तपासले जाते. प्रयोगशाळेध्ये त्यामधील प्रोटिन व उष्मांक दिसतो, त्याला २२५ किंवा २५० ग्रॅमने गुणून तो उष्मांक व प्रथिने आहे का, ते पाहिले जाते, १०० ग्रॅमचे नमुने तपासले जाते. शासन निर्णयात सांगितले होते की, १०० ग्रॅम आहार २२५ ते २७५ ग्रॅम भरेल. विभागाने घेतलेल्या १०० ग्रॅम नमून्याला २२५ किंवा २५० ग्रॅमने गुणल्यानंतर ते नमुने अपात्र ठरतात. परंतु आता सांगितलेल्या माहितीच्या पद्धतीने, इस्कॉनचे १०० ग्रॅमचे नमुने घेतले तर त्याला २००-२२५ ग्रॅमने गुणण्याऐवजी ३५९ ग्रॅमने गुणायला पाहिजे होते, ते गुणले गेलेले नाही. त्यामुळे ते नमुने अपात्र दाखवत आहे. विभागाने वजनाचा अभ्यास केला, त्यावेळी त्याचे वजन पहिली ते पाचवीसाठी ३५९ ग्रॅम आले आणि त्याचे वजन सहावीसाठी ५७६ ग्रॅम आले. हे इस्कॉनसंस्थेसाठी होते. इतर संस्थांचे वजन पाहिले तर असे दिसेल की, १०० ग्रॅम तांदूळ घेतला आणि त्यामध्ये २० ग्रॅम डाळ टाकली, ५ ग्रॅम तेल वापरले, ५० ग्रॅम भाजीपाला वापरला, पल्सेस वापरले आणि ५०० ग्रॅम पाणी वापरले तर ते सुद्धा वजन ४३० ग्रॅमच्या दरम्यान येते. त्यामुळे विभागाने शासन निर्णयात सुधारणा सुचविली की, शासनाने दिलेले वजन प्रत्यक्षात जास्तीचे येते, त्यामुळे शासनाने दुरुस्ती करावी, त्याप्रमाणे शासनाने दुरुस्ती केल्यानंतर उचललेल्या १०० ग्रॅमच्या नमून्याला या वजनाने गुणल्यानंतर सर्वसाधारणपणे ८४ ते ८५ टक्के नमुने पात्र ठरले आहेत. वजनाच्या तफावतीमुळे ते नमुने अपात्र दिसत होते, जोपर्यंत शासन निर्णय बदलत नाही, तोपर्यंत त्याने गुणाकार करू शकत नाही. शासन निर्णय बदलल्यानंतर गुणाकार करून ते नमुने पात्र ठरविलेले आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले.

विभागाने दंडात्मक कारवाई का केली ? अशी विचारणा समितीने केली असता, तत्कालीन परिस्थितीत वजनाचा शासन निर्णय होता, त्यानुसार गुणाकार करता आला नव्हता, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. याबाबतचे पैसे विभाग परत करणार का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास होकारार्थी उत्तर देऊन पैसे परत करावे लागतील. कारण ती चूक शासनाच्या निर्णयामधील होती. त्यामुळे दंड झालेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. शासन निर्णय दुरुस्त केला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास होकारार्थी उत्तर दर्शवून शासन निर्णय दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ ला दुरुस्त केला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. पहिला शासन निर्णय होता, त्यानुसार संबंधितांवर कारवाई केली. विभागाने शासन निर्णय दुरुस्त करून त्याची चूक दुरुस्त करून देत आहात का, विभाग त्याची चूक दुरुस्त करण्यासाठी शासन निणर्यात दुरुस्ती करीत आहे का ? विभागाने असे केले तर त्याचा अर्थ तसा होऊ शकेल. शासन निर्णय बदलून मुलांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार आहे.अहवालामध्ये असे कुठेही लिहिलेले नाही की, १०० ग्रॅमचे नमुने घेतले आणि २५० ग्रॅमने गुणले. विभागाला आता शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करून पूर्वलक्षी प्रभाव देता येईल का ? अहवाल १०० ग्रॅमचा आहे, विभाग त्याला २५० ग्रॅमने गुणले, त्यामुळे इतकी कॅलरी दिसत आहे. ४५० ने गुणले असते तर अमुक एवढे झाले असते, हे प्रमाणित करून द्यावे. प्रमाणित करण्याचा आधार काय आहे ? असे मुद्दे समितीने उपस्थित केले असता, अहवालामध्ये १०० ग्रॅमसाठी आहे, असे लिहिले आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

This Certificate has been provided by the MCGM. विभागाने स्पष्टीकरण द्यावे की, विभागाने १०० ग्रमचे नमुने घेतले होते. जुन्या शासन निर्णयाप्रमाणे २२५ ते २५० ग्रॅम केले, आता नवीन शासन निर्णयाच्या आधारे ४०० प्रमाणे कॅलरी बरोबर होत आहे, असे विभागाने अधिकृतपणे निवेदन द्यावे, असे समितीने निदेशित केले असता, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ ला शासन निर्णय काढला आहे. या शासन निर्णयामुळे योग्य झाले आहे. शासन निर्णय कॅलरीफिक व्हॅल्यू बदलत नाही. शासन निर्णयामध्ये तांत्रिक चूक झाली होती, १०० ग्रॅम तांदूळ व सोबत डाळ एकत्र करून शिजविली तर त्याचे वजन जास्त होईल, याचा निर्णय शासन निर्णय घेत नाही तर ते निसर्गाच्या नियमाने होते.

ही फिगर कोठून घेतली, असे विभागाने विचारले होते. भारत सरकारच्याही धोरणात असे कुठेही लिहिलेले नाही. दोन ते अडीच पट होणार आहे, असे अंदाजे लिहिले आहे. कॅलरीफिक व्हॅल्यू तांदळाची असते पाणी फेकून द्यावे लागते. तांदळातील पाणीही फेकले जाते. शिजविल्यानंतर कॅलरीफिक व्हॅल्यू येणार आहे. त्या गोष्टीचे फॅक्टरायझेशन बरोबर झाले नाही, त्यामुळे त्या प्रयोगशाळेतून चुकीचा अहवाल येत होता, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

इस्कॉनने पल्सेस व भाजीपाल्याचा वापर करून तो आहार दिला होता. हे सर्व ॲड केले होते आणि ते नमुने कॅलरीफिक व्हॅल्यूप्रमाणे बरोबर आहे, असे विभागाला आश्वासन द्यावे लागेल, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून सूचित केले असता, त्यास होकारार्थी उत्तर देऊन एवढे ग्रॅम ईस्कॉनने पुरविले होते आणि ते पुरवितात असे विभागीय सचिवांनी समितीने अवगत केले. इस्कॉनकडून प्रत्येक मुलाला किती मटेरियल दिले जाते ? अशी विचारणा समितीने केली असता, शिजविल्यानंतर ३५९ ग्रॅम देण्यात येते. ड्राय घेतले तर ४० ग्रॅम तांदूळ, ३० ग्रॅम डाळ असते, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. विभागाने ४०० ग्रॅम न घेता ३५९ ग्रॅम घ्यावे, असे समितीने सूचित केले असता, ३५९ ग्रॅम घेऊन ४६३ ग्रॅम कॅलरी येते. केंद्र सरकारच्या नॉर्म्सपेक्षा ते अधिक आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने काढलेला शासन निर्णय प्रॉस्पेक्टिव्ह आहे की रेट्रोस्पेक्टीव्ह केला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, आता हा शासन निर्णय नाही. विभाग तांत्रिक बाबीची स्पष्टता करीत आहे. त्यामुळे विभाग पूर्वलक्षी प्रभावाने शासन देत आहे. त्याचे फक्त गुणांकन बदलणार आहे. बाकी काहीही बदलणार नाही. त्यामुळे हा पूर्वलक्षी प्रभावाने, असा शासन निर्णय लिहिला आहे. आधीपासून ती चूकच होती. त्यामुळे हा पूर्वलक्षी प्रभाव आहे, हा निर्णय नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. बाकीच्याही संस्था आहेत. २८८ संस्थांच्या प्रकरणांत डाळ-भात नाहीच, असे सांगण्यात आले आहे. विभागाने दंड लावला आहे, त्याबाबतीत विभाग काय करणार आहे ? विभागाने सॅम्पलिंग सन २०१०-११, सन २०११-१२ पासून सुरू होते. विभागाच्या लक्षात तेव्हा आले नाही का की चुकीचे कॅल्क्युलेशन चालले आहे ? अशी प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून विचारणा केली असता, वेगवेगळ्या प्रकरणांत महालेखाकारांनी मुद्दे मांडले आहेत की, विभाग बाकीचे नमुने कसे तपासतो ? विभागाची चूकही लक्षात येत आहे. चांगली गोष्ट अशी आहे की, चूक लक्षात येत असून विभाग सुधारणा करीत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

किती वर्षांपासून दंड वसूल करण्यात येत आहे, विभाग संस्थांना (इस्कॉन) ७ वर्षांचा फायदा देणार आहात का त्याचप्रमाणे हे सॅम्पलिंग बरोबर नाही, हे त्यांच्या लक्षात कसे आले नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, नैसर्गिक नियम आहे. शासन निर्णय काढून दुरुस्ती केली आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले. ७ वर्षांत दंड आकारला आहे, तो संस्थांना (इस्कॉन) परत द्यावा लागेल, असे समितीने सूचित केले असता, दंड परत केला पाहिजे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. तांत्रिक चूक आहे. विभागाने लेखी द्यावे, असे समितीने निदेशित केले असता, Government Order has been issued. इस्कॉन काय पुरविते, ते सांगण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी विदित केले. १०० ग्रॅमचा मूळ अहवाल आहे, मात्र इस्कॉनने २५० ग्रॅमपर्यंत केले आहे. ३५९ ग्रॅमपर्यंत केले पाहिजे. शासन निर्णय जोडावा आणि सविस्तर लेखी उत्तर द्यावे, जेणेकरून सर्व गोष्टी स्पष्ट होतील, असे समितीने निदेशित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

मागील ७ वर्षांमध्ये विभागाकडून करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाईची रक्कम किती आहे ? व इस्कॉनला ६ कोटी रुपयांऐवजी २३.५१ कोटी रुपये कशासाठी दिलेले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, ४.८२ लाख रुपये ही एकत्रित दंडात्मक रक्कम आहे. इस्कॉनने कमी तांदूळ पाहिजे असल्याचे सांगितले होते. त्यामुळे कमी तांदूळ शिजवण्यासाठी कमी इंधन लागणार असा अंदाज व्यक्त करण्यात आला. तसेच ते इतर अन्न सुद्धा शिजवत असल्यामुळे त्याकरिता इंधनाची गरज लागते, असे विभागीय सचिवांनी विदित केले. जेवढे मटेरियल त्यात टाकतात ते शिजवण्यासाठी जास्त पैसे लागतात. त्यामुळे ४० ग्रॅम तांदळाऐवजी विभाग पूर्ण आहार देते का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभाग ४० ग्रॅम तांदळाऐवजी पूर्ण आहार देतो. या संदर्भात दिनांक २४ सप्टेंबर, २०१२ रोजी भारत सरकारने राजस्थान सरकारला एक पत्र पाठविले होते असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

इस्कॉन ॲडीशनल मटेरियल ॲड करण्यासाठी किती पैसे घेत होते ? इस्कॉन विभागाकडून पैसे घेत नव्हते का ? अशी विचारणा समितीने केली असता, ते बाहेरुन मटेरियल घेत असतात. विभाग त्यांना फक्त कुकिंग कॉस्ट देतो. या संदर्भात महालेखाकारांच्या लेखापरिक्षणात अनेकवेळा चर्चा झाली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

४० ग्रॅम तांदूळ दिल्यानंतर इतर जे मटेरियल ईस्कॉनकडून ॲड केले जाते त्याचे पैसे ते विभागाकडून घेत नाहीत, असे मत समितीने व्यक्त केले असता, भारतात दोन संस्था मोठ्या प्रमाणात काम करीत आहेत. दोन्ही संस्था इस्कॉनसारख्या कृष्ण भक्त संस्था आहेत. त्यांच्याकडून मोठमोठ्या शहरामध्ये मोठ्या किचनमधून मुलांच्या न्युट्रीशन अडचणी सोडविण्यासाठी उद्देशाने काम केले जात आहे. तसेच त्या दोन्ही संस्थांनी मिडडे मिलमध्ये समावेश केल्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात डोनेशन मिळते, अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

समितीचा मूळ प्रश्न असा आहे की, ईस्कॉन संस्था विभागाकडून फक्त ४० किंवा ६० ग्रॅम तांदूळ घेते. परंतु डाळ, धान्य यांचे वजन गृहीत धरुन ते शिजवण्यासाठी विभागाकडून पैसे घेतात. त्याव्यतिरिक्त ते साहित्याचे पैसे घेतात का ? अशी विचारणा समितीने केली असता, शासनाकडून परवानगी असलेल्या साहित्याचे पैसे इस्कॉन घेते असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. त्या साहित्याचे पैसे ते कोणाकडून घेतात ? त्याचप्रमाणे होम डिलेव्हरीच्या संदर्भात काय परिस्थिती आहे ? त्यामध्ये ही कॉस्ट समाविष्ट आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभाग ईस्कॉनला शासनाच्या निकषापेक्षा जास्त रक्कम देत नाही. तसेच इस्कॉनने शासनाला असे सांगितले की, मुले जास्त जेवत नसल्यामुळे जास्त तांदूळ देऊ नयेत, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने ईस्कॉनला दिला जात असलेला तांदूळ कमी केला असला तरी वाहतूक खर्च कसा केला जातो ? अशी विचारणा समितीने केली असता, शासनाच्या निकषामध्ये वाहतूक खर्चाचा समावेश नाही. इतर खर्च ते इतरत्र ठिकाणाहून मिळवतात असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. याचा अर्थ ते चॅरिटीच्या धर्तीवर कामे करीत आहेत. तरी सुद्धा विभाग त्यांची तपासणी करीत आहे. मुंबईमध्ये इतर लोकांची २८८ किचन सेंटर आहेत. त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, एकूण २८९ किचन सेंटर असून त्यापैकी एक इस्कॉन आहे. २८८ किचन सेंटर १०० ग्रॅमप्रमाणे तांदूळ घेतात. शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार ते त्यामध्ये पल्सेस मिक्स करतात. त्याचे वजन ४१३ ग्रॅम दरम्यान होत असते. पूर्वी त्यांच्या नमुन्यांचे वजन २२५ ग्रॅम होत असल्यामुळे ते यशस्वी होऊ शकले नाहीत. अशाप्रकारे ४१३ ते ४५० ग्रॅम वजन असलेले नमुने ८० ते ८५ टक्क्यांपर्यंत पात्र ठरले आहेत, या संदर्भात ४२५ ग्रॅमबाबत शासन निर्णय आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

उक्त मुद्याबाबत पुनःश्च दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेण्यात आली. महालेखाकार यांच्या दिनांक १४ जून २०१८ च्या पत्राद्वारे उपस्थित मुद्यांबाबत विभागाने सुधारित उत्तर दिलेले आहे. (महालेखाकारांचे पत्र विवरण क्र. २ वर समाविष्ट) त्याबाबत विभागाचे मत मांडण्याकरिता समितीने निर्देशित केले असता, शासनाने शासन निर्णयामध्ये एक सुधारणा केली होती. त्या प्रमाणे तांदूळ व इतर सर्व वस्तुंचे प्रमाण वापरुन आहार तयार केला, त्या तयार आहाराचे वजन किती असावे याबाबत शासनाने काही बदल केला होता, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ पासून शासन निर्णयाद्वारे सुधारणा केलेली आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, महालेखाकारांनी मुद्दा उपस्थित केला होता की, शासन निर्णय तपासून घ्यावे शासन निर्णयामध्ये जी सुधारणा झाली ती शास्त्रीयदृष्ट्या योग्य आहे काय ? त्याप्रमाणे विभागाने आता केलेले आहे व त्या माहितीचा समावेश विभागाच्या उत्तरामध्येही केलेला आहे. महालेखाकारांचा दुसरा मुद्दा असा होता की, हा शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने कसा काय लागू करण्यात येत आहे ? या संदर्भात विभागाने असे स्पष्टीकरण दिलेले आहे की, तयार आहाराच्या वजनामध्ये जी सुधारणा करण्यात आलेली आहे ती बरोबर आहे का, हे विभागाने ३ संस्थांकडे तपासणी करायला पाठविले. त्या ३ पैकी २ संस्थांनी त्यांचा अहवाल दिलेला आहे. त्यांनी विभागाने केलेली सुधारणा योग्य आहे असे नमूद केलेले आहे. एस.एन.डी.टी.चा अहवाल मात्र आलेला नाही. तो येणे अपेक्षित आहे. विभागाने या माहितीचा समावेश सुधारित उत्तरामध्ये केलेला आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सन २०१७ मध्ये नवीन शासन निर्णय निर्गमित केला. त्या शासन निर्णयाबाबत समितीला काही आक्षेप नाही. पूर्वीचेही काही शासन निर्णय अस्तित्वात होते. विभागाने नमूद केले आहे की, विभागाने ते नमुने भारत सरकारकडून मान्य करून घेतलेले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, ते नमुने आता विभाग भारत सरकारकडे पाठविणार आहे. कारण त्यांच्या गाईड लाईन्समध्ये तयार आहाराचे वजन किती असावे याचा उल्लेख तेव्हा नव्हता व तो अद्यापही नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

हा गुणांकांचा विषय आहे. विद्यार्थ्यांना जर प्रोटीन व कॅलरीज द्यायच्या असतील, तर तो गुणांकाचा विषय आहे. गुणांकाप्रमाणे किती वजन घ्यायचे, याबाबत सन २०११ पर्यंत २५० ग्रॅम इतके प्रमाण होते. सदरहू प्रमाण राज्य शासनाच्या गाईडलाईन्समध्ये होते, असे समितीने निदर्शनास आणले असता, केंद्र शासनाच्या गाईडलाईन्समध्ये याचा उल्लेख नसताना राज्य शासनाच्या गाईडलाईन्समध्ये याचा उल्लेख कसा आला हे विभागाने तपासले असता विभागाच्या निदर्शनास आले की, एवढे तांदूळ, एवढी डाळ घेऊन किती तयार आहार असावा याबाबतचा अंदाज घेऊन त्यावेळेस शासन निर्णयानुसारनिर्गमित करण्यात आला होता. मात्र खरेतर आहाराचे वजन किती असले पाहिजे हे त्यावेळेस प्रयोगशाळेमध्ये शास्त्रोक्त पद्धतीने किंवा त्रयस्थ संस्थेकडून तपासून घेण्यात आले नव्हते. ते वर्षानुवर्षे तसेच सुरू राहिले. मात्र जेव्हा हे सर्व घडले व १०० टक्के नमुने अपात्र होऊ लागले त्यावेळेस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हे निदर्शनास आल्यानंतर मोठा प्रश्न निर्माण झाला. सर्वच्या सर्व नमुने अपात्र होत असल्याचे निदर्शनास आल्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेने ते नमुने त्यांच्या प्रयोगशाळेमध्ये तपासणी करून घेतले की, नमुने अपात्र होत आहेत. त्यांनी त्यांच्या प्रयोगशाळेमध्ये एवढे तांदूळ व एवढी डाळ वापरली व किती वजन आले पाहिजे हे प्रत्यक्षात करून पाहिले. मग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हे लक्षात आले की, खरेतर याचे वजन जास्त आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

बृहन्मुंबई महापालिकेच्या स्वत:हून लक्षात आले नाही तर महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर ते लक्षात आले, असे मत समितीने मांडले असता, महालेखाकारांच्या परिच्छेदानंतर नाही तर इस्कॉनच्या आक्षेपानंतर ते लक्षात आले, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

महालेखाकारानी आक्षेप घेतल्यावर जेव्हा इस्कॉनकडून ४ लक्ष ८२ हजार रुपयांची वसुली झाली. परंतु महालेखाकाराचा जेव्हा परिच्छेद आला तेव्हा या सर्व गोष्टी विभागाच्या लक्षात आल्या. आता विभागाने सांगितले की, १०० ग्रॅम शिजलेल्या अन्नाचे वजन किती होते याबाबतचा निर्णय नवीन शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येत आहे. परंतु, त्याला भूतलक्षी प्रभावाने वापरता येतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्या शासन निर्णयानुसार जे इनपूट आहेत म्हणजे १०० ग्रॅम तांदूळ व इतके ग्रॅम डाळ वगैरे इनपूट सारखे आहेत. त्यावेळेसही ते शिजवून त्याचे जे वजन येणे अपेक्षित आहे ते या सुधारित शासन निर्णयाप्रमाणेच आहे. त्यामुळे त्याला भूतलक्षी प्रभावाने देणे आवश्यक आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

We have an objection on this point. नमुनेमध्ये कुठेही आहाराच्या वजनाबाबत उल्लेख केलेला नाही. विभाग जर हा शासन निर्णय भूतलक्षी प्रभावाने लागू करायला गेले तर हे सर्व अडचणीचे होणार, असे मत प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून मांडले असता, विभागाने याचा विचार केला की, वजनाबाबत प्रयोगशाळेला जेव्हा नमुने पाठविले जातात त्यापैकी ते १०० ग्रॅम युनिट घेऊन किती प्रथिने व किती उष्मांक आहेत, याची तपासणी करण्यात येते. परंतु, ते हे प्रमाणित करू शकत नाहीत की, प्रत्यक्षात मुलांना किती खिचडी देण्यात आली किंवा किती वजनाचा आहार त्यांना प्रत्यक्षात देण्यात आला, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

We are only talking about the weight of the sample which went to the lab. विभागाने जे मुलांना पुरविले आहे, त्याबाबत सांगत नाही. जे प्रयोगशाळेचे अहवाल आहेत त्यामध्ये weight of the sample is not mentioned. Now, how is it possible to have all those sample rechecked. विभाग विनाकारण अडचणी निर्माण करीत आहे. दंड लावण्यात आला त्याची वसुलीही झालेली आहे. विभागाने हा शासन निर्णय प्रॉस्पेक्टीव्हली अप्लाय करावा, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून सूचित केले असता, विभागाने प्रॉस्पेक्टीव्हली अप्लाय करण्याबाबत विचार केला मात्र ते तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही. कारण पोषण आहारासाठी पुरविण्यात आलेली सामुग्री (input) व शिजवलेले अन्न (output) जुळले पाहिजे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

यामध्ये मुलत: असे होते की, प्राथमिक गटाकरिता (इयत्ता १ ली ते ५ वी) तसेच उच्च प्राथमिक गटाकरिता (इयत्ता ६वी ते ८वी) अनुक्रमे १०० व १५० ग्रॅम तांदूळ घेतले पाहजे, अशी सरकारची सुरुवाती पासूनची भूमिका आहे. या संस्थेने ५० व ७५ ग्रॅम असा निर्णय विभागाकडून करून घेतला. विभागाकडून मान्यता घेतली व इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन यांनी ४० आणि ६० ग्रॅम तांदूळ घेतला, बाकीचे सर्व पदार्थ मिसळले. समितीचा मूळ मुद्दा असा होता की, इस्कॉन फुड रिलीफ हा फाउंडेशन १०० व १५० ग्रॅम शिजविण्याचे पैसे घेतात. त्यांनी ६ कोटी रुपयांऐवजी २४ कोटी रुपये घेतले. It was the basic objection. Now, they are reducing the weight of the rice and taking charges for 150 gm. This is the main objection. कॅलरी व प्रोटीन पाहता त्यामध्ये भाज्या,डाळ टाकता येते व त्याचे पैसे शासनाकडून घेण्यात येत नाहीत फक्त शिजविण्याचे पैसे घेण्यात येतात. हा सर्व विषय जो उपस्थित झालेला आहे, They are not withdrawing the 150 gm rice but taking the payment for the same. Therefore, these issues has been raised by the A.G. असे समितीने निदर्शनास आणले असता, शासनाने एका पत्राद्वारे इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन यांना तांदूळ कमी वापरण्याची परवानगी दिली होती. विभागाने त्या पत्राचा अभ्यास केला असता असे लक्षात आले की, शासनाने स्पेसिफिकली ४० किंवा ६० ग्रॅम असा उल्लेख न करता त्यांना अशी परवानगी दिली की, आवश्यक उष्मांक व प्रथिने मिळाली पाहिजेत. शासन त्यांना तेवढे प्रमाण कमी करण्याची परवानगी देऊ शकते. शासनाच्या पत्रामध्ये असे स्पष्ट नमूद होते की, आवश्यकतेप्रमाणे उष्मांक व प्रथिने मिळाली पाहिजेत त्याप्रमाणे महानगरपालिकांनी गणना करून संस्थांना तेवढी परवानगी द्यावी, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभाग जे शिजविण्याचे खर्च देतो त्याची गणना कशाच्या आधारावर करण्यात येते, ती तांदळाच्या आधारावर करण्यात येते की, मध्यान्ह भोजन पुरविण्यात येते त्याच्या आधारावर करण्यात येते ? अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र शासनाच्या ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट मिनिस्ट्रीच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या पत्रामध्ये असा उल्लेख आहे की, "Payment of cooking cost has not linkage with the utilisation of food grains." याचा अर्थ अन्न शिजविण्याचा खर्च ठरवून दिलेला आहे. पोषण आहाराना किती धान्यादी पदार्थ वापरलेत यासोबत त्यात नमूद केलेले नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अशा प्रकरणामध्ये विभागाने १०० आणि १५० ग्रॅम कुठून ठरविले ? अशी विचारणा समितीने केली असता, The problem lies there. ६० आणि ७५ ग्रॅम शिजविण्याकरिता लागणारी ऊर्जा व १००, १५० किंवा १७५ ग्रॅम शिजविण्याकरिता लागणारी ऊर्जा यामध्ये फरक असणारच आहे.

बाकीचे धान्यादी पदार्थ त्यामध्ये आहेत. केवळ तांदूळ असे म्हणतच नाही त्यामध्ये सर्वच पदार्थ आहेत. त्याबाबत असे स्पष्टीकरण देण्यात आले की, त्यांनी त्यामध्ये भाज्यासुद्धा टाकल्या आणि उष्मांक, प्रथिने याचे प्रमाण योग्य राखले. एखादी चांगली गोष्टी होत असेल तर ती सर्वांना दिशादर्शक असली पाहिजे मात्र तसा विषय येथे नाही. येथे असा विषय आहे की, शासनाचे जे पैसे विभागाने त्यांना दिले ते अधिकचे दिले, असा महालेखापालांचा परिच्छेद आहे. त्याबाबत विभागाने सांगितले पाहिजे, असे समितीने निर्देशित केले असता, हा प्रश्न कसा निर्माण झालेला आहे, त्याबाबत सांगताना महालेखापाल यांनी आक्षेप घेतल्यानंतर महानगरपालिकेने इस्कॉन या संस्थेचे पैसे देणे थांबविले. पैसे थांबविल्यानंतर इस्कॉनने त्यांची बाजू विभागापुढे मांडली. इस्कॉनने सांगितले की, ते मध्यान्ह आहार बंद करणार. पोषण आहाराचा बहुतांश पुरवठा करणारी केंद्रीय स्वयंपाकघर, इस्कॉन ही संस्था आहे. सगळ्या संस्थांचे नमुने असे का येतात, वास्तविक राज्यभर ही अट बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्वतः सर्व संस्थांवर टाकलेली आहे. नमुना तपासणीचीही इस्कॉन अट घालतो. वारंवार याचे नमुने कमी दिसायला लागले आहे. याचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी असे लक्षात आले की, मल्टिप्लायिंग फॅक्टर जो राज्य शासनाने शासन निर्णयामध्ये टाकला त्याप्रमाणे ज्या प्रमाणात आहार शिजविण्यात येतो प्रत्यक्ष प्रयोगशाळेमध्ये काय घडते ते येत नव्हते राज्य शासनाने २२५ ते २७५ ग्रॅम शिजून येईल, त्या आहारात येणारे प्रथिने आणि कॅलरी याचे प्रमाण कमी दिसत होते. त्यामुळे नमुने अपात्र म्हणून परत येत होते. महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे बैठक झाली. इस्पितळातील आहारतज्ज्ञ, प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ, शाळेचे मुख्याध्यापक, त्या संस्थेत नमुने शिजवायचे ते लोक, पालक यांच्यासमोर न शिजवलेल्या धान्यादी आहाराचे नमुने घ्यावे. ते प्रयोगशाळेमध्ये शिजवावे. त्याचे टेस्टींग करावे आणि ते घेण्यात यावे असे ठरले. सॅम्पलचे वजन ३५९ ग्रॅम आले. विभाग २२५-२७५ च्या रेंजने धरत होता. त्याच्यामध्ये ही वाढ झाली. बाकीचे प्रोटीनचे घटक होते. सोसायटींचे, महिला बचत गट करीत असलेले नमुने घेतले होते. इस्कॉन टेंपलचे नमुनेही घेतले होते. येथे हे अपात्र आणि पात्र याचे सूत्र येथे लागू करू शकत नाही. वारंवार काय झाले की, नमुने नापास झाले, असे म्हटले जात होते. प्रत्यक्ष तशी वस्तुस्थिती नाही. महानगरपालिकेच्या या प्रयोगशाळेची स्थापना १९०३ साली झाली. या प्रयोगशाळेला देशभर मान्यता आहे. केंद्राची जी एफएसआय नावाच्या संस्थेची मान्यता या प्रयोगशाळेला आहे. या प्रयोगशाळेमध्ये सुशिक्षित कर्मचारी असतात. ही प्रयोगशाळा अनेकांकडून नमुने तपासते. आपले एफडीएल नमुने सॅम्पल तपासते. केंद्र शासनाचे, रेल्वेचे खाद्यपदार्थाचे नमुने तपासते. याबाबत न्यायालयात आव्हान दिले जाते. याबाबत लोकांना उत्तर घ्यावे लागते ही तपासणी एका नावाजलेल्या संस्थेकडून केलेली आहे. येथे ८०००० नमुने या संस्थेमध्ये तपासले जातात. ११० वर्षांपासूनची ही संस्था आहे. यामध्ये खाद्यान्न आणि पाणी याचे सगळ्या प्रकारचे नमुने तपासले जातात. ही जी खिचडी बनते, ज्यावेळी विभाग शाळेत जाऊन पाहतो. सर्व मुले ही खिचडी आवडीने खातात. त्याचे काय कारण असू शकते. त्यामध्ये ज्यावेळी पाहिले की, मध्यान्ह पोषण आहारामध्ये शंभर ग्रॅम तांदूळ धरतात इस्कॉन फुड रिलीफ फांऊडेशन येथे ४० ग्रॅम धरतो. महिला बचत गट यांची २० ग्रॅम डाळ असते. इस्कॉन संस्थेची ३० ग्रॅम डाळ असते. गोडेतेल तेल ५ ग्रॅम इतर संस्था टाकतात. इस्कॉननत्यामध्ये १६ ग्रॅम गाईचे तुप टाकतो. नंतर भाजीपाला इतर संस्था ५० ग्रॅम टाकतात. इस्कॉन संस्था ८० ग्रॅम भाजीपाला टाकतो. इतर संस्थांच्या खिचडीत शेंगदाणे नसतात. इस्कॉन संस्था सहा ग्रॅम शेंगदाणे टाकते. सोया नगेट्स पाच ग्रॅम टाकले जातात. महिला बचत गटाच्या खिचडीत सोया नगेट्स टाकले जात नाहीत. याचा जर विचार केला तर याच्यामध्ये मिनरल्स आणि व्हिटॅमिन्स भाजीपाल्यामधील त्याचा हिशेब कुठेही घेतलेला नाही. हे क्वांटिफाय करता येत नाही. मिनरल्स आणि त्यातील प्रोटीन तपासून त्याचे पर्सेंटेज विभाग पाहतो, त्यावेळी लक्षात आले की, त्यामध्ये ॲश कंटेंट असतो. तो मिनरल्स आणि व्हिटॅमिन्समधून आला तर तो जास्त असतो. या सॅम्पलमध्ये जास्त व्हिटॅमिन्स येतात. यामुळे मिनरल्स आणि व्हिटॅमिन्स या सॅम्पलमध्ये जास्त येतात. यामध्ये मुलांची आवड आणि त्यांचे कन्झम्प्शन विभाग पाहतो. या सगळ्या गोष्टी विचारात घेऊन राज्य शासनाकडे प्रस्ताव गेला. ही वस्तुस्थिती अशी आहे की, राज्य शासनाचे अभिप्राय घेतले. यासंदर्भात बैठक झाली. त्यामध्ये हे सर्व मांडले गेले. त्यांनी विभागाचे व संस्थेचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानंतर शासन निर्णयामध्ये सुधारणा केलेली आहे. नवीन निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये सुधारणा केली. ही बाब वैज्ञानिकदृष्ट्या सत्यच आहे. मागील नमुने अपात्र आहेत, असे म्हणणे अन्यायकारक होईल. अशी विभागाने विनंती करून मुले ही खिचडी किती खातात, हेही विभागाने चेक केलेले आहे. तेथे सर्व मुलांना खिचडी किती आवडते. प्रयोगशाळेत नमूना म्हणून पाठविला जाणारा खिचडीचा भाग ठराविक प्रमाणातील असतो. त्या त्या मुलांच्या पानावर जास्त खिचडी वाढली जाते. आदर्श नमुन्यापेक्षा जास्त मुले खातात. नमुन्याच्या वजनावर त्यातील प्रथिने, उष्माकांची मर्यादा अवलंबून नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

याचे दोन भाग आहेत असे समितीचे मत आहे. एक आहार शिजविण्या पुर्वीचा नमुना आणि एक आहार शिजवण्यानंतरचा नमुना. संस्थेने ते डिराईव्ह केले आहे आणि ते विभागाने लागू केलेले आहे तसेच जर ते पूर्वीपासून करीत असतील तर समितीला असे वाटते की, then Committee have to look in this para in a different manner, असे मत समितीने मांडून मागील जे नमुने आहेत, त्यांना जर ३५९ प्रमाणे केले तर ते मान्य होणार का ? अशी विचारणा समितीने केली असता, ८५ टक्के इतके प्रमाण त्यात होते. प्रथिनांचे प्रमाण काही ठिकाणी ११.५० आले. १०.९० इतके आले होते. आता ते १२.०० पर्यंत भरलेले आहे, हे खरे आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

गुणांकाचा जो शासन निर्णय आहे, तो चुकीचा आहे. या चुकीच्या शासन निर्णयामुळे हा घोळ झालेला आहे, असे मत समितीने मांडले असता विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली. शासन निर्णय भुतलक्षी प्रभावाने लागू करण्याच्या संदर्भातदेखील हा केवळ गुणांकाचा विषय आहे. मल्टिप्लिकेशन बाय २.५ आणि ३.५ गुणाकार करणे हे एवढे पुरेसे आहे, असे मत समितीने व्यक्त करून इस्कॉनपेक्षा जास्त नमुने खाजगी महिला बचत गटांचे अपात्र होतात, त्याबाबत विभागाने काय कारवाई केलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ठरविलेल्या पात्रतेप्रमाणे जर त्यामधील पोषण मुल्य नसतील तर त्यांच्याकरिता दंडात्मक शिक्षेची तरतूद केलेली आहे. २००० ते ५००० रुपयांची रक्कम निर्देशित महानगरपालिकेने स्वतः घातलेले आहेत. राज्य शासनाने या संदर्भात जर काही वेगळे निर्देश दिले तर ते विभाग स्वीकारेल, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

ज्या ठिकाणी या पात्रतेच्या पॅरामीटर्सचे पालन होत नसेल तर जास्तीची शास्ती लावली पाहिजे. सभागृहात आणि सगळीकडे ज्याबाबत नेहमी चर्चा होती. ते अन्न खाल्ले जात नाही. त्यातून जर एक डिराईव्ह केले असेल तर हे चांगले आहे की, ते मुले ती रुचकर खिचडी जास्त खातात. परंतु त्याची अंमलबजावणी एक एजन्सी करीत नाही. एकाच वेळी अनेक एजन्सीजमध्ये इस्कॉन एजन्सी खिचडी शिजवितात, असे नाही. या पॅरामीटर्समध्ये ईस्कॉनला ते सगळे इनग्रेडियन्टस टाकणे आवश्यक आहे. जेवढे उष्मांक जाणे आवश्यक आहे, त्याकरिता ते आवश्यक असेल तर त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. हा परिच्छेद वगळायला निदान समितीची तत्वतः मान्यता आहे. समिती विभागाच्या व महानगरपालिकेच्या उत्तराने समाधानी आहे. विभागीय सचिवांनी आणखी एक गोष्ट सांगितली होती, जर इस्कॉनने मागणी केली तर विभागाकडून शास्तीची रक्कम परत करण्यात येईल. If they are not in default then what is departments's future action on it, अशी विचारणा समितीने केली.

खुलाश्यामध्ये त्यांनी अर्धशासकीय पत्राद्वारे ही बाब निदर्शनास आणली होती. शासन येथे कुठेही म्हणत नाही की, हे नमुने चुकीचे आहेत. हे जी काही विक्री झालेली आहे, ती चुकीचे आहे, असे कॅटेगॉरिकल म्हटलेले नाही. These were all incorrect test reports and department now endorsing whatever the MCGM is saying. committee have to say that if department want to retrospectively apply this Government Resolution असे महालेखापालांनी निदर्शनास आणले असता, त्यावर ते नमुने चुकीचे नाही नमुने एका ठराविक वजनाचे दिले जातात. परंतु तपासणी अहवाल प्रत्येक शंभर मार्गाचे देतात म्हणून ते बरोबर आहेत. गुणांकांचा मुद्दा आहे. मल्टिप्लिकेशन फॅक्टर चुकलेला आहे. त्यावेळी ही चूक केली नसती तर हा सगळा गोंधळ झाला नसता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Department aggreeing that the earlier G.R. was not proper and now govt. are changing the G.R. त्याचप्रमाणे सरकारकडे जमा केलेली ४,७२,००० ही रक्कम मोठी आहे. त्याचे काय करणार ? इस्कॉनच्या लोकांवर अन्याय करू नये, असे समितीचे मत आहे. सचिवांनी मागील साक्षीमध्ये स्पष्टपणे सांगितले होते की, ही रक्कम परत करण्यात येईल. त्या दृष्टीने समितीने आता विचारले की, याला तो शासन निर्णय लागू करण्यात येत असेल तर समितीची हरकत नाही. अठरा कोटी रुपये वसूल करावे लागणार. ते योग्य होणार नाही. त्या दृष्टीने जी शास्ती लावली त्याला गुणांकन चेक करून शास्तीचे पैसे जेथे जेथे योग्य असतील तेथे तेथे परत करावेत असे समितीने सूचित केले असता, ही रक्कम एवढी मोठी नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

It is not the question of money. The Government is not accepting that whatever they did with testing of sample was incorrect. This is point असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

The department has to give the message. ही केवळ एक तांत्रिक चूक आहे. गुणांकाचा हा विषय आहे. हा विषय प्रॅक्टीकली शंभर ग्रॅमचे वजन शिजलेल्या आहाराचे घेतलेले आहे. त्या दृष्टीने ते ३५९ गुणांक येतो, हा केवळ इस्कॉनचा प्रश्न नाही. एवढे सगळे नमुने अपात्र झालेले आहेत. ज्यांचे नमुने त्या गुणांकामध्ये बसत नसतील तर त्यांचे पैसे विभागाने कापले पाहिजेत. ३५९ प्रमाणे केंद्र शासनाचा शासन निर्णय कुठेच नव्हता. तो २५० करून घेतला. ते चुकीचे होते, हे शास्त्रोक्त पद्धतीने यांनी शाबित केलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, प्रयोगशाळेला जे नमुने पाठविले जातात ते अंदाजाने २००-२५० ग्रॅमचा पाठविले जातात. मुले त्यापेक्षाही मागणीप्रमाणे जास्त आवडीने खातात. म्हणून ते मल्टिप्लिकेशन फॅक्टर महत्त्वाचे आहे. कितीने ते मल्टिप्लाय करायचे आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

यावर महालेखाकार यांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले की, हे सगळे तपासणी अहवाल चुकीचे आहेत, हे आम्ही मागे घेतो. असे विभागाने ज्ञापनामध्ये म्हटलेले आहे. हे केवळ इस्कॉन टेंपलचेच झालेले आहे, असे नाही. It is not only ISKON. The reports of the samples were failed then the Government has to accept in their official reply that, all these reports were wrong. Because this is the basis of this audit para. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले

की, शासन निर्णयामध्ये जे ग्राम दाखविलेले आहेत, ते शिजविलेले आहेत. वस्तुस्थिती निदर्शनास आणली आणि राज्य शासनाने त्यामध्ये सुधारणा केली. त्यामुळे त्यापूर्वीचे नमुने अपात्र होते, असे म्हणणे योग्य नाही. तशी वस्तुस्थिती नाही. प्रयोगशाळेत या नमुन्यांना अपात्र असे म्हटलेले नाही. प्रयोगशाळेनेया नमुन्यांची इतर गुणांकाशी पडताळणी केली होती.

त्याच्या अहवालातील गुणांकाची गणना २५० च्या शासन निर्णयाप्रमाणे केलेले आहे. आता जे सुधारित करीत आहात, ते शासन निर्णयामध्ये सुधारणा केलेली आहे. इस्कॉनची रेसिपी प्रत्येक संस्था करीत आहे, हे विभाग कसे तपासणार ? हे गुणांकन इस्कॉनवर लागू होते, परंतु इतर खाजगी संस्थांवर लागू होणार नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, तांदळामध्ये १००:४० असे यामध्ये प्रमाण आहे. प्रोटीन्स, कार्बोहायड्रेड, फॅट्स यांच्या गुणांकनाने जी कॅलरी काढले जाते, त्याला गुणिले फॅक्टर करतात, त्यावर कॅलरीज अवलंबून असतात असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१०० ग्रॅम राईस वापरला जात असेल तर त्याचे गुणांकन काय असेल व ते कोणी ठरविले आहे. अशी विचारणा समितीने केली असता, त्याचे गुणांकन ४३१ आले. ते सगळे नमुने प्रयोगशाळेमध्ये टेस्ट केले. १०० ग्रॅमने घेऊन केले ६० ग्रॅमने घेऊन केले. १५० ग्रॅमने घेऊन केले असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

हे सर्व प्रस्तावामध्ये व २०१७ च्या शासन निर्णयामध्ये लिहिलेले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, दोन्हींच्या पाककृतीमध्ये फरक आहे. बचत गटांना ही पाककृती करण्यासाठी दुप्पट डबल खर्च द्यावा लागेल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. ईस्कॉन संस्थेलामदत निधी मिळतो म्हणून ते करतात. बाकीचे लोक कसे करतात, त्यांचे विभाग गुणांक काय घेतात ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, बाकीचे सर्व नमुने ४३१ घेण्यात येतात. ते सर्व मंजूर झाले. एसएनडीटीला अहवालाकरिता काही पाठविले, त्याचे काय झाले **?** अशी विचारणा समितीने केली असता, आता ते येणे अपेक्षित आहे, दोन संस्थांनी अहवाल दिला एका संस्थेने दिला नाही. एसएनडीटीकडून विभागाने पुन्हा अहवाल मागविलेला आहे. विभाग तांत्रिकदृष्ट्या बघत आहे की, जो सुधारित शासन निर्णय आहे तो योग्य आहे का ? ज्यावेळी हा शासन निर्णय इश्यू केला, त्यावेळी हे सर्व तपासूनच तो निर्गमित केलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीच्या माहितीप्रमाणे यासंदर्भात तांदुळाचा हिशोब कुणी ठेवत नाही. याची कोणीही तपासणीही करीत नाही. हे जे बचत गटांना, संस्थांना तांदूळ पुरवठा करतात, तो त्यांनी किती वापरला व किती पुरविला केला या प्रकारची काही पद्धती आहे की नाही ? नगरसारख्या ठिकाणी रेकॉर्डप्रमाणे तांदूळ शिल्लक आहे. नवीन कंत्राटदार तांदूळ घ्यायला तयार नाही. याच्या तांदुळाची जी उचल करतो, त्याच्यावर अंकुश नाही. अशा प्रकारची परिस्थिती आहे. समितीला या विषयावरही माहिती अपेक्षित आहे की, विभाग तांदुळाची उचल करण्याची त्यांना ऑर्डर देतो, उचलीप्रमाणे त्याचा दस्तऐवज (रेकॉर्ड) विभाग पाहतो का ? त्याचा दस्तऐवज आणि शिल्लक दरवर्षी तपासला जातो का ? कोणी ४० ग्रॅम वापरते, कोणी १०० ग्रॅम वापरतात. हा उपस्थितीचा विषय आहे. हा तांदूळ जितके लोक उपस्थित आहेत, त्यांना देता येईल. त्याप्रमाणे बाकी जो शिल्लक साठा मोठ्या प्रमाणात असतो आणि याची कोणतीही विल्हेवाट कोणताही दस्तऐवजही ठेवला जात नाही. यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात मोठा घोळ आहे. नगर जिल्ह्यात ४००० क्विंटल तांदूळ प्रत्यक्षात आहे. दस्तऐवजामध्ये ऑन स्टॉकमध्ये दिसतो पण गोडावूनमध्ये काहीच नाही. या दृष्टीने कोणती योजना तयार केली जाणार आहे, याची माहिती द्यावी. एसएनडीटीचा अहवाल आल्यानंतर दुरुस्ती करून घ्यावी. विभागाचा रिप्लाय ठीक आहे असे समितीने मत मांडले. तसेच विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे :

पुरवठेदाराने भारतीय अन्न महामंडळाच्या (FCI) गोदामातून उचल केलेला तांदूळ, शाळांना वितरित केलेला तांदूळ व पुरवठेदाराकडे शिल्लक असलेला तांदूळ यांचा ताळमेळ घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून प्राथमिक शिक्षण संचालनालयास तांदूळ वाहतूकीच्या देयकासोबत नियमित सादर केले जाते.

याबाबत सदर परिच्छेदावर आपले मत मांडताना महालेखाकारांनी नमूद केले की, Accountant General agree to retrospective application of this G.R. नमुने अपात्र झालेले आहेत. पुन्हा ५ वर्षानंतर दुसरा शासन निर्णय घेऊन येतील व तोदेखील चुकीचा होता असे सांगितले जाईल. कॅगचा रिपोर्ट आल्या नंतर हा शासन निर्णय बदलण्यात आला, which was the basis of this audit para on those failed sample. इस्कॉनच्या केंद्रीय स्वयंपाकगृहाला १०० ग्रॅम व १५० ग्रॅम तांदूळ दिल्यानंतरही त्यांचे नमुने अपात्र झालेले आहेत असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले. सन २०११ मधील माध्यमातून घेतली आहे. ज्यांना ४० व ६० ग्रॅम तांदूळ दिला त्यांचा समिती स्वीकार करेल. त्यांना शासन निर्णय लागू राहील. ज्यांना १०० व १५० ग्रॅम दिले असेल त्या नुसार त्याचा गुणांक आला पाहिजे. त्या बाबत कारवाई केली पाहिजे, असे समितीने मत मांडले असता, उष्मांक व प्रथिने बसत नसेल तर बृहन्मुंबई महानगरपालिका

कारवाई करणारच आहे. त्यांनी मान्य केले आहे. पुन्हा नव्याने काही नमुन्यांची तपासणी केली असून थोड्या फार प्रमाणात नमुने अपात्र होत आहेत. त्याबाबत ते कारवाई करणारच आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. (याबाबत विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरण पत्र क्रमांक २).

**परिच्छेद क्र. २.३.४.३ शिजविलेल्या आहाराचे नमुने अनुतीर्ण ठरण्याची मोठ्या प्रमाणातील टक्केवारी**

१.६ या परिच्छेदामध्ये एमसीजीएम व्यतिरिक्त राज्यातील ३३ जिल्हा परिषदांपैकी एकाही जिल्हा परिषदेने सन २०१०-१५ दरम्यान शिजवलेल्या अन्नातील उष्मांक मूल्य व प्रथिनांची मात्रा तपासण्याची चाचणी केली नव्हती, असे महालेखापालांचे आक्षेप आहेत यासंदर्भात खुलासा करावा असे समितीने निदेश दिले असता, जिल्हापरिषद, प्राथमिक शाळांसाठी फूड टेस्टिंगसाठी विशेष तरतूद उपलब्ध नसते. त्यासाठी दररोजचे खिचडीचे सॅम्पल काढून ठेवले जाते. हे सॅम्पल २४ तास म्हणजे आजचे सॅम्पल उद्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देईपर्यंत साठवून ठेवले जाते. एखादी घटना घडल्यानंतर त्या दृष्टीने आपण टेस्टिंग करतो. पण दररोज तपासणी करण्यासाठी तरतूद नसल्यामुळे ती केली जात नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

केंद्र शासनाच्या गाईड लाईनमध्ये स्पट तरतूद आहे. त्याप्रमाणे राज्य शासनाने तरतूद केली पाहिजे. सदरहू गाईड लाईननुसार आहार नमुना तपासणीसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे काय, राज्य शासनाच्या शासन निर्णयामध्ये उक्त प्रकरणी काय उल्लेख केला आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागीय सचिवांनी आहार नमुन्यांची तपासणी ठरवून दिलेल्या लॅबमधून करून घ्यावयाची आहे. सदरहू कार्यवाही जिल्हा परिषदेकडून अपेक्षित आहे असे विदीत केले तसेच सदरहू प्रकरणी आर्थिक तरतूद नसल्यामुळे नियमीत आहार नमुना तपासणी करणे अवघड आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हा विषय नियमीत तपासणीचा नाही. ५ वर्षामध्ये एकदाही आहार नमुना तपासणी करण्यात आली नाही, असा लेखा आक्षेप आहे.सदरहू नमुना तपासणीसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे काय ? सदरहू नमुना तपासणीसाठी येणारा खर्च कोण देणार ? असे समितीने विचारले असता त्यासंदर्भात आर्थिक तरतूद नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. नमुना काढून ठेवल्यानंतर त्याची तपासणी कोणी करावयाची ? असा मुद्दा प्रधान महालेखाकार यांनी उपस्थित केला असता, मुलांना पुरविण्यात येणारा आहार वाटप करण्यापूर्वी त्याचा नमुना बाजूला काढून ठेवावयाचा असतो. उक्त आहार सेवनानंतर काही घटना घडली तर तो नमुना तपासणीसाठी पाठवावयाचा असतो. परंतु आहार सेवनानंतर प्रत्यक्षात काही घटना घडत नाही, घडली तर संबंधितांच्या खर्चातून तो आहार नमुना तपासणीसाठी पाठविण्यात येत असेल. परंतु उक्त नमुना तपासणीसाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आली नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

काही घटना घडली तरच नमुना तपासणीसाठी पाठविण्यात येत असेल तर सदरहू बाब शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आली आहे काय, शासनाच्या धोरणामध्ये काय नमूद करण्यात आले आहे व केंद्र शासनाला काय अपेक्षित आहे ? केंद्र शासनाने सदरहू जबाबदारी राज्य शासनाकडे सोपविली आहे. उक्त नमुना तपासणीसाठी राज्य शासनाकडे तरतूद नाही, याबाबत केंद्र शासनाला कळविण्यात आले आहे काय, त्यासाठी निधीची मागणी केली आहे काय, उक्त प्रकरणी तरतूद करण्यासाठी राज्य सरकारने प्रस्ताव सादर केला आहे काय ? केंद्र शासनाने गाईड लाईन तयार केली असून त्याची पूर्णतः अंमलबजावणी झाली पाहिजे, त्यासाठी कोणी तरी जबाबदारी घेतली पाहिजे. विभागाने मंत्री महोदय अथवा मंत्रिमंडळासमोर अथवा वित्त विभागास प्रस्ताव सादर केला होता का, त्यांनी तो अमान्य केला आहे काय ? सदरहू माहिती समितीला समजणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या गाईड लाईननुसार शालेय शिक्षण विभागाने कोणती कार्यवाही केली ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला त्यावर Sir, guidelines say that it will be the responsibility of the State Governments to ensure that the meal supplied meet the calorific content which has been prescribed under the guidelines. उक्त तरतुदीनुसार अर्बन लोकल बॉडीज् त्यांच्या लॅबमध्ये सॅम्पलींग करतात. एमसीजीएमचा वेगळा मुद्दा होता. जिल्हा परिषदने नमुना तपासणी करणे आवश्यक आहे. Otherwise how will the State Government ensure that the calorific content of the meal is being met ? असे प्रधान महालेखाकार यांनी समितीस अवगत केले.कॅलरीफीक कन्टेन्ट क्वान्टीटीमध्ये असतो कारण आहारामध्ये तांदळाचे प्रमाण अधिक असते. तांदूळ ज्याप्रमाणात वापरण्यात येईल त्याप्रमाणात कॅलरीज् मिळतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाची उत्तरे संभ्रमात टाकणारी आहेत. राज्य शासनाची सिस्टम काय आहे ते समितीला समजावून सांगावी. सीएसजीचे अधिकारी केंद्र शासनाची सिस्टम समजावून सांगतील. सिस्टममध्येच गोंधळ आहे. महालेखापाल यांनी सांगितले की, आहार नमुना जिल्हा परिषदेच्या लोकल बॉडीने तपासला पाहिजे. परंतु कोणत्याही लोकल बॉडीज् कडून आहार तपासणी करण्यात येत नाही. आहार नमुना तपासणीसाठी पाठविण्यात येत नाही. काही घटना घडली तरच आहार नमुना तपासणीसाठी पाठविण्याची व्यवस्था आहे. नमुना तपासणी होऊन आल्यानंतर धान्याचा वापर

करावा, असा नियम आहे का ? अशी समितीने विचारणा केली असता, आहार योजनेंतर्गत खिचडी तयार केल्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक किंवा शालेय समितीचे सदस्य वाटप करण्यापूर्वी अर्धा तास अगोदर त्याची चव घेतात, त्याची नोंदवहीमध्ये नोंद करतात असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मुलांना आहार देण्यासाठी शाळेस पुरवठा करण्यात आलेले धान्यादी माल महिन्याच्या २० तारखेपूर्वी तपासले पाहिजे का ? केंद्र शासनाच्या गाईड लाईनचे पालन राज्य सरकारने केले नाही, हे खरे आहे काय, असल्यास का करण्यात आले नाही ? याची माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता, धान्यादी माल खरेदी केल्यानंतर त्याचा नमुना शासकीय लॅब येथे तपासणीसाठी पाठविण्यात येतो व तपासण्यात येतो. सदरहू तपासणी धान्य व कच्चा माल याबाबतीत करण्यात येते. उक्त कार्यवाही केंद्र शासनाच्या गाईड लाईननुसार करण्यात येते, शिजवलेला आहार दररोज तपासणीसाठी पाठविण्यात येत नाही. कारण त्याप्रमाणात लॅबची क्षमता नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

धान्य, तिखट, तेल, मिरची, हळद या वस्तू करारामध्ये नमूद दर्जाच्या आहेत की नाही, हे मालाचा पुरवठा झाल्यानंतर त्याच्या नमुना तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय तो वापरु नये. अशा प्रकारचा नियम आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, धान्यादी मालाचा पुरवठा सेंट्रलाईज पद्धतीने करण्यात येतो. त्यासाठी जिल्हानिहाय निविदा प्रक्रीया राबविण्यात येते. एक पुरवठादार एका जिल्ह्यास धान्यादी मालाचा पुरवठा करीत असतो. त्याच्याकडून माल घेण्यापूर्वी त्याची शासन मान्य लॅबमधून तपासणी करण्यात येते धान्यादी माल प्राप्त झाला हे समजण्यासाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाची स्वाक्षरी आवश्यक असते. परंतु शाळेच्या मुख्याध्यापकाकडे पुरवठा करण्यात येणाऱ्या धान्याच्या करारनाम्याची कॉपी देण्यात येत नाही. तसेच धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचा नमुना प्रमाणित होऊन आला तरच संबंधित पुरवठादाराचे देयक अदा करण्यात येते.असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पुरवठादार कोणत्याही स्तरावरील असला तरी त्याचा करारनामा करण्यात येतो. शालेय पोषण आहार करारनामा मराठी भाषेत तयार करण्यात येतो व अंगणवाडी मध्ये पुरवठा करण्यात येणाऱ्या टीएचआरचा करारनामा इंग्रजी भाषेमध्ये तयार करण्यात येतो. अंगणवाडी सेविकेला इंग्रजी समजत नाही त्यांना पुरवण्यात येणाऱ्या टीएचआरचा करारनामा इंग्रजीमध्ये तयार करणे उचित नाही. शाळेतील मुख्याध्यापकाला इंग्रजी भाषा समजत असते परंतु त्यांना पुरवठा करण्यात येणाऱ्या माला संबंधीचा करारनामा मराठी भाषेत तयार करण्यात येतो. एवढा सगळा गोंधळ आहे. त्यामुळे विभागाने समितीला पहिल्या टप्प्यापासून शेवटच्या टप्प्यापर्यंतची सिस्टम समजावून सांगावी अशी समितीने सूचना केली असता, विभागाच्या माहितीनुसार संचालक स्तरावरुन पुरवठा करण्यात येणाऱ्या मालासंदर्भातील निविदेची कार्यवाही करण्यात येते. प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात येते. सदरहू प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुरवठादाराची निवड करण्यात येते. त्यानंतर त्यास वर्क ऑर्डर देण्यात येते. सदरहू वर्क ऑर्डर मराठी भाषेत असतेपुरवठादाराने वर्क ऑर्डरनुसार पुरवठा करणे व शाळेपर्यंत पाहोचविणे अपेक्षित आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यांना माल स्वीकारावयाचा आहे त्यांच्याकडे करारनाम्याची प्रत असणे आवश्यक आहे काय, असा समितीने प्रश्न केला असता, त्यांच्याकडे करारनाम्याची प्रत असणे आवश्यक आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. करारनाम्यामध्ये अटी व शर्तींचा समावेश करण्यात आलेला असतो, तो मुख्याध्यापकांना पुरविण्यात येत नाही. सदरहू करारनामा ज्या दिवशी निश्चित करण्यात येईल त्या दिवशी तो विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावा. सदरहू करारनामा वेबसाईटवरुन डाऊनलोड करून त्यानुसार धान्य स्वीकारावे, अशा सूचना मुख्याध्यापकांना देण्यात याव्यात अशी सूचना समितीने केली असता, एमडीएम पोर्टलवर करारनाम्याची प्रत अपलोड करण्यात येते. नमुना क्रमांक १, २, व ३ वहीचा नमुना प्रिंट करून त्याची प्रत शिक्षण अधिकारी यांना देण्यात येते व ती प्रत्येक बी.ओ. यांना उपलब्ध करण्याच्या सूचना देण्यात येते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदरहू करारनाम्याची प्रत वेबसाईटवर उपलब्ध करून दिल्यास ती संबंधितांना सहजपणे उपलब्ध होईल असे समितीने मत व्यक्त केले असता, नमुना क्रमांक १,२, व ३ वही प्रत्येक शाळेला पुरवण्यात येते. त्यामध्ये त्याची प्रत असते.मीड डे मील पोर्टलवर शालेय पोषण आहार करारनामा अपलोड करण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. सदरहू करारनामा डाऊनलोड करून माल स्वीकारण्याची सूचना संबंधितांना देण्यात यावी. तसेच, गाईड लाईननुसार धान्य प्राप्त झाले, अशी माहिती संबंधितांनी पोर्टलवर अपलोड करण्याचीही सूचना देण्यात यावी. जेणे करून माल स्वीकारताना तपासला किंवा नाही, हे स्पष्ट होईल. सदरहू माल तपासला असेल तर संबंधिताची जबाबदारी निश्चित करता येणे शक्य होईल. अशी व्यवस्था तयार करण्यात यावी अशी सूचना समितीने केली.स्थानिक पातळीवर शासकीय प्रयोग शाळा उपलब्ध नसल्याने त्यांचे नमुने तपासणे शक्य होत नाही, या विभागाच्या उत्तराने समाधान होत नाही. एका जिल्ह्यासाठी एक प्रयोग शाळा आहे काय ? कोणत्या जिल्ह्यांनी मालाचा नमुना तपासणीसाठी कोणत्या जिल्ह्यात पाठवावा ? सदरहू यादी समितीला सादर करण्यात यावी. आपला लेखा

परिच्छेद शिजवलेल्या अन्ना संबंधिचा आहे. या आक्षेप प्रकरणी विभागाने उत्तर दिले आहे की, " due to lack of funding and unavailability of food lab at local level, the samples of the cooked meal cannot be sent to laboratory for examination". केंद्र सरकारच्या गाईड लाईनचे व्हायलेशन होत आहे असे समितीने मत व्यक्त केले असता, शिजवलेला आहार दररोज लॅबला टेस्टींगसाठी पाठविणे केंद्र शासनालाही अपेक्षित नाही. परंतु त्याची चव घेणे अपेक्षित आहे. त्यानुसार मुलांना आहार देण्यापूर्वी अर्धातास अगोदर मुख्याध्यापक, शिक्षक किंवा शिक्षण समितीचे सदस्य चव घेतात. त्यानंतर मुलांना आहार वाटप करण्यात येतो. चवीवरुन ती खराब आहे किंवा नाही, हे समजते. अशा पद्धतीने आहाराच्या क्वालिटीची निगा ठेवण्यात येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रॉ मटेरिअल क्वालिटीचे काय ? सदरहू बाब बंधनकारक आहे. शिजवलेल्या आहारासंदर्भात काही अनियमितता नसते. पुरवठ्या प्रकरणी अनियमितता असते. म्हणजे तो माल कमी दर्जाचा असतो.असा प्रश्न समितीने केला असता,कच्चे रॉ मटेरिअल खरेदी करण्यासाठी जिल्हास्तरावरुन आदेश देण्यात येतात व पुरवठा घेण्यापूर्वी त्या मालाचा नमुना लॅबमधून चेक करून घेण्यात येतो असे विभागीय सचिवांनी सांगितले. मुंबई महानगर पालिकेच्या दादर येथील महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेत चाचणी केलेल्या १६०० नमुन्या पैकी १५४६ नमुने उष्मांक प्रथिनांच्या प्रमाणासाठी केंद्र शासनाने विहीत केलेली मात्रा पूर्ण करण्यासाठी अपयशी ठरले होते. विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या आहाराच्या १६०० पैकी १५४६ नमुने योग्य ठरत नसतील तर ते वाटप करून उपयोग काय ? सदरहू बाब एमसीजीएमच्या निदर्शनास आली आहे. याचा अर्थ, रॉ मटेरिअल पुरवठा ठरवून दिलेल्या ग्रेडनुसार पुरवठा करण्यात येत नाही. सदरहू परिस्थिती निर्माण झाल्यानंतर त्याकडे विभागाने लक्ष दिले आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, तो मुद्दा वेगळा आहे. योग्य प्रथिने व उष्मांक यासंदर्भातील मुद्दा आहे. खिचडी तयार करताना त्यामधे तांदूळ थोडासा कमी व दाळीची मात्रा अधिक असावी या संदर्भातील असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

शालेय पोषण आहार खिचडीमध्ये दाळ कमी असते व तांदळाचा वापर अधिक करण्यात येतो असे समितीने निदर्शनास आणले असता, तांदळाचे प्रमाण अधिक असते व दाळीचे प्रमाण थोडेसे कमी असते. त्यामुळे त्यामध्ये प्रथिने कमी असतात. त्याचा नमुना लॅबला पाठविला नाही तर चव घेऊन समजते प्रथिने कमी आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले. विद्यार्थ्यांना कॅलरीज् मिळाल्या पाहिजे, हा आपला उद्देश आहे असे समितीने मत व्यक्त केले.कशावरुन विभाग म्हणू शकतो मुलांना खिचडीतून कॅलरी मिळतात ? एमडीएमच्या गाईडलाईन आहेत. It clearly says that the overall responsibility for providing nutritious cooked mid day meal to every child in all Government schools lies with the State Government and Union Territory. सन २०११ मधील शासन निर्णयामध्ये प्रत्येक आयटमसाठी, अन्न शिजवण्यासाठी तरतूद निश्चित केली आहे. अन्न शिजवण्यासाठी शासनाकडे तरतूद आहे परंतु त्याचा नमुना तपासणीसाठी तरतूद नाही, असे विभागाकडून सांगण्यात येत आहे. The Department is taking this very casually. You assure the Committee that the meal that was provided met the nutritious criteria as mentioned in the guidelines असे प्रधान महालेखाकार यांनी सांगितले.कार्बोहाईड्रेड निश्चितपणे होत असेल. परंतु प्रोटीन कदाचित कमी पडत असतील. कारण दाळीचे प्रमाण तांदळापेक्षा कमी असते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

डाळ महाग व तांदूळ स्वस्त असतात का ? त्यामुळे पुरवठादार डाळ कमी व तांदळाचा पुरवठा अधिक करतो असा प्रश्न समितीने केला असता, केंद्र शासनाकडून एफसीआय गोदामाच्या माध्यमातून तांदळाचा पुरवठा मोफत करण्यात येतो. दाळ व इतर धान्य पुरवठा करण्यासाठी वेगळा पुरवठादार नियुक्त करण्यात येतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शिजवलेल्या अन्नाचा नमुना तपासणी केला नाही तर त्यामधून कॅलरीज् मिळतात हे कशावरुन सिद्ध करू शकता ? Can you ensure that the quantity and calorific content was met as per guidelines ? असा मुद्दा प्रधान महालेखाकार यांनी उपस्थित केला असता, त्याचे वैज्ञानिक कारण असे आहे की, ज्यावेळी आहाराचा नमुना पाठविण्यात येतो त्यावरुन मुलांना किती प्रमाण देण्यात आले हे सांगता येणे शक्य नाही. नमुना तपासता येऊ शकतो परंतु त्याचे किती प्रमाणात वाटप केले व त्यातून किती कोर्बोहायड्रेड मुलांना मिळाले हे सांगता येत नाही.समजा; आपण २४० ग्रॅम नमुना तपासणीसाठी पाठवू शकतो. परंतु मुलांना ४५० ग्रॅम आहार वाटप करण्यात आला आहे काय हे निश्चितपणे सांगता येत नाही. आहार नमुन्यात काही दोष आहे का हे तपासून समजते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुलांना सदर अन्न देण्याअगोदर स्थानिक स्तरावरील एक समिती ते खाऊन पाहते.आपण कितीही सॅम्पलिंग केले तरीही ते चुकीचे झाले असे आपण म्हणू शकतो, परंतु ग्रामीण भागामध्ये जर स्थानिक प्रतिनिधी स्वतः टेस्ट करून मॉनिटरींग करीत असतील तर त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास काही हरकत नाही.कोणतेही स्थानिक प्रतिनिधी दररोज शाळेत जात नाहीत. संबंधित व्यक्ती खिचडी तयार करून मुलांना देतात त्यावर शाळा व्यवस्थापन समितीवरील लोकांचे दररोजचे नियंत्रण नसते.कॅलरी किंवा उष्मांक मोजण्याची सिस्टिम जोपर्यंत निदान जिल्हा पातळीपर्यंत

सुरू करीत नाहीत तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. केंद्र सरकारच्या याबाबत गाईडलाईन्स असून राज्य सरकार त्याचे पालन करणार आहे किंवा नाही याबाबत माहिती द्यावी. जर राज्य सरकार केंद्र सरकारच्या गाईडलाईन्सचे पालन करणार असेल तर याबाबतची कार्यवाही किती दिवसांमध्ये केली जाणार आहे याबाबत देखील समितीला माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले असता, या संदर्भात एक महिन्यामध्ये पूर्ण आढावा घेण्यात येईल व केंद्र शासनाच्या सर्व गाईडलाईन्स पूर्ण केल्या जातील असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

**परिच्छेद क्रमांक : २.३.४.४ मुलांच्या आरोग्य तपासणीतील तूट/कमतरता :**

१.७ योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये (परिच्छेद २.५) इतर विकास कार्यक्रमांशी एककेंद्राभिमुखतेने मुलांची नियमीत आरोग्य तपासणी करण्याची तरतूद आहे. लेखापरिक्षकांच्या असे निदर्शनास आले की, २०१०-१५ दरम्यान निवडक २६९ शाळांपैकी ६४ शाळांनी अनिवार्य असूनही वार्षिक आरोग्य तपासण्या केल्या नव्हत्या. तसेच, निवडक २६९ शाळांपैकी ३९ शाळांनी २०१०-१५ दरम्यान एकही आरोग्य तपासणी केली नव्हती. तसेच निवडक २६९ शाळांपैकी ज्या ८१ शाळांमध्ये आरोग्य तपासण्या केल्या गेल्या होत्या त्यांच्याकडील मुलांच्या तपासणी व संदर्भपत्रांमध्ये त्यांची उंची, वजन, शरीर वस्तूमान निर्देशांक इत्यादी महत्वपूर्ण तपशील नोंदला जात नव्हता. याबाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले असता, सदर मुद्दा शालेय मुलांच्या आरोग्य तपासणीशी संबंधित आहे. आपल्याकडे जेवढया शाळा आहेत त्यामध्ये शिकणाऱ्या सर्व मुलांची ठरलेल्या कालावधीमध्ये म्हणजे सन २०१० ते २०१५ दरम्यान तपासणी झालेली नाही व त्यासंदर्भातील हा आक्षेप आहे. याचे नेमके कारण काय आहे त्याबाबतच्या प्राप्त झालेल्या संपूर्ण माहितीचा अभ्यास केला तसेच आरोग्य विभागाकडे विचारपूस केली. त्यावेळी असे समजले की, सन २०१०-१५ च्या दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील डॉक्टरांकडून ही तपासणी होणे अपेक्षित होते. परंतु आरोग्य विभागामध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे सर्वच्या सर्व शाळा कव्हर होऊ शकल्या नाहीत. परंतु आरोग्य विभागाने असे सांगितले आहे की, " त्यानंतर केंद्र सरकारची राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आर.बी.एस.के.) नावाची एक नवीन योजना आली असून त्याअंतर्गत मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले आहे. राज्यामध्ये एकूण ११७२ पथके तयार करण्यात आली आहेत. त्यामध्ये २ बी.एम.एस. डॉक्टर, १ ए.एन.एम. व १ फार्मासिस्ट यांचा समावेश असून त्यांना वेगळे वाहन देखील देण्यात आलेले आहे व या पथकांमार्फत आता वैद्यकीय तपासणीचे काम करण्यात येत आहे. " असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१०-१५ दरम्यान या ३९ शाळांमध्ये तपासणीच केली गेली नाही. इतर शाळांमध्ये आरोग्य तपासणी करण्यात आली. परंतु या शाळांमध्येच का करण्यात आली नाही ? असा प्रश्न समितीने केला असता, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर्स प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दैनंदिन कामामध्ये व्यस्त असल्यामुळे सर्व शाळांमध्ये तपासणी होऊ शकली नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. २६९ शाळांपैकी २३० शाळांनी आरोग्य तपासणी केली व ३९ शाळांनी तपासणी केली नाही. विभागाने सांगितलेला पॅरामीटर तपासणी झालेल्या २३० शाळांना देखील लागू होतो. तरीही ३९ शाळांनी तपासणीच केली नाही. यामध्ये संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांचा किंवा संबंधित अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा आहे, हे आपण मान्य केले पाहिजे. आपण सांगत आहात की, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पुरेसे कर्मचारी नव्हते. जर असे असेल तर या शाळांनी प्राथमिक आरोग्य केंद्रांना लेखी कळविलेले आहे का ? जर दिले असेल तर किती तारखेला पत्र दिले व संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांनी त्यावर काय उत्तर दिले याबाबतची माहिती समितीस सादर करावी असे समितीने निदेश दिले असता, ही बाब सन २०१०-१५ दरम्यानची असून त्या कालावधीमध्ये मनुष्यबळ कमी होते. विभागाने आता जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांना सूचना दिल्या असून त्यांनी संचालक व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला आहे. त्यांना सांगण्यात आले आहे की, " शाळांमध्ये आरोग्य तपासणी पूर्ण करून घ्या. " हे काम वैद्यकीय अधिकाऱ्यांनाच करावे लागते त्यामध्ये शाळा स्वत: काही करू शकत नाही. त्यांनी त्यांच्या क्षमतेप्रमाणे काम केलेले आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विशिष्ट ३९ शाळांमध्येच आरोग्य तपासणी का केली गेली नाही हा मुळ प्रश्न आहे. जर पुरेसे मनुष्यबळ नव्हते तर त्याचा परिणाम इतर सर्वच शाळांवर व्हायला हवा होता असे समितीने मत व्यक्त केले असता, ज्यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांना मोकळा दिवस मिळतो त्या दिवशी ते दौऱ्याचे नियोजन करून शाळांना भेटी देतात व तपासणी करतात असे विभागीय सचिवांनी सांगितले. समितीला असे वाटते की विभागाने शिक्षणाधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांना आरोग्य तपासणीची जबाबदारी दिली पाहिजे व हे काम झालेच पाहिजे असा नियम केला पाहिजे. न होण्यासारखे यामध्ये काहीच नाही. जर त्यांनी ठरविले तर याबाबत कार्यवाही होईल परंतु त्यांनी लक्ष दिले नाही तर मात्र शक्य नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, आता याबाबत निश्चितपणे कार्यवाही होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यानंतर अशा प्रकारची घटना कुठेही घडली तर त्यांना जबाबदार धरुन कारवाई करता येईल, " अशा सूचना शिक्षणाधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांना द्याव्यात,असे केले तरच प्रश्न सुटेल अशी सूचना समितीने केली असता, यानंतर असा प्रश्नच उद्‌भवणार नाही कारण

विभागाकडे मोठ्या प्रमाणात मुनष्यबळ उपलब्ध झालेले आहे. त्यामुळे निश्चितच सर्व शाळा कव्हर होतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आपल्याकडे नेमके कसे मुनष्यबळ उपलब्ध झाले आहे त्याबाबत समितीला सविस्तर माहिती द्यावी अशी सूचना समितीने केली असता, आरोग्य विभागातील मनुष्यबळाबाबत माहिती देत आहे. त्यांनी मुलांच्या आरोग्य तपासणीसाठी वेगळी पथके तयार केली आहेत. राज्यामध्ये अशा प्रकारची एकूण ११७२ पथके तयार केली असून त्यांच्यासाठी स्वतंत्र वाहनांची देखील व्यवस्था केली आहे. एका गटामध्ये ३ ते ४ पथके असून शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी करणे हेच त्यांचे एकमेव काम आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर्स उपलब्धच नाहीत. अमरावती जिल्ह्यातील ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी १६ केंद्रांमध्ये डॉक्टर्स उपलब्ध नाहीत. अमरावती जिल्ह्यामध्ये शालेय मुलांची आरोग्य तपासणी करण्यासाठी किती पथके तयार करण्यात आली आहेत, त्यामध्ये कोणकोणत्या डॉक्टरांचा समावेश आहे ?  जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील डॉक्टरांव्यतिरिक्त जर ११७२ पथके तयार केल्याबाबत आपण समितीला माहिती देत आहात तर मला अमरावती जिल्ह्यामध्ये शालेय मुलांच्या आरोग्य तपासणीसाठी तयार करण्यात आलेल्या पथकांची संख्या, त्यामधील डॉक्टर्स, त्यांना देण्यात आलेल्या वाहनांच्या क्रमांकासह माहिती किती दिवसांमध्ये देणार ? असा प्रश्न समितीने केला याबाबतची माहिती संबंधितांकडून लेखी स्वरुपात समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

उक्त मुद्याबाबत पुनःश्च दिनांक ३१ जुलै, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. राज्यामध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत मुलांच्या आरोग्य तपासणीसाठी ११७२ पथके असून त्यांना स्वतंत्र वाहनांची तसेच स्टाफची व्यवस्था करण्यात आल्याचे विभागाने सांगितले होते, परंतु अशा प्रकारची कोणतीही व्यवस्था नसल्याचे समितीने सांगितल्याने याबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करण्याचे निर्देश विभागास देण्यात आले होते. त्या अनुषंगाने समितीला माहिती द्यावी, असे समितीने निदेश दिले असता, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव उपस्थित आहेत. ते समितीच्या परवानगीने याबाबत समितीला माहिती देतील. तसेच शालेय शिक्षण विभागाची माहिती देखील समितीला सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन्माननीय समिती सदस्य यांनी मागील बैठकीमध्ये सांगितले होते की, " मी दररोज जिल्हा परिषदेमध्ये असतो. त्यामुळे तेथील कामांबाबत मला माहिती असते... " त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यामध्ये अशा प्रकारची किती पथके आहेत याबाबतची सविस्तर माहिती समितीस सादर करावी, असे समितीने निदेश दिले असता, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जन्मापासून ते १९ वर्षांपर्यंतच्या मुलांची तपासणी करण्यात येते. यासाठी प्रत्येक ब्लॉकमध्ये पथके तयार करण्यात आली आहेत. राज्यामध्ये अशा प्रकारची एकूण ११७५ पथके असून प्रत्येक पथकामध्ये दोन डॉक्टर्स असतात. त्यापैकी एक पुरुष डॉक्टर व एक स्त्री डॉक्टर असतात. तसेच एक ए.एन.एम. व एक फार्मसी ऑफिसर असतात. त्यांना एक वाहन व मेडिसिन देण्यात येते. या पथकांकडून प्रत्येक अंगणवाडीची वर्षातून दोन वेळा तपासणी करण्यात येते व शाळेची वर्षातून एक वेळा तपासणी केली जाते. या माध्यमातून साधारणतः ९९ टक्के अंगणवाडया व शाळांची तपासणी केली जाते. पटावर व अंगणवाडीमध्ये हजर असलेल्या मुलांची यामध्ये तपासणी करण्यात येते. ज्या मुलांना किरकोळ आजार असतील त्यांच्यावर तेथेच उपचार केले जातात व ज्या मुलांना मेजर प्रॉब्लेम असतील त्यांना रेफर केले जाते. रेफर करण्यामध्ये दोन-तीन गोष्टी आहेत. ज्यांना हार्ट डिसीज, कार्डियाक प्रॉब्लेम्स आहेत त्या मुलांच्या इकोकार्डिओग्राफीसाठी आपण कॅम्प आयोजित करतो व कोणाला सर्जिकल ट्रीटमेंट किंवा मेडिकल मॅनेजमेंटची गरज आहे ते ठरविले जाते. याशिवाय आर्थोपेडिक प्रॉब्लेम, हार्निया किंवा इतर आजार असणाऱ्या मुलांवर उपचार करण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये किती पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे ? ९९ टक्के शाळा व अंगणवाडयांची या पथकांमार्फत तपासणी केली जाते. ज्ञापनातील दिलेली माहिती प्रमाणे सन २०१४-१५ मध्ये एकूण ८१ हजार ४१० शाळांपैकी ६४ हजार ४२८ शाळांची आरोग्य तपासणी झालेली आहे. सन २०१५-१६ मध्ये एकूण ८२ हजार ९८ शाळांपैकी ६७ हजार ४६४ शाळांची आरोग्य तपासणी झालेली आहे. सन २०१६-१७ मध्ये एकूण ८४ हजार ५५३ शाळांपैकी ६८ हजार ९९३ शाळांची आरोग्य तपासणी झालेली आहे. एकूण शाळा व आरोग्य तपासणी झालेल्या शाळांची संख्या आपण पाहिली तर यामध्ये ९९ टक्क्यांची आकडेवारी कशी निघेल ? विद्यार्थ्यांच्या एकूण संख्येपैकी २२ ते २७ लाखांपर्यंत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झालेली नाही, याबाबत खुलासा करावा असे समितीने सांगितले असता, सन २०१७-१८ चा रिपोर्ट पाहिला तर विभागाला ८० हजार ९४९ शाळांचे टारगेट होते, सुरुवातीच्या काळात विभागाकडे स्पेशल टीम्स नव्हत्या, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

सन २०१६-१७ पर्यंतची आकडेवारी समितीकडे आहे. सन २०१६-१७ मध्ये एकूण ८४ हजार ५५३ शाळांपैकी ६८ हजार ९९३ शाळांची आरोग्य तपासणी झालेली आहे. विभागाने आता सांगितले की, ९९ टक्के शाळा व अंगणवाडयांची आरोग्य तपासणी झाली आहे. मग या वर्षीपासूनच एवढी तपासणी झाली आहे का ? असा प्रश्न समितीने केला असता, मागील वर्षीच्या आकडेवारीबाबत माहिती देत आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०१४-१५ वर्षाबाबतची ही साक्ष आहे. त्यावेळी व्यवस्था बरोबर नसल्याबाबतचा हा परिच्छेद आहे. विभागाने त्यावेळीच यासाठी व्यवस्था करायला पाहिजे होती परंतु केली नाही आणि त्याबाबत साक्ष आयोजित करण्यात आलेली आहे, ११७५ पथके नियुक्त केल्याबाबत विभागाने आता माहिती दिली आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत किती वाहने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत? अशी समितीने विचारणा केली असता, साधारणतः प्रत्येक तालुक्यामध्ये दोन ते तीन वाहने आहेत. हे तालुक्याची आवश्यकता व शाळांच्या संख्येनुसार ठरविण्यात आलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन्माननीय सदस्यांचे म्हणणे होते की, अशा प्रकारची वाहने किंवा पथके नाहीत, असे समितीने सूचित केले असता, ही वाहने भाडयाने घेताना काही अडचण आली किंवा एजन्सीने दिले नाहीत तर विभाग त्यांचे खासगी वाहन वापरण्यास परवानगी देतो किंवा पब्लिक ट्रान्सपोर्टने जाण्याचा खर्च विभाग एन.एच.एम. मधून देतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सुमारे २२ ते २७ टक्के विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणीच झाली नाही. याला जबाबदार कोण आहे याचे उत्तरच देण्यात आलेले नाही. सुमारे २० टक्के विद्यार्थी आरोग्य तपासणीपासून वंचित आहेत. यासाठी केंद्रातून निधी येतो तसेच राज्य सरकार देखील इतर निधी पुरविते. हा निधी १०० टक्के शाळांसाठी देण्यात येतो. जर १०० टक्के निधी खर्च होऊन देखील सुमारे २० ते २५ टक्के शाळा किंवा विद्यार्थी तपासणीपासून वंचित राहत असतील तर ही गंभीर बाब आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, केंद्र सरकारकडून मुलांच्या संख्येप्रमाणे निधीचा पुरवठा केला जात नाही. विभागाकडे जेवढी पथके मंजूर आहेत त्या सर्वांना वाहन वापराकरीता मर्यादा आहे. तेवढाच खर्च विभागास अनुज्ञेय आहे. तसेच पथकांमधील डॉक्टरांनाही विभाग मानधन देते. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याप्रमाणे विभागाला निधी मिळत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१४-१५ मध्ये एकूण ८१ हजार ४१० शाळांपैकी ६४ हजार ४२८ शाळांची आरोग्य तपासणी झालेली आहे. विभाग सांगत आहे की, सन २०१३-१४ मध्ये संख्या कमी होती. परंतु सन २०१६-१७ ची देखील आकडेवारी समितीकडे आहे. त्यामध्ये देखील असेच दिसून येते. सन २०१६-१७ मध्ये एकूण ८४ हजार ५५३ शाळांपैकी ६८ हजार ९९३ शाळांची आरोग्य तपासणी झालेली आहे. सध्याची परिस्थिती विचारात घेतानाच मागील कालखंडामध्ये या योजनेची का अंमलबजावणी झाली नाही ही बाब समिती साक्ष घेताना विचारात घेते. मागील कालखंडामध्ये यात त्रुटी झालेल्या आहेत. सन २०१६-१७ मध्ये देखील त्रुटी आहेत. याची कारणे समितीला सांगितली पाहिजेत, असे समितीने मत व्यक्त केले असता, आरोग्य तपासणीसाठी ही खास पथके स्थापन करण्याबाबतचा कार्यक्रम सन २०१३-१४ पासून सुरू झाला. सुरुवातीच्या काळामध्ये याची संख्या कमी होती. विभागाकडे असलेल्या सन २०१७-१८ च्या माहितीप्रमाणे पूर्वीच्या स्थितीत आता सुधारणा झालेली आहे. काही ठिकाणी त्यावेळी बी.ए.एम.एस. डॉक्टर्स उपलब्ध नव्हते. डॉक्टर्स न मिळाल्यामुळे काही शाळा राहिल्या असतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हानिहाय काय स्थिती आहे? कोणत्या विभागामध्ये तपासण्या कमी झाल्या आहेत? विभागाने समितीला राज्याची आकडेवारी सादर केली आहे. यामध्ये विदर्भ, मराठवाडा, पश्चिम विदर्भ, खानदेश, कोकण या सर्व प्रदेशांचा समावेश आहे. यापैकी सर्वात कमी तपासण्या कोणत्या भागातील शाळांच्या झाल्या आहेत? असा प्रश्न समितीने केला असता, विभागाकडे माहिती नसल्याने सदर परिच्छेद समितीने प्रलंबित ठेवले.

अमरावती जिल्ह्याची माहिती विभागाने मिळवली आहे. तेथे किती पथके आहेत, या पथकांमध्ये कोण डॉक्टर्स आहेत, त्यांचे दुरध्वनी क्रमांक व इतर सविस्तर माहिती समितीने मागितली होती. त्याबाबतची अमरावती जिल्ह्याची यादी विभागाकडे आता उपलब्ध आहे. त्यामध्ये डॉक्टरांचे नाव, दुरध्वनी क्रमांक, वाहन क्रमांक यांचा समावेश आहे. सदर माहिती समितीस सादर करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. (सदरहू माहिती विवरण पत्र क्रमांक ३ वर समाविष्ट.)

उक्त मुद्याबाबत पुनःश्च दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी या परिच्छेदाबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, काही मुलांची तपासणी झालेली नाही व किती पथकआरबीएस अंतर्गत आहेत अशी माहिती मागील वेळी समितीने विचारली होती त्याबाबत आरबीएसकेचा कार्यक्रम सन १३-१४ पासून सुरू झालेला आहे. समिती समोरील विषय सन २०१४ ते २०१७ या कालावधीमधील आहे. या वर्षाच्या कालावधीत केंद्र शासनाला अहवाल पाठवला असून विभागाकडील आकडेवारीनुसार अतिरिक्त संचालक यांनी असे सांगितले आहे की, जवळपास ९९ टक्के शाळांमध्ये तपासणी झाली होती. ९३ ते ९४ टक्के मुलांची तपासणी झाली होती. या माहितीमध्ये थोडी विसंगती आहे. विभागाने जुने रेकॉर्ड्स तपासले. त्यावरून असे दिसते की, ९३ ते ९४ टक्के मुलांची तपासणी झाली.

त्यावर सन २०१६-१७ मध्ये परिस्थिती बरीच खराब होती असे समितीने निदर्शनास आणले असता, केंद्र शासनाला जो अहवाल पाठवला तोच शालेय शिक्षण विभागाला पाठविण्यात येईल. त्यामुळे विसंगती राहणार नाही. सध्या समितीला दिलेली माहिती व केंद्र शासनाला दिलेला अहवाल यामध्ये फरक आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार ७ ते ८ टक्के मुले तपासणीपासून वंचित राहत आहेत.

शालेय शिक्षण विभागाच्या माहितीनुसार २० ते २१ टक्के मुले तपासणीपासून वंचित आहेत असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

सन २०१४-१५ व २०१५-१६ मधील आकडेवारी सांगण्यात यावी असे समितीने निदेशित केले असता, सन २०१४-१५ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने संपूर्ण राज्यात १ कोटी २२ लाख ३६ मुलांची तपासणी केली. शालेय शिक्षण विभागाचा आकडा ६८ लाखाचा आहे. जिल्हानिहाय, शाळा निहाय विभागाकडे आकडेवारी आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, शाळांची संख्या ८४ हजार ६६ होती तर शालेय शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार ८१ हजार शाळा होत्या. ९९ टक्के शाळांमध्ये व ९३ टक्के मुलांची तपासणी केली. सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०१५-१६ मध्ये १ कोटी २३ लाख ४४ हजार ९७१ मुलांची तपासणी केली व शालेय शिक्षण विभागाने सादर केलेला आकडा ८० लाख आहे. या आकडेवारीमध्ये देखील बराच फरक आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने ९४ टक्के मुलांची तपासणी केली. सन २०१६-१७ मध्ये १ कोटी २३ लाख ५६७ मुलांची तपासणी विभाग करू शकला. ९४ टक्के मुलांची तपासणी झाली. ६ ते ७ टक्के मुलांची तपासणी करणे शक्य झाले नाही असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

समितीला सादर केलेली माहिती व आता सांगण्यात आलेली माहिती या मधील आकडेवारीमध्ये बरीच तफावत आहे असे समितीने निदर्शनास आणले तसेच सन २०१० ते २०१५ मध्ये जी घट झालेली आहे त्याचा उल्लेख केला आहे असे प्रधान महालेखाकारांनी समितीला सहाय्य करताना नमूद केले त्यावर सन २०१० मध्ये हा कार्यक्रमच नव्हता. सन २०१३ पासूनन केंद्र शासनाचा कार्यक्रम आला. सन २०१३-१४ मध्ये काही कालावधीकरिता व सन २०१४-१५ मध्ये पूर्ण वर्ष हा कार्यक्रम राबवण्यात आला होता. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून केंद्र शासनाला जो अहवाल सादर केला जातो तोच अहवाल शालेय शिक्षण विभागाला देखील सादर केला जाईल. प्रधान महालेखापाल यांना दरवर्षी जो अहवाल सादर करण्यात येतो तो देखील विभागाकडून शालेय शिक्षण विभागास सादर करण्यात येईल असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी सांगितले.

११७५ पैकी किती पथकांचे काम सुरू आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सर्व पथके कार्यरत आहेत. २ वैद्यकीय अधिकारी, १ फार्मासिस्ट व १ एएनएम अशी ४ पदे असतात. काही पथकामध्ये दोन पैकी एक वैद्यकीय अधिकारी नाही. ११७५ पथकांची जिल्हानिहाय विगतवारी देखील उपलब्ध आहे असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले. टक्केवारीची माहिती द्यावी तसेच पथकांचे तपशील द्यावेत. वाहनांकरिता निधी कोठून मिळतो? अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र शासनाने मर्यादा ठरवून दिलेली आहे. साधारणपणे २३ हजार रुपये महिना निधी दिला जातो. या मर्यादेपर्यंत टेंडर काढले जाते. यंदा सेंट्रल टेंडर डॉक्युमेंट काढण्याची संकल्पना आहे. प्रत्येक पथकाकडे वाहन आहे. त्यांनी स्वत:ची गाडी वापरली किंवा सार्वजनिक वाहतूक यंत्रणेचा वापर केला किंवा भाड्याच्या गाडीने प्रवास केल्यास त्याची प्रतिपूर्ती केली जाते असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

सन २०१३ पासून ही योजना आली. सन २०१४ ते १७ मधील आकडेवारी विभागाने सांगितली. ही योजना सुरू होण्यापूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे काही यंत्रणा नव्हती काय? अशी विचारणा समितीने केली असता, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम सन २०१३ पासून सुरू झाला. पूर्वी ही जबाबदारी पीएचसीमधील एमओ यांची होती. तेव्हा देखील मुलांची तपासणी केली जात होती. मात्र यासाठी वेगळी टीम व प्रोग्राम या कार्यक्रमानंतर सुरू करण्यात आली असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

मध्यान्ह आहार योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार परिच्छेद २.५ प्रमाणे दुसऱ्या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची नियमितपणे तपासणी करण्यात यावी असे महालेखापालांनी सूचित केले. मिड डे मिल योजनेच्या परिच्छेद क्र. २.५ अंतर्गत सर्व मुलांची तपासणी दरवर्षी नियमित झाली पाहिजे अशी तरतूद आहे. नवीन कार्यक्रम सन २०१३ पासून आला. ९८ ते ९९ टक्के सध्या आहे. शालेय शिक्षण विभागाला हे बंधनकारक आहे की, योजना सुरू झाली तेव्हा पासून त्यांनी सार्वजनिक आरोग्य केंद्राकडून किंवा आरोग्य विभागाकडून मुलांची तपासणी करणे आवश्यक होते. या योजनेमध्ये अनेक शाळांची तपासणी झाली नाही, असे दिसून आल्यामुळे महालेखापालांनी हा आक्षेप काढला आहे असे मत समितीने व्यक्त केले तसेच हेल्थ कार्ड ठेवले जाते काय, जेथे तपासणी केली तेथे कोणतीही नोंदणी केल्याचे आढळून आले नाही असे महलेखापालांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, सन २०१३ पासूनन योजना सुरू केली असून त्याचे स्ट्रक्चरल कार्ड आहे. अंगणवाडीतील मुलांसाठी वेगळे कार्ड आहे. डोळ्यापासून टाचेपर्यंत तपासणी केली जाते. उंची, वजन, बीएमआय कॅल्क्युलेट केले जाते. सर्व पॅरामिटर्स बघितले जातात व ३४ गोष्टींचे निदान केले जाते. काही लहान आजार असल्यास तेथे पथकाकडून उपचार दिले जातात किंवा रेफर केले जाते. ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा व जिल्हा रुग्णालये आहेत. अनेक ठिकाणी स्पेशलाईज्ड हॉस्पिटल्स आहेत. पेडियाट्रीक सर्जन जिल्हा रुग्णालयात बोलावून सर्जरी केली जाते. ऑर्थ्रॅल्मिक सर्जरी, हार्ट सर्जरी केली जाते. मोठ्या रुग्णालयांशी टाय अप केले आहे. हा प्रोग्राम स्टक्चर्ड आहे.एका डॉक्टरला केवळ ५ हजार रुपये एका दिवसाला देण्यात येतात. ते डॉक्टर रुग्णालयात येऊन मुलांवर शस्त्रक्रिया करतात. इंडियन असोसिएशन ऑफ

पेडियाट्रीक सर्जन अंतर्गत त्यांची नोंदणी झालेली आहे. बेस्ट प्रॅक्टीस अवॉर्ड मिळालेला आहे. इतर राज्यांनी देखील अशी योजना राबवावी असे केंद्र शासनाने सांगितले आहे असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक : २.३.४.५ दुय्यम दर्जाची स्टेनलेस स्टिलची खणाची ताटे खरेदी करणे**

१.८ सदर मुद्दाबाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले असता, हा मुद्दा दुय्यम दर्जाची स्टेनलेस स्टीलची ताटे खरेदी करण्याबाबतचा आहे. शालेय पोषण आहाराबरोबरच ताट खरेदीसाठी १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेद्वारे पैसे देण्यात आले होते. ५ हजार रुपये प्रति शाळा याप्रमाणे हा निधी देण्यात आला होता. २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ अशा ३ वर्षांसाठी ही योजना सुरू होती. यामधील खरेदी केंद्र सरकारच्या निकषांप्रमाणेच होत होती. परंतु या योजनेमध्ये देण्यात येणारा निधी मोठ्या शाळांसाठी अपुरा पडत होता. पहिल्या वर्षी एका शाळेला, दुसऱ्या वर्षी दुसऱ्या शाळेला व तिसऱ्या वर्षी तिसऱ्या शाळेला याप्रमाणे पाच वर्षांपर्यंत वेगवेगळ्या शाळांना निधीचे वितरण केले जात होते व ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुन्हा पहिल्या वर्षी निधी मिळालेल्या शाळांना पैसे मिळत होते. ज्यावेळी ५ वर्षांनंतर पहिल्या शाळेला पुन्हा पैसे मिळायचे व हे पैसे ताट खरेदीसाठी पुरत नसल्यामुळे अगोदर खरेदी केलेली जुनी ताटे देखील वापरात ठेवली जात होती. तसेच नवीन ताटांची खरेदी करून तेदेखील वापरले जात होते. याचा अर्थ काही जुनी ताटे व काही नवीन ताटे अशा प्रकारे वर्षानुवर्षे ताटांचा वापर सुरू होता असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

यामध्ये महालेखापालांचा आक्षेप असा आहे की, स्पेसिफिकेशनप्रमाणे ताटांचे वजन नव्हते, जाडी नव्हती तसेच त्यांची तपासणी करण्यात आली नाही.प्रत्येक शाळेला ताटे खरेदी करण्यासाठी ५ हजार रुपये निधी दिला जात होता. ही ताटे खरेदी करण्याचा करार करण्याचे काम शाळांवर सोपविण्यात आले होते की जिल्हा किंवा राज्य स्तरावरुन याचे टेंडर काढण्यात आले होते? यामध्ये ४ कंत्राटदारांना १२ खरेदी आदेश दिले आहेत. याचा अर्थ आपण जे सांगितले की, प्रत्येक शाळेला ५ हजार रुपये दिले ती वस्तुस्थिती नाही. महालेखाकारांचा आक्षेप आहे की, ठरलेल्या मानकांनुसार सर्व बाबी नाहीत असे समितीने निदर्शनास आणून दिले.या प्रकरणात डी.जी.एस. ॲण्ड डी. मधून खरेदी करण्यात आलेली आहे असे प्रधान महालेखाकार यांनी समितीस अवगत केले.

याची खरेदी केंद्रीकृत पद्धतीनेच करण्यात आली आहे. सन २०१२-१३ पासून हा निधी येण्यास सुरुवात झाली होती. केंद्र शासन व डी.जी.एस. ॲण्ड डी. मध्ये झालेल्या दर कराराची ज्यावेळी तपासणी केली त्यामध्ये केवळ ताटांचा आकार किती असावा त्याबाबतचा उल्लेख होता. ताटाचे वजन किंवा जाडी याबाबत पहिल्या दोन वर्षांच्या करारामध्ये उल्लेख नव्हता. त्यामुळे झालेल्या करारानुसारच खरेदी करण्यात आलेली आहे. कदाचित या सर्व बाबी केंद्र सरकारच्या लक्षात आल्या असतील व त्यामुळे तिसऱ्या वर्षापासून म्हणजे सन २०१४-१५ पासून करारामध्ये वजनाचा निकष समावेशित करण्यात आला असे विभागास सचिवांनी सांगितले.

विभागाने सांगितले की, पहिल्या दोन वर्षी करण्यात आलेल्या करारांमध्ये ताटाचे वजन किंवा जाडीबाबतची गाईडलाईन नव्हती. याबाबत प्रधान महालेखाकार यांचे काय म्हणणे आहे? असे समितीने विचारले असता, Our para is based on the terms and conditions of the purchase order which you have placed on the supplier for providing these trays. It was mentioned in the terms and conditions of the purchase order that minimum thickness of the steel sheet should be 0.7 mm and that of the tray should be of 0.5 mm. You did testing with a Superitendence Company of India Pvt. Ltd. सॅम्पल टेस्टिंग रिपोर्टमध्ये त्यांनी वजनाचा कुठेही उल्लेख केलेला नाही. केवळ डायमिटर व हाईटचा उल्लेख केलेला आहे. काही सॅम्पलिंग शासकीय प्रशिक्षण संस्था, आय.टी.आय., मुंबई येथे करण्यात आले. तेथे दिसून आले की, 0.30 mm only as against 0.55 mm which was required. त्यानंतर आपण उत्तर दिले की, शासनाच्या म्हणजे रेल्वे विभागाच्या राईटस् या कंपनीकडे आम्ही सेकण्ड इन्स्पेक्शनसाठी पाठविले. Even if you give the tolerance limit of 0.10 mm, then also these should have met 0.55 mm. राईटस् ने तपासलेल्या सॅम्पल्समधील ६ पैकी ५ सॅम्पल्समध्येही त्रुटी आढळून आल्या. This para is based on the terms and conditions of the purchase order which you placed on the DGSD for supply of these trays. फेब्रुवारी आणि ऑगस्ट, २०१३ मधील हे आदेश आहेत. The State Nodal Agency placed 12 purchase orders between February and August 2013 असे प्रधान महालेखाकार यांनी समितीस अवगत केले.

पर्चेस ऑर्डर करताना विभागाने अटी व शर्तींमध्ये नमूद केलेल्या स्पेसिफिकेशन्सप्रमाणे पुरवठा झाला नाही, असे प्रधान महालेखाकार यांचे स्पष्ट म्हणणे आहे. त्यानंतर आय.टी.आय. मध्ये तपासणी करण्यात आली तेथे देखील त्रुटी आढळल्या. नंतर विभागाने दुसऱ्या एजन्सीकडे पाठविले तेथे देखील ६ पैकी ५ सॅम्पल्स फेल झाले. याचा अर्थ दुय्यम दर्जाचा पुरवठा झाला होता हे सिद्ध होत आहे. या सर्व गोष्टी होऊन

राईटस् चा अहवाल आल्यानंतर विभागाने त्याबाबत काय कारवाई केली ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागाकडून सन २००७ पासून ताटांचा पुरवठा करण्यात येत होता. तपासणीवेळी घेतलेल्या ताटांमध्ये काही ताटे सन २००७ ची असतील, काही ताटे २००८ ची असतील किंवा काही सन २०१२-१३ मध्ये घेतलेली असू शकतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेदामध्ये जुन्या ताटांबद्दल काहीही म्हटलेले नाही असे प्रधान महालेखाकार यांनी सांगितले. सन २०१२-१३ मध्ये पुरवठा केलेल्या ताटांचेच नुमने तपासणीसाठी घेतलेले आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता, हे नमुने शाळांमध्ये जाऊन घेण्यात आले. त्यामध्ये काही जुने व काही नवीन ताटे असण्याची शक्यता आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. आपण देखील सॅम्पलिंग केलेले आहे. We have also got it done from Government Agency and not from any Private Agency. सन २०१५ मध्ये विभागाने हे नमुने सॅम्पलिंगसाठी राईटस् या कंपनीकडे पाठविलेले आहे. यामध्ये जुन्या स्टॉकचा विषयच नाही. सन २०१३ मध्ये केंद्रीकृत आदेशान्वये करण्यात आलेल्या खरेदीबाबतचा हा विषय आहे असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

विभागाने सांगितले की, सन २००७ साली खरेदी करण्यात आलेली ताटे त्यामध्ये असण्याची शक्यता आहे. मग सन २००७ पासूनची ताटे एवढया सुस्थितीत असतील व एवढे दिवस टिकत असतील तर नवीन ताटांची ऑर्डर करण्याची आवश्यकताच नव्हती.सहा महिने किंवा वर्षभरापूर्वीचे ताट असेल तर ते समजू शकतो. दुसरी गोष्ट म्हणजे स्टेनलेस स्टीलमध्ये अनेक ग्रेड आहेत. या ग्रेडपैकी फुड क्वालिटीसाठी वापरण्यात येणारे स्टेनलेस स्टील या ताटांसाठी वापरण्यात आले आहे किंवा कसे हे अगोदर पाहा. केवळ स्टेनलेस स्टील असून उपयोग नाही तर फूड ग्रेडेड स्टेनलेस स्टीलचा वापर करणे आवश्यक आहे. इतर ग्रेडचे स्टेनलेस स्टील आरोग्यास अपायकारक असते. त्याची तपासणी करण्यात आली होती का ? थिकनेसचा मुद्दा जरी टॉलरेन्सचा असला तरीही तो सरसकटच स्विकारार्ह नसतो. सरतेशेवटी वजनानुसारच पेमेंट करावे लागते. टॉलरेन्स अलाउ केला तर सर्वच मिनिमम स्टँडर्डचे घेऊन कमी वजनाच्या वस्तू पुरवतील असे समितीने मत व्यक्त केले असता, यामध्ये प्रयोगशाळेमधून तपासणी करून घेण्याची पद्धत होती.ऑर्डर दिल्यानंतर पुरवठा स्विकारण्यापुर्वी प्रयोगशाळेमध्ये नमुना पाठवून ऑर्डरप्रमाणे आहे किंवा कसे हे तपासून घेणे आवश्यक होते व त्यावेळी अशा पद्धतीने कार्यवाही करण्यात आलेली आहे. प्रयोगशाळेने दिलेल्या अहवालामध्ये ऑर्डरप्रमाणे सॅम्पल्स असल्याचे सांगण्यात आलेले आहे. त्यानुसारच पुरवठ्याचा ताबा घेऊन वाटप करण्यात आले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रयोगशाळेमध्ये ताटांचे नमुने पाठविण्यात आले परंतु, तेथे ते थिकनेसमध्ये फेल झाले असे महालेखापाल सांगत आहेत.विभागाने आपल्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, वर नमूद केल्याप्रमाणे ताटांचा नियमित वापर होत असल्याने ताटांची झीज होऊन जाडी काही प्रमाणात कमी झालेली आहे, याबाबत सांगावे असे समितीने निदेश दिले असता, कदाचित जुनी ताटे या सॅम्पलमध्ये आली असतील तर शक्यता आहे. या सर्व ताटांची विभागाला तपासणी करावी लागेल. वापरलेल्या ताटांचे वजन किती असते याची विभागाला वेगळी तपासणी करून घ्यावी लागेल. यासंदर्भात विभागाकडे राईट्सने दिलेला अहवाल आहे.आता मात्र विभागाने ही खरेदीच बंद केलेली आहे. आता विभाग सेंट्रलाईज किंवा डिसेंट्रलाईज खरेदी करीत नाही. ताटांची खरेदी काही वर्षांपासून बंद आहे. भविष्यामध्ये जर ताटे खरेदी करण्याची वेळ आली तर, समितीने दिलेल्या सूचनेप्रमाणे फक्त डिसेंट्रलाईज पर्चेसिंग करण्यात येईल. स्कूल मॅनेजमेंट कमिटीच्या हातात ५००० रुपये देऊन त्यांनी ही ताटे खरेदी करावीत याची विभागाकडून खात्री करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सगितले.

**परिच्छेद क्रमांक २.३.४.६. सूक्ष्मपोषणद्रव्यांची अविवेकी खरेदी**

१.९ या परिच्छेदामध्ये असा विषय आहे की, ज्या कॅप्सूल खरेदी केल्या त्याबाबत संचालक, आरोग्यसेवा, मुंबई यांनी एस.एन.ए. ला असे कळविले की, खरेदी करण्यात येत असलेल्या आय.एफ.ए. कॅप्सूल ११ वर्षे वयाखालील मुलांसाठी योग्य नव्हत्या. ज्यांच्यासाठी विभागाने त्या कॅप्सूल घेतल्या होत्या त्यांच्यासाठी त्या योग्य नव्हत्या असे संचालक, आरोग्य सेवा यांचे म्हणणे आहे, याबाबत विभागाने माहिती द्यावी अशी सूचना समितीने केली असता या कॅप्सूलमध्ये आयर्न किती मिलीग्रॅम असावे यामध्ये थोडे टेक्नीकल इशु आहेत. किती वयोगटातील मुलांना किती मिलीग्रॅम आयर्न द्यावे याबाबत केंद्र शासनाच्या ज्या गाईडलाईन्स आहेत त्यामध्ये भरपूर बदल होत गेलेले आहेत. आजही याबाबत स्पष्ट गाईडलाईन नाही आणि त्यावेळीही ती नव्हती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

संचालक, आरोग्य सेवा यांच्या मतानुसार या कॅप्सूल्स ११ वर्षाखालील मुलांना देण्यायोग्य नाहीत. आरोग्य विभागाचे संचालक सर्वोच्च अधिकारी आहेत. त्यांचे जर असे मत असेल तर राज्यातील कोणतीही व्यक्ती याचे समर्थन कसे करू शकते ? असे मत समितीने व्यक्त केले असता, संचालक आरोग्य सेवा, यांनी विभागाला सल्ला दिला की, या कॅप्सूल लहान वयोगटातील मुलांना म्हणजे १० वर्षांच्या खालील मुलांना देण्यात येऊ नयेत. त्या मोठ्या मुलांना देण्यात यावी. त्याप्रमाणे करण्यात आले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने त्या कॅप्सूल्स कोणासाठी घेतल्या होत्या ? अशी समितीने विचारणा केली असता, त्यावेळेस ४८ एम.जी. च्या गोळ्या घेण्यात आल्या. या गोळ्या ६ ते १० वयोगटासाठी उपयुक्त आहेत आणि ते आजही हे घेत आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

खरेदी झाली पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आणि गोळ्या फक्त सहावी ते आठवीतील विद्यार्थ्यांसाठीच योग्य असल्याचा निष्कर्ष आला. याचा अर्थ पहिली ते पाचवीतील विद्यार्थ्यांसाठी त्या अयोग्य होत्या.ज्यांच्यासाठी त्या गोळ्या घेण्यात आल्या त्यांच्या त्या उपयोगी पडल्या नाहीत त्यामुळे तो खर्च निष्फळ ठरला असा महालेखापालांचा आक्षेप आहे. ज्या विद्यार्थ्यांसाठी या गोळ्या विकत घेतल्या होत्या, त्यांना त्या देऊ शकलो नाही कारण डी.एच.एस. यांनी शालेय शिक्षण विभागाला असा सल्ला दिला की, या गोळ्या त्या मुलांना देण्यायोग्य नाहीत. ज्या प्रयोजनासाठी आपण या गोळ्या विकत घेतल्या होत्या, त्याच्यासाठी त्या वापरण्यात आल्या नाहीत, त्यामुळे तो खर्च निष्फळ ठरला असे जे ए.जीं.चे म्हणणे आहे, त्यामध्ये गैर काय आहे ? दुसरा आक्षेप असा आहे की, ही खरेदी करताना डी.एच.एस. चा कोणताही तांत्रिक सल्ला घेतला नव्हता यासंदर्भात खुलासा करावा असे समितीने निदेश दिले असता, संचालक आरोग्य सेवा यांचा सल्ला घेतला होता. यामध्ये डिटेल पत्रव्यवहार झालेला आहे. शालेय शिक्षण विभागाचे व आरोग्य विभागाचे संचालक यांच्यामध्ये ४-५ वेळा पत्रव्यवहार झालेला आहे. आता येथे आरोग्य विभागाचे कोणी नाहीत त्यामुळे त्यांच्यावर दोष लावणे योग्य नाही. परंतु, मी जो काही अभ्यास केला आहे, त्यावरुन त्यांच्या सल्ल्यामध्ये भरपूर कॉंट्रॅडिक्शन्स आहेत. त्यावेळेच्या केंद्र शासनाच्या गाईडलाईन्स मी पाहिल्या आहेत. ते एक सांगत आहेत, डायरेक्टर दुसरे सांगत आहेत आणि आजच्या घडीला जे सचिव आहेत ते केंद्राच्या ज्या नवीन गाईडलाईन्स आलेल्या आहेत त्यानुसार तिसरे सांगत आहेत. डोसेज किती असावा याबाबत सांगावयाचे झाले तर, त्यावेळेस ४८ एम.जी. चा डोसेज होता. ते असे म्हणत आहेत की, आज तेच डोसेज ते वापरत आहेत. मी स्वतः सचिव महोदयांना असे विचारले की, कोणत्या वयोगटासाठी किती एम.जी.चा डोसेज उपयुक्त आहे हे तुम्ही सांगू शकता का ? त्यावेळेस त्यांनी मला अशी माहिती दिली की, त्याला ५० एम.जी. म्हणतात किंवा ४५ एम.जी. सुद्धा म्हणतात म्हणजे थोडीशी रेंज असेल तर, ५० एम.जी. किंवा ४५ एम.जी. हा डोसेज सहा ते दहा वयोगटासाठी उपयुक्त आहे आणि आज ते स्वतः देत आहेत, असे त्यांनी मला सांगितले. माझ्याकडे त्यांचा मेसेजसुद्धा आहे. त्यामुळे असे दिसते की, काळानुसार गाईडलाईन्स चेंज होत राहिलेल्या आहेत, हा एक मुद्दा आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, त्यावेळेस विभागाच्या समोर दुसरेही १०० एम.जी. चे प्रॉडक्ट होते. हे जे प्रॉडक्ट घेण्यात आले ते ४८ एम.जी. चे होते. १०० एम.जी. चे प्रॉडक्ट होते त्या बाबत आरोग्य विभागाची शिफारस होती. विभागाने चेक केल्यावर असे आढळले की, त्याची किंमत खूप जास्त होती. मी तुलना केली असता त्याचे दर हे प्रती कॅप्सूल १ रुपया २१ पैसे होते. आपण जी खरेदी केली ती ६७ पैसे प्रती कॅप्सूल या दराने केली. मी ती नोटिंग पाहिली आहे. त्यावेळेस हे दोन्ही पर्याय कन्सीडर करण्यात आले व हा पर्याय स्वस्त असल्याने तो घेण्याचा निर्णय घेण्यात आला असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

गर्व्हनमेंट ऑफ इंडियाच्या ज्या गाईडलाईन्स आहेत त्यानुसार १०० एम.जी. मूलतत्त्व लोह असे असले पाहिजे. आपण ४८.५ एम.जी. चे दिले. आपल्याला ताप आलेला असताना डॉक्टरांनी आपल्याला ५०० एम.जी. ची गोळी घेण्यास सांगितले मात्र आपण २५० एम.जी. ची गोळी घेतली तर त्याचा काहीच उपयोग होत नाही, तसा हा प्रकार आहे. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाची गाईडलाईन असे म्हणत असेल की, १०० एम.जी. च्यावर पाहिजे आणि आपण ४८.५ एम.जी. च्या गोळ्या देत आहात तर विभागाने दिलेल्या या गोळ्यांचा उपयोग काय झाला ? गर्व्हनमेंट ऑफ इंडियाच्या गाईडलाईनच्या पलीकडे जाऊन विभाग गोळ्यांचा पुरवठा करीत आहे. हे व्हायोलेशन ऑफ सिस्टिम आहे असे समितीने मत व्यक्त केले असता, त्यावेळेच्या केंद्राच्या ज्या गाईडलाईन्स आहेत, त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, ६ ते १० वयोगटातील मुलांना तुम्ही ३० एम.जी. च्या गोळ्या द्या. तेथे ३० एम.जी.चा उल्लेख आहे. त्यामुळेच मी असे म्हणत आहे की, निकष चेंज होत राहिले आहेत. आजच्या घडीला सचिव महोदय ४५ एम.जी. आहे असे म्हणत आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एप्रिल, २००७ च्या केंद्र शासनाच्या गाईडलाईन्सनुसार हेल्थ डायरेक्टरने असे सांगितले की, त्या कॅप्सूल ११ वर्षांवरील विद्यार्थ्यांना देण्यात यावे. केंद्र शासनाची गाईडलाईन १०० एम.जी. ची आहे. त्यांनी सांगितले म्हणून १० वर्षाच्या मुलांना नाही द्यायच्या, ११ वर्षांवरील मुलांना गोळ्या द्यायच्या. परंतु, त्यातून निष्पन्न काय होते, विभागाने ज्यासाठी हा खर्च केला, त्याचा फायदा काय झाला ? फक्त विभागाकडे गोळ्या आहेत म्हणून देऊन टाकायच्या कारण विभागाने त्या विकत घेतल्या. केंद्र शासनाचे पैसे विभागाकडे आले ते खर्च करणे हे विभागाचे कामच आहे, असे समितीने व्यक्त केले.

केंद्र शासनाच्या गाईडलाईन्सचा मी आता डिटेलमध्ये अभ्यास करीत होते. त्या सुद्धा अर्धवट आहेत. त्यांनी त्या गाईडलाईन्समध्ये असे नमूद केले आहे की, ६ ते १० वयोगटासाठी ३० एम.जी. आणि ११ ते १८ वयोगटासाठी ॲडल्टप्रमाणे डोस आहे. त्यामध्ये त्यांनी १०० एम.जी. चा उल्लेख केलेला नाही. परंतु, आपण दुसऱ्या पत्रव्यवहारातून या निष्कर्षावर पोहोचतो की, तो १०० एम.जी. असावा. परंतु, आता वेगळे आहे. हे थोडेसे कॉंट्रॅडिक्टरी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

६ ते १० वयोगटातील मुलांना विभागाने काय प्रोव्हाईड केले ते समजत नाही. विभागाने त्यांच्यासाठी ज्या गोळ्या खरेदी केल्या त्या ॲडल्ट मुलांना दिल्या. ते १०० एम.जी.च्या नॉर्म्सपेक्षा कमी होते, याबाबत सांगावे, असे प्रधान महालेखाकार यांनी सूचित केले असता, डायरेक्टर यांच्या सल्ल्यानुसार त्या ११ ते १४ वयोगटातील मुलांना देण्यात आल्या, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना काय देण्यात आले ? ज्या वयाच्या विद्यार्थ्यांसाठी ही गोळ्यांची योजना आहे. त्यांना त्या दिल्या नाहीत. कारण त्या त्यांच्यासाठी योग्य नव्हत्या. ज्यांना ३० एम.जी. च्या खाली दिल्या पाहिजेत त्यांच्यासाठी आपण ४६ एम.जी. च्या घेतल्या आणि ज्यांना १०० एम.जी. च्या दिल्या पाहिजेत त्यांना ४६ एम.जी.च्या गोळ्या देत आहात, असे समितीने निदर्शनास आणले. ६ ते १० वयोगटातील मुलांना आपण काहीच दिले नाही काय ? असा प्रश्न प्रधान महालेखाकार यांनी उपस्थित केला असता, ६ ते १० वयोगटातील मुलांना आय.एफ.एफ. सिरप देण्यात आलेले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. विभागाने त्याची परत वेगळी खरेदी केली काय ? ती खरेदी कोणत्या हेड अंतर्गत केली, केंद्र शासनाने त्याकरिता विभागाला पैसे दिले की, राज्य सरकारने खरेदी केली ? असा प्रश्न समितीने केला असता, हेल्थ स्कीम मधून मुलांना ती प्रोव्हाईड करीत असतील त्यातून दिले असावे, असे प्रधान महालेखाकार यांनी सांगितले.

ज्या हेतूने केंद्र सरकारने ही योजना काढली व ज्यांच्यासाठी काढली त्यांना याचा फायदा झाला नाही. महालेखापालांनी स्पेसिफिकेशन प्रमाणे ते झाले की नाही ते पाहिले. या सर्व गोष्टींमध्ये असे निदर्शनास येत आहे की, ज्या ६ ते १० वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना होती, त्यांना याचा फायदा झाला नाही. त्यांना ३० एम.जी. च्या गोळ्या दिल्या पाहिजे होत्या. मात्र आपण जास्त एम.जी.च्या गोळ्या घेतल्या. मग त्या ११ ते १३ वयोगटातील मुलांना देऊन टाका ठेवून काय करायचे, अशाप्रकारचा सर्व प्रयोग झालेला आहे. शासनाला ज्या मुलांकरिता खर्च करावयाचा होता, त्यांना त्याचा उपयोग झाला नाही, असे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. या गोळ्या विकत घेण्याचे आदेश ज्या अधिकाऱ्यांनी काढले, त्यांनी औषधे खरेदी करीत असताना त्या गाईडलाईन्सच्या स्पेसिफिकेशन्स का दिल्या नाहीत, त्या स्पेसिफिकेशन्सनुसार त्यांनी खरेदी का केली नाही ? जर त्या स्पेसिफिकेशन्सनुसार खरेदी केली नसेल आणि त्यांचा अशाप्रकारे दुरुपयोग किंवा प्रॉपर उपयोग झाला नसेल तर त्यांना आपण जबाबदार धरणार आहात काय ? अशी समितीने विचारणा केली असता, हा जो हे प्रॉडक्ट खरेदी करण्याचा निर्णय झाला, तो आर.सी. प्रमाणेच होता. त्याच्याकडे केंद्र शासनाची ई.एस.आय.सी.ची आर.सी. होती. त्या माणसाकडे केंद्र शासनाचा दर करार होता, त्याच्याकडूनच विभागाने खरेदी केली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने असे सांगितले की, ई.एस.आय.सी. च्या दर कराराप्रमाणे खरेदी केली. महालेखापालांनी यामध्ये असेही ऑब्जेक्शन काढले आहे की, डी.एच.एस. ने ई.एस.आय.सी. च्या दर कराराप्रमाणे खरेदी करण्याच्या आदेशासाठी कुठलाही हिरवा कंदिल दाखविलेला नव्हता. खरेदी आदेशाच्या पश्चात केवळ त्यांचे तांत्रिक मत मांडले होते, असे समितीने मत व्यक्त केले असता, दोन्ही विभागांमध्ये मार्च, २०१० पासून हा पत्रव्यवहार सुरू होता. ही ऑर्डर जेव्हा काढण्यात आली तेव्हा ३१ मार्च, २०१० रोजी खरेदीचा जी.आर. काढण्यात आला. त्या ऑर्डरमध्ये असे नमूद करण्यात आले होते की, शालेय शिक्षण विभागाने आरोग्य विभागाच्या सल्ल्याप्रमाणे याच्या पुढची कारवाई करावी. त्याप्रमाणे पुन्हा पत्रव्यवहार सुरू राहिला. शेवटी त्यांच्या सल्ल्याप्रमाणे या गोळ्या त्या वयोगटांना देण्यात आल्या, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या वयोगटासाठीही त्या परिपूर्ण नव्हत्या. विभागाने खालच्या वयोगटासाठी काय केले, यावर विभागाने सिरप घेतले असे सांगितले आहे. ते सिरप कोणत्या स्कीम मधून खरेदी केले ? या योजनेत त्याकरिता ॲडिशनल पैसे कसे मिळाले ? विभागाने पहिल्यांदा ज्या कॅप्सूल घेतल्या, त्यांचा उपयोग त्या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी झाला नाही. विभागाने त्या सिनिअर विद्यार्थ्यांना दिल्या. त्यानंतर तेथेच न थांबता परत ऑर्डर दिली. त्याला पुढच्या वर्षी परत ऑर्डर दिली, याबाबत सांगावे, अशी समितीने सूचना केली असता, संचालक आरोग्य सेवा यांचा सल्ला आजच्या गाईडलाईन्सच्या विरुद्ध आहे. हे प्रॉडक्ट ६ ते १० वयोगटासाठी उपयुक्त होते. आता ते येथे नसल्याने बोलणे ठिक वाटत नाही. परंतु, त्यांनी तसा सल्ला कसा काय दिला हे समजत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पहिले ते पाचवीतील विद्यार्थ्यांना उपयुक्त नाही म्हणून त्या वरच्या वयोगटातील मुलांना दिल्या तरी चालतील. कोणीही असाच सल्ला देईल. वाया जाण्यापेक्षा त्या वरच्या वयोगटातील विद्यार्थ्यांना द्याव्यात. शासनाने खरेदी करून त्याला पैसे देऊन टाकले आहेत तर तो काय करणार, त्यापेक्षा वरच्या वयोगटातील मुलांना त्या देऊन टाकाव्यात, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्या सप्लायरला जी डायरेक्टर लेव्हल वरुन सप्लाय किंवा वर्क ऑर्डर देण्यात आली ती हा सल्ला मिळाल्यानंतर देण्यात आली. दिनांक ४ ऑगस्ट, २०१० रोजी त्यांना हा सल्ला डायरेक्टर ऑफ हेल्थकडून मिळाला होता, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उक्त मुद्यासंदर्भात दिनांक ३१ जुलै, २०१८ रोजी पुनःश्च विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. यामध्ये खरेदी करण्यात आलेले कॅप्सुल्स ४८ एमजीची आहे. ११ वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील मुलांना १०० एमजी आणि त्यापेक्षा कमी वयोगटातील मुलांना ३० एमजी कॅप्सुलची आवश्यकता

आहे. परंतु कॅप्सुल्स रेंडमली घेण्यात आली व त्याबद्दल महालेखाकार यांनी आक्षेप घेतलेले आहेत. ११ पेक्षा जास्त वयोगटातील मुलांना १०० एमजी ऐवजी ४८ एमजीची कॅप्सुल दिली तर ती चालू शकते, असे गृहीत धरण्यात आलेले आहे. याबद्दल आरोग्य विभागाची काय भूमिका आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, २०१३ मध्ये केंद्र शासनाचा नॅशनल प्रोग्राम फॉर आयर्न प्लस एनिसिएटीक हा प्रोग्राम आला. २०१३ मध्ये केंद्र शासनाचे धोरण काही प्रमाणात बदलले. तत्पुर्वी केंद्र शासनाचे आयर्न फॉलिक ॲसीड बद्दलचे धोरण वेगळे होते. यामध्ये झालेला बदल मी सांगू इच्छितो. २०१३ पूर्वी ० ते ५ वर्षापर्यंतच्या वयोगटाकरिता मुलांकरिता २० मीलीग्रॅम एलीमेंटल आयर्न आणि १०० मायक्रो ग्रॅम फॉलिक ॲसीड पर एम.एल. असे प्रमाण होते. हे सिरप म्हणून द्यायचे होते. २०१३ च्या पॉलिसीमध्ये वयोमर्यादा ६ महिन्यापासून ७ वर्षे केली व कॉन्टीटी तेवढीच ठेवण्यात आली. ६ ते १० वर्षांची दुसरी कॅटेगिरी होती. यामध्ये २०१३ पूर्वी ३० मीलीग्रॅम आयर्न आणि २५० मायक्रोग्रॅम फॉलिक ॲसीड १०० दिवस एका वर्षात द्यायचे होते, अशी भारत सरकारची पॉलिसी होती. २०१३ नंतर ५ ते १० वयोगटासाठी ४५ मीलीग्रॅम आयर्न इतकी तरतूद होती. जानेवारी २०१३ मध्ये केंद्र शासनाने नवीन कार्यक्रम आणला होता व त्याला नॅशनल आयर्न प्लस इनिशिएटिव्ह असे नाव दिले होते. त्या प्रोग्राममध्ये अशा प्रकारे बदल करण्यात आला होता, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३० एम.जी. हे प्रमाण केव्हा पासून होते ? अशी समितीने विचारणा केली असता, २००७ किंवा त्यापूर्वी ३० एम.जी. चे प्रमाण होते, After २०१३, it was 45mg iron and 400 micro gram folic acid. Then for 10 to 19 years there was no change in it. Before 2013 also it was 100mg iron and 500 micro gram folic acid weekly and subsequently also it was 100 mg iron and 500 micro gram folic acid, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सीव्हील सर्जन, उप संचालक, आरोग्य, अकोला. डीएचओ, जिल्हा परिषद. हे सर्व पथके सिव्हील सर्जन यांच्या कंट्रोलमध्ये आहेत. परंतु हे सर्व पथके ज्या ज्या प्राथमिक केंद्रामध्ये डॉक्टर नाहीत आणि ग्रामीण रूग्णालयात डॉक्टर नाहीत, तेथे पाठविले जाते. या पथकांकडून शालेय तपासणी केली जातच नाही. अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर मधील आरएच मध्ये ड्युटीवर आढळून आले असे सन्माननीय समिती सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार पथकातील सर्व डॉक्टरांना आरएच मध्ये ड्युटी दिलेली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, याकरिता अतिरिक्त स्टाफ नियुक्त केलेला नाही काय असा प्रश्न समितीने केला असता, अपवादात्मक परिस्थितीमध्ये ग्रामीण रूग्णालयामध्ये मेडीकल ऑफीसर नसेल तर काही ठिकाणी अपवादात्मक, परिस्थितीत ड्यूटी देण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

फॉलिक ॲसीड संदर्भात समितीचे असे म्हणणे आहे की, विभागाने घेतलेले फॉलिक ॲसीड आरोग्य विभागाच्या नॉर्म्स नुसार घेतले आहे काय ? तसेच आरोग्य विभागाच्या नॉर्म्स नुसार विद्यार्थ्यांना दिले आहे काय ? ही खरेदी २०१० मधील आहे. २०१३ मध्ये नॉर्म्स बदलले. According to norms of the year 2010, 30 mg capsule should be given to 6to 10 years old and from 10 years old onwards it should be given 100 mg. अशा प्रकारे ऑर्डर देण्यात आली. त्यावेळी या नियमांचा विचार करण्यात आलेला नाही. त्यांनी ६ ते १० पर्यंतच्या वयोमर्यादेचा व ११ पेक्षा अधिक वयोमर्यादेचाही विचार न करता ४८ एमजीचे फॉलिक ॲसिड दिले. त्यामुळे यासंदर्भातील नियमांची संपूर्णतः पायमल्ली करण्यात आली. डीएचएस ची मान्यता घेतली होती, असे विभागाचे म्हणणे आहे. यासंदर्भात आरोग्य विभागाचे काय म्हणणे आहे ? आरोग्य विभागाने जे केले, ते योग्य आहे काय ? तसेच ते मान्यता घेऊन केले काय ? असेल तर ते नॉर्म्स प्रमाणे आहे काय ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, त्यावेळी ४८ मिलीगॅम आयर्न कोणत्या वयोगटाकरिता प्रेस्क्रीप्शन नव्हते. विभागाने त्यांना १०० मिलीग्रॅम आयर्न आणि ०.५ (पॉईंट फाईव्ह) मायक्रोग्रॅम फॉलिक ॲसीड तांत्रिक मान्यता कम्युनिकेट केली होती. दररोज १ या प्रमाणे, वर्षातून १०० दिवस, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याचाच अर्थ त्यांनी नॉर्म्स प्रमाणे खरेदी केलेली नाही, असा प्रश्न समितीने केला असता, गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या गाईडलाईन प्रमाणे ४८ मीलीग्रॅमची कॅप्सुल नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शिक्षण विभागाला असा प्रश्न आहे की, गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या गाईडलाईन्स असताना, नॉर्म्स असताना व गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने निधी दिला असताना त्या गाईड लाईन्स प्रमाणे व नॉर्म्स प्रमाणे खरेदी का करण्यात आली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, हा निर्णय मार्च महिन्यामध्ये घेण्यात आला होता. त्याचे प्रोडक्ट योग्य नसेल तर त्याला आरसी का मिळाली, परंतु त्याच्याकडे आरसी होती. तसेच त्याचा दर देखील कमी होता. १०० एमजी ची कॅप्सूल किंवा गोळी खरेदी केली असती तर एका गोळी ची किंमत १ रुपये २१ पैसे होती आणि यांच्याकडून खरेदी केलेली गोळी केवळ ६१ पैशाची होती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

औषधांचे प्रेस्क्रीप्शन आरोग्य विभागाच्या गाईड लाईन्स प्रमाणे दिले जाते. यामध्ये शालेय शिक्षण विभागाच्या गाईड लाईन्स उपयोगात येणार नाही. विभागाने कुठे देणे बंधनकारक आहे ? विभागाने दिले नसते तर पूर्ण पैसे वाटले असते, विभागाने असे सांगितले की, मार्च महिन्यामध्ये

आरसी देण्यात आली. आरसी मार्च महिन्यामध्ये देण्याचे काय कारण होते ? याचे कारण असे की, त्यांना ३१ मार्च पर्यंत पैसे संपवायचे होते. दुसरी बाब अशी की, प्रेस्क्राईब गाईड संदर्भात केंद्र सरकारने स्टॅण्डर्ड ठरवून दिलेले आहे. त्या स्टॅण्डर्ड पेक्षा कमी दरामध्ये मिळते म्हणून त्या गोळ्यांची खरेदी करण्यात आली आहे काय ? असे असेल तर त्या स्टॅण्डर्डची काही व्हॅल्यू नाही काय ? हे स्टॅण्डर्ड केंद्र सरकार ठरविते काय ? हे स्टॅण्डर्ड डब्ल्यू.एच.ओ. स्टॅण्डर्ड ठरविते. विभागाने सरळसरळ मान्य केले पाहिजे की, याकरिता रॅकेट तयार करून पैसे खर्च करण्याचा उद्योग करण्यात आला. पैसे कसे खर्च होतील, याचाच विचार केला व त्याचाच हा परिणाम आहे. त्यामुळे यासंदर्भात समितीने त्यांची साक्ष नोंदवून घ्यावी. तसेच त्या काळामध्ये जे अधिकारी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. मानांकनाप्रमाणे खरेदी केली असती तर १ गोळी १ रुपयांपेक्षा अधिक किंमतीला मिळाली असती, परंतु तीच गोळी यांच्याकडून केवळ ६१ पैशाला मिळाली, असे जस्टिफिकेशन देत असाल, तर ते कसे चालेल ? यापेक्षा ती दिली नसती तर अधिक चांगले झाले असते. विभागाने त्यांना ४८ एमजीच्या २ कॅप्सुल दिल्या काय ? विभागाने स्पष्ट सांगितलेले आहे की, ३० एमजी आणि १०० एमजी ची कॅप्सुल घेणे आवश्यक होते, as per the tender parameters. तसेच या कंपनीची आरसी आहे. सदरहू कॅप्सुल स्वस्त मिळत आहे किंवा सदरहू कॅप्सुल ४८ एमजीची असली तरी चालेल, असे म्हणणे मुळीच योग्य नाही. त्यामुळे प्रकरणास सर्व टॉप टू बॉटम पर्यंतच्या सर्व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एका महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, असे समितीने निदेश दिले.

**परिच्छेद क्रमांक २.३.४.७ : शिजवलेले अन्न चाखण्यात कमतरता/तूट**

१.११ या परिच्छेदासंदर्भात माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता, शालेय विद्यार्थ्यांना प्रती दिन आहार दिला जातो. दररोज आहाराची चव तपासली पाहिजे, अशा प्रकारच्या सूचना विभागाने वेळोवेळी दिलेल्या आहेत, त्यानुसार परिपत्रक निर्गमित केलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१८ टक्के शाळेतील शिक्षकांनी आहाराची चव तपासली नाही, असा महालेखाकार यांनी आक्षेप नोंदविलेला आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने यासंदर्भात पर्याय दिले आहेत. काही ठिकाणी शिक्षक, मुख्याध्यापक, स्वयंपाकी, व्यवस्थापन समितीमधील सदस्य आणि पालक असे ५ पर्याय दिले आहेत. यापैकी एकाने तरी शाळेतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहाराच्या चवीची तपासणी केली पाहिजे, असे हे पर्याय असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

तो शॉर्टफॉल होता. नांदेड जिल्ह्यात ६३ टक्के शॉर्टफॉल होता. सद्यःस्थितीत नांदेड जिल्ह्यात त्यानुसार सुधारणा केलेली आहे काय ? असे प्रधान महालेखकार यांनी विचारणा केली. उपरोक्त ५ पैकी कोणीही आहाराच्या चवीची तपासणी केलेली नाही, असे प्रधान महालेखाकारांचे म्हणणे आहे. नांदेड जिल्ह्यात ६३ टक्के शॉर्टफॉल होता. त्यामुळे संबंधित शिक्षणाधिकारी आणि गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून खुलासा मागविला होता काय ? अशी समितीने विचारणा केली असता, सदरहू विषय पुणे आणि यवतमाळ जिल्ह्याशी संबंधित आहे. नांदेड जिल्ह्याबाबत माहिती नव्हती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लेखापरिच्छेदात सुस्पष्ट माहिती दिलेली आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, आता त्यांना नोंदवह्या देण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक शाळांना सूचना दिलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले. नांदेड जिल्ह्यामध्ये ६३ टक्के लोकांनी आपली जबाबदारी नीटपणे पार पाडली नाही. त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चितच केली पाहिजे. गट शिक्षणाधिकाऱ्याची रेकॉर्ड तपासण्याची जबाबदारी नाही काय ? शिक्षणाधिकाऱ्यांना शिक्षकांच्या पदांना मान्यता देण्यापुरतेच मर्यादित काम आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, वेळोवेळी आढावा बैठका आयोजित करून सूचना दिल्या जातात, असे विभागीय सचिवांनी सांगितले. अशा प्रकारची अंमलबजावणी केली असती तर नांदेड जिल्ह्यामध्ये तसा प्रकारच घडला नसता. आढावा बैठक घेतली जाते त्यावेळी चांगले चित्र पहायला मिळते, असे मत समितीने व्यक्त केले असता, पुन्हा आढावा बैठक घेऊन नियमित आहाराच्या चवीची तपासणी करण्यासाठी सूचना देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नांदेड जिल्ह्यामध्ये ६३ टक्के लोकांनी आपली जबाबदारी नीटपणे पार पाडली नाही. त्याठिकाणच्या शिक्षणाधिकारी आणि गट शिक्षणाधिकाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे.जबाबदारी निश्चित झाल्यानंतर संबंधितांची इन्क्रीमेंट थांबविण्यासारखी कारवाई करण्याची गरज आहे. अशा प्रकारचा मेसेज बाहेर गेलाच पाहिजे आणि तशी कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाधिकारी आणि गट शिक्षणाधिकारी ज्या ठिकाणी ॲक्टीव्ह

आहेत, त्या ठिकाणी प्रश्न निर्माण होत नाही. ज्या ठिकाणी संबंधित अधिकारी ॲक्टीव्ह नसतात अशा ठिकाणी प्रश्न निर्माण होतो अशी समितीने सूचना केली असता, सदर बाब स्कुल मॅनेंजमेंट कमिटी लेव्हलची आहे. त्यांना जबाबदारी दिलेली आहे. तरी त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात येईल, तसेच समितीने दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही केली जाईल, असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

विभागाने संबंधितांवर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत अवगत करावा, अशी सूचना समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्र.२.३.४.८ : स्वयंपाकी निसहायक यांना प्रशिक्षण देण्यात व आरोग्य तपासणी करण्यात कमतरता/तूट**

१.१२ स्वयंपाकी आणि सहाय्यक यांना प्रशिक्षण देण्याबाबत व आरोग्य तपासणी करण्यास कमतरता व तूट असल्याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे ? विभागाने लेखी उत्तरात असे म्हटलेले आहे की, पद्धत तयार करण्याचे काम अंतिम टप्यात आहे, ते कधी पर्यंत पूर्ण होणार ? अशी समितीने विचारणा केली असता, विभाग एसओपी तयार करीत असून एका महिन्यामध्ये पूर्ण जाळी तयार केली जाणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

भारत सरकारचा प्रशिक्षण देण्यासंदर्भातील जीआर केव्हाचा आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, शासनाने यासंदर्भात वेळोवेळी सविस्तर गाईड लाईन्स इश्यु केलेल्या आहेत. जुलै २०१३ मध्ये देखील गाईड लाईन्स इश्यु करण्यात आल्या होत्या. तसेच सप्टेंबर २०१६ मध्ये देखील सविस्तर गाईड लाईन्स इश्यु करण्यात आलेल्या आहेत. परंतु त्याला एसओपी असे नाव दिले नव्हते. त्यामुळे गाईड लाईन्सच्या स्वरूपात सविस्तर इंन्स्ट्रक्शन इश्यु केलेले होते. स्वयंपाकीने कशा प्रकारचा आहार तयार करावा, कशा प्रकारची स्वच्छता ठेवावी इत्यादीबाबतच्या इन्स्ट्रक्शन त्यामध्ये होत्या. आता या इन्स्ट्रक्शनला एसओपीच्या स्वरूपात अपग्रेड करून नव्याने इश्यु करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ज्यावेळी गाईड लाईन्स इश्यु केल्या तेव्हा केंद्र सरकारने गाईड लाईन्समध्ये ज्या बाबी सांगितल्या होत्या. त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, असे महालेखाकार यांचे ऑब्जेक्शन आहे. निधी वाटप करीत असताना त्यावेळेसच्या केंद्र सरकारच्या जीआरमध्ये या बाबींचा उल्लेख होता. Who is responsible for this ? आता एसओपी मध्ये काय करणार आहात ? असे समितीने विचारणा केली असता, एसओपी देणे हा एक भाग आहे व ते करण्यात येईल. परंतु त्या सर्वांना प्रशिक्षण देखील देण्यात येणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकार यांनी असे ऑब्जेक्शन घेतले आहे की, त्यावेळी हे नव्हते. त्यावर विभागाचे काय म्हणणे आहे, ते स्पष्ट करण्यात यावे आणि त्याला कोण जबाबदार आहे ? असा समितीचा प्रश्न आहे, त्यावर त्याबद्दल आढावा घेतलेला आहे. विभागाकडे १ लाख ७४ हजार स्वयंपाकी आहेत. तसेच एकाच वेळी सर्वांना प्रशिक्षण दिले जाईल, एवढी विभागाकडे क्षमता नाही. सर्वांना टप्याटप्याने, डीसेंट्रलाईज पद्धतीने प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. स्वयंपाकी यांची संख्या जास्त असल्यामुळे याला थोडा वेळ लागणार आहे. स्वयंपाक करणाऱ्या बायांच्या काही सवयी असतात किंवा त्यांच्या काही प्रॅक्टीसेस असतात व त्यामध्ये बदल करण्याकरिता त्यांना मोठ्या कालावधीचे प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकाराकडून असे आक्षेप घेण्यात आले आहे की, ८१ शाळांमध्ये १० ते १५ स्वयंपाकी आणि सहाय्यक कोणत्याही वैद्यकीय तपासणीला सामोरे गेले नव्हते, असा प्रश्न समितीने केला असता, त्यांनी वर्षातून दोन वेळेस स्वतःची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी, असे विभागाकडून परिपत्रक जारी करण्यात आले होते. त्याची अंमलबजावणी होत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२०१० ते २०१५ मध्ये महालेखाकार यांनी आक्षेप काढलेले आहे व त्याबद्दल विभागाचे काय म्हणणे आहे, ते स्पष्ट करावे, असे समितीने निदेश दिले असता, त्यावेळी स्वयंपाकींची वैद्यकीय तपासणी झाली नव्हती, हे मान्य आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. त्यावेळी वैद्यकीय तपासणी करण्यास काय अडचण होती ? असा प्रश्न समितीने केला असता, त्यावेळी त्यांची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी, अशी अपेक्षा होती. परंतु विभागाकडे असलेल्या यंत्रणेकडे तेवढी क्षमता नव्हती. त्यामुळे त्यांनी स्वतः स्वतःची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी, असा त्यातून मार्ग काढण्यात आलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने समितीला सांगावे की प्रशिक्षण आणि वैद्यकीय तपासणी यासाठी काही विशेष खर्चाची तरतूद केली होती काय ? त्यात असे काही झाले काय की प्रशिक्षण नुसते दाखविले आणि त्याची देयके अदा केली. कारण त्यामध्ये जर असे अभिप्रेत असेल की हे प्रशिक्षण दिलेच पाहिजे किंवा ती वैद्यकीय तपासणी केलीच पाहिजे तर त्यासाठी खर्च कराव्या लागणाऱ्या निधीची तरतूद किंवा प्रोव्हीजन नक्कीच केलेली असेल तर ती कशी असेल ? हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. कारण जेव्हा ही योजना सुरू झाली तेव्हापासून एजीच्या आक्षेपांबद्दल विभागाकडे

कोणतेही उत्तर नाही. कारण प्रशिक्षण देण्याची किंवा आरोग्य तपासणी करण्याची अशी कोणतीही यंत्रणा संपूर्ण राज्यात कोठेही नाही. कारण हे काम बचत गटाच्या महिला करतात. त्यात वेगवेगळ्या महिला असू शकतील. कारण एकाच बचत गटाकडे ते काम दिले असेल असे नाही. दरवर्षी त्यामध्ये बदल होऊ शकतो, गावात आपण खेडेगावामध्ये असे चित्र पाहतो. त्यामुळे अशा प्रत्येक महिलेची आरोग्य तपासणी होईल किंवा त्यांना प्रशिक्षण दिले जाईल असे नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी अशा कोणत्याही निधीची तरतूद शासनाने केलेली नाही. म्हणून हे काम होऊ शकत नाही. मात्र ऑडीट आक्षेपानुसार शासन यावर कोणती उपाययोजना करणार आहे ते विभागाने विचारपूर्वक सांगावे. विभागाने समितीला सांगावे की आपण यापुढे काय करणार आहात, आणि त्यासाठी तरतूद कशी करणार ? आजमितीस प्रशिक्षणासाठी कोणतीही आर्थिक तरतूद केली असेल तर ते सांगावे, अशी सूचना समितीने केले असता, विभागाकडे प्रशिक्षणासाठी वेगळी आर्थिक तरतूद नाही. पण विभागाकडे मॉनिटेरिंगसाठी एक वेगळा निधी असतो. त्याला एमएमई म्हणजे मॅनेजमेंट मॉनिटेरिंग आणि इव्हॅल्यूएशन म्हटले जाते. सर्वसाधारणपणे अशा कामासाठी हा निधी वापरला जातो. विभागाला हाच निधी वापरावा लागेल. कारण विभागाकडे वेगळा निधी नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दुसरा मुद्दा असा आहे की दरवर्षी बचतगट बदलले जातात. त्या दृष्टीने विचार केला तर विभागाने एकदा प्रशिक्षण देऊन विषय संपणार नाही तर विभागाला दरवर्षी प्रशिक्षण द्यावे लागेल, असे समितीने मत व्यक्त केले असता, काही वर्षांसाठी ते बचतगट काम करतात. कमी खर्चामध्ये प्रशिक्षण कसे देता येईल यासंबंधी विभाग नियोजन करते. यामध्ये व्हीडीओचा वापर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने हे नियोजन करावे. मात्र यासाठी विभाग किती कालावधी घेणार आहे. ते समितीला सांगण्यात यावे, असे समितीने सूचित केले असता,यासाठी किमान १ वर्षाचा कालावधी लागेल. कारण यामध्ये प्रशिक्षकांची संख्या फार मोठी आहे. १ लाख ७४ हजार लोकांना प्रशिक्षण देणे शिल्लक आहे. वर्षभर चालणारा हा कार्यक्रम असेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाला दरवर्षी हे ट्रेनिंग कायम स्वरुपी द्यायचे असेल तर त्याचा कॉम्प्यूटर प्रोग्राम करण्यात यावा. कारण मॅन्यूअल प्रशिक्षण दिले तर ते खर्चिक असेल. दरवर्षी हे प्रशिक्षण द्यायचे असल्यामुळे संगणकीय सॉफ्टवेअर प्रोग्राम तयार करून त्याच्या आधारे प्रशिक्षण दिले तर त्याचा खर्च कमी होईल आणि त्यात त्या त्या वेळी काही बदल करता येणे शक्य होईल. त्यामुळे आजच्या वैज्ञानिक पद्धतीद्वारे आणि इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले गेले तर योग्य होईल याचा विचार करण्यात यावा. त्यामुळे ही एक वन टाईम इनव्हेस्टमेंट होईल. पुढच्या वेळी आणखी काही कमी जास्त वाढविता येईल, अशी समितीने सूचना केली असता, समितीच्या सूचनेचा निश्चित विचार करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने नोव्हेंबर २०१५ मध्ये महालेखापाल कार्यालयास आश्वासन दिले होते की आम्ही प्रशिक्षणासाठी ट्रेनिंग प्रोग्रॅम तयार करू. आता लोकलेखा समितीने हा परिच्छेद घेऊन साक्ष लावली नसती तर विभागाने एसओपी तयार केली नसती काय ? Why it has taken more than 2 years to prepare these guidelines. कारण आपण योजना तर राबवित आहात. ही डिफेक्ट योजना नाही. विभागाने या मुद्याला लाईटली घेतले आहे, असे प्रधान महालेखाकार यांनी मत व्यक्त केले.

त्यावेळी झालेल्या साक्षीनंतर या प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखण्यात आला. २ किंवा ३ टप्प्यामध्ये हे प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले होते. तालुका स्तरावर एक अधीक्षक असतो आणि त्याने या महिलांना प्रशिक्षण द्यायचे असते. अधीक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी एमएमई मधील निधीचा काही प्रमाणात वापर करण्यात आला आणि असे करीत करीत हे काम सुरू आहे. फक्त आता आपण फुल फ्लेसमध्ये कसे करता येईल आणि मोठ्या तंत्रज्ञानाचा वापर करून व्हीडीओद्वारे प्रत्येक महिलेला कसे प्रशिक्षण देता येईल असा एसओपी विभागाकडून विकसित करण्यात येईल.परंतु हे घडले नाही असे नाही. याचे वेळोवेळी प्रशिक्षण सुरू आहे. बैठकांमध्ये आढावा घेण्यात येतो. २ ते ३ टप्प्यांमध्ये ते प्रशिक्षण सुरू आहे. पण याला चांगला स्केल किंवा जास्त वैज्ञानिकदृष्ट्या कसे योग्य होईल याचा विचार विभाग करीत असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने एसओपी तयार केला आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, एसओपीचे काम अंतिम टप्प्यात आहे. एका महिन्यात एसओपी पूर्ण करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने एक महिन्यानंतर या समितीला किमान एसओपीची हार्ड कॉपी द्यावी, असे समितीने निदेश दिले.

**परिच्छेद क्रमांक २.३.४.९ : अन्न पदार्थांच्या " सेवनासाठीच्या निर्धारित तिथी " नंतर त्यांचा वापर केला जाणे.**

१.१३ या परिच्छेदासंदर्भात माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता, हा मुद्दा एक्सपायरी डेटसंबंधी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. यामध्ये विभागाने असे उत्तर दिले आहे की विभागाने दिलेला माल गुणवत्तेनुसार दिला आहे. मात्र तो वापरण्याच्या वेळेवर

मिळाला नसेल आणि एक्सपायरी डेटनंतर वापरण्यात येत असेल तर त्यातून विषबाधा होऊ शकते अशा प्रकारचे ए.जीं.चे आक्षेप आहेत, असे समितीने निदर्शनास आणले. उत्तरामध्ये विभागाने असे म्हटले आहे की शिक्षणाधिकारी, पुणे आणि शिक्षणाधिकारी, धुळे यांचा खुलासा मागवित आहोत. तो खुलासा आला किंवा कसे त्यासंबंधी माहिती द्यावी असे प्रधान महालेखाकार यांनी सूचना केली.

ज्यावेळी पुरवठादाराने मालाचा पुरवठा केला त्यावेळी तो माल एक्सपायर्ड झाला होता किंवा त्याची एक्सपायरी डेट जवळ होती काय, दुसरे असे की त्यावेळी तो माल ठीक होता. परंतु हा माल १-२ वर्षे राहिल्यामुळे तेव्हा या मालाची एक्सपायरी झाली असे विभागीय सचिवांनी सांगितले. यासंबंधी संबंधित शिक्षणाधिकारी यांचे म्हणणे काय आहे ? असा प्रश्न प्रधान महालेखाकार यांनी उपस्थित केला.

विभागीय सचिव माहिती देतात की एक्सपायरी डेटच्या जवळपास... तर आपण किती तारीख असेल तर त्या मालाची डिलिव्हरी करायची किंवा नाही यासाठी किमान एक्सपायरीचे अमुक इतके दिवस शिल्लक असतील तरच तो माल डिलिव्हरी करायला पाहिजे असा काही तरी नियम असावा. त्यामुळे विभागाने या मालासंबंधी हे पाहिले पाहिजे की त्या डेटच्या किती दिवस अगोदर त्या मालाचे वितरण झाले आहे. जर तो माल एक्सपायरी डेटच्या शेवटच्या टप्प्यावर आला असेल तर त्याची जबाबदारी संबंधित अधिकारी यांची आहे. जर एक्सपायरी डेटच्या शेवटच्या टप्प्यात न येता विभागाने निश्चित केलेल्या तारखेच्या कालावधीपूर्वी तो माल पुरवठादाराकडून आला असेल मात्र विभागाने संबंधितांना वितरित केला नसेल तर या दोन्ही बाबतीत संबंधित अधिकारी दोषी आहेत.

शेवटी मुदत संपलेल्या तारखेनंतर कोणताही माल किंवा अन्न पदार्थ वापरले जाता कामा नयेत याबाबतची खबरदारी शिक्षणाधिकारी, बचत गटाचे संबंधित अधिकारी, शाळेची व्यवस्थापन समिती यांनी घ्यायला हवी. मात्र त्यांनी अशी खबरदारी घेतली नाही असे यावरुन दिसते. पुणे आणि धुळे जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांचा खुलासा मागविला किंवा कसे ते सुद्धा सांगावे, अशी समितीने विचारणा केली असता, पुणे व धुळे शिक्षणाधिकाऱ्यांचा खुलासा मागविला असून तो विभागाला प्राप्त झाला आहे. त्या खुलाशामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की आम्ही पुरवठादारांकडून तो माल बदलून घेतला आहे आणि जे मुदतबाह्य सॅम्पल्स होते ते बदलण्यात आल्याचे त्यांच्या खुलाशामध्ये नमूद आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या मालासंबंधी काही तत्त्व किंवा नियम आहे किंवा कसे की एक्सपायरी डेटच्या किती दिवस पूर्वी असली पाहिजे. आज जर विभाग मालाची डिलीव्हरी घेत असेल तर त्याला किमान ६ महिने मुदत असायला हवी असा प्रश्न समितीने केला असता, विभागाकडून दोन दोन महिन्यांचा पुरवठा एकदा घेण्यात येतो. तो माल त्या दोन महिन्यांमध्ये संपेल अशी अपेक्षा असते. त्यामुळे एक्सपायरी डेट आजपासून ६ महिन्यानंतरचा मुद्दा योग्य आहे. कारण तो माल दोन महिन्यांचा ठेवतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने यासंबंधी निर्बंध घालावेत की जो माल वितरित केला जाईल त्याला एक्सपायरीपूर्वी किमान सहा महिन्यांची मुदत असावी. यामध्ये कोणकोणत्या अन्न पदार्थांचा समावेश आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, यामध्ये मसाले, गरम मसाले, तेल, हळद अशा प्रकारचे साहित्य असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

संपूर्ण महाराष्ट्राचे कंत्राट घेणाऱ्या मोठमोठ्या एजन्सीज आहेत. त्या सर्वांचे लागेबांधे आहेत. यांच्याकडे माल पुरवठा करण्याचे काम असल्यामुळे ते त्या शाळेवर नेऊन देणे अनिवार्य आहे. त्या शाळेवर माल गेल्यानंतर तो उतरवून घेणे अनिवार्य आहे. मात्र यामध्ये कधी कधी एक्सपायरी झालेला माल असतो. तरी ते तो मला उतरवून घेतात. कारण त्यांना कोणताही पर्याय नसतो. त्यासाठी पुरवठादार माल देत असताना विभागाच्या अधिकाऱ्यांनी वॉच ठेवला पाहिजे की त्याची एक्सपायरी किती तारखेला आहे, अशी समितीने सूचना केली असता, विभाग ते मॉनिटेरिंग करू शकते. ज्यावेळी मालाची ऑर्डर दिल्यानंतर पुरवठा केला जातो. कदाचित तो केंद्रीकृत असेल किंवा ज्या पातळीवरुन तो दिला जात असेल त्या ठिकाणी पाहणे आवश्यक आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत फूल प्रुफ यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. महालेखाकारांनी हे रेकॉर्डवर आणले आहे. हे सॅम्पल म्हणजे टीप ऑफ दि आईसबर्ग असे एक सॅम्पल आणले आहे. आपण दाव्यानिशी सांगता काय की असे कोठेही घडलेले नाही. खालच्या पातळीवरील अशी एकही तक्रार जिल्हा पातळीवर आलेली नाही की पालकांनी, विद्यार्थ्यांनी किंवा शिक्षकांनी अशी फिर्याद केली नाही काय की एक्सपायरी डेटनंतर आम्हाला माल पाठविला आहे आणि त्याची फिर्याद आम्ही केली आहे असे आपण दाव्यानिशी सांगू शकणार नाही. त्यामुळे याबाबत फुलप्रूफ यंत्रणा राबविण्यासाठी आपण यापुढे कोणती व्यवस्था करणार आहात ? एक्सपायरी डेटच्या किमान ठरलेला कालावधीनुसार १०० टक्के तंतोतंत पालन झाल्याशिवाय मालाची डिलीव्हरी स्वीकारली जाणार नाही असे केले पाहिजे. दुसरे म्हणजे ज्यावेळी एखाद्या दिवशी असा माल येईल आणि दुसऱ्या दिवशी शिजविण्यासाठी काहीच अन्न नसेल तर ते असा माल घेतीलच.

त्यांना असा माल उतरवून घ्यावाच लागतो. कारण त्याला पर्याय नसतो, असे समितीने मत व्यक्त केले असता, नियमांमध्ये सुधारणा करताना समितीने दिलेल्या सूचनेनुसार त्या मालाचा किमान सहा महिन्यांचा कालावधी असला पाहिजे त्यासंबंधी विभाग दक्षता घेईल की जेणेकरून तो माल पुढील एक दोन महिन्यात एक्सपायर होईल अशी पाळी येणार नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक २.३.४.१० : मुलांनी वापरावयाच्या द्रवरुप साबणाचा (hand wash) असंबद्ध पुरवठा :**

१.१४ हॅन्ड वॉश सर्वांना देता आले नाही. कारण विभागाकडे निधीची कमतरता आहे असे दिसते. व्यवस्थापन सनियंत्रण मूल्यमापन यासाठी उपलब्ध असलेल्या निधीमधून विभागाने हा खर्च केल्याचे दिसते, असे मत समितीने व्यक्त केले असता,गरजेपेक्षा फक्त थोडाच पुरवठा विभाग करू शकला. त्याबाबत विभागाने पडताळणी केली असता सर्व शाळांमधील मुलांना हा साबण पुरवठा करायचा झाला तर त्यासाठी फार मोठा निधी लागेल. विभागाने पडताळणी केल्यानुसार १०० टक्के हे काम करायचे असेल तर त्यासाठी १८४ कोटी रुपयांचा निधी लागणार होता आणि विभागाकडे तेवढा निधी नाही. केंद्र शासन सुद्धा यासाठी निधी देत नाही. काही वर्षापासून लिक्विड सोप आता बंद झाले आहे. आता विभागाचे असे नियोजन आहे की नॉर्मल साबणाचा वापर करण्यासाठी व स्थानिक पातळीवर त्याची व्यवस्था करणे व त्यातून मुलांना हात धुता येतील अशी विभागाची सुधारित पॉलिसी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक २.३.४.११ : आपतकालीन वैद्यकीय आराखड्याचा अभावः**

१.१५ या परिच्छेदासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, या परिच्छेदामध्ये असा मुद्दा होता की समजा एखादी घटना घडली, उदाहरणार्थ अन्नातून विषबाधा झाली, आग लागली किंवा नैसर्गिक आपत्तीमधून एखादी घटना घडली तर जे आकस्मिक घटनांसंबंधी दूरध्वनी असतात, उदाहरणार्थ रुग्णवाहिका, अग्निशमन केंद्र, रुग्णालयांचे दूरध्वनी, पोलीस ठाण्याचे दूरध्वनी हे इमर्जन्सी सुविधेसंबंधीचे फोन नंबर्स सर्व शाळांमध्ये उपलब्ध असले पाहिजेत. त्याबद्दल जून २०१८ मध्ये फ्लेक्स बॅनर्स तयार करण्यात आले आणि त्यावर या इमर्जन्सी सुविधांचे दूरध्वनी क्रमांक प्रिंट करून त्यांचे वाटप करण्यात आले आहे. त्याच्यावर २.८ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. यामध्ये डीएमआरचा आरसी करण्यात आला आहे. तसेच आता मोबाईलचे युग असल्यामुळे शाळा व्यवस्थापन समितीचे स्थानिक सदस्यांच्या मोबाईल्समध्ये हे सर्व नंबर्स असले पाहिजेत. अशी विभागाकडून खात्री करण्यात येईल. कदाचित हे नंबर्स त्यामध्ये असतील किंवा नसतील सुद्धा. पण विभाग याबाबत खात्री करेल की या एमर्जनसी सुविधांचे सर्व नंबर्स त्यांच्याकडे उपलब्ध असले पाहिजेत, जेणेकरून विनाविलंब ते या सुविधांशी संपर्क साधू शकतील, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

शाळांच्या देखभाल व दुरुस्तीचे कामकाज कोणाकडे असते ? असा प्रश्न प्रधान महालेखाकार यांनी उपस्थित केला असता, शाळांच्या देखभाल दुरूस्तीचे काम शाळा व्यवस्थापन समितीकडे असते, यासंबंधी प्रत्येक शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती असते व हे काम त्या समितीमार्फत केले जाते, असे विभागीय सचिवांनी सांगितले. यामध्ये आग नियंत्रण यंत्रणेचा सुद्धा मुद्दा महत्त्वाचा आहे. फायर एक्सस्टींगवीशरसची मुदत संपली असली तरी ते रिन्यूव्ह केलेले नाहीत किंवा रिफील केलेले नाहीत, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

प्रधान महालेखाकार यांचे म्हणणे असे आहे की आग नियंत्रणाशी संबंधित उपकरणांमध्ये वाळू ठेवणे किंवा ती बदली करणे हे काम शिल्लक आहे काय असा प्रश्न समितीने केला असता, यासंबंधी खालच्या स्तरावर जे बजेट उपलब्ध करण्यात येते. म्हणजे स्कूल मॅनेजमेंट समितीला जे बजेट मिळते त्यामधून ते करता येईल. परंतु विभागाने आता या धोरणामध्ये थोडा बदल केला आहे, हा निर्णय झालेला आहे. आता वाळूच्या बादल्या ठेवण्याबाबत असे सांगण्यात आले आहे. कारण फायर एक्सस्टींगवीशरसला रिफील करावे लागते आणि ते रिफील करण्यासाठी खालच्या स्तरावर पुरेसे बजेट उपलब्ध आहे किंवा नाही त्याची माहिती नसते. त्यामुळे विभागाने फायर एक्सस्टींगवीशरस ऐवजी वाळूच्या बादल्या ठेवाव्यात अशा सूचना दिलेल्या आहेत. त्याशिवाय सर्वांकडे फायर ब्रिगेडचे नंबर्स ठेवायला सांगितले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. वाळूची पोती ठेवावीत आणि फायर एक्सस्टींगवीशरस नकोत असे म्हणणे योग्य नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, फायर एक्सस्टींगवीशरस नकोत असे नाही तर जेथे जेथे स्थानिक बजेटमधून ते फायर एक्सस्टींगवीशरस ठेवू शकतात तेथे ती व्यवस्था केली जाणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. ते फायर एक्सस्टींगवीशरस रिफिल सुद्धा करण्यात यावे, अशी सूचना प्रधान महालेखाकार यांनी केली.

ऑडीटचा आक्षेप आहे की त्या फायर एक्सस्टींगवीशरसला रिफील करण्यात आलेले नाही, असा समितीने प्रश्न केला असता, या शाळांसाठी साधील अनुदान असते त्यामधून त्यांना हे करायला सांगण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. विभागाने त्यांना प्रत्येक ठिकाणी फायर एक्सस्टींगवीशरस साधील अनुदानातून बसविण्याचे अनिवार्य करण्यात यावे, अशी समितीने सूचना केली.

**परिच्छेद क्रमांक २.३.४.१२ : गोणपाटाच्या पोत्यांची विल्हेवाट न लावल्यामुळे महसुलाची हानी.**

१.१६ गोणपाटाच्या पोत्यांची विल्हेवाट लावण्यासंबंधी पालन झाले नाही म्हणून त्यासंबंधी महालेखाकार यांनी विभागाला थेट सूचना दिल्या आहेत. कारण जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गोणपाटाच्या गोण्यांची विल्हेवाट न लावणे हे अकाऊंटच्या दृष्टीने जरी योग्य असले तरी असे विषय या समितीसमोर येणे संयुक्तिक वाटत नाही.

प्रॅक्टीकली विचार केला तर ते योग्य नाही. जर एखाद्या मुलाने शाळेमध्ये लघवी केली तर ती पुसण्यासाठी शिक्षकाने गोणी घेतली तर त्याचा हिशेब कसा लावणार ? यामधील अर्धी पोती तर फुटूनच येतात. रिकाम्या पोत्यांची ही रक्कम ७ ते ८ कोटी रुपयांची आहे. विभागाने यंत्रणा सुस्थितीत राबविली पाहिजे. यासाठी फुल प्रुफ यंत्रणा राबवावी. महालेखापालांनी विभागाला कळविल्यानंतर विभागाने ते काम केलेले नाही. रिकाम्या पोत्यांच्या संदर्भात गाईडलाईन दिलेल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाला देखील सिमेंटच्या रिकाम्या पोत्यांचा हिशेब ठेवावा लागतो. विभागाला सिस्टम ब्रेक करता येणार नाही. हिशोब ठेवावयाचा नाही, असे शासनाने मान्य केले आहे काय ? शासनाने रिकाम्या पोत्यांचा हिशेब ठेवण्याचे आदेश दिले असतील तर त्याचे पालन केलेच पाहिजे. पुरवठा करण्यात येणाऱ्या धान्याच्या पोत्यावर नेव्हीचा शिक्का असतो. सदरहू लेखा आक्षेप प्रकरणी महसूलीची हानी झाली शासनाने सुस्पष्टपणे मान्य केले आहे. उक्त वस्तुस्थिती विभागाने मान्य केली आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी समितीला शिफारस करणे क्रमप्राप्त आहे.

पोत्यांची विल्हेवाट लावण्याची आवश्यकता नाही, तिचा पुन्हा वापर करू नये किंवा पोत्यांमध्ये लिकेजेस असतील तर ते दुरुस्त करावेत, याबाबत विभागाने स्पष्ट सूचना द्याव्यात. समितीला रिकाम्या पोत्यांची काळजी नसून त्यामध्ये भरलेले धान्य खाली पडून वाया जाऊ नये, याची काळजी आहे. रिकाम्या पोत्यावरुन धान्य पुरवठा करण्यात आला आहे, हे समजते. शाळांना अर्धे धान्य पुरवठाच करण्यात येत नाही. धान्याच्या पोत्यांवर नेव्हीचा शिक्का असतो, कंपनीचे नाव असते, त्यावर स्पेसिफिकेशन नमूद करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात सूचना करण्याची आवश्यकता आहे. सदरहू प्रकारची धान्याची पोती बाजारामध्ये सहजपणे उपलब्ध होतात, असे समितीने मत व्यक्त केले असता, सदरहू प्रकरणी क्षेत्रियस्तरावरील अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येईल. पोत्यांच्या हिशोबासंदर्भात काही दिवसांपूर्वी तीव्र विरोध करण्यात आला होता. शिक्षकांवर इतर अनेक कामे सोपविण्यात येतात. त्यामुळे सदरहू प्रकरण संवेदनशील असल्याने चर्चा करून रिकाम्या पोत्यांचा हिशोबाबाबत मार्ग काढण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हा लेखा आक्षेप ८ कोटी रुपयांचा आहे. हा लेखा परिच्छेद कसा काय वगळता येईल ? असा प्रश्न समितीने केला असता, रिकाम्या पोत्यांचा वापर वेगवेगळ्या कारणांसाठी करण्यात येतो. रिकाम्या पोत्यांचा हिशोब ठेवला पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शाळांना एकूण धान्याच्या अर्धाच धान्य पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे रिकाम्या पोत्यांच्या हिशोब न ठेवणे याचे समर्थन करता येणार नाही. समितीला रिकाम्या पोत्यांची काळजी नाही, धान्य पुरवठा करण्यासंदर्भात काळजी आहे. धान्याच्या पोत्यांची काळजी घेण्यात येत नाही. त्यामधील माल काढून घेण्यात येतो. रिकाम्या पोत्यांना किंमत मिळत नाही म्हणून या मुद्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यामुळे ८ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. पोत्यांचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असून त्यासंदर्भात विभागाने स्पष्टपणे चूक झाल्याचे मान्य केले आहे. पुरवठादाराने सर्व माल पुरवठा केला पाहिजे, याची काळजी घेता येईल. सदरहू लेखा आक्षेप पुन्हा तपासण्याची आवश्यकता आहे. सदरहू प्रकरणी विभागाच्या सचिवांच्या मागणीनुसार त्यांना वेळ देण्यात यावा. सदरहू लेखा परिच्छेदाचे स्पष्टीकरण पुढील बैठकीच्या वेळी सादर करण्यात यावे, तोपर्यंत हा लेखा परिच्छेद प्रलंबित ठेवण्यात येत असल्याचे समितीने निदेश दिले.

उक्त मुद्याबाबत दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी पुनःश्च विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

१.१७ याबाबत दिलेल्या सुधारीत उत्तराबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, शाळांमध्ये तांदूळ पुरवठा होता. त्या गोण्यांचा हिशोब ठेवला पाहिजे, त्या गोण्यांची विक्री करून शासकीय खात्यात रक्कम जमा केली पाहिजे. मात्र तसे होत नाही यामुळे शासनाचे नुकसान होत आहे, असा विषय होता. शाळेत तांदूळ पुरवठा करताना वर्षानुवर्षापासून गोण्या दिल्या जात होत्या. या बाबत कोणी फारसे लक्ष दिले नाही हे मान्य करावे लागेल. या गोण्यांची कशी विल्हेवाट लावली जाते याची माहिती घेतली असता स्वयंपाकगृहात पायपुसणी म्हणून या गोण्यांचा वापर केला जातो. जुनी पुस्तके, शैक्षणिक साहित्य यांची साठवण करण्यासाठी, इतर साहित्य ठेवण्यासाठी वापर केला जातो. काही प्रमाणात चांगल्या गोण्यांची विक्री केली जाते. काही संस्थांनी विक्रीची रक्कम शासन स्तरावर जमा केली आहे. मात्र सर्व संस्थांनी भरलेली नाही. शासनाने आदेश काढले की, रक्कम विक्री करून शासनाच्या खात्यात जमा करावी व हिशोब ठेवावा. यास शिक्षक व मुख्याध्यापकांकडून बराच विरोध झाला. या बाबत दोन पर्यायांचा विचार केला जात आहे.

शिक्षकांना हे काम देऊ नये. त्यांच्याकडे बरीच कामे आहेत. शिक्षक संघटनांनी यास विरोध केलेला आहे. दुसऱ्या कोणाला हे काम दिले तर ते प्रॅक्टीकल होईल. पुरवठादारांनी गोण्या गोळ्या कराव्यात व त्या विकून त्याचा हिशोब द्यावा, असा एक पर्याय होऊ शकतो असे समितीने सूचित केले असता, ती रक्कम त्यांच्या बिलमधून कमी केली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

हा पर्याय योग्य आहे. पुरवठादार गोण्या गोळा करेल. डीएसओ यांनी त्याची किंमत ठरवावी व विक्री केल्यानंतर ती रक्कम कमी करावी. सन २०१५ मधील शासन निर्णयाचे तंतोतंत पालन या पुढे तरी झाले पाहिजे. विभागाने पूर्वी देखील सांगितले होते. भरलेले पोतेच गायब होऊन जाते. शाळेला माल पोहचला पाहिजे, त्याची गणना रिकाम्या गोण्यांमधून होत आहे असे समितीने निदर्शनास आणले. त्याचप्रमाणे गोणीचा पुरवठा झाला की नाही हे कसे समजेल ? अशी महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून विचारणा केली असता, विभागाकडे संगणकीकृत यंत्रणा आहे. कमी तांदूळ पुरवठा होईल असे आता होणार नाही. या बाबत स्वतंत्रपणे माहिती विभाग देऊ शकतो किंवा आता देखील माहिती देता येईल. याकरिता एक संगणकीय सिस्टीम आहे. त्यात किती तांदळाच्या पोत्यांचा पुरवठा करण्यात आला याबाबतचा हिशेब ठेवला जातो.`त्यामुळे कमी तांदळाच्या पोत्यांचा पुरवठा झाला हा विषय राहिलेला नाही. याबाबत समितीला माहिती देण्यात येईल असे विभागाने आश्वस्त केले.

या सर्व नोंदी कागदोपत्री राहतात. या संदर्भात प्रत्यक्षात तपासणी होणे अत्यावश्यक आहे. या गोणपाटांच्या आधारावर शाळा व्यवस्थापन समितीने प्रत्यक्षात तपासणी केल्यास ते सोईस्कर राहील. परंतु यासंबंधी किंमत कमी किंवा जास्त मिळत असल्यामुळे ते या गोष्टीकरिता तयार होणार नाहीत, असे मत समितीने व्यक्त केले.

यात दोन विषय आहेत. डिस्पोझलचा विषय वेगळा आहे. शाळांना किती पोत्यांचा पुरवठा करण्यात आला यावर एजन्सीची भूमिका महत्वाची असते. फक्त पोत्यांची रक्कम देतील. परंतु प्रत्यक्षात त्यांच्यांकडून माल पाठविला जाणार नाही असा मुद्दा महालेखापालांनी समितीच्या माध्यमातून उपस्थित केला असता, समितीने उपस्थित केलेल्या मुद्याची विभागाने नोंद घेतली आहे. विभागाकडून यासंबंधी वेगळा अभ्यास करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

शाळानिहाय किती गोण्यांचा पुरवठा करण्यात आला यासंबंधी असलेल्या अकाऊंटची माहिती विभागाला संबंधित मुख्याध्यापकाकडून समजू शकते. त्यात काही गोणपाट खराब किंवा काही चांगले असू शकतील. चांगले गोणपाट विकता येऊ शकतील. तांदळाचे गोणपाट कधीही खराब होत नाहीत. यासंबंधी पैसे मिळाले पाहिजेत त्याकरिता विभागाने कार्यपद्धती तयार करून बसवावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी यासंबंधी सविस्तर अभ्यास करण्यात येईल असे समितीस विदित केले. (विवरण पत्र क्र. ४)

शिक्षकांवर टाकण्यात आलेली गोणपाटाची जबाबदारी बंद केल्यास यातून मार्ग निघू शकतो. मध्यान्ह आहारासंबंधी तूरडाळची सुद्धा जाहिरात केली जाते. शासनाच्या आदेशानुसार शासनाकडूनच तूरडाळ खरेदी केली पाहिजे. या संदर्भात शासन स्तरावरुन प्रत्येक जिल्ह्यामध्ये सूचना दिलेल्या आहेत. शासनाकडून ३५ रुपये प्रति किलोने तूरदाळ विक्री केली जाते. अशा परिस्थितीत पुणे जिल्ह्यात कंत्राटदाराकडून तूरडाळ खरेदी करण्याच्या शालेय शिक्षण विभागाकडून परवानगी देण्यात आली व त्यानुसार कंत्राटदाराकडून ७९ रुपये प्रति किलो दराने तूरडाळ खरेदी करण्यात आली. शासनाने ९० रुपये दराने तूरदाळ खरेदी न करण्याबाबतचे आदेश सुद्धा काढलेले आहेत. त्यामुळे ही बाब विभागाने स्वतः तपासून घ्यावी. यासंबंधीचा अहवाल विभागाने १५ दिवसांमध्ये समितीकडे सादर करावा असे समितीने निदेशित केले. त्यासबंधीची माहिती विभागाकडून प्राप्त झाली आहे सदर माहिती खालीलप्रमाणे :

महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटींग फेडरेशन लि. मुंबई यांच्यामार्फत आठवड्यातील तीन दिवसांकरिता आवश्यक असलेली तूरडाळ माहे डिसेंबर, २०१७ पासून पुरवठा करून घेण्यात येत असल्याने माहे डिसेंबर, २०१७ ते सप्टेंबर, २०१८ पर्यंत पुणे जिल्हा महापरिषदेने तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करणाऱ्या पुरवठेदाराकडून अथवा इतर संस्थेकडून तुरडाळ खरेदी केलेली नाही याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद, पुणे यांच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. (विवरण पत्र क्र. ५)

इंधन भाजीपाला अनुदान वाटपात जिल्हास्तरावर होणारा विलंब टाळणे यामध्ये एक सुसूत्रता आणणे यासाठी शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शाळास्तरावरील इंधन-भाजीपाला आणि शहरी भागातील शाळांचे धान्यादी मालाचे अनुदान MDM पोर्टलवर शाळांनी भरलेल्या दैनंदिन माहितीच्या आधारावर संगणकीय प्रणालीद्वारे देयके तयार करून प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरून PFMS प्रणालीद्वारे अनुदानाची रक्कम थेट शाळा व्यवस्थापनाच्या समितीच्या बँक खात्यावर जमा करावी असा निर्णय शासनाने दिनांक २ एप्रिल, २०१८ पत्रान्वये घेतला आहे. (प्रत सोबत जोडली आहे.) (विवरण पत्र क्र. ६) त्याअनुषंगाने माहे एप्रिल, २०१८ पासूनची इंधन-भाजीपाला व शहरी भागातील धान्यादी मालाच्या अनुदानाची देयके जिल्हास्तरावरून पारीत न करता संचालनालय स्तरावरून MDM PORTAL द्वारे देयके तयार करून सदरील अनुदान शाळांच्या खात्यांवर वर्ग करण्याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिनांक १७ मे २०१८ च्या पत्रान्वये सूचना सर्व जिल्ह्यांना दिल्या आहेत. ग्रामीण भागात पुरविण्यात आलेल्या धान्यादि मालाची देयके पुर्वीप्रमाणेच संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्तरावरून अदा करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्रमांक २.३.५. संनियंत्रण,**

**परिच्छेद क्रमांक २.३.५.१. संनियंत्रणातील त्रुटी**

**१.१८** संनियंत्रण समितीच्या संदर्भातील लेखा आक्षेप आहे, यासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, शासनाने दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी संनियंत्रण समिती स्थापन करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला असून जिल्हा स्तरीय संनियंत्रण समित्या गठीत करण्यात आल्या असून त्यांच्या मार्फत संनियंत्रण सुरू आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू समितीचे अध्यक्ष संसद सदस्य यांना करण्यात आले आहे. परंतु विभागाने अभिप्रायामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे, असे नमूद केले आहे. याबाबत माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, सन २००५ मधील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी संनियंत्रण समितीचे अध्यक्ष होते. सन २०१५ मधील शासन निर्णयानुसार संनियंत्रण समितीचे सदस्य-सचिव जिल्हाधिकारी आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आल्या आहेत काय ? केंद्र शासनाने विधानमंडळ सदस्यांना संनियंत्रण समितीचे अध्यक्ष करण्याचे सूचित केले आहे, काय असा प्रश्न समितीने केला असता, उक्त समितीमध्ये विधानमंडळ सदस्यांचाही समावेश करण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

The GoI issued instructions (April 2013) to the State Project Directors of various Central Schemes, including MDM Scheme, for constitution of a District Level Committee for monitoring of the Schemes. The Committee was to be constituted by co-opting Members of the Centre/State Legislature, Collectors, District Education Officers, members of ZPs, two NGOs working on elementary education in the area etc. The senior-most Member of Parliament in the meeting was to chair the Committee. However, no such Committee was constituted by the GoM as of December 2015, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

उक्त प्रकरणीच्या शासन निर्णयामध्ये खासदार/आमदार महोदय नमूद करण्यात आले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. उक्त समितीमध्ये वरिष्ठ विधिमंडळ सदस्य यांना समाविष्ट करावयाचे आहे. जिल्ह्यातील लोकसभा सदस्य, राज्यसभा सदस्य, विधानसभा सदस्य व विधानपरिषद सदस्यांचा समितीमध्ये समावेश करावा, असे नमूद करण्यात आले आहे. सदरहू समितीच्या बैठका होतात का ? असाप्रश्न समितीने केला असता, दिनांक २२ एप्रिल, २०१५ मध्ये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच नियमीत बैठक घेण्यात येतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली नाही, असा लेखा आक्षेप आहे असे प्रधान महालेखाकार यांनी निदर्शनास आणले असता, उक्त समिती गठीत करण्याकरिता दिनांक २२ एप्रिल, २०१५ मध्ये शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. उक्त समिती प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापन करण्यात आली आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, सदरहू प्रकरणी माहिती घेऊन समितीला सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

सदरहू समिती अनेक योजनांच्या संदर्भात स्थापन करण्यात येते. त्या समिती अंतर्गत संनियंत्रण ठेवता यावे याकरिता उक्त योजना जोडण्यात आली आहे. टोल क्रमांकावरून तक्रारी प्राप्त होतात का ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले. सर्व जिल्ह्यांमध्ये भरारी पथकांची नियुक्ती केली असल्याची माहिती विभागाने समितीला दिली आहे. ७ जिल्ह्यांनी भरारी पथकांची निर्मिती केली नाही, असा लेखा आक्षेप आहे. भरारी पथकांच्या संदर्भात सद्यःस्थिती काय आहे ? लेखा परिक्षणाच्या वेळी ७ जिल्ह्यांमध्ये भरारी पथके तयार करण्यात आले नव्हते, याबाबत माहिती विचारली असता, विभागीय सचिवांनी सर्व जिल्ह्यामध्ये भरारी पथके तयार करण्यात आले आहेत, असे सांगितले.

लेखा परिक्षणाच्या वेळी भरारी पथके तयार न करण्याची कारणे काय, सदरहू प्रकरणी तत्कालीन जबाबदार मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा शिक्षण अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय ? सदरहू प्रकरणी कारवाई केल्याशिवाय योजनेचे नियंत्रण व कार्यान्वयन होणार नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता, उक्त प्रकरणी कालच आयुक्तांशी चर्चा करण्यात आली आहे. भविष्यामध्ये अशा प्रकारचा निष्काळजीपणा होणार नाही, याची काळजी घेण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

भरारी पथके तयार करण्याची जबाबदारी ज्यांची होती त्यांनी ती का तयार केली नाहीत ? भरारी पथके तयार केले नाही तर योजना व्यवस्थित राबविल्या जात नाहीत. त्यासाठी भरारी पथके तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरहू प्रकरणी तत्कालीन ७ जिल्ह्यातील जबाबदार अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून समितीला माहिती सादर करण्यात यावी असे समितीने निदेश दिले. (विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्रमांक ६ मध्ये समाविष्ट.)

**अभिप्राय व शिफारशी**

**परिच्छेद क्र.२.३.२ "नियोजन व व्याप्ती"**

**परिच्छेद क्र.२.३.२.१ "दुष्काळप्रवण जिल्ह्यांना लाभ न मिळणे/जिल्ह्यांचा समावेश नसणे"**

**अभिप्राय**

**१.१९ मध्यान्ह आहार** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार दुष्काळ बाधित क्षेत्रांमध्ये उन्हाळी सूट्टयांच्या दरम्यान मुलांना पुरक पोषण आहार द्यावयाचा होता. जर उन्हाळी सुट्टया सूरु झाल्यावर किंवा अगदी सुरु व्हायच्या वेळी एखादया क्षेत्राला दुष्काळ बाधित क्षेत्र घोषित करणारी अधिसूचना जारी करण्यात आली तर अशा वेळी राज्य शासनाने केंद्रिय अर्थसहाय्य मुक्त होईल असे गृहीत धरुन अशा क्षेत्रांमध्ये मध्यान्ह आहाराचा पुरवठा करावा असे स्पष्ट निर्देश आहेत. सन २०१०-१५ दरम्यान राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने अधिसूचित केलेले दुष्काळ बाधित जिल्हे, योजनेत समाविष्ट न झालेले दुष्काळ बाधित जिल्हे आणि ज्या जिल्ह्यांचा चुकीने दुष्काळ बाधित जिल्हे म्हणून या योजनेत समावेश करण्यात आला. अशा जिल्ह्याचा तपशील पाहता ३४ दुष्काळ बाधित जिल्ह्यांचा योजनेत समावेश करण्यात आला नव्हता, त्याचवेळी आठ जिल्हे दुष्काळ बाधित असल्याचे अधिसूचित झालेले नसतानाही या कालावधीत त्यांचा योजनेतंर्गत समावेश करण्यात आला होता. दुष्काळ बाधित जिल्ह्यांचा समावेश न होणे व दुष्काळ बाधित म्हणून अधिसूचित झालेले नसतानाही काही जिल्ह्यांचा योजनेत समावेश होणे यावरुन दुष्काळ प्रवण जिल्ह्यांमध्ये योजनेची अंमलबजावणी करताना पर्याप्त नियोजनाचा तसेच राज्यस्तरीय नोडल संस्था (SNA) आणि महसूल व वन विभाग यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दर्शविला गेला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत राज्याचे वार्षिक कार्य व अंदाजपत्रक केंद्र शासनाच्या मंजूरीसाठी साधारणपणे दरवर्षी माहे जानेवारी मध्ये दाखल करण्यात येते. तथापि, जानेवारी पर्यंत राज्य शासनाद्वारे दुष्काळग्रस्त जिल्हे घोषित करण्यात येत नाहीत. त्यामुळे जिल्हयांकडून दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांना ऊन्हाळी सुट्टीत शालेय पोषण आहार मिळण्याबाबतचा प्रस्ताव वेगळयाने समाविष्ट होत नाही. तथापि, ऊन्हाळी सुट्टीत विद्यार्थ्यांची उपस्थिती नगण्य असल्याने दुष्काळी भागात विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार उपलब्ध करून देण्यासाठी नियमित अर्थसंकल्पातील तरतूदीचा वापर करण्यात येतो असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

यावर समितीने आक्षेप नोंदवित यापुर्वी केंद्र शासनाला पाठविण्यात आलेला अहवाल दुष्काळ जाहीर झाल्यानंतरच्या काळामध्ये सादर करण्यात आला होता. या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवित असताना विभागाकडून चूक झाली. मुलांना भोजन मिळू नये असा कोणताही हेतू विभागाचा नव्हता. सन २०१३ ते १५ मध्ये दुष्काळ अगोदरच जाहीर झालेला होता व त्यानंतर अहवाल पाठविला असतानाही दुष्काळग्रस्त जिल्ह्यांचा समावेश विभागाने त्यात केला नाही. तरीही तांत्रिक बाबीपेक्षा महत्वाचे म्हणजे दुष्काळग्रस्त भागात संपुर्ण कालावधीत विद्यार्थ्यांना शालेय मध्यान्ह भोजन मिळावे हा मूळ हेतू साध्य झाला किंवा कसे हे पाहण्याची प्राथमिक जबाबदारी शासनाची होती. कित्येकदा दुष्काळ घोषित करणे व त्याचे आदेश यंत्रणेमार्फत शाळांपर्यत पोहोचण्याच्या दरम्यानच्या कालावधीत पालक व विद्यार्थ्यांचे स्थलांतर होते अथवा उन्हाळी सुट्टया लागल्यामुळे पालक व विद्यार्थ्यांपर्यंत हा निर्णय पोहचण्यास विलंब लागतो. यासाठी केंद्र शासनाकडून निश्चितपणे निधी प्राप्त होत असताना कोणत्याही तांत्रिक बाबींमुळे ही योजना बंद अथवा त्यात खंड पडू नये याची पुर्ण काळजी राज्य शासनाच्या स्तरावरुन घेणे अत्यंत आवश्यक असून विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाची सुविधा वर्षभर अविरत सुरु ठेवण्याची नितांत आवश्यकता व शासनाची जबाबदारी आहे. दुष्काळ जाहीर झाला तर उन्हाळी सुट्टीत शाळा जरी शिक्षणासाठी बंद असल्या तरी मध्यान्ह भोजन सुरुच ठेवण्यात येते. असे असताना या सुविधेचा लाभ जास्तीत जास्त गरजू विद्यार्थ्यांना देण्याच्यादृष्टीने दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही ही विहित मुदतीत होणे क्रमप्राप्त आहे.

**शिफारस**

**१.२० मध्यान्ह आहार योजना ही केंद्रपुरस्कृत योजना असून जिचे उद्दिष्ट शाळेतील भरती संख्या वाढविणे, पटसंख्या कायम ठेवणे आणि उपस्थिती वाढविणे आणि त्याचवेळी प्राथमिक व उच्च माध्यमिक वर्गांमधील विद्यार्थ्यांच्या पोषणाचा स्तर उंचावून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास उत्तेजना देणे हे होते. सन २००८-०९ पासून या योजनेची व्याप्ती वाढवून ती उच्च प्राथमिक वर्गांसाठी देखील लागू करण्यात आली. त्याआधारे दुष्काळ बाधित जिल्ह्यांमध्ये उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत या योजनेचा लाभ देण्यास सुरुवात झाली. परंतु महालेखाकारांनी अचूकरित्या नोंदविलेल्या आक्षेपानुसार जिल्हा/तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करणेबाबतची शासनस्तरावरुन अवलंबिण्यात आलेली कार्यपध्दती व त्याचबरोबर केंद्र शासनाकडे या योजनेंतर्गत पाठवावयाच्या प्रस्तावामध्ये ताळमेळ व नियोजनाचा अभाव असल्यामुळे या योजनेची अंमलबजावणी दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये प्रभावीपणे होवू शकली नाही. उन्हाळी सुट्टया सुरु होण्याअगोदर अशाप्रकारे मध्यान्ह भोजनाची माहिती विद्यार्थ्यांना व पालकांना वेळेत दिली तरच त्याचा लाभ त्या विद्यार्थ्यांना मिळू शकतो अन्यथा सुट्टयांमध्ये बाहेर जाणे अथवा स्थलांतरण या कारणास्तव योजनेस मान्यता येईपर्यंत त्याचा लाभ घेण्यासाठी मुले हजर नसतात. इतकेच नव्हेतर या योजनेत दुष्काळग्रस्त म्हणून घोषित झालेल्या भागांचा समावेश न होणे व त्याचवेळी दुष्काळबाधित**

**असल्याचे अधिसूचित झालेला नसतानाही त्या जिल्ह्यांचा या योजनंतर्गत समावेश होणे याच सर्व बाबी योजनेची अंमलबजावणी करताना नियोजनाचा व समन्वयाचा अभाव दर्शविणाऱ्या आहेत. मध्यान्ह भोजनाची योजना ही केंद्र पुरस्कृत असून त्याचा संपुर्ण निधी हा केंद्र शासनाकडून प्राप्त होत असल्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबींची पुर्तता विभागाने विहित वेळेत पुर्ण करून योजनेची अंमलबजावणी करावी, दुष्काळ घोषित करणेबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन विहित मुदतीत सुरु करण्यात यावी व कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ घोषित करण्याच्या प्रक्रियेतील विलंबाचा कोणताही परिणाम या दुष्काळबाधित जिल्ह्यांना होणार नाही. शाळांमधील प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील सर्व पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा. तसेच या योजनेत दुष्काळग्रस्त जिल्ह्यांचा समावेश करताना ते अचूकरित्या करण्यात यावे. यासाठी या योजनेची अंमलबजावणी अतिशय नियोजनबध्द पध्दतीने करण्यात यावी व त्याचबरोबर विद्यार्थ्यांची भरती संख्या वाढविणे, पटसंख्या कायम ठेवणे, उपस्थिती वाढविणे व त्याचवेळी प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांमधील पोषणाचा स्तर उंचाविणे ही योजनेची उद्दिष्टे यशस्वीरित्या साध्य करण्यात यावीत. दुष्काळी जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये राबविण्यात येणारी सदरहू योजना अतिशय चांगली असल्याने त्याबाबत जनजागृती करून उक्त योजनेचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळाला पाहिजे यासाठी विभागाने प्रयत्नशील राहावे. दुष्काळबाधित म्हणून अधिसूचित केलेल्या जिल्ह्यांमधील सर्व शाळांचा मध्यान्ह आहार योजनेत खात्रीने समावेश होईल याची सुनिश्चिती करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने महसूल व वन विभागाशी अत्यंत प्रभावी समन्वय ठेवून कामकाज करावे व योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच महालेखाकारांनी आक्षेपित केल्यानुसार दुष्काळबाधित नसलेल्या जिल्ह्यांचा देखील या योजनेत समावेश करण्यात आला असल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.३ "वित्तीय व्यवस्थापन"**

**अभिप्राय**

**१.२१** केंद्र शासनाने राज्याच्या वार्षिक कार्य आराखडा व अंदाजपत्रकाला मंजूरी दिल्यावर प्रत्येक वर्षी एप्रिल, मे मध्ये केंद्रिय अर्थसहाय्याचा पहिला हप्ता राज्य शासनाला मुक्त करण्यात येतो आणि मागील अनुदानाच्या विनियोगाच्या प्रगतीच्या आधारावर दुसरा हप्ता सप्टेंबर, ऑक्टोबर मध्ये मुक्त केला जातो. केंद्रिय अर्थसहाय्य प्राप्त झाल्यावर केंद्राच्या अनुदानाबरोबर राज्य शासन त्यांचा तेवढाच किमान अनिवार्य हिस्सा (२५ टक्के) योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय नोडल संस्थेला (SNA) मुक्त करते. परंतु सन २०१०-११ दरम्यान एकूण रु.१४८०.३० कोटी अनुदानापैकी फक्त रु.७००.५३ कोटी (४७ टक्के) खर्च झाले होते. ज्याचे मुख्य कारण म्हणजे नोव्हेंबर २००९ मध्ये GoI ने सूचना जारी करूनही विभागाने १२ महिन्यांपेक्षा जास्त काळात स्वयंपाकावरील खर्च सुधारित केला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

दि.२४/११/२००९ च्या केंद्र शासनाच्या पत्रान्वये अन्न शिजविण्याचा खर्च सुधारित करण्यात आला होता. तसेच, सदर योजनेचे निधीचे प्रमाण केंद्र : राज्य हे ७५ : २५ करण्यात आले होते. त्यानुसार केंद्र शासनाने अन्न शिजविण्याचा खर्च आणि स्वंयपाकी तथा मदतनीस यासाठी लागणारा अतिरिक्त निधी केंद्र शासनास मागणी करण्याबाबत तसेच, राज्य शासनास तरतूद करण्याबाबत कळविले होते. यानुषंगाने शासनाने दि.१९/०१/२०१० च्या पत्रान्वये केंद्र शासनास अतिरिक्त तरतूदीची मागणी केली. तसेच, वित्त विभागास खर्चाच्या सुधारित दरास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव आणि रु.१२१.०४ कोटी इतक्या अतिरिक्त पूरक मागणीचा प्रस्ताव दि.२५/०५/२०१० रोजी सादर केला. सदर पूरक मागणीच्या प्रस्तावास पावसाळी अधिवेशन २०१० मध्ये विधान मंडळाद्वारे मान्यता देण्यात आली. यास वित्त विभागाच्या मान्यतेनंतर शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खर्चाच्या सुधारित दरामध्ये वाढ करण्याबाबतचा शासन निर्णय दि.०२/०२/२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आला. वित्त विभागाने शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून खर्चाचे सुधारित दर लागू करण्याबाबत निर्देश दिले होते.

**शिफारस**

**१.२२ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदांतर्गत वित्तीय व्यवस्थापनाचा अभाव असल्याचे आक्षेप नोंदविले आहेत. विभागाने स्वयंपाकावरील खर्च सुवेळेत सुधारीत न केल्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित तर राहिलाच शिवाय केंद्र शासनाकडून येणारा पुढील निधी देखील प्राप्त झाला नाही. सन २०१० मध्ये अन्न शिजविण्याच्या दराचे मापदंड बदलण्यात आले होते. केंद्र शासनाने सन २००९ मध्ये सुधारीत दर जाहिर केल्यानंतरही राज्य शासनाने दीड वर्ष उशिराने हा निर्णय जाहिर केला. परिणामी या निर्णयाची अंमलबजावणी भविष्यलक्षी प्रभावाने केल्यामुळे मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत अन्न शिजविण्याकरिता जुन्या दराने रक्कम वाटप करण्यात येत होती. अंमलबजावणीतील विलंबाबाबत समितीने विचारणा केली असता पुरवणी मागणी मंजूर करून घेणेसाठी लागलेल्या कालावधीमुळे हा विलंब झाल्याचे सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित पुरवणी मागणी मान्य झाल्यानंतर तरी तात्काळ शासन निर्णय**

**निर्गमित करणे आवश्यक असताना तो जवळ जवळ ८ महिने विलंबाने निर्गमित करण्यात आला. प्रस्ताव मान्यतेसंदर्भातील तांत्रिक बाबींची पुर्तता करण्यामध्येच हा कालावधी गेल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु वास्तविक शासनाने पुरवणी मागणी मंजूर केल्यानंतरच यासाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक बाबींची तात्काळ पुर्तता करून शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक असताना त्यासाठी ७ महिने विलंब झाला. परिणामी शालेय शिक्षण विभागाने केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी गमावला. या बाबी निश्चितच गंभीर असून विभागाने केंद्राकडून प्राप्त होणाऱ्या आर्थिक मदतीबाबत अधिक सजग व तत्पर राहून जास्तीत जास्त मदत राज्य शासनाला प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी वेळेत न केल्यामुळे राज्याचे निश्चितच नुकसान झाले आहे. अन्न शिजवण्याचे कमी दराने पैसे देण्यात आले. अतः उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर विभागाने कारवाई करून भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी. तसेच शासनाने स्वयंपाकावरील खर्च व मानधन अदा करण्यातील अडचणींवर तोडगा काढण्यासाठी शाळांना निधीचे थेट हस्तांतरण करण्यासाठी त्वरीत उपाययोजना करावी. तसेच केंद्राकडून व राज्याकडून या योजनांना प्राप्त होणारा निधी वेळेत खर्च करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.३.१ " निधी मुक्त करण्यातील विलंब "**

**अभिप्राय**

**१.२३** केंद्र शासनाच्या अनुदान मुक्तता आदेशात नमूद केलेल्या अटींनुसार केंद्र शासनाने योजनेसाठी अनुदान मुक्त केल्यावर त्वरीत राज्य शासनाने केंद्राकडून प्राप्त झालेल्या अनुदानाबरोबर त्यांचा स्वतःचा किमान अनिवार्य तेवढाच हिस्सा नोडल संस्थांना मुक्त करावा, ज्यांनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी तो आठवडयाच्या आत जिल्हे / गट / शाळा यांना मुक्त करावा. परंतु असे असताना जिल्ह्यांना नोडल संस्थांकडून प्राप्त होणारी अनुदाने मुख्य लेखे व वित्त अधिकारी यांच्याकडील जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधीत जमा केली जातात. ही अनुदाने नंतर शाळांना वितरीत करण्यासाठी गटांना मुक्त केली जातात. निवड केलेल्या आठ जिल्ह्यांकडून पुढे (मुंबई व्यतिरिक्त) गटांना अनुदाने मुक्त करण्यात मोठया प्रमाणात विलंब झाला होता. बऱ्याच मध्यस्त पातळया असल्याने अनुदाने मुक्त करण्यात विलंब झाला होता ही वस्तुस्थिती शासनाने मान्य केली आणि म्हणूनच सर्व जिल्हापरिषदांना अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, Real Time Gross Settlement (RTGS) व्दारे थेट जिल्ह्यांकडून शाळांना स्वयंपाकाचा खर्च व मानधन यासाठी अनुदाने मुक्त करावी असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**१.२४ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नमूद केलेले आक्षेप मध्यान्ह आहार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीदृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. या आहारासाठीचा निधीच जर शासनाने वेळेत उपलब्ध करून दिला नाही तर या योजनेची अंमलबजावणी अखंडीत पध्दतीने सुरु राहणे शक्य नाही. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या वेगवेगळया विभागांबरोबर समन्वय प्रस्थापित करणे, धोरणात्मक निर्णय घेणे, अन्नधान्याचे वाटप व उचल यावर संनियंत्रण ठेवणे, यासाठी जिल्हास्तरीय संनियंत्रण मार्गदर्शन समिती (SSMC) गठीत केली (मार्च २००५). माहे ऑगस्ट, २०१० मध्ये मुलांना विहित दर्जा आणि मात्रेत शिजलेले अन्न देता यावे यासाठी SSMC ने शाळांना स्वयंपाकासाठीचा खर्च आगावू देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. परंतू धोरणात्मक निर्णयाच्या विरुध्द जिल्हा / गट अधिकाऱ्यांनी मात्र प्रत्यक्ष खर्च झाल्यावरच शाळांना रक्कम प्रदान करणे सुरु ठेवले. निवडक २३९ शाळांपैकी १८० शाळांमध्ये परिस्थिती अधिकच दयनीय होती कारण स्वयंपाकावरील खर्च आणि स्वयंपाकी नि सहाय्यकांचे मानधन यांची प्रतिपूर्ती करण्यात एक महिना ते २४ महिन्यांचा विलंब झाला होता. स्वयंपाकावरील खर्च व मानधनाचे प्रदान विलंबाने होण्यामुळे आवश्यक दर्जा व मात्रेत शिजवलेले अन्न पुरविण्यात तडजोड केली जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. शासनाने सांगितले की, शाळांना स्वयंपाकावरील खर्चाची रक्कम आगावू मुक्त करण्याचा निर्णय विभागाकडून वित्त विभागाशी विचारविनिमय करून घेतला जात होता. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत निधी वितरणाच्या धोरणात्मक निर्णयातील बदलामुळे सन २०१३-१४ मध्ये निधी वितरणामध्ये काही प्रमाणात उशिर झाला. शाळा स्तरावर निधी वितरित करताना बऱ्याच टप्प्याद्वारे निधी वितरित होत होता. त्यामुळे शाळास्तरावर निधी मिळण्यास विलंब होत होता. त्यामुळे शिक्षण आयुक्त यांनी दि.०३/११/२०१६ च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हयांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना इंधन-भाजीपाला अनुदान आणि स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन थेट जिल्हास्तरावरुन शाळास्तरावर RTGS द्वारे करण्याचे निर्देश दिले आहेत. सन २०१५-१६ पासून वित्त विभागाने निधी वितरणाचे अधिकार संबंधित विभागांना दिले आहेत.**

**सदर योजनेंतर्गत अन्न शिजविण्याचा खर्च संबंधित अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांना आगाऊ स्वरुपात देण्याबाबत वित्त विभागाची मंजूरी मिळू शकलेली नाही. तथापि, सन २०१८-१९ पासून इंधन व भाजीपाला यासाठीचा निधी प्राथमिक शिक्षण संचालनालयास्तरावरुन**

**थेट शाळा व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने दि.०२/०४/२०१८ च्या पत्रान्वये घेतला आहे. यामुळे प्रत्येक जिल्ह्यात एकाच वेळी इंधन व भाजीपाला यासाठीचा निधी जलद गतिने वितरीत करणे शक्य होणार आहे. निधी वितरण ध्क्रच प्रणालीद्वारे होणार असल्याने याबाबत होणाऱ्या विलंबावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. अतः याची अंमलबजावणी विभागाने प्रभावीपणे करावी व कोणत्याही परिस्थितीत निधीच्या अनुपलब्धतेमुळे मध्यान्ह आहार योजनेच्या अंमलबजावणीत खंड पडू नये याची विभागाने काळजी घ्यावी व भविष्यात असे आक्षेप टाळावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.३.२ "रोख पुस्तिका आणि बँकेची विवरणे यामधील शिल्लकींचा ताळमेळ न घेणे"**
**अभिप्राय**

१.२५ MCGM मुंबई येथील या योजनेसंदर्भातील कक्ष प्राप्त व संवितरीत अनुदानांचे लेखांकन करण्यासाठी प्राथमिक वर्गांसाठी एक आणि उच्च प्राथमिक वर्गांसाठी दुसरे अशा दोन रोख पुस्तिका ठेवते. सन २०१०-१५ या कालावधीसाठीच्या रोख पुस्तिकांच्या चाचणी तपासणीत सुरुवातीच्या आणि अंतिम शिल्लकींमध्ये विसंगती आढळून आल्या. या नोंदी लेखा अधिकाऱ्याने साक्षांकीत करूनही त्यांना विसंगतीचा तपास लागला नव्हता. दि.३१ मार्च,२०१५ रोजी प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गासाठीच्या रोख पुस्तिकेतील शिल्लकी आणि बँक विवरणे यातील फरक अनुक्रमे रु.७.६४ कोटी व रु.८.७७ कोटी होता ज्याचा डिसेंबर,२०१५ पर्यंत ताळमेळ घेतला गेला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सध्या मुंबई महानगरपालिकेमार्फत योजनेचा निधी NEFT द्वारे वितरित करण्यात येत आहे. त्यामुळे रोख पुस्तिका व बॅक विवरण यामध्ये तफावत राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही. जिल्हा परिषद स्तरावर अनेक योजनांचा निधी जिल्हयाच्या जिल्हा फंडामध्ये जमा होत असतो. शालेय पोषण आहार या योजनेसह इतर सर्व योजनांचा जिल्हा स्तरावर आलेला निधी जिल्हा फंडामध्ये जमा होतो. सदर योजनेकरिता स्वतंत्र खाते जिल्हास्तरावर उपलब्ध नाही.

या योजनेतंर्गत अन्न शिजविण्याकरिता येणाऱ्या खर्चाचे अनुदान सन २०१८-१९ पासून राज्यस्तरावरुन थेट शाळाव्यवस्थापन समितीच्या खात्यावर PFMS प्रणालीव्दारे जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे एकाच वेळी सर्व शाळांना निधी वितरीत करणे शक्य झाले आहे. PFMS प्रणालीव्दारे निधी वितरण होत असल्याने रोख पुस्तिकेतील शिल्लक रक्कम व बँक विवरणपत्रामधील शिल्लक रक्कम यामधील ताळमेळ ठेवणे सुलभ झाले आहे असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**१.२५ सदरहू आक्षेप अतिशय गंभीर स्वरुपाचे असून रोख पुस्तिका आणि बँकेची विवरण पत्रे यामधील शिलकीचा ताळमेळ न घेणे अथवा त्यात विसंगती वा तफावत आढळून येणे या सर्व बाबी वित्तीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या असून कोणत्याही परिस्थितीत आर्थिक शिस्तीला अनुसरुन नाहीत. निधी, खर्च व शिल्लक याचा ताळमेळ विहित मुदतीत न जुळविल्यामुळे ही तफावत वाढतच जाते. विभागाने रोख पुस्तिका अद्ययावत ठेवणे व बँकेच्या विवरण पत्रामधील शिलकीचा ताळमेळ नियमितरित्या ठेवणे बंधनकारक असताना हा ताळमेळ न ठेवल्यामुळे कोट्यवधी रुपयांची तफावत यात दिसून आल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. अशाप्रकारे दिसून आलेली रकमेची तफावत ही केवळ तांत्रिक त्रुटी वा उणिवांशी व त्याच्या पुर्ततेशी निगडीत व मर्यादीत नसून यात निधीचा गैरव्यवहार व अनियमितता असण्याची देखील पुर्ण शक्यता आहे. त्यामुळे जोपर्यंत हा ताळमेळ अचूकरित्या पुर्ण केला जात नाही तोपर्यंत गैरव्यवहाराच्या शंकेचे पुर्णपणे निरसन होवू शकणार नाही. आता विभागाने यासाठी पब्लिक फायनान्स मॅनेजमेंट सिस्टिम सुरु केल्यामुळे प्रत्येक शाळेकडून त्यांनी केलेल्या खर्चाची ऑनलाईन नोंद इंटरनेटच्या माध्यमातून संगणकाद्वारे करण्यात येते व केंद्र शासनापासून संबंधित शाळेपर्यंत खर्चाची व शिलकीची माहिती सर्वांना पाहणे शक्य असल्यामुळे या योजनेत मोठ्या प्रमाणात पारदर्शकता आलेली आहे. पहिले हा निधी तालुका पातळीवरुन देण्यास उशिर होत असल्याने तो नंतर जिल्हा पातळीवरुन देण्यास सुरुवात करण्यात आली. परंतु आता मात्र राज्य स्तरावरुन थेट शाळेला निधी देण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे. याअगोदर शाळांमध्ये या कार्यपध्दतीचा अवलंब झालेला नसल्यामुळे प्रत्येक शाळेचा हिशोब येईपर्यंत वाट पाहावी लागत होती व त्यानंतरच निधी वितरीत करण्यात येत होता. हा विलंब टाळण्यासाठी PFMS सिस्टिम सुरु केल्यामुळे आता या अडचणी मोठ्या प्रमाणात दुर झालेल्या आहेत. परंतु महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेल्या कालावधीतील नोंदीचा ताळमेळ घेणे व त्याअनुषंगाने निधीचा अपव्यय व गैरव्यवहार झाल्याच्या शंकेचे निरसन करून घेणे देखील अत्यंत आवश्यक आहे. अतः शासकीय रकमेच्या दुर्विनियोगाचा धोका टाळण्यासाठी रोख पुस्तिकेतील शिल्लक रकमा आणि बँक विवरण पत्रे यामधील फरकाचा ताळमेळ करून घ्यावा व यामध्ये येणारी**

**तफावत व विसंगती असलेल्या रकमेची तपासणी करून आवश्यक ती कारवाई शासनाने करावी व भविष्यात हा ताळमेळ नियमितरित्या घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४ "योजनेची अंमलबजावणी"**

**परिच्छेद क्र.२.३.४.१ "सर्व शालेय दिवसांत शिजवलेले अन्न पुरविण्यातील तूट"**

**अभिप्राय**

**१.२७** मध्यान्ह आहार योजनेतील तरतूदीनुसार शाळेत उपस्थित असलेल्या आणि योजनेअंतर्गत लाभ मिळण्यास पात्र असणाऱ्या प्रत्येक बालकाला सर्व शालेय दिवशी मध्यान्ह आहार देण्यात यावा. निवडक २६९ शाळांमधील अन्नधान्य साठा नोंदवह्या आणि इतर संबंधीत दस्तऐवजांच्या तपासणीत आढळले की, २०१०-१५ दरम्यान १७५ शाळांनी प्रत्येक वर्षी सरासरीने सर्व शालेय दिवशी मुलांना शिजवलेले आहार दिला नव्हता. तसेच, १७५ पैकी १८ शाळांनी प्रत्येक वर्षी ८६ शालेय दिवस व १७५ पैकी चार शाळांनी १४६ शालेय दिवस शिजवलेला आहार दिला नव्हता. नांदेड जिल्ह्यातील दोन शाळांनी २०१२-१४ व २०१४-१५ दरम्यान मुलांना कोणताही आहार पुरविला नव्हता.

सर्व शालेय दिवशी मुलांना शिजवलेला आहार न देण्याबद्दल २३९ शाळांपैकी ७९ शाळांनी नोडल संस्थांनी नियुक्त केलेल्या कंत्राटदाराकडून तांदूळ मिळण्यातील विलंब आणि स्वयंपाकावरील खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यातील विलंब ही कारणे दिली होती. उर्वरित १६१ शाळांनी सर्व शालेय दिवशी आहार न पुरविण्यासाठी कोणतीही विशिष्ट कारणे दिली नाहीत. तसेच योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे राज्यांनी प्रत्येक शाळेत अन्नधान्याचा किमान एक महिन्याचा राखीव साठा ठेवण्यात येत असल्याची खात्री करावी. २३९ शाळांमधील ३१ मार्च रोजी असलेला तांदूळाचा शिल्लक साठा तपासला असता तांदूळ मिळण्यास विलंब झाल्यास मध्यान्ह आहार पुरविण्यात खंड पडू नये यासाठी राखून ठेवावयाचा एक महिन्याचा राखीव साठा सरासरी १३८ शाळांमध्ये ठेवण्यात आला नव्हता, ही बाब निश्चितीच गंभीर आहे.

सदरहू योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर स्वरुपाचे असून या संपुर्ण योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहेत. मध्यान्ह आहार पुरविण्यात खंड पडू नये यासाठी शाळांमध्ये एक महिन्याचा शिल्लक धान्य साठा उपलब्ध असणे आवश्यक असताना १३८ शाळांमध्ये अशाप्रकारचा साठा दिसून आला नाही असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. या प्रकरणी संबंधित शाळांकडून खुलासा मागविण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. शाळांकडून मागणी प्राप्त झाल्यानंतर पुरवठादारांनी पुढील ५ दिवसांच्या कालावधीत धान्याचा पुरवठा करणे बंधनकारक असून त्यास विलंब झाल्यास पुरवठादारावर दंड आकारण्याची तरतूद देखील निविदाकरारात विनिर्दीष्ट असताना त्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे असे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. मध्यान्ह भोजनामध्ये खंड पडण्यामागे विद्यार्थी शाळेत न येणे, स्वाईन फ्ल्यु, अतिवृष्टी, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय क्रीडा स्पर्धा अशी अनेक कारणे समितीसमोर सांगण्यात आली. परंतु १७५ पैकी फक्त ८६ दिवस भोजन देण्यात आले आहे. काही शाळांनी १४६ दिवस भोजन दिले. तसेच नांदेड जिल्ह्यातील २ शाळांनी सन २०१२-२०१५ दरम्यान विद्यार्थ्यांना कोणताही आहार पुरविला नव्हता. खंड पडलेला कालावधी हा फार मोठा असल्यामुळे ही कारणे निश्चितच समर्थनीय नाहीत. या बाबी अतिशय गंभीर असून केंद्र पुरस्कृत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत निश्चितच बाधा आणणाऱ्या आहेत.

**शिफारस**

**१.२८ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर असून शिजविलेल्या अन्न पुरवठ्यामध्ये कोणत्याही कारणास्तव पडणारी तूट निश्चितच समर्थनीय नाही. अंमलबजावणीमध्ये ही तफावत येणाची कारणमिमांसा समितीने शोधली असता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा या धोरणाची अंमलबजावणी करतात, परंतु अनुदानित शाळा मात्र याची अंमलबजावणी करीत नाहीत असे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने तीव्र नापसंती व्यक्त करून केंद्र पुरस्कृत योजना राज्यस्तरावर राबविणे व त्याच्या अटी शर्ती व मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे शाळांवर बंधनकारक असतानाही अशा शाळा याची अंमलबजावणी टाळत असतील तर त्यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता असून त्यांचे अनुदान देखील बंद करण्याचे अधिकार विभागाकडे असताना विभागाकडून कोणतीही कठोर कारवाई या शाळांसंदर्भात करण्यात येत नाही. या योजनेची अंमलबजावणी ऐच्छिक नसून अनिवार्य आहे. असे असताना नांदेड येथील इंदिरा गांधी गर्ल्स प्रायमरी स्कुल आणि प्रतिभा निकेतन प्रायमरी स्कुल, नांदेड यांनी त्याची अंमलबजावणी केली नव्हती. तांदळाचा पुरवठा कंत्राटदाराकडून वेळेत न होणे हे त्यामागील एक कारण असून आहार शिजविण्याच्या खर्चाची प्रतिपूर्तीमध्येही विलंब झाल्यामुळे या बाबी घडल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. PFMS सिस्टिममुळे यावर बरेच नियंत्रण आले असून पुरवठ्यामध्ये जर उशिर झाला तर विभागास कारवाई करता येते. परंतु हा विलंब टाळण्यासाठी धान्याचा पुरवठा विहित मुदतीत व अन्न शिजविण्याच्या रकमेची प्रतिपूर्ती वेळेत करणे देखील आवश्यक आहे. विभागाने आता यात सुधारणा केलेली आहे परंतु महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपावेळी मात्र निश्चितच या उणिवा राहिल्यामुळे योजनेची अंमलबजावणी बाधित**

**झालेली आहे. त्यासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची व पुरवठादाराकडून दंड वसुल करण्याची आवश्यकता आहे. विभागाने योग्यवेळी पुरवठारांकडून दंड वसुल केला असता तर योजनेच्या अंमलबजावणीत तुलनात्मकदृष्ट्या कमी खंड पडला असता. या प्रकरणी कित्येक शाळांनी तर खुलाशाचे उत्तर देखील विभागास सादर केले नाही. अशी जर या शाळांची भूमिका असेल तर त्यावर देखील आळा व निर्बंध घालण्याची आवश्यकता आहे. सदरहू योजना सन १९९५ साली सुरु झाली असतानाही यात टप्प्या टप्प्याने आजतागायत सुधारणा करण्याचे काम सुरुच आहे व इतकी महत्वाची योजना प्रायोगिक तत्वासारखी राबविणे निश्चितच योग्य नाही.**

**अतः या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या पुरवठादार व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर विभागाने तात्काळ कारवाई करावी व दंडाची आकारणी करून ती वसुल देखील करावी. तसेच शाळास्तरावर २० शालेय दिवस पुरेल इतका धान्य साठा शिल्लक असताना शाळांनी तांदुळ व धान्यादि मालाची मागणी पुरवठा दाराकडे नोंदविण्यात यावी. पुरवठादारानी मागणी नोंदविल्यानुसार २० कार्य दिवसाच्या आत मालाचा पुरवठा न केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. विहित कालावधीत पुरवठा न केलेल्या खंडीत पुरवठ्यापोटी खुल्या बाजारातून धान्यादी मालाचे खरेदी शाळांनी केल्यास त्यासाठी येणारा अतिरिक्त खर्च पुरवठादाराच्या देयकातून वसूल करण्यात यावा. तसेच पुरवठादाराने तांदूळ व धान्यादी मालाचा उशिरा पुरवठा केल्यास त्यास दंड आकारण्याची करारनाम्यात असलेल्या तरतूदीची अंमलबजावणी करण्यात यावी. पुरवठादाराने मालाचा पुरवठा न केल्यास व त्यामुळे विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहिल्यास विद्यार्थ्यांना अन्न सुरक्षा भत्ता देण्याची तरतुद दि.०२/०२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. तसेच, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांच्या आहारात खंड पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. या योजनेंतर्गत अन्न पुरविण्यातील तूट कमीत कमी करावी, असे करताना धान्याचा पुरवठा विहित वेळेत करण्यात यावा व अन्न शिजविण्याच्या रकमेची प्रतिपूर्ती देखील विहित मुदतीत करण्यात यावी व भविष्यात असे आक्षेप टाळावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.२ "स्वयंपाकाच्या खर्चाच्या प्रदानात आणि तांदूळाची उचल/वापर करण्यातील अपर्याप्तता/त्रुटी"**
**अभिप्राय**

**१.२९** योजनेत प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गातील प्रत्येक बालकासाठी अनुक्रमे १०० ग्रॅम आणि १५० ग्रॅम इतका तांदूळ पुरविण्याची तरतूद होती. २००८-०९ पासून प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमधील मुलांना शिजवलेले अन्न देण्याचे कार्य MCGM ने मुंबईतील ISKCON फूड रिलिफ फाउंडेशन वर सोपविले. केंद्र शासनाचे १०० ग्रॅम आणि १५० ग्रॅम हे प्रमाणक अधिक असल्याच्या सबबीवर प्रती बालक प्रती दिवस सरासरी ४० ग्रॅम तांदूळाची उचल करण्यास परवानगी देणेबाबत व तांदूळ शिजवताना त्यात इतर पदार्थ मिसळले जाणार असल्याने स्वयंपाकावरील खर्चात त्या प्रमाणात कपात केली जाऊ नये अशी ISKCON ने MCGM ला विनंती केली असता केंद्र शासनाने विहित केलेल्या उष्मांक व प्रथिने घटकांचे प्रमाण कायम रहावे यासाठी तांदूळात डाळी, शेंगदाणे, सोयानगेटस् इत्यादी अतिरिक्त पदार्थ मिसळले जाणार असतील तर प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांसाठी प्रती बालक प्रती दिवस अनुक्रमे ५० ग्रॅम व ७५ ग्रॅम तांदूळ वापरण्यास ISKCON ला परवानगी देण्यात आली.

सन २०१०-१५ दरम्यान MCGM ने ६.८५ कोटी रुपये (४० ग्रॅम तांदुळाच्या आधारावर) भोजनांच्या स्वयंपाकाच्या खर्चापोटी ISKCON ला रु.२३.५१ कोटी (१०० ग्रॅम प्रमाणे) मंजूर केले. प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांसाठी १०० ग्रॅम भात शिजवण्यासाठी निश्चित केलेल्या तत्कालीन दराने रु.२३.५१ कोटी इतका स्वयंपाकावरील खर्च अदा करण्यात आला होता. ISKCON ने तांदूळ शिजवताना त्यात इतर पदार्थ मिसळल्याने १०० ग्रॅम व १५० ग्रॅम साठीच्या संपूर्ण स्वयंपाकाचा खर्च अदा करण्यात आला होता असे सांगण्यता आले.

स्वयंपाकावरील रु.२३.५१ कोटीचा संपूर्ण खर्च अदा करणे आणि त्याच्या समर्थनार्थ शासनाने दिलेले स्पष्टीकरण तर्कसंगत नव्हते कारण MCGM ने २०१०-१५ दरम्यान ISKCON च्या मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून प्राप्त केलेले तयार अन्नाचे सर्व २३६ नमूने त्यांच्यातील उष्मांक व प्रथिने घटक केंद्र शासनाने विहित केलेल्या प्रमाणात नसल्याने प्रयोगशाळेतील चाचण्या अनुत्तीर्ण झाल्या होत्या. सर्वच्या सर्व नमुने चाचणीत अनुत्तीर्ण ठरल्यामुळे शिजविलेल्या अन्नातील पोषणमुल्य कायम ठेवण्यासाठी त्यामध्ये डाळी, शेंगदाणे, सोयानगेटस् इत्यादी अतिरिक्त पदार्थ मिसळले गेले नव्हते अशी धारणा होण्यास कोणतीच शंका नव्हती आणि म्हणूनच २०१०-१५ दरम्यान ISKCON ने उचल केलेल्या प्रत्यक्ष तांदूळाच्या मात्रेच्या (२४,३११.६० क्विंटल) आधारावर रक्कम प्रमाणशीर कमी करून ISKCON ला स्वयंपाकासाठी अदा करावयाची रक्कम रु. ६.८२ कोटी इतकी मर्यादित ठेवण्यासाठी MCGM कडे सबळ कारण होते. परंतु अशी कोणतीही कारवाई MCGM ने केली नाही. तसेच MCGM ने ISKCON शी शिजवलेले अन्न पुरविण्याविषयी केलेल्या करारामध्ये (प्रत्येक वर्षी पुनरुज्जीवीत करावयाचा) जर ISKCON कडून आवश्यक दर्जाचे व वैशिष्ठ्यपूर्ण अन्न पुरविले गेले नाही तर अशा प्रसंगी दंड आकारण्याविषयी कोणतीही अट समाविष्ट नव्हती. तसेच सन २०१०-१५ दरम्यान २३६ नमूने चाचणीत अनुत्तीर्ण झाल्यावर MCGM ने अशा प्रत्येक अनुत्तीर्ण नमून्यासाठी ISKCON वर फक्त रु. २०००/- दंड आकारला परंतू २०१०-१५ दरम्यान ISKCON ला अदा केलेल्या वाढीव स्वयंपाक खर्चाच्या (रु.२३.५१ कोटी) वैधतेचे किंवा आवश्यकतेचे मूल्यमापन केले

नव्हते. विभागाने ISKCON च्या बाबतीत ज्यावेळी प्रती बालक प्रती दिवस ५० ग्रॅम तांदूळाची (प्राथमिक वर्गांसाठी) आणि ७५ ग्रॅम तांदूळाची (उच्च प्राथमिक वर्गांसाठी) उचल अशी प्रमाणकातील घट मान्य केली होती त्याचवेळी मुंबईतील ३४१९ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना जी २८८ इतर मध्यवर्ती स्वयंपाकगृहे शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करीत होती ती मात्र GoI च्या प्रमाणकानुसार प्रतीबालक प्रती दिवस १०० ग्रॅम व १५० ग्रॅम तांदूळाची उचल करीत होती हे आश्चर्यकारक होते. परंतु या २८८ मध्यवर्ती स्वयंपाकगृहांनी तांदूळाच्या साठा नोंदवह्या न ठेवल्यामुळे प्राप्त झालेला व वापरलेला तांदूळ यांचे प्रत्यक्ष प्रमाण विभागाला पडताळता न आल्याने ही समस्या आणखीन वाढली. योगायोगाने, वाहतूक कंत्राटदाराने बेकायदेशीररित्या आर्थिक लाभ प्राप्त करण्यासाठी वेगवेगळया मध्यवर्ती स्वयंपाकगृहातील (२८८ पैकी) तांदूळ मोठया प्रमाणात खुल्या बाजारात वळविल्याच्या तक्रारीबद्दल विभागाने आधीच तपासणी सुरु केली होती. यावरुन मुंबईतील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील मुलांना किती तांदूळाची प्रत्यक्षात आवश्यकता आहे याचा आढावा घेण्यासाठी विभागाने त्वरीत हस्तक्षेप करण्याची गरज अधोरेखीत होते. तसेच ISKCON ने मध्यान्ह आहार योजनेसाठी वेगवेगळया परदेशी तसेच भारतीय संस्थांकडून रु.३६.०८ कोटीच्या देणग्या प्राप्त केल्या होत्या. या योजनेसाठी केंद्र/राज्य शासनाकडून संपूर्णपणे निधी प्राप्त होतो आणि मुलांना शिजविलेले अन्न पुरविण्यासाठी विहीत प्रमाणकांनुसार निधी मुक्त केला जात होता म्हणून या योजनेसाठी ISKCON ने देणग्या स्वीकारणे अयोग्य होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

समितीने यासंदर्भात तपासणी केली असता शासन निर्णय दि. १८ जून, २००९ अन्वये प्राथमिकसाठी विहित केलेल्या पाककृतीनुसार शिजविलेल्या आहाराचे वजन ३०० ते ३२५ ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी ४५० ते ४७५ ग्रॅम असे नमूद केले होते. शासन निर्णय दिनांक ०२/०२/२०११ नुसार शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खर्चाचे सुधारित दर लागू करून मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच शालेय पोषण आहार योजनेंतर्गत द्यावयाच्या पाककृतीच्या तपशिलामध्ये तांदूळ व धान्यादी माल वापरण्याचे प्रमाण दिले आहे. त्यानुसार इ. १ ली ते ५ वीसाठी १०० ग्रॅम तांदूळ व इतर आवश्यक पूरक पदार्थ (कडधान्य, भाजीपाला) वापरुन प्रतिविद्यार्थी २५० ते २७५ ग्रॅम वजनाचा ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार आणि इयत्ता ६ वी ते ८ वीसाठी १५० ग्रॅम तांदूळ व इतर आवश्यक पूरक पदार्थ (कडधान्य, भाजीपाला) वापरुन प्रतिविद्यार्थी ३७५ ते ४०० ग्रॅम वजनाचा ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार द्यावयाचा होता.

परंतु या संस्थांकडून घेण्यात आलेल्या शिजविलेल्या अन्नाचे नमूने प्रयोगशाळेत मोठ्या प्रमाणात अनुत्तीर्ण झाल्यामुळे शासनाने विहित केलेली पाककृती व वापरावयाचे धान्यादी मालाचे घटक यानुसार प्रत्यक्षात अन्न शिजविले असता त्याचे वजन प्रस्तुत शासन निर्णयात नमूद केलेल्या वजनापेक्षा जास्त येत असल्याचे दिसून आले आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत शासनाने विहित केलेले पाककृती नुसार अन्न शिजविल्यास त्याचे वजन प्राथमिकसाठी ४२५ ते ४६० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी ७६४ ग्रॅम इतकी येत असल्याचे आढळून आले आहे. शिजविलेल्या अन्नाचे वजन हे त्यामध्ये वापरलेले अन्न, भाजीपाला व पाण्याचे प्रमाण यावर बऱ्याच अंशी अवलंबून असते.

उपरोक्तप्रमाणे प्रत्यक्षात केलेल्या प्रात्यक्षिकाच्या आधारे प्राथमिकसाठी ४०० ते ४५० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी ७०० ते ७५० ग्रॅम येत असल्याचे दिसून आल्याने अगोदर काढण्यात आलेल्या शासन निर्णयात नमूद प्रमाण हे चुकीचे असल्याचे सप्रमाण सिध्द झाले. त्यामुळे प्रस्तुत शासन निर्णयात बदल करून दि. २८/११/२०१७ च्या शासन निर्णयान्वये इयत्ता १ ली ते ५ वीसाठी शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ४०० ते ४५० ग्रॅम वजनाचा ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार आणि इयत्ता ६ वी ते ८ वी साठी शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ७०० ते ७५० ग्रॅम वजनाचा ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार द्यावयाचा आहे, अशी सुधारणा करण्यात आली.

ईस्कॉन या सेवाभावी संस्थेकडून शालेय पोषण आहार योजना राबविण्यासाठी वेगवेगळया परदेशी तसेच भारतीय संस्थाकडून देणग्या घेतल्या असल्याने याबाबत खुलासा सादर करण्यास शासनाने दि.११/०३/२०१५ च्या पत्रान्वये ईस्कॉन या संस्थेस कळविले असता दि. ०८/०४/२०१५ च्या पत्रान्वये केंद्र सरकारने दि. १२/०२/२०१५ रोजीच्या पत्रानुसार ईस्कॉन संस्थेस अशाप्रकारे देणग्या गोळा करण्यास अनुमती दिल्याचे निदर्शनास आले.

या योजनेंतर्गत शिजविलेल्या अन्नामध्ये विहित उष्मांक व प्रथिने समाविष्ट आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी शिजवलेल्या अन्नाच्या नमुन्याची नियमित तपासणी अधिकृत व शासनमान्य प्रयोगशाळेकडून करून घेणे आवश्यक असून नमुना तपासणी केलेल्या १८४ पैकी १५७ पात्र आणि २७ अपात्र नमुने आढळून आले.

**शिफारस**

**१.३० सदरहू प्रकरणाची सखोल छाननी समितीने केली असता शिजविलेल्या अन्नाचे वजन व त्यातील उष्माकांचे प्रमाणच शासन निर्णयात चुकीचे दर्शविल्यामुळे हा संपुर्ण गोंधळ झालेला आहे व त्यामुळेच हे अन्नाचे नमूने मोठ्या प्रमाणात अपात्र ठरले. महानगरपालिकेने प्रात्यक्षिकाद्वारे ही तपासणी केल्यानंतर वस्तुत: निदर्शनास आलेल्या प्रमाणाच्या आधारे अगोदरच्या शासन निर्णयास शुध्दीपत्रक काढून हे प्रमाण वाढविण्यात आले. शासनाने शासन निर्णयातील त्रुटी व उणिवा निदर्शनास आणून त्यास**

शुध्दीपत्रक काढून त्या दुर केल्यामुळे जास्तीत जास्त नमुने आता पात्र ठरले आहेत. तत्कालिन परिस्थितीत शासन निर्णयात जे प्रमाण नमूद होते त्या प्रमाणानुसारच महानगरपालिकेला या योजनेची अंमलबजावणी करणे आवश्यक असल्यामुळे त्यावेळी ईस्कॉनवर दंड ठोठावण्यात आला होता व तो त्यांच्या देयकातून वसुलही करण्यात आला. परंतु शासन निर्णयातील त्रुटी जर विभाग मान्य करीत असेल तर ईस्कॉनकडून वसुल करण्यात आलेल्या दंडाची रक्कम परत करण्याची तसेच थांबविलेले देयकांचे प्रदान तातडीने करण्याची आवश्यकता असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता शासनाच्या व महानगरपालिकेच्या विभागीय प्रतिनिधींनी यास सहमती दर्शविली.

शासनाने काढलेला सुधारीत शासन निर्णय हा पुर्वलक्षी प्रभावाने लागू आहे किंवा कसे याबाबत समितीने विचारणा केली असता आताचा शासन निर्णय हा केवळ तांत्रिक बाबीची स्पष्टता करण्यासंदर्भात असून त्यात फक्त गुणांकन बदलणार असून अन्य कोणताही बदल नाही. आधीपासूनच ती शासन निर्णयातील चूक असल्यामुळे आता ही केलेली दुरुस्ती पुर्वलक्षी प्रभावाने लागू राहिल असेही समितीसमोर स्पष्ट करण्यात आले. ईस्कॉन व्यतिरिक्त अन्य २८८ संस्थांच्या प्रकरणात देखील विभागाने ज्यांचेवर दंड लावलेला आहे. त्या प्रकरणी देखील सुधारीत शासन निर्णयाच्याआधारे योग्य तो निर्णय गुणवत्तेनुसार घेऊन दंडाची रक्कम परत करणे आवश्यक आहे.

ईस्कॉनला अन्न शिजविण्यासाठी दिलेल्या खर्चाच्या आक्षेपासंदर्भात समितीसमोर स्पष्ट करण्यात आले की, तांदूळ व डाळी व्यतिरिक्त ईस्कॉन या खिचडीत अतिरिक्तरित्या शेंगदाणे, सोयानगेटस्, गाईचे तुप, कडधान्ये व पालेभाज्या यांचा समावेश करीत असून या अतिरिक्त वस्तुंचा खर्च ते स्वतः करतात. भारतात या क्षेत्रात दोन मोठ्या संस्था कार्यरत असून (ईस्कॉनसह) देशात मोठमोठ्या शहरांमध्ये मुलांच्या पोषण आहारातील अडचणी सोडविण्याच्यादृष्टीने त्या कार्यरत असतात. तसेच या दोन्ही संस्थांनी मध्यान्ह भोजन योजनेचा समावेश त्यात केल्यामुळे त्यांना देणगी स्वरुपात मोठ्या प्रमाणात रक्कम मिळत असते. ईस्कॉन संस्था विभागाकडून केवळ तांदूळ घेते व त्यांना शिजविण्याचा खर्च शासन देते व अन्य वस्तुंचा कोणताही खर्च शासन करीत नसताना शासनाची कार्यपध्दती ही संस्थांना चांगले कार्य करण्यास प्रोत्साहन देणारी असली पाहिजे व त्यांचेकडून चूक झाल्यास प्रसंगी कारवाई करण्याची देखील तरतूद असली पाहिजे व या खिचडीच्या माध्यमातून मुलांना पोषक व जास्तीत जास्त उष्मांक व प्रथिने असलेली खिचडी मध्यान्ह आहाराच्या माध्यमातून मिळत असेल, शिवाय ईस्कॉनने तयार केलेली खिचडी ही अत्यंत चविष्ट असून मुले ती आवडीने देखील खात असतील तर अशा परिस्थितीत या प्रकरणी शासनाने व महानगरपालिकेने वेळेत तोडगा काढून या समस्यांचे निराकरण करणे आवश्यक असताना महानगरपालिका या संस्थांकडून केवळ दंड आकारीत राहिली व नंतर हा शासन निर्णयच चुकीचा असल्याचे विभाग मान्य करते. या सर्व बाबींमुळे शासनाची व महानगरपालिकेची एकूणच कार्यपध्दती प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असून चांगल्या संस्थांना अशा योजनांसाठी काम करण्यास प्रोत्साहन देणारी नाही. शिवाय याचा संस्थांना नाहक त्रास देखील सोसावा लागतो.

वास्तविक शिजविलेल्या अन्नात किती उष्मांक व प्रथिने अस्तित्वात आहेत याही पेक्षा मुलांनी किती खिचडी खाल्ली व त्याअनुषंगाने किती आवश्यक ती प्रथिने व उष्मांक मुलांच्या शरीरात गेली हे अधिक गांभीर्याने तपासण्याची आवश्यकता आहे. सदरहू प्रकरणाबाबत शासनस्तरावर असलेल्या त्रुटीचे व त्यानंतर यासंदर्भात केलेले निराकरण पाहता समितीने विभागाची भूमिका मान्य केली. महालेखाकारांनी मात्र या परिच्छेदासंदर्भात समितीस पत्राद्वारे काही आक्षेप नोंदवून विभागाच्या भूमिकेस असहमती दर्शविली व ही सुधारणा भूतलक्षी प्रभावाने न राबविता ती भविष्यासाठी शासनाने लागू करावी अशी भूमिका समितीसमोर स्पष्ट केली. (विवरण जोडल्याप्रमाणे २) परंतु प्रकरणाची उपरोक्त सद्यःस्थिती पाहता ही योजना योग्यरित्या चालू राहण्यासाठी समितीने विभागाची भूमिका देखील ग्राह्य धरावी असे मत समितीने व्यक्त केले.

महालेखाकारांनी सदरहू प्रकरणी आक्षेप नोंदविल्यानंतर महानगरपालिकेने ईस्कॉन या संस्थेचे पैसे देणे थांबविले. परिणामी ईस्कॉने देखील मध्यान्ह आहार बंद करण्याबाबत शासनाला कळविले. ईस्कॉन ही संस्था देश पातळीवर पोषण आहार बहुतांश पुरवठा करणारी केंद्रीय संस्था असून त्यांचे नमुने अपात्र झाल्यामुळे शासनस्तरावरुन ही संपुर्ण तपासणी सुरु झाली. अन्य महिला बचत गटामार्फत तयार करण्यात आलेल्या भोजनामध्ये या अतिरिक्त अन्नपदार्थांचा समावेश नसल्यामुळे त्यांच्या चवीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात तफावत असते. मुलांची आवड व ही खिचडी खाण्याचे प्रमाण पाहता निश्चितच ईस्कॉनने बनविलेल्या आहाराकडे विद्यार्थ्यांचा कल जास्त असतो व आदर्श नमुन्यापेक्षा जास्त खिचडी ही मुले खातात. उपरोक्त सर्व वस्तुस्थिती पाहता ज्याठिकाणी पात्रतेच्या मापदंडाचे तसेच उष्मांक व प्रथिनांच्या विहित प्रमाणाचे पालन होत नसेल तर निश्चितच शासनाने या संस्थांवर दंड वा शास्ती आकारली पाहिजे. परंतु ईस्कॉन या संस्थेसंदर्भात मात्र शासन निर्णयातील त्रुटीमुळे हे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले

**असून ती शासन निर्णयातील त्रुटी आता दुर करण्यात आल्यामुळे सदरहू परिच्छेदातील आक्षेप आता अस्तित्वात राहात नाहीत व ईस्कॉन व अन्य संस्थांनी मागणी केल्यास विभागाकडून शास्तीची वा दंडाची रक्कम परत करण्यात यावी. तसेच मुंबई मधील सर्व मध्यवर्ती स्वयंपाकगृहातील तांदूळाचा साठा तपासण्यासाठी मुंबई महानगरपालिकेमार्फत तपासणी पथकाची स्थापना करून त्यामार्फत प्राप्त तांदूळ, वापरात आलेला तांदूळ व शिल्लक तांदूळ यांचा आढावा नियमितरित्या घेण्यात यावा व त्यात अनियमितता आढल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. शिजविलेल्या अन्नात उष्मांक व प्रथिने समाविष्ट नसतील तर संबंधित संस्थांवर नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी व स्वयंपाकाच्या खर्चाच्या प्रदानात आणि तांदळाची उचल/वापर करण्यातील त्रुटी तात्काळ दुर करून या योजनेची अंमलबजावणी दोषविरहित पध्दतीने अधिक प्रभावी पध्दतीने करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी.**

**परिच्छेद क्र.२.३.४.३ "शिजविलेल्या आहाराचे नमूने अनुत्तीर्ण ठरण्याची मोठया प्रमाणातील टक्केवारी"**

**अभिप्राय**

**१.३१** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये विहित केल्यानुसार मध्यान्ह आहार योजनेमधील पोषण घटक प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गासाठी अनुक्रमे (i) उष्मांक ४५० ते ७०० आणि (ii) प्रथिने १२ ग्रॅम व २० ग्रॅम असणे आवश्यक होते. २०१०-१५ दरम्यान मुंबईमधील २८९ मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून घेतलेल्या आणि MCGM ने त्यांच्या दादर येथील महापालिका प्रयोगशाळेत चाचणी केलेल्या शिजविलेल्या अन्नांच्या १६०० नमून्यांपैकी १५४६ नमूने (९७ टक्के) त्यातील उष्मांक व प्रथिनांच्या प्रमाणासाठी GoI ने विहीत केलेली मात्रा पूर्ण करण्यात अपयशी ठरले होते. उत्तीर्ण न झालेल्या नमुन्यांची अतीव जास्त टक्केवारी ही मुलांना देण्यात येणारे शिजवलेले अन्न, दर्जा, योजनेतंर्गत निश्चित केलेल्या पोषण मुलांच्या प्रमाणकांशी समतूल्य नव्हते याचे निदर्शक होती. तसेच MCGM व्यतिरिक्त राज्यातील ३३ जिल्हा परिषदांपैकी एकही जिल्हा परिषदेने २०१०-१५ दरम्यान शिजविलेल्या अन्नातील उष्मांक मुल्य व प्रथिनाची मात्रा तपासण्यासाठी त्याची चाचणी केली नव्हती. जर शिजविलेल्या अन्नाची चाचणी केली गेली असती तर त्याचे अधिक चांगले परिणाम प्राप्त झाले असते कारण ZPs नियंत्रणाखालील बहुसंख्य शाळा ग्रामीण भागात चालवल्या जातात आणि त्यांच्याकडे मुंबईतील मध्यवर्ती स्वयंपाकगृहात उपलब्ध असणाऱ्या आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध नसतात. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तयार अन्नाचे नमूने अन्न प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्याबाबत स्वतंत्र आर्थिक तरतूद उपलब्ध नाहीत. ग्रामीण भागातील शाळांमध्ये आहार शिजविण्याचे काम गरजू महिला किंवा महिला बचत गट यांच्याद्वारे होत असून निधी अभावी तसेच, स्थानिक पातळीवर शासकीय प्रयोगशाळा उपलब्ध नसल्याने त्यांना तयार आहाराचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे शक्य होत नाही.

अन्नाचे नमूने तपासणीमध्ये अनुत्तीर्ण ठरल्यास शिक्षणाधिकारी यांना नियमानुसार अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांवर दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता असताना त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. राज्यातील ३३ जिल्हापरिषदांपैकी एकाही जिल्हा परिषदेने सन २०१०-१५ दरम्यान शिजविलेल्या अन्नातील उष्मांक मुल्य व प्रथिनांची मात्रा तपासण्याची चाचणी केली नव्हती. जिल्हापरिषद स्तरावर यासाठी विशेष निधीची तरतूद देखील नसते.

**शिफारस**

**१.३२ महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप अत्यंत महत्वाचे असून मुलांच्या पोषण आहारात बाधा आणणारे आहे. वास्तविक केंद्र शासनाच्या योजनेच्या मार्गदर्शक तत्वामध्ये हा आहार नमुना तपासणी ठरवून दिलेल्या प्रयोगशाळेमधून करणे बंधनकारक असतानाही नियमितपणे ही तपासणी होत नाही. काही ठिकाणी तर ५ वर्षातून एकदाही आहार तपासणी करण्यात आलेली नाही. तसेच अशी तपासणी न करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही तसेच अन्नाचे नमुने अनुत्तीर्ण ठरल्यास नियमानुसार या यंत्रणांवर कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यात आली नाही. केंद्र शासनाने या खर्चाची आर्थिक जबाबदारी राज्य शासनाकडे सोपविली आहे व राज्य शासनाकडे मात्र यासाठी कोणतीही निधीची तरतूद न केल्यामुळे मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी होवू शकली नाही. सद्य:स्थितीत खिचडी तयार केल्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक किंवा शालेय समितीचे सदस्य खिचडी वाटप करण्यापूर्वी अर्धा तास अगोदर त्याची चव घेतात व त्याची नोंदवहीमध्ये नोंद करतात. एक नमुना २४ तासासाठी सांभाळून ठेवण्यात येतो. विद्यार्थ्यांनी खिचडी खाल्ल्यानंतर काही घटना घडल्यास तो नमुना तपासणीसाठी पाठविण्यात येतो. सदरहू अवलंबिण्यात येत असलेली कार्यपध्दती ही अतिशय अशास्त्रीय असून योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत अडथळा निर्माण करणारी तर आहेच, परंतु केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणारी आहे. या अस्तित्वात असलेल्या पध्दतीमधून मुलांना या तयार आहाराच्या माध्यमातून विहित उष्मांक वा प्रथिने मिळाले किंवा कसे याची कोणतीही शाश्वती नाही. खिचडी शिजविण्यासाठी येणाऱ्या धान्याची तपासणी करण्यात येते परंतु शिजविलेला आहार दरारोज तपासणीसाठी पाठविण्यात येत नाही व त्या प्रमाणात प्रयोगशाळा देखील उपलब्ध नाहीत. धान्याचा पुरवठा केंद्रीय पध्दतीने करण्यात येतो व त्यासाठी जिल्हानिहाय निविदा प्रक्रिया राबविण्यात येते व निवड**

**झालेल्या पुरवठादाराकडून माल घेण्यापूर्वी त्याची शासनमान्य प्रयोगशाळेमधून तपासणी करण्यात येते. तसेच हा माल प्राप्त झाला हे समजण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांची स्वाक्षरी आवश्यक असते. त्यावर पुरवठादाराचे देयक अदा करण्यात येते. सदरहू कार्यपध्दती ही अतिशय सदोष असून जिल्हानिहाय निविदा प्रक्रिया राबवून पुरवठादाराची नियुक्ती आणि अटी व शर्तींची निश्चिती ही केंद्रीय पध्दतीने करण्यात येते. केवळ धान्य स्विकारण्याची जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापकांची असते. परंतु असे करताना केंद्रीय पध्दतीने केलेल्या करारनाम्याची प्रत ही मुख्याध्यापकांकडे उपलब्ध करून देण्यात येत नसल्यामुळे करारातील अटी शर्तीनुसार मालाचा पुरवठा झाला किंवा कसे याची शहानिशा, तपासणी व निश्चिती करण्यासाठी कोणतीही वाव उपलब्ध नसते. अंतः ज्यांना माल स्विकारायचा आहे त्यांच्याकडे करारनाम्याची प्रत मराठीत व सुलभ भाषेत उपलब्ध नसणे, तसेच करारनामा इंग्रजीत असल्यास गावपातळी अथवा स्थानिक स्तरावरील लोकांना त्यातील अटी शर्तींचा बोध न होणे, परिणामी स्विकारलेले धान्य हे अटी शर्तीनुसार देण्यात येत असल्याची खात्री करता येत नाही. विभागाच्या स्तरावरुन यासाठी नियोजनबध्द यंत्रणा अस्तित्वात असण्याची आवश्यकता असतानाही त्यात मोठ्या प्रमाणात त्रुटी दिसून आल्या. यासाठी करारनाम्याची व त्यातील अटी शर्तींची प्रत जोपर्यंत मुख्याध्यापकांना पुरविण्यात येत नाही तोपर्यंत याची उलट तपासणी करणे मुख्याध्यापकांना करणे शक्य नाही. सदरहू करारनामा हा सुलभ भाषेत व मराठीत असावा व सदरहू करारनामा ज्या दिवशी अंतिम करण्यात येईल त्या दिवशीच तो विभागाच्या वेबसाईटवर टाकण्यात यावा व स्थानिक पातळीपर्यंत सर्वांना तो वेबसाईटवरुन उपलब्ध करून द्यावा. सद्यःस्थितीत MDM पोर्टलवर करारनाम्याची प्रत अपलोड करण्यात येते व त्याची प्रिंट काढून शिक्षणाधिकारी यांना देण्यात येते. सदरहू करारनाम्याची प्रत वेबसाईटवर उपलब्ध करून दिल्यास ती सर्व स्तरावर सहज उपलब्ध होईल व त्याची उलट तपासणी करून त्यातील अटी शर्तीनुसार धान्य स्विकारणे शक्य आहे. परंतु सदरहू परिच्छेदात आक्षेपित केल्याप्रमाणे १६०० नमुन्यांपैकी १५४६ नमुने उष्मांक व प्रथिनांच्या प्रमाणासाठी केंद्र शासनाने विहित केलेली मात्रा पुर्ण करण्यासाठी अपयशी ठरले होते. इतक्या मोठ्या प्रमाणात जर नमुने अपात्र ठरत असतील तर विद्यार्थ्यांना हा आहार पुरवून काहीच उपयोग नाही. कधी तांदूळ तर कधी डाळ कमी असे प्रमाण घेवून बनविलेल्या खिचडीचे नमुने जर प्रयोगशाळेतून नियमितरित्या तपासून घेतले नाहीत तर या भोजनाची गुणवत्ता निश्चितच ठरविणे शक्य नाही. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त उष्मांक व प्रथिने मिळाली पाहिजेत हा यामागील प्रमुख उद्देश आहे. शिजविलेल्या अन्नाच्या नमुन्याची तपासणी केली नाही तर त्यामधून नेमक्या किती कॅलरीज् मिळाल्या हे सिध्द करणे अशक्य आहे.**

**महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप गंभीर असून शिजविलेल्या आहाराचे नमुने अनुत्तीर्ण ठरण्याची मोठ्या प्रमाणावरील टक्केवारी पाहता या अन्नामध्ये निश्चितच उष्मांक व प्रथिने यांची कमतरता दिसून येते. तसेच प्रयोगशाळेमधून तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद व नियमितरित्या या अन्नाची तपासणी विभागाकडून करण्यात यावी. राज्यात प्रयोगशाळांची संख्या वाढविण्यात याव्यात यासाठी देखरेख यंत्रणा निर्माण करून या सर्व बाबींवर विभागाचे संनियंत्रण करण्यात यावे. त्याचप्रमाणे कॅलरी किंवा उष्मांक मोजण्याची यंत्रणा जिल्हापातळीपर्यंत सुरु करीत नाही तोपर्यंत या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करता येणार नाही. या संपुर्ण बाबींची तपासणी करून १ महिन्यात पुर्ण आढावा घेण्यात येईल व केंद्र शासनाची मार्गदर्शक तत्वे पुर्ण करण्यात येतील असे समितीसमोर आश्वासित करण्यात आले. परंतु याची पुर्तता झाली नाही. अतः या प्रकरणी शासनस्तरावरुन तातडीने उपरोक्तपणे आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.४ "मुलांच्या आरोग्य तपासणीतील तूट/कमतरता"**

**अभिप्राय**

**१.३३** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये इतर विकास कार्यक्रमांशी एककेंद्राभिमुखतेने मुलांची नियमीत आरोग्य तपासणी करण्याची तरतूद आहे. निवडक २६९ शाळांपैकी ६४ शाळांनी अनिवार्य असूनही वार्षिक आरोग्य तपासण्या केल्या नव्हत्या. तसेच ३९ शाळांनी सन २०१०-१५ दरम्यान एकही आरोग्य तपासणी केली नव्हती. तसेच ज्या ८१ शाळांमध्ये आरोग्य तपासण्या केल्या गेल्या होत्या त्यांच्याकडील मुलांच्या तपासणी व संदर्भपत्रांमध्ये त्यांची उंची, वजन, शरीर वस्तूमान निर्देशांक इत्यादी महत्वपूर्ण तपशील नोंदला जात नव्हता. परिणामी शिजवलेले अन्न / सूक्ष्मपोषण द्रव्ये आणि इतर पूरक आहाराचा मुलांच्या एकंदर पोषण आणि आरोग्यविषयक स्थितीवर होणारा परिणाम मोजण्यासाठी राज्य शासनाकडे सुयोग्य कार्यतंत्र नव्हते असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस**

**१.३४ सदरहू योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये इतर विकास कार्यक्रमांशी एककेंद्राभिमुखतेने मुलांची नियमित आरोग्य तपासणी करण्याची तरतूद असताना त्यात तूट व कमतरता आढळून आली. सन २०१० ते २०१५ दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील**

**डॉक्टरांकडून ही तपासणी होणे अपेक्षित असताना आरोग्य विभागामध्ये मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे या सर्व शाळांची तपासणी होवू शकली नाही. परंतु त्यानंतर केंद्र शासनाचा राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम या नविन योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध झाले. त्याप्रमाणे डॉक्टरांची अनेक पथके निर्माण करून त्यांना वाहने देखील देण्यात आली असून त्यांच्यामार्फत वैद्यकीय तपासणीचे काम करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित आता सर्व सुरळित सुरु केले आहे, परंतु जवळ जवळ ५ वर्षे ही तपासणीच करण्यात आली नाही हा त्या संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांचा किंवा संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचा निश्चितच निष्काळजीपणा आहे. उपलब्ध मनुष्यबळामधून सर्वच शाळांमधील मुलांची नियोजनबध्द पध्दतीने तपासणी होणे आवश्यक असताना यामध्ये निश्चितच नियोजनाचा अभाव दिसून येतो. आता मात्र वर्षातून दोनदा प्रत्येक अंगणवाडीची व एकदा शाळेची तपासणी करण्यात येते व आवश्यक ते उपचार देखील मुलांवर करण्यात येतात. आता विभागाने यंत्रणा सुधारली असली तरीही ज्या कालावधीसाठी महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविलेले आहेत त्या कालावधीत ती तपासणी झालेली नव्हती. यासंदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. या योजनेसाठी केंद्र व राज्य स्तरावर देखील निधी प्राप्त होत असतानाही विद्यार्थी वैद्यकीय तपासणीपासून वंचित राहात असतील तर ही बाब निश्चितच गंभीर आहे. यात अधिक गंभीर बाब म्हणजे केंद्र शासनाला पाठविण्यात आलेल्या अहवालात विभागाकडील आकडेवारीनुसार जवळ जवळ ९९ टक्के शाळांमध्ये तपासणी झाल्याचे नमूद आहे. जेव्हा की, हे प्रमाण वस्तुतः कमी होते. त्यामुळे या माहितीमध्ये देखील विसंगती व तफावत निश्चितच दिसून येते. सन २०१४-१५ पासून आता ही तपासणी नियमितरित्या होत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. सदरहू तपासणी करण्याचा मुख्य उद्देश हा मुलांच्या आरोग्याचे संवर्धन व विकास साधणेकरिता एक महत्वपुर्ण पाऊल असून बालकांच्या किंवा मुलांच्या आरोग्याची तपासणी, त्याच्यात आढळणाऱ्या आजारांवर वेळीच उपचार करून पायबंद घालणे याअनुषंगाने आवश्यकती उपाययोजना शासनस्तरावरुन करण्यात यावी. मध्यान्ह आहार योजनेंतर्गत सर्व मुलांची तपासणी दरवर्षी नियमित झाली पाहिजे अशी स्पष्ट तरतूद आहे. त्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी करण्यात यावी. विद्यार्थ्यांचे स्वास्थ्य पत्रीका (Health Card) ठेवण्यात यावे ज्यामध्ये केलेल्या तपासणीची नोंदणी विस्तृतरित्या आढळून येवू शकते व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.५ "दुय्यम दर्जाची स्टेनलेस स्टिलची खणाची ताटे खरेदी करणे"**
**अभिप्राय**

**१.३५** मुलांना शिजवलेला आहार वाढण्यासाठी नोडल संस्थांनी फेब्रुवारी व ऑगस्ट,२०१३ दरम्यान रु.५३.४९ कोटी रक्कमेची स्टेनलेस स्टीलची खणाची ५२.७५ लाख ताटे पुरविण्यासाठी डायरेक्टर जनरल ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्पोजल (DGS&D) कडून मान्यताप्राप्त चार दर कंत्राटदारांना १२ खरेदी आदेश दिले. खरेदी आदेशातील शर्ती व अटींनुसार भारतीय मानक विभागाने विहित केल्यानुसार स्टील पट्टयांची (०.७ मी.मी) व ताटाची (०.५५ मी.मी.) किमान जाडी असावयाची होती. तसेच, प्रत्येक ताटावर उत्पादकाचे नाव किंवा आदयाक्षरे किंवा उत्पादन चिन्ह यासह "स्टेनलेस स्टील" किंवा "SS" असा सुवाच्य ठळक आणि पक्का शिक्का असावयाचा होता. एप्रिल, २०१३ ते नोव्हेंबर,२०१३ दरम्यान सर्व ताटांचा पुरवठा केला गेला आणि एप्रिल,२०१३ व मे २०१४ दरम्यान कंत्राटदाराला रु.५३.४९ कोटी अदा केले गेले.

सुपरीटेंडंस कंपनी ऑफ इंडिया (प्रायव्हेट) लिमिटेड, मुंबई (राज्य शासनाची अधिकृत प्रमाणन संस्था) ने केलेल्या पुरवठापूर्व व पुरवठापश्चात निरीक्षणांमधून ही ताटे फक्त व्यास व उंचीच्या बाबतीत तांत्रिक परिमाणांशी सुसंगत असल्याचे दर्शविले गेले होते. परंतु, संस्थेने दिलेल्या निरीक्षण / चाचणी प्रमाणपत्रात ०.५५ मी.मी. इतक्या किमान जाडीच्या अनिवार्य परिमाणाएवढी या ताटांची जाडी असल्याविषयी कोणताही उल्लेख नव्हता. अशाप्रकारे अनिवार्य परिमाण पूर्ण न करणारी ही ताटे कोणत्या परिस्थितीत स्वीकारली गेली तिचे आकलन होणे कठीण होते. तसेच तीन खरेदी आदेशांनुसार पुरवठा केलेल्या ताटांचे २२ नमूने लेखापरीक्षकांनी यादृच्छीक पध्दतीने निवडले आणि शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था (ITI), मुंबई येथे त्यांची जाडी तपासली. ITI मुंबई ने सादर केलेल्या चाचणीच्या निष्कर्षांवरुन सर्व २२ ताटांची जाडी ०.५५ मी.मी. पेक्षा कमी (०.३० मी.मी. ते ०.५० मी.मी. अशा प्रमाणात जाडी होती) होती. तसेच, २२ नमुन्यांपैकी एकावरही उत्पादकाचे नाव किंवा आदयाक्षरे किंवा उत्पादन चिन्ह यासह "स्टेनलेस स्टील" किंवा "SS" असा शिक्का नव्हता. वरील वस्तुस्थिती विचारात घेता मुलांना शिजवलेले अन्न वाढण्यासाठी रु.५३.४९ कोटी खर्च करून खरेदी केलेली ५२.७५ लाख स्टेनलेस स्टीलची खणाची ताटे सकृतदर्शनी दुय्यम दर्जाची ठरली.

सन २०१३-१४ पर्यंत D.G.S.&D. व्दारे करण्यात आलेल्या दरकरारामध्ये ताटाचा आकार, उंची, खोली इ. परिमाणे नमूद होती. सदर दरकरारामध्ये ताटांचे वजन नमूद केलेले नव्हते. यानंतर करण्यात आलेल्या दरकरारामध्ये इतर परिमाणासोबत ताटाचे वजन ही नमूद केलेले आहे.

यामुळे या नवीन दर करारानुसार मार्च,२०१५ मध्ये खरेदीचे आदेश दिल्यानंतर त्या आदेशानुसार झालेल्या ताटांच्या पुरवठयामधून यादृच्छिक पध्दतीने ताटांचे नमूने घेवून प्रयोशाळा तपासणी करत असताना इतर परिमाणांसोबतच ताटांचे वजनही मोजण्यात आले. सदर तपासणीमध्येही ताटे D.G.S.&D. दर करारामधील परिमाणांची पूर्तता करत असल्याचे अहवालामध्ये नमूद आहे. सन २०१४ पर्यंतच्या दरकरारामध्ये ताटांचे वजन नमूद केलेले नव्हते. यामुळे सन २०१४ पर्यंत पुरवठा करण्यात आलेल्या ताटांचे वजन त्यावेळी प्रयोगशाळेत मोजले असते तरीही, प्रमाणित वजन किती असावे हे निश्चित नसल्याने वजन विचारात घेवून पुरविण्यात आलेल्या ताटांचा दर्जा सुमार होता, असे निष्कर्ष काढता आले नसते.

केंद्र शासनाच्या निकषानुसार प्रतिशाळा रु.५०००/- इतका निधी भांडी खरेदीसाठी प्राप्त होतो. ५ वर्षानंतर सदर शाळांकरिता भांडी बदलीसाठी पुन्हा रु.५०००/- प्रतिशाळा इतका निधी प्राप्त होतो. एकदा निधी प्राप्त झाल्यानंतर त्या भांड्यांच्या बदलीसाठी (replacement) ५ वर्षानंतर पुन्हा केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होतो. या ५ वर्षाच्या कालावधीत दररोज शाळेत ताटांचा वापर होतो. यामुळे ताटांची काही प्रमाणात झीज होते. शालेय पोषण आहार योजनेकरिता पात्र शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता, सदर रु.५०००/- प्रतिशाळा हा निधी खूपच कमी आहे. यामुळे या निधीतून पुरेशी ताटे / भांडी खरेदी होत नाहीत. यामुळे ५ वर्षानंतर बदलीसाठी (replacement) निधी प्राप्त झाल्यानंतर सरसकट सर्व ताटे / भांडी बदली न करता जुन्या ताटांपैकी वापरण्यास योग्य ताटे शाळास्तरावर वापरली जातात. महालेखापाल कार्यालयाने नमून्यादाखल तपासलेली ताटे नियमित वापरातील होती. यामुळे याची काही प्रमाणात झीज झालेली होती असे समितीसमोर सांगण्यात आले.

सन २०१४-१५ पासून करण्यात आलेल्या D.G.S.& D. च्या दरकरारामध्ये वजन नमूद केल्याने ताटांच्या दर्जाच्या अनुषंगाने तपासणी करावयाच्या परिमाणांची स्पष्टता आली आहे. यामुळे मार्च,२०१५ मध्ये शासनाने खरेदी केलेल्या ताटांच्या दर्जाबाबत कोणताही मुद्दा उपस्थित झालेला नाही. मार्च,२०१५ नंतर या योजनेतंर्गत कप्पा ताटांची खरेदी करण्यात आलेली नाही. सदरहू योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतिशाळा रु.५०००/- इतका निधी ताट खरेदीसाठी देण्यात आला. परंतु हा निधी मोठ्या शाळांसाठी अपुरा असल्यामुळे एका वर्षी एका शाळेला तर दुसऱ्या वर्षी दुसऱ्या शाळेला अशाप्रकारे हा निधी वेगवेगळ्या शाळांना वितरीत केला जात असे. जवळ जवळ पाच वर्षे पुर्ण झाल्यानंतर पुन्हा पहिल्या शाळेला निधी देण्यात येत असे. त्यामुळे जुनी ताटे व नविन ताटे अशी एकत्रितरित्या वापरात येत होती. महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात करार अटी शर्तीमध्ये नमूद निकषानुसार ताटांचे वजन व जाडी नव्हती असे मुळ आक्षेप नोंदविलेले आहेत. तसेच ती स्विकारताना तपासणी देखील करण्यात आली नव्हती. ही खरेदी केंद्रीकृत पध्दतीनेच करण्यात आली व यासंबंधी झालेल्या दर कराराच्या तपासणीमध्ये केवळ ताटांचा आकार किती असावा याबाबत उल्लेख होता. परंतु ताटाचे वजन व पत्र्याची जाडी याबाबत पहिल्या दोन वर्षाच्या करारामध्ये उल्लेख नव्हता. मात्र तिसऱ्या वर्षीपासून करारामध्ये वजनाचा निकष समाविष्ट करण्यात आला. शासकीय प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) मुंबई येथे काही नमुन्यांची तपासणी केली असता पत्र्याची जाडी ०.५५ मी.मी. ऐवजी ०.३० मी.मी. एवढे आढळून आले. त्यानंतर रेल्वे विभागाच्या राईटस् या कंपनीकडे दुसऱ्यांदा तपासणीसाठी हे नमुने पाठविले असता ६ पैकी ५ नमुन्यांमध्ये त्रुटी आढळून आल्या असे महालेखाकारांनी समितीसमोर सांगितले. त्यामुळे वस्तु ताब्यात घेताना खरेदी दर करारानुसार नमूद अटी शर्तींच्या मापदंडाप्रमाणे पुरवठा झाला नाही, याचाच अर्थ दुय्यम दर्जाचा पुरवठा झाला हे सकृतदर्शनी दिसून येते. या ताटांच्या खरेदीसाठी वजनानुसारच देयक अदा करावे लागते. तसेच वस्तुचा पुरवठा घेणेअगोदरच त्याची प्रयोगशाळेमधून तपासणी करून घेण्याची पध्दती होती. अशाप्रकारे प्रयोगशाळांमध्ये ताटांचे नमुने पाठविण्यात आले असता ते विहित जाडीचे नसल्याचे समोर आले. यावर विभागीय सचिवांनी ताटांचा नियमित वापर होत असल्याने त्याची झिज होवून जाडी काही प्रमाणात कमी झाल्याचे त्रोटक उत्तर समितीसमोर दिले. आता ही ताटांची खरेदी काही वर्षापासून बंद करण्यात आली आहे.

**शिफारस**

**१.३६ मुलांना शिजविलेला आहार वाढण्यासाठी स्टेनलेस स्टिलची खणाची ताटे पुरविण्याबाबत कंत्राटदारांना खरेदी आदेश देण्यात आले. खरेदी आदेशातील अटी व शर्तीनुसार त्याचा पुरवठा होणे आवश्यक असताना त्या ताटांची जाडी व वजन हे करारातील अटी शर्तीमधील निकषाप्रमाणे नव्हते. यासंदर्भात शासकीय प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) मुंबई तसेच राईटस् या कंपनीकडे देखील दुसऱ्यांदा हे प्रकरण तपासणीसाठी पाठविण्यात आले. ही खरेदी केंद्रीय पध्दतीने होत असताना त्याचा पुरवठा शाळांना करते वेळी विहित मापदंड न तपासता हा पुरवठा घेण्यात आला. आता ही ताटांची खरेदी बंद करण्यात आलेली आहे. परिणामी मुलांना शिजविलेले अन्न वाढण्यासाठी रु.५३.४९ कोटी खर्च करून खरेदी केलेली ५२.७५ लाख स्टेनलेस स्टिलची खणाची ताटे सकृतदर्शनी दुय्यम दर्जाची ठरली. सदरहू बाब अतिशय गंभीर असून विभागाने या प्रकरणी चौकशी करून ही खरेदी विहित अटी व शर्तीनुसार झाली किंवा कसे याची खात्री करून घ्यावी व या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. तसेच भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.६ "सूक्ष्मपोषणद्रव्यांची अविवेकी खरेदी"**
**अभिप्राय**

**१.३७** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार या योजनेत स्थानिक क्षेत्रात आढळून येणाऱ्या सामान्य कमतरतांनुसार राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तांत्रिक सल्ल्याने किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र/शासकीय रुग्णालयाकडून साप्ताहीक लोह फॉलिक ॲसिड (IFA) ची पूरक औषधे आणि इतर योग्य पूरक पोषणे देऊन त्याव्दारे पूरक सूक्ष्मपोषणद्रव्यांची पूरक मात्रादेखिल देण्यात यावी. केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने देखिल IFA पुरक पोषणाविषयी धोरणात्मक मार्गदर्शके जारी केली (एप्रिल २००७) ज्यानुसार ६-१० वर्षे वयोगटातील मुलांना प्रत्येक वर्षी १०० दिवस प्रतीबालक प्रती दिवस ३० मी ग्रॅम मुलतत्व लोह आणि २५० मायक्रोग्रॅम फॉलिक ॲसिड तसेच किशोरवयीन (११-१८ वर्षे) मुलांना प्रौढांच्या मात्रेत व कालावधीत म्हणजेच प्रत्येक वर्षी १०० दिवस प्रती दिवस प्रती बालक १०० मी ग्रॅम मुलतत्व लोह आणि ५०० मायक्रोग्रॅम फॉलीक ॲसिड द्यावयाचे होते.

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालकांच्या दर कंत्राटदाराच्या दराबरोबर झिम लॅबोरेटरीज ने प्रस्तावित केलेल्या दरांची तुलना करता त्यांचे प्रस्तावित दर कमी असल्याचे आढळून आले. त्यानुसार विभागाने झिम लॅबोरेटरीजचा प्रस्ताव मान्य केला आणि SNA ने इयत्ता I ते VIII (६-१४ वर्षे) मध्ये शिकणाऱ्या मुलांसाठी एकूण रु.२९.५० कोटी किंमतीच्या ४१.९९ कोटी IFA कॅप्सूल्स पुरविण्यासाठी झिम लॅबोरेटरीजला खरेदी आदेश दिले. SNA ने देखील इयत्ता VI ते VIII (११-१४ वर्षे) मध्ये शिकणाऱ्या मुलांसाठी फेब्रुवारी,२०११ मध्ये रु.१७.४२ कोटीच्या २४.५४ कोटी कॅप्सूल्स आणि ऑक्टोबर,२०११ मध्ये रु.१०.१२ कोटीच्या १४.२६ कोटी कॅप्सूल्स पुरविण्यासाठी पूर्ण आदेश दिले. अशाप्रकारे २००९-१२ दरम्यान झिम लॅबोरेटरीजकडून रु.५७.०६ कोटी किंमतीच्या एकूण ८०.७९ कोटी कॅप्सुल्स खरेदी करण्यात आल्या. परंतु पहिल्या मागणीसमोर झिम लॅबोरेटरीजने पुरवठा केलेल्या IFA कॅप्सुलमध्ये (४१.९९ कोटी) ४८.५३ मिग्रॅम मुलतत्व लोह आणि ५०० मायक्रोग्रॅम फॉलिक ॲसिड होते. संचालक, आरोग्य सेवा (DHS), मुंबई यांनी SNA ला असे कळविले (एप्रिल,२०१०) की खरेदी करण्यात येत असलेल्या IFA कॅप्सुल ११ वर्षे वयाखालील मुलांसाठी योग्य नव्हत्या आणि म्हणून या कॅप्सुलचे वाटप इयत्ता VI ते VIII (११-१४ वर्षे) मध्ये शिकणाऱ्या मुलांना करण्याचा सल्ला दिला. DHS च्या तांत्रिक सल्ल्यानुसार विभागाने IFA कॅप्स्यूल्स ११-१४ वर्षे वयोगटातील मुलांना देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार फेब्रुवारी व ऑक्टोबर,२०११ मध्ये केलेल्या पुर्नमागणीसाठी निर्धारित लाभार्थींच्या वयोगटातही फेरफार/बदल करण्यात आला.

वरील घटनाक्रमावरुन हे स्पष्टपणे दर्शविले जाते की विभागाने झिम लॅबोरेटरीजला खरेदी आदेश देण्यापूर्वी DHS चा कोणाताही तांत्रिक सल्ला घेतला नव्हता किंवा योग्य वयोगटासाठी योग्य मात्रेच्या IFA कॅप्स्यूल्सची खरेदी करताना GoI च्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला नव्हता. अशाप्रकारे DHS च्या तांत्रिक सल्ल्यापश्चात प्राप्त झालेल्या औषधांच्या मात्रेनुसार (४८.५३ मी.ग्रॅम मुलतत्व लोह) विभागाला त्यानुरुप वयोगटात तडजोड/बदल करावा लागला हे स्पष्ट दिसते.

एप्रिल,२००७ च्या GoI च्या विहितकाच्या अनुषंगाने पाहिले तर प्राप्त झालेल्या मात्रेतील औषध (४८.५३ मि.ग्रॅम मुलतत्व लोहयूक्त) ६-१० वर्षे वयोगटासाठी किंवा ११-१४ वर्षे वयोगटांसाठी योग्य नव्हते. प्राप्त केलेल्या औषधाची मात्रा (४८.५३ मि.ग्रॅम. मुलतत्व लोह) ११-१४ वर्षे वयोगटांसाठी देखिल इच्छित प्रमाणात गुणकारक ठरणार नव्हती कारण ही मात्रा GoI ने विहित केलेल्या मात्रेपेक्षा (१०० मि.ग्रॅम मुलतत्व लोह) लक्षणीय प्रमाणात कमी होती. अशाप्रकारे झिम लॅबोरेटरीजकडून २००९-१२ दरम्यान रु.५७.०६ कोटीच्या ८०.७९ कोटी कॅप्स्यूल्सची खरेदी विवेकहीन होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजनेच्या केंद्र शासनाच्या मागदर्शक सूचनांमध्ये (२००६ Guidelines) विद्यार्थ्यांना सूक्ष्मपोषण द्रव्ये व आयर्न फोलीक ॲसिड पुरविण्याची तरतूद आहे. ZIM Laboratories या संस्थेने ESIC दरकरारावर IFA गोळया पुरविण्याबाबतचा प्रस्ताव सन २०१० मध्ये शासनाकडे सादर केला होता. ESIC दरकरारानुसार IFA गोळयांचा दर DMER दरकरारावरील दरापेक्षा कमी असल्याने शासनाने ESIC दरारावर IFA गोळया पुरविण्याचा निर्णय दि.३१/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये घेतला होता. तथापि, विद्यार्थ्यांना आर्यनयुक्त गोळया देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना आरोग्य सेवा संचालनालयाचे मार्गदर्शन घेवून त्यानुसार निर्गमित कराव्यात, असे शासन निर्णयामध्ये नमूद होते. यानुसार आरोग्य संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त झाल्याशिवाय शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी पुरवठेदारास पुरवठा आदेश दिले नाहीत. आरोग्य संचालनालयाने ११-१८ वर्षे वयोगटातील मुलांना IFA गोळया कक्ष्क दरकरारावर पुरविण्याबाबत तसेच, यासाठी डोसचे प्रमाण इ. चे अभिप्राय दिले. तसेच प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना IFA औषध द्रवस्वरुपात देण्याबाबत अभिप्राय आरोग्य संचालनालयाने दिले आहेत.

आरोग्य संचालनालयाने केवळ उच्च प्राथमिकच्या विद्यार्थ्यांना (इ. ६ वी ते ८ वी) IFA गोळया पुरविण्यास मान्यता दिल्याने त्यानंतर पुढील २ वर्षाकरिता उच्च प्राथमिकच्या विद्यार्थ्यांना ESIC दरकरारावर IFA गोळया पुरविण्यात आल्या. प्राथमिकच्या (इ. १ ली ते ५ वी) विद्यार्थ्यांना आरोग्य संचालनालयाच्या सल्ल्यानुसार द्रव स्वरुपात IFA पुरविण्यात आले. केंद्र शासनाने सन २०१२-१३ पासून Weekly Iron and

Folic Acid Supplementation Scheme (WIFS) ही योजना सुरु केली आहे. या योजनेतंर्गत १८ वर्ष वयोगटापर्यंतच्या विद्यार्थ्यांना Iron & Folic Acid (IFA) गोळयांचे वाटप करण्यात येते. या योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक आरोग्य विभागार्मात करण्यात येते. यामध्ये शालेय पोषण आहार योजनेसाठी पात्र इ. ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांचाही समावेश होता. यामुळे सन २०१२-१३ पासून ESIC दरकरारावर IFA गोळयांचा पुरवठा शालेय पोषण आहार योजनेतंर्गत करण्यात आलेला नाही असे समितीस सांगण्यात आले.

**शिफारस**

**१.३८ समितीने सदरहू प्रकरणी सखोल छाननी केली असता संचालक आरोग्य सेवा यांच्या अभिप्रायानुसार ही कॅप्सुल ११ वर्षाखालील मुलांना देणे योग्य नव्हती. असे असताना विभागाने या कॅप्सुल कशासाठी खरेदी केल्या हा प्रश्न उद्‌भवतो. सदरहू खरेदी ही इयत्ता १ ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी झालेली असताना खरेदी केलेल्या गोळया मात्र केवळ इयत्ता ६ ते ८ वीतील विद्यार्थ्यांसाठी योग्य असल्याचे निष्कर्ष समोर आले. त्यामुळे इयत्ता १ ते ५ वी या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या या गोळयांचा खर्च निष्फळ ठरला. ह्या ज्या गोळया खरेदी करण्यात आल्या त्या ४८ एम.जी.च्या होत्या व आरोग्य विभागाची शिफारस १०० एम.जी.ची होती परंतु त्याची किंमत खुप जास्त होती व हे दर प्रतिकॅप्सुल रु.१.२१ होते. विभागाने त्यावेळी जी खरेदी केली ती प्रतिकॅप्सुल रु.०.६७ या दराने केली. त्यावेळेस या दोन्ही पर्यायाचा विचार करूनच स्वस्त पर्याय स्विकारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे या वयोगटातील विद्यार्थ्यांना द्यावयाच्या डोसेसचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात तफावत असून यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शक सूचना बदलत राहिल्यामुळे नेमक्या किती एम.जी.चा डोस द्यावा याबाबत एकमत नव्हते. यावर समितीने आक्षेप घेत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे १०० एम.जी. च्या कॅप्सुल देणे आवश्यक असताना ४८ एम.जी. च्या कॅप्सुलच्या खरेदीचे विभाग कसे काय समर्थन करु शकते. यासंदर्भात केंद्राच्या गाईडलाईन व निकष सतत बदलत आहेत. परंतु त्यावेळच्या गाईडलाईनमध्ये ६ ते १० वयोगटातील मुलांना ३० एम.जी. देण्याचा उल्लेख दिसून येतो. आज हा ४५ एम.जी.चा निकष आहे. यावर समितीने आक्षेप नोंदवित केवळ केंद्र शासनाकडून पैसे विभागाला प्राप्त झाले म्हणून ते खर्च करणे एवढाच निकष पाळण्यात आला. नेमक्या किती एम.जी.चा डोस किती वयोगटातील मुलांसाठी योग्य ठरतो याबाबत विभाग अद्यापही साशंक आहे. असे असतानाही केवळ किंमतीने स्वस्त आहे म्हणून सोईस्करित्या कमी एम.जी.च्या गोळयांची खरेदी करणे निश्चितच आक्षेपार्ह आहे. विभागाने त्याचवेळी या संदर्भात योग्य ते आदेश घेवून याची स्पष्टता व निराकरण करून घेणे आवश्यक होते, परंतु तसे करण्यात आले नाही. अशा परिस्थितीत ६ ते १० वयोगटातील मुलांना कोणत्या गोळया देण्यात आल्या, अशी समितीने विचारणा केली असता या मुलांना IFF सिरप देण्यात आले असून ती हेल्थस्किम मधून मुलांना पुरविण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अशाप्रकारे या खरेदीमध्ये प्रयोग करण्याची विभागाला कोणतीही आवश्यकता नव्हती. विहित निकषाप्रमाणे खरेदी करण्यास विभागास कोणतीही अडचण नसताना त्याचे पालन अधिकाऱ्यांकडून झालेले नाही. DHS ने ESIC च्या दर करारावर खरेदी आदेश देण्यासाठी हिरवा कंदली दाखविला नव्हता तर खरेदी आदेशापश्चात केवळ त्यांचे तांत्रिक मत मांडले होते, आणि झिम लॅबोरेटरीजकडून पहिल्या मागणीत खरेदी केलेल्या IFA कॅप्स्युल्स केंद्र शासनाने विहित केलेल्या मात्रे बरहूकूम नसल्याने त्यानंतर रु.२७.५४ कोटी किंमतीच्या ३८.८० लाख कॅप्स्युल्सची पुर्नमागणी टाळणे शक्य झाले असते. खरेदी केलेल्या गोळया ज्या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी खरेदी केल्या त्यांचेसाठी त्या उपयोगी नाहीत. परंतु खरेदी करून घेतल्यामुळे त्यांचा वापर त्यावरील वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी करण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय शिल्लकच नव्हता. ११ वर्षापेक्षा जास्त वयोगटातील विद्यार्थ्यांना १०० एम.जी. व त्यापेक्षा कमी वयोगटातील विद्यार्थ्यांना ३० एम.जी. कॅप्सुलची आवश्यकता असताना ही खरेदी सरसकट ४८ एम.जी.ची करण्यात आली. सन २०१३ पुर्वी व त्यानंतर असलेल्या केंद्र शासनाच्या धोरणामध्ये बदल दिसून येतो. यावर समितीने आक्षेप नोंदवित विभागाने घेतलेले फॉलिक ॲसिड आरोग्य विभागाच्या निकषाप्रमाणे घेतले आणि त्यानुसार विद्यार्थ्यांना दिले आहे काय, तसेच ही खरेदी सन २०१० ची असल्यामुळे २०१३ च्या निकषाचा याचेशी कोणताही संबंध नाही. सन २०१० मध्ये अस्तित्वात असलेल्या निकषाप्रमाणे ही खरेदी झाली आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता त्यावेळी अस्तित्वात असलेल्या निकषाप्रमाणे ही खरेदी झालेली नसल्याचे समितीसमोर विभागीय प्रतिनिधींद्वारे स्पष्ट करण्यात आले. परिणामी यासाठी निश्चित केलेल्या प्रमाणाला व गुणवत्तेला कोणताही अर्थ राहात नाही. केवळ निधी कसाही खर्च करणे एवढाच उद्देश समोर ठेवून ही खरेदी करण्यात आली. सदरहू प्रकरण अत्यंत गंभीर असून या प्रकरणी वरिष्ठ ते कनिष्ठ पातळीवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस १ महिन्यात देण्याबाबत समितीला आश्वासित करूनही हा अहवाल समितीस अद्यापही अप्राप्त आहे, ही देखील गंभीर बाब आहे. शासनाने या प्रकरणी संबंधितांवर तात्काळ कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस २ महिन्यात देण्यात यावा. तसेच विद्यार्थ्यांसाठी सुक्ष्म पोषण द्रव्यांची खरेदी नियमानुसार, आवश्यकतेनुसार व शासनाच्या विहित प्रमाणकानुसारच करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.७ "शिजवलेले अन्न चाखण्यात कमतरता/तूट"**

**अभिप्राय**

**१.३९** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गातील मुलांना अन्न खाण्यास देण्याच्या अर्धा तास आधी प्रत्येक दिवशी आळीपाळीने किमान एका शिक्षकाने आणि शालेय व्यवस्थापन समिती (SMC) च्या सदस्यांपैकी एकाने शिजवलेल्या अन्नाची चव बघावी. दररोज मुलांना आहार देताना देखरेख ठेवण्यासाठी व पर्यवेक्षण करण्यासाठी आणि दररोज कोणत्याही व्यत्ययाविना चांगल्या दर्जाचा आहार दिला जाईल याची खात्री करण्यासाठी देखिल किमान एक माता आळीपाळीने शाळेत उपस्थित असावी.

सन २०१५-१६ च्या राज्याच्या वार्षिक कार्य आराखडा आणि अंदाजपत्रकामधून आहाराचा दर्जा, सुरक्षा आणि स्वच्छता याविषयी प्राप्त केलेल्या माहितीमधून असे उघडकीस आले की, २०१४-१५ दरम्यान शिक्षक व SMC सदस्य यांनी शिजलेले अन्न चाखण्यात कमतरता /तूट होत्या. पाच जिल्ह्यांमध्ये ज्या शाळांमध्ये शिक्षकांनी अन्न चाखले नव्हते त्यांची टक्केवारी नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक ६३ टक्के होती. तसेच चंद्रपूर व मुंबई जिल्ह्यांमध्ये मात्र एकाही शाळेत ते चाखले नव्हते. तसेच २६९ शाळांपैकी केवळ १७४ शाळांमध्ये मध्यान्ह आहाराचे वाटप करताना पाल्यांच्या माता उपस्थित होत्या.

सन २०११-१५ दरम्यान राज्यात अन्नविषबाधेची १३ प्रकरणे SNA ला कळविण्यात आली होती. ज्यामध्ये ९९६ मुलांना बाधा झाली होती. १३ प्रकरणांपैकी सहा प्रकरणात अन्नाचे नमूने तपासणीसाठी प्रयोगशाळांमध्ये पाठविण्यात आले होते. सहापैकी दोन प्रकरणात माहे डिसेंबर,२०१५ पर्यंत प्रयोगशाळांचे अहवाल प्राप्त झाले नव्हते. तीन प्रकरणात अन्नविषबाधेचे कारण अहवालातून स्पष्ट होऊ शकले नव्हते, तसेच एका प्रकरणात (सोलापूर जिल्हा) अन्नात किटकनाशकाचा अंश आणि केरोसिनचा तीव्र गंध असलेले खनिज तेल असल्याचे सिध्द झाले होते. BDO सोलापूर यांनी केलेल्या चौकशीत असे आढळून आले की स्वयंपाकघर घाणेरडे आणि अस्वच्छ होते आणि शिजलेले अन्न मुख्याध्यापक किंवा शिक्षकांकडून चाखले गेले नव्हते. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी शिक्षण अधिकाऱ्यांना या प्रकरणात चौकशी करण्याचे निर्देश दिले (मार्च,२०१५) परंतू डिसेंबर,२०१५ पर्यंत चौकशीचा अहवाल प्राप्त झाला नव्हता. उर्वरित सात प्रकरणात, जेथे अन्नाचे नमूने प्रयोगशाळांना पाठविण्यात आले नव्हते तेथे पोलीस तक्रार दाखल करणे, मध्यवर्ती स्वयंपाकगृहांना दिलेले कार्यादेश रद्द करणे, शिक्षक /मुख्याध्यापकांना निलंबित कारणे अशा स्वरुपाची कारवाई करण्यात आली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

**शिफारस**

**१.४० शालेय पोषण आहार योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आहार देण्यापूर्वी किमान अर्धा तास अगोदर संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / शिक्षक / स्वयंपाकी तथा मदतनीस / पालक / शाळा व्यवस्थापन समितीतील सदस्य यांच्याद्वारे प्रत्यक्षात खावून त्याची चव बघून वितरीत केला जाणे बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी झाली नाही. शालेय विद्यार्थ्यांना प्रतिदिन द्यावयाच्या आहाराची चव चाखूनच त्यानंतर ती विद्यार्थ्यांना खायला देण्याबाबत विभागाने परिपत्रक निर्गमित केले असतानाही १८ टक्के शाळेतील शिक्षकांनी आहाराची चव तपासली नसल्याचे महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. या आहाराची चव चाखण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापक, स्वयंपाकी, व्यवस्थापन समितीतील सदस्य आणि पालक असे पर्याय दिले आहेत. असे असतानाही त्याचे पालन न होण्याचे कोणतेही कारण नाही. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये या तपासणीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. संबंधितांनी या जेवणाची चव अर्धा तास अगोदरच घेवून त्यासंदर्भातील नोंद नोंदवह्यांमध्ये करून ठेवणे बंधनकारक असताना त्याचे पालन करण्यात आले नाही. अशाप्रकारे उल्लंघन होत असताना त्याची तपासणी देखील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अमर्याद कालावधीसाठी करण्यात आली नाही. त्यामुळे ते अधिकारी देखील तितकेच यासाठी जबाबदार आहेत. ज्याठिकाणी शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांची जबाबदारी नियमानुसार पार पाडली त्या जिल्ह्यांमध्ये हे आक्षेप नोंदविण्यात आलेले नाहीत. या बाबींची पुर्तता करून घेण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांचीच होती. ज्या जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांनी ही जबाबदारी पार पाडली नाही त्या अधिकाऱ्यांवर व संबंधित शाळांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस १ महिन्यात देण्याबाबत समितीला आश्वासित करूनही हा अहवाल समितीस अप्राप्त आहे, ही देखील गंभीर बाब आहे. शासनाने या प्रकरणी संबंधितांवर तात्काळ कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस २ महिन्यात देण्यात यावा. तसेच पालकांच्या सहभागामुळे आहाराचा दर्जा सुधारण्यास निश्चितच हातभार लागेल, म्हणून आहार तयार करताना आणि त्याचे वाटप करताना शाळेत उपस्थित राहण्यासाठी पालकांना प्रोत्साहीत करण्यात यावे. या योजनेचा आवाका लक्षात घेता, शिक्षक, SMC चे सदस्य आणि माता यांचा सक्रिय सहभाग सर्वोत्तम आहे कारण त्यामुळे बाहेरील पर्यवेक्षक / निरिक्षक यांच्यावर संनियंत्रणासाठी असलेली अवलंबिता कमी होण्यास मदत होणार होती कारण एरवी दररोज सर्व शाळांवर देखरेख ठेवण्यास ते असमर्थ असतात. त्यामुळे याची अंमलबजावणी करणेत यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.८ "स्वयंपाकी नि सहाय्यक यांना प्रशिक्षण देण्यात व आरोग्य तपासणी करण्यात कमतरता/तूट"**
**अभिप्राय**

**१.४१** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार मुलांना द्यावयाचा मध्यान्ह आहार तयार करताना आणि त्याचे वाटप करताना स्वच्छता आणि आरोग्यपूर्णता राखणे आवश्यक आहे. याविषयी, शालेय स्तरावरील स्वयंपाकगृहांसाठी अन्न सुरक्षा आणि आरोग्य पूर्णता यासाठी केंद्र शासनाने मार्गदर्शक तत्वे जारी केली. ज्यानुसार प्रत्येक राज्याने स्वयंपाकी नि सहाय्यक आणि चक चे सदस्य यांच्यासह वेगवेगळया कार्याधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी स्वत:ची एक कायमस्वरुपी प्रमाणित कार्यचालन पध्दती (SOP) विकसीत करावी. तसेच, स्वयंपाकी नि सहाय्यकांच्या पदासाठी त्यांच्या तंदुरुस्तीची/ पात्रतेची खात्री करण्यासाठी त्यांची द्वैवार्षिक आरोग्य तपासणी करण्यासाठी राज्याने प्रभावी कार्यतंत्र विकसीत करण्याचीही आवश्यकता होती. परंतु GoM विभागाने स्वयंपाकी नि सहाय्यक यांच्या प्रशिक्षण किंवा वैद्यकीय तपासणीसाठी कोणतीही SOP तयार केली नव्हती आणि याविषयीची व्यवस्था अगदी तात्पुरती / कामचलाऊ होती. ४२ शाळांमध्ये स्वयंपाकी नि सहाय्यक यांना कोणतेही प्रशिक्षण दिले गेले नव्हते आणि ८१ शाळांमध्ये २०१०-१५ दरम्यान स्वयंपाकी नि सहाय्यक कोणत्याही वैद्यकीय तपासणीला सामोरे गेले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

स्वयंपाकी आणि सहाय्यक यांना प्रशिक्षण देणेसंदर्भात व त्यांची आरोग्य तपासणी करणेत कमतरता व तूट याबाबत समितीने विचारणा केली असता प्रशिक्षणासाठी विभाग SOP तयार करीत असून एक महिन्यामध्ये ते काम पुर्ण होईल असे समितीसमोर सांगण्यात आले. या आरोग्य तपासणी व प्रशिक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी सविस्तर व मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या असतानाही त्याचे पालन झालेले नाही. स्वयंपाकी किंवा सहाय्यकांचे आरोग्य व त्यांना प्रशिक्षण या बाबी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजन योजनेमधील अत्यंत महत्वाचा भाग असून विद्यार्थ्यांसाठींचे जेवण कसे शिजवावे तसेच ते शिजविताना तो स्वयंपाकी निरोगी आहे अथवा त्याच्या कुठल्याही आजाराची बाधा विद्यार्थ्यांना होवू नये यासाठी त्यांना प्रशिक्षण व त्यांची आरोग्य तपासणी या दोन्ही बाबी अत्यंत मुलभूत व अत्यंत महत्वाच्या असताना त्याची अंमलबजावणी झालेली नाही. याबाबत समितीने विचारले असता राज्यात जवळजवळ २ लाख इतके स्वयंपाकी असून त्या सर्व स्वयंपाक्यांना एकाचवेळी प्रशिक्षण देणे विभागाला शक्य नाही. त्यामुळे त्यांना टप्प्याटप्प्याने व विकेंद्रीकरण पध्दतीने प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. त्यातही हा आहार अनेक ठिकाणी महिला बचत गटामार्फत तयार करण्यात येत असून हे बचत गट प्रत्येक वर्षी बदलत असतात. अशावेळी त्यांना प्रशिक्षण देवून होईपर्यंत त्या बचत गटाची मुदत संपलेली असते. यामध्ये वारंवार होणाऱ्या बदलामुळे त्यांना दिलेल्या प्रशिक्षणाचा पुढील वर्षी कोणताही उपयोग होत नाही. तसेच वर्षातुन दोन वेळा या स्वयंपाकी व सहाय्यकांनी वैद्यकीय तपासणी करून घेणेबाबत विभागाकडून परिपत्रक निर्गमित करण्यात आले असतानाही त्याची समाधानकरित्या अंमलबजावणी होवू शकली नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात ही वैद्यकीय तपासणी करणे विभागाला शक्य नसल्यामुळे या स्वयंपाकी/सहाय्यकांनी स्वत: वैद्यकीय तपासणी करून घ्यावी असा त्यातून मार्ग काढण्यात आला. परिणामी ही तपासणी स्वयंपाकी व सहाय्यकांवरच सोडल्यामुळे ती योग्यरित्या केली गेली किंवा कसे याची खात्री करणे शक्य होणारे नाही. त्यामुळे कित्येक स्वयंपाकी यांनी स्वत:ची वैद्यकीय तपासणी करून देखील घेतली नाही. हे प्रशिक्षण व वैद्यकीय तपासणी करण्याची जबाबदारी वास्तविकत: विभागाची आहे. यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या निधीची तरतूद विभागाने कशी केली, याबाबत समितीने विचारणा केली असता यासाठी विभागाकडे वेगळी आर्थिक तरतूद नाही. परंतु विभागाकडे MME म्हणजे Management, Monitoring, Evaluation यासाठी एक वेगळा निधी असतो त्यातूनच हा खर्च करण्यात येतो असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**१.४२ योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार मुलांना द्यावयाचा मध्यान्ह आहार तयार करताना आणि त्याचे वाटप करताना स्वच्छता आणि आरोग्यपुर्णता राखणे आवश्यक असल्याने राज्याने या स्वयंपाकी व सहाय्यकांना प्रशिक्षण देणे तसेच त्यांच्या तंदुरुस्तीची/ पात्रतेची खात्री करण्यासाठी त्यांची द्विवार्षिक आरोग्य तपासणी करण्याची आवश्यकता असताना त्यासाठी राज्याने कार्यतंत्र विकसित करण्याची आवश्यकता असतानाही त्याची कोणतीही पुर्तता विभागाने केली नाही. या योजनेंतर्गत मध्यान्ह आहार तयार करताना प्रशिक्षण व आरोग्य तपासणी या दोन्ही बाबी विद्यार्थ्यांशी निगडीत अत्यंत महत्वाच्या असतानाही त्याची पुर्तता झाली नाही. परिणामी ते स्वयंपाकी व सहाय्यक तसेच काम करीत राहिले. राज्यात या स्वयंपाकी व सहाय्यकांची संख्या जवळजवळ २ लाख आहे. त्यामुळे हे प्रशिक्षण देणे व वैद्यकीय तपासणी करणे तितके सोपे नाही हे समितीला मान्यच आहे. परंतु प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हे प्रशिक्षण ऑनलाईन अथवा संगणकीय सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तयार करून सर्व स्वयंपाकी व सहाय्यकांना दिल्यास त्यासाठी येणारा खर्च देखील कमी होईल व सर्व जणांना एकाचवेळी हे प्रशिक्षण व्हिडीओच्या माध्यमातून घेणे शक्य होईल. त्यामुळे या आधुनिक युगातील तांत्रिक नवनविन तंत्रज्ञानाचा वैज्ञानिक पध्दतीने वापर करून हे प्रशिक्षण देण्यासंदर्भात विभागाने संगणकीय आज्ञावली अथवा एखादा व्हिडीओ विकसित करावा, जेणेकरून हे प्रशिक्षण सर्वांना देणे शक्य होईल. तसेच या सर्व स्वयंपाकी व सहाय्यकांची वर्षातून दोनदा आरोग्य तपासणी करणे बंधनकारक करून त्याच्या अंमलबजावणीची खात्री नियमितरित्या विभागाने घ्यावी. शक्य असल्यास ही तपासणी विभागानेच करावी व तसे शक्य नसल्यास त्यांनी वैद्यकीय तपासणी स्वत:हून करून घेतली याची**

**खात्री व शहानिशा विभागाने करून घ्यावी. तसेच यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद देखील करण्यात यावी. याअनुषंगाने एक कायमस्वरुपी प्रमाणित कार्यचालन पध्दती (SOP) विकसित करावी व त्याची तात्काळ अंमलबजावणी सुरु करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.९ अन्नपदार्थांच्या सेवनासाठीच्या निर्धारित तिथी नंतर त्यांचा वापर केला जाणे**
**अभिप्राय**

**१.४३** योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार शाळांना वाटप करण्यात येणारे अन्नघटक चांगल्या दर्जाचे व आरोग्यपूर्ण असावे. ZPs मधील मध्यान्ह आहाराचे अधिक्षक आणि निवडक २६९ शाळांचे केंद्र प्रमुख यांच्यासह लेखापरिक्षकांनी संयुक्तपणे केलेल्या प्रत्यक्ष पडताळणीमध्ये असे आढळून आले की, १० शाळांमध्ये (पुणे:चार आणि धुळे : सहा) खाद्यतेल आणि मसाले यासारखे वेष्टनयुक्त पदार्थ त्यांच्या सेवनासाठीच्या निर्धारित तिथी पासून एक महिना ते २० महिन्यांनंतरही वापरले जात होते, जे असे मुदतबाह्य झालेले पदार्थ वापरण्यातील छुप्या धोक्यांविषयी संबंधितांना जागरुक /सचेतित करण्यात विभागाला आलेले अपयश तसेच वेगवेगळया पातळयांवर शाळांवर संनियंत्रण ठेवणे आणि त्यांची तपासणी करणे यातील कमतरता दर्शविते.

**शिफारस**

**१.४४ सदरहू आक्षेप अत्यंत गंभीर असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याला अपायकारक व हानीकारक आहे. विद्यार्थ्यांना विभागाने दिलेला माल गुणवत्तेनुसार व वापराच्या मुदतीत देणे बंधनकारक असताना विभागाने त्यांना सेवनासाठीच्या निर्धारीत तिथीनंतर (Expiry date) किंवा त्याच्या थोड्या आधी देण्यात आले. ही अतिशय गंभीर बाब असून यासाठी राज्यस्तरावर कार्यपध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. ही खरेदी केंद्रीय पध्दतीने करण्यात येते. परंतु त्याचे वितरण स्थानिक पातळीवर होवून त्याचा वापर होईस्तोवर त्याची मुदत संपते. अशा परिस्थितीत ही खरेदी करतेवेळीच त्या मालाची निर्धारीत तिथी तपासूनच ही खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून त्याचा वापर विद्यार्थ्यांच्या आहारात होईस्तोवर त्याची निर्धारीत तारीख संपू नये. अतः विभागाने वेष्टनयुक्त (Packed) खाद्यपदार्थ त्यांच्या सेवनासाठीच्या निर्धारीत तिथीच्या पर्याप्त आधी वापरले जातील याची खात्री करावी. सदरहू प्रकरणी महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाची सखोल चौकशी करावी. जर तो माल निर्धारीत तारखेच्या शेवटच्या टप्प्यावर खरेदी करण्यात आला असेल तर त्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहिल. जर विहित मुदतीत हा माल खरेदी झाला आहे परंतु विभागाने वितरीत करण्यास विलंब लावला असेल तर त्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. या सर्व बाबींचे नियंत्रण व खबरदारी शिक्षणाधिकारी, बचत गटाचे संबंधित अधिकारी व शाळेची व्यवस्थापन समिती या सर्व स्तरावरुन घेणे आवश्यक असताना याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झालेले आहे. अतः या प्रकरणी चौकशी करून सर्वच जबाबदार अधिकाऱ्यांवर व पुरवठादारांवर विभागाने कारवाई करावी. तसेच भविष्यकाळासाठी यासाठी एक कार्यन्वयन यंत्रणा तयार करून किमान निर्धारीत तारखेचा कालावधी निश्चित करावा व मालाच्या निर्धारीत तारखेच्या शेवटच्या सहा महिन्याच्या कालावधीत हा माल खरेदीच करु नये अशाप्रकारचे निकष तयार करण्यात यावेत. बऱ्याचदा माल नियमितपणे येत नसल्यामुळे जसा माल आला तसा उतरवून घेण्याशिवाय शाळांकडे पर्याय नसतो. अशावेळी आहारात कोठेही खंड पडू नये अशापध्दतीने ही यंत्रणा शासनाने राबवावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.१० "मुलांनी वापरावयाच्या द्रवरुप साबणाचा (hand wash) असंबध्द पुरवठा"**
**अभिप्राय**

**१.४५** केंद्र शासनाने सर्व राज्य शासनांना द्रवरुप साबणाचा पुरवठा होण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या, जेणेकरून मुले जेवणापूर्वी आणि जेवणानंतर खात्रीने त्यांचे हात स्वच्छ करतील. सन २०१०-१५ दरम्यान विभागाने शाळांना वाटप करण्यासाठी द्रवरुप साबणाच्या एकूण रु.१०.३१ कोटी किंमतीच्या २०.०४ लाख बाटल्या (प्रत्येकी २५० मि.ली. क्षमतेच्या) खरेदी केल्या.

शाळांसाठी द्रवरुप साबणाची खरेदी व पुरवठा अतिशय असंबध्द रितीने केला जात होता. उदाहरणार्थ, विभागाने २०१२-१३ मध्ये ८५०३१ शाळांसाठी द्रवरुप साबणाच्या ८.९३ लाख बाटल्या खरेदी केल्या परंतू २०११-१२ मध्ये मात्र ८९३३८ शाळांसाठी फक्त २.५३ लाख बाटल्या खरेदी केल्या होत्या. २०१०-११ व २०१३-१४ दरम्यान अनुक्रमे ८८६४१ आणि ८६०२८ शाळांसाठी द्रवरुप साबणांची कोणतीही खरेदी करण्यात आली नव्हती. ज्या वर्षात (२०११-१२) द्रवरुप साबण खरेदी करण्यात आला होता, तेव्हाही सर्व शाळांना पुरवठा करण्यासाठी तो अपर्याप्त होता. द्रवरुप साबणाची खरेदी व पुरवठा करण्याचा आराखडा विषमतोल होता कारण, सरतेशेवटी प्रत्येक शाळेला वर्षभरात फक्त ४ ते १० बाटल्याच प्राप्त होणार होत्या हे चमत्कारीकच होते कारण ही संख्या इतकी नगण्य होती की मुलांमध्ये आरोग्य व स्वच्छतेच्या चांगल्या सवयी बिंबवण्याची मूळ कल्पना त्यामुळे धोक्यात आली होती. शासनाने सांगितले की द्रवरुप साबणाची खरेदी करण्यासाठी GoI कडून निधीची कोणतीही स्वतंत्र तरतूद

करण्यात आली नव्हती आणि योजनेच्या व्यवस्थापन, संनियंत्रण आणि मूल्यमापन या घटकांसाठी उपलब्ध असलेला निधी उपलब्धतेनुसार यासाठी वापरण्यात येत होता. योजनेसाठी व्यवस्थापन, संनियंत्रण व मूल्यमापन या घटकाखाली उपलब्ध असलेल्या निधीतून पात्र शाळांना सन २०१५-१६ मध्ये द्रवरुप साबणाचा पुरवठा केला असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**१.४६ केंद्र शासनाने राज्य शासनाला मुलांच्या स्वच्छतेच्या दृष्टीने द्रवरुप साबणाचा पुरवठा करण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु या द्रवरुप साबणाची खरेदी व पुरवठा अतिशय असंबध्द पध्दतीने करण्यात आल्यामुळे मुलांमध्ये आरोग्य व स्वच्छतेच्या चांगल्या सवयी बिंबवण्याची मुळ कल्पना यामुळे धोक्यात आली. द्रवरुप साबणाच्या खरेदीसाठी कोणतीही स्वतंत्र निधीची तरतूद केंद्र शासनाकडून करण्यात येत नाही. तर योजनेच्या व्यवस्थापन, संनियंत्रण आणि मुल्यमापन या घटकांसाठी असलेला निधी उपलब्धतेनुसार यासाठी वापरण्यात येतो. त्यामुळे लिक्वीड सोप देण्याचे आता बंदच करण्यात आले असून नियमित साबणाचा वापर करण्यासाठी स्थानिक पातळीवर त्याची व्यवस्था करणेसंदर्भात विभागाने सुधारीत धोरण अवलंबिलेले आहे. मुलांच्या स्वच्छतेला याअनुषंगाने प्राधान्य देणे आवश्यक असून द्रवरुप किंवा अन्य साबण वापरावा याचा योग्य तो निर्णय निधीच्या उपलब्धतेनुसार विभागाने घ्यावा. परंतु कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष होणार नाही व त्यामुळे त्यांच्या आरोग्यास कोणतीही हानी पोहचणार नाही व साबणाची तरतूद अखंडीत पध्दतीने सुरु राहिल याची खात्री विभागाने करावी व आवश्यकता असल्यास त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद राज्य शासनाच्या स्तरावरुन करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.११ "आपत्कालीन वैद्यकीय आराखडयाचा अभाव"**
**अभिप्राय**

**१.४७** केंद्र शासनाने जारी केलेल्या सूचनांनुसार, अन्नविषबाधा, आग, नैसर्गिक आपत्ती इत्यादी आकस्मिक समस्यांना तोंड देण्यासाठी प्रत्येक शाळेकडे आपत्कालीन वैद्यकीय आराखडा तयार असावा. परंतु १७१ शाळांमध्ये रुग्णवाहीका सेवा, अग्निशमनकेंद्रे, पोलिस स्थानके आणि रुग्णालये यांचे दूरध्वनी क्रमांक दर्शविले नव्हते. तसेच १८३ शाळांमध्ये जी अग्नीशमन उपकरणे बसविली होती त्यांचा वैधतेचा कालावधी संपल्यावरही त्यामध्ये अग्नीशमन द्रव्यांचा पुनर्भरणा करण्यात आला नव्हता. शासनाने सांगितले की शाळांमध्ये मोक्याच्या जागी औषधालये, जिल्हा रुग्णालये, रुग्णवाहीका सेवा, डॉक्टर्स इत्यांदीचे संपर्क क्रमांक दर्शविण्याच्या / बाळगण्याच्या आणि शाळेत वाळूच्या बादल्या ठेवण्याच्या सूचना देण्यात येत होत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सन २०१४ मध्ये योजनेबाबतची माहिती देणारे बॅनर्स पुरविण्यात आलेले आहेत. सन २०१८-१९ मध्ये आपातकालीन सेवा दूरध्वनी क्रमांक व योजनेबाबत माहिती देणारे फ्लेक्स बोर्ड सर्व शाळांना देण्यात येणार आहेत असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**१.४८ महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचे व बंधनकारक असताना २६९ पैकी १७१ शाळांमध्ये रुग्णवाहिका सेवा, अग्निशमन केंद्रे, पोलीस स्थानके आणि रुग्णालये यांचे दुरध्वनी क्रमांक दर्शविलेले नव्हते. तसेच १८३ शाळांमध्ये अग्निशमन उपकरणांमध्ये द्रव्यांचा पुनर्भरणा करण्यात आला नव्हता. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने आपातकालिन वैद्यकीय आराखडा शाळेच्या स्तरावर यशस्वीरित्या कार्यरत असणे अत्यंत आवश्यक असताना याचा अभाव समितीला दिसून आला. कधी विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाली किंवा आग लागली किंवा नैसर्गिक आपत्तीमधून एखादी आकस्मिक घटना घडली तर या सुविधेचा लाभ तात्काळ विद्यार्थ्यांना घेणे शक्य होण्यासाठी ही अद्ययावत माहिती शाळेच्या दर्शनी भागात लावणे अत्यंत आवश्यक असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. हे संपुर्ण काम शाळेच्या व्यवस्थापन समितीचे आहे. अग्निशमन उपकरणात भरावयाच्या द्रव्यांचा पुनर्भरणा करणे आवश्यक असताना आर्थिक तरतूदीअभावी हा भरणा करण्यात न आल्यामुळे ही अग्निशमन उपकरणे कोणत्याही उपयोगाची राहिली नाहीत. याउपर आग नियंत्रणात आणण्यासाठी या उपकरणांजवळ रेतीने भरलेली पोती ठेवण्यात येत असल्याचे समितीस सांगण्यात आले. परंतु समितीच्या मते वाळूची पोती ठेवणे हा तितकासा प्रभावी उपाय नसल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. या सर्व बाबींसाठी केंद्राकडून कोणताही निधी प्राप्त होत नाही तसेच राज्य शासनाच्या स्तरावरुन देखील कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात येत नाही. त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये केंद्र शासनाने दिलेल्या निधी व्यतिरिक्त अन्य बाबींसंदर्भात मोठ्या प्रमाणात निधीअभावी पुर्ततेचा अभाव दिसून येतो. अग्निशमन उपकरणे जर शाळांमध्ये बसविलेली असतील तर त्याचे पुनर्भरण करणे देखील अत्यंत आवश्यक आहे व त्यासाठी निधीची तरतूद देखील विभागाने करणे क्रमप्राप्त आहे. आवश्यकता पडल्यास सादिल अनुदानातून हा खर्च करणे अनिवार्य करण्यात यावे. परंतु कोणत्याही परिस्थितीत आपातकालिन वैद्यकीय आराखड्यात कोणताही अभाव राहू नये यासाठी आवश्यक ती उपाययोजना विभागाने करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.४.१२ "गोणपाटाच्या पोत्यांची विल्हेवाट न लावल्यामुळे महसूलाची हानी"**
**अभिप्राय**

**१.४९** डिसेंबर,२०१२ मध्ये, तांदूळाच्या रिकाम्या पोत्यांची गट पातळीवर विल्हेवाट लावण्याविषयी विभागाने नोडल संस्थांना निर्देश दिले होते. परंतु सप्टेंबर,२०१४ मध्ये गट पातळी ऐवजी GoM च्या महिला व बाल विकास विभागाशी सल्लामसलत करून निश्चित केलेल्या दराने प्रत्येक तीन महिन्यांनी एकदा शाळेच्या पातळीवरच रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट लावण्याचे आणि त्यातून मिळणारी रक्कम शासकीय खात्यात जमा करण्याचे निर्देश विभागाने या संस्थांना दिले. निवडक २३९ शाळा व ३० पैकी २३ मध्यवर्ती स्वयंपाकगृहे यांच्याकडील दस्तऐवजांच्या तपासणीअंती एकही शाळा किंवा मध्यवर्ती स्वयंपाकगृह रिकाम्या पोत्यांचा हिशोब ठेवत नव्हते. पुढे, डिसेंबर,२०१२ व सप्टेंबर,२०१४ मध्ये विभागाने निर्देश जारी केले असतानाही गट किंवा शाळा पातळीवर रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट लावली जात नव्हती. केंद्रीय अनुदानातून तांदूळाची खरेदी केली जात असल्याने, रिकाम्या पोत्यांच्या विक्रितून मिळणारी रक्कम योजनेच्या लेख्यांमध्येच जमा करावयास हवी होती. म्हणूनच रिकाम्या पोत्यांच्या विक्रीतून मिळणारी रक्कम शासकीय लेख्यांत जमा करण्याचे विभागाने दिलेले निर्देश (सप्टेंबर,२०१४) देखील उचीत नव्हते.

या योजनेतंर्गत २०१२-१५ दरम्यान भारतीय अन्न महामंडळांच्या वखारींमधून प्रत्येकी ५० कि. ग्रॅम वजनाच्या १.५५ कोटी पोत्यांमधून ७.७६ लाख मेट्रीक टन तांदूळाची उचल करण्यात आली होती. परंतू रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट न लावल्यामुळे विभागाने अंदाजे रु.७.७६ कोटी रक्कम या कालावधीत गमावली.

**शिफारस**

**१.५० गोणपाटाच्या पोत्यांची विल्हेवाट न लावल्यामुळे झालेल्या महसूलाची हानी ही अंदाजित रु.७.७६ कोटी इतकी असून ही रक्कम फार मोठी असल्यामुळे दुर्लक्षित करता येणार नाही. ३ महिन्यातून एकदा शाळेच्या पातळीवरुन रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट लावून त्यातून मिळणारी रक्कम शासकीय खात्यात जमा करणे आवश्यक असताना त्याची विल्हेवाट न लावल्यामुळे मोठ्या प्रमाणात महसूलाची हानी झाल्याचे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. समितीच्या असेही निदर्शनास आले की, बऱ्याच शाळांमध्ये पावसाच्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी अथवा जमिन स्वच्छ करण्यासाठी या बारदानांचा वापर केला जातो. तसेच काही पोती फुटलेली असतात. अशा परिस्थिती हा बारदानांचा ताळमेळ लागणे कठीणच होते. परंतु यातून मिळणारी रक्कम ही जवळजवळ रु. ७ ते ८ कोटी असल्यामुळे विभागाने यंत्रणा सुस्थितीत राबवून यासाठी यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक आहे. कोठेही या यंत्रणेत व्यत्यय वा खंड पडता कामा नये. जर शासनाने रिकाम्या पोत्यांचा हिशोब ठेवण्याचे आदेश दिले असतील तर त्याचे पालन करणे शाळांवर बंधनकारकच आहे व विभागाने ही बाब समितीसमोर मान्य देखील केली. या बारदानांचा हिशोब ठेवण्यामागील उद्देश असाही आहे की, यावरुनच शाळांना किती धान्य पुरवठा झाला हे सिध्द करता येते. बऱ्याचदा पुर्ण प्रमाणात शाळांना धान्य पुरवठा करण्यात येत नाही, अशावेळी या बारदानांच्या माध्यमातून हे संनियंत्रण ठेवणे शक्य आहे. असा हिशोब ठेवण्यास शिक्षकांकडून मोठ्या प्रमाणात तीव्र विरोध करण्यात येतो. या बाबींकडे विभागाने आतापर्यंत फारसे लक्ष दिले नसल्याचे समितीसमोर मान्यच करण्यात आले. परंतु यातून विभागाने योग्य तो मार्ग तात्काळ काढावा व बारदानांचा हिशोब, त्याची विक्री, त्या माध्यमातून प्राप्त झालेला महसूल शासकीय खात्यात तात्काळ जमा करण्यात यावा. शिक्षकांना ही कामे करणे शक्य नसल्यास पुरवठादारांनी ही बारदाने गोळा करून तो विकून त्याचा हिशोब द्यावा अथवा ती रक्कम या पुरवठादारांच्या देयकातून वजावट करून घेण्याच्या पर्यायाचा विचार करून त्याचा अवलंब करण्याबाबत योग्य तो निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात यावा. त्यासाठी संगणकीकृत यंत्रणा तयार करण्यात यावी. शक्यतोवर शाळा व्यवस्थापन समितीनेच या बाबींची प्रत्यक्षात तपासणी करणे अधिक योग्य व सोईस्कर ठरेल. त्याअनुषंगाने बारदानांचा हिशोब, त्याची विल्हेवाट, विक्री व त्यातून आलेली रक्कम शासनखाती जमा करणे यासाठी आवश्यक ती यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.५ "संनियंत्रण"**
**परिच्छेद क्र.२.३.५.१ "संनियंत्रणातील त्रुटी"**
**अभिप्राय**

**१.५१** एखादी योजना, कार्यक्रम किंवा प्रक्रिया यातील तफावतींचा त्यांच्यावर लवकरात लवकर सुधारणात्मक कार्यवाही करण्यासाठी आणि भावी नियोजनात त्यातून बोध घेण्यासाठी शोध घेण्याच्या उद्देशाने त्यांच्या प्रगतीचा माग घेण्यासाठी संनियंत्रण अत्यंत महत्वपूर्ण असते. परंतु मध्यान्ह आहार योजनेसह इतर वेगवेगळया केंद्रिय योजनांच्या राज्य प्रकल्प संचालकांना योजनेवर संनियंत्रण ठेवण्यासाठी एक जिल्हास्तरीय समिती गठित करण्यासाठी केंद्र शासनाने सूचना जारी केल्या. केंद्र/राज्य विधानमंडळाचे सदस्य, जिल्हाधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, ZPs चे सदस्य व परिसरात प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या दोन NGOs इत्यादींच्या एकत्रित सहभागाने समिती गठित करायची होती. बैठकीच्या वेळी सर्वात वरिष्ठ विधानमंडळ सदस्याने समितीचे अध्यक्षपद भुषवायचे होते. परंतू, डिसेंबर,२०१५ पर्यंत GoM ने अशी कोणतीही समिती गठित केली नव्हती. निवड केलेल्या नऊपैकी फक्त दोन जिल्ह्यांनी (धुळे आणि सोलापूर) MDM योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या शाळांची

आकस्मिक तपासणी करण्यासाठी भरारी पथके तयार केली होती. विभागाने मंजूरी दिल्यानंतर सहा वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटूनही उर्वरीत सात जिल्ह्यांनी अद्याप भरारी पथके तयार केली नव्हती. भरारी पथकांनी प्रत्येक महिन्यात किमान दहा शाळांची तपासणी करणे आवश्यक होते आणि संबंधित ZPs आणि शिक्षण अधिकाऱ्यांना अहवाल सादर करावयाचे होते. अशाप्रकारे योजनेवर प्रभावी संनियंत्रण ठेवण्यासाठीच्या कार्यतंत्रांपैकी एक कार्यतंत्र पूर्णपणे प्रस्थापित झाले नव्हते.

विभागातील सार्वजनिक तक्रार निवारणाची व्यवस्था खूप प्रभावी नव्हती कारण टोल बी क्रमांकावरुन (१८०० २३३ ९९८८) दाखल केलेल्या तक्रारींची नोंद जर नोंदवहीत घेण्यात आली होती तरी या तक्रारींवर केलेल्या अंतिम कारवाईची नोंद नोंदवहीत घेतल्याचे आढळून आले नव्हते. तसेच, पर्याप्त संनियंत्रणासाठी SNA कडून प्रलंबित तक्रारींचा मासिक किंवा वार्षिक संक्षिप्त गोषवारा देखील तयार करण्यात येत नव्हता. तसेच सामान्य पध्दतीने प्राप्त होणाऱ्या लेखी तक्रारींची नोंद घेण्यासाठी विभागाकडे तक्रारींची नोंदवही ठेवण्यात आली नव्हती. सन २०१०-१५ दरम्यान विभागामध्ये ७९ लेखी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या ज्यापैकी १८ प्रकरणांमध्ये कारवाई केली गेली होती आणि ६१ प्रकरणे डिसेंबर,२०१५ रोजी प्रलंबित होती. २०११-१४ मधील ४१ प्रकरणांत चौकशी अधिकाऱ्यांनी कोणतीही चौकशी केली नव्हती. अशाप्रकारे तक्रार नोंदवहीत तक्रारींची नोंद घेण्याची कोणतिही व्यवस्था नसल्यामुळे संनियंत्रण कार्यतंत्र निष्प्रभ ठरले. नोडल संस्थांनी (SNA) राज्यासाठी तयार केलेल्या आणि GoI ला सादर केलेल्या, तांदूळाची सुरुवातीची शिल्लक, संस्थांकडून अधिमान्यता प्राप्त झाल्यावर वाहतुकदारांनी उचल केलेला तांदूळ, वापरलेला तांदूळ आणि तांदूळाची अंतिम शिल्लक यांची स्थिती दर्शविणाऱ्या त्रैमासिक प्रगती अहवालांवरुन (QPR) २०१०-१५ दरम्यान विभागामध्ये ७९ लेखी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या ज्यापैकी १८ प्रकरणांमध्ये कारवाई केली गेली होती आणि ६१ प्रकरणे डिसेंबर,२०१५ रोजी प्रलंबित होती. २०११-१४ मधील ४१ प्रकरणांत चौकशी अधिकाऱ्यांनी कोणतीही चौकशी केली नव्हती. अशाप्रकारे तक्रार नोंदवहीत तक्रारींची नोंद घेण्याची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे संनियंत्रण कार्यतंत्र निष्प्रभ ठरले. SNA ने राज्यासाठी तयार केलेल्या आणि GoI ला सादर केलेल्या तांदूळाची सुरुवातीची शिल्लक SNA कडून अधिमान्यता प्राप्त झाल्यावर वाहतुकदारांनी उचल केलेला तांदूळ वापरलेला तांदूळ आणि तांदूळाची अंतिम शिल्लक यांची स्थिती दर्शविणाऱ्या त्रैमासिक प्रगती अहवालांवरुन (QPR) २०१०-१५ दरम्यानच्या प्रत्येक वर्षात सुरुवातीच्या आणि अंतिम शिल्लकींमध्ये मोठया प्रमाणात विसंगती आढळून आल्या होत्या.

यासंदर्भात शासन निर्णय दिनांक २५/०३/२०१४ नुसार शालेय पोषण आहार योजनेतंर्गत केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणाली तपासणीसाठी महानगरपालिका व नगरपालिका स्तरावर स्वंतत्र यंत्रणा गठित करण्यात आल्या आहेत. विभागाने दि.२२/०४/२०१५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा स्तरीय संनियंत्रण समिती गठित करण्यात आली असून सदर समितीचे अध्यक्ष संबंधित जिल्हयाचे सर्वात वरिष्ठ खासदार आणि सदस्य सचिव हे संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी आहेत. प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या दि. ०८/०६/२०१५ च्या पत्रान्वये उपरोक्त गठित केलेल्या समितीनुसार (दक्षता समिती) वेळोवळी आढावा घेण्यात येत आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावर शालेय पोषण आहार योजनेकरिता एक टोल बी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यावरती प्राप्त झालेल्या तक्रारीची नोंद घेण्यात येते आणि सदरील तक्रार ज्या जिल्ह्याशी संबंधीत आहे त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी यांना तक्रारीच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतात.

प्रत्येक जिल्हास्तरावर भरारी पथकांची स्थापना करून पथकामार्फत यादृच्छीक शाळांना भेटी देवून शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याची खात्री केली जाते. तसेच, राज्यस्तरावर सुध्दा भरारी पथकांची स्थापना करून शालेय पोषण आहार योजनेच्या कामकाजाचे सनियंत्रण केले जाते. तसेच, शिक्षणाधिकारी, लेखाधिकारी शापोआ, गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक शापोआ, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख शाळाभेटी शालेय पोषण आहार योजनेचा कामकाजाचा आढावा घेत असतात असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**१.५२ शासनाने दि.२२/०४/२०१५ रोजी संनियंत्रण समिती स्थापन करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला असून जिल्हास्तरीय संनियंत्रण समित्या गठीत करण्यात आल्या असून त्यामार्फत संनियंत्रण सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यासंदर्भातील नियमित बैठका घेण्यात याव्यात. तसेच भरारी पथके तयार न केल्यासंदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित केल्याशिवाय योजनेचे नियंत्रण व कार्यान्वयन होवू शकणार नाही. शासनाने जिल्हास्तरीय समितीची स्थापना करून सार्वजनिक तक्रार निवारण व्यवस्थेत सुधारणा करून संपुर्ण सहाय्यासाठी भरारी पथके गठीत करून संनियंत्रण कार्यतंत्र बळकट करावे. तसेच शालेय पोषण आहार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विकसित करण्यात आलेली मध्यांन आहार योजना ही (MDM) पोर्टलच्या माध्यमातून अचूकरित्या राबवावी व या योजनेचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळून अनुदानाचा वापर काटकसरीने आणि कार्यक्षमतेने करून योजनेवर प्रभावी संनियंत्रण ठेवावे. अतः या प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी. तसेच दुष्काळबाधित म्हणून घोषित केलेल्या जिल्ह्यांमधील शाळांचा या योजने अंतर्गत समावेश झालेला नसल्याने मध्यान्ह आहार योजनेचे नियोजन आणि व्याप्ती कमकुवत ठरली. SNA कडून जिल्हे, गट आणि शाळांना अनुदाने मुक्त करण्यात मोठया प्रमाणात विलंब झाला होता. मुलांना शिजवलेला आहार सर्व शालेय दिवशी देण्यात आला नव्हता. मुंबईतील प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमधील मुलांसाठी ISKCON आणि २८८ इतर मध्यवर्ती स्वयंपाकगृहांनी**

**उचल केलेल्या तांदुळामध्ये मोठया प्रमाणात विसंगती असूनही राज्य शासनाने या परिस्थितीचा आढावा घेतला नव्हता. GoI ने विहित केलेल्या मात्रेपेक्षा (१०० मि.ग्रॅ.) खरेदी केलेल्या मुलतत्तव लोहाची मात्रा (४८.५३ मि.ग्रॅ.) लक्षणीयरित्या कमी असल्याने रु.५७.०६ कोटी खर्च करून लोह फॉलिक ॲसिडच्या ८०.७९ कोटी कॅप्स्युल्सचे प्रापण अविवेकी ठरले आणि म्हणूनच ११-१४ वर्षे वयोगटातील निर्धारित लाभार्थ्यांसाठी त्या इच्छित प्रमाणात गुणकारक ठरल्या नाहीत. राज्यात २०१४-१५ दरम्यान १८ टक्के शाळांमध्ये शिक्षकांनी आणि ४५ टक्के शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी माध्यान्ह आहार चाखला नव्हता. स्वयंपाकी आणि सहाय्यक यांच्या प्रशिक्षणात आणि आरोग्य तपासणीत कमतरता होत्या. शाळांकडून खाद्य तेल आणि मसाले यासारख्या वेष्टनयुक्त खाद्य पदार्थांचा वापर त्यांच्या सेवनासाठीच्या निर्धारीत तारखेनंतरही केला जात होता. जिल्हास्तरीय समितीची स्थापना न करणे आणि भरारी पथकांची निर्मिती न करणे यामुळे योजनेचे संनियंत्रण कमकुवत राहिले. मोफत मध्यान्ह आहार देऊनही २०१०-११ च्या तुलनेत २०१४-१५ मध्ये शासकीय, अनुदानीत आणि स्थानिक संस्थांच्या शाळांमध्ये मुलांच्या भरतीमध्ये घट झाली होती. या सर्व बाबी कमकुवत संनियंत्रण दर्शविणाऱ्या आहेत. त्यामुळे विभागाने प्रभावी संनियंत्रण करावे अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.२.३.६ "मूल्यमापन"**
**परिच्छेद क्र.२.३.६.१ "मुलांच्या भरतीच्या संख्येत घट"**
**अभिप्राय**

**१.५३** मुलांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी आकर्षित करण्यासाठी आणि त्यांच्या भरतीच्या संख्येत सुधारणा करण्याच्या उद्देशाने MDM योजना सुरु करण्यात आली होती. SNA निवडक २६९ शाळा आणि निवडक आठ जिल्हे यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या विश्लेषणात असे निदर्शनास आले की, २०१०-११ शी तुलना करता २०१४-१५ मध्ये शासकीय, अनुदानीत आणि स्थानिक संस्थांच्या शाळांमध्ये भरतीच्या संख्येत घट झाली होती. सन २०१०-११ च्या तुलनेत २०१४-१५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात भरतीमध्ये सर्वाधिक घट झाली होती त्याचवेळी निवडक नऊ जिल्ह्यांपैकी मुंबईमध्ये भरतीमधील घट सर्वाधिक होती. पालकांनी त्यांच्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत, विना-अनुदानीत शाळेत प्रवेश घेण्यास पसंती देणे आणि जन्मदर कमी होणे ही कारणे भरतीच्या संख्येत घट होण्यासाठी शासनाने दिली. लोकसंख्येतील एक वाढता हिस्सा मोफत आहारापेक्षा दर्जेदार शिक्षणाला प्राधान्य देत आहे म्हणून अध्यापन / अध्ययनाच्या परिणामांमधील सुधारणांची जोड दिल्याशिवाय फक्त मोफत ग़्र मुलांना शाळेमध्ये टिकवून ठेवण्यास पुरेसे नाही.

**शिफारस**

**१.५४ शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा, खाजगी अनुदानित शाळा, बालकामगार प्रकल्प, शासन अनुदानित मदरसा इत्यादी मधील १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ देण्यात येतो. तथापि, काही वर्षापासून पालकांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे ओढा अधिक असून विद्यार्थी विनाअनुदानित तसेच स्वयंअर्थसहाय्यीत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. सदर शाळांमध्ये शालेय पोषण आहार देण्यात येत नाही. त्यामुळे योजनेतील पात्र विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. तसेच, राज्यातील जन्मदर सातत्याने कमी होत आहे. त्यामुळे देखील विद्यार्थी संख्या कमी होत आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियानातंर्गत डिजीटल शाळा, तंत्रस्नेही शिक्षक यांच्याआधारे राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थी प्रभावीपणे गुणात्मक व दर्जात्मक शिक्षण घेत आहेत.**

**सन २०१५ मध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि. २२ जून,२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सुरु केला आहे व दि. ०९ जानेवारी,२०१७ च्या शासन निर्णयान्वये जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सुरु केला असून या कार्यक्रमातंर्गत ज्ञानरचना कृतीयुक्त अध्यापन पध्दतीने विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. तसेच, शहरी व ग्रामीण शाळांमध्ये मागणीनुसार सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरु केले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित शाळा शासकीय शाळांमधील पटसंख्येमध्ये मागिल दोन वर्षामध्ये वाढ झालेली आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळेमधील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमामुळे गुणवत्ता वाढ झालेली असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मोठया प्रमाणात प्रवेश घेतले आहे असेही समितीस सांगण्यात आले. अतः भरती मोहिमांसारख्या सामाजिक चळवळी आयोजित करून आणि मोफत मध्यान्ह आहारापेक्षा इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाला पालक प्राधान्य देत असल्याने त्यावर जोर देवून शिक्षणाचा दर्जा उंचावून मुलांची भरती आणि पटसंख्या कायम राहिल याची शासनाने सुनिश्चिती करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

विधी व न्याय विभाग

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>परिच्छेद/आक्षेप</th><th>अभिप्राय/खुलासा</th></tr>
<tr><td>१.</td><td>३.१.२.१ अत्यंत गरीब आणि दुर्बल गटातील रुग्णांना बाह्यरुग्ण म्हणून आरक्षण देण्याविषयी MPT अधिनियमात असलेल्या तरतुदींची अंमलबजावणी न करणे.<br>लेखापरीक्षकांना असे आढळून आले की, MPT अधिनियमाच्या कलम ४१ AA मधील तरतूदी जरी ऑगस्ट, १९८६ पासून लागू झाल्या होत्या तरी धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मुंबई उच्च न्यायालयाने या विषयी हस्तक्षेप करुन ०१ सप्टेंबर, २००६ पासून लागू होणारी एक योजना तयार करेपर्यंत जवळजवळ २० वर्षे राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांकडून चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये अत्यंत गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना वैद्यकीय मदत पुरविण्यासाठी कोणतेही निर्देश दिले नव्हते.<br>मुंबई उच्च न्यायालयाने आखलेल्या योजनेतील (योजना) तरतूदी ज्या सप्टेंबर, २००६ पासून लागू झाल्या आणि MPT अधिनियमाच्या कलम ४१ AA मधील तरतूदी तक्ता ३.१.१ मध्ये दर्शविल्या आहेत.
<table>
<tr><td>प्रवर्ग</td><td colspan="2">MPT अधिनियमानुसार</td><td colspan="2">योजनेनुसार</td></tr>
<tr><td></td><td>आंतररुग्ण</td><td>बाहयरुग्ण</td><td>आंतररुग्ण</td><td>बाहयरुग्ण</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">आरक्षण (टक्केवारीत)</td><td colspan="2">आरक्षण (टक्केवारीत)</td></tr>
<tr><td>अत्यंत गरीब</td><td>१० (मोफत)</td><td>10 (मोफत)</td><td>10 (मोफत)</td><td>निरंक</td></tr>
<tr><td>दुर्बल गट</td><td>१० (सवलतीत)</td><td>१० (सवलतीत)</td><td>१० ( सवलतीत)</td><td>निरंक</td></tr>
<tr><td colspan="5">स्रोत : MPT अधिनियम आणि उच्च न्यायालयाची योजना.</td></tr>
</table>
तक्ता ३.१.१ मधून असे दिसून येते की, योजनेखाली अत्यंत गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना फक्त आंतररुग्ण म्हणून आरक्षण विहित केले आहे. आणि MPT अधिनियमात दोन्ही प्रवर्गाखाली बाहय रुग्ण म्हणून १० टक्के आरक्षण ठेवण्याविषयीच्या तरतूदींची अजूनही अंमलबजावणी झाली नाही.<br>महाराष्ट्र शासनाच्या (GOM) विधि व न्याय विभागाने सांगितले (डिसेंबर २०१५)की, उच्च न्यायालयाची योजना ही MPT अधिनियमांच्या विभाग ४१</td><td>महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१ क क अन्वये "... धर्मादाय आयुक्ताने किंवा राज्य शासनाने, रुग्णालय (कोणतेही शुश्रुषालय किंवा प्रसूतीगृह यासह), दवाखाना किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कोणतेही इतर केंद्र (यात यापुढे ज्याचा निर्देश "वैद्यकीय केंद्र" असा करण्यात आला आहे) चालवणाऱ्या अशा कोणत्याही विश्वस्थ व्यवस्थेच्या विश्वस्तांस किंवा त्यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तीस पुढीलपैकी सर्व किंवा कोणतेही निर्देश देणे विधिसंगत असेल" अशी तरतूद आहे. अर्थात सदर कलमानुसार वैद्यकीय उपचार देणारे कोणतेही वैद्यकीय केंद्र अंतर्भूत होते व त्यामध्ये फक्त बाह्यरुग्णांकरिता वैद्यकीय उपचार देणारा दवाखानाही येऊ शकतो.<br>सदर कलम ४१ क क व त्या अंतर्गत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेतील तरतुदींनुसार, सदर अधिनियमांतर्गत नोंदणीकृत विश्वस्थ वव्यवस्था संचालित धर्मादाय रुग्णालयांना / धर्मादाय वैद्यकीय केंद्रांना, पात्र निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना अनुक्रमे मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार देणे बंधनकारक आहे. सदर तरतुदींनुसार उपचार देताना आंतररुग्ण व बाह्यरुग्ण अशाप्रकारचे वर्गीकरण नाही. सबब, सदरहू दोन्ही प्रकारचे रुग्ण हे योजनेअंतर्गत वैद्यकीय उपचार मिळण्यास पात्र ठरतात. त्यानुसार, सदर योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या संकेत स्थळावरिल प्रणालीतही केवळ बाह्यरुग्ण उपचार देणाऱ्या रुग्णालयांचाही समावेश करण्यात आलेला आहे.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | AA शी सुसंगत होती आणि त्यामध्ये खाटांच्या आरक्षणाच्या त्याच तरतूदी उधृत केल्या होत्या.<br>हे उत्तर संदर्भाधीन आहे कारण, लेखापरीक्षकांचा या योजनेला आक्षेप नाही परंतु, त्यांच्या मताप्रमाणे, मुंबई उच्च न्यायालयाने आखलेल्या योजनेत आंतररुग्णांसाठीच्या आरक्षणावर भर दिला जातो त्याचवेळी अत्यंत गरीब व दूर्बल गटातील रुग्णांना बाह्यरुग्ण म्हणून आरक्षण देण्यासाठीच्या MPT अधिनियमातील तरतूदींची राज्य शासनाकडून अद्याप अंमलबजावणी व्हावयाची आहे. | |
| २. | **३.१.२.२ आरक्षणातील कमतरता MPT अधिनियमाच्या** कलम ४१ AA च्या उपकलम ३ मधील तरतूदीनुसार जर राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासाकडून चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमधील आरक्षणाची टक्केवारी राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अनुदान, सूट, सवलत इ.मुळे MPT अधिनियमातील कलम ४१ AA अंतर्गत विहित केलेल्या आरक्षणापेक्षा अधिक ठरली तर अशा वाढीव टक्केवारीने आरक्षण दिले जावे.<br>पुढे, बृहन्मुंबई महानगर पालिकेचा (MCGM) विकास नियंत्रण नियमावली (DCR), १९९१ च्या विनियम ३३ (२) नुसार, समाजातील आर्थिक दृष्टया दूर्बल गटातील व्यक्तींसाठी किंवा दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी एकूण खाटांच्या संखेच्या किमान २० टक्के खाटा मोफत वैद्यकीय उपचारासाठी आरक्षित ठेवल्या जातील या अटीवर सामान्य चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा (FSI) अधिक FSI वैद्यकीय संस्थांना देण्यावी परवानगी देण्यात आली आहे. त्याव्यतिरिक्त एकूण बाहयरुग्णांपैकी १० टक्के रुग्णांना देखील सवलतीच्या दरात उपचार देण्यात यावेत. अशाप्रकारे, MPT अधिनियमाचा कलम ४१ AA च्या उपकलम ३ सह DCR मधील विनियम विचारात घेतले तर अधिनियमाव्या कलम ४१ AA अंतर्गत तरतूद केलेल्या आरक्षणापेक्षा DCR अंतर्गत तरतूद केलेल्या आरक्षणाची टक्केवारी अधिक ठरली.<br>निवडक ११ रुग्णालयांच्या दस्तऐवजांच्या तपासणीत खालील बाबी आढळून आल्या. | उपरोक्त आक्षेप/ परिच्छेदाच्या अंतर्गत नमूद ४ धर्मादाय रुग्णालये मा.उच्च न्यायालयाच्या योजनेतील तरतुदीनुसार खाटांचे आरक्षण ठेवीत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तथापि, सदर रुग्णालये त्यांना भाडेपट्टा / अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक प्रदान करण्याबाबतच्या करारनाम्यानुसार अतिरिक्त टक्केवारीतील खाटा आरक्षित ठेवत नसल्याचा आक्षेप उपस्थित करण्यात आला आहे. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी आरक्षित खाटांच्या मा.उच्च न्यायालयीन योजनेची देखरेख हा विषय या विभागाच्या व या विभागांतर्गत धर्मादाय संघटनेच्या अधिकार कक्षेत आहे.<br>धर्मादाय रुग्णालयांस जागा अथवा FSI मंजूर करताना ज्या अटी व शर्तींच्या आधारे संबंधित प्राधिकरणानी ती मंजूर केलेली आहे. त्या अटी व शर्तींचे पालन करणे हे त्या संबंधित धर्मादाय रुग्णालयांस बंधनकारक आहे. त्या अटी व शर्तींचे पालन होत आहे किंवा नाही, याबाबतची देखरेख करण्याची जबाबदारी ही त्या संबंधित प्राधिकरणाची आहे. |

| | | |
|---|---|---|
| | • वार रुग्णालयांना DCR अंतर्गत अतिरिक्त FSI देण्यात आला होता. आणि म्हणूनच त्यांनी अधिक टक्केवारीत आरक्षण देणे आवश्यक होते. परंतु समाजातील आर्थिक दृष्टया दूर्बल गटातील व्यक्ती किंवा दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना विनाशुल्क उपचारांसाठी एकूण खाटांपैकी किमान २० टक्के खाटा तसेच बाहय रुग्णांना सवलतीच्या दराने उपचारासाठी १० टक्के खाटा आरक्षित ठेवण्या ऐवजी ही रुग्णालये योजनेनुसार आरक्षण देत असल्याचे (अत्यंत गरीब रुग्णांवर विनाशुल्क उपचारांसाठी एकूण वापरातील खाटांपैकी १० टक्के व दूर्बल गटातील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचारासाठी १० टक्के खाटांचे आरक्षण ) आढळून आले.<br>• दोन रुग्णालये – कोकीळाबेन धिरुभाई अंबानी रुग्णालय व वैद्यकीय संशोधन केंद्र मुंबई आणि सुश्रुत रुग्णालय व संशोधन केंद्र मुंबई यांनी जिल्हाधिकारी, मुंबई यांनी प्रतीवर्ष रु. एक इतक्या सवलतीच्या भाडेपट्टीवर अनुक्रमे जानेवारी, १९९८ व मे, १९७९ मधील जमीन दिली भाडेपट्टीकरारानुसार, पहिल्या रुग्णालयाने आंतररुग्णांवर विनाशुल्क उपचारासाठी १५ टक्के आरक्षण आणि सवलतीच्या दराने उपचारासाठी १५ टक्के आरक्षण ठेवावयाचे होते. त्यावेळी दुसऱ्या रग्णालयाने आंतररुग्णांसाठी विनाशुल्क उपचारासाठी ३० टक्के आरक्षण आणि ना नफा ना तोटा तत्वावर उपचारासाठी ३० टक्के आरक्षण ठेवावयाचे होते. परंतु ही दोन्ही रुग्णालये केवळ योजनेनुसारच आरक्षण देत होती. (१० टक्के) जे प्रमाण भाडेपट्टी करारात करारनिविष्ट केलेल्या अक्केवारीपेक्षा ( १५ टक्के आणि ३० टक्के ) कमी होते.<br>शासनाने सांगितले की, अतिरिक्त FSI चे प्रदान आणि भाडेपट्टी या विषयीचे दस्तऐवज प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करण्यात येईल आणि योग्य कारवाई केली जाईल. | |
| ३. | **३.१.२.३ राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांचा शोध घेण्यासाठी यंत्रणेचा अभाव** | सदर आक्षेप / परिच्छेदाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम , १९५० अन्वये धर्मादाय आयुक्तालयात सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था यांची नोंदणी होते. |

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र सुश्रुशा गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत सर्व रुग्णालयांची नोंदणी होणे आवश्यक असते. तसेच धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेला जो राज्य अनुदानीत सार्वजनिक न्यास धर्मादाय रुग्णालये चालविण्याचा उद्देश बाळगतो, त्याची नोंदणी महाराष्ट्र सुश्रुशा गृहनोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत केली जाणे देखील आवश्यक असते. धर्मादाय आयुक्तांनी दिलेल्या माहितीमधून असे आढळून आले की, मुंबई व ठाणे येथे राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासाकडून चालविल्या जाणाऱ्या आणि ऑगस्ट २००७ पर्यंत धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेल्या रुग्णालयांची संख्या डिसेंबर, २०१५ पर्यंत ११३ होती. जी संख्या मागील आठ वर्षांपेक्षा जास्त काळापासून स्थिर होती. यावरुन असे दर्शविले गेले की, जे न्यास ऑगस्ट, २००७ पासून कार्यरत झाले होते आणि म्हणूनच MPT अधिनियमांतर्गत त्यांचा समावेश होऊ शकला नव्हता. त्यांचा शोध घेण्यासाठी धर्मादाय आयुक्तांनी कोणतेही विशेष प्रयत्न केले नव्हते.<br><br>शासनाने सांगितले की, स्थानिक पर्यवेक्षण प्राधिकाऱ्यांकडून रुग्णालयांची यादी प्राप्त करण्याचे आणि अधिनियमातील तरतूदीनुसार धर्मादाय रुग्णांलयांचा समावेश करण्याचे आवश्यक निर्देश सर्व जिल्हा कार्यालयांना देण्यात आले आहेत (मे २०१५). | धर्मादाय आयुक्त कार्यालयात धर्मादाय रुग्णालयांची नोंदणी होत नाही. मा. उच्च न्यायालय मुंबई, यांनी मंजूर केलेली योजना दि. १/०९/२०१६ रोजीपासून अंमलात आलेली आहे. त्यावेळेस, नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेमार्फत संचालित धर्मादाय रुग्णालयांची यादी तयार करण्यात आली. दि. ०७/०३/२०१४ रोजीच्या स्थितीनुसार राज्यात एकूण ४०८ धर्मादाय रुग्णालये योजनेअंतर्गत येत होती. माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१६ मध्ये घेतलेल्या आढाव्यानुसार आजमितीस राज्यातील एकूण ४२४ धर्मादाय रुग्णालये/धर्मादाय वैद्यकीय केंद्र योजनेअंतर्गत येत असल्याचे आढळते. माहे जानेवारी २०१७ मध्ये सदर संख्या ४३० झालेली आहे.<br><br>सदर धर्मादाय रुग्णालयांच्या यादीत, योजनेतील व्याख्येनुसार , राज्यातील सर्वच धर्मादाय रुग्णालयांचा समावेश होण्याच्या दृष्टीने, सर्व संबंधित स्थानिक पर्यवेक्षण प्राधिकाऱ्यांना त्यांचेकडे नोंदणी करण्यात येणाऱ्या धर्मादाय रुग्णालयांची/धर्मादाय वैद्यकीय केंद्रांची यादी, धर्मादाय आयुक्तालयाच्या संबंधीत जिल्हा कार्यालयांकडे पाठविण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. |
| ३-अ | **३.१.२.४ अत्यंत गरीब रुग्णांसाठीचा निधि**<br>योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार (परिच्छेद ४) प्रत्येक सार्वजनिक धर्मादाय रुग्णालयाने "अत्यंत गरीब रुग्णांसाठीचा निधी" (IPF) या नावाचा एक स्वतंत्र निधी निर्माण करावा आणि नियमीत शुल्क भरणाऱ्या रुग्णांच्या एकूण शुल्काच्या दोन टक्के रक्कम यामध्ये जमा करावी. तसेच, योजनेच्या परिच्छेद ११ नुसार जास्तीत जास्त संख्येत अत्यंत गरीब आणि दुर्बल गटातील रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यासाठी IPF खात्यातील उपलब्ध रक्कमेचा वापर करावा. | सदर परिच्छेदात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या योजनेतील तरतूदी केवळ नमूद केलेल्या असून, कोणतेही आक्षेप नमूद नाहीत. सबब, यासंदर्भातील यासंदर्भातील अभिप्राय निरंक आहेत. |
| ४. | **३.१.२.५ अत्यंत गरीब रुग्णांसाठीच्या निधीमध्ये कमी रक्कम जमा करणे**<br>**१) बेथनी रुग्णालय, ठाणे.** | **१) बेथनी रुग्णालय, ठाणे.**<br>सदर रुग्णालयाने उपरोक्त आक्षेपाच्या अनुषंगाने केलेल्या खुलाश्या प्रमाणे व सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे यांच्या यांच्या अहवालानुसार बेथनी रुग्णालयाने खालीलप्रमाणे, गणना करून रु.१,४२,५९,१०५/- |

सदर रुग्णालयाच्या वर्ष २०१२-१५ या कालावधीतील वार्षिक लेखांच्या तपासणीत असे आढळून आले कि, रुग्णालयाने IPF मध्ये रु. १.४३ कोटी रक्कम कमी जमा केली आहे.

शासनाने सांगितले की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त ठाणे, यांनी रुग्णालयाला कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे.

लेखापरीक्षेत पुढे असे आढळून आले आहे की, नियमीत रुग्णांच्या बिलांमध्ये डॉक्टरांच्या शुल्कापोटी आकारल्या जाणाऱ्या एकूण रक्कमेपैकी १५ टक्के हिस्सा बिच कँडी रुग्णालय, मुंबई यांनी स्वत:साठी राखून ठेवला होता आणि उर्वरीत ८५ टक्के रक्कमेचे डॉक्टरांच्या हिश्श्यापोटी प्रदान केले होते. परंतु, एकूण १०० टक्के बिल रकमेऐवजी रुगणालयाने त्यांच्या हिश्श्याच्या (१५ टक्के) फक्त दोन टक्के रक्कम IPF खात्यात जमा केली होती. परिणामी, २०१४-१४ दरम्यान IPF खात्यात रु.३.४७ कोटी जमा करण्यात आले.

शासनाने सांगितले की, सदर बाब सनियंत्रण समितीसमोर मांडण्यात येईल आणि समितीच्या निर्णयानुसार कारवाई केली जाईल.

**२) ब्रीच कॅन्डी रुग्णालय, मुंबई.**

नियमीत रुग्णांच्या बिलांमध्ये डॉक्टरांच्या शुल्कापोटी आकारल्या जाणाऱ्या एकूण रकमेपैकी १५ % हिस्सा ब्रिच कँडी रुग्णालय, मुंबई यांनी स्वत:साठी राखून ठेवला होता आणि उर्वरीत ८५टक्के रक्कमेचे डॉक्टरांच्या हिश्श्यापोटी प्रदान केले होते. परंतु, एकूण १००% बिल रकमेऐवजी रुग्णालयाने त्यांच्या हिश्श्याच्या (१५%) फक्त २% रक्कम IPF खात्यात जमा केली होती. परिणामी , २०१२-१४ दरम्यान IPF खात्यात रु.३.४७ कोटी कमी जमा करण्यात आले.

ऐवजी रु. १,३५,००,१२३/- त्यांचे निर्धन रुग्णांच्या निधीत जमा केलेले आहेत.

| लेखापरीक्षकांनी केलेली गणना | | मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या योजनेनुसार | |
|---|---|---|---|
| सन २०१२ ते २०१५ या कालावधीत ग्रॉस बिलींग म्हणून "less: Reimbursement from IPF for treatments of indigent and weaker section patients" या शीर्षाखाली एकूण रक्कम रु. १,५९,०६,२१९/- इतकी वजा करून घेतलेली रक्कम. | रु.१,७१,३८,२७,३४५/- | सन २०१२ ते २०१५ या कालावधीत ग्रॉस बिलींग म्हणून "less: Billing indigent and weaker section patients" या शीर्षाखाली एकूण रक्कम रु. ५,३८,५५,३००- इतकी वजा करून घेतलेली रक्कम. | रु. १,६७,५८,७८ |
| जमा करावयाची २ % रक्कम | रु. ३,४२,७६,५४७/- | जमा करावयाची २ % रक्कम | रु. ३,३५,१७,५६ |
| प्रत्यक्ष जमा केलेली २ % रक्कम | रु. २,००,१७,४४२/- | प्रत्यक्ष जमा केलेली २ % रक्कम | रु. २,००,१७,४४ |
| कमी जमा केलेली रक्कम | रु. १,४२,५९,१०५/- | कमी जमा केलेली रक्कम | रु. १,३५,००,१२३ |

**२) ब्रीच कॅन्डी रुग्णालय, मुंबई.** मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.९७७/२०१६ सोबत रिट याचिका क्र.२८३२/२०१४ या प्रकरणी दि.१४/१०/२०१६ रोजी आदेश दिले. सदर आदेशानुसार ब्रीच कॅन्डी रुग्णालयाचा संबंधित मुद्दा तसेच योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने इतर मुद्दे यांचे निराकरण करण्याकरीता असोसिएशन ऑफ हॉस्पिटल्स, राज्यस्तरीय प्राधिकरण (State Functionaries), देखरेख समिती, बृहन्मुंबई विभाग व इतर संबंधित यांची संयुक्त बैठक घेण्याकरीता निर्देश दिले. त्यानुसार दि.१९.११.२०१६, दि.२२.११.२०१६ दि.०१/१२/२०१६ व दि.०३/०१/२०१७ रोजी संयुक्त बैठका घेण्यात आल्या. दि.०३/०१/२०१७ रोजीच्या बैठकीत ब्रीच कॅन्डी रुग्णालयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहे ऑगस्ट २०१४ पासून डॉक्टर्स फीज संदर्भात फरकाची रक्कम निर्धन रुग्णांच्या निधीत जमा करण्याची तयारी दर्शविली. सदर प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे. त्यानुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी , ब्रिच कॅन्डी हॉस्पिटल यांनी त्यांचे दि. २३/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये माहे ऑगस्ट २०१४ ते डिसेंबर २०१६ या

| | | |
|---|---|---|
| | | कालावधीतील डॉक्टर फीज मधील डॉक्टरांच्या हिश्श्याच्या २% फरकाची रक्कम रु. ५,३७,६०,४५०/- मा. उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या आधिन राहून IPF मध्ये जमा केली असल्याचे कळविले असून तसेच यापुढे ते नियमीतपणे सदर २ % रक्कम IPF मध्ये जमा करतील असे कळविले आहे. सदर डॉक्टर फीच्या २% फरकांची सप्टेंबर २००६ ते जुलै २०१४ पर्यंतची वसूलीची रक्कम जास्त असल्याने, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम न्यायनिर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे उचित होईल, असा निर्णय उपरोक्त बैठकीत घेण्यात आला आहे. |
| ५. | **३.१.२.६ अत्यंत गरीब रुग्णांसाठीच्या निधीमध्ये दाखवलेला अतिरिक्त खर्च**<br>योजनेच्या परिच्छेद ८ नुसार धर्मादाय रुग्णालयांनी अत्यंत गरीब रुग्णांना त्याचप्रमाणे दुर्बल गटातील रुग्णांना काही शुल्क विरहीत सेवा मोफत पुरवाव्या. तसेच योजनेच्या मार्गदर्शक तत्वाच्या परिच्छेद १० नुसार दुर्बल गटातील रुग्णांविषयीच्या सशुल्क सेवांचे देयक तयार करावे आणि दुर्बल गटातील रुग्णांनी अदा केलेली रक्कम वजा करुन त्यानंतर उर्वरीत रक्कम IPF खात्यात खर्ची दाखवावी. निवडक ११ रुग्णालयांपैकी दोन रुग्णालयांमधील २०१२-१५ या वर्षीच्या देयकांची तपासणी केली असताना असे आढळून आले की, IPF खात्यात रु.२.७५ लाख अतिरिक्त खर्ची दाखविण्यात आले होते. जे खाली विषद केले आहे.<br>• खाटा व इतर नियमित तपासण्या यासारख्या शुल्कविरहीत सेवांचा समावेश करण्यात आल्यामुळे सुश्रुत रुग्णालय आणि संशोधन केंद्र, मुंबई यांनी ३६ देयकांपैकी ५ देयकांमध्ये IPF मध्ये रु. ८७,४१८/- अतिरिक्त खर्ची दर्शविले.<br>• पी.डी.हिंदुजा रुग्णालय मुंबई यांनी ४३ देयकांपैकी ४ देयकांमध्ये ४ दुर्बल गटांतील रुग्णांकडून रु. ११.०६ लाख रक्कम आकारली होती. परंतु IPF खात्यात ती खर्ची दाखविताना रुग्णालयाने या ४ रुग्णांना जीवनदायी योजनेअंतर्गत संचालक, आरोग्य सेवा यांच्याकडून प्राप्त झालेले आर्थिक साहाय्य (धनादेश) तसेच रुग्णांनी स्वत:च्या उपचाराकरिता केलेला रु. ७.४२ लाख खर्च विचारात घेतला | **१) सुश्रुत हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर :-**<br>सदर रुग्णालयाने उपरोक्त ५ देयकांपैकी रुग्ण IP-११९९६७, IP-११०४७५, या लाभार्थी रुग्णांच्या देयकामधून अनुक्रमे रु.१७,२३५/- व रु.६,१८५/- इतकी आय.पी.एफ. मधून जास्त खर्च केलेली रक्कम जानेवारी 2016 च्या मासिक विवरणपत्रनुसार आय.पी.एफ मध्ये वर्ग केल्याचे धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाने कळविले आहे.<br>सदर रुग्णालयाने रुग्ण IP-११०५९८, IP-११०३४७, ICO ९७०६ या लाभार्थी रुग्णांच्या देयकातून आय.सी.यू.बेड चार्जेसची रक्कम अनुक्रमे रु.४२,०००/- , रु.२९००/-, रु.१६,५२२/-आय.पी.एफ. वर्ग केलेली नाही. याबाबत सहाय्यक धर्मादाय आयुक्त (रुग्णालय), बृहन्मुंबई सदर रुग्णालयास, उपरोक्त रक्कम आय.पी.एफ मध्ये वर्ग करण्याचे तसेच लाभार्थी रुग्णांच्या देयकात आकारलेली आय.सी.यू.बेड चार्जेस ची रक्कम (मॉनिटर व ऑक्सिजन चार्जेस सोडून ) माहे सप्टेंबर, २००६ ते माहे सप्टेंबर २०१५ पर्यंत परिगणित करुन आय.पी.एफ. मध्ये वर्ग करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सुश्रुत हॉस्पिटल व रिसर्च सेंटर यांनी निर्धन रुग्णांसाठी रु. ७, १२,५७५/- व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी रु. २, ३२,२६५/- अशाप्रकारे रु. ९, ४४,८४०/- इतकी रक्कम निर्धन रुग्ण निधीत जमा केली आहे.<br><br>**२) पी.डी.हिंदुजा रुग्णालय :-** सदर रुग्णालयाने ४ दुर्बल घटकातील रुग्ण ऐडमीशन क्र. १२१६११७, १२१४०९७, १२१५२६४, १२०४४४९ यांचे देयकानुसार अनुक्रमे रु. ७६,३२३/- रु. ८१,०२०/-, रु. १४,७५४/- रु. ८,६६०/- एकूण रक्कम रु. १,८०,७५७/- IPF मधून जास्त खर्च केलेली आहे. याबाबत सहायक धर्मादाय आयुक्त (रुग्णालय) बृह्नमुंबई यांनी सदर रुग्णालयास रक्कम रु. 1,80,757/- IPF मध्ये वर्ग करण्याचे आदेश दिले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | नव्हता. परिणामी रुग्णालयाने रु. ३.६४ लाख ऐवजी IPF खात्यात रु. ५.५२ लाख खर्ची दाखविले. ज्यामुळे रु. १.८८ लाख अतिरिक्त खर्च दर्शविला गेला.<br>शासनाने असे सांगितले की, लेखापरीक्षकांनी उपस्थित केलेल्या आक्षेपाला रुग्णालयाने दिलेल्या उत्तराची पडताळणी केली जाईल. आणि जर रुग्णालयांनी योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब केला नसल्याचे आढळूनआले तर, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. | |
| ६. | **३.१.२.७ रुग्णांवर अनावश्यक आर्थिक भार**<br>योजनेच्या परिच्छेद १० नुसार, रुग्णालयांनी ज्या किंमतीत औषधे, उपभोग्य वस्तु आणि रोपणे खरेदी केली असतील त्याच किंमतीत त्या वस्तु रुग्णांकडून आकारल्या जाव्यात. परंतु, दुर्बल गटातील रुग्णांनी औषधे, उपभोग्य वस्तु आणि रोपणे यांच्या देयकाच्या किमान ५० टक्के रक्कम प्रदान करावी. पुढे, योजनेच्या परिच्छेद ९ नुसार, अत्यंत गरीब रुग्णांना दाखल करुन घेतांना धर्मादाय रुग्णालयांनी कोणत्याही अनामत रक्कमेची मागणी करुन नये.<br>सन २०१२-१५ या कालावधीत पी. डी. हिंदुजा रुग्णालय, मुंबई यांच्या सहा देयकांची आणि बेथनी रुग्णालय, ठाणे यांच्या ५५ देयकांची तपासणी केली असता असे आढळून आले की, दुर्बल गटातील रुग्णांकडून फक्त औषधे, उपभोग्य वस्तू आणि रोपणे यांचा किंमत प्राप्त करण्याऐवजी त्यांच्याकडून बधिरीकरण शुल्क, ICU शुल्क, डॉक्टरांचे शुल्क, इमेजिंग शुल्क, तपासणी शुल्क, शस्त्रक्रिया दालन शुल्क आणि शस्त्रक्रिया शुल्क यापोटी ५०% शुल्क आकारण्यात आले होते. परिणामी, या दोन रुग्णालयातील ६१ देयकांमध्ये दुर्बल गटातील रुग्णांवर रु. ३८.०३ लाख इतका अनावश्यक आर्थिक भार पडला.<br>शासनाने सांगितले की, लेखापरीक्षकांनी उपस्थित केलेल्या आक्षेपाला पी.डी.हिंदुजा, रुग्णालयाने दिलेल्या उत्तराची पडताळणी केली जाईल आणि जर रुग्णालयांनी योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब केला नसल्याचे आढळून आले तर त्यांच्यावर कारवाई केली | १) **हिंदुजा रुग्णालय** :- सदर रुग्णालयाने सदर आक्षेपांच्या अनुषंगाने दिलेल्या खुलाश्यात लेखापरीक्षण अहवालात देयकांचा दिला तपशील नसल्याने यावर भाष्य करीत नसल्याचे नमूद केले आहे. तथापि, धर्मादाय सह आयुक्त बृहन्मुंबई कार्यालयाने सदर रुग्णालयातील काही दुर्बल घटकातील रुग्णांची देयके तपासली असता रुग्णालयाने सदर देयकात Bed charges, Anesthesiology charges, ECG charges, Doctors Fess, Imaging charges, X-ray, Chest P.A., CBC, Creatinine, ABO and RH यावर शुल्क आकारणी केलेली नाही. तसेच Bislery water यावर आकारलेले खर्च IPF मधून खर्ची टाकलेले नाही. तसेच, Bed charges या शीर्षाखाली direct consumables (ICU/ICCU/PICU) Intensive care charges यावर शुल्क आकारणी केलेली नाही. तसेच X-ray portable, operation theatre charges, Surgery charges यावरील शुल्क आकारणी IPF मधून खर्ची टाकलेले आहे, असे कळविण्यात आले आहे.<br>मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेतील खंड क्र. 9 व 10 नुसार जर डॉक्टरांनी त्यांच्या मेहनतान्यात सूट दिली असेल तर असा मेहेनताना अंतिम देयकांमध्ये (बिल) समाविष्ट करू नये. तसेच खंड क्र. ८ नुसार एकूण ९ सेवा नादेय आहेत, त्याव्यतिरिक्त इतर सर्व सेवा ह्या देय सेवा आहेत. त्यानुसार, सहायक धर्मदाय आयुक्त (रुग्णालय), बृहन्मुंबई यांनी त्यांचे दि. २४/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर रुग्णालयास दुर्बल घटकातील रुग्णांच्या देयकांची परिगणना योजनेतील तरतुदींनुसार करण्यात यावी, असे आदेश दिले आहेत.<br>२) **बेथनी रुग्णालय, ठाणे** :- सदर रुग्णालयाने माहे नोव्हेम्बर २०१३ ते ऑगस्ट २०१५ या कालावधीतील ICU/NICU/HDU बेड चार्जेस व नर्सिंग केअर यावरील IPF मधून खर्च केलेली |

| | | |
|---|---|---|
| | जाईल. त्यांनी पुढे असेही सांगितले की, बेथनी रुग्णालयाला कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली आहे.<br>पुढे सन २०१२-२०१५ या कालावधीशी संबंधित १३९ देयकांच्या तपासणीत असे आढळून आले कि, उपरोक्त ३ रुग्णालयांनी योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करून अत्यंत गरीब ९ रुग्णांकडून रु. १.७४ लाख इतकी अनामत रक्कम प्राप्त केली होती.<br>अत्यंत गरीब रुग्णांकडून रुग्णालयांनी अनामत रक्कम प्राप्त करु नये, हे शासनाने मान्य केले आणि याविषयी आवश्यक कारवाई केली जाईल अशी ग्वाही दिली. | रक्कम परिगणित करून रु. २६,३७, ४००/- पुन: IPF मध्ये वर्ग केलेली आहे. तसेच, सदर रुग्णालयाने माहे नोव्हेम्बर २०१३ च्या आधी व ऑगस्ट २०१५ च्या नंतर सदर रक्कम IPF मधून खर्च केलेली नाही, असे साहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे यांनी कळविले आहे. त्याचप्रमाणे, सदर रुग्णालयाने औषधे, उपभोग्य वस्तू आणि रोपणे यांच्या खरेदी किंमत व MRP यातील फरकाची सन २०१२ ते २०१५ या कालावधीतील एकूण रक्कम रु. ६, २०,७४४/- व सन २०१० ते २०१२ या कालावधीतील एकूण रक्कम रु. ३, ०९,०३१/-. तसेच, सप्टेंबर २००६ ते माहे मार्च २०१० पर्यंत एकूण रक्कम रु. ५ लाख IPF मध्ये वर्ग केल्याचे सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे यांनी कळविले आहे. तसेच, सदर रुग्णालयाच्या सॉफ्टवेअरमध्ये बदल झाल्यामुळे सदर रुग्णालय subsequent Routine Diagnosing ची रक्कम निर्धन रुग्णांच्या निधीत जमा करु शकले नाही. यासंदर्भात सदर मुद्दा ठाणे जिल्ह्याच्या देखरेख समितीसमोर ठेवणेबाबत धर्मादाय उप आयुक्त, ठाणे यांना कळविण्यात आले आहे.<br><br>१) पी. डी. हिंदुजा रुग्णालयाबाबत, सदर रुग्णालयाने निर्धन रुग्णांकडून अनामत रक्कम घेतल्याबाबत सदर रुग्णालयाचा खुलासा घेण्यात यावा, असे धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र कार्यालयाचे धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयास कळविलेले असून, यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.<br>२) सैफी रुग्णालयाने निर्धन रुग्णांकडून (IP No. ५५८९८३८, ५५९७३१३, ५५९७०२२ व ५६२०५४७) स्वीकारलेली अनामत रक्कम सदर रुग्णांना परत केली आहे. तसेच (IP No. ५६२६६३३, ५६२६६५७, ५६२६६९३ व ५६२६९११) या रुग्णांची देयके तपासली असता सदर रुग्ण योजनाबाह्य (सर्वसाधारण) असल्याचे निदर्शनास आले. तथापि, सदर आपत्कालीन ( Emergency ) रुग्णांकडून रुग्णालयाने अनामत रक्कम घेतली असल्याने, धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाने सदर रुग्णालयास, योजनेतील खंड क्र. ३ नुसार आपत्कालीन रुग्णांकडून अनामत रक्कम घेण्यात येऊ नये, अशा प्रकारचे निर्देश दिलेले आहेत.<br>३) सुश्रुत हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर या रुग्णालयाने आपत्कालीन रुग्णांकडून (IP ११४१५६, IP ११४१९६, IP ११४१७९, ICO ८५३५, ICO ८५२३, IP ११०५८९८, IP १९७०७) स्वीकारलेली अनामत रक्कम सदर रुग्णांना परत केले आहे, असे कळविले आहे. |
| ७. | **३.१.२.८ योजनेविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकाराची अभाव**<br>एका सार्वजनिक हिताच्या याचिकेवरील सुनावणी दरम्यान मुंबई | उपरोक्त आक्षेप/ परिच्छेदाच्या अनुषंगाने सविनय कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेली योजना ही जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याकरीता धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून कागदी फलक (Posters) छापण्यात आले आहेत. सदर कागदी फलक सर्व जिल्ह्यातील |

| | | |
|---|---|---|
| | उच्च न्यायालयाने धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना इलेक्ट्रॉनिक आणि छापील माध्यमाद्वारे योजनेस मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देण्याचे निर्देश दिले (मार्च २००८), जेणेकरुन योजनेखाली उपलबध असलेल्या सुविधांपर्यंत निर्धारित लाभार्थी पोहचू शकतील. उच्च न्यायालयाने असेही निर्देश दिले की, ग्राम पंचायतीच्या जाळयाद्वारे अगदी गाव पातळीवरील नागरीकांपर्यंत योजनेविषयी माहिती पोहचविण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जावी.<br>लेखापरीक्षेत असे आढळून आले की, धर्मादाय आयुक्तांच्या मुंबई येथील कार्यालयात योजनेविषयी विस्तृत माहिती देण्यासाठी प्रतिसादाची सोय असणारे एक दूरध्वनी यंत्र (टोल फ्री क्र.१८०० २२२ २७०) बसविण्यात आले होते. (जून २००८), परंतु या टोल फ्री हेल्प लाईनला मोठया प्रमाणात प्रसिध्दीही देण्यात आली नव्हती किंवा धर्मादाय आयुक्तांच्या संकेतस्थळावर हा हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला नव्हता. जनतेला ग्रामपंचायतींच्या जाळयांद्वारे या योजनेविषयी माहिती पोहचविण्यासाठी धर्मादाय आयुक्तांकडून कोणतीही कार्यवाही केली गेली नसल्याचेही लेखापरीक्षकांना आढळून आले.<br>शासनाने सांगितले की, सर्व जिल्हा कार्यालयांना धर्मादाय रुग्णालयांची यादी, टोल फ्री क्रमांक, संकेतस्थळ आणि योजनेचा तपशील एका मराठी व एका इंग्रजी अशा दोन स्थानिक वर्तमानपत्रात पुन्हा प्रसिध्द करण्याविषयी निर्देश देण्यात आले आहेत. | सार्वज<br>फलक<br>पाठवि<br>हॉस्पीट<br>नातेवा<br>खाटांबे<br>उपलब<br>व्हावी,<br>योजने<br>करण्य<br>तसेच<br>नियमी<br>या का | काणी लावण्याकरीता सर्व जिल्हा कार्यालयांना निर्देशित करण्यात आलेले आहे. तस<br>नेक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व रुग्णालयांमध्ये लावण्याकरीता त्या विभागास<br>ली आहेत.<br>य आयुक्तालयाच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाअंतर्गत धर्मादाय आयुक्त संकेतस्थळावरील<br>ब्यूल गो-लाईव्ह करण्यात आलेले आहे. सदर मॉड्यूलमार्फत, रुग्ण अथवा रुग्णांच्या<br>धर्मादाय रुग्णालयांमध्ये अतिगरीब व दूर्बल घटकातील रुग्णांसाठी राखीव असलेल्या<br>स्थिती, संपर्क व्यक्तीचे नाव, संपर्क दूरध्वनी क्रमांक अशी अनुषंगिक माहिती सहजपणे<br>ची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.<br>जनेची माहिती शासकीय / महानगरपालिका इ. रुग्णालयांत येणाऱ्या निर्धन व गरीब रुग्णांना<br>पथदर्शी प्रकल्प म्हणून मुंबईतील ५ प्रमुख शासकीय / महानगरपालिका रुग्णालयांत सदर<br>लब्ध आरक्षित खाटांची माहिती देणारे स्मार्ट टि.व्ही स्थापित करण्यात आले आहेत.<br>आयुक्त कार्यालयाकडून सदर योजनेची माहिती प्रसार माध्यमांतूनसुध्दा देण्याचा प्रयत्न<br>ला आहे. यापुढे देखील तळागाळापर्यंत सर्वसामान्य जनतेस सदर योजनेची माहिती होईल,<br>ही धर्मादाय रुग्णालयांकडून योजनेच्या अंमलबजावणीत कसून होणार नाही, याकरीता<br>ण घेण्याबाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून जास्तीत-जास्त प्रयत्न केले जातील, असे<br>कळविले आहे. |
| ८. | **३.१.२.९. रुग्णालयांची तपासणी करण्यात कमतरता**<br>सार्वजनिक न्यासांच्या कामकाजात सुधारणा करणे आणि ते प्रभावी व कार्यक्षम होईल याची सुनिश्चिती करणे या उद्देशाने धर्मादाय आयुक्तांनी प्रत्येक जिल्हयातून विभागीय अधिकाऱ्यांना प्रत्येक महिन्यात किमान दोन ते तीन सार्वजनिक न्यासांची तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. (१९५९) पुढे जुलै १९७२ मध्ये धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात आणि प्रादेशिक कार्यालयात नियुक्त केलेल्या निरिक्षकांना प्रत्येक महिन्यात किमान चार ते पाच सार्वजनिक न्यासांची तपासणी करण्याचे निर्देश धर्मादाय आयुक्तांनी दिले होते. लेखापरीक्षेत परंतु असे आढळून आले की, सप्टेंबर, २००६ मध्ये योजना लागू | उ<br>धर्मादा<br>ित आह<br>कोणत्य<br>त निरीक्ष<br>र्पालयाने | आक्षेप/परिच्छेदाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, प्रत्येक जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णाल सदर या<br>ख्येनुसार प्रत्येक महिन्यास किती निरीक्षण होणे आवश्यक आहेत, याबाबतची मानके धर्मादाय आयुक्त या<br>ठायाने ठरवून दिलेली आहेत. |

झाल्यानंतर धर्मादाय आयुक्तांनी तपासण्यांची वारंवारीता आणि तपासण्यांची संख्या या विषयी कोणत्याही सूचना दिल्या नव्हत्या.

मुंबईतील ७८ रुग्णालयांच्या २००९-२०१४ दरम्यान केलेल्या तपासणीविषयी धर्मादाय आयुक्तांनी सादर केलेल्या माहितीमधून खालील बाबी आढळून आल्या.

| पासून तपासणी केली नाही | रुग्णालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| पाच वर्षांपेक्षा अधिक | ४ | ५ |
| चार वर्षांपेक्षा जास्त परंतु पाच वर्षांपेक्षा कमी | १४ | १८ |
| तीन वर्षांपेक्षा जास्त परंतु चार वर्षांपेक्षा कमी | ३ | ४ |
| दोन वर्षांपेक्षा जास्त परंतु तीन वर्षांपेक्षा कमी | १७ | २२ |
| एक वर्षांपेक्षा जास्त परंतु दोन वर्षांपेक्षा कमी | ८ | १० |
| एक वर्षांपेक्षा कमी | ३२ | ४१ |
| एकूण | ७८ | १०० |
| स्रोत : धर्मादाय आयुक्तांनी सादर केलेली माहिती. | | |

तक्ता ३.१.२ वरुन असे दिसून येते की, ५९ टक्क्यांपेक्षा जास्त रुग्णालयांची तपासणी एक वर्षापेक्षा अधिक काळ झाली नव्हती.

पुढे DCR च्या नियम ३३ (२) (७) अनुसार, संचालक, आरोग्य सेवा, यांना DCR च्या विनियम ३३ (२) मध्ये नमूद केलेल्या अटींचे वैद्यकीय संस्था योग्य प्रकारे पालन करतात किंवा नाही. याबर सनियंतत्रण ठेवण्यासाठी प्राधिकृत केले होते, परंतु, संचालक, आरोग्य सेवा, यांचेकडून अशाप्रकारे कोणतेही संनियंत्रण केले गेले नव्हते.

राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केली जाईल असे शासनाने सांगितले.

**साक्ष :**

**परिच्छेद क्र.३.१.२.१ अत्यंत गरीब आणि दुर्बल गटातील रुग्णांना बाह्यरुग्ण म्हणून आरक्षण देण्याविषयी एमपीटी अधिनियमात असलेल्या तरतुदींची अंमलबजावणी न करणे.**

**२.१** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २ मे, २०१८ रोजी विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली त्यावेळी चर्चेदरम्यान शासनाने अत्यंत गरीब आणि दुर्बल गटातील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयामध्ये द्यावयाच्या सवलतीबाबत एक शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्या शासन निर्णयान्वये एमपीटी अधिनियमानुसार धर्मादाय रुग्णालयांमध्ये अत्यंत गरीब रुग्णांना आंतररुग्ण व बाह्यरुग्ण म्हणून १० टक्के मोफत उपचार करावयाचे आहेत तसेच दुर्बल गटातील रुग्णांना आंतररुग्ण व बाह्यरुग्ण म्हणून १० टक्के सवलतीमध्ये उपचार करावयाचे आहेत. त्याचप्रमाणे योजनेनुसार धर्मादाय रुग्णालयामध्ये आंतररुग्ण म्हणून अत्यंत गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना १० टक्के मोफत व सवलतीमध्ये उपचार दिले जात आहेत. परंतु बाह्यरुग्ण म्हणून दिल्या जाणाऱ्या उपचाराची माहिती निरंक आहे, याचा अर्थ बाह्यरुग्ण म्हणून मोफत किंवा सवलतीमध्ये उपचार दिले जात नाहीत हे खरे आहे काय ? या प्रश्नाच्या अनुषंगाने समितीला माहिती जाणून घ्यावयाची आहे. ज्या धर्मादाय रुग्णालयांनी शासनाकडून सवलतीच्या दरात भूखंड मिळविला, ज्यांच्याकडून २.५ टक्के प्रिमियमची रक्कम घेऊन ९७.२ टक्के रक्कम माफ करून एफएसआयमध्ये सवलत देण्यात आली, त्यांनी १० टक्के गरीब व दुर्बल रुग्णांना मोफत उपचार दिले पाहिजेत याच्याशी समिती सहमत आहे. धर्मादाय आयुक्तांच्या अखत्यारित ज्या ट्रस्टची नोंदणी झालेली आहे त्या दवाखाना किंवा धर्मादाय रुग्णालयांना हे सर्व लागू होणार आहे. परंतु ज्या चॅरिटेबल ट्रस्टने शासनाकडून कोणतीही सवलत घेतली नाही, ज्यांना पाण्याचे देयक व्यावसायिक दराने आकारले जाते, मालमत्ता करामध्ये सवलत दिली जात नाही, त्यांनी खाजगी किंवा स्वतःच्या प्लॉटवर स्वतःच्या खर्चाने इमारत उभी केली आहे, ज्यांना वार्षिक नफ्यावर नियमाप्रमाणे आयकर भरावा लागतो त्यांच्यावर एमपीटी अधिनियमानुसार मोफत व सवलतीमध्ये उपचार करण्याबाबत सक्ती केली जात आहे तसेच त्यांनी याची अंमलबजावणी केली नाही तर ट्रस्टींना तुरुंगात पाठवू असे सांगितले जाते हे खरे आहे काय? मुंबई शहरातील जवळजवळ ३१ धर्मादाय रुग्णालये बंद झाली असून आणखी ८९ धर्मादाय रुग्णालये बंद होण्याच्या मार्गावर आहेत. संबंधितांना धर्मादाय रुग्णालय चालवावयाचे नाही अशी त्यांची भूमिका आहे. समिती सदस्य जी संस्था चालवित आहेत ती १९३४ ची धर्मादाय संस्था आहे, वर्षाला ३ लाख ओपीडी आहे, त्या धर्मादाय रुग्णालयामध्ये मोतीबिंदूसाठी इम्पोर्टेड लेन्सचा वापर करून १००० रुपयांमध्ये डोळ्याची शस्त्रक्रिया केली जाते, ४०० रुपयांमध्ये डायलिसीसचे उपचार केले जातात, १० रुपयांमध्ये दात काढून दिला जातो, ३० रुपयांमध्ये एक्स-रे काढून दिला जातो, १०० रुपयांमध्ये सोनोग्राफी करून देतो. ही संस्था बंद करणार आहोत. दररोज नवीन सर्क्युलर, नवीन माणसे तपासणीसाठी येतात. सचिवांकडून ही माहिती जाणून घ्यावयाची आहे की, हिंदुजा, ब्रिच कॅण्डी, लिलावती, कोकीळाबेन, हरकिसनदास यासारख्या मोठ्या धर्मादाय रुग्णालयांनी शासनाकडून किंवा महापालिकेकडून मोठ्या प्रमाणात सवलती मिळविल्या आहेत. त्यांच्यावर विभाग काहीही कारवाई करू शकणार नाही. परंतु श्री कांदिवली हितवर्धक मंडळ, जैन श्वेतांबर मूर्तीपूजक दवाखाना, चॅरिटेबल रुग्णालय सारखी धर्मादाय रुग्णालये विभाग संपविण्यास निघालेला आहे. आपण ज्या सुविधा देतो, त्यानुसार फायदा घेणारे लोक कोणत्या कॅटेगरीतील असतात? ज्या धर्मादाय रुग्णालयांना शासनाने कोणतीही सवलत दिली नाही, पब्लिक चॅरिटी ट्रस्ट म्हणून ते रुग्णालय चालवित आहेत, त्यांना १० टक्के अत्यंत गरीब व दुर्बल गटातील आंतर रुग्णांसाठी मोफत व सवलतीच्या दरात उपचार देणे बंधनकारक आहे का? ज्यांची टर्नओव्हरनुसार सवलतीची खर्च टक्केवारी मर्यादा संपली आहे त्यांनी सवलतीत उपचार देणे बंद केले तर त्यांना पत्र पाठवून तुमच्यावर कायदेशीर कारवाई होईल असे कळविले जाते. They are not profit making institution. त्यांची रुग्णालये लोकांच्या चॅरिटीवर चालतात, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीचे म्हणणे अगदी बरोबर आहे. काही रुग्णालयांनी सुविधा घेतली नाही, परंतु ते चॅरिटी करतात. त्या रुग्णालयांना ८० जी अंतर्गत फायदा मिळतो. दुसरी गोष्ट अशी की काही रुग्णालयावर कारवाई केली जाते तर काही रुग्णालयावर कारवाई होत नाही, अशा प्रकारे भेदभाव केला जात नाही. ज्यांच्या बाबतीत विभागाकडे तक्रार आली किंवा विभागाला असे आढळून आले की, गरीब रुग्णांना उपचार नाकारतात, त्यांच्यावर विभागाने कारवाई केली आहे. मागील सप्टेंबर महिन्यात असे निदर्शनास आले की, काही रुग्णालये गरीब रुग्णांना उपचार नाकारतात. तेव्हा मी स्वतः वेषांतर करून नानावटी रुग्णालयात गेलो होतो. तेथे पाहिले की, गरिबांवर उपचार केले जात नाहीत, तेव्हा विभागाने त्यांच्याविरुद्ध प्रॉसिक्यूशन केले आहे. विभाग कोणाबद्दल भेदभाव करीत नाही. मुंबईतील कंबाला हिल व सेव्हन हिल्स ही रुग्णालये त्यांच्या अंतर्गत अडचणीमुळे बंद झाली आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कलम ८० जी अंतर्गत जे लोक देणगी देतात त्यांना सवलत मिळते. रुग्णालयांना काय फायदा मिळतो? ज्या चॅरिटेबल संस्थांनी कलम ८० जी अंतर्गत एक पैशाचा फायदा घेतला नाही, ज्यांना देणगी देणाऱ्यांनी देणगी दिल्यानंतर ८० जी प्रमाणपत्र एक्झेम्पशनसाठी आयकर विभागाकडे सादर केले नसेल त्यांना विभाग बाद करणार आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभाग कोणत्याही रुग्णालयावर किंवा ट्रस्टीवर

सूडबुद्धीने कारवाई करीत नाही. गरीब रुग्णांना उपचार नाकारले, गरीब असतानाही रुग्णाला योजनेचा फायदा दिला नाही किंवा त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल झाली तर संबंधितांवर कारवाई करतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यांनी कलम ८० जी चा लाभ घेतला नाही त्यांच्यावर विभाग कारवाई करणार आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, ज्यांची चॅरिटेबल रुग्णालय म्हणून नोंदणी झालेली आहे, त्यांनी अत्यंत गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना सवलत दिली पाहिजे. चॅरिटेबल रुग्णालयांनी सुविधा घ्याव्यात किंवा घेऊ नयेत, ज्यांची नोंदणी चॅरिटेबल रुग्णालय म्हणून आहे त्यांना ही योजना बंधनकारक आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यांनी करांमध्ये, चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) मध्ये सूट घेतली त्यांना गरीब रुग्णांसाठी टक्केवारीनुसार मोफत व सवलतीच्या दरात उपचार द्यावे लागतात. त्याचे पालन केले जात नाही. त्यांचे दस्तावेज उपलब्ध होत नाहीत असे विभाग सांगत आहे, हे कसे काय? अशी विचारणा समितीने केली असता, एखाद्या महापालिकेने त्यांना सवलतीमध्ये भूखंड दिलेला असतो किंवा शासनाच्या विभागाने काही सवलती दिलेल्या असतात. समितीस सांगू इच्छितो की, एमपीटी अधिनियमाच्या कलम ४१ एए अंतर्गत तरतुदींची अंमलबजावणी होते की नाही हे धर्मादाय आयुक्त कार्यालयाला पहावे लागेल. परंतु शासनाच्या एखाद्या ॲथॉरिटीने सवलत दिली असेल तर त्याचे निरीक्षण (monitoring) त्यांनाच करावे लागेल. शासनाने विभागास निरीक्षण करण्यास सांगितले तर अंमलबजावणी करतात की नाही याची पाहणी करू, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभाग ज्यासंदर्भात सांगत आहे ते परिच्छेद ३.१.२.२ मध्ये आहे. परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मध्ये ओपीडीसाठी सवलत देण्याचा नियम केला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, बाह्य रुग्ण आले तर त्यांना तपासणे बंधनकारक आहे. योजनेच्या निकषात जे बसतात त्यांना बाह्यरुग्ण म्हणून तपासणे भाग आहे. दुर्बल गटासाठी ओपीडी देखील आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.१.२.२ नुसार जर विभागाने त्यांना भूईभाडे, एफएसआयमध्ये सवलत दिली असेल तर सवलतीचा वेगळा नियम लागू केला आहे. त्याचे पालन काटेकोरपणे होते की नाही याची तपासणी कोण करणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, स्टेट एडेड पब्लिक ट्रस्ट हे कायद्याने निश्चित केले आहे. कायद्यातील कलम ४१ एए व उप कलम ४ नुसार एफएसआय मिळविला असेल किंवा सवलतीच्या दरात भूखंड घेतला असेल या शिवाय कलम ५८ प्रमाणे पब्लिक ट्रस्टला कॉन्ट्रिब्ल्यूशन द्यावे लागते. जे पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट वैद्यकीय क्षेत्रासाठी काम करतात त्यांना सूट दिलेली आहे. त्यांना पब्लिक ट्रस्ट ॲडमिनिस्ट्रेशन फंडमध्ये कॉन्ट्रिब्यूशन द्यावे लागत नाही. विभागाची जी योजना आहे त्यामध्ये विभाग १० टक्के गरीब आणि १० टक्के दुर्बल सेक्शन हे पाहतो. जर एखाद्या ट्रस्टला १ रुपया नाममात्र दराने भूखंड देण्यात आला आहे, ही जागा देताना महापालिकेबरोबर जर असा करार झाला असेल की, या रुग्णालयामध्ये जे काही रुग्ण येतील त्यापैकी २० टक्के रुग्णांना मोफत उपचार द्यावेत. १० टक्के दुर्बल गटातील आणि १० टक्के गरीब गटातील रुग्ण असतात. हा जो २० टक्के वाटा द्यायचा आहे तो ॲडिशन असावा असे कायद्याला अभिप्रेत आहे. तो या २० टक्क्यामध्ये कव्हर होत नाही. कायद्यामध्ये Notwithstanding anything contained....” , असे म्हणून कलम ४१ एए चा उप कलम ३ आहे. याचे निरीक्षण धर्मादाय आयुक्त करू शकणार नाहीत. हा भाग, ज्या महापालिकेने सवलत दिली आणि ज्यांनी अनुदान घेतले त्याबाबतीत आहे, त्याचे निरीक्षण करण्याची यंत्रणा विभागाकडे नाही किंबहुना तशी विभागाला परवानगी सुद्धा नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महापालिकेने सवलत दिली म्हणून २० टक्के रुग्णांवर मोफत उपचार करावयाचे आणि एमपीटी अधिनियमानुसार १० टक्के मोफत व १० टक्के सवलतीमध्ये असे २० टक्के विचारात घेतले तर एकूण ४० टक्के रुग्णांना सवलत द्यावी लागणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, महापालिकेबरोबर तसा करार झाला असेल तर २० टक्के रुग्णांना सवलत द्यावी लागणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, २० टक्के खाटा मोफत वैद्यकीय उपचारासाठी आरक्षित ठेवल्या या अटीवर सामान्य चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा अधिक एफएसआय वैद्यकीय संस्थांना देण्याची परवानगी देण्यात आली आहे. याचे निरीक्षण कोणी करीत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, १० टक्के अत्यंत गरीब आणि १० दुर्बल गटाच्या संदर्भात विभागाकडून निरीक्षण केले जाते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यांना महापालिकेने सवलतीमध्ये भूखंड दिला असेल त्याबाबत त्यांनी निरीक्षण करावयाचे आहे. सरकारच्या माध्यमातून एकूण ४० टक्के रुग्णांना सवलत द्यावयाची असेल तर रुग्णालय कोण चालवावयास येईल? कधीतरी या क्षेत्रातील तज्ज्ञ, डॉक्टर्स, प्रामाणिकपणे काम करणारे संस्था चालक यांच्याशी एकत्रितपणे चर्चा करून निर्णय घ्यावा, असे मत समितीने व्यक्त केले असता, या अधिनियमामध्ये १९८६ साली सुधारणा करण्यात आली. १९८६ पासून २००६ पर्यंत याची समाधानकारक अंमलबजावणी होत नव्हती, त्यामुळे मा. उच्च न्यायालयात

रिट याचिका दाखल झाली. त्या रिट याचिकेमध्ये सगळ्यांचे प्रतिनिधी होते. रुग्णालय, चॅरिटेबल संस्था, शासनाचे प्रतिनिधी होते, त्यांनी मिळून ही योजना तयार केली. बऱ्याच अंशी ही उत्तम योजना झाली आहे. काही ठिकाणी असे म्हणू शकतो की, अधिक प्रमाणात प्रभावी अंमलबजावणी होते. विधानपरिषद आणि विधानसभेमध्ये प्रत्येक अधिवेशनात या संदर्भात प्रश्न विचारला जातो की, या योजनेचा योग्यप्रकारे लाभ ज्यांना मिळावयास पाहिजे त्यांना मिळत नाही. योजना फायदेशीर आहे. काही प्रकरणांमध्ये याचा ओनरस इम्प्लिमेन्टेशन होतो त्या व्यक्तीगत प्रकरणांमध्ये अशी समजूत केलेली आहे की ती ट्रस्ट धर्मादाय आयुक्तांकडे जाऊ शकतात आणि त्यांच्या ज्या काही अडचणी आहेत त्या मांडू शकतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अधिकाऱ्यांच्या भावना चांगल्या आहेत, मनापासून गरीब लोकांना लाभ कसा मिळेल याचा ते विचार करीत आहेत. पण जे क्लेम करतात ते प्रतिनिधी कोण आहेत. जसलोक, लिलावती, हरकिसनदास, ब्रिच कॅण्डी रुग्णालयातील खाटांची संख्या कितीतरी पटीने जास्त आहे. कांदेवाडीतील जैन क्लिनिक किंवा ५० , ६० ते १०० खाटा असलेल्या रुग्णालयाचे प्रतिनिधी आले तर ते वस्तुस्थिती सांगू शकतील. त्यांना वेगळे नियम लावावेत. ज्यांची रुग्णालये १०० खाटांपेक्षा जास्त संख्येची आहेत, ज्यांची उलाढाल ५० ते १०० कोटी रुपये आहे. १० ते १५ कोटी रुपयांचा व्हॉल्यूम असलेली ३०० रुग्णालये आहेत. आणि १०० कोटी उलाढाल असणारे ५ रुग्णालये आहेत. ते येऊन सांगतात की अमुक करा, तमुक करा, आम्हाला जमत नाही. या विषयासंबंधी विधानमंडळाची धर्मादाय तदर्थ नावाची एक समिती आहे. या बाबतीत ज्या सूचना आहेत त्या संबंधित समितीच्या निदर्शनास आणून दिल्या तर जास्त योग्य होईल, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीच्या निदर्शनास आणून देतो की त्यांनी करारनामा केलेला आहे की असे करू. फार कमी प्रकरणांमध्ये असे एक्सप्रेस ॲग्रीमेंट असतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने एक्झिट कॉन्फरन्सच्या वेळेस असे सांगितले की अतिरिक्त एफएसआयचे प्रदान आणि भाडेपट्टी विषयाचे दस्तावेज प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करण्यात येईल आणि योग्य ती कार्यवाही केली जाईल असे विधि व न्याय विभागाने सांगितले आहे. त्यावर कोणतीच कार्यवाही केली नाही. एका बाजूला प्रयत्नांची पराकाष्ठा करू असे म्हटले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभाग आता एवढे करू शकतो की महाराष्ट्राच्या परव्यूव्हमध्ये ४३० रुग्णालये विभागाकडे आहेत.त या सर्व ठिकाणी जे शक्य आहे तेथे प्रयत्न करू की त्यांनी इन ॲडीशन टू एक्सप्रेस लायबिलीटी स्वीकारली आहे किंवा कसे? असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समिती सदस्यांनी अतिशय चांगला मुद्दा उपस्थित केला आहे. ज्या लोकांनी शासनाकडून कोणतीही सवलत घेतली नाही आणि जे रुग्णालये फक्त देणग्यांवरच सुरू आहेत त्या रुग्णालयांवर अशी बंधने किंवा नियम व कायदे लावणे कितपत योग्य आहे? ती रुग्णालये १० टक्के नाही तर उर्वरित लोकांना सुद्धा तोच दर लावतात. ती देणगी घेणारी रुग्णालये फक्त दुर्बल घटकांनाच १० रुपये शुल्क आकारतात असे नाही तर सर्वांसाठी हेच शुल्क आकारतात अशी स्थिती आहे. या विषयावर एक वेगळा दृष्टीकोन घेणे अतिशय आवश्यक आहे. अशी रुग्णालये आता बंद होण्याच्या मार्गावर आहेत, असे मत समितीने व्यक्त केले असता, ही बाजू आम्ही अधिकारी म्हणून मांडणे योग्य नाही. उद्या धर्मादाय रुग्णालये तदर्थ समितीची बैठक आहे. सन्माननीय समिती सदस्य यांना विशेष निमंत्रित म्हणून त्या बैठकीमध्ये बोलवावे. कारण विभाग ही बाजू मांडू शकत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्या मोठमोठ्या रुग्णालयांनी सवलती मिळवून शासनाच्या जमिनी घेतल्या आहेत त्यांच्या बाबतीत समितीने काय करायचे ते सूचवा. कोणीही याची अंमलबजावणी करीत नाही. त्यामुळे पर्यायाने त्या रुग्णालयांना फायदा होत आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, अशी स्थिती नाही. ज्या संस्थांना राज्य शासनाच्या अनुदानित सार्वजनिक विश्वस्त संस्था म्हणून मान्यता आहे त्यांच्या बाबतीत १० टक्क्यांपर्यंत सवलत देण्याचे नियम काटेकोरपणे लावतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या रुग्णालयांनी जे इतर फायदे किंवा सवलती घेतल्या आहेत आणि त्या अनुषंगाने त्यांनी त्या सुविधा देणे बंधनकारक आहे की ज्या सवलती नियम ४६ (ए) व्यतिरिक्त अधिकच्या आहेत.त करारनाम्यानुसार ज्या सवलती एफएसआय किंवा भाडयाच्या बाबतीत असतील त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी धर्मादाय आयुक्तांवर नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावर असहमती दर्शवून विभाग ते करू शकणार नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मग याबाबत कोण अंमलबजावणी करणार आहे, अशी विचारणा समितीने केली असता, ज्यांनी अशी जमीन भाडेपट्टयाने दिली असेल त्यांची ही जबाबदारी आहे. त्यामध्ये महापालिकेने जमीन दिली असेल तर महापालिकेचा संबंध येतो आणि राज्य शासनाने जमीन दिली असेल तर नगरविकास विभागाचा संबंध येतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मोठ्या रुग्णालयांमध्ये ४००, ५००, ६०० ते ७०० इतका कर्मचारीवर्ग असतो. त्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना त्या १० टक्क्यांमध्ये वर्षभरातून जे उपचार करायचे असतात त्यासंबंधी कामगार संघटनांशी कंत्राट करारनामा केला जातो त्या करारनाम्यात नमूद केले जाते की यापुढे संपूर्ण उपचाराचा खर्च रुग्णालय करील. त्यामुळे ते कर्मचारी खूश होतात.त यामध्ये १० टक्के सवलती या मूळात जे गरीब लोक आहेत त्यांना द्यायच्या आहेत.त मात्र त्या रुग्णालयातील कर्मचारीवर्गाला व त्यांच्या नातेवाईकांना दाखवून असे उपचार केले जातात. अशी स्थिती त्या रुग्णालयांमध्ये आहे. त्यांच्यावर कोणतेही निर्बंध आणू शकत नाही. They are giving this 10% facility to employees as per their Agreement, असे समितीने निदर्शनास आणले असता, योजनेमध्येच याचा विचार करण्यात आला आहे आणि त्यात स्पष्टपणे म्हटले आहे की रुग्णालयाच्या व्यवस्थापनाच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना किंवा कर्मचाऱ्यांना यामध्ये सवलत देण्यात येऊ नये असे स्पष्ट म्हटले आहे आणि ज्यावेळी विभागाचे अधिकारी निरीक्षणासाठी जातात त्यावेळी त्याची ओळख निश्चित करून घेतात. हा प्रकार होत नाही असे म्हणणे बरोबर होणार नाही. कारण समितीने निदर्शनास आणलेली माहिती खरी असेल. परंतु त्याचा दुरुपयोग होणार नाही याबाबत विभाग काळजी घेतो. तपासणीच्या वेळी तसे जर निदर्शनास आले तर त्या रुग्णालयांना नोटीस देतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु या परिच्छेदाच्या बाबतीत समितीला नगरविकास आणि महसूल विभागाची साक्ष घेणे आवश्यक आहे. महसूल विभागाकडून रुग्णालयांना भूखंड देण्यात येतात. धर्मादाय आयुक्तालयाकडे बऱ्याच गोष्टींची अंमलबजावणी करण्यासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध नाही. रुग्णालयांची पाहणी करणे, त्यानंतर त्याचा अहवाल तयार करणे वगैरे. त्या रुग्णालयांची थेट धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार करता आली पाहिजे. कोणती तरी आरटीआय ॲक्टीव्हीस्ट करतो तेव्हा त्यांना लक्षात येते. मात्र त्यांच्याकडे पुरेशी यंत्रणा नाही. त्यांनी जर अशी यंत्रणा उभारली किंवा समितीच्या शिफारशीमध्ये तसे नमूद केले तर त्यांना पुरेसा कर्मचारीवर्ग मिळाला तर ते त्यांच्या मनात असेल त्याप्रमाणे परिणामकारकरित्या काम करू शकतील. कारण त्यांच्या मनात कितीही काही असले तर कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे त्यांच्यावर मर्यादा येतात.त त्यांना तहसीलदार किंवा तलाठी यांच्यावर विसंबून रहावे लागते. त्यामुळे यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेता तो वाढविण्याची आवश्यकता विभागाला वाटते किंवा कसे त्याचा खुलासा व्हावा. सध्याच्या परिस्थितीत अंमलबजावणी यंत्रणेची काय स्थिती आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडे निरीक्षण समिती असते. विभागाकरिता सह धर्मादाय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रत्येक जिल्ह्यासाठी सहायक धर्मादाय आयुक्त किंवा उप धर्मादाय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती असते. एखाद्याने जर तक्रार केली तर ती त्या निरीक्षण समितीसमोर ठेवले जाते व त्या तक्रारीचे निवारण केले जाते. प्रत्येक जिल्ह्याला सहायक धर्मादाय आयुक्त हे त्या विभागाचे प्रमुख असतात आणि त्यांच्यामार्फत या समितीचे निरीक्षण केले जाते. तसेच प्रत्येक जिल्ह्याकरिता आणि प्रत्येक विभागासाठी निरीक्षक सुद्धा नियुक्त केलेले असून त्यासाठी विशिष्ट नॉर्म्स ठरवून दिले आहेत. त्यांच्यामार्फत त्या त्या ठिकाणी तपासणी केली जाते. समितीने म्हटल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. परंतु त्याचा या तपासणीवर परिणाम होऊ देत नाहीत. लोकांच्या तक्रारी आल्यानंतर लगेच त्याचे निवारण करतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जर एखाद्या रुग्णालयाने नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळले तर काय करता? आतापर्यंत किती लोकांवर कार्यवाही केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, या कार्यवाहीच्या बाबतीत निरीक्षण समिती असते. त्या समितीसमोर तक्रार आल्यानंतर त्या तक्रारीवर कार्यवाही करतो. कारण प्रत्येक महिन्याला त्या निरीक्षण समितीची बैठक घ्यावी लागते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीचा प्रश्न असा आहे की किती लोकांवर कार्यवाही केली आहे, किंवा या सर्व तक्रारी समोपचारानेच मिटवून टाकता काय? अशी विचारणा समितीने केली असता, काही वेळेस त्या रुग्णालयाला विचारणा करतो की एखाद्या व्यक्तीकडून पैसे घेतले आहेत ते पैसे त्यांना परत देण्यास तयार आहात किंवा नाहीत. संबंधित रुग्णालय तयार झाले तर तो विषय तेथेच मिटवून टाकतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

धर्मादाय आयुक्तांनी सांगितले की अशी ४३० रुग्णालये त्यांच्या अखत्यारित आहेत तर तक्रार आल्यावर कार्यवाही करणे हे पोलीस ठाण्याचे काम बरोबर आहे. ते करायलाच हवे. परंतु याशिवाय आपल्याला माहिती आहे की या ४३० रुग्णालयांनी त्या त्या नॉर्म्सप्रमाणे सवलती द्यावयाच्या आहेत. तर ही निरीक्षण समिती त्या ४३० रुग्णालयासंबंधी अशा पद्धतीने कार्यवाही करते की फक्त तक्रार आल्यानंतरच कार्यवाही करते, अशी विचारणा समितीने केली असता, एखाद्या रुग्णालयाने जर एखाद्या रुग्णाला उपचार करण्याचे नाकारले असेल तर त्या रुग्णाने विभागाच्या कार्यालयात तक्रार केली असेल तर त्याची लगेच दखल घेतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

म्हणजे तक्रार केली तरच दखल घेतली जाते. मात्र या ४३० रुग्णालयांची स्वत:हून तपासणी विभागाकडून होत नाही. ही तपासणी तक्रार आल्यावर करण्यात येते काय? अशी विचारणा समितीने केली असता, अशा रुग्णालयांची तपासणी करण्यात येते. विनातक्रार सुद्धा तपासणी सुरू असते. यामध्ये अचानक भेट देऊन तपासणी केली जाते, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

समितीला हे माहिती आहे की, १० टक्के रुग्णांना सवलत देणे आणि विविध सुविधा देणे यासंबंधी रुग्णालयामध्ये दर्शनी भागावर डिस्प्ले बोर्ड लावला जातो की अमुक अमुक सवलती दिल्या जातात, असे मत समितीने व्यक्त केले असता, रियल टाईम बेसीसवर संकेतस्थळावर हे दिसते. संकेतस्थळावर टोल फ्री क्रमांक आहे आणि तेथे एसएमएस सुविधा सुद्धा आहे. त्या ठिकाणी मोबाईल क्रमांक नोंदविला किंवा ई-मेल क्रमांक नोंदविला आणि लगेच माहिती मागितली की अमुक रुग्णालयामध्ये किती खाटा रिक्त आहेत तर त्यासंबंधी लगेच माहिती मिळेल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या ४३० रुग्णालयांपैकी अशी किती रुग्णालये आहेत की ज्यांना वेळोवेळी सूचना देऊन किंवा त्यांच्या बाबतीत तक्रारी येऊन सुद्धा त्यांनी त्यानुसार द्यावच्या सुविधेची अंमलबजावणी केली नाही. त्या रुग्णालयावर जास्तीत जास्त कोणती कार्यवाही केली आहे, अशी विचारणा समितीने केली असता, त्यावर विभागीय प्रतिनिधींनी उदाहरण सादर केले की, ते सन २०१५ मध्ये सह धर्मादाय आयुक्त म्हणून कार्यरत असताना पुण्याला पिंपरी-चिंचवड येथे बिर्ला रुग्णालय म्हणून फार मोठे रुग्णालय आहे. त्या बिर्ला रुग्णालयला एका ट्रस्टने जमीन विकली होती. आदित्य बिर्ला रुग्णालय हे पंचतारांकित रुग्णालय असून त्याबाबत अशी तक्रार आली की त्या रुग्णालयाला ट्रस्टने जमीन विकली आहे. परंतु ते गरीबांना सुविधा देत नाहीत.त त्यामुळे त्यांना नोटीस पाठविली की या सुविधा देणे बंधनकारक असताना गरीबांना अशा सुविधा देत नाहीत. त्यावेळी त्या रुग्णालयाचे जे सीईओ होते ते आले होते व त्यांनी सांगितले की आम्ही ही जमीन पैसे देऊन घेतली असल्यामुळे आम्हाला अशा सुविधा देणे बंधनकारक नाही. विभागाने त्यांना असे सांगितले की ही जमीन ट्रस्टकडून घेतली असल्यामुळे अशा सुविधा देणे बंधनकारक आहे. जर अशा सुविधा देणार नसाल तर कार्यवाही करावी लागेल. त्यांनी सन २००६ मध्ये ती जमीन घेतली होती आणि त्यांना सन २०१५ मध्ये अशी नोटीस दिली होती. सुरुवातीला त्यांना समजून सांगितले तर ते ऐकायला तयार नव्हते. ज्यावेळी त्यांना नोटीस दिली की तुमच्यावर कार्यवाही करू. त्यानंतर ते तयार झाले की गरीबांना उपचार देऊ.ऊत्या दृष्टीने काय करावे ते सांगावे. त्यावेळी त्यांना असे सांगितले की सन २००६ ते २०१५ पर्यंत जेवढी देयकाची रक्कम असेल त्यांच्यापैकी २ टक्के रक्कम गरीबांसाठी राखून ठेवावी. तसेच या दरम्यान ज्या गरीबांनी उपचार घेतले. मात्र त्यांनी संपूर्ण पैसे भरले असतील त्या सर्वांना त्यांचे पैसे परत करावेत अशा असे त्यांना निर्देश दिले. त्यानुसार त्यांनी २००६ ते २०१५ पर्यंत १२ कोटी रुपये गरीबांसाठी काढून ठेवले आणि दरम्यान त्यांनी वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिली की या कालावधीत ज्या ज्या गरीबांनी संबंधित रुग्णालयात पैसे देऊन उपचार घेतले आहेत त्यांनी संपर्क साधावा. त्यानुसार त्यांनी साडे तीन कोटी रुपये त्या गरीबांना परत केले आहेत. त्यामुळे कार्यवाहीबद्दल म्हणता तशी कार्यवाही लक्षात आल्यानंतर करतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परंतु आजच्या स्थितीत अशी किती रुग्णालये आहेत की त्यांना सांगूनही त्यांनी अंमलबजावणी केली नाही, अशी विचारणा समितीने केली असता, असे खूप कमी रुग्णालये आहेत. पण आता त्यांची यादी उपलब्ध नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. समितीच्या शिफारशीमध्ये सुद्धा तशी सूचना करण्यात येईल की यापुढे फुल प्रूफ यंत्रणा सुरू करावी. आपण जागेवर नसलो तरी ती यंत्रणा सुरू असली पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

ज्यावेळी आपण पुण्याला सह धर्मादाय आयुक्त म्हणून कार्यरत होतात त्या काळातील हे प्रकरण होते. आपल्या ते लक्षात होते आणि त्यानंतर आपण जेव्हा धर्मादाय आयुक्त म्हणून रुजू झाले तेव्हा आपण ते प्रकरण काढले व त्यामुळे ते शक्य झाले. अधिकारी म्हणून ते केलेले कर्तव्य आहे. परंतु यासाठी एक यंत्रणा तयार केली पाहिजे असे समितीचे मत आहे. शासनाला गरीबांसाठी जे अपेक्षित आहे तशी फुल प्रूफ यंत्रणा तयार करावी. त्यामुळे अशी यंत्रणा तयार करण्यासाठी एखादे सॉफ्टवेअर किंवा एखादा सल्लागार नेमून सिस्टीम तयार करण्यात येणार आहे काय आणि किती कालावधीत अशी यंत्रणा तयार करण्यात येणार आहे. अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे पाठवावा लागतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

असा प्रस्ताव सदर विभागाकडे किती दिवसात पाठविण्यात येणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास सहमती दर्शवली व विभागाने ६ रुग्णालयांना सक्त ताकिद दिली आहे. १२ रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे आणि २ रुग्णालयांविरुद्ध प्रॉसिक्युशनची कार्यवाही सुरू केली आहे. अतिरिक्त १२ रुग्णालयांना ज्या सोयी सुविधा दिल्या होत्या. त्या घेऊन सुद्धा अशा गरजू लोकांना सुविधा देत नाहीत तर त्यांच्या बाबतीत वेगवेगळ्या विभागांनी दिलेल्या सोयी सुविधा काढून घ्याव्यात अशा प्रकारचा प्रस्ताव संबंधित विभागांकडे दिला आहे. अशा प्रकारे विभागाने कार्यवाही केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत एक कृती आराखडा तयार करावा तसेच, ज्यावेळी एखादी इन्श्यूरन्स कंपनी मेडिक्लेम काढते तेव्हा त्यांच्याकडे मेडिक्लेमसंबंधी फुल प्रूफ यंत्रणा आहे. काही बाबतीत मॅन्युअली मेडिक्लेम काढले जात असतील. पण त्या कंपन्यांकडे फुल प्रूफ यंत्रणा आहेत. शासनाने ज्या लाभार्थ्यांसाठी योजना आखल्या आहेत. त्यामध्ये जमिनीचा फायदा घेतलेला असतो. करामध्ये सवलत घेतलेली असते. अशा प्रकारे ज्या ज्या

संस्थांनी अशा सवलती घेतल्या आहेत त्या त्या जमिनींचे दर किती आहेत, त्या त्या काळात राखीव खाटा किती आहेत, त्या राखीव खाटांची संख्या दररोज किती आहे, याची माहिती त्या रुग्णालयात दररोज अद्ययावत केल्यानंतर संगणकाच्या चार्टवर त्याची अद्ययावत माहिती दिसली पाहिजे. ज्यावेळी त्या रुग्णालयात एखादा माणूस गेल्यानंतर सांगितले गेले खाटा रिक्त नाहीत तर त्याची माहिती त्या व्यक्तीला तेथूनच संकेतस्थळावरुन कळली पाहिजे की त्या रुग्णालयात २ खाटा रिक्त आहेत, असे समितीने सूचित केले असता, ही यंत्रणा आज उपलब्ध आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२००८-०९ मध्ये याच विषयासंबंधी विधिमंडळामध्ये तदर्थ समिती कार्यरत होती. त्यावेळी माननीय बाबासाहेब कुपेकर हे अध्यक्ष होते. त्यावेळी बऱ्याच शिफारशी त्या समितीने केलेल्या असल्याने बरेच काम नियमित झाले आहे. तेव्हा या सर्व बाबी निदर्शनास आल्या होत्या की कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना सवलती दिल्या जातात वगैरे. त्यावेळी न्यायालयाच्या निर्णयाच्या अगोदर या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी होते किंवा नाही हे कुणीच पाहिले नव्हते. त्यानंतर १० टक्के खाटा राखून ठेवण्याचा निर्णय झाला असला तरी उपचार करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली नव्हती. नुसत्या खाटा राखीव ठेऊन काही उपयोग नव्हता. त्यानंतर त्या रुग्णालयाच्या वार्षिक खर्चाच्या २ टक्के निधी खर्च करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या निदर्शनास आणले असता, वार्षिक खर्चाच्या नाही तर टर्नओव्हरच्या २ टक्के निधी खर्च करण्याचे ठरविले आहे, असे समितीने स्पष्ट केले.

ते ग्रॉस बिलींगच्या २ टक्के आहे. त्यानंतर ती माहिती ऑनलाईन असावी अशी शिफारस यासंदर्भातील विधिमंडळ तदर्थ समितीने केली होती. ज्यांनी याचे उल्लंघन केले त्यांची नोंदणी रद्द करण्याइतपत त्यावेळी शिफारस केली होती. त्यानंतर बऱ्याच बाबी नियमित झाल्या आहेत. त्यावेळी उत्पन्न मर्यादा २१ हजार रुपये होती. ती सुद्धा नंतर वाढविण्यात आली आहे. त्यानंतर ही मर्यादा पूर्वी ५० हजार रुपये होती व आता ती वाढवून ८५ हजार रुपये केली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले तसेच गरीबांसाठी ८५ हजार रुपये केली असून १ लाख ६० हजार रुपये दुर्बल गटासाठी केली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत विधिमंडळामध्ये नियमित समिती स्थापन केली आहे. ती समिती नियमितपणे या सर्व बाबींची तपासणी करते. विधि व न्याय विभागाचे राज्यमंत्री या समितीचे पदसिद्ध समिती प्रमुख आहेत. सदर समितीचे दौरे सर्व रुग्णालयांमध्ये नियमितपणे होतात, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

परिच्छेद क्रमांक १.३.२ मध्ये विभागाने सांगितले आहे की, सन २०१५ मध्ये ११३ रुग्णालये विभागाकडे नोंदणीकृत आहेत. आता त्या रुग्णालयांची संख्या ४३० सांगितली आहे तर ही संपूर्ण नोंदणी सन २०१५ नंतरची आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, ही नोंदणी पूर्वीपासूनची आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. महालेखापालांचे असे मत आहे की, डिसेंबर, २०१५ पर्यंत एकूण ११३ रुग्णालये नोंदणीकृत होते. असे समितीने निदर्शनास आणले असता, दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी ४०८ रुग्णालये नोंदणीकृत होते. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीचा मुद्दा असा आहे की सुश्रृषा गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत आयुक्तांकडे नोंदणी झालेल्या रुग्णालयांची संख्या डिसेंबर, २०१५ पर्यंत फक्त ११३ होती. जी संख्या मागील ८ वर्षापासून तेवढीच होती. मात्र आता ४३० इतकी संख्या विभागामार्फत सांगण्यात येत आहे तर ही डिसेंबर २०१५ नंतरची नोंदणी आहे काय? याबाबत समितीला अवगत करण्यास सांगितले असता, नर्सिंग होम हे नोंदणी करावे लागतात आणि जिल्ह्यामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक असतो त्यांच्याकडे त्यांची नोंदणी होते.ेविभागाला समिती निर्देश देते त्यानुसार ४-६ महिन्यातून एकदा भेट देतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मागील ८ वर्षापासून म्हणजे २००७-०८ पासून डिसेंबर, २०१५ पर्यंत ही संख्या आयुक्तालयाकडे ११३ इतकी होती असा महालेखापालांचा परिच्छेद आहे. आता धर्मादाय आयुक्त सांगत आहेत की ही संख्या ४३० आहे तर ही संपूर्ण वाढीव संख्या डिसेंबर, २०१५ नंतरची नोंदणी आहे की त्यावेळी कुठे तरी दिलेल्या संख्येचा आकडा चुकीचा होता त्याबाबत समितीस अवगत करावे असे सूचित केले असता, याबाबत खात्री करावी लागेल. आकडा चुकीचाही असू शकतो. कारण ४ वर्षात एकदम इतकी संख्या वाढू शकत नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

रुग्णालयांची ४३० ही संख्या संपूर्ण राज्याची आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास सहमती दर्शवत ही आकडेवारी संपूर्ण राज्याची आहे व प्रत्येक सहा महिन्यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांकडून नवीन नोंदणीची मागणी मागवितो. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार ती रुग्णालये समाविष्ट होतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यावेळी ही सर्व तपासणी सुरू झाली त्यावेळी रुग्णालयांना या सर्व प्रक्रियेचा एवढा जाच वाटायला लागला की, त्यांनी मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्टअंतर्गत नोंदणी करणे थांबविले. ज्यांनी नोंदणी केलेली आहे त्यांनी त्या कालावधीमध्ये नोंदणी रद्द केली. कारण अशी माहिती त्यावेळी पुढे आली होती की, येथून नोंदणी रद्द करून कंपनी कायद्यांतर्गत त्यांनी त्यांच्या रुग्णालयांची नोंदणी करण्याच्या प्रक्रिया सुरू केल्या होत्या. त्यांना रुग्णालयावर ही सर्व बंधने नको होती. याबाबतची वस्तुस्थिती देखील समितीसमोर आली तर बरे होईल, असे मत विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मांडले.

असे कोणतेही रुग्णालय सध्या तरी प्रलंबित नाही की, ज्यांनी नोंदणी रद्द करण्याची मागणी केलेली आहे. केवळ कंबाळा रुग्णालयाने त्यांना व्यवस्थापन दुसऱ्याला द्यायचे असल्याबाबत अर्ज दिलेला आहे. दुसरे ते चालविण्यास तयार आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, चॅरिटीसाठी आवश्यक योजनांची अंमलबजावणी करू. तसेच दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्यावर जे काही बंधने आहेत ते कायद्यान्वये दिलेले आहेत. त्यांना जास्त त्रास देतच नाहीत. त्यांनी ते स्विकारलेले आहे. त्यांना नियमानुसार २० टक्के असलेलेच करण्यास सांगत आहोत. त्यामुळे त्यांना कोणतीही जबरदस्ती करीत नाहीत किंवा बंधने आणत नाहीत. नियमानुसार जे आहे तेच करण्यास सांगत आहोत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक : ३.१.२.५ अत्यंत गरीब रुग्णांसाठीच्या निधीमध्ये कमी रक्कम जमा करणे–**

२.२. बेथनी रुग्णालय, ठाणे यांनी १ कोटी ३५ लाख रुपये कमी जमा केले. ब्रीच कॅण्डी रुग्णालयाने ५ कोटी ३७ लाख रुपये कमी जमा केल्याबाबतचा हा परिच्छेद आहे. यामध्ये माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सर्व पैसे जमा केले आहेत का? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास सहमती दर्शविली व उर्वरित रक्कम संबंधितांनी जमा केली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अशा प्रकारे इतर ठिकाणी चूक झालेली आहे का? आय.पी.एफ. फंडमध्ये २ टक्के रक्कम जमा झाली पाहिजे. त्या अनुषंगाने ४३० संस्थांची तपासणी केली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत तपासणी करतो. त्या-त्या महिन्यामध्ये एक्झॉस्ट केलेल्या आय.पी.एफ. फंडाची माहिती प्रत्येक महिन्याला देतात व त्याप्रमाणे तपासणी करतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक : ३.१.२.६ अत्यंत गरीब रुग्णांसाठीच्या निधीमध्ये दाखविलेला अतिरिक्त खर्च-**

२.३. हिंदुजा रुग्णालयाशी संबंधित हा परिच्छेद आहे. या प्रकरणामध्ये आदेश दिलेले आहेत, याची सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये दुर्बल गटातील रुग्णाकडून काही अनामत रक्कम घेण्यात आली होती. रुग्णालयाचे म्हणणे असे होते की, रुग्ण रुग्णालयामध्ये दाखल होतो त्यावेळी तो दुर्बल गटातील आहे किंवा गरीब आहे ते सांगत नाही. त्यामुळे जर रुग्णांकडून अनामत म्हणून अशी काही रक्कम घेतली असेल. परंतु या रकमा परत केल्या आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. ही रक्कम परत केली आहे की केली जाणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, काही जणांची परत करण्यात आली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यांच्याकडून अनामत रक्कम न घेण्याचा नियम आहे. तरीही अनामत रक्कम घेण्यात आली होती, असे समितीने निदर्शनास आणले असता, आय.पी.एफ. किंवा गरीब रुग्णांकडून अनामत रक्कम घेता येत नाही. परंतु रुग्णालयाचे म्हणणे असे आहे की, रुग्णालयामध्ये दाखल होताना काही रुग्ण त्याबाबत माहिती देत नाहीत. त्यानंतर चार-पाच दिवसांनी कळते की, हे आय.पी.एफ. अंतर्गत उपचारास पात्र आहेत. त्यावेळी घेण्यात आलेली अनामत रक्कम परत केली जाते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अनामत रक्कम न घेण्याचा नियम केवळ गरीब रुग्णांसाठी आहे की, गरीब व निर्धन अशा दोन्ही गटातील रुग्णांसाठी आहे? अशी विचारणा समितीने केली असता, हा नियम दोघांसाठी आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. इतर खर्चाची रक्कम देखील घेतली आहे. ते देखील जमा केले आहेत का? अशी विचारणा समितीने केली असता, जमा केले आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. हे वसुलीचे काम तक्रारींच्या आधारे करण्यात आले की ऑडिट पाहून करण्यात आले? कारण ही बाब कशी लक्षात आली? तक्रार केल्यानंतर निदर्शनास आली की अकाउंट पाहताना निदर्शनास आली? अशी विचारणा समितीने केली असता, काही-काही वेळा अकाउंट पाहिल्यावर लक्षात येते तर काही वेळा तक्रारीवरुन लक्षात येते. दोन्ही बाजूने याकडे लक्ष ठेवतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक : ३.१.२.७ रुग्णांवर अनावश्यक आर्थिक भार**

२.४. याबाबत थोडक्यात समितीला अवगत करावे असे समितीने सूचित केले असता, त्यांनी यामधील रक्कम जमा केली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. विभागाने त्यांना तसा आदेश दिला असेल, असे मत समितीने व्यक्त केले असता, होय, त्यांना आदेश देण्यात आले होते. त्यानंतरच त्यांनी पैसे जमा केले आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हिंदुजा व बेथनी रुग्णालयांनी पैसे जमा केले आहेत का? अशी विचारणा समितीने केली असता, पैसे जमा केले आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. ज्या लोकांकडून हे पैसे वसूल करण्यात आले त्या लोकांना हे पैसे कसे मिळणार? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित व्यक्तींनी विभागाकडे अर्ज केला की, तात्काळ त्यांचे पैसे परत करू, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हे संबंधित व्यक्तींना कळवावे लागेल. त्यांना ही बाब कशी कळेल? ज्या रुग्णांकडून हे पैसे घेण्यात आले त्यांना ते परत करण्यात आले का? अशी विचारणा समितीने केली असता, सदर परिच्छेद क्रमांक ३.१.२.७ एक्सेस बिलिंगशी संबंधित आहे. आय.पी.एफ. फंडमध्ये ठराविक आयटेम्सचाच खर्च टाकायचा आहे. घेण्यात आलेली अनामत रक्कम परत करण्यात आली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

In this case of Excess billing have they charged the amounts which they are not liable to charge? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये एक्सेस बिलिंग करून आय.पी.एफ. फंडमधून पैसे खर्च केल्याचे दाखविले आहे. त्यामुळे आय.पी.एफ. फंड तेवढा कमी झाला. तो फंड दुसऱ्या रुग्णांसाठी वापरता आला असता, असे विभागीय सचिवांनी सांगितले. पूर्वी चुकून डेबिट केलेले पैसे आय.पी.एफ. मधून परत क्रेडिट केले का? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्रमांक ३.१.२.८ योजनेविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकाराचा अभाव**

२.५. या योजना सर्वसामान्य लोकांना माहिती नाहीत.त यासाठी जनजागृतीचा कार्यक्रम विभाग राबवित नसल्याचे निरीक्षण महालेखाकारांनी नोंदविले आहे. याबद्दल मत मांडण्याचे सूचित केले असता, विभागामार्फत यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असतात. सिव्हिल हॉस्पिटल्स, रेल्वे स्टेशन्स, बसस्थानकांवर दर्शक फलके लावण्यात आलेली आहेत. ४३० रुग्णालयांनी दर्शनी भागामध्ये नेहमीच्या फलकासह डिजिटल दर्शक फलक लावावा व त्यामध्ये उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या, त्यापैकी भरलेल्या खाटांची संख्या, मोकळ्या खाटांची संख्या यांची माहिती लावण्याबाबत सांगितलेले आहे. तसेच एक मोडयुल डेव्हलप केले असून त्यावर ही सर्व माहिती उपलब्ध होते. तसेच मुंबईमधील सिव्हील हॉस्पिटल्स व महानगरपालिकेच्या हॉस्पिटल्समध्ये डिजिटल दर्शक बसविला व त्या माध्यमातून जसलोक रुग्णालयामध्ये किती खाटा उपलब्ध आहेत ते जे.जे. रुग्णालयामध्ये दिसायचे, अशा प्रकारची ती व्यवस्था होती. हे प्रायोगित तत्त्वावर करण्यात आले होते. त्याला सुरुवातीला चांगला प्रतिसाद मिळाला, परंतु पुढे काही लॉजिस्टिकल इश्यूज येऊ लागले. टी.व्ही. फोडणे, सतत इंटरनेट सुविधा न पुरविणे अशा अडचणी त्यामध्ये येऊ लागल्या. परंतु हा प्रयोग सर्व ठिकाणी राबविणार आहोत. सिव्हिल हॉस्पिटल्समधून इतर धर्मादाय रुग्णालयांबाबतची माहिती उपलब्ध झाली पाहिजे. समजा कोल्हापूर सिव्हिल रुग्णालयमध्ये गेलो तर तेथे कोल्हापूरमधील धर्मादाय रुग्णालयांमध्ये उपलब्ध असलेल्या खाटाबाबतची माहिती मिळेल व रुग्णाला तिकडे हलविता येईल. यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबतच्या परिच्छेदामध्ये महालेखाकारांनी म्हटले आहे की, धर्मादाय आयुक्तांच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये योजनेविषयी माहिती देण्यासाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करण्यात आला होता. १८०० २२२ २७० असा तो क्रमांक होता. परंतु या टोल फ्री हेल्पलाईनला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात आली नाही किंवा धर्मादाय आयुक्तांच्या संकेतस्थळावर हा हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला नव्हता. जनतेला ग्रामपंचायतीच्या जाहिरातीद्वारे या योजनेविषयी माहिती पोहविण्यासाठी धर्मादाय आयुक्तांकडून कोणतीही कार्यवाही केली गेली नसल्याचे ऑडीटर्सने बघितले आहे. याबाबत भूमिका मांडावी, असे समितीने सूचित केले असता, लोकांमध्ये जागृती नसल्याचे लक्षात आल्यानंतर धर्मादाय रुग्णालये गरीब रुग्णांच्या दारी ही योजना राबविली. दिनांक ४ नोव्हेंबर, २०१७ रोजी मुंबईमधील सर्व मोठी ७८ रुग्णालये व ठाण्यातील काही रुग्णालयांमधील डॉक्टर्स रस्त्यावर आले. त्यांनी पदपथावरील लोकांना तपासले. झोपडपट्टी भागामध्ये जाऊन तेथील लोकांना तपासले. तसेच ज्या-ज्या ठिकाणी गरीब लोक आहेत तेथे जाऊन एकाच दिवसामध्ये मुंबईतील ११ हजार लोकांना तपासले. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हे ठीक आहे, परंतु या योजनेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी काय कार्यवाही केली? अशी विचारणा समितीने केली असता, यामार्फतच प्रचार-प्रसार करण्याचा प्रयत्न केला. धर्मादाय रुग्णालये गरीब रुग्णांच्या दारी ही मोहीम दिनांक ३ डिसेंबर, २०१७ रोजी महाराष्ट्रामध्ये राबविण्यात आली. त्यामध्ये ५७ हजार लोकांना तपासण्यात आले. लोकांमध्ये जागृती व्हावी हाच यामागील उद्देश होता. या मोहिमेमुळे एकाच दिवसामध्ये सुमारे ७० हजार लोकांपर्यंत पोहचलो. याची जाहिरात देखील करण्यात आली. मोठ-मोठ्या रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना उपचार मिळू शकतील, असे सांगितले. त्यामुळे लोक आता अशा रुग्णालयांमध्ये येऊ लागले आहेत. यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहोत. यासाठी संकेतस्थळ आहे. विभागाच्या निदर्शनास आले की, गरीब लोक केवळ महापालिका रुग्णालयांमध्येच येतात. त्यामुळे तेथे स्मार्ट टीव्ही बसविले आहेत. ७८ रुग्णालयांची त्या टी.व्ही.वर यादी प्रदर्शित करण्यात येते. कोणत्या रुग्णालयामध्ये किती जागा राखीव आहेत व आता किती उपलब्ध आहेत हे त्यामार्फत लोकांना कळते व ते उपचारासाठी दाखल होतात. अशा प्रकारे प्रयत्न करीत आहोत. तसेच यामध्ये आणखी काय करता येईल याचा विचार करून प्रयत्न करू, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मुख्यमंत्री कार्यालयाकडून १० टक्के वाटपाबाबतचा काय नियम आहे? अशी विचारणा समितीने केली असता, ती बाब वेगळी आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक ३.१.२.९ रुग्णालयांची तपासणी करण्यात कमतरता**

२.६. विभागाची तपासणी यंत्रणा कमकुवत आहे का, कारण समितीसमोर आलेल्या आकडेवारीमध्ये एका महिन्यात किमान दोन ते तीन सार्वजनिक न्यासांची तपासणी करण्याचे धोरण आहे. परंतु एक-एक दोन-दोन वर्षे विभागामार्फत तपासणी केली जात नाही. जर तपासणी केली नाही तर पुढील बाबी कशा निदर्शनास येतील? केवळ तक्रारींच्या आधारावर कारवाई करता, अशी विचारणा समितीने केली असता, विभागाच्या प्रत्येक निरीक्षकांना महिन्यातून किमान तीन रुग्णालयांना अचानक भेट देण्याचे लक्ष्य ठरवून देण्यात आले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

याबाबतची आकडेवारी समितीसमोर ठेवण्यात आलेली आहे त्यातून तसे निदर्शनास येत नाही. एका महिन्यामध्ये दोन-तीन भेटी देण्याचे लक्ष्य आहे. परंतु पाच वर्षांपेक्षा अधिक काळापासून कोणीही तपासणी न केलेली ४ रुग्णालये, एक वर्षापेक्षा कमी कालावधीपासून कोणीही तपासणी न केलेली ३२ रुग्णालये आहे. तीन वर्षे, दोन वर्षे तपासणी न केलेली देखील रुग्णालये आहेत. विभागाने समितीस सांगितले की, महिन्यामध्ये दोन-तीन रुग्णालयांना भेटी देण्याचे लक्ष्य विभागातील निरीक्षकांना देण्यात आलेले आहे. विभागाकडे एकूण किती निरीक्षक आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक जिल्ह्यासाठी वेगळे निरीक्षक आहेत. काही जिल्ह्यांमध्ये चार, पाच तर काही जिल्ह्यांमध्ये आठ, नऊ अशी वेगवेगळी संख्या आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सर्व जिल्ह्यांमध्ये मिळून किमान ७० ते ७५ निरीक्षक तरी असतील, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली. प्रत्येक महिन्याला जर ते दोन भेटी देत असतील तर वर्षातून किमान तीन-चार वेळा प्रत्येक रुग्णालयाला भेट देऊन झालीच पाहिजे. परंतु पाच-पाच वर्षे रुग्णालयाला कोणीही जाऊन पाहत नाही. हा जो गैरप्रकार सुरू आहे याला कुठे आळा घालता येईल? समितीला असे वाटते की, तपासणी करण्याचे काम कमी आहे. You are only taking action on the basis of complaints, असे मत समितीने व्यक्त केले असता, मुंबईमध्ये जर १० निरीक्षक असतील तर प्रत्येकाला तीन-तीन रुग्णालये वाटून दिली आहेत. प्रत्येकाने महिन्यामध्ये तीन रुग्णालयांना भेट द्यायची, जेणेकरून एका महिन्यामध्ये तीस रुग्णालयांना भेटी देऊन होतील. अशा पद्धतीने कार्यवाही केली जात आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. तसेच विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की उपलब्ध असलेली आकडेवारी सन २००९ ते २०१४ दरम्यानची आहे.

महालेखाकारांनी असे निरीक्षण नोंदविले आहे की, अत्यंत गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना बाह्यरुग्ण म्हणून आरक्षण देण्याविषयीच्या एम.पी.टी. अधिनियमाच्या तरतुदीची शासनाने अंमलबजावणी करावी. शासनाने धर्मादाय रुग्णालय चालविणाऱ्या राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांचा शोध घ्यावा आणि त्यांना एम.पी.टी. अधिनियम, १९५० च्या कलम ४१ (अ) (अ) च्या कक्षेत आणावे. जेणेकरून रुग्णांना मोठ्या संख्येत त्याचा लाभ प्राप्त होईल. तसेच अधिक जनजागृती करण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात आणि योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन होणार नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी धर्मादाय रुग्णालयांची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. या तीन शिफारशींबाबत विभागाचे काय मत आहे? अशी विचारणा समितीने केली असता, या शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने जे काही करता येईल त्याबाबत नक्की प्रयत्न करू, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

उक्त परिच्छेदासंदर्भात विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव तसेच महसूल विभागाचे सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची दिनांक १२ जुन, २०१८ रोजी पुन्हा साक्ष घेतली. २० टक्के लोकांना म्हाडा मुंबई पब्लिक ट्रस्ट नियमाखाली १० टक्के लोकांना मोफत आणि १० टक्के लोकांना सवलतीच्या दराने उपचार दिले जातात. जी जागा शासनाच्या माध्यमातून खूप कमी किंमतीमध्ये धर्मादाय रुग्णालयासाठी मिळत असते किंवा सार्वजनिक न्यासाकरिता मिळत असते, त्यांच्या माध्यमातून काही विशेष सवलत देण्याची काही प्रथा आहे का? काही नियम आहेत का, त्याच्याबद्दल देखभाल करण्याची जबाबदारी कोणावर आहे? कारण आपण केवळ लिमिटेड टू ट्वेंटी पर्सेंटचा इंटरेस्ट पाहतात, असा मुद्दा उपस्थित झाला होता. यावर विभागीय सचिवांची मत व्यक्त करावे असे समितीने सूचित केले असता, आता ज्याचा उल्लेख केला, तशा प्रकारच्या ज्या खाटा असतात दहा टक्के + दहा टक्के यांची तपासणी धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयामार्फत केली जाते आणि त्याबद्दलची तरतूद मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० मध्ये आहे. या व्यतिरिक्त काही प्रकरणात जेथे शासनातर्फे जमीन दिली जाते, त्या ठिकाणी त्या लॅण्ड ग्रांटच्या आदेशामध्ये विवक्षितपणे या संदर्भातील तरतूद समाविष्ट केलेली असते. बऱ्याच ठिकाणी १५ टक्के अ १५ टक्के म्हणजे पंधरा टक्के मोफत आणि पंधरा टक्के सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी विहित केलेल्या सवलतीच्या दरानुसार अशा पद्धतीने देखील खाटा

देण्याचे बंधन संबंधित संस्थांवर लादण्यात येते. याची तपासणी करण्याकरिता दुहेरी नियंत्रण असू नये, याच्याकरिता शासनाने एक दिनांक २२ डिसेंबर,२००५ रोजी महसूल विभागाने या संदर्भातील जे अधिकारी आहेत, ते धर्मादाय आयुक्त यांना प्रत्यावर्तीत केलेले आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु त्यांना याबाबत माहितीच नाही. असे समितीने निदर्शनास आणले असता. हे जे पत्र दिनांक २२.१२.२००५ चे आहे, ते प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग या दोघांना उद्देशून लिहिण्यात आलेले आहे. त्यामध्ये स्पष्टपणे याचा उल्लेख करण्यात आलेला आहे की, एका संस्थेवर दुहेरी नियंत्रण होऊ नये, याचेकरिता जी एक यंत्रणा आहे त्यांना शासनाचा महसूल विभाग आपले अधिकारी प्रत्यावर्तीत करीत आहे आणि महसूल विभागातर्फे हे जे तपासणीचे कामकाज आहे, ते धर्मादाय आयुक्तांनी पाहायचे आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागीय सचिवांनी जी बाब निदर्शनास आणली ती खरी आहे. परंतु जे उत्तर आहे, त्यामध्ये असा उल्लेख आहे की, धर्मादाय रुग्णालयात जागा आता एफएसआय मंजूर करतांना ज्या अटी व शर्तींच्या आधारे संबंधित प्राधिकरणाने मंजूर केलेली आहे, त्या अटी व शर्तींचे पालन करणे त्या संबंधित धर्मादाय रुग्णालयास बंधनकारक आहे, त्या अटी व शर्तींचे पालन होत आहे किंवा नाही या बाबतीत देखरेख करण्याची जबाबदारी ही त्या संबंधित प्राधिकरणाची आहे. सचिव तोंडी एक बाब सांगत आहेत आणि लेखी उत्तरामध्ये दुसरीच बाब आहे. शासनाने जागा दिली असेल आणि त्यावेळी जो करारनामा झाला असेल, त्याच्यामध्ये जो उल्लेख असेल तो मान्य आहे. ज्याने अतिरिक्त एफएसआय घेतला प्रिमियमचे चार्जेस २.५ टक्के होते. रेडी रेकनर प्रिमियम ९५.५ टक्के होता, त्यामध्ये सवलत होती. ज्यांनी अधिकचा एफएसआय घेतला, त्यांना हे लागू होईल हेही खरे आहे. त्यांना ते लागू झाले पाहिजे, त्यात दुमत नाही. ज्यांनी टॅक्समध्ये कमर्शियली न लावता जे धर्मादाय नोंदणीअंतर्गत ट्रस्ट आहे, रुग्णालय किंवा शाळा चालवित आहेत, म्हणून त्यांना सवलती देत असतो, त्याही सवलती ते घेत असतील, ते घेत असतील तर त्यांना ते बरोबर आहे. ती सवलत ते कमर्शियली भरतात. ते मालमता कर, पाणी शुल्क भरतात. विजेचे देयक देखील ते व्यावसायिक दराप्रमाणे भरतात केवळ आणि केवळ धर्मादाय आयुक्तांकडे ती संस्था नोदणीकृत आहे, म्हणून त्यांना हे दहा-दहा टक्क्यांची अट कशाला, या विषयावर मागच्या साक्षीमध्ये खूप सखोल चर्चा झालेली आहे. त्यांनी त्यावर सांगितलेले आहे की, आमच्या अंतर्गत पब्लिक ट्रस्टमध्ये जे काही रजिस्टर्ड असणार त्यांना दहा टक्के द्यावेच लागणार. आजची साक्ष होती की, युडी जी सवलत देते, महसूल जी सवलत देते, त्याच्या बद्दलची मॉनिटरींग कोण करते, युडी काय सवलत देते. कोणती सवलत अधिकची मिळणार, आपला जो विषय आहे, तो पूर्ण उदाहरण दिले होते. त्यांना वारंवार हेही सांगितले की, जे लोक पब्लिक ट्रस्टमध्ये रजिस्टर्ड आहेत, ते ही सवलत घेणार नाहीत. त्यांना कोणतीही सवलत मिळणार नाही. त्यांना वॉटर व प्रॉपर्टी टॅक्सचीही सवलत मिळत नाही. या संदर्भात नियम बदलण्यासंदर्भात सभागृहामध्ये सांगू. रेकॉर्डवर सांगा की, कोणतीही सवलत घेतली नाही तरी प्रॉपर्टी टॅक्स, वॉटर टॅक्सची, विजेची सवलत नाही. आयपीएफचे टर्नओव्हरचे दोन पर्सेंट आयपीएफ आहे. दोन पर्सेंट मिळाल्यानंतर त्यांच्याकडे शेकडो पत्र आले असतील की आमचे दोन पर्सेंट पूर्ण झालेले आहेत, आता पुढे ही सवलत पुढे चालू ठेवू शकत नाही. तुम्ही ही सवलत चालू ठेवली नाही तर तुमच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. तुमचा नियम आणि कायदा दोन पर्सेंट ऑफ दि टोटल टर्न ओव्हरचे जे इन्कम्स आहेत, बिलींगच्या दोन पर्सेंटचे आहे. आयपीएफची अमाऊंट तुमची २ पर्सेंटची संपल्यानंतर अशा पद्धतीची सक्ती कोणत्या नियमाच्या आधारे केली जाते. कोणत्या नियमाच्या आधारे ही सवलत पुढे चालू ठेवा असे म्हणता, अशी विचारणा समितीने केली असता, पहिले आपण जे सांगितले की, आम्ही काही सवलती घेत नाही, जेव्हा आपण एखादे ट्रस्ट रजिस्टर्ड करतो, त्यावेळी विलींगली पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट स्थापन केलेले असते. चॅरिटेबल म्हणून रजिस्टर्ड केले की, चॅरिटी ॲक्ट लागू होतो. दुसरी गोष्ट प्रत्येक सार्वजनिक न्यासाला २ टक्के रक्कम जी आहे, ती प्रशासकीय शुल्क म्हणून घेतो. आपण बाकीच्या न्यासांना घेतो आणि २ टक्केच्या अनुषंगाने दहा-दहा टक्के आरक्षण दिले जाते. दोन टक्के संपल्यानंतर मॉनिटरींग समितीकडे अर्ज करायचा की आमचे टू पर्सेंट जे आहे, ते संपलेले आहे. काही वेळेस काय होते की, काही रुग्णालये प्रामाणिकपणे करतात. काही रुग्णालये अधिक देयक दाखवितात. जे आवश्यक नाही तेही देयक दाखवतात. पुणे येथे तीन रुग्णालयांनी सांगितले की, त्यांचा फंड संपलेला आहे. विभागाने काय केले की, निरीक्षकाकडुन त्यांची चौकशी केली त्यांच्याकडे काही टक्के फंड शिल्लक होता. त्यांच्याकडे दीड कोटी फंड होता. एकाकडे दीड कोटी रुपये बाकी निघाली. ज्यांची बाकी किंवा ज्यांचा फंड संपलेला आहे, त्यांची निरीक्षकामार्फत चौकशी करतो. सहा महिन्यात चौकशी पूर्ण करतो. निरीक्षण समितीकडे त्याचा अहवाल देतो. कोणावरही हे असे बंधनकारक करीत नाहीत. समितीने तसे निदर्शनास आणून द्यावे, त्याप्रमाणे निश्चित त्यांना न्याय देण्याचे काम करण्यात येईल. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नगरविकास आणि महसूल विभागाच्या माध्यमातून विशेष सवलती रुग्णालयांना मिळतात. सचिव यांनी सांगितले की, पंधरा-पंधरा टक्क्यांची अट आहे आणि त्याची तपासणी धर्मादाय आयुक्तांनी करावी, तसे काही विभागाने मागील साक्षीमध्ये मान्य केलेले नाही. विभागाने सांगितले की, विभागाला त्याच्यामध्ये काही देणेघेणे नाही. त्यांनी केवळ मॉनिटरींग करावी. त्यांनी सन २००५ चा आदेश काढला. दुर्दैव असे आहे की, विभागाला

तो आदेशच माहिती नाही. एक हा विषय आहे की, पंधरा- पंधरा टक्के म्हणजे ते दहा दहा टक्के आहे, ज्यांचे दहा दहा टक्के आहे, त्याला जोडून पाच टक्के आहे की, आणखी दहा टक्के आणि पंधरा टक्के असे आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, सन २००५ मध्ये हे पत्र पाठविलेले होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आतापर्यंत विभागाने त्याची अंमलबजावणी केली नाही. असे समितीने निदर्शनास आणले असता सन २००६ मध्ये उच्च न्यायालयामध्ये ही जी दहा टक्केची जी योजना झालेली आहे, सन २००६ मध्ये उच्च न्यायालयामध्ये जो निवाडा झाला, त्या निवाडयामधून ही योजना झालेली आहे तर याच्यामध्ये सेक्शन ४१ मध्ये अनुदानित सार्वजनिक न्यास म्हणजे शासनाने मदत केलेल्या ज्या धर्मादाय संस्था आहेत, त्यांची व्याख्या दिलेली आहे. त्याच्या पहिल्याच क्लॉज मध्ये पुढील प्रमाणे आहे. "has received any grant of land or building, either on ownership basis or on lease or leave and licence, at a nominal or concessional rate, from the State Government or the Central Government or any local authority ;" जी शासनाने जमीन दिलेली आहे, कोणत्या सवलतीच्या दराने अथवा भाडेपट्टीवर, लायसेन्सवर दिलेली आहे तर तो ही एक घटक आहे की, सार्वजनिक न्यास समजण्यासाठी जमीन जरी दिलेली असली तरी ती हा पंधरा टक्केचा लावायचा की दहा टक्केचा लावायचा त्याबाबत पुनरावलोकन करू असे विभागीय सचिवांनी सांगितले..

पंधरा टक्क्यांच्या अटीवर जागा दिली असेल तर पंधरा टक्क्याप्रमाणे जर करारनामा झालेला असेल तर दहा टक्के की पंधरा टक्के याबाबत खुलासा करावा. ज्यावेळी एफएसआय वाढवून दिला त्यावेळी अटी व शर्तींमध्ये हे निश्चित करणे आवश्यक आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, याकरिता धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. अर्बन डेव्हलपमेंट संदर्भात फाईव्ह पर्सेंट अशा अटी आहेत. नगरविकास यांचे तीस टक्के, पंधरा टक्के आणि पंधरा टक्के अर्बन डेव्हलपमेंटच्या दहा टक्के आणि विभागाने वीस टक्के म्हटले तर साठ टक्के होतात. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबतचे ठोस सविस्तर उत्तर अजूनही विभागाकडे नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता याकरिता एक धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. यामध्ये अपर कॅप किती असावा, याबाबतचा निर्णय घेणे आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. ज्यावेळी माननीय उच्च न्यायालयाने आरक्षण आणले त्यावेळी याची अंमलबजावणी होत होती नगरविकास आणि महसूल विभागाचे आरक्षण होत नव्हते म्हणून त्यांनी हा नियम आणि सक्ती आणली होती. या सगळ्या अटी त्यामध्ये समाविष्ट आहेत. असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. ज्यांनी काही घेतले नाही, त्यांच्याकडून २० टक्के ज्यांनी सर्व लाभ घेतला त्यांनाही २० टक्के आरक्षणाची सक्ती. जागा मोफत घेऊन एफएसआय वाढवून घेतला आणि ज्या लोकांनी घेतला आतापर्यंत जे म्हणत होते, आम्ही काही घेतलेले नाही, एटीसीही घेतले नाही, असेही काही लोक म्हणत होते. तरीही खाटांचे आरक्षण द्यावे लागते. यामध्ये डिफ्रेन्शियेट केले पाहिजे. धोरण ठरविताना हा विचार केला पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता, कोणत्या संस्थांना मॅक्झिमम कॅप देणे आवश्यक आहे, याचाही विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा काही संस्थांचे रुग्णालये व्हायेबल होणार नाहीत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यांनी काही घेतले नाही, त्यांनी मुंबई पब्लिक ट्रस्ट अधिनियमाखाली दहा टक्क्यांची सक्ती लिमिटेड टू टू पर्सेन्ट अशी सक्ती केली. दुसऱ्या बाजूला ज्या लोकांनी शासनाबरोबर पंधरा टक्के देण्याचा करारनामा केला, ज्या लोकांनी पाच टक्के देण्याची अट दिली, त्यांना एफएसआय वाढवून दिला, त्या दृष्टीने त्यांना या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संरक्षण देऊन टाकले. असे मत समितीने व्यक्त केले असता नगरविकास विभागाने त्यांचे मेकॅनिझम तसेच ठेवले आहे, त्यामध्ये संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांना समाविष्ट केलेले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अतिरिक्त एफएसआय नगरविकास विभागाकडून दिला जातो, त्यावेळी रेग्यूलेशनमध्ये अट आहे. ती वीस टक्के खाटा राखीव ठेवणे आवश्यक आहे. २० टक्के ॲडिशनल एफएसआयच्या की सरसकट २० टक्के खाटा राखीव ठेवणे आवश्यक आहे अशी विचारणा समितीने केली असता, सरसकट एकूण खाटांच्या २० टक्के राखीव ठेवणे आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. ज्यावेळी अतिरिक्त एफएसआय दिला त्यावेळी कोणत्या अटींवर दिला, याचा विचार करून सांगावे. असे समितीने सूचित केले असता, २० टक्के खाटा आरक्षित ठेवणे, १० टक्के बाह्य रुग्ण जे आहेत, त्यांना मोफत सवलतीच्या दरात उपचार करणे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नगरविकास विभाग जे म्हणत आहे ते खरे आहे. नगरविकास विभागाकडे ज्या वाढीव एफएसआय करिता जातात, त्याचा कन्सर्न नगरविकास विभागामध्ये येतो, तेव्हा ते धोरण २० टक्क्यांचे लागू होते. ज्याच्यामध्ये केवळ आयुक्तांच्या संबंधित विभागातील रुग्णालयातील त्यांनी अतिरिक्त वाढीव एफएसआय घेतलेला नाही. शासनाचा प्लॉट घेतलेला नाही. ते धर्मादाय आयुक्त यांच्या परिपत्रकाप्रमाणे त्यांना दहा टक्के मोफत खाटा आणि दहा टक्के सवलतीच्या दराने खाटा त्यांना कोणत्याही ओपीडीमध्ये जे बाह्य रुग्णालयामध्ये त्यामध्ये सवलती नाहीत. त्यामध्ये केवळ

१० टक्के रिझर्व्हड फॉर दि पुअर क्लास फ्री सर्व्हिस हे को-ऑर्डिनेशन करण्याची आवश्यकता आहे. समिती सदस्याने एक उदाहरण दिले की, सेव्हन हिल्स रुग्णालयाच्या १२ एकराचा प्लॉट आहे. महापालिकेने हा प्लॉट त्यांना दिला म्हणजे नगरविकास विभागाची जबाबदारी होती. आज रुग्णालय उभारून दहा वर्षे झाली. हे रुग्णालय महापालिकेशी करार करीत नाही. महापालिकेला जुमानत नाही. एकही खाटेबाबत महानगरपालिकेशी करार करीत नाही, महानगरपालिकेला न्यायालयात जाऊन जबरदस्तीने तेथे स्वत:चा फलक लावून व्यवस्था हातात घ्यावी लागली. आता ते रुग्णालय रिलायन्स कंपनीकडे हस्तांतरित करीत आहेत, हे या समितीचा कन्सर्न आहे. या रुग्णालयात सामान्य रुग्णास कोणता लाभ मिळणार आहे याची कोणतीही स्पष्टता नाही. या ठिकाणी, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव उपस्थित आहेत त्यांना हे सर्व प्रश्न माहीत आहेत. आज त्यामध्ये लक्ष घातले नाही तर त्याचे दुष्परिणाम होतील. या ठिकाणी धर्मादाय आयुक्त उपस्थित आहेत. महानगरपालिकेच्या जागेवर सेव्हन हिल्स रुग्णालय उभे आहे. ५० हजार स्वे.फूट बांधकामासह हस्तांतरित केले. या संदर्भात सुसुत्रता करण्याची आवश्यकता आहे. नगर विकास विभागाने एफएसआयमध्ये सवलत दिली असेल किंवा महसूल विभागाने प्लॉट दिला असेल तर त्याबाबत कोणत्या सुविधा पुरविण्यात येतील याची माहिती घेतली पाहिजे. आता नगरविकास विभागाने खालच्या पातळीवर अधिकार डेलिगेट केलेले असल्यामुळे नस्तीवर माननीय मुख्यमंत्री यांच्या सहीची आवश्यकता नाही. आता आयुक्त महानगरपालिकेमध्ये बसून ती बाब निकाली काढू शकतील. ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचा फायदा समाजातील दुर्बल घटकांना होणार आहे. या संदर्भात कोणते धोरण स्वीकारणार आहात? रुग्णालयास रिझर्व्हेशन किंवा कमी दरातत जागा दिली असल्यामुळे त्यामध्ये लोकांचे इंटरेस्ट सेव्ह झाले पाहिजेत या दृष्टीने शासनाची काय भूमिका आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सेव्हन हिल्स रुग्णालय चॅरिटेबल रुग्णालय नसल्यामुळे तेथे विभागाची काही भूमिका नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सेव्हन हिल्स रुग्णालयाचा उल्लेख करण्यात आला. माहुल येथे म्युनिसिपल हॉस्पीटलसाठी चार प्लॉटवर आरक्षण होते. सन १९९९ च्या अखेरीस तेथे एक म्युनिसिपल हॉस्पीटल बांधण्यास सुरुवात केली होती. त्या रुग्णालयावर ३५ कोटी रुपये खर्च केल्यानंतर ठेकेदाराने ॲबंडन केले. त्यानंतर एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट कॉल केले गेले होते. त्यामध्ये सात एजन्सीने भाग घेतला होता. त्यामध्ये सेव्हन हिल्स एजन्सी होती. त्यांना हे काम मिळाले. मुंबई महानगरपालिकेने ज्या अटी आणि शर्ती ठरविल्या होत्या त्यामध्ये १३०० खाट तयार करायचे होते त्यापैकी २०० टक्के खाटा मुंबई महानगरपालिकेला द्यायचे ही मुख्य अट होती. एकही बेड दिलेला नाही, पण तसे नाही. सेव्हन हिल्स रुग्णालयाने १३०० बेडस केले नाहीत. त्या रुग्णालयाने ३३० बेडस तयार केले. त्यासाठी त्यांनी खूप कर्ज घेतले. त्या रुग्णालयास कर्ज पुरवठा करणारी एक्सीस बँक ट्रीब्र्युनलकडे गेली. मुंबई महानगरपालिकेकडून सेव्हन हिल्सला बऱ्याच कारणे दाखवा नोटीस गेलेल्या होत्या. पण हे प्रकरण ट्रीब्युनलकडे गेल्यामुळे ते Insolvency Resolution प्रकरणामध्ये आले. नंतर ट्रीब्युनलने आयएफटी म्हणजे प्रोफेशनल सोल्युशन काढतात त्यांची नियुक्ती करून त्यांना सहा महिन्यांचा वेळ देण्यात आला. सोल्यूशन काढण्यासाठी त्यांनी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट कॉल केले. ज्यामध्ये १७ एजन्सीने भाग घेतला त्यामध्ये १० हॉस्पीटल सेक्टर्स आहेत. काही फायनान्शिअल सेक्टर्स आहेत. त्यामध्ये रिलायन्स कंपनी देखील आहे. ट्रीब्युनलने आयएफटीला सहा महिन्यांत सोल्युशन काढण्यासाठी संधी दिलेली आहे. कमिटी ऑफ क्रेडीटमध्ये एमसीजीएम देखील एक सदस्य आहे. त्या समितीने काढलेले सोल्युशन स्थायी समितीसमोर सादर करावे लागेल त्यानंतरच निर्णय होईल. सध्या त्यांनी ७० टक्के कर्ज घेतलेले आहे, त्या दिशेने हे सर्व सुरू आहे परंतु कोणतेही सोल्युशन निघालेले नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीत अवगत केले.

Will the MCGM keep the interest of people in mind? समितीचे असे मत आहे की, ज्या ३३० खाटा तयार आहेत त्यापैकी २० टक्के म्हणजे ६६ खाटा महानगरपालिकेसाठी आरक्षित आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी दिले होते परंतु त्यामध्ये बरीच तफावत होती. ज्या रुग्णांवर सवलतीच्या दरात उपचार करावयाचे होते ते केलेले नाहीत म्हणून त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अभी जो National Companies Law Tribunal ( NCLT ) के सामने वह इन्सॉलव्हेन्सी ॲक्ट के तहत गई है। भले ही उसमें एमसीजीएम एक पार्टी है लेकिन सन २००० में एमसीजीएम और सेव्हन हिल्स के बीच में जो बेसिक ॲग्रीमेंट किया था वह मुलतः सदोष था. मेरा आपसे इतना ही कहना है कि हम अब उसमें पार्टी है तो नये सिरे से जब ॲग्रीमेंट होगा तो उसमें आम जनता का हित ध्यान में लिया जाना चाहिए असे मत समितीने व्यक्त केले असता, अटी आणि शर्तीमध्ये काय काय चुका होत्या ते एमसीजीएमला माहीत आहे. जेव्हा प्रस्ताव सादर केला जाईल तेव्हा एमसीजीएमच्या हिताचा विचार करून तशा पद्धतीने निर्णय घेतला जाईल. I would like to inform that IRP is not the last word to finalise any deal. जमीन, लीज हे सर्व हक्क एमसीजीएमकडे आहे. जे सोल्युशन येईल आणि ते मान्य नसेल तर ते जास्तीत जास्त काय करू शकतात तर त्यांना ऑक्शन करता येते. But they cannot touch the land, they cannot touch the building. जमीन आपल्याकडे आहे. आपले सर्व इंटरेस्ट प्रीझर्व्ह आहेत. त्यामध्ये काही अडचण नाही. पण आपल्यासमोर सोल्युशन येईल त्यावर चर्चा केली जाईल. एमसीजीएम सकारात्मक गोष्टींच्या दृष्टीने विचार करील, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

Is the MCGM monitoring this matter? अशी विचारणा समितीने केली असता, Yes, MCGM is monitoring the matter on day to day basis, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या अनुषंगाने नवीन नवीन मुद्दे समोर येत आहेत. यामध्ये दोन-तीन वेगवेगळे भाग आहेत. नगर विकास विभागाने एफएसआयमध्ये सूट दिली असेल तीच प्रकरणे फक्त नगर विकास विभागाकडे जातात. दुसरी गोष्ट शासनाने रुग्णालयासाठी जमीन दिली असेल तर ते वेगळे प्रकरण होते. फक्त धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी केलेले आहे, in order to get relaxation in taxation हा तिसरा भाग आहे. हे तीन वेगवेगळे भाग आहेत. या तीन विभागांचा कधीही समन्वय होऊ शकणार नाही. ज्यांनी शासनाची जमीन घेतली असेल पण वाढीव एफएसआय घेतला नसेल तर त्या संदर्भातील फाईल नगर विकास विभागाकडे जाणार नाही. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती एमपीटीच्या अधिनियमांचे पालन करते. महसूल विभागाचा मुद्दा आहे की, आरोग्य विभागाला मॉनेटरींग दिले. ते कमिटमेंट फुलफील करतात की नाही? त्यांनी १०/१० मध्ये इनकॉर्पोरेट केले. मॉनेटरींग हेल्थ डिपार्टमेंट करतात असे ते म्हणतात. ते कोठून करतात ते समितीला माहीत नाही. हे सर्व सूट देऊनसुद्धा ते रुग्णालय योग्यरित्या रिझर्व्हेशन देत नसेल तर याच विषयावर तीन विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्याचे ठरविले होते. They are only looking after the interest of MPT. They are not bothered about Revenue and Urban Development Departmentus interest. समितीसमोर धर्मादाय आयुक्त आणि विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी सांगितले की, जिल्हास्तरावर समिती आहे त्याचे प्रमुख जिल्हाधिकारी आहेत आणि ते या सर्व गोष्टींचा आढावा घेत असतात या ठिकाणी सांगण्यात आले की, सन २००५ मध्ये त्यांना अधिकार दिले गेले आहेत. या तीन विभागांचा समन्वय शक्यच नाही. ज्यांनी अतिरिक्त एफएसआय घेतला नाही त्या संदर्भातील नस्ती नगरविकास विभागाकडे जाणार नाही. या तीन विभागांमध्ये समन्वय असावा यासाठी त्या विभागांच्या सचिवांना बोलाविलेले आहे. या तीन प्रकारच्या केसेस होतात त्याला कसे रेग्युलराईज करून त्याचा फायदा लोकांना मिळाला पाहिजे यादृष्टीने समिती ही साक्ष घेत आहे. शासनाच्या नियमांची तपासणी झाली पाहिजे. ती सार्वजनिक न्यासाच्या नियमाखाली होत आहे. बाकी दोन ठिकाणच्या ऑब्लीगेशन त्या संस्थेची आहे आणि ते बरोबर पार पाडत नाहीत. त्यावर कोणी बरोबर निरिक्षण करीत नाही. सार्वजनिक आरोग्य विभाग तपासणी करते किंवा कसे हे नगरविकास विभाग पाहत नाही. या ठिकाणी सांगण्यात आले की, शासन निर्णय दिला, यांची अशी भूमिका आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १०-१० टक्के केले आहे, १५ टक्क्याची गरज नाही. याबाबतत स्पष्टता होण्याची आवश्यकता आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सन २००६ पासून १०-१० टक्केचा फॉर्म्युला सुरू केला. सन २००५ मध्ये महसूल विभागाने सांगितले की, सवलतीच्या दरात जागा दिलेली आहे त्याचे १५ टक्के प्रमाणे निरीक्षण करावे. ज्या संस्थेने शासनाकडून कोणतीच सवलत घेतली नाही त्यांच्याकडून १० टक्के आणि ज्यांनी शासनाकडून सवलती घेतल्या त्यांच्याकडूनही १० टक्के हे योग्य नाही. ज्यांनी वेगवेगळ्या योजनेखाली नगर विकास विभागाकडून एफएसआयचा फायदा घेतला किंवा कमी दरात जागा घेतली त्यांनी विभागाला जे जे कमिटमेंट केले त्याला कुठेतरी स्ट्रीमलाईन करून धर्मादाय आयुक्तांनीच सर्व पाहिले पाहिजे. तीन तीन विभागाने पाहिले तर काहीच होणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीचे मत बरोबर आहे. स्टेट हेडेड पब्लिक ट्रस्टमध्ये हे सर्व कव्हर होतात. डी.सी.रुल्सच्या रेग्युलेशनमध्ये सवलत दिलेली आहे, लँड लीजमध्ये सवलत दिलेली आहे, एक्झेम्शन आहे. तसेच त्यांना पीटीएफ फंडमधूनन ५८ (२) प्रमाणे सूट देतो. चॅरिटेबल रुग्णालय आणि मेडीकल रिलिफ करता म्हणून फंडचे पैसे भरण्याचे एक्झेम्शन आहे. नोंदणीकृत चॅरिटेबल ट्रस्टनी शासनाकडून कोणते फायदे घेतलेले आहेत त्याची माहिती त्या संस्थांकडून घेण्यात येईल. त्याचप्रमाणे नगरविकास आणि महसूल विभागाकडून त्यांनी ट्रस्टला कोणकोणत्या सवलती दिलेल्या आहेत त्याची देखील त्या विभागाकडून माहिती घेण्यात येईल. नियमामध्ये जी स्कीम फ्रेम केलेली आहे ती उच्च न्यायालयाच्या परवानगीने दुरुस्ती प्रस्तावित करू. समजा तीन विभागाकडून नगरविकास विभाग, महसूल विभाग आणि टॅक्सचे एक्झेम्शन घेतले असेल यापैकी जो हायर बेनिफीट १५ अधिक १५५ असा ३० टक्के द्यावा म्हणजे तेवढया खाटा राखीव ठेवाव्यात. जर दुसरी वेगळी टर्म नसेल तर १० अधिक १० असा बायडिफॉल्ट आहे अशा पद्धतीने स्कीम अमेंड करावी लागेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

खाजगी रुग्णालयास एफएसआय वाढवून मिळालेला आहे. त्यांचे मॉनेटरींग कसे करणार आहात, अशी विचारणा समितीने केली असता, ते मॉनेटरींग चॅरिटेबल ट्रस्टच्या अखत्यारित येणार नाही. हे त्यात्या विभागाला करावे लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विधि व न्याय विभागाने यामध्ये लक्ष घातले पाहिजे. अन्यथा त्यांचे फक्त ॲग्रीमेंट होईल आणि विषय संपेल. विभाग जी मॉनेटरींगची पद्धत इन्व्हॉल्व्ह करीत आहे त्याचे पर्सेन्टेज काय आहे हा एक भाग आहे आणि को-ऑर्डीनेटर मॉनेटरींग सिस्टीम ज्यामध्ये खाजगी रुग्णालयांनी एफएसआय वाढवून घेतला आहे त्यांना अटी घातल्या आहेत, त्याचा मॉनेटरींग सिस्टीमध्ये भाग असला पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभाग फक्त मॉनेटरींगवर थांबत नाही. समजा त्यामध्ये डिफॉल्ट झाला तर त्याबाबत प्रॉसीक्युशनची प्रोव्हीजन आहे. जर ती संस्था नोंदणीकृत नसेल तर बॉम्बे पब्लीक ट्रस्टच्या अंडर त्यांना प्रॉसीक्युट करू शकत नाही. आपणास एका एन्डपर्यंत जाऊन थांबता येत नाही. पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या ॲक्टच्या परव्हयूमध्ये आला तर आपण पुढे जाऊ शकतो. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या खाजगी रुग्णालयाने चार एफएसआय किंवा वाढीव एफएसआय घेतला असेल त्या बदल्यात १० टक्के, १५ टक्के, २० टक्के खाटा धर्मादाय कामाकरिता दारिद्रय रेषेखालील (BPL) लोकांकरिता देणार आहोत असा करार नगरविकास विभागाबरोबर केला असेल तर तो मॉनीटर होतो किंवा कसे हे पाहण्याचे काम विधि व न्याय विभागाचे आहे. यासंदर्भात काय करायचे त्याबाबत शासनाला मार्गदर्शन करावे. विभाग ही कारणे का सांगत आहे. प्रॉसिक्युट करू शकत नाही म्हणून विभाग काही करणार नाही? समितीचा सचिवांच्या विधानाला आक्षेप आहे. पब्लिक ट्रस्ट ॲक्टखाली प्रॉसिक्युट करू शकणार नाही ही बाब समिती समजू शकते. समितीचा मुद्दा साधा आहे. You are a Law Secretary, it is your job to suggest to the Government under which Section they can be prosecuted, if they fail to abide by the terms and conditions of the Agreement. ज्या संस्था पब्लिक ट्रस्टमध्ये नाहीत आणि त्यांनी फायदा घेतला तर त्यांचेवर कसे मॉनेटरींग करता येईल?अशी विचारणा समितीने केली असता, ज्या विभागाकडून सवलती घेतल्या असतील त्यांच्या करारामध्ये ज्या काही अटी आणि शर्ती असतील, सिव्हील आणि क्रिमिनल लॅबिलीटीज लॅटीज प्रिस्क्राईब केल्या असतील त्याप्रमाणे विभाग कार्यवाही करील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महसूल विभागाच्या सचिवांनी सन २००५ चा शासन निर्णय दाखविला तो तोच आहे. ज्या ज्या विभागांनी सवलती दिलेल्या आहेत त्याचे निरीक्षण धर्मादाय आयुक्तांच्यामार्फत होणार असा शासन निर्णय आहे असे विभागाचे सचिव सांगत आहेत. या समितीचा कन्सर्न तोच आहे. संबंधितांवर कायदेशीर कारवाई करू शकणार नाही, but as you are the Law Secretary, you can give suggestion to the Government. नगर विकास विभागाने चार एफएसआय दिला असेल तर त्यांच्याकडे या सर्व गोष्टी पाहण्यासाठी विभाग नाही. ती माहिती विधि व न्याय विभागाकडे पाठविली तर त्याची तपासणी करण्यासाठी वेगळा विभाग सुरू करावा किंवा त्या विभागाकडे तरी सुरू करावा याबाबत समितीला अवगत करावे असे सूचित केले असता, त्यांनी खाजगी रुग्णालयांची यादी दिली तर खूप चांगले होणार आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. आता विभागाने समितीला उत्तर दिलेले आहे. त्यानुसार समितीला पत्र दिलेले आहे. परंतु, त्यांनी विभागाला पत्र दिलेले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास असहमती दर्शविली.

सद्य:स्थितीत अडचण निर्माण झालेली आहे. आता वर्कआऊट कसे करता येईल याबाबत अवगत करावे असे समितीने सूचित केले असता, समितीला त्यांनी ज्या अटी व शर्ती ठरविलेल्या आहेत, त्या विभागाला माहीत नाहीत. ते प्रथम सांगावे लागणार आहे. यादी विभागाकडे नाही. तसेच अटी व शर्ती विभागाला माहित नाहीत. सन २००६ मध्ये माननीय उच्च न्यायालयाने या सर्व बाबी निश्चित करताना हे सर्व लक्षात घेऊन केलेले आहे. काही रुग्णालयांना सवलती मिळालेल्या आहेत. त्यामुळे माननीय उच्च न्यायालयाने ही योजना केलेली आहे. काही ठिकाणी फायदा घेतला जात नाही, तरी त्या ठिकाणी या योजना लागू आहेत, याबाबत समिती सदस्यांनी माहिती दिलेली आहे. काही लोक फायदा घेतात आणि त्यांना देखील तेवढ्याच जागा मिळतात. यामध्ये एक कॅप ठरवावा लागणार आहे. जे फायदा घेत नाहीत, त्यांना १० टक्के ठीक आहे. जे फायदा घेत आहेत, त्यांना आणखी अतिरिक्त किती वाढविता येईल यासाठी संयुक्त समिती करून ते अंतिम करावे लागणार आहे. त्याशिवाय हा मुद्दा सुटणार नाही. विभागाकडून केवळ निरीक्षण करण्याचे काम केले जाणार आहे. गरीबांना मोफत उपचार मिळाले पाहिजे, अशी शासनाची भूमिका आहे. अन्यथा जी रुग्णालये अंमलबजावणी करीत नाहीत, अशा रुग्णालयाच्या विरोधात कारवाई करण्याबाबत पत्रान्वये नगरविकास विभागाला कळविले जाणार आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

केंद्र शासनाकडून १० कोटी जनतेसाठी एक योजना तयार केली जात आहे. अशा लोकांसाठी ५ लाख रुपयांचा विमा आहे. ही लोक गरीब म्हणून कन्सीडर केले जातील किंवा त्यांचे पैसे विमा कंपनीकडून रुग्णालयाने घेतल्यानंतर त्यांना कन्सीडर केले जाणार आहे. याबाबत देखील निर्णय घ्यावा लागणार आहे. योजना लागू झाल्यानंतर यंत्रणा बदलून जाणार आहे. गरीब लोकांना विमा योजना लागू आहे. गरीबांच्या खाटा त्यांना दिल्या जातील आणि विमा कंपनी पैसे घेणार आहे. यासंदर्भात काय करावे लागणार त्यासाठी निर्णय घ्यावा लागणार आहे. सन २००५ मध्ये महसूल विभागाने धर्मादाय आयुक्त कार्यालयाला अधिकार दिल्याचे सांगितले आहे. सन २००५ नंतर किती जमिनी रुग्णालयांना वितरित केल्या आहेत, यासंदर्भातील माहिती उपलब्ध आहे काय? अशी विचारणा समितीले केली असता, याबाबतची माहिती घेऊन ती नंतर सादर केली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

रुग्णालयांना जमीन वितरित केलेली आहे. ते धर्मादाय आयुक्तांना कळविल्याशिवाय त्याची अंमलबजावणी करू शकणार नाहीत. विभागाकडून जमिनी वितरित केल्या जात आहेत. नगरविकास विभागाने वाढीव एफएसआय दिले हे जोपर्यंत धर्मादाय आयुक्तांना माहीत होणार नाही तोपर्यंत ते वाढीव एफएसआयच्या अनुषंगाने कार्यवाही करणार नाहीत. नगरविकास आणि महसूल विभागाने वाढीव एफएसआय मागणाऱ्या संस्थांना धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी करावी म्हणून अट टाकली पाहिजे. त्यानंतर वाढीव एफएसआय मिळणार आहे. महसूल विभागाने सन २००५ नुसार अधिकार दिल्याचे सांगितले आहे. अधिकार काय दिले आहेत? अंमलबजावणी होत नसल्यामुळे त्यांना कारवाई करण्याचे अधिकार

दिले आहेत काय? आदेशानुसार रुग्णालय काम करीत नाहीत, असे कळविणार आहे की, कारवाई देखील तेच करणार आहेत. अशी विचारणा केली असता, सन २००५ चे पत्र असून, त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, खाटांच्या संदर्भातील अटी व शर्तीवर जमीन देण्यात आलेली आहे, त्याची तपासणी करण्याचे अधिकार धर्मादाय आयुक्तांना प्रदान करण्यात आले आहेत. तपासाअंती शर्तभंग झालेला असेल तर त्या अनुषंगाने अलॉटमेंट रद्द करण्याचे किंवा कारवाई करण्याचे अधिकार महसूल विभागाला असणार आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नगरविकास विभागाने त्यांना कधीच माहिती दिलेली नाही. त्यांनी आरोग्य विभागाला सांगितले आहे. त्यांनी अंमलबजावणी केली किंवा कसे याबाबतची तपासणी केलेली आहे काय? यामध्ये अटी टाकून संबंधित विभागाने जबाबदारी झटकली आहे. त्यांनी अंमलबजावणी किंवा मॉनेटरिंग करावयाचे हे कोणी बघत नाही. हे सर्व मुंबई, पुणे आणि नाशिकसाठी आहे. ज्या ठिकाणी सवलतीच्या दरात जागा दिल्या जातात, त्या ठिकाणी सर्व नियम लागू असतात. धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी नसेल तर त्यांना वाढीव एफएसआय कसा मिळतो असा समितीचा प्रश्न आहे. प्रायव्हेटला देता येते. मर्यादा ही केवळ सार्वजनिक न्यासासाठी ठेवली असून, तसे करता कामा नये, विभागाला यासंदर्भात चौकट करून नियम करावे लागणार आहेत. नियम समिती जर सन २००५ पासून तयार झालेली नसेल तर आणखी किती दिवस लागणार असा देखील प्रश्न आहे. साक्षीतून काही तरी चांगले निष्पन्न झाले पाहिजे. अशा प्रकारची परिस्थिती शिक्षणक्षेत्रामध्ये देखील आहे. समिती केवळ रुग्णालयांचा विचार करीत आहे. शिक्षण संस्थांसाठी वाढीव एफएसआय किंवा प्लॉट दिले जातात. त्या ठिकाणी अटी व शर्ती आहेत. तसेच त्या ठिकाणी २० टक्के आरक्षणानुसार संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेश दिला पाहिजे. वाढीव एफएसआय दिलेला आहे. याचे निरीक्षण कोणी करावे असा प्रश्न आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, असे असेल तर नक्की करू. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

खाजगी रुग्णालयांना दिले तर निरीक्षण करायला काहीच हरकत नसणार आहे. ते करणार आहेत. अटी व शर्ती यांचे उल्लंघन झाले असेल तर त्यांना कारवाई करावी लागणार आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. यासंदर्भात एखादे सूत्र निश्चित करावे लागणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, बाय डिफॉल्ट १० टक्के द्यावे लागणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. पब्लिक ट्रस्टमध्ये ज्यांनी काहीच घेतले नाही, त्यांना १० टक्के दिले जाते. त्यांनी जागा मोफत घेतली आहे आणि एफएसआय वाढवून घेतलेला आहे. आता संबंधित अधिकाऱ्यांनी क्लॉज वाचून दाखविलेला आहे. ज्यांनी घेतले असेल तरी देखील त्यांना १० टक्के दिले आहे. हे चुकीचे आहे. त्यानुसार पुन्हा माननीय उच्च न्यायालयाकडे अपिल करावे लागणार आहे. सर्वांकडून लीज फर्म घ्यावी असे माननीय उच्च न्यायालयाने म्हटले नाही. माननीय उच्च न्यायालयाने काय म्हटले आहे? माननीय उच्च न्यायालयाने त्यांनी १० टक्के कॅप लावली आहे, असे म्हटले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये १० टक्के केलेले आहे. माननीय उच्च न्यायालयात जाऊन ही योजना सुधारित करून घ्यावी लागणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता विभागाने एक फॉर्म्युला डिनाय करू असे सांगितले आहे. असे करण्यास विभागाला अधिकारच नाही. विभागाला माननीय उच्च न्यायालयात जावे लागणार आहे. अन्यथा विधिमंडळात कायदा संमत करावा लागणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, काही लोकांनी चॅरिटेबल ट्रस्ट सेवाभावी वृत्तीने सुरू केलेले आहेत. त्यांना शासनाकडून कोणत्याही अपेक्षा नाहीत. त्यानुसार काही लोकांनी सुविधा घेतल्याच नाहीत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

माननीय उच्च न्यायालयात प्रश्न निर्माण झाला होता. शासनाच्या सवलती घेणाऱ्या संस्था कमिटमेंटप्रमाणे नगरविकास विभागाकडून एफएसआय वाढवून घेतला असल्यामुळे देत नव्हते. आता रिट पिटीशन झालेली आहे. त्यावेळी धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे कॅप ट्रस्ट नोंदणीकृत असल्याची योजना नव्हती. म्हणून ज्या कॅप ट्रस्ट नोंदणीकृत आहेत, त्यांना १० टक्के देण्याची आवश्यकता आहे. ज्यांनी खाजगी प्लॉट घेतले आहेत, त्यांच्याकडून शासनाने करार केलेला आहे. नगरविकास विभागाने वाढीव एफएसआय वाढवून दिलेला आहे. त्यासंदर्भात परिपत्रक काढून २० टक्के द्यावे लागणार आहे. अशा प्रकारे ते ७० टक्के झालेले आहे. त्यामुळे ते शक्य नाही. वाढीव एफएसआय घेतला असेल तर अमुक द्यावे लागणार आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून नोंदणी करामध्ये सूट घेतली जाणार असेल तर आपल्याला हे लागू होणार आहे. शासनाकडून नाममात्र सवलतीच्या दरात प्लॉट घेतला असेल तर ही सवलत दिली जाणार आहे. हे सर्व धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे प्रत्यार्पित करावे लागणार आहे. Whether it is registered under MPT or not ज्या ज्या संस्थानी फायदा घेतला आहे, त्याचे मॉनेटरिंग धर्मादाय आयुक्त कार्यालयाने केले तर ते बरोबर होणार आहे. नगरविकास विभागाकडून एफएसआय घेतला असेल तर त्यासाठी वेगळे दिले पाहिजे. ज्यांनी तिसरी जागा मोफत घेतली असेल तर त्यांना तिसरा फायदा द्यावा. त्यांनी केलेला करारनामा आणि व्यावहारीक दृष्टीकोन ठेऊनच निर्णय घ्यावा लागणार आहे. यासंदर्भात फ्रेम करून माननीय उच्च न्यायालयात किती दिवसांमध्ये याचिका दाखल करणार असा प्रश्न आहे. अशी विचारणा समितीने केली असता, माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यापूर्वी विभागास समितीच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. काही रुग्णालयांना चॅरिटी करावयाचे आहेत, म्हणून ते या योजनेत आले आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने योजना तयार करून ती माननीय उच्च न्यायालयात सादर करावी, अशी सूचना आहे. हे किती दिवसांमध्ये करणार त्याबाबतची माहिती समितीला द्यावी. असे समितीने सूचित केले असता, दोन्ही विभागाकडून माहिती येईल त्यावेळी तसे सादर करणे शक्य होणार आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आता १० टक्के कॅप माननीय उच्च न्यायालयात सन २००६ च्या आदेशामुळे लागलेली आहे. समितीचे मत असे आहे की, ज्यांनी फायदा घेतले नाही, त्यांना देखील १० टक्के दिले जात आहे. तसेच ज्यांनी फायदा घेतलेला आहे, त्याला देखील १० टक्के दिले जात असल्यामुळे तो एक प्रकारे अन्याय आहे. यासंदर्भात काही तरी निश्चित करण्याची आवश्यकता आहे. त्यानंतर ती योजना माननीय उच्च न्यायालयास सादर करावी, अशी सूचना आहे. त्यानंतर त्यांची परवानगी घेण्याची गरज आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये चार योजना करण्याची आवश्यकता आहे. पहिल्या कॅटेगरीमध्ये कोणताही फायदा घेतलेला नाही. फक्त रुग्णालय चालविणारी संस्था चॅरिटेबल ट्रस्ट म्हणून नोंदणीकृत आहे. यांच्यासाठी सद्यःस्थितीच्या योजनेनुसार १० टक्के दिले पाहिजे. दुसरी योजना ही चॅरिटेबल ट्रस्टने शासनाकडून सवलतीच्या दराने जागा घेतलेली आहे. तसेच तिसरी योजना ही चॅरिटेबल ट्रस्टने शासनाकडून जागा घेतली नाही पण वाढीव एफएसआय घेतलेला आहे. चौथ्या कॅटेगरीमध्ये शासनाकडून जागा घेतलेली आहे, एफएसआय घेतलेला आहे. अशा प्रकारे चार कॅटेगरी कराव्या लागणार आहेत. यामध्ये योजना तयार करण्यापूर्वी महसूल आणि नगरविकास विभागाकडून नस्तीवर अभिप्राय घेतले पाहिजेत. त्यांचे एफएसआयसाठी मंजुरीचे आदेश असतील तर त्यामध्ये या योजनेप्रमाणेच अट टाकली पाहिजे. अन्यथा योजना एका बाजूला आणि अटी व शर्ती दुसऱ्या बाजूला राहतील, असे होता कामा नये. नगरविकासामध्ये ज्या अटी आहेत, त्या रेग्युलेशनचा एक भाग आहे. महसूलमध्ये शासकीय आदेश बदलता येतो. त्यांच्याकडे रेग्युलेशनचा भाग आहे. रेग्युलेशन बदलावयाचे म्हटले तर त्यांच्या योजनेप्रमाणे रेग्युलेशनमध्ये बदल करावा लागणार आहे. यासाठी एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत ३७ नुसार प्रक्रिया पार पाडावी लागणार आहे. या सर्व बाबी समितीच्या शिफारशींमध्ये आल्या तर ते खूप चांगले होणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सचिवांनी जी माहिती दिलेली आहे, ती समितीला मान्य आहे. चांगली सूचना केलेली आहे. ३७ (१) किंवा रेग्युलेशनमध्ये बदल केल्याशिवाय ते होणारच नाही. पण ते त्यांनी केली पाहिजे. समिती आणखी एक कॅटेगरीबाबत सूचना करणार आहे. खाजगी ट्रस्ट नोंदणीकृत नसतील तरी देखील त्यांच्याकडून ४ एफएसआय घेतला जातो. तो सवलतीच्या दरात एफएसआय घेतो. त्याला नगरविकास विभागाच्या कॅटेगरीमध्ये समावेश करावा लागणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये विधि व न्याय विभागाचे सचिव यांनी अडचण सांगितलेली असून, ती बरोबर आहे. ती संस्था चॅरिटेबल ट्रस्ट नसल्यामुळे अधिनियमाच्या चौकटीत बसत नाही. यासंदर्भात धर्मादाय आयुक्तांना कारवाईचे आदेश प्राप्त होत नाहीत. त्यांनी प्रशासकीय दृष्टया जबाबदारी स्वीकारण्याची गरज आहे. त्या संस्थांना तशा प्रकारचे अधिकार राहणार नाहीत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे संबधित विभागालाच करावे लागणार आहे. The Charity Commissioner would do the audit and give the report to the department. विभागाने यापूर्वीच्या बैठकीत मनुष्यबळ आहे, अशी माहिती दिलेली आहे. समिती यासंदर्भात शिफारस करणार आहे. सचिव यांनी प्रधान सचिवांसमवेत चर्चा केल्यानंतर फॉर्म्युला तयार करण्याची आवश्यकता आहे. महसूल विभागाचे सचिव यांनी जी माहिती दिलेली आहे, त्या धर्तीवर समिती शिफारस करणार आहे. नोंदणीकृत नसले तरी त्याबाबत विचार करावाच लागणार आहे. एफएसआय किंवा जागा कमी दरात घेतली असेल तर त्यांना देखील नियमाअंतर्गत लागू करावे लागणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, महसूल विभागाचा विषय नसला तरी समितीला एक सूचना आहे की, आज तंत्रज्ञान उपलब्ध आहे. अशा प्रकारचे जे खाट आहेत त्याचे व्यवस्थापन समाधानकारक करणे ही काळाची गरज आहे. कारण यासंबंधात खूप मोठ्या प्रमाणावर असमाधान आहे. अनेकजण सांगतात की, या खाटांचा वापर लक्षित लोकांसाठी होत नाही. यासाठी सेंट्रल पोर्टल तयार केले पाहिजे. या योजनेमध्ये जी जी रूग्णालये समाविष्ट आहेत त्यांनी मोफत उपलब्ध असलेल्या खाटांची माहिती खाटांवर पोर्टलवर अपलोड केली पाहिजे. तसेच त्यांनी ऑक्युपन्सी सांगितली पाहिजे की, या खाटेवर अमूक अमूक व्यक्ती ॲडमिट आहे. असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले असता, तसे पोर्टल तयार करण्यात आलेले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अशी व्यवस्था असेल तर ते उत्तमच आहे, जर तंत्रज्ञानाचा उपयोग केला नाही तर अशा गोष्टींवर निरीक्षण करणे शक्य होणार नाही. त्यामुळे कोणालाही पीनपॉईंट करणे शक्य होणार नाही. असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

जेवढा टर्न ओव्हर झाला त्याच्या २ टक्के पर्यंत सवलत गरजू रूग्णांना देतात. तेव्हा दोन्ही विभागाच्या सचिवांनी एकत्रित चर्चा करावी. तसेच, महसूल विभागाचे सचिव यांच्याकडून जी सूचना आली आहे त्यासंबंधात समिती देखील शिफारस करणार आहे त्यांची सूचना मान्यच आहे. समिती शिफारस करणार आहे असे गृहीत धरून कामाला लागावे. तसेच योजना विभागाने तयार करावी व तीन महिन्यांच्या आत उच्च

न्यायालयामध्ये प्रोसिड व्हावे अशी समितीची इच्छा आहे. सन २००५ चे निवेदन असताना विभागाने सन २०१८ पर्यंत काहीच केलेले नाही. १० टक्क्यांवरच अडलेलो आहोत. आरोग्य विभाग निरीक्षण करीत नाही. किती खाटा वापरल्या जातात याची माहिती आरोग्य विभागाकडे नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, ट्रस्ट आणि विभागांकडून सगळी माहिती संकलित करतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जागा कोणाला कधी दिली याची यादी नंतर करावी. विभागाने आधी नियम करावेत. नियम झाले की, सर्व काही करता येईल. जे लोक MTP अधिनियमाच्या अंतर्गत नोंदणीकृत नाहीत त्यांना देखील हे बंधन लागू झाले पाहिजे याची देखील काळजी विभागाने घ्यावी. अशी सूचना समितीने विभागास केली.

**अभिप्राय व शिफारशी**

**परिच्छेद क्र.३.१ "राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांकडून चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये अत्यंत गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना औषधोपचार"**

**परिच्छेद क्र.३.१.२ "लेखापरिक्षा निष्पत्ती"**

**परिच्छेद क्र.३.१.२.१ "अत्यंत गरीब आणि दुर्बल गटातील रुग्णांना बाह्यरुग्ण म्हणून आरक्षण देण्याविषयी एमपीटी अधिनियमात असलेल्या तरतूदीची अंमलबजावणी न करणे "**

**अभिप्राय**

**२.७** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या (MPT) कलम ४१अअ मधील तरतूदी जरी ऑगस्ट,१९८६ पासून लागू झाल्या होत्या तरी धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मुंबई उच्च न्यायालयाने या विषयी हस्तक्षेप करुन ०१ सप्टेंबर, २००६ पासून लागू होणारी एक योजना तयार करेपर्यंत जवळजवळ २० वर्षे राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांकडून चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये अत्यंत गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना वैद्यकीय मदत पुरविण्यासाठी कोणतेही निर्देश दिले नव्हते. मा.उच्च न्यायालयाने तयार केलेल्या योजनेअंतर्गत अत्यंत गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना फक्त आंतररुग्ण म्हणून आरक्षण विहित केले आहे. परंतु MPT अधिनियमात मात्र आंतररुग्ण व बाह्यरुग्ण अशा दोन्ही प्रवर्गाखाली आरक्षण ठेवण्याविषयीचीतरतूद असतानाही बाह्यरुग्ण म्हणून आरक्षण ठेवण्यासंदर्भातील तरतुदीची अजूनही अंमलबजावणी झाली नाहीअसे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१अअ मधील तरतूदीमध्ये वैद्यकीय उपचार देणारे कोणतेही वैद्यकीय केंद्र अंतर्भूत होते व त्यामध्ये बाह्यरुग्णांकरिता वैद्यकीय उपचार देणारा दवाखानाही येऊ शकतो. सदर कलम ४१अअ व त्या अंतर्गत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेतील तरतुदींनुसार, सदर अधिनियमांतर्गत नोंदणीकृत विश्वस्थ व्यवस्था संचालित धर्मादाय रुग्णालयांना / धर्मादाय वैद्यकीय केंद्रांना, पात्र निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना अनुक्रमे मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार देणे बंधनकारक आहे. सदर तरतुदींनुसार उपचार देताना आंतररुग्ण व बाह्यरुग्ण अशाप्रकारचे वर्गीकरण नाही. सबब, सदरहू दोन्ही प्रकारचे रुग्ण हे योजनेअंतर्गत वैद्यकीय उपचार मिळण्यास पात्र ठरतात. त्यानुसार, सदर योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या संकेत स्थळावरिल प्रणालीतही बाह्यरुग्ण उपचार देणाऱ्या रुग्णालयांचाही समावेश करण्यात आलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर स्पष्ट केले.

**शिफारस**

**२.८ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (MPT) च्या कलम ४१ अअ नुसार एक असा सार्वजनिक न्यास जो निव्वळ वैद्यकीय सहाय्य देण्यासाठी किंवा वैद्यकीय सहाय्य व इतर धर्मादाय प्रयोजनासाठी निर्माण करण्यात आलेला आहे आणि ज्याद्वारे एखादे रुग्णालय (कोणत्याही सुश्रुषागृह किंवा प्रसुतीगृहाचा समावेश असलेले), दवाखाना किंवा कोणतेही वैद्यकीय उपचार केंद्र वैद्यकीय सहाय्यासाठी चालविले जाते आणि ज्या न्यासाला राज्य किंवा केंद्र शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून जमीन किंवा इमारत, कर्ज किंवा कोणतेही सहाय्यक अनुदान किंवा इतर अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे, ज्या न्यासाला राज्य शासनाने कोणताही मोकळा भूखंड मोफत, नाममात्र वा सवलतीच्या दराने वापरण्यासाठी सुट किंवा परवानगी दिली आहे आणि ज्या न्यासाला कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्यांनी विकास नियंत्रण नियमांमधून लक्षणीय स्वरुपात एखादी सवलत किंवा वजावट किंवा सूट दिली आहे. त्यास या अधिनियमांतर्गत राज्य अनुदानित सार्वजनिक न्यास असे संबोधण्यात येते.**

**महाराष्ट्रात या अधिनियमातील तरतूदींच्या प्रशासन व अंमलबजावणीवर धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडून पर्यवेक्षण केले जाते आणि त्यानुसार राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांकडे एकूण वापरातील खाटांपैकी १० टक्के (आंतररुग्णांसाठी) आणि वैद्यकीय केंद्रातील प्रत्येक विभागात वैद्यकीय तपासणी आणि उपचार करण्यासाठी त्यांच्या रुग्णांवरील उपचाराच्या एकूण क्षमतेच्या १० टक्के (बाह्यरुग्णांसाठी) इतकी क्षमता अत्यंत गरीब व्यक्तींसाठी विनाशुल्क आणि दुर्बल गटातील व्यक्तींना राज्य शासनाने निश्चित केलेल्या सवलतीच्या दराने देण्याचे निर्देश देण्यासाठीचे अधिकार त्यांना सोपविण्यात आलेले आहेत.**

**या अधिनियमातील तरतूदी अत्यंत सुस्पष्ट असतानाही व त्या आंतररुग्ण व बाह्यरुग्ण अशा दोन्हीसाठी समानरित्या लागू असतानाही त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नव्हती. यासंदर्भात मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाल्यानंतर व मा.उच्च न्यालयाने याची गंभीर दखल घेऊन या तरतूदींची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याच्यादृष्टीने आणि गरीब व निर्धन वा दुर्बल गटातील रुग्णांना या तरतूदीअन्वये राज्यातील मोठमोठ्या**

**रुग्णालयांमध्ये मोफत वा सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार मिळावेत या उदात्त हेतूने या तरतूदींना समांतररित्या पूरक अशी योजना सन २००६ पासून सुरु केली. त्यानंतरच विभागाकडून या अधिनियमातील तरतूदींची अंमलबजावणी सुरु झाली. तोपर्यत मात्र विभाग या तरतूदींच्या अंमलबजावणी प्रकरणी अनभिज्ञ, उदासीन व निष्क्रीय होता. परंतु महालेखाकारांनी अचूकरित्या आक्षेपित केल्याप्रमाणे यामहाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ अअ अन्वये आंतररुग्ण व बाह्यरुग्ण अशा दोन्ही प्रकारच्या रुग्णांना मोफत वा सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार करणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली नाही. मा.उच्च न्यायालयाने तयार केलेल्या योजनेत जी केवळ आंतररुग्ण असा उल्लेख दिसून येत असून त्यात बाह्यरुग्णासंदर्भात कोणतीही स्पष्टता नसली तरीही एमपीटी अधिनियमात मात्र आंतररुग्ण व बाह्यरुग्ण अशा दोन्ही तरतूदी अस्तित्वात असल्यामुळे त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे बंधनकारकच आहे. जरी न्यायालयाच्या योजनेत केवळ आंतररुग्णासंदर्भात उल्लेख असला तरीही अधिनियमातील बाह्यरुग्णासंदर्भात असलेल्या तरतूदीच्या अंमलबजावणीस मात्र कोणतीही बाधा येत नाही. विभागाने देखील ही बाब मान्य करुन सदरहू दोन्ही प्रकारचे रुग्ण हे या योजनेंतर्गत वैद्यकीय उपचार मिळण्यास पात्र ठरतात असे समितीसमोर स्पष्टच केले आहे. परंतु याची अंमलबजावणी मात्र राज्यस्तरावर प्रभावीपणे होत नसल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. अतः अत्यंत गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना बाह्यरुग्ण म्हणून आरक्षण देण्याविषयीच्या एमपीटी अधिनियमाच्या तरतूदींची शासनाने कडक व प्रभावी अंमलबजावणी करुन यास व्यापक प्रसिध्दी देखील द्यावी व या माध्यमातून जास्तीत जास्त गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना या तरतूदींचा व योजनेचा लाभ देण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.३.१.२.२ "आरक्षणातील कमतरता"**

**अभिप्राय**

२.९ (MPT) अधिनियमाच्या कलम ४१अअच्या उपकलम ३ मधील तरतूदीनुसार जर राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासाकडून चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमधील आरक्षणाची टक्केवारी राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अनुदान, सूट, सवलत इ.मुळे (MPT) अधिनियमातील कलम ४१अअअंतर्गत विहित केलेल्या आरक्षणापेक्षा अधिक ठरली तर अशा वाढीव टक्केवारीने आरक्षण दिले जावे.

तसेच बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली (DCR) , १९९१ च्या विनियम ३३ (२) नुसार, समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल गटातील व्यक्तींसाठी किंवा दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी एकूण खाटांच्या संख्येच्या किमान २० टक्के खाटा मोफत वैद्यकीय उपचारासाठी आरक्षित ठेवल्या जातील या अटीवर सामान्य चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा (FSI) अधिक FSI वैद्यकीय संस्थांना देण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्याव्यतिरिक्त एकूण बाहयरुग्णांपैकी १० टक्के रुग्णांना देखील सवलतीच्या दरात उपचार देण्यात यावेत. अशाप्रकारे, MPT अधिनियमाचा कलम ४१अअच्या उपकलम ३ सह DCR मधील विनियम विचारात घेतले तर अधिनियमाच्या कलम ४१अअ अंतर्गत तरतूद केलेल्या आरक्षणापेक्षा DCR अंतर्गत तरतूद केलेल्या आरक्षणाची टक्केवारी अधिक ठरली.याआधारे निवडक ११ रुग्णालयांचीतपासणीकेली असता चार रुग्णालयांना DCR अंतर्गत अतिरिक्त FSI देण्यात आला होता. आणि म्हणूनच त्यांनी अधिक टक्केवारीत आरक्षण देणे आवश्यक होते. परंतु समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल गटातील व्यक्ती किंवा दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना विनाशुल्क उपचारांसाठी एकूण खाटांपैकी किमान २० टक्के खाटा तसेच बाहय रुग्णांना सवलतीच्या दराने उपचारासाठी १० टक्के खाटा आरक्षित ठेवण्या ऐवजी ही रुग्णालये योजनेनुसार आरक्षण देत असल्याचे (अत्यंत गरीब रुग्णांवर विनाशुल्क उपचारांसाठी एकूण वापरातील खाटांपैकी १० टक्के व दूर्बल गटातील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचारासाठी १० टक्के खाटांचे आरक्षण) आढळून आले. तसेच कोकीळाबेन धिरुभाई अंबानी रुग्णालय व वैद्यकीय संशोधन केंद्र मुंबई आणि सुश्रुत रुग्णालय व संशोधन केंद्र मुंबई या दोन्ही रुग्णालयांना प्रतीवर्ष रु.एक इतक्या सवलतीच्या भाडेपट्टीवर अनुक्रमे जानेवारी,१९९८ व मे,१९७९ मधील जमीन दिली. भाडेपट्टीकरारानुसार, पहिल्या रुग्णालयाने आंतररुग्णांवर विनाशुल्क उपचारासाठी १५ टक्के आरक्षण आणि सवलतीच्या दराने उपचारासाठी १५ टक्के आरक्षण ठेवावयाचे होते. त्याचवेळी दुसऱ्या रुग्णालयाने आंतररुग्णांसाठी विनाशुल्क उपचारासाठी ३० टक्के आरक्षण आणि ना नफा ना तोटा तत्वावर उपचारासाठी ३० टक्के आरक्षण ठेवावयाचे होते. परंतु ही दोन्ही रुग्णालये केवळ योजनेनुसारच आरक्षण देत होती. (१० टक्के) जे प्रमाण भाडेपट्टी करारात करारनिविष्ट केलेल्या टक्केवारीपेक्षा (१५ टक्के आणि ३० टक्के) कमी होतेअसे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यावरुन असे स्पष्ट होते की, ही ४ धर्मादाय रुग्णालये केवळ मा.उच्च न्यायालयाच्या योजनेतील तरतुदीनुसार खाटांचे आरक्षण ठेवीत असून त्यांना भाडेपट्टा / अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक प्रदान करण्याबाबतच्या करारनाम्यानुसार अतिरिक्त टक्केवारीतील खाटा आरक्षित ठेवीत नाही. या परिच्छेदांसंदर्भातील महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत अतिरिक्त FSIचे प्रदान व भाडेपट्टी विषयीचे दस्ताऐवज प्राप्त करुन योग्य ती कारवाई केली जाईल असे विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले. परंतु यासंदर्भात लोकलेखा समितीची साक्ष लागेपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती.

याउलटनिर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी आरक्षित खाटांच्या मा.उच्च न्यायालयीन योजनेची देखरेख, अंमलबजावणी व संनियंत्रण हा विषय विधी व न्याय विभागाच्या व या विभागांतर्गत येणाऱ्या धर्मादाय संघटनेच्या अधिकार कक्षेत येते.परंतु धर्मादाय रुग्णालयांस जागा अथवा FSI मंजूर करताना ज्या अटी व शर्तींच्या आधारे संबंधित प्राधिकरणांनी ती मंजूर केलेली आहे. त्या अटी व शर्तीचे पालन करणे हे त्या संबंधित धर्मादाय रुग्णालयांस बंधनकारक आहे व त्या अटी व शर्तीचे पालन होत आहे किंवा नाही, याबाबतची देखरेख करण्याची जबाबदारी ही त्या संबंधित प्राधिकरणाची वा विभागाची आहे असे विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहेत. एकच धर्मादाय रुग्णालय शासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडून अथवा महानगरपालिकांकडून अनेक सवलती व सुट

करारातील अटी शर्तींच्या अधीन राहून प्राप्त करुन घेतात. परंतु या सर्व विभागांचा एकमेकांशी कोणताही ताळमेळ, समन्वय वा नियोजन नसल्यामुळे या करारातील अटी शर्तींची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही.ज्याचा या रुग्णालयांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ मोठ्या प्रमाणात होतो व त्यांचेवर शासनाचे कोणतेही नियंत्रण राहात नाही.धर्मादाय रुग्णालयांनी शासनाकडून कोणत्याही सवलती किंवा सुट घेतलेल्या असो किंवा नसो, परंतु जी रुग्णालये एमपीटी अधिनियमाखाली नोंदणीकृत झालेली आहेत त्यांना अधिनियमातील तरतूदीप्रमाणे गरीब (१० टक्के) व दुर्बल गटातील (१० टक्के)बाह्य वा आंतररुग्णांना खाटा राखीव ठेवून मोफत वा सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार देणे बंधनकारकच आहे व या तरतूदींची अंमलबजावणी व देखरेख करण्याचे काम विधी व न्याय विभागांतर्गत असलेल्या धर्मादाय संघटनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

परंतु समितीच्या असेही निदर्शनास आले की, या व्यतिरिक्त ज्या रुग्णालयांनी शासनाच्या वेगवेगळ्या विभागाकडून अन्य सवलती व सुट घेतलेल्या आहेत. त्यासंदर्भात केलेल्या कराराची व अटी शर्तींची अंमलबजावणी अतिरिक्त व वाढीव टक्केवारीने करण्यात येत नसून ही रुग्णालये केवळ उच्च न्यायालयाच्या या योजनेनुसारच आरक्षण देत होती व या बाबींवर देखरेख ना विधी व न्याय विभाग ना सुट वा सवलत देणारा संबंधित विभाग ठेवत आहे व वाढीव टक्केवारींची अंमलबजावणी व या उल्लंघनासंदर्भात संबंधित रुग्णालयांवर केलेली वा करावयाची कारवाईदेखील कोणताही विभाग करीत नसल्याचे समितीला दिसून आले.परिणामी या अधिनियमाखाली नोंदणी केलेली परंतु अतिरिक्त सवलत न घेतलेली रुग्णालये व शासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडून सवलती व सूट घेतलेली धर्मादाय रुग्णालये या दोन्ही रुग्णालयांना समानपातळीवर एकच सामायिक निकष लावून केवळ योजनेच्या अंमलबजावणी पुरताच या रुग्णालयांची जबाबदारी मर्यादित ठेवण्यात आली आहे व वाढीव टक्केवारीत घ्यावयाच्या राखीव खाटा वा उपचाराबाबत विभागाचे या रुग्णालयांकडे दुर्लक्ष झाले आहे. ज्याचा प्रत्यक्ष लाभ या रुग्णालयांना तर होतच आहे. परंतु गरीब व दुर्बल रुग्ण या मोफत उपचारापासून वंचित राहात आहेत.ज्या रुग्णालयांनी शासनाकडून अतिरिक्त सुविधा घेतलेल्या आहेत त्यांचेवर कोणताही भार वा जबाबदारी सद्य:स्थितीत नाही. शासनाच्या वेगवेगळ्या विभागाकडून या सुविधा या रुग्णालयांना प्राप्त होत असतात व प्रत्येक विभागाने दिलेल्या सुविधेसाठी स्वतंत्र करारानुसार स्वतंत्र अटी व शर्ती निश्चित करुन ती सवलत देण्यात येत असते. अशा परिस्थितीत अधिनियमातील तरतूदीच्या अंमलबजावणी व्यतिरिक्त शासनस्तरावरुन देण्यात आलेल्या अतिरिक्त सवलतीसाठी त्या संबंधित विभागाच्या अटी शर्तीनुसार वेगळे वाढीव दायित्व या रुग्णालयांवर असून त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे अभिप्रेत आहे.सद्य:स्थितीत याची अंमलबजावणी करण्यासाठी व या सर्व विभागांचा एकमेकांशी एकत्रित समन्वय व ताळमेळ ठेवण्यासाठीकोणतीही स्वतंत्र व्यवस्था, तरतूद वा यंत्रणा विभागाकडे उपलब्ध नाही व या धर्मादाय रुग्णालयांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी केवळ धर्मादाय संघटनेवर टाकण्यात आली असून त्यांचेमार्फत फक्त MPTॲक्ट व मा.उच्च न्यायालयाची योजना या मर्यादेतच रुग्णालयांवर सद्य:स्थितीत नियंत्रण ठेवण्यात येत आहे.वेगवेगळ्या विभागांनी रुग्णालयांना दिलेल्या सवलतीच्या अनुषंगाने केलेल्या करारासंदर्भातील अटी शर्तींची माहिती देखील धर्मादाय आयुक्तांना देण्यात येत नाही. किंबहुना अशा रुग्णालयांवर कारवाई करण्याचे अधिकारही धर्मादाय आयुक्तांनानसूनज्या विभागाने ही सवलत दिली त्याच विभागाने त्याच्या पुर्ततेची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे असे समितीसमोर स्पष्ट करण्यात आले. परिणामी ही वाढीव अतिरिक्त सवलत या रुग्णालयांनी रुग्णांना द्यावी किंवा कसे याबाबत कोणतीही स्पष्टता व अंमलबजावणीची कार्यपध्दती समितीसमोर स्पष्ट होवू शकली नाही. धर्मादाय आयुक्त व विधी व न्याय विभागाने ही जबाबदारी त्यांची नसल्याची समितीसमोर स्पष्ट केले व ज्या विभागांनी सवलत दिली असेल त्यांनीच या बाबींचे परिक्षण व कार्यवाही करावी असेही समितीसमोर नमूद केले.सद्य:स्थितीत विधी व न्याय विभाग फक्त १० + १० टक्के राखीव खाटांची अंमलबजावणी संदर्भातच लक्ष देत असून अन्य अतिरिक्त व विशेष सवलती घेतलेल्या रुग्णालयांवर कोणतीही अधिकची जबाबदारी टाकण्यात आलेली नाही. जी सवलत शासनाकडून या रुग्णालयांना देण्यात येते त्यासंदर्भातील अटी व शर्ती त्या विभागामार्फतच काढण्यात आलेल्या आदेशामध्ये विवक्षितपणे समाविष्ट केलेली असते. परंतु त्याच्या अंमलबजावणीवर नियंत्रण मात्र कोणत्याही यंत्रणेकडून केले जात नाही. या प्रकरणी विशेष तपासणी करण्यासाठी समितीने महसूल सचिवांना देखील समितीसमोर बोलविले असता मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये असलेल्या राखीव खाटांच्या व्यतिरिक्त काही प्रकरणात जेथे शासनातर्फे जमिन दिली जाते त्या जमिनी देण्याच्या आदेशामध्येच अधिकच्या अटी शर्तीनुसार मोफत व सवलतीच्या दरात राखीव खाटा देण्याचे बंधन या संस्थांवर लादण्यात येते. याची तपासणी करण्याकरिता दुहेरी नियंत्रण असू नये याकरिता शासनाच्या महसूल विभागाने दि.२२.१२.२००५ रोजीच्या पत्राद्वारे यासंदर्भातील जे अधिकार आहेत ते धर्मादाय आयुक्त यांना प्रत्यावर्तित केले आहेत व महसूल विभागातर्फे हे जे तपासणीचे कामकाज आहे ते धर्मादाय आयुक्तांनी पहावे असे स्पष्टपणे या पत्रात नमूद असल्याचे समितीस सांगण्यात आले. समितीच्या असेही निदर्शनास आले की, सदरहू पत्राबाबतची कोणतीही माहिती धर्मादाय कार्यालयाला नव्हती त्यामुळे आजतागायत ते कार्यालय एमपीटी अधिनियमातील तरतूदीची अंमलबजावणी करण्यापूरतीच कार्यवाही करीत होते.यासाठी शासनस्तरावरुन या रुग्णालयांना सवलती देणारे वेगवेगळे विभाग व विधी व न्याय विभागांतर्गत येणारे धर्मादाय आयुक्त कार्यालय यांचेमध्ये योग्य तो ताळमेळ व समन्वय असणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत अन्य विभागांकडून देण्यात येणाऱ्या सवलतींची कोणतीही माहिती वा कागदपत्रे धर्मादाय कार्यालयाना देणे विभागांवर बंधनकारक नाही. परिणामी त्याची अंमलबजावणी प्रभावीरित्या होवू शकत नाही. याहीउपर ज्या रुग्णालयांनी अन्य विभागांमार्फत दिलेल्या सवलती संदर्भातील अटी शर्तींचे पालन व पुर्तता न केल्यास या उल्लंघनाप्रती करावयाच्या कारवाईचे कोणतेही अधिकार विधी व न्याय विभागाला नाहीत. जोपर्यत या अटी शर्तींच्या देखरेखीची व अंमलबजावणीच्या नियंत्रणासोबतच त्याच्या उल्लंघना संदर्भात शास्ती करण्याचे अधिकार धर्मादाय आयुक्तांना अधिकृतरित्या देण्यात येत नाहीत तोपर्यंत याची अंमलबजावणी विधी व न्याय विभाग धर्मादाय आयुक्तांच्या माध्यमातून प्रभावीपणे करु शकणार नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शिफारस**

**२.१० MPTअधिनियमाच्या कलम ४१अच्या उपकलम ३ मधील तरतूदीनुसार जर राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासाकडून चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमधील आरक्षणाची टक्केवारी राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अनुदान, सूट, सवलत इ.मुळे MPT अधिनियमातील कलम ४१अअंतर्गत**

विहित केलेल्या आरक्षणापेक्षा अधिक ठरली तर अशा वाढीव टक्केवारीने आरक्षण दिले जावे.तसेचबृहन्मुंबई महानगर पालिकेच्या (MCGM) विकास नियंत्रण नियमावली (DCR), १९९१ च्या विनियम ३३ (२) नुसार, समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल गटातील व्यक्तींसाठी किंवा दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी एकूण खाटांच्या संख्येच्या किमान २० टक्के खाटा मोफत वैद्यकीय उपचारासाठी आरक्षित ठेवल्या जातील या अटीवर सामान्य चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा (FSI) अधिक FSI वैद्यकीय संस्थांना देण्याची परवानगी देण्यात आली आहे. अशाप्रकारे, MPT अधिनियमाच्या कलम ४१अअच्या उपकलम ३ सह क्लॅज मधील विनियम विचारात घेतले तर अधिनियमाच्या कलम ४१अअअंतर्गत तरतूद केलेल्या आरक्षणापेक्षा DCR अंतर्गत तरतूद केलेल्या आरक्षणाची टक्केवारी अधिक ठरते.परंतु ज्या रुग्णालयांना विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात आला होता किंवा सवलतीच्या दराने भाडेपट्टीवर जमिन देण्यात आली होती ती रुग्णालये एमपीटी अधिनियमांचे उल्लंघन करुन समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील रुग्णांना जास्त टक्केवारीत आरक्षण देत नव्हती.

उपरोक्त तरतूद स्वयंस्पष्ट असताना देखील सद्य:स्थितीत ही सर्व धर्मादाय रुग्णालये केवळ मा.उच्च न्यायालयाच्या योजनेनुसारच अंमलबजावणी करीत असून या सवलती घेऊन देखील कोणतेही अतिरिक्त वा वाढीव दायित्व या रुग्णालयांवर नाही. त्यामुळे ज्या रुग्णालयांनी सूट वा सवलती घेतल्या अशी रुग्णालये व ज्यांनी कोणतीही सूट वा सवलत घेतली नाही अशा दोन्ही प्रकारची रुग्णालये एकसमानरित्या योजनेची अंमलबजावणी करीत आहेत. धर्मादाय रुग्णालयांना मिळत असलेल्या सवलतीचे स्वरुप हे निरनिराळे असून त्यांच्याशी संबंधित विभाग देखील वेगळे आहेत. अशा परिस्थितीत अटी शर्तीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्या त्या विभागाची आहे. परंतु सद्य:स्थितीत या सर्व संबंधित विभागांचा एकमेकांशी कोणताही समन्वय नसल्यामुळे याचा सर्वस्वी लाभ या धर्मादाय रुग्णालयांना होतो. संपुर्ण योजनेचे संनियंत्रण या सर्व विभागांनी एकत्रित येवून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जेणेकरुन या सर्व बाबींवर संनियंत्रण ठेवण्याचे काम संबंधित एकच विभाग करु शकतो.या सर्व बाबींच्या अंमलबजावणीची जबाबदारी विखुरलेल्या स्वरुपात वेगवेगळ्या विभागांवर न ठेवता व रुग्णालयांवर दुहेरी नियंत्रण राहू नये यासाठी या सर्व बाबींच्या नियंत्रणाची, अंमलबजावणीची व देखरेखीची जबाबदारी एकाच विभागावर ठेवण्यात यावी असे समितीचे स्पष्ट मत आहे. सद्य:स्थितीत या सर्व धर्मादाय रुग्णालयांवर देखरेख व संनियंत्रण करण्याचे काम धर्मादाय आयुक्तांकडे आहे व सद्य:स्थितीत अधिनियमातील तरतूदी व योजनेची अंमलबजावणी त्यांचेमार्फतच सुरु आहे. त्यामुळे अन्य विभागांनी दिलेल्या सोयी, सवलती, सूट व त्यासाठी निश्चित केलेल्या अटी शर्तीच्या अंमलबजावणीची जबाबदारी देखील धर्मादाय आयुक्तांकडेच देणे योग्य व व्यवहार्य ठरेल. परंतु धर्मादाय कार्यालयाकडे सद्य:स्थितीत उपलाब्ध असलेल्या यंत्रणेच्या व मनुष्यबळाच्या माध्यमातून ही अतिरिक्त व वाढीव जबाबदारी पार पाडणे धर्मादाय आयुक्तांना निश्चितच शक्य होणारे नाही.जर ही संपुर्ण जबाबदारी विधी व न्याय विभागावर टाकावयाची झाल्यास त्यांना अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी वर्ग देणे देखील आवश्यक आहे तरच ते परिणामकारकरित्या काम करु शकतील. अत: या सर्व बाबींचे नियंत्रण, पर्यवेक्षण, देखरेख व अंमलबजावणीची जबाबदारी धर्मादाय आयुक्तांकडेच देण्यात यावी. ज्यांनी या कामाची देखरेख व संनियंत्रण समितीच्या (Monitoring Committee) माध्यमातून अंमलबजावणी करावी.सद्य:स्थितीत अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे सर्व रुग्णालयांची तपासणी धर्मादाय कार्यालयाकडून करणे शक्य होत नाही. त्यामुळे केवळ तक्रार प्राप्त झाली तरच त्याची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. या संपुर्ण बाबींसाठी विभागाने परिपुर्ण यंत्रणा अत्यंत पारदर्शकरित्या व मानवी हस्तक्षेप विरहित आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन तयार करण्यात यावी व कोणत्याही परिस्थितीत ही कार्यवाही व यंत्रणा अविरत सुरुच राहिली पाहिजे अशी कार्यपध्दती स्विकारण्यात यावी.असे करताना या सर्व विभागांकडून देण्यात येणाऱ्या सवलतीच्या अनुषंगाने घ्यावयाच्या मोफत उपचाराचे प्रमाण एकत्रित करुन जर ते एका अंतिम मर्यादेपेक्षा अधिक होत असेल तर या बाबी रुग्णालयांनादेखील परवडणाऱ्या नाहीत. त्याचप्रमाणे या रुग्णालयांवर वाढीव दायित्व टाकताना त्याची अंतिम मर्यादेची टक्केवारी किती असावी याची देखील निश्चिती होणे आवश्यक आहे. शासनाने या प्रकरणी अत्यंत व्यावहारीक दृष्टीकोन ठेवून ही धर्मादाय रुग्णालये देखील योग्यरितीने कार्यरत राहू शकतील यादृष्टीने योग्य तो निर्णय करण्याची आवश्यकता आहे. यासाठी या सर्व बाबींवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी एकाच यंत्रणेवर ठेवण्याची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत यासाठीची अंतिम मर्यादा (upper limit) देखील विहित करणे आवश्यक आहे. केवळ या तरतूदींची व अटी शर्तींची अंमलबजावणीची जबाबदारी धर्मादाय आयुक्त कार्यालयावर सोपविताना याच्या उल्लंघना प्रकरणी कारवाई वा शास्तीचे अधिकार देखील त्यांना देण्यातयावेत. तरच याची अंमलबजावणी योग्यरित्या होणे शक्य आहे. सद्य:स्थितीतएका विभागाने ठरविलेल्या अटी शर्तींची माहिती दुसऱ्या विभागाला नसते. यासाठी एमपीटी ॲक्टखाली नोंदणीकृत असलेल्या धर्मादाय रुग्णालयांना शासनस्तरावरुन निरनिराळ्या विभागांकडून प्राप्त होणाऱ्या सवलतींची व त्यासाठी पुर्ण करावयाच्या करारातील अटी शर्तींची एकत्रित माहिती विधी व न्याय विभागाअंतर्गत धर्मादाय आयुक्तांकडे उपलब्ध असण्याबाबतची यंत्रणा निर्माण करण्यात यावी. या ॲक्टखाली नोंदणीकृत असलेल्या सर्वच रुग्णालयांना एकाच स्तरावर न ठेवता त्यांची श्रेणीनुसार(category) विभागणी करुन ज्या प्रमाणात सवलती घेतलेल्या आहेत त्याप्रमाणे रुग्णालयांचे वर्गीकरण करण्यात यावे व त्या प्रमाणातच त्यांच्यावर अतिरिक्त जबाबदारी व दायित्व देखील निश्चित करण्यात यावे. यासाठी शासनस्तरावरुन या सर्व बाबींचा आढावा घेवून योग्य ते नियोजन करुन ही सुधारीत योजना तयार करुन त्यासाठी आवश्यक ते नियम तयार करण्यात यावेत. आवश्यकता असल्यास मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून योजनेत सुधारणा करणे देखील आवश्यक आहे. तसेच याअनुषंगाने अधिनियमात आवश्यक ते बदल करण्याची आवश्यकता असल्यास ते देखील करण्यात यावेत. शासनाने अशा प्रकरणी व्यावहारीक दृष्टीकोनाचा अवलंब करुन धर्मादाय रुग्णालय देखील योग्यरित्या काम करु शकतील व त्याचप्रमाणे शासनाला देखील त्यांच्या अटी शर्तींचे पालन करताना गरीब व निर्धन लोकांना जास्तीत जास्त मोफत व सवलतीच्या दराने उपचार उपलब्ध करुन देणे शक्य होईल अशा कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. यासाठी सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा पुर्ण वापर करुन यासाठी सेंट्रल पोर्टल तयार करण्यात यावे व सर्व धर्मादाय रुग्णालये, शासकीय रुग्णालये व शासनस्तरावरील विभाग यांचेशी ते लिंक करुन त्यावरील माहिती अद्ययावत करण्यात यावी.शासनाने आतापर्यंत कोणकोणत्या धर्मादाय रुग्णालयांना काय काय सवलती दिल्या त्यासाठी निश्चित

**केलेल्या अटी शर्ती वा करारनामा, रुग्णालयांनी त्याची केलेली अंमलबजावणी, केलेले उल्लंघन व यावर शासनाचे संनियंत्रण या सर्व बाबींची माहिती एकत्रित तयार करुन ती या पोर्टलवर टाकण्यात यावी. तसेच या रुग्णालयांकडे पाठवावयाच्या रुग्णांचे नियंत्रण व देखरेख मंत्रालय स्तरावर देखील ठेवण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.३.१.२.३ "राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांचा शोध घेण्यासाठीयंत्रणेचाअभाव"**

**अभिप्राय**

महाराष्ट्र सुश्रुशा गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत सर्व रुग्णालयांची नोंदणी होणे आवश्यक असते. तसेच धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेला जो राज्य अनुदानीत सार्वजनिक न्यास धर्मादाय रुग्णालये चालविण्याचा उद्देश बाळगतो, त्याची नोंदणी महाराष्ट्र सुश्रुशा गृहनोंदणी अधिनियम,१९४९ अंतर्गत केली जाणे देखील आवश्यक असते. परंतु मुंबई व ठाणे येथे राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासाकडून चालविल्या जाणाऱ्या आणि ऑगस्ट,२००७ पर्यंत धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेल्या रुग्णालयांची संख्या डिसेंबर,२०१५ पर्यंत ११३ होती. जी संख्या मागील आठ वर्षांपेक्षा जास्त काळापासून स्थिर होती. जे न्यास ऑगस्ट,२००७ पासून कार्यरत झाले होते आणि म्हणूनच MPT अधिनियमांतर्गत त्यांचा समावेश होऊ शकला नव्हता. त्यांचा शोध घेण्यासाठी धर्मादाय आयुक्तांनी कोणतेही विशेष प्रयत्न केले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये धर्मादाय आयुक्तालयात सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था यांची नोंदणी होते. धर्मादाय आयुक्त कार्यालयात धर्मादाय रुग्णालयांची नोंदणी होत नाही. मा. उच्च न्यायालय मुंबई, यांनी मंजूर केलेली योजना दि.१.९.२००६ रोजीपासून अंमलात आलेली आहे. त्यावेळेस, नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेमार्फत संचालित धर्मादाय रुग्णालयांची यादी तयार करण्यात आली. दि.७/३/२०१४ रोजीच्या स्थितीनुसार राज्यात एकूण ४०८ धर्मादाय रुग्णालये या योजनेअंतर्गत येत होती.

माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१६ मध्ये घेतलेल्या आढाव्यानुसार आजमितीस राज्यातील एकूण ४२४ धर्मादायरुग्णालये/धर्मादाय वैद्यकीय केंद्र योजनेअंतर्गत येत असल्याचे आढळते. माहे जानेवारी २०१७ मध्ये सदर संख्या ४३० झालेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**२.१२ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अत्यंत महत्वाचे असून योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अत्यंत आवश्यक व प्राथमिक बाबींशी निगडीत आहे. यात राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांचा शोध घेण्यासाठी यंत्रणेचा अभाव असल्याचे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. त्यामुळे जे राज्य अनुदानित सार्वजनिक न्यास धर्मादाय रुग्णालय चालवित होते त्यांचा योजनेंतर्गत समावेश करण्यासाठी शोध घेण्याची यंत्रणा भक्कम नव्हती. अत: सदर धर्मादाय रुग्णालयांच्या यादीत, योजनेतील व्याख्येनुसार, राज्यातील सर्वच धर्मादाय रुग्णालयांचा समावेश होण्याच्या दृष्टीने, सर्व संबंधित स्थानिक पर्यवेक्षण प्राधिकाऱ्यांना त्यांचेकडे नोंदणी करण्यात येणाऱ्या धर्मादाय रुग्णालयांची/धर्मादाय वैद्यकीय केंद्रांची यादी, धर्मादाय आयुक्तालयाच्या संबंधीत जिल्हा कार्यालयांकडे पाठविण्यात यावी.शासनाने धर्मादाय रुग्णालये चालविण्याऱ्या राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांचा शोध घ्यावा आणि त्यांना एमपीटी अधिनियम,१९५० च्या कलम ४१ अअ च्या कक्षेत आणावे जेणेकरुन गरीब रुग्णांना मोठ्या संख्येत त्याचा लाभ प्राप्त होईल व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची अद्ययावत माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.३.१.२.४ "अत्यंत गरीब रुग्णांसाठीचा निधी"**

**परिच्छेद क्र.३.१.२.५ "अत्यंत गरीब रुग्णांसाठीच्या निधीमध्ये कमी रक्कम जमा करणे"**

**अभिप्राय**

२.१३ योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार(परिच्छेद ४) प्रत्येक सार्वजनिक धर्मादाय रुग्णालयाने अत्यंत गरीब रुग्णांसाठीचा निधी (IPF) या नावाचा एक स्वतंत्र निधी निर्माण करावा आणि नियमीत शुल्क भरणाऱ्या रुग्णांच्या एकूण शुल्काच्या दोन टक्के रक्कम यामध्ये जमा करावी. तसेच, योजनेच्या परिच्छेद ११ नुसार जास्तीत जास्त संख्येत अत्यंत गरीब आणि दुर्बल गटातील रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यासाठी IPF खात्यातील उपलब्ध रक्कमेचा वापर करणे सदरहू योजनेअंतर्गत अभिप्रेत व बंधनकारक आहे. परंतु बेथनी रुग्णालय, ठाणे या रुग्णालयाच्या वर्ष २०१२-१५ या कालावधीतील वार्षिक लेखांच्या तपासणीत रुग्णालयाने IPF मध्ये रु.१.४३ कोटी रक्कम कमी जमा केली आहे. तसेचनियमीत रुग्णांच्या बिलांमध्ये डॉक्टरांच्या शुल्कापोटी आकारल्या जाणाऱ्या एकूण रक्कमेपैकी १५ टक्के हिस्सा बिच कँडी रुग्णालय, मुंबई यांनी स्वत:साठी राखून ठेवला होता आणि उर्वरीत ८५ टक्के रक्कमेचे डॉक्टरांच्या हिश्श्यापोटी प्रदान केले होते. परंतु, एकूण १०० टक्के बिल रकमेऐवजी रुग्णालयाने त्यांच्या हिश्श्याच्या (१५ टक्के) फक्त दोन टक्के रक्कम IPF खात्यात जमा केली होती. परिणामी, २०१४-१५ दरम्यान IPF खात्यात रु.३.४७ कोटी कमी जमा करण्यात आले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. अशापध्दतीने IPF फंडचे नियमन सदोषरितया होत होते.

**शिफारस**

**२.१४ महालेखाकारांनी उपरोक्त दोन्ही परिच्छेदात नमूद केलेले आक्षेप अत्यंत गंभीर असून अत्यंत गरीब रुग्णांसाठीच्या निधीमध्ये कमी रक्कम जमा केल्यासंदर्भातील आहेत. मा.उच्च न्यायालयाने यासंदर्भात केलेल्या योजननेनुसार MPT ॲक्टअंतर्गत राखीव ठेवलेल्या खाटांवरील रुग्णांवर औषधोपचाराचा**

**खर्च करणेसाठी रुग्णालयांनी २ टक्के निधी "अत्यंत गरीब रुग्णांसाठीचा निधी" (IPF) या शिर्षाखाली स्वतंत्र निधी ठेवणे बंधनकारक आहे. परंतु महालेखाकारांनी नमुन्यादाखल केलेल्या लेखापरिक्षणात बेथनी रुग्णालय, ठाणे व ब्रीच कॅन्डी रुग्णालय, मुंबई यांनी यात कमी निधी जमा केल्याबाबत सदरहू आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. सदरहू आक्षेप नोंदविल्यानंतर बेथनी रुग्णालय, ठाणे यांनी रु.१.३५ कोटी त्यांचे निर्धन रुग्णांच्या निधीत जमा केले आहेत. तसेच ब्रीच कॅन्डी रुग्णालयासंदर्भात मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल असून मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रु.५,३७,६०,४५०/- आयपीएफ फंडमध्ये जमा करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. महालेखाकारांनी नमुन्यादाखल केवळ दोन रुग्णालयांची तपासणी केली असता या अनियमितता निदर्शनास आल्या आहेत. वास्तविकत: राज्यात एमपीटी अधिनियमाखाली नोंदणीकृत सर्वच धर्मादाय रुग्णालयांनी अशाप्रकारे आयपीएफ फंडमध्ये रक्कम जमा करतेवेळी गैरप्रकार वा अनियमितता निश्चितच असू शकते.त्यामुळे या तरतूदीची प्रभावी अंमलबजावणी होत नाही व गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना याचा लाभ मिळण्यास अनेक अडचणी निर्माण होतात. राज्यात जवळजवळ ४३० धर्मादाय रुग्णालये सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. काही रुग्णालये याची अंमलबजावणी प्रामाणिकपणे करतात परंतु काही रुग्णालये अधिकचे देयक दाखवितात अथवा फंड संपलेला असल्याची कारणे समोर करतात. परिणामी अत्यंत गरीब रुग्णांसाठीच्या निधीचे रुग्णालयाकडून केले जाणारे व्यवस्थापन अपर्याप्त होते. निधीमध्ये कमी जमा आणि अतिरिक्त खर्च झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत.धर्मादाय निरीक्षकांमार्फत अशा सर्वच रुग्णालयांची ६ महिन्यात सखोल चौकशी करण्याबाबत समितीसमोर आश्वासित करण्यात आले.सदरहू आक्षेपाच्या माध्यमातून समितीला आश्वासित केल्याप्रमाणे या सर्वच रुग्णालयांची तपासणी नियमितरित्या करण्यात यावी.त्याअनुषंगाने राज्यातील सर्वच धर्मादाय रुग्णालयांची तपासणी करुन आयपीएफ फंड नियमानुसार जमा झाल्याची धर्मादाय आयुक्तांनी खात्री करावी व फंड जमा न झाल्यास ती रक्कम जमा करुन घेण्यात यावी. तसेच या आयपीएफ फंडमधून झालेल्या खर्चाचा तपशील व रुग्णांना देण्यात आलेल्या वैद्यकीय सेवा व सुविधा संदर्भातील माहिती प्रत्येक महिन्यालारुग्णालयांच्या वेबसाईटवर व शासनाच्या पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध करण्यात यावी व वेबसाईटवर अपलोड व अद्ययावत करण्यात यावी. त्याचप्रमाणे ही माहिती धर्मादाय आयुक्तांना सादर करणे बंधनकारक करण्यात यावे व अशा रुग्णालयांनी या फंडमधून केलेला खर्च हा योग्य व पात्र रुग्णांना मिळाला आहे किंवा कसे, तसेच केलेला खर्च वाजवी आहे किंवा कसे याची नियमितरित्या तपासणी, देखरेख व संनियंत्रण समितीच्या (Monitoring Committee) माध्यमातून करावी व या योजनेची अंमलबजावणी सर्वच धर्मादाय रुग्णालयांकडून प्रभावीपणे करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.३.१.२.६ " अत्यंत गरीब रुग्णांसाठी असलेल्या निधीमध्ये दाखवलेला अतिरिक्त खर्च "**

**अभिप्राय**

२.१५ योजनेच्या परिच्छेद ८ नुसार धर्मादाय रुग्णालयांनी अत्यंत गरीब रुग्णांना त्याचप्रमाणे दुर्बल गटातील रुग्णांना काही शुल्क विरहीत सेवा मोफत पुरवाव्या. तसेच योजनेच्या मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद १० नुसार दुर्बल गटातील रुग्णांविषयीच्या सशुल्क सेवांचे देयक तयार करावे आणि दुर्बल गटातील रुग्णांनी अदा केलेली रक्कम वजा करुन त्यानंतर उर्वरित रक्कम आयपीएफ खात्यात खर्ची दाखवावी. परंतु निवडक ११ रुग्णालयांपैकी दोन रुग्णालयांमधील २०१२-१५ या वर्षीच्या देयकांची तपासणी केली असताआयपीएफ खात्यात रु.२.७५ लाख अतिरिक्त खर्ची दाखविण्यात आले होते. परंतु त्यात खाटा व इतर नियमित तपासण्या यासारख्या शुल्कविरहीत सेवांचा समावेश करण्यात आल्यामुळे सुश्रुत रुग्णालय आणि संशोधन केंद्र, मुंबई यांनी ३६ देयकांपैकी ५ देयकांमध्ये क्ष्क्रमध्ये रु.८७,४१८/- अतिरिक्त खर्ची दर्शविले. तसेच पी.डी.हिंदुजा रुग्णालय, मुंबई यांनी ४३ देयकांपैकी ४ देयकांमध्ये ४दुर्बल गटांतील रुग्णांकडून रु. ११.०६ लाख रक्कम आकारली होती. परंतु क्ष्क्रखात्यात ती खर्ची दाखविताना रुग्णालयाने या ४ रुग्णांना जीवनदायी योजनेअंतर्गत संचालक, आरोग्य सेवा यांच्याकडून प्राप्त झालेले आर्थिक साहाय्य (धनादेश) तसेच रुग्णांनी स्वत:च्या उपचाराकरिता केलेला रु. ७.४२ लाख खर्च विचारात घेतला नव्हता. परिणामी रुग्णालयाने रु. ३.६४ लाख ऐवजी IPF खात्यात रु. ५.५२ लाख खर्ची दाखविले. ज्यामुळे रु. १.८८ लाख अतिरिक्त खर्च दर्शविला गेला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.सुश्रुत हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर या रुग्णालयाने उपरोक्त५ देयकांपैकी दोन लाभार्थी रुग्णांच्या देयकामधून अनुक्रमे रु.१७,२३५/- व रु.६,१८५/- इतकी आय.पी.एफ. मधून जास्त खर्च केलेली रक्कम जानेवारी २०१६ च्या मासिक विवरणपत्रानुसार आय.पी.एफ मध्ये वर्ग केल्याचे समितीस सांगण्यात आले.

तसेच सदर रुग्णालयाने उर्वरीत ३ लाभार्थी रुग्णांच्या देयकातून आय.सी.यू.बेड चार्जेसची रक्कम अनुक्रमे रु.४२,०००/- , रु.२९००/-, रु.१६,५२२/-आय.पी.एफ.मध्ये वर्ग केलेली नाही. याबाबत सहाय्यक धर्मादाय आयुक्त (रुग्णालय), बृहन्मुंबई सदर रुग्णालयास, उपरोक्त रक्कम आय.पी.एफ मध्ये वर्ग करण्याचे तसेच लाभार्थी रुग्णांच्या देयकात आकारलेली आय.सी.यू.बेड चार्जेस ची रक्कम (मॉनिटर व ऑक्सिजन चार्जेस सोडून) माहे सप्टेंबर, २००६ ते माहे सप्टेंबर २०१५ पर्यंत परिगणित करुन आय.पी.एफ. मध्ये वर्ग करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सुश्रुत हॉस्पिटल व रिसर्च सेंटर यांनी निर्धन रुग्णांसाठी रु. ७, १२,५७५/- व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी रु. २, ३२,२६५/- अशाप्रकारे रु. ९, ४४,८४०/- इतकी रक्कम निर्धन रुग्ण निधीत जमा केली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले

**त्याचप्रमाणेपी.डी.हिंदुजा** रुग्णालयाने४ दुर्बल घटकातील रुग्णांचे देयकानुसार अनुक्रमे रु. ७६,३२३/- रु. ८१,०२०/-, रु. १४,७५४/- रु. ८,६६०/- एकूण रक्कम रु. १,८०,७५७/- IPF मधून जास्त खर्च केलेली आहे. याबाबत सहायक धर्मादाय आयुक्त (रुग्णालय) बृहन्मुंबई यांनी सदर रुग्णालयास रक्कम रु. १,८०,७५७/- IPF मध्ये वर्ग करण्याचे आदेश दिले असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. सदरहू विषयावरील साक्षीदरम्यान या रुग्णालयांनी सर्व रक्कम भरल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**२.१६ महालेखाकारांनी धर्मादाय रुग्णालयांच्या केलेल्या तपासणीमध्ये काही रुग्णालयांनी अत्यंत गरीब रुग्णांसाठीच्या निधीमध्ये दाखविलेला अतिरिक्त खर्चयासंदर्भात गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत. योजनेच्या अटी व शर्तीनुसार या रुग्णालयांनी काही शुल्क विरहीत सेवा मोफत पुरविणे बंधनकारक आहे तसेच दुर्बल गटातील रुग्णांनी अदा केलेली रक्कम वजा करुन त्यानंतर उर्वरित रक्कम IPF खात्यात खर्ची दाखविणे आवश्यक असतानाही रुग्णालयांमार्फत क्ष्ध्रकखात्यात मोठया प्रमाणात रक्कम अतिरिक्त खर्ची दाखविण्यात आली ही बाब गंभीर असून एकप्रकारे शासनाची व गरीब रुग्णांची फसवणूकच आहे. महालेखाकारांनी नमुन्यादाखल केवळ ११ निवडक रुग्णालयांची तपासणी केली असता त्यापैकी सुश्रृत रुग्णालय आणि संशोधन केंद्र, मुंबईव पी.डी.हिंदुजा रुग्णालय, मुंबई या दोन रुग्णालयांनी आयपीएफ फंडमध्ये अतिरिक्त खर्च दाखविल्याचे दिसून आले.सदरहू आक्षेप नोंदविल्यानंतर त्यातील काही रक्कम क्ष्ध्रक खात्यात भरण्यात आली. तसेच केवळ नमुन्यादाखल केलेल्या तपासणीमध्ये दोन रुग्णालयांमध्ये असे प्रकार महालेखाकारांच्या निदर्शनास आले परंतु या बाबी राज्यात अन्यही अनेक रुग्णालयांमध्ये निश्चितच होतात.इतकेच नव्हेतर IPF निधीमधून दर्शविण्यात आलेला खर्च हा अतिरिक्तरित्या देखील दर्शविल्याचे दिसून येते. परिणामी हा निधी कमी दर्शविण्यात येतो व या निधीमधून उपचार मिळणाऱ्या रुग्णांची संख्या कमी होते. महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर सुश्रृत रुग्णालयामधील अशाप्रकारे अतिरिक्त खर्च दर्शविलेली रु.९,४४,८४०/- इतकी रक्कम निर्धन रुग्ण निधीत जमा करण्यात आली आहे. तसेच पी.डी.हिंदुजा रुग्णालयातील रु.१,८०,७५७/- इतकी रक्कम आयपीएफ फंडमध्ये वर्ग करण्याचे आदेश धर्मादाय आयुक्तांनी या रुग्णालयांना दिल्यानंतर रक्कम जमा करण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालयाने तयार केलेल्या योजनेमध्ये या रुग्णालयांनी पुरवावयाच्या शुल्क विरहीत सेवा मोफत पुरविण्याबाबत तसेच सशुल्क सेवांचे देयक तयार करताना दुर्बल घटकांनी अदा केलेली रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम IPF फंडमध्ये खर्ची दाखवावी अशी स्पष्ट तरतूद असतना त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. अनेकदा या मोठमोठ्या रुग्णालयांमध्ये येणाऱ्या या गरीब रुग्णांना या तांत्रिक बाबी वा कार्यपध्दतीचे ज्ञान नसल्यामुळे रुग्णालयांमार्फत या निधीचा गैरवापर होतो. तसेच जास्तीत जास्त खर्च दाखवून हा निधी लवकरात लवकर संपल्याचे दाखविण्याचा अनेक रुग्णालयांचा प्रयत्न असतो. याबाबींवर देखरेख व संनियंत्रण समितीचे (Monitoring Committee) पुर्ण नियंत्रण राहिले नाही तर या बाबींवर आळा बसणार नाही. अतः धर्मादाय आयुक्त कार्यालयाने यासाठी अशा बाबींची व आक्षेपांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सक्षम व प्रभावी यंत्रणा उभी करावी व आयपीएफ फंडामधून खर्च होणारी रक्कम ही योजनेनुसार व नियमानुसार पात्र गरीब व दुर्बल गटातील रुग्णांसाठी होत असल्याची खात्री धर्मादाय आयुक्तांनी व संनियंत्रण समितीने करावी. या फंडमधील खर्चाचा तपशील वेबसाईटवर ऑनलाईन तपासणीसाठी खुला करण्यात यावा व कोणत्याही परिस्थितीत या निधीचा अपव्यय होत नसल्याची तपासणी करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.३.१.२.७ रुग्णांवर अनावश्यक आर्थिक भार**

**अभिप्राय**

**२.१७** योजनेच्या परिच्छेद १० नुसार, रुग्णालयांनी ज्या किंमतीत औषधे, उपभोग्य वस्तु आणि रोपणे खरेदी केली असतील त्याच किंमतीत त्या वस्तु रुग्णांकडून आकारल्या जाव्यात. परंतु, दुर्बल गटातील रुग्णांनी औषधे, उपभोग्य वस्तु आणि रोपणे यांच्या देयकाच्या किमान ५० टक्के रक्कम प्रदान करावी. तसेचयोजनेच्या परिच्छेद ९ नुसार, अत्यंत गरीब रुग्णांना दाखल करुन घेतांना धर्मादाय रुग्णालयांनी कोणत्याही अनामत रक्कमेची मागणी करु नये. असे असतानाही सन २०१२-१५ या कालावधीत पी. डी. हिंदुजा रुग्णालय, मुंबई यांच्या सहा देयकांची आणि बेथनी रुग्णालय, ठाणे यांच्या ५५ देयकांची तपासणी केली असता दुर्बल गटातील रुग्णांकडून फक्त औषधे, उपभोग्य वस्तू आणि रोपणे यांची किंमत प्राप्त करण्याऐवजी त्यांच्याकडून बधिरीकरण शुल्क, ICU शुल्क, डॉक्टरांचे शुल्क, इमेर्जिंग शुल्क, तपासणी शुल्क, शस्त्रक्रिया दालन शुल्क आणि शस्त्रक्रिया शुल्क यापोटी ५०% शुल्क आकारण्यात आले होते. परिणामी, या दोन रुग्णालयातील ६१ देयकांमध्ये दुर्बल गटातील रुग्णांवर रु. ३८.०३ लाख इतका अनावश्यक आर्थिक भार पडला.पुढे सन २०१२-२०१५ या कालावधीशी संबंधित १३९ देयकांच्या तपासणीत उपरोक्त ३ रुग्णालयांनी योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करून अत्यंत गरीब ९ रुग्णांकडून रु. १.७४ लाख इतकी अनामत रक्कम प्राप्त केली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

हिंदुजा रुग्णालयाने सदर आक्षेपांच्या अनुषंगाने दिलेल्या लेखी खुलाशात लेखापरीक्षण अहवालात देयकांचा तपशील दिलेला नसल्याने यावर भाष्य करीत नसल्याचे नमूद केले आहे. तथापि, धर्मादाय कार्यालयाने हिंदुजा रुग्णालयातील काही दुर्बल घटकातील रुग्णांची देयके तपासली असता रुग्णालयाने सदर देयकात Bed charges, Anesthesiology charges, ECG charges, Doctors Fess, Imaging charges, X-ray, Chest P.A., CBC, Creatinine, ABO and RH यावर शुल्क आकारणी केलेली नाही. तसेच Bislery water यावर आकारलेले खर्च IPF मधून खर्ची टाकलेले नाही. तसेच, Bed charges या शीर्षाखाली direct consumables (ICU/ICCU/PICU) Intensive care charges यावर शुल्क आकारणी केलेली नाही. तसेच X-ray portable, operation theatre charges, Surgery charges यावरील शुल्क आकारणी IPF मधून खर्ची टाकलेले आहे, असे कळविण्यात आले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेतील खंड क्र. ९ व १० नुसार जर डॉक्टरांनी त्यांच्या मेहनतान्यात सूट दिली असेल तर असा मेहेनताना अंतिम देयकांमध्ये (बिल) समाविष्ट करू नये. तसेच खंड क्र. ८ नुसार एकूण ९ सेवा नादेय आहेत, त्याव्यतिरिक्त इतर सर्व सेवा ह्या देय सेवा आहेत. त्यानुसार, सहायक धर्मादाय आयुक्त (रुग्णालय), बृहन्मुंबई यांनी त्यांचे दि. २४/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर रुग्णालयास दुर्बल घटकातील रुग्णांच्या देयकांची परिगणना योजनेतील तरतुदींनुसार करण्यात यावी, असे आदेश दिले आहेत.

बेथनी रुग्णालय,ठाणे या रुग्णालयाने माहे नोव्हेंबर,२०१३ ते ऑगस्ट,२०१५ या कालावधीतील ICU/NICU/HDU बेड चार्जेस व नर्सिंग केअर यावरील IPF मधून खर्च केलेली रक्कम परिगणित करून नोव्हेंबर,२०१३ च्या आधी व ऑगस्ट,२०१५ च्या नंतर सदर रक्कम क्ष्क्रमधून खर्च केलेली नाही. त्याचप्रमाणे, सदर रुग्णालयाने औषधे, उपभोग्य वस्तू आणि रोपणे यांच्या खरेदी किंमत व MRP यातील फरकाची सन २०१२ ते २०१५ या कालावधीतील एकूण रक्कम रु. ६, २०,७४४/- व सन २०१० ते २०१२ या कालावधीतील एकूण रक्कम रु. ३, ०९,०३१/-. तसेच, सप्टेंबर २००६ ते माहे मार्च २०१० पर्यंत एकूण रक्कम रु. ५ लाख IPF मध्ये वर्ग केल्याचे सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे यांनी कळविले आहे. तसेच, सदर रुग्णालयाच्या सॉफ्टवेअरमध्ये बदल झाल्यामुळे सदर रुग्णालय Subsequent Routine Diagnosing ची रक्कम निर्धन रुग्णांच्या निधीत जमा करु शकले नाही. यासंदर्भात सदर मुद्दा ठाणे जिल्ह्याच्या देखरेख समितीसमोर ठेवणेबाबत तसेच पी. डी. हिंदुजा रुग्णालयाबाबत, सदर रुग्णालयाने निर्धन रुग्णांकडून अनामत रक्कम घेतल्याबाबत सदर रुग्णालयाचा खुलासा घेण्यात यावा, तसेच सैफी रुग्णालयाने निर्धन रुग्णांकडून स्वीकारलेली अनामत रक्कम सदर रुग्णांना परत केली आहे. तसेच (IP No. ५६२६६३३, ५६२६६५७, ५६२६६९३ व ५६२६९११) या रुग्णांची देयके तपासली असता सदर रुग्ण योजनाबाह्य (सर्वसाधारण) असल्याचे निदर्शनास आले. तथापि, सदर आपत्कालीन ( Emergency ) रुग्णांकडून रुग्णालयाने अनामत रक्कम घेतली असल्यानेयोजनेतील खंड क्र. ३ नुसार आपत्कालीन रुग्णांकडून अनामत रक्कम घेण्यात येऊ नये, अशा प्रकारचे निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणेसुश्रुत हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर या रुग्णालयाने आपत्कालीन रुग्णांकडून स्वीकारलेली अनामत रक्कम सदर रुग्णांना परत केली असल्याचेविभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

**शिफारस**

**२.१८ सदरहू परिच्छेदाअंतर्गत महालेखाकारांनी रुग्णांवर अनावश्यक आर्थिक भारयासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून नमुन्यादाखल केलेल्या रुग्णालयांच्या तपासणीत पी.डी.हिंदुजा रुग्णालय,मुंबई व बेथनी रुग्णालय,ठाणे, सैफी रुग्णालय, मुंबईतसेच सुश्रुत रुग्णालय आणि संशोधन केंद्र यांचेसदंर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. यासंदर्भात धर्मादाय कार्यालयाने सदर रुग्णालयातील काही दुर्बल घटकातील रुग्णांची देयके तपासली असता या देयकात अनेक महत्वाच्या शुल्कांची आकारणी सदोषरित्या केली असल्याचे दिसून आले.अनेक ठिकाणी अवाजवी व जादा रकमेचीदेयके तयार करण्यात आली. योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करुन रुग्णालयांनी अत्यंत गरीब रुग्णांकडून नियमबाह्यरित्या अनामत रक्कम प्राप्त केली आणि रुग्णांकडून अतिरिक्त शुल्क प्राप्त केल्याची काही प्रकरणे आढळून आली. तसेच या क्ष्क्र अंतर्गत ज्या बाबींसाठी आकारणी करणे अभिप्रेत नव्हते त्याही बाबींसाठीचा खर्च दर्शविण्यात आल्यामुळे आयपीएफ फंड कमी झाला जो अन्य रुग्णांसाठी वापरता येणे शक्य होते.परिणामी वैद्यकीय देयकांची परिगणना योजनेतील तरतूदीनुसार झाल्याचे दिसून येत नाही. गरीब व दुर्बल गटातील रुग्ण दाखल होताना त्यांचेकडून अनामत रक्कम न घेण्याबाबत बंधनकारक असतानाही अशी अनामत रक्कम घेण्यात आल्याचे अनेक प्रकरणी दिसून येते. रुग्ण रुग्णालयामध्ये दाखल होतो त्यावेळी तो दुर्बल वा गरीब गटातील असल्याचे सांगत नसल्यामुळे अशाप्रकारे अनामत रक्कम घेतली जाते. परंतु निदर्शनास आल्यानंतर ती परत करण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींकडून समितीसमोर सांगण्यात आले. परंतु ही बाब निश्चितच समर्थनीय नाही.एकदा अनामत रक्कम रुग्णालयात भरली तर ती सहजासहजी परत मिळत नाही अथवा रुग्णांना ती रुग्णालयांकडून परत मिळविणे खुपच अवघड आहे. रुग्णालये ही रक्कम स्वत:हून गरीब व दुर्बल गटातील रुग्णांना परत करण्याची शक्यता तर कमीच आहे. मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी तयार केलेल्या योजनेची अंमलबजावणी करताना गरीब व निर्धन रुग्णासाठी तयार केलेल्या आयपीएफ फंडमधून होणाऱ्या खर्चाचा संपुर्ण लाभ हा पात्र गरीब व निर्धन रुग्णांना योग्यरित्या मिळणे व कोणत्याही परिस्थितीत या निधीचा अपव्यय अथवा अनियमितता होवू नये याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही या धर्मादाय रुग्णालयांची असून त्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवण्याचे काम धर्मादाय आयुक्तांकडून होत असते. तरीही या योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी व दोष मोठ्या प्रमाणात असल्याचे महालेखाकारांच्या या आक्षेपावरुन निश्चितच दिसून येते. सदोष देयके बनवून या रकमा क्ष्क्र फंडमध्ये खर्ची दाखविणे व निदर्शनास आल्यावर रक्कम पुन्हा क्ष्क्रमध्ये जमा करणे या रुग्णालयांच्या कार्यपध्दतीवर देखील शासनाने आळा घालण्याची आवश्यकता आहे. रुग्णालयांनी निधी क्ष्क्रमध्ये पुन्हा जमा केल्यानंतर विभाग त्यांचेवर कोणतीही कारवाई करीत नाही. त्यामुळे अशा प्रकरणांची पुनरावृत्ती होतच राहाते. महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर हा निधी पुन्हा आयपीएफ फंडमध्ये जमा करण्यात आला. परंतु अन्य रुग्णालयांमध्ये देखील अशाच बाबी निश्चितच घडतात. त्याची देखील तपासणी करण्यात यावी. विभागाने या रुग्णालयांना केवळ निधी जमा केल्यामुळे न सोडता त्यांचेवर कारवाई देखील करण्यात यावी वअशा आक्षेपांची पुनरावृत्ती विभागाने भविष्यात टाळावी व योजनेची अंमलबजावणी गरीब व निर्धन रुग्णांच्या जास्तीत जास्त हिताची करण्यात यावी व याचा नियमित मासिक आढावा धर्मादाय आयुक्तांनी घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र.३.१.२.८ "योजनेविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकाराचा अभाव"**

**अभिप्राय**

**२.१९** एका सार्वजनिक हिताच्या याचिकेवरील सुनावणी दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना इलेक्ट्रॉनिक आणि छापील माध्यमाद्वारे योजनेस मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देण्याचे निर्देश दिले (मार्च २००८), जेणेकरुन योजनेखाली उपलब्ध असलेल्या सुविधांपर्यंत निर्धारित लाभार्थी पोहचू शकतील. उच्च न्यायालयाने असेही निर्देश दिले की, ग्राम पंचायतीच्या जाळयाद्वारे अगदी गाव पातळीवरील नागरीकांपर्यंत योजनेविषयी माहिती पोहचविण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जावी.

परंतु धर्मादाय आयुक्तांच्या मुंबई येथील कार्यालयात योजनेविषयी विस्तृत माहिती देण्यासाठी प्रतिसादाची सोय असणारे एक टोल फ्री दूरध्वनी यंत्र बसविण्यात आले होते. परंतु या टोल फ्री हेल्प लाईनला मोठया प्रमाणात प्रसिध्दीही देण्यात आली नव्हती किंवा धर्मादाय आयुक्तांच्या संकेतस्थळावर हा हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला नव्हता. जनतेला ग्रामपंचायतींच्या जाळयांद्वारे या योजनेविषयी माहिती पोहचविण्यासाठी धर्मादाय आयुक्तांकडून कोणतीही कार्यवाही केली गेली नसल्याचेआक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

समितीने यासंदर्भात विचारणा केली असता मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेली योजना ही जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याकरीता धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून कागदी फलक (Posters) सर्व जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणी लावण्याकरीता तसेच सदर फलक सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व रुग्णालयांमध्ये लावण्याकरीता निर्देशित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. तसेच धर्मादाय आयुक्तालयाच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाअंतर्गत धर्मादाय आयुक्त संकेतस्थळावरील हॉस्पीटल मॉड्यूल गो-लाईव्ह करण्यात आलेले आहे. सदर मॉड्यूलमार्फत, रुग्ण अथवा रुग्णांच्या नातेवाईकास धर्मादाय रुग्णालयांमध्ये अतिगरीब व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी राखीव असलेल्या खाटांबाबतची स्थिती, संपर्क व्यक्तीचे नाव, संपर्क दूरध्वनी क्रमांक अशी अनुषंगिक माहिती सहजपणे उपलब्ध होण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सदर योजनेची माहिती शासकीय / महानगरपालिका इ. रुग्णालयांत येणाऱ्या निर्धन व गरीब रुग्णांना व्हावी, यासाठी पथदर्शी प्रकल्प म्हणून मुंबईतील ५ प्रमुख शासकीय / महानगरपालिका रुग्णालयांत सदर योजनेची व उपलब्ध आरक्षित खाटांची माहिती देणारे स्मार्ट टि.व्ही स्थापित करण्यात आले आहेत.

धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून सदर योजनेची माहिती प्रसार माध्यमांतूनसुध्दा देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. यापुढे देखील तळागाळापर्यंत सर्वसामान्य जनतेस सदर योजनेची माहिती होईल, तसेच कोणत्याही धर्मादाय रुग्णालयांकडून योजनेच्या अंमलबजावणीत कसूर होणार नाही, याकरीता नियमीत निरीक्षण घेण्याबाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून जास्तीत-जास्त प्रयत्न केले जातीलअसे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस**

**२.२० राज्यात शासनाद्वारे ज्या अनुदानित रुग्णालयांची नोंदणी महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियमांतर्गत करण्यात येते त्या धर्मादाय रुग्णालयांनी विहित तरतूदीनुसार व प्रमाणात अत्यंत गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी आंतररुग्ण वा बाह्यरुग्ण म्हणून मोफत वा सवलतीच्या दराने उपचार करणेबंधनकारक असताना सन २००६ पर्यंत याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नव्हती. सन २००६ मध्ये मा.उच्च न्यायालयासमोर दाखल झालेल्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने या प्रकरणी प्रथमतः या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे राज्यात सुरु झाली. याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने यासाठी एक योजना देखील तयार करुन या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यात देखरेख व संनियंत्रण समिती (Monitoring Committee) स्थापन केली. तेव्हापासून या अधिनियमांतर्गत तरतूदींची व मा.उच्च न्यायालयाच्या योजनेची अंमलबजावणी राज्यात खऱ्या अर्थाने सुरु झाली. राज्य शासनाने देखील या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता व या माध्यमातून मोठमोठ्या रुग्णालयांमधून गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांनामोफत वा सवलतीच्या दराने उपलब्ध होणारेवैद्यकीय उपचारलक्षात घेता विधी व न्याय विभागांतर्गत कार्यरत धर्मादाय आयुक्तांच्या माध्यमातून या प्रकरणी अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत विधीमंडळ सभागृहात देखील लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या धर्मादाय रुग्णालयांसंदर्भातील अतिशय महत्वाच्या विषयावर दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची संयुक्त तदर्थ समिती गठीत करुन त्या समितीच्या माध्यमातून निरनिराळ्या रुग्णालयांच्या कामकाजासंदर्भात तपासणी करुन शासनाने या प्रकरणी करावयाच्या परिणामकारक उपाययोजनांबाबत अहवाल सभागृहास सादर करण्यात आला. सदरहू विषयाचे गांभीर्य लक्षात घेता व यासाठी वरिष्ठ स्तरावरुन आवश्यक असणारा नियमित पाठपुरावा लक्षात घेता विधीमंडळात धर्मादाय रुग्णालयांसंदर्भातील नव्याने गठीत तदर्थ समिती मा. राज्यमंत्री, विधी व न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सद्यःस्थितीत कार्यरत आहे. या माध्यमातून गत ७ ते ८ वर्षामध्ये या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये मोठ्या प्रमाणात आमुलाग्र सुधारणा झालेला असून या योजनेची व अधिनियमातील तरतूदींची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे व या रुग्णालयांच्या कामकाजाची पारदर्शकता व त्यावरील प्रभावी नियंत्रणाबाबत मोठ्या प्रमाणात उपाययोजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. परंतु महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने निर्धन व दुर्बल गटाकरिता असलेल्या या महत्वाच्या योजनेविषयी जनजागृती करण्याची यंत्रणा अद्यापही कमकुवत आहे.अतः योजनेविषयीची जनजागृती जनसामान्यात निर्माण करण्याची नितांत आवश्यकता आहे. कित्येक गरीब रुग्णांना या योजनांसंदर्भात माहिती देखील नसून यासाठी अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत हे गरीब रुग्ण व त्यांचे कुटुंबिय अनभिज्ञ आहेत. या योजनेला पुरेशी प्रसिध्दी देण्यासाठी शासनस्तरावरुन अनेक बाबींचा अवलंब करण्यात आलेला असून सर्व रुग्णालयांच्या दर्शनी भागात याबाबतची दर्शनी फलके लावण्यात आलेली आहेत. तरीही या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात रुग्णालयाच्या स्तरावरुन वेळोवेळी पळवाट काढण्यात येते अथवा योजनेची सोईस्करित्या अंमलबजावणी करण्यात येते. तसेच यासाठी तयार केलेल्या आयपीएफ फंडसाठी देखील योग्य ते नियोजन करण्यात येत नाही. या सर्व बाबींवर आळा घालण्यासाठी या योजनेविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी विभागाने पुढाकार घेवून या योजनेला योग्य व व्यापक प्रसिध्दी द्यावी. यासाठी सद्यःस्थितीत उपलब्ध असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा व या रुग्णालयांमधील राखीव खाटांचे व आयपीएफ फंडचा वापर व नियंत्रण हे धर्मादाय आयुक्तांच्या तसेच शासनस्तरावरुन समांतररित्या ठेवण्यात यावे. यासाठी विभागाने एक मॉड्युल तयार केलेले असून त्यामध्ये ही सर्व माहिती उपलहब्ध होवू शकते. परंतु त्याची अद्यापही अनेक कारणास्तव अंमलबजावणी होवू शकली नाही. शासकीय रुग्णालयांमध्ये देखील या खाटांच्या उपलब्धतेची माहिती डिजीटल दर्शनी फलकाद्वारे उपलब्ध करण्याची बाब देखील शासनस्तरावरुन अवलंबिण्यात यावी. तसेच राज्यात कार्यरत असलेल्या धर्मादाय रुग्णालयांची नावे व माहिती देखील यामध्ये उपलब्ध करण्यात यावी. या योजनेची माहिती देण्याविषयी उपलब्ध करण्यात आलेल्या टोल फ्री हेल्पलाईनला पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी.तसेच ग्रामपंचायत स्तरावरुन या**

**योजनेची माहिती देण्याविषयी व योजनेविषयी अधिक जनजागृती करण्यासाठी शासनाने योग्य ती उपाययोजना करुन या योजनेचा योग्य प्रचार व प्रसार करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्र. ३.१.२.९ "रुग्णालयांची तपासणी करण्यात कमतरता"**

**अभिप्राय**

२.२१ सार्वजनिक न्यासांच्या कामकाजात सुधारणा करणे आणि ते प्रभावी व कार्यक्षम होईल याची सुनिश्चिती करणे या उद्देशाने धर्मादाय आयुक्तांनी प्रत्येक जिल्हयातून विभागीय अधिकाऱ्यांना प्रत्येक माहिन्यात किमान दोन ते तीन सार्वजनिक न्यासांची तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. (१९५९) पुढे जुलै १९७२ मध्ये धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात आणि प्रादेशिक कार्यालयात नियुक्त केलेल्या निरिक्षकांना प्रत्येक महिन्यात किमान चार ते पाच सार्वजनिक न्यासांची तपासणी करण्याचे निर्देश धर्मादाय आयुक्तांनी दिले होते. परंतु सप्टेंबर, २००६ मध्ये योजना लागू झाल्यानंतर धर्मादाय आयुक्तांनी तपासण्यांची वारंवारीता आणि तपासण्यांची संख्या या विषयी कोणत्याही सुचना दिल्या नव्हत्या.मुंबईतील ७८ रुग्णालयांच्या २००९-२०१४ दरम्यान केलेल्या तपासणीविषयी धर्मादाय आयुक्तांनी सादर केलेल्या माहितीमधून ५९ टक्क्यांपेक्षा जास्त रुग्णालयांची तपासणी एक वर्षापेक्षा अधिक काळ झाली नव्हती. DCR च्या नियम ३३ (२) (e) अनुसार, संचालक, आरोग्य सेवा, यांना DCR च्या विनियम ३३ (२) मध्ये नमूद केलेल्या अटींचे वैद्यकीय संस्था योग्य प्रकारे पालन करतात किंवा नाही. यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी प्राधिकृत केले होते. परंतु, संचालक, आरोग्य सेवा, यांचेकडून अशाप्रकारे कोणतेही संनियंत्रण केले गेले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस**

**२.२२** महालेखाकारांनी **धर्मादाय रुग्णालयांसंबंधी करावयाच्या तपासणीमध्ये कमतरता असल्याचे गंभीर आक्षेप सदरहू परिच्छेदान्वये नोंदविलेले आहेत.गरीब रुग्णांसाठी अत्यंत प्रभावी ठरणारी अधिनियमातील ही तरतूद व अस्तित्वात असणाऱ्या योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या होत आहे किंवा कसे, यासाठी विभागाची तपासणी यंत्रणा अत्यंत कमकुवत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. राज्य अनुदानित सार्वजनिक न्यासांकडून चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांच्या तपासण्या धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी आवश्यक संख्येत केल्या नव्हत्या. धर्मादाय आयुक्तांनी १ महिन्यात किमान दोन ते तीन सार्वजनिक न्यासांची तपासणी करण्याचे धोरण असताना ही तपासणी दोन दोन वर्षे केली जात नाही. केवळ ज्या रुग्णालयांसंदर्भात तक्रारी प्राप्त होतात त्याच रुग्णालयांना भेट देवून तपासणी करण्याची पध्दत सद्य:स्थितीत अवलंबिण्यात येत आहे. परिणामी ५ वर्षापेक्षा अधिक काळापासून कोणीही तपासणी न केलेली ४ रुग्णालये, १ वर्षापेक्षा कमी कालावधीपासून कोणीही तपासणी न केलेली ३२ रुग्णालये तसेच ३ व २ वर्षे तपासणीच न झालेल्या अनेक रुग्णालयांसंदर्भात सदरहू परिच्छेदात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. परिणामी योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यास निश्चितच अडथळा निर्माण होतो व या रुग्णालयांवर कोणाचेही थेट नियंत्रण राहत नाही. सद्य:स्थितीत केवळ तक्रार प्राप्त झालेल्या या रुग्णालयाकडून कारवाई करण्यात येते. परंतु विभागाने केवळ तक्रारींची दखल घेवून कारवाई करण्याऐवजी सर्वच धर्मादाय रुग्णालयांची नियमित व सरसकट तपासणी करुन या रुग्णालयांवरती शासनाचे प्रभावी नियंत्रण ठेवावे. योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन होणार नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी धर्मादाय रुग्णालयांची नियमित तपासणी करण्यात येवून त्यासाठी धर्मादाय आयुक्त किवा शासनाने आवश्यक कार्यपध्दती निश्चित करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## गृहनिर्माण विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. ३.४ "सहकारी गृहनिर्माण संस्थांना अदेय आर्थिक लाभ"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

| परिच्छेद क्रमांक | विषय | परिच्छेदाबाबत स्पष्टीकरण | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय (Vetting of AG) | महालेखाकार कार्यालयाच्या vetting संदर्भात स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|
| ३.४ | महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास अधिनियम,१९७६ च्या कलम १०३-I(३) मधील तिसऱ्या अनुसूचीमध्ये प्रमाणित केलेल्या मानकानुसार ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना (CHS) MBRRB यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र (NOC) देण्यात आलेले असते त्यांनी जे रहिवाशी MBRRB च्या संक्रमण शिबिरामध्ये राहतात किंवा ज्यांच्या जुन्या उपकरप्राप्त इमारती बांधल्या जाऊ शकत नाहीत अशा रहिवाश्यांना वाटप करण्यासाठी पाच ते ५० टक्के बांधीव क्षेत्र (BUA) प्रत्यार्पित करणे आवश्यक असते.<br><br>ऑक्टोबर २०१२ मध्ये गृहनिर्माण विभाग,महाराष्ट्र शासन यांनी ज्या ३३ CHS नी नवीन इमारती बांधल्या होत्या, परंतु अतिरिक्त बांधीव क्षेत्र (BUA) MBRRB ला प्रत्यार्पित | उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासामध्ये विकासकांकडून मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास देय अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ (सदनिका) जे रहिवाशी MBRRB च्या संक्रमण शिबिरामध्ये राहतात किंवा ज्यांच्या जुन्या उपकरप्राप्त इमारती बांधल्या जाऊ शकत नाहीत, अशा रहिवाशांच्या पुनर्वसनाकरीता वापरण्यात येणार होते. सदर सदनिका विकासकांनी स्वत:च्या ताब्यात ठेवल्या किंवा त्या विकल्या, अशा विकासकांकडून अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मिळवणे व ज्या कालावधीकरीता अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ मिळवणे व ज्या कालावधीकरीता अतिरीक्त बांधकाम | As the decision has been taken to recover the amount, the total amount recovered from the developer's society wise may be included in the reply to PAC. | शासनाच्या सदर निर्णयाच्या अनुषंगाने म्हाडाने संबंधित २९ प्रकरणातील विकासक/मालक यांना दंडाची रक्कम व तसेच त्याच इमारतीमध्ये अथवा त्याच वार्डमधील इतर इमारतीमध्ये सरप्लस क्षेत्रफळ देण्याबाबत सूचना निर्गमित केल्या.<br>सदर २९ प्रकरणामध्ये मार्च २०१८ अखेर वसूल झालेली दंडाची रक्कम व सरप्लस एरियाबाबतची माहिती सोबतच्या तक्त्यात नमूद केली आहे. (प्रत सोबत जोडली आहे)<br>सदर तक्त्यावरून असे दिसून येते की, मंडळास सरप्लस क्षेत्रफळ सुपुर्द करावयाच्या सदर २९ प्रकरणामधील एकूण १०९७९.३२ चौ.मी. सरप्लस एरियापैकी ६४६६.८५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | केले नव्हते. त्यांच्यावर शास्ती आकरण्याचे निर्देश महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) यांना दिले. जेव्हा सरकारी कर्मचारी शासकीय निवासात मुदतबाहय कालावधीसाठी राहतात तेव्हा त्यांच्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयात शास्तीचा जो दर विहीत केला आहे त्याप्रमाणे शास्ती आकारण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार MBRRB ने ३३ पैकी ३० CHS संबंधी जानेवारी १९९२ ते डिसेंबर २०१४ या कालावधीसाठी ११,३१९.२९ चौ.मी. इतके अतिरिक्त (BUA प्रत्यार्पित न केल्याबद्दल रु ३२.६८ कोटी शास्ती परिगणीत केली व त्याप्रमाणे मागणी सूचना जारी केल्या.<br><br>लेखापरिक्षेत असे निदर्शनास आले की, MBRRB ने वापरलेली पध्दत (सरसकट दराने आकारणी करण्याची ) योग्य नव्हती. कारण आकारणी ही महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तीकेच्या परिच्छेद ३८० नुसार सार्वजनिक बांधकाम विभाग मालमत्तांचे (सरकारी व खाजगी दोन्ही) भाडेपटटीमुल्य ठरविण्यासाठी आणि भाडयाच्या वाजवी दरारासबंधीचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी जे | क्षेत्रफळ मिळणे आवश्यक होते त्या कालावधीपासून, ते क्षेत्र म्हाडास प्राप्त होई पर्यंतच्या कालावधीकरीता विकासकास दंडनीय भाडे आकारण्यासंदर्भातील कार्यपध्दती म्हाडा स्तरावर व शासन स्तरावर निश्चित करण्यात आली नव्हती. अशा विकासकांविरुध्द फौजदारी गुन्ह्यांचीही नोंद करण्यात आलेली होती. प्रथमच अशा प्रकारची स्थिती उद्भवल्याने तसेच या सदनिका या भाडेकरू / रहिवाशांच्या पुनर्वसनाकरीता वापरण्यात येणार असल्याने ज्या प्रकारे जे शासकीय कर्मचारी त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर शासकीय निवासस्थान खाली करीत नाहीत, अशा कर्मचाऱ्यांकडून ज्या दराने दंडनीय भाडे आकारण्यात येते, त्याच दराने या विकासकांकडून दंड वसुल करण्याचा निर्णय शासन मान्यतेने घेण्यात आलेला आहे. | | चौ.मी. क्षेत्रफळ वसूल करण्यात आले आहे. तसेच ३५.८५ चौ.मी.या क्षेत्रफळासाठी रेडी रेकनरच्या दराप्रमाणे सुमारे रू. १,०८,४५,३१९/- एवढी रक्कम संबंधित विकासक/मालक यांचेकडून वसुल करण्यात आली आहे. त्याचबरोबर सदर वसुलीसोबतच शासनाच्या निर्देशाप्रमाणे संबंधित विकासक / मालक यांचेकडून रू.९,६०,८२,९१८/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.<br><br>२९ प्रकरणांपैकी ११ प्रकरणातील (तक्त्यातील अनु क्रं. ६,७,११,१२,१८,१९,२०,२२,२५,२६ व २८) विकासक / मालक यांनी सरप्लस क्षेत्रफळ मंडळाकडे सुपुर्द केला आहे व तसेच दंडाची रक्कमही मंडाळाकडे भरणा केली आहे. तक्त्यातील अनु क्रं. २७ येथील विकासक/मालकाने त्याच्याकडील देय सरप्लस क्षेत्रफळ मंडळाकडे सुपुर्द केला असून दंडाची रक्कम मात्र अदा केली नाही. उर्वरित १७ प्रकरणातील विकासक/मालक यांनी त्यांचेकडील देय सरप्लस क्षेत्रफळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सिध्दगणक दर अवलंबितो त्याच्या आधारावर करण्यात आली नव्हती. संस्थांनी प्रत्यार्पित केलेली अतिरिक्त जागा, अशा इमारती ज्या क्षेत्रात आहेत तेथील बाजारभावाने भाडेपटटीवर दिली असल्याच्या शक्यतेमुळे शास्तीचा दर प्रगणित करण्यासाठी सिध्दगणकाचा अवलंब करण्याच्या तर्काला पुढे पुष्टीच मिळाली.<br><br>लेखापरिक्षेच्या अंदाजानुसार २१ CHS नी प्रत्यार्पित केलेल्या अतिरिक्त BUA पोटी जानेवारी २००९ ते डिसेंबर २०१४ त्या त्या वर्षाच्या सिध्दगणकाच्या दराप्रमाणे या कालावधीसाठी रु ३५.९९ कोटी इतकी शास्ती प्रगणित होत होती. परंतु MBRRB ने याचे कालावधीसाठी (जानेवारी २००९ ते डिसेंबर २०१४) वापरलेल्या सरकसट दराच्या पध्दतीप्रमाणे या २१ प्रकरणात रु २३.५७ कोटी इतकी शास्ती परिगणीत होत होती. योगायोगाने या २१ प्रकरणात सिध्दगणक दराप्रमाणे मासिक भाडेपटटी प्रति चौरस फुट रु ३३.७२ (२००९) आणि रु १५७.८१ (२०१४) होती. जी MBRRB च्या पध्दतीनुसार फक्त रु. २५ | | | मंडळाकडे सुपुर्द केला नाही व त्याचबरोबर दंडाची रक्कमही भरलेली नाही.<br><br>त्याचबरोबर उर्वरित ४ प्रकरणातील देय २९२१.२१ चौ.मी. या सरप्लस क्षेत्रफळापैकी ३१६.६९ चौ.मी. एवढे क्षेत्रफळ मंडळाने वसूल केले आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आणि रु. ५० प्रति महिना प्रति चौ.फुट प्रगणित होत होती.<br>अशा प्रकारे अतिरिक्त बांधीव क्षेत्र प्रत्यार्पित न करण्यावर अयोग्य दारने शास्ती आकारल्यामुळे २१ सहकारी गृहनिर्माण संस्थांना रु.१२.४२ कोटी इतका अदेय आर्थिक लाभ झाला. ३५) | | | |

(श्रीनिवास मोकलीकर)
कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग

कक्ष अधिकारी
गृहनिर्माण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

## List of NOC Holder to who has in, ued to pay penalty against surplus area - position updat n March 2018

| Sr. No. | Name of Property | Name of NOC holder | Ward | FILE NO. | Total Surplus area required to be Surrendered (in2) | Part/ Full Surplus area Surrendered (in2) | Monetory compansation received against balance Surplus area | | Total surplus area surrendered | Balance surplus to be Surrendered (in2) | Date of N.O.C. | Surplus Surrendered (Yes or Not/ Surended on | Penalty informed as per Govt.'s letter dated 15 Oct. 2012 | Penalty received from NOC holder | Penalty yet to be received (Balance) | Upto date Penalty according to Govt. letter | FIR loged u/s & date under section I.P.C 405, 406, 415, 417, 420,421, 423 and 424- | Status | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Area | Amount | | | | | | | | | | | |
| 1 | Redevelopment of property at C.S.No.1669 of Mandvi Divn, Bldg No.1 T 3 tan Tan Pura Street ( 2nd Nishanpada X lane), "Parvda Mansion" | Shri Haji Abulkar Haji Moosa | B2 | 1208 | 84.98 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 84.98 | 11.2.2003 | No | 2217372 | | 2217372 | 3223190 | FIR No.169/11 dated 04.08.2011 at Dongri Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount |
| 2 | Redevelopment of property Bearing cons No C.S.No.248 at 31,Dr.Bhadkamkar Marg,Known as "Damwala Building" | M/s. Paras Enterprises | D2 | 165 | 334.25 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 334.25 | 18.04.91 | No | 9638659 | | 9638659 | 13956541 | FIR No.206/11 dated 28.07.2011 at Nagpada Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount |
| 3 | Redevelopment of property bearing CS No 241,242 of Tardeo Divn. Bldg No.22-26B, Shukhap Street, and 263-273-Bellasis Road, Cess No. D-4958(3) & D-4947-48 | The Bulwan Estate Co.op. Hsg. Society, A1, Hashmi 24, Mirchai Street, Agripada, Mumbai- | D2 | 618 | 1797.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 1797.00 | 30.12.93 | No | 48249332 | 77256947 | -29007615 | 71462978 | FIR No 208/11 dated 30.07.2011 at Nagpada Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to M.B.R.R.B. Board The NOC holder has executed agreement for surplus Built up area admeasuring 4265.72m2 with MBRRB duly registered agreement under No BBE-1/4758/2014/ dated 03.06.2014 and supplementary agreement No BBE-1/2156/2015 dated 26.06.2015. **The NOC holder has paid the penalty computed upto dt. 30.06.2017, i.e. Rs. 4,97,31,912/- on 15.02.2013 and Rs.2,75,25,035/- on 15.05.2015 to MBRRB. The balance upto-date penalty amount to be paid to MBRRB is being intimated to the NOC holder.** |
| 4 | Redevelopent of property at C.S.No. 352 of Tardeo Divn., Street No. 30A, 30A, 39-42 & 44-80, Dr D.B. marg, "Haji Kasam Chawl" | Shri I.A.Parekh | D2 | 1236 | 277.07 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 277.07 | 3.5.2003 | No | 6633326 | | 6633326 | 10211612 | FIR No.205/11 dated 28.07.2011 at Nagpada Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. The NOC holder has challanged the surplus area in the Hon. City Civil Court, vide Suit No.999/2011. MBRRB has filed Affidavit before the Court. The matter is still pending. However there is no stay or directions from the Hon. Court for taking further action against the NOC holder. |
| 5 | Redevelopment of C.S.No.618 of Matgaon on Bldg.No.33-33A,Navowadi,Matgaon | Shri Ashok Maratha, CA to owner Kothari House, 5/7, Oak Lane, Fort, Mumbai-23 | E1 | 440 | 62.36 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 62.36 | 21.12.95 | No | 1755295 | | 1755295 | 2510859 | FIR No.160/11 dated 28.07.2011 at Byculla Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |

| Sr. No. | Name of Property | Name of NOC holder | Ward | FILE NO. | Total Surplus area required to be Surrendered (m2) | Part/ Full Surplus area Surrendered (m2) | Monetary compensation received against balance Surplus area | | Total surp/ area surrendered | plance plus to be Surrendered (m2) | Date of N.O.C. | Surplus Surrendered (Yes or No)/ Surrendered on | Penalty informed as per Govt.'s letter dated 15 Oct. 2012 | Penalty received from NOC holder | Penalty yet to be received (Balance) | date ...lty according to Govt. letter | FIR loged u/s & date under section I.P.C 405, 406, 415, 417, 420,421, 423 and 424- | Status | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Area | Amount | | | | | | | | | | | |
| 6 | Redevelopment of C.S.No.89,Margaon Dn.,Cen.No.E.5661, Bldg.No.47,Behrams Hill Road known as "Tawakkal Apartment" | Mohd. Salim Abdul Kayum Kadin | E1 | 558 | 146.13 | 186.13 | 0.00 | 0.00 | 186.13 | -40.00 | 11.3.1994 | Yes | 4779734 | 4141093 | 2638641 | 8109093 | FIR No-157/11 dated 28.07.2011 at Byculla Police Station | FIR lodged | The developer have surrendered the Surplus area admeasuring 186.13m2 to MBRRB on 08.11.2013 as against Surplus BUA 146.13 m2. The total penalty amount required to be paid to MBRRB was ₹1,09,093. However since the NOC holder has surrendered excess surplus area admeasuring 40.00m2 MBRRB the penalty amount was reduced to Rs.4141093/- **The NOC holder has paid the penalty amount Rs.4141093/- to MBRRB on 06.07.2017.** Accordingly it is proposed to informed Economic Offence Wing (Unit-II), Crime Investigation Department |
| 7 | Redevelopment of C.S.No.399 of margaon Dn.,St.No.108-108A & 112,Shah Mohsha Rd. | M/s Sumer & Asso., 201, Commerce House, 140, N.M. Road, Fort, Mumbai-23. | E1 | 117 | 2883.25 | 2475.05 | 0.00 | 0.00 | 2475.05 | 408.20 | 7.4.1994 | Yes (Part) | 92330818 | | 92330818 | 92233017 | FIR No.161/11 dated 28.07.2011 at Byculla Police Station | FIR lodged | The NOC holder has surrendered Surplus Built up area admeasuring 2475.05m2 on 27.08.2013 to MBRRB on another property i.e. C.S.No.381 of Margaon Divn.in same ward. Hence there is a short fall of area admeasuring 408.20m2 yet to be surrendered to M.B.R.R.B. Board. The NOC holder challenged the balance surplus area in the Hon. High Court vide W.P.No.2117 of 2014. The Hon. High Court vide order dated 22.09.2016 directed NOC holder to appear before Chief Office / MBRRB for hearing. The CO/MBRRB has given hearing to the petitioner on 17.10.2016. MBRRB has taken measurement of unsecures surrendered and accordingly Any. has submitted for report before the Hon. High Court. However the NOC holder has again challenged the surplus area before the Hon. High Court and matter is still pending for final order.<br>The NOC holder has also challenged the penalty amount of Rs.92233017/- to be paid to MBRRB in the said W.P. The balance surplus BUA and penalty amount shall be recovered after the final order of Hon. High Court |
| 8 | Redevelopment of C.S.No.134 Margaon Dn. Bldg. No. 7-7A, Behrahm Hill Road, Margaon, Bombay 400 010 | Mohd. Iqbal Ali Mohd., M/s M.I. Enterprises, 23, Kolsa Street, Near Pydhonie, Mumbai-3 | E1 | 153 | 33 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 55.00 | 14.07.95 revised on 14.07.1999 | No | 1731659 | | 1731659 | 2442149 | FIR No.158/11 dated 28.07.2011 at Byculla Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |
| 9 | Redevelopment of property situated C.S.No.392 at Margaon Dn | Shri Anandpara & Others, CA to Trustee Haji Umer Seah Trust 80, Kambekar Street, | E1 | 463 | 137.22 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 137.22 | 9.2.1996 revised on 20.05.1999 | No | 3803353 | | 3803353 | 5575063 | FIR No.162/11 (5933) dated 28.07.2011 at Byculla Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |

| Sr. No. | Name of Property | Name of NOC holder | Ward | FILE NO. | Total Surplus area required to be Surrendered (m2) | Part/ Full Surplus area Surrendered (m2) | Monetary compensation received against balance Surplus area | | Total surp/ area surrendered | alance arplus to be Surrendered (m2) | Date of N.O.C. | Surplus Surrendered (Yes or No)/ Surrended on | Penalty inferred as per Govt.'s letter dated 15 Oct. 2012 | Penalty received from NOC holder | Penalty yet to b received (Balance) | date ality according to Govt. letter | FIR loged u/s & date under section I.P.C 405, 406, 415, 417, 420,421, 423 and 424- | Status | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Area | Amount | | | | | | | | | | | |
| 10 | Redevelopment of property at C.S.No.28(pt) of mazgaon cens no. E (4857(1) Baker Lane, Mazgaon Mumbai. | Shri I.D Parekh , CA to owners the Grand Club of Chembur. Gala No.105, Sant Savta marg, Mustafa Bazar, Mumbai-10. | E1 | 957 | 50.88 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 50.88 | 20.07.98 | No | 835197 | | 835197 | 3492465 | FIR No.156/11 dated 28.07.2011 at Byculla Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |
| 11 | Redevelopment of C.S.No. 381 Mazgaon Dr. Seth Moosha Lane Mazgaon Mumbai 10 | M/s. Arvind Properties Pvt.Ltd. 201, Commerce house, 140, N.M.Rd., Fort, Mumbai-23 | E1 | 991 | 3021.94 | 2667.01 | 0.00 | 0.00 | 2667.01 | 354.93 | 16.08.99 | Yes (Part) vide No.2556 dated 27.08.2013 | 94445176 | | 94445176 | 95604930 | FIR No.159/11 dated 28.07.2011 at Byculla Police Station | FIR lodged | The NOC holder has surrendered Surplus Built up area admeasuring 2667.01m2 to MBRRB. Hence there is a short fall of area admeasuring 354.93m2 yet to be surrendered to M.B.R.& R. Board. The NOC holder challenged the balance surplus area in the Hon. High Court vide W.P.No.335 of 2013. The Hon. High Court vide order dated 07.12.2016 directed MBRRB to appoint Arc. for remeasurement of tenements surrendered to MBRRB. Accordingly Arc. has taken the measurements, however the NOC holder has again challanged the same and matter is still pending for final order.<br>The NOC holder has also challanged the penalty amount of Rs.9,58,04,910/- to be paid to MBRRB in the said W.P. The balance surplus BUA and penalty amount shall be recovered after the final order of Hon. High Court |
| 12 | Redevelopment of Property bearing C.S.No.1609 Byculla Div. Cens No. E-4(07(1)/28 Club back 35 Senior st. (Maratharnandir) Mumbai 8 | M/s Oscar Builder P. Ltd. 2, Sneh White, 18th Road, Khar (W). Mumbai-52 | E2 | 815 | 41.60 | 39.49 | 2.11 | 523353.16 | 41.60 | 0.00 | 12.7.1996 revised on 20.05.1999 | Yes | 1507143 | | 1507143 | 2025284 | FIR No.207/11 (6/9/11) dated 29.07.2011 at Nagpada Police Station | FIR lodged | The NOC holder has surrendred surplus BUA admeasuring 39.49m2 in same ward in another property i.e C.S.No.412, 1/412, 2/412, 3/412, 4/412 & 4A/412 of Mazgaon Division. And for balance area of 2.11m2 NOC holder has paid monetary compensation amounting to Rs.523353/- to MBRRB. Further penalty amount has been waived by COMBRRB vide speaking order dated 12.04.2017 considering the "C" summary report filed by Asst. Police Inspectors /EOW/ Cell-II before the additional Chief Seession, Metropolitan Magistrate Mumbai and Legal opinion of LA/A. |
| 13 | Redevelopment of property Bearing Plot No.78, C.S.No.1883 at Dr.A.Nair Road. | Allied Holding Ltd Aar Castles,78,A. N Rd., Mumbai-11. | E2 | 120 | 59.61 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 59.61 | 6.5.1991 revised on 10.08.2001 | No | 2255365 | | 2255365 | 3025407 | FIR No.156/11 dated 29.07.2011 at Byculla Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |

| Sr. No. | Name of Property | Name of NOC holder | Ward | FILE NO. | Total Surplus area required to be Surrendered (m2) | Part/ Full Surplus area Surrendered (m2) | Monetory compensation received against balance Surplus area | | Total surp/ area surrendered | alance rplus to be Surrendered (m2) | Date of N.O.C. | Surplus Surrendered (Yes or No)/ Surended on | Penalty informed as per Govt.'s letter dated 15 Oct. 2012 | Penalty received from NOC holder | Penalty yet to be received (Balance) | date ity according to Govt. letter | FIR loged u/s & date under section I.P.C 405, 406, 415, 417, 420,421, 423 and 424- | Status | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Area | Amount | | | | | | | | | | | |
| 14 | Redevelopment of F.P.No 38,C.S.No 1647 of Bevzilla Dn ,Agripada Estate situated on Mr Lasfa Melville Rd. | M/s. Mohd. Mustafa & Co., 3, Sarang Street, Mumbai-4 | E2 | 164 | 53.06 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 53.06 | 2.3.1993 revised 24.01.2000 | No | 2110363 | | 2110363 | 2795702 | FIR No.155/11 (61/11) dated 29.07.2011 at Agripada Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |
| 15 | Redevelopment of property Bearing C.S.No.1/2,Naigaon X Lane, Matunga Divn. Known as Mahim Mansion. | Shri C.S.Nadkarni M/s. Sneha Bhalders, 50, Safeer Banglow, Dadasaheb Phalke Rd., Mumbai-14. | FN | 88 | 92.88 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 92.88 | 12.9.1990 | No | 3166924 | | 3166924 | 4366748 | FIR No.277/11 dated 13.06.2011 at Matunga Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |
| 16 | Redevelopment of Property bearing C.S No.16 of Matunga Divn., Building No.14-14A, M.M.G.S. Marg (Naigaon X Lane), Dadar (East) | Shri Vinayak P.Mayekar of M/s.Sunny Const. Co., 1 Saiprasad, M.M.GS Marg, Dadar, Mumbai-14 | FN | 89 | 549.84 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 549.84 | 13.08.92 Revised on 17.01.2003 | No | 12631254 | | 12631254 | 19734087 | FIR No.329/11 dated 29.07.2011 at Matunga Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |
| 17 | Redevelopment of Property bearing C.S.No.120/ Plot No.121 of Dadar-Matunga Estate(South)Mumbai | Shri Uday Dighe, 208, Ambedkar Rd, Matunga | FN | 472 | 73.11 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 73.11 | 19.10.92 | No | 2340324 | | 2340324 | 3284739 | FIR No.326/11 dated 29.07.2011 at Matunga Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. There is dispat between NOC holder and society of tenants /occupants and the society has obtained stay order from the Hon. City Civil Court dated 09.04.2009 in L.C Suit No.4152/2007 restraining NOC holder from creating any third party rights in 8th floor flat proposed to be surrendered to MBRRB. The said order has been challenged by the NOC holder in the Hon. High court vide appeal No.524 of 2009. Panel Advocate appeared on behalf of MHADA and stated that certain surplus BUA is not yet handed over by NOC holder to MBRRB. The Hon. High Court vide order dated 13.08.2009 that MHADA will be at a liberty to move the trial court for such a relief. The matter is still pending before the Hon. Court. |
| 18 | Redevelopment of C.S.No 195/10 of Matunga Divn ,Plot No.247 of Dadar-matunga Estate Telange Road. | Harish Durgi Nishar, C/o Kutch 3, Sarvamangal, 15, College lane, Dadar, Mumbai. | FN | 563 | 64.02 | 67.33 | 0.00 | 0.00 | 67.33 | 0.00 | 30.11.93 | Yes | 2119014 | 1475208 | 643806 | 1475208 | FIR No.331/11 dated 29.07.2011 at Matunga Police Station | FIR lodged | The NOC holder surrender surplus BUA admeasuring 67.33m2 in same ward in another property i.e. Flat No.403 "A" Wing "Heritage Apartment" In Plot No.109E, C.S.No.460E/6 of Sion Divn.The NOC holder has paid penalty amount of Rs.14,23,520/- + 51,688/- = Rs.14,75,208/- **The NOC holder paid the penalty amount of 14,23,520/- to MBRRB on 28.05.2014 and submitted copy of payment receipt No.12430 to MBRRB.** Thereafter this office vide letter dated 22.07.2014 has informed the Sr. Police Inspector/ DD(C)/Unit-2 regarding compliance done by NOC holder and to close the case as per the Government in Housing Department's letter dated 15.10.2012 |

| Sr. No. | Name of Property | Name of NOC holder | Ward | FILE NO. | Total Surplus area required to be Surrendered (m2) | Part/ Full Surplus area Surrendered (m2) | Monetary compensation received against balance Surplus area | | Total surpl area surrendered | dance rplus to be Surrendered (m2) | Date of N.O.C. | Surplus Surrendered (Yes or No)/ Surended on | Penalty informed as per Govt.'s letter dated 15 Oct. 2012 | Penalty received from NOC holder | Penalty yet to be received (Balance) | date ;ly according to Govt. letter | FIR lisged u/s & date under section I.P.C 405, 406, 415, 417, 420,421, 423 and 424 | Status | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Area | Amount | | | | | | | | | | | |
| 19 | Redevelopment of property bearing C.S.No.557/10 of Matunga Div. Plot No. 750 Dadar Matunga (East) cess No. F 6508(12) 4&12Rd. No. 5,6 pandit colony Dadar(E) | Shri B.S.G Kini Ramakant Jadhav,92-B, Dadar Parchim Apt., Dadar (W), Mumbai-28 (M/s Novara Developers Pvt. Ltd.) | FN | 801 | 67.56 | 65.22 | 2.34 | 665760.00 | 65.22 | 0.00 | 6.2.1996 | Yes | 1363519 | 1765206 | -401687 | 1765206 | FIR No.332/11 dated 29.07.2011 at Matunga Police Station | FIR lodged | The NOC holder has surrenderid surplus area admeasuring 65.22m2 in same ward in another property i.e. C.S.No.4, 1/4 & 1/5 of Dadar Matunga Divn, M.M.G.S. Marg, Dadar(E), Mumbai-400 014 to MBRRB. The NOC holder has paid the difference in capitalised value Rs.665760/- to MBRRB. Further **the NOC holder has paid the amount of Rs.16,19,764 + 1,45,442/- = 17,65,206/-** as on April 2015. This office has informed the EOW accordingly. |
| 20 | Redevelopment of property bearing C.S.No.564/10 Matunga Div. Plot No. 745 of Dadar Matunga(E) cess No. F-6809(19), S.Jahanger Vimadlal Rd. Parsis Colony Dadar (E) | Shri R.R. Jadhav, C.A. to Owner Mr. S.G.Kini (HUF), C/o M/s Vilas Avchat &Asso., 3/2 Kalidas Udyog Bhavan, Near Century Bazar, Prabhadevi, Mumbai-25 | FN | 802 | 58 | 54.91 | 3.09 | 2807988.00 | 54.91 | 0.00 | 9.2.1996 | Yes | 1233013 | 2107047 | -874034 | 2107047 | FIR No.333/11 dated 29.07.2011 at Matunga Police Station | FIR lodged | The NOC holder have handed over the Surplus Built up area admeasuring 54.91m2 in same ward in another building i.e. C.S.No.4 1/4 & 1/5 of Matunga Divn. MMGS Marg, Dadar-East, Mumbai 400 014 to MRRRB and for balance area the NOC holder has paid the amount of Rs.2807988/- to MRRRB. Further **the NOC holder has paid the penalty amount of Rs.2107047/- to MBRRB as on April, 2015**. Accordingly this office vide letter dated 04.12.2015 has informed EOW |
| 21 | Redevelopment of property C.S.No.477/10 Matunga Div. Okt le, 75 of Dadar Matunga Estate cess No. F7973(6)/St. No.27 Bhavadgi Rd. Matunga Mumbai | Shri Nalinkumar M.Shah &Ors. C/o Arch. Shri Anil R. Patil, 401, Nilambari off College Lane, Opp. Portuguese Church, Dadar (W), Mumbai-28. | FN | 788 | 76.95 | 0.00 | 0.00 | -- | 0.00 | 76.95 | 12.7.1996 | No | 2480699 | | 2480699 | 3474035 | FIR No.334/11 dated 29.07.2011 at Matunga Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |
| 22 | Redevelopment of property C.S.No.731/10 of Matunga Div.Plot No 550 of Dadar Matunga Estate Jame Jamshed Road Matunga Mumbai "Rajani Villa" "Siddhi Chawl" | Dhanji V. Gohar, C.A. to owners, 214/10, Futani Building, R.A. Kidwai Marg, Wadala | FN | 1152 | 285.34 | 261.47 | 21.87 | 4443950.00 | 261.47 | 0.00 | 5.7.2002 | Yes | 4057419 | 5195773 | -1138354 | 5195773 | FIR No.335/11 dated 29.07.2011 at Matunga Police Station | FIR lodged | The NOC holder has surrendered surplus BUA admeasuring 138.10m2 on 28.02.2014 in same ward in another property i.e. C.S.No.403E/6 of Sion-Matunga Division in to M.B.R.& R. Board and paid monetory compensation amount of Rs.30190/- for balance surplus area 1.60m2. Thereafter as per the Revised NOC with FSI 3.00 the NOC holder has surrendered surplus BUA admeasuring 123.37m2 in same ward in another property i.e. C.S.No.403E/6 of Sion-Matunga Division and for balance area of 8.80m2 NOC holder has paid an amount of Rs.414199/- to MBRRB. **The NOC holder paid penalty amount of Rs.4057419/- + 975732/- +1,62,622/- = Rs.51,95,773/- as on 28.02.2014.** |

| Sr. No. | Name of Property | Name of NOC holder | Ward | FILE NO. | Total Surplus area required to be Surrendered (m2) | Part/ Full Surplus area Surrendered (m2) | Monetory compensation received against balance Surplus area | | Total surp area surrendered | Balance ...rplus to be Surrendered (m2) | Date of N.O.C. | Surplus Surrendered (Yes or No)/ Surended on | Penalty informed as per Govt.'s letter dated 15 Oct. 2012 | Penalty received from NOC holder | Penalty yet to b received (Balance) | o date alty according to Govt. letter | FIR loged u/s & date under section I.P.C 405, 406, 415, 417, 420,421, 423 and 424 | Status | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Area | Amount | | | | | | | | | | | |
| 23 | Redevelopment of property Bearing cons No. F.P.No.542,TPS-III,Mahim on M.M.Chhotani Road, Mahim. | Raj & Co | GN | 101 | 184.5 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 184.50 | 17.07.91 | No | 7338270 | | 7338270 | 9721641 | FIR No 294/11 dated 01.08.2011 at Matunga Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |
| 24 | Redevelopment of property F.P.No.662 TPS III, Mahim dn. Cons No.G 5024(1) 33B,5024(2)/33BB-G 5025/33.35 Wanjewadi Mahim | Shri Mohd Salim Shaikh & Fared Ahmed Khan, CA to Aminaben W/o Gulam Mohiuddin Bhora, C/o. I.A. Parekh, Gala No.109, Sant Savata Marg, Mustafa Bazar, Mumbai-10 | GN | 880 | 59.14 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 59.14 | 15.11.96 | No | 1970216 | 2352164 | -381948 | 2734187 | FIR No.293/11 dated 01.08.2011 at Mahim Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to M.B.R.& R. Board. **The NOC holder has paid the penalty amount of Rs.2352164/- on 01.02.2014 to M.B.R.& R. Board.** The NOC holder has executed and agreement of surplus area admeasuring 59.14m2 with MBRRB duly registered under No BBE-4/7896/2017 dated 05.10.2017. The surplus area tenement to be surrendered to MBRRB on 6th floor is nearing to completion and same shall be taken over by MBRRB after NOC holder surrender the same. |
| 25 | Redevelopment of property at F.P.No. 298 of 299, TPS - III of Mahim , Bldg No. 133, 143D, L.J.Road & 133 A, 135B-C, 143A, 143AC, Gopi Tank Road. Mumbai. "Chhawadi" | M/s. Gayatri Enterprises, C.A. to owners, 202, Umerga Building, 15, L.T. Marg, Mumbai - 3 | GN | 1171 | 232.11 | 215.22 | 0.00 | 0.00 | 215.22 | 16.89 | 4.9.2002 | Yes (Part) | 4183318 | | 4183318 | 7161715 | FIR No.292/11 dated 01.08.2011 Shivaji Park Police Station | FIR lodged | The NOC holder has surrendered surplus Built up area admeasuring 215.22m2 to M.B.R.& R. Board. The NOC holder has not paid penalty amount of Rs.18.79 lakhs to MBRRB and also not paid the monetary compensation amount Rs.19.00 Lakhs towards short fall surplus area even after informing the NOC holder |
| 26 | Redevelopment of property No.1253, Old Prabhadevi, Kolbavarkarwadi bearing cons no., known as Jabbavan & Ram Bhavan. | Smt.Sumitra V.Bhatre Kol hatkar Wadi, F.S.253, Old Prabhadevi Rd., Mumbai-25 | GS | 50 | 19.97 | 16.45 | 3.52 | 225344 | 16.45 | 0.00 | 28.02.92 | Yes | 789480 | 789480 | 0 | 2047452 | FIR No.250/11 dated 29.07.2011 at Dadar Police Station | FIR lodged | The NOC holder has surrendered surplus Built up area admeasuring 16.45m2 to MBRRB and for balance area has paid monetary compensation amounting to Rs.225344/- on 18.05.2012 to M.B.R.& R. Board. **The NOC holder has paid penalty amount of Rs.7,89,480/- to MBRRB on 23.08.2017.** |

| Sr. No. | Name of Property | Name of NOC holder | Ward | FILE NO. | Total Surplus area required to be Surrendered (m2) | Part/ Full Surplus area Surrendered (m2) | Monetory compensation received against balance Surplus area | | Total surplus area surrendered | Balance Surplus to be Surrendered (m2) | Date of N.O.C. | Surplus Surrendered (Yes or No)/ Surended on | Penalty informed as per Govt.'s letter dated 15 Oct. 2012 | Penalty received from NOC holder | Penalty yet to be received (Balance) | Penalty date according to Govt. letter | FIR loged u/s & date under section I.P.C 405, 406, 415, 417, 420,421, 423 and 424 | Status | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Area | Amount | | | | | | | | | | | |
| 27 | Redevelopment of property Bearing F.P.No.1013, TPS-IV,Mahim on Hirve Gurugi Road, Prabhadevi | Director Sanghavi Estate & Const. Pvt. Ltd. 7, Hansam House, Second flr, Hansam Street, Fort, Mumbai-23. | GS | 197 | 69.73 | 66.81 | 2.92 | 2178924 | 58.51 | 8.00 | 15.03.91 | Yes | 2623241 | | 2623241 | 3524013 | FIR No.251/11 dated 29.07.2011 at Dadar Police Station | FIR lodged (revised surplus area done as per MCGM approval and it comes 69.73 instead of 153.34) | The NOC holder has surrendered surplus Built up area admeasuring 58.51m2 to MBRRB and for balance area admeasuring 11.52m2 has paid monetary compensation amounting to Rs.2178924/- to M.B.R.& R. Board under protest. The NOC holder has not paid penalty amount of Rs.10.15Lakhs to MBRRB |
| 28 | Redevelopment of F.P.No.1031 of Mahim Divn., Sayani Road, Prabhadevi. | Sreeon Builders, 19, Tardeo Bridge, Diana Cinema, Tardeo, Mumbai-34 | GS | 443 | 57.96 | 51.76 | 0.00 | 0.00 | 51.76 | 6.20 | 10.1.1991 | Yes (part) | 2134166 | 1000000 | 1134166 | 2882893 | FIR No.252/11 dated 29.07.2011 at DadarPolice Station | FIR lodged | The NOC holder has surrendered surplus Built up area admeasuring 51.67m2 to M.B.R.& R. Board. The NOC holder has not paid monetary compensation of Rs.17.75 Lakhs for shortfall area to M.B.R.& R. Board Further the NOC holder has also not paid balance penalty amount of Rs.29.78 Lakhs to MBRRB. **NOC holder paid penalty amounting to Rs.10,00,000/- on 26.11.2013.** |
| 29 | Redevelopment of property C.S.No. 2139 Lower Parel Divn. 80/82 Irani Chawl Sitaram Jadhav Marg Lower Parel | M/s Siddhivinayak Construction Pvt. Ltd., 3, Sarvamangal, College Lane, Dadar (W), Mumbai-28 | GS | 1058 | 85.86 | 0.00 | 0.00 | 0.00 | 6160.66 | 85.86 | 24.07.03 | No | 2499014 | | 2499014 | 3604153 | FIR No.178/11 dated 29.07.2011 at N.M.Joshi Marg Police Station | FIR lodged | The NOC holder has not surrendered surplus Built up area to MBRRB and also not paid penalty amount. |
| **Total (A)** | | | | | 10979.32 | 6166.85 | 35.848 | 10845319 | 12321.32 | 4779.93 | | | 325221901 | 96082918 | 229138983 | 386818775 | 229138983 | | |

| Sr. No. | Name of Property | Name of NOC holder | Ward | FILE NO. | Total Surplus area required to be Surrendered (m2) | Part/ Full Surplus area Surrendered (m2) | Monetory compensation received against balance Surplus area | | Total surplus area surrendered | Balance surplus to be Surrendered (m2) | Date of N.O.C. | Surplus Surrendered (Yes or No)/ Surended on | Penalty informed as per Govt.'s letter dated 15 Oct. 2012 | Penalty received from NOC holder | Penalty yet to be received (Balance) | Update penalty according to Govt. letter | FIR loged u/s & date under section I.P.C 405, 406, 415, 417, 420,421, 423 and 424- | Status | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Area | Amount | | | | | | | | | | | |
| 30 | Redevelopment of property bearing C.S.No. 428 & 1/428 of Parel Sewri Div. Situated at G.D.Ambekar Marg in F/S ward mumbai, known as "Nirlep House" | Mr.Y.G.Bhogale, CA to Shri R.N.Bhogale & S.G. Bhgole, Owner, Nirlep, Block No. 6 & 7, Ist floor, 163-C, Dr. Ambedkar Marg, Dadar(E) Mumbai | FS | 724 | 340.63 | 250.78 | 0.00 | -- | 250.78 | 89.85 | 12.3.1996 | Yes (Part) | | 0 | 0 | | | Due to Court case (Writ) Petition No.2795 of 2010) no FIR lodged | |
| 31 | Redevelopment of F.P.No 34B TPS III of mahim Div.situated at 115,116 & 117 Bal Govindas Rd., Dadar, Bombay 400 028 | Kohinoor Co.Hsg.Societ y Ltd.F.P.No 34 B, TPSIII 115 116-117 GovindDas Road, Mahim, Mumbai-16 | GN | 673 | 2368.3 | 0.00 | 0.00 | -- | 0.00 | 2368.30 | 10.3.1995 | No | | 0 | 0 | | | Construction of sale building not yet started hence no FIR lodged | |
| 32 | Redevelopment off P.No.528 TPS III bldg. No. 72, & 102 A, cons No. GN-5686 (2-2A) Mogal Lane, Mahim, Bombay, "Krishna Kunj" | Shri Shreyash and Ashok Narayan Pathare, 18, Yugprabhat Society, Off. Saladevi Temple Road, Mahim, Mumbai- 400 016 | GN | 714 | 154.8 | 0.00 | 0.00 | -- | 0.00 | 154.80 | 28.08.95 revised on 31.08.2000 | No | | 0 | 0 | | | The plan not yet approved by MCGM above 8th floor house work hold up therefore no FIR lodged | |
| 33 | Redevelopment of property F.P.No.633 TPS III Mahim Div. C.S. 846 & 1/848 cons G. 4938(1) 4939/56 B, 96 F Lady Jamsedji Rd. | Shri Ramesh T.Jogani CA to owners Shri Mukesh C.Vora &Ors., 633, Rajpal Bazar Rd., Mahim, Mumbai-16 | GN | 709 | 57.48 | 65.91 | 0.00 | -- | 65.91 | 0.00 | 15.11.96 | Yes | 436707 | 0 | 436707 | 436707 | | Before lodging FIR NOC holder handed over the surplus area, hence no FIR lodged | |
| Total (B) | | | | | 2921.21 | 316.69 | | | 316.69 | 2612.95 | | | 436707 | | 436707 | 436707 | | | |
| Grand Total (A+ B) | | | | | 13900.53 | 6483.54 | 35.85 | 10845319.16 | 12638.01 | 7392.88 | | | 325658608 | 96882918 | 229575690 | 387255482 | | | |

**साक्ष :**

**परिच्छेद क्रमांक ३.४ : सहकारी गृहनिर्माण संस्थांना अदेय आर्थिक लाभ.**

३.१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २ मे २०१८ रोजी गृहनिर्माण विभागाचे सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. त्यावेळी उक्त विषयासंदर्भातील सद्य:स्थितीबाबत अवगत करण्यास समितीने सूचित केले असता,मुंबई शहरामध्ये ३३ उपकर प्राप्त इमारती आहेत. या इमारतींचा पुनर्विकास ३३ (७) डीसीआर आणि ३३ (९) या दोन डीसीआर खाली करण्यात येतो. यामध्ये आजपर्यंत मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाने विकासक किंवा सोसायटी किंवा मालक यांना जेवढे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) दिलेले आहेत, त्यापैकी त्यांना म्हाडाकडे सरप्लस एरिया देणे बंधनकारक आहे. परंतु या प्रकरणामध्ये ३३ विकासकांनी म्हाडाकडे सरप्लस एरिया दिलेला नव्हता. त्या विकासकांनी सरप्लस एरियाची परस्पर विल्हेवाट लावली किंवा थर्ड पार्टी राईट्स क्रिएट केले किंवा त्याची विक्री केली. त्यामुळे म्हाडाने २०११ पूर्वी म्हणजेच २००९-२०१० मध्ये ३३ प्रकरणामध्ये गुन्हे दाखल केलेले आहेत. त्यामध्ये आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने यासंदर्भातील तपास केला व महानगरदंडाधिकारी यांच्या न्यायालयामध्ये चार्जशिट सादर केलेली आहे. यापैकी २९ प्रकरणांमध्ये १०९७९ चौ.मी. सरप्लस एरिया विकासकांनी म्हाडाला प्रत्यार्पित करणे आवश्यक होते. १०९७९ चौ.मी. अतिरिक्त जागेपैकी म्हाडाने ६१६६.८५ चौ.मी. क्षेत्रफळ वसूल केलेले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

समितीला प्राप्त झालेल्या माहितीमध्ये ६ हजार ४०० चौ.मी. क्षेत्रफळ वसूल केले असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, या व्यतिरिक्त ३५.८५ चौरस मीटर क्षेत्रफळ ॲडिशनल मॉनिटरी काँम्पेनसेशनच्या स्वरूपामध्ये ॲज ए रेडीरेकनर म्हणून प्राप्त झालेले आहे. या २९ प्रकरणात विकासकांनी ४ हजार ७७६.७२ चौ.मी. सरप्लस क्षेत्रफळ प्रत्यार्पित करणे बाकी आहे. यासंदर्भात एकूण दंडाची रक्कम ३२ कोटी ५२ लाख २१ हजार ९०१ आहे. तसेच पेड झालेली रक्कम ९ कोटी ६० लाख ८२ हजार ९१८ रुपये आहे. तसेच बॅलेन्स असलेली रक्कम २२ कोटी ९१ लाख ३८ हजार ९८३ रुपये आहे. अशा विकासकांकडून शासन निर्णयाप्रमाणे पेनल्टी इंपोज करतो, त्याप्रमाणे ही रक्कम येणे बाकी आहे. उर्वरित ४ प्रकरणांमध्ये म्हाडाला प्रत्यार्पित करावयाचे एकूण सरप्लस क्षेत्रफळ २९२१.२१ चौरस मीटर इतके आहे. त्यापैकी म्हाडाने ३१६.६९ चौरस मीटर एवढे क्षेत्रफळ वसूल केलेले आहे. जवळपास २६०४.५२ चौरस मीटर क्षेत्रफळ वसूल करणे बाकी आहे किंवा त्यांनी ते क्षेत्रफळ म्हाडाला दिलेले नाही. तसेच ४ लाख ३६ हजार ७०७ रुपये दंडाची रक्कम होती. त्यांनी दंडाची पूर्ण रक्कम दिलेली नाही. त्यांच्याकडे ४ लाख ३६ हजार ७०७ रुपये दंडाची रक्कम बाकी आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कशाची दंडाची रक्कम बाकी आहे? सरप्लस क्षेत्रफळ द्यायचे होते. एका बाजूला एकूण ३३ पैकी २९ प्रकरणात ४ हजार ७७६.७२ चौ.मी. सरप्लस क्षेत्रफळ प्रत्यार्पित करणे बाकी असल्यामुळे संबंधितांवर ३२ कोटी रुपये दंडाची रक्कम निश्चित केली. परंतु उर्वरित ४ प्रकरणात २६०४.५२ चौरस मीटर क्षेत्रफळ वसूल करणे बाकी असताना संबंधितांवर केवळ ४ लाख रुपये दंडाची रक्कम निश्चित करण्याचे काय कारण आहे? अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय काढलेला आहे. त्यांनी स्वत:ची दंडाची रक्कम किती आकारावी, याबाबत कोणताही कायदा नसल्यामुळे त्यांनी सामान्य प्रशासन विभागाने काढलेल्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे दंडाची रक्कम आकारली आहे. असे अवगत केले.

परिगणना करण्याचा निर्णय शासनाने काढलेला आहे. समितीचा मुद्दा असा आहे की, २६०४.५२ चौरस मीटर क्षेत्रफळच्या वसूलीबाबत दंडाच्या रकमेचा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. असे असताना संबंधितांवर केवळ ४ लाख रुपये दंड आकारण्याची सेटलमेंट कशी काय करण्यात आली? अजून ती जागा मिळणे बाकी आहे? अशी विचारणा समितीने केली असता, In four cases we have not lodged FIR, as in one case there is court matter, in two cases sale component of buildings is not ready and in one case the developer surrendered the surplus area to MBRRB. हे त्याचे डिटेल्स आहे. तसेच २९ प्रकरणांपैकी ११ प्रकरणामध्ये विकासक किंवा मालक यांनी surrendered both surplus area and penalty amount to MHADA. In one case owner/developer has surrendered surplus built-up area but not paid penalty to MHADA. १७ प्रकरणांमध्ये त्यांनी सरप्लस क्षेत्रफळही दिलेले नाही आणि दंडाची रक्कम देखील दिलेली नाही. अशा प्रकारे ३३ प्रकरणांची माहिती आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

संबंधित विकासकांनी दंडाची रक्कम दिलेली नाही, याबाबत समितीला माहिती दिली. परंतु त्यांच्या विरोधात कोणती कारवाई केली? तसेच ही सर्व प्रकरणे सन २००९ मधील आहेत. ही जागा बांधून द्यायची होती. सन २००९ मधील दर आणि सन २०१८ मधील दर पाहिले तर आता ४ पट भाव वाढलेले आहेत. विकासकांनी दंडाची रक्कम दिलेली नसताना म्हाडाने केवळ बघ्याची भूमिका घेतलेली आहे, असे मत

समितीने व्यक्त केले असता, म्हाडाने २०११ मध्ये धोरण आणून असा निर्णय घेतला की, विकासकाला ना हरकत प्रमाणपत्र (NOC) दिल्यानंतर अशी अट टाकली की, " Commencement Certificate at Plinth Level ". तेव्हाच विकासकासोबत सरप्लस क्षेत्रफळ देण्याबाबत रजिस्टर्ड ॲग्रीमेंट करतो. एमसीजीएम ने ज्या प्रमाणे बांधकाम परवानगी आणि नकाशे मंजूर करतात त्याप्रमाणे दुसरी बाब अशी की, सरप्लस क्षेत्रफळ प्रत्यार्पित केल्याशिवाय विकासकाला ओसी देत नाहीत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सरप्लस क्षेत्रफळ दिल्याशिवाय विकासकाला ओसी दिली जात नाही, ही बाब मान्य आहे. परंतु त्यांनी दंडाची रक्कम दिली नाही, म्हणून म्हाडाने त्यांच्यावर कोणती कारवाई केली? नियमांबाबत सांगण्यात आले परंतु ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणल्यानंतर विभागाने कोणती कार्यवाही केली? याबाबत माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, एकूण ना हरकत प्रमाणपत्र (NOC) प्रकरणांमध्ये सरप्लस क्षेत्रफळ मिळू शकते, त्याबाबतची आकडेवारी सांगू इच्छितो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मिळू शकते, होऊ शकते, अशा पद्धतीने उत्तर अपेक्षित नाही. महालेखाकारांनी जी बाब निदर्शनास आणली, ती बाब मान्य आहे. दंडाची रक्कम वसूल झाली नाही, याबाबत विभागाची काय भूमिका आहे आणि विभागाने एवढी वर्षे काय केले, याबाबतची माहिती देण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, यासंदर्भात सर्वांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्यांची चार्जशिट न्यायालयामध्ये दाखल झालेली आहे. तसेच एरिएर्स ऑफ लॅण्ड रेव्हेन्यु आरआरसी वसूल करण्यासाठी त्यांचे मालमत्तेचे विवरण जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे कळविलेले आहेत. तसेच म्हाडाचे कार्यकारी अभियंता यांना देखील कळविण्यात आलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मालमत्तेचे डिटेल्स किती दिवसामध्ये मिळतात? हा विषय सुरू होऊन किती दिवस झालेले आहे? बीएमसीमध्ये व म्हाडा मध्ये योग्य ती यंत्रणा आहे. त्यामुळे सर्व माहिती एका आठवड्यामध्ये मिळते. कोणत्या कोणत्या विकासकाकडे किती व कोणत्या परवानग्या आहेत, याची माहिती मिळवायला किती वर्षे लागतात? अशी विचारणा समितीने केली असता, ही सर्व माहिती ७ ते १५ दिवसांमध्ये उपलब्ध होऊ शकते. या प्रकरणामध्ये त्यांच्या मालमत्ता ॲटॅचमेंट करण्याच्या दृष्टीने आरआरसी लगेच इश्यु व्हायला पाहिजे होती. परंतु तसे झालेले नाही. आरआरसी साठी विभाग महसूली यंत्रणेवर अवलंबून असतो. खरे म्हणजे म्हाडा ॲक्टमध्ये दुरूस्ती करून वसूलीचे अधिकार म्हाडालाच असावे, अशी समितीने शिफारस केली तर अधिक चांगले होईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने त्यास सहमती दर्शविली. परंतु सध्या समितीसमोर मुद्दा असा आहे की, २०११ मध्ये एफआयआर दाखल केली. आता २०१८ हे वर्ष चालू आहे. एफआयआर झाली की, नाही? संबंधितानी अटकपूर्व जामीन घेतली व हा विषय संपला. २०११ मध्ये एफआयआर दाखल केलेला असताना बोर्डाचे अधिकारी इतके दिवस काय करत होते? ९ हजार चौरस मीटर म्हणजेच जवळपास १ लाख चौरस फूट क्षेत्रफळामध्ये लोक ट्रान्झीट कँम्प मध्ये राहतात. मोठ्या प्रमाणात प्रतिक्षा यादी मध्ये असणारे असे लोक आहेत. त्या लोकांना हे सर्व उपलब्ध करून देता आले असते. वाढीव बांधीव क्षेत्र आतापर्यंत मिळत नाही. २०११ मध्ये केवळ एफआयआर दाखल केली. त्यानंतर कोणतीही कारवाई केलेली नाही. विभागाने हे मान्य केले की, १५ दिवसांमध्ये यासंदर्भातील माहिती प्राप्त होऊ शकते. २०११ पासून २०१८ पर्यंत म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे, असेच म्हणावे लागेल. म्हाडा ही स्वतंत्र यंत्रणा आहे, म्हाडाचे स्पेशल सीईओ आहेत. समितीचे असे मत आहे की, जेवढया कर्मचाऱ्यांची गरज आहे, त्यापेक्षा चारपट कर्मचारी म्हाडाकडे आहेत. खाजगीचा विचार केला तर उपलब्ध कर्मचाऱ्यांपैकी एक तृतीयांश कर्मचाऱ्यांमध्ये म्हाडा चालविली जाऊ शकते. असे होत नाही की, तुमच्याकडे लक्ष नाही, म्हणून वसुली थांबली. आलेल्या माणसाच्या टेबलावर वजन ठेवले की, वसुली थांबते. तो कागदच गायब होतो व नंतर आतमध्ये जातो. दुसरा अधिकारी आल्यावर तो परत कागद बाहेर काढतो व संबंधिताला पत्र पाठवितो. त्यानंतर त्या अधिकाऱ्यास संबंधित व्यक्ती भेटतात आणि तेव्हा पुन्हा कागद आत जातो. हा गंभीर विषय आहे. याची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. एखादी नोटीस आली की, संबंधित अधिकाऱ्याला भेटायला जायचे, अशी प्रॅक्टीस झालेली आहे. विभाग नोटीस देतो. नोटीस दिल्यानंतर बीएमसीच्या उपायुक्तांना तेथे मेंबरशिप मिळते आणि त्यानंतर त्या नोटीसचे काहीच होत नाही. ही प्रॅक्टीस अत्यंत गंभीर आहे. या लोकांनी काहीना काही तरी केले असेल. बोलविले असेल, काही केले असेल. म्हाडा काहीच करीत नाही. त्यामुळे विभागाचे सचिव म्हणून म्हाडाच्या विरोधात काय करणार आहात? ही जुनी परिगणना आहे. आता वसूलीची रक्कम वाढली असेल, असे मत समितीने व्यक्त केले असता, डीसीआर ३३ (७), ३३ (९) अंतर्गत सरप्लस एरिया परिशिष्ट ३ प्रमाणे मिळायला पाहिजे. हे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये २०१५ पर्यंत चालू होते. उच्च न्यायालयामध्ये विकासकाने याचिका दाखल केली होती व ती हारल्यानंतर तो पुन्हा सर्वोच्च न्यायालयात गेला. सर्वोच्च न्यायालयामध्ये देखील ते हारले. त्यानंतर त्यांनी रिव्हीजन याचिका दाखल केली. जुलै, २०१५ पासून ॲक्च्युअल सरप्लस क्षेत्रफळ येणे चालू झाले. पूर्वी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात लेटीगेशन असल्यामुळे ते सरप्लस एरिया प्रत्यार्पित करीत नव्हते. आता ४७८ प्रकरणांमध्ये सरप्लस एरिया मिळणे आवश्यक आहे. जवळपास ५४ हजार ८६० चौरस मीटर एरिया विभागाने घेतलेला आहे. हा एरिया उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या लेटीगेशन्समुळे जमा झाला नव्हता. सदरहू विकासकांनी सरप्लस एरिया दिला

नाही, क्षेत्रफळाची विक्री केली हे जे काही त्यांच्या प्रॉपर्टीची डिटेल्स अधिकारी घेत आहेत. परंतु डिटेल्स मिळत नाहीत. जिल्हाधिकारी यांना देखील पत्र पाठविलेले आहे. तसेच आरबीआय कडे त्यांच्या बँक खात्याचा तपशील मागितलेला आहे.प्रत्येक महिन्याला वसुली झाली नाही तर रक्कम वाढते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंतची स्थिती काय आहे ? सर्व थकबाकीची एकूण परिगणना दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत किती आहे, त्याची माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले असता, यासंदर्भातील माहिती समितीला उपलब्ध करून देण्यात येईल. उच्च न्यायालयामध्ये क्रिमिनल रिटपिटीशन दाखल झाले. विभागाने प्रतिज्ञापत्र दिलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाकडे केव्हापर्यंतची माहिती उपलब्ध आहे, याबाबत अवगत करण्यास सांगितले असता, मार्च, २०१८ पर्यंतची माहिती यामध्ये आहे. प्रत्येक प्रकरणाची सविस्तर माहिती सादर करण्यात येईल. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

म्हाडा जमिनीचा मालक आहे.त्यांना ना हरकत प्रमाणपत्र (NOC) देतो. नियोजन प्राधिकारी (Planning authority) म्हाडा आहे की, बीएमसी आहे? प्लॅन ॲप्रुव्ह कोण करते? अशी विचारणा समितीने केली असता, प्लॅन ॲप्रुव्ह बीएमसी करते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०११ मध्ये एफआयआर दाखल करण्यात आली आणि २०११ मध्ये ॲग्रीमेंट करण्याची सुरुवात झाली. त्यांना प्लींथ पर्यंतची सीसी देतो आणि फ्रदर सीसी पूर्वी त्याने जे सरप्लस बांधीव क्षेत्र द्यायचे आहे, त्याचे ॲग्रीमेंट करतो आणि तो रजिस्टर करतो. एकाच गव्हर्नमेंटच्या अंडरमध्ये काम करता. हौंसिंगच्या अंडर काम करता आणि ते युडीच्या अंडर काम करते. त्यांनी सरप्लस क्षेत्रफळ प्रत्यार्पित केले नाही, म्हणून त्याची सीसी थांबवा असे इंटीमेशन का दिले नाही? तुमच्या ओसीची कोण वाट पाहते? मुंबई शहरामध्ये २२ हजार इमारती विदाउट ओसीच्या आहेत. लॅण्ड लॉर्ड पझेशन देऊन गेले. आता रेरा कायदा आला म्हणून त्यांना भीती वाटते. म्हाडा आणि महानगरपालिकेची त्यांना भीती वाटत नाही. ते विदाऊट ओसी इमारतीचा ताबा देऊन जातात. म्हाडा लॅन्ड ओनींग ॲथॉरिटी आहे. म्हाडाचे देणे बाकी आहे आणि त्याने ओसी घेतली नाही आणि परस्पर देऊन टाकला, विकून टाकला तर त्याला भीती नाही.

समितीचे असे मत आहे की, संबंधिताची सीसी थांबविण्यात यावी, अशा सूचना त्यांना का केल्या नाही? तसेच ते २०१५ मध्ये सर्वोच्च न्यायालयामध्ये रिव्हीजन बेंच कडे गेल्यानंतर प्रकरण हारले, त्यानंतर पैसे आणि जागा येण्यास सुरुवात झाली. ९ कोटी रुपये त्यानंतर आलेले आहेत. त्यापैकी काही लोकांनी पैसे दिलेले नसून जागा दिलेल्या आहेत. काही लोकांनी दंडाची रक्कम दिलेली असून जागा दिलेल्या नाहीत. ४ क्रमांकाचे प्रकरण असे आहे की, त्यानी दंडाची रक्कम दिली असून सरप्लस क्षेत्रफळ दिलेले नाही. आता ही माहिती उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे की, २०११ पासून ते सरप्लस बांधीव क्षेत्र देत नाहीत आणि त्याची दंडाची रक्कम देखील देत नाहीत.२०११ मध्ये एफआयआर दाखल केल्यामुळे २०११ पूर्वीचा सरप्लस एरिया आणि दंडाची रक्कम देत नाहीत. त्याच विकासकाला आणि त्या आर्किटेक्टला आर्किटेक्ट प्लॅन सादर करीत नसेल तर त्या आर्किटेक्टला त्यानंतर त्यांना आणखी बांधकामाकरिता जागा दिलेल्या आहेत. त्याचबरोबर ते उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात प्रकरण दाखल विभाग करीत आहेत व विरोधात भांडत आहेत. ते तेथे प्रकरण हारतात, सर्वोच्च न्यायालयातही प्रकरण हारतात, रिव्हीजन पिटीशन मध्ये जातात, तेथेही हारतात. तरी देखील विभाग त्यांना जागा देतो. समजा व्यापाऱ्याने एका बँकेमध्ये १० हजार रूपयांची ठेवी ठेवली आणि बँक डीफॉल्टर डिक्लेअर झाली तर पैसे दिले जात नाहीत. त्यामुळे पुन्हा तेथे ठेवी ठेवत नाहीत. आपले पैसे बुडणार असल्याने आपण व्यापाऱ्यांना माल देत नाहीत परंतु हे कोणत्या प्रकारचे व्यापारी आहेत. एखादा साधा व्यक्ती गेल्या १५ वर्षांपासून एका ठिकाणी राहात असेल आणि त्याला ट्रान्सफरची एनओसी द्यायची असेल तर दलालामार्फत गेल्यावरच काम होते, अन्यथा काम होत नाही. विधिमंडळ सदस्याने सांगितले किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याने सांगितले तरी काम होत नाही.३३ विकासकांपैकी लेटीगेशन चालू असताना किंवा त्याने आपल्याला बांधीव क्षेत्र दिले नाही, त्यानंतर देखील ज्या ज्या विकासकांना इतर जागेवर काम करण्याची परवानगी दिली, असे किती विकासक आहेत? हा समितीचा प्रश्न आहे.२०११ पासून सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आल्यानंतर ही प्रकरणे प्रलंबित आहेत. हे पैसे देत नाहीत. त्यांनी अटकपूर्व जामीन घेतली असेल. शासनाचे पैसे बुडालेले आहेत. हे १०० टक्के गैरव्यवहाराचे प्रकरण आहे. त्याकाळात ॲग्रीमेंट झाले नसेल तरी देखील देत असताना एक अट होती की, विकासकाने वाढीव बांधीव क्षेत्र परत दिले पाहिजे. हे ॲग्रीमेंट २०१४ मध्ये सीसी नंतर रजिस्टर करण्यास सुरुवात केली, तरी त्यापूर्वी जागा देताना त्यामध्ये अट होती, परंतु त्याने अटीची पुर्तता केली नाही आणि जागा परस्पर विकून टाकली, एफआयआर दाखल केलेली आहे. अटकपूर्व जामीन मागे यायला पाहिजे आणि त्याला अटक झाली पाहिजे, अशा प्रकारे न्यायालयामध्ये अपिल केलेले आहे काय? अशा प्रकारची अपिल केली असेल तर अपिल केव्हा करण्यात आली, कोणत्या न्यायालयात अपिल करण्यात आली आणि कोणकोणत्या विकासकांविरूद्ध अपिल करण्यात आली ? एफ.आय.आर. दाखल केली तर कॅव्हीएट का नाही दाखल केले? त्यांची सी.सी. देऊ नये याकरिता

बी.एम.सी.कडे प्रयत्न केला होता काय? असा प्रयत्न केला असतानाही त्यांनी ती दिली का, दिली असल्यास बी.एम.सी.ला बोलावू. असे मत समितीने व्यक्त केले असता,याबाबतीत प्रकरणनिहाय स्टेटस घ्यावे लागेल. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

In any case, you have given that. ३३ पैकी एखाद्या प्रकरणामध्ये बी.एम.सी.कडे गेला होता काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास असहमती दर्शविली. It is a total fault of the Department because they were sleeping over that issue. हे आता थांबविले पाहिजे. याच विकासकाला, आर्किटेक्टला जो भांडत आहे, जो बिल्ट अप एरिया देत नाही, त्याच लोकांना परस्पर याच प्रकारचे विकासाचे काम दिले काय, याचीही माहिती उपलब्ध नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता,या ३३ प्रकरणांमध्ये इमारती पूर्ण झाल्या होत्या-नव्हत्या म्हाडाने यामध्ये कुठल्याच प्रकरणात ओ.सी. दिलेल्या नाहीत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

म्हाडा ओ.सी. कशी देणार, त्याकरिता बी.एम.सी. आहे ना? असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यावर एन.ओ.सी. फॉर ओ.सी. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. ज्या लोकांनी म्हाडाकडे एन.ओ.सी.द्या याचा विकास आम्ही करीत आहोत असे सांगितले आणि ज्यांचे जुने देणे बाकी होते, जुनी दंडाची रक्कम येणे बाकी होते, जुने बांधीव क्षेत्र येणे बाकी होते, ते न्यायालयात भांडत होते तरी सुद्धा त्यांना पुढच्या एन.ओ.सी. दिल्या ही माहिती समितीकडे आहे. विभागाने एन.ओ.सी. दिल्या की नाही दिल्या? याबाबत अवगत करण्यास सांगितले असता, त्यावर ती माहिती घेऊन समितीला सादर करतो. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

विभागाने सर्व सविस्तर माहिती घेऊन यावे. ना हरकत प्रमाणपत्र (NOC) जरी दिले असेल तर त्याकरिता कोण जबाबदार आहेत, त्यांच्यावरही कारवाई झालीच पाहिजे. त्यांची अटकपूर्व जामीन रद्द करावी, कारण त्यांनी शासनाची फसवणूक केली आहे. त्यांना एवढया संधी मिळाल्या, ते न्यायालयामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय अशा विविध याचिकामध्ये हरले. त्यांचा अटकपूर्व जामीन मागे घ्या व त्यांना अटक करा, अशी सूचना पोलिसांना केली का, अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत विभागाला पुढचा वेळ द्यावा. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अटकपूर्व जामीन ही काही ठराविक कारणास्तव दिली जाते. बाजू मांडण्यात कुठे कमी पडलो, याबाबत देखील सांगावे. तसेच विभागाचे असे मत आहे की, शिफारस करावी. मात्र समितीच्या शिफारशीवर कार्यवाही होत नाही. समितीच्या सन १९९० पासूनच्या शिफारशी प्रलंबित आहेत. विभागाकडेही शिफारशी प्रलंबित आहेत. त्यामुळे शिफारस करून काय करायचे, विभागाने कार्यवाही करावी. समितीकडे महालेखापालांचे पत्र आहे. सन १९९० पासून ते सन २००५ पर्यंतच्या शिफारशी मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. असे निदर्शनास आणले असता, विभागाची अशी सूचना आहे की, म्हाडा कायद्यामध्ये वसूलीसाठी समितीने आवश्यक तरतूद करावी, असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी केली जात नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, जेथे काईंडमध्ये सरप्लस एरिया टेनामेंट ट्रान्सफर केला नाही तो विकून टाकला तेथे रेडीरेकनरप्रमाणे पैसे घेणे भागच आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. सन २०११ मध्ये एफ.आय.आर. दाखल करण्यात आली. त्यांनी बांधीव क्षेत्राचा एरिया प्रत्यार्पित करायचा होता तो कालावधी कुठला होता, आता १० हजार चौरस मीटरचा एरिया सांगितला तो कुठल्या कालावधीचा होता ? अशी विचारणा समितीने केली असता, तो सन २०११ च्या अगोदरचा कालावधी आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. तो केव्हापासूनचा आहे, सन १९९१ पासूनचा आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सन १९९७ पासूनचा वगैरे असेल. सन १९९१ मध्ये पुन्हा चॅलेंज केले होते. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखापालांनी जे लेखापरिक्षण केले आहे त्यामध्ये केवळ ३३ प्रकरणे निदर्शनास आली आहेत. सन २०१५ च्या न्यायालयाच्या आदेशानंतर त्या जागा ताब्यात आल्या. आता नवीन डेव्हलपमेंटला ज्या जागा दिल्या आहेत, त्याच्यातील जागा ताब्यात आल्या. असे मत समितीने व्यक्त केले असता, त्याबाबतचा एक पूर्ण चार्ट देतो. त्यामध्ये सुरुवातीपासून किती यायचे होते, किती आलेले आहे आणि किती शिल्लक आहे याची माहिती देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन १९९० पासून विभागाची सोसायटी आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, हा विषय सोपा आहे. तो विभागाच्या लक्षात का आला नाही? समिती याची माहिती येथेच वाचते व त्यावर येथेच निर्णय सांगते व विभाग ते मान्य करते. एकाही प्रश्नावर कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, म्हणजे विभागाच्या उच्च अधिका-यांच्या संगनमताने हे सर्व चाललेले आहे असे समितीने समजावे काय? त्या विकासकांची नावे वाचावीत.

मुंबईतील गरीब विकासकांची नावे कळू द्या. असे समितीने सूचित केले असता, श्री. हाजी अबुबकर हाजी मुसा यांचा मांडवी विभागातील पुर्नविकासाचा प्रकल्प आहे. मे.पारस एंटरप्रायजेस, दि बलवा इस्टेट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, श्री.आय.ए.पारेख, श्री.अशोक मुरारका, मुख्यत्यार पत्रधारक, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ते मुख्यत्यार पत्रधारक आहेत विकासक कोण आहेत? अशी विचारणा केली असता, तो मालक असेल. त्यानंतरचे नाव आहे श्री.मोहम्मद सलिम अब्दुल कयुम कोडिया, मे. सुमेर अँड असोसिएट.त्यानंतर मोहम्मद इकबाल अली मोहम्मद मे.एम.आय.एंटरप्रायजेस, श्री. आनंदपुरा अँड अदर. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले त्यावर, ही नावे पाहिली तर ती अशी आहेत की, ज्यांचे आज मुंबईमध्ये ५० प्रकल्प सुरू आहेत. त्यांच्याकडून पैसे वसूल होत नाहीत इतके हतबल सरकार आणि इतका हतबल विभाग आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. त्यांच्या सर्व प्रकरणांना स्थगिती दिली ना तर, एका मिनिटात पैसे वसूल होतील. म्हाडाची ज्यांची ज्यांची प्रकरणे सुरू आहेत, त्या सर्वांना बोलवा. त्यांना सांगा की, जुनी प्रकरणे झाल्याशिवाय याची स्थगिती उठवित नाहीत, असे केले तर ते ८ दिवसांत पैसे भरतील, असे मत समितीने व्यक्त केले.

सन १९९० पासून किती लोकांकडे बिल्टअप एरिया शिल्लक आहे. त्यांच्याकडून किती रुपये येणे बाकी आहे, it should not be limited to 33. याबाबत कोणती कारवाई करण्याबाबत समितीला आश्वासित करणार आहात ? भाडयाची रक्कम तसेच बिल्टअप एरिया मिळाले पाहिजेत किंवा त्याबरोबर आजच्या रेडिरेकनरप्रमाणे पैसे मिळाले पाहिजेत. बिल्टअप एरिया उपलब्ध नसेल अशा लोकांवर शेवटी दंडात्मक कारवाई करून रेडिरेकनरप्रमाणे पैसे घ्यावे लागतील. अशी सूचना समितीने केली.

कामे सुरू आहेत त्यामध्ये रिहॅबचे ५०-१०० लोक आहेत. असे लोक आहेत की, जे जुने भाडेकरू आहेत. त्यांना जर रेस्ट्रीक्टेड करायचे असेल तर त्याचा सेल कंपोनंट कंट्रोल करावा. म्हाडाचा एरिया आहे. त्यांच्या रेंट कलेक्टरची ग्राऊंडवर काही ॲक्टीव्हीटी नाही. बिचारे लोक रेंट भरण्याकरिता हैराण होतात. मैं यह कहना चाहता हूं कि पूरे महाराष्ट्र में डिजिटलाईजेशन किया गया है. आप महाराष्ट्र सरकार का, म्हाडा का पैसा किसी भी बैंक में भरो, वह पैसा सीधा उनके खाते में आएगा. टेलीफोन का १००-१०० बैंक का एक नम्बर पर जम्पींग होता है, २०० लाईन का जम्पींग होता है. हमारे पास सब सिस्टिम है. शिखर बैंक और छोटी को-ऑपरेटीव बैंक को छोड़ दीजिए. दूसरी किसी भी बैंक में, शेड्युल बैंक में म्हाडा के रेंट का पैसा भरा जाता है तो वह म्हाडा के खाते में जमा होगा. मेरा कहना है कि सिस्टिम विकसित क्यों नहीं की जाती है? आप म्हाडा भवन में जाकर देखिए. वहां पर ट्रान्सफर के केसेस होंगे, अन्य मॅटर होंगे, छोटे मोटे दूसरे केसेस होंगे, व्हेरिफिकेशन का कोई केस होगा. एक भी काम दलाल के बिना नहीं होता है. आप एक ग्रिवेन्सेस सेल शुरु कीजिए. वहाँ पर किसी जबाबदारी आदमी को बिठाईए. कम से कम म्हाडा का जो गालाधारक है, उसको यदि कुछ कहना होगा तो उसकी बात सुनने के लिए वहां पर कोई आदमी होना चाहिए. वह कहेगा कि मैं तिसरी बार यहां पर आ रहा हूं, मेरा काम नहीं हो रहा है. ये आदमी कहता है कि इसको लेकर आओ, उसको लेकर आओ. आप ये काम तो कीजिए. घर का रेंट भरने के लिए उसको छुट्टी लेनी पऱ रही है. जब वह वहां पर जाता है तो वहां पर रेंट कलेक्टर नहीं होता है. याबाबतही निर्णय घ्यावा. असे समितीने विभागास सूचित केले.

म्हाडाचा तक्रार निवारण कक्ष मंत्रालयामध्ये सुरू करावा आणि कम्प्लायन्स घ्यावा व म्हाडाकडून याची माहिती घ्यावी की, या तक्रारींचे काय झाले तर त्यामध्ये काही तरी यंत्रणा तयार होईल. जर म्हाडाकडे जबाबदारी दिली तर काही होणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने आणखीही एक विचार केला आहे. एस.आर.ए. व म्हाडामध्ये जो रिहॅब कंपोनंट असतो, फ्री कंपोनंट असतो तो रेराच्या अंतर्गत येत नाही. तो मुद्दा विभागाच्या मंत्री महोदयांनी उपस्थित केला. याबाबत विभागाची रेरा ॲथॉरिटी समवेत चर्चा झाली. त्याला रेराच्या अंतर्गत कम्प्लसरी कसे आणता येईल, कारण एकदा रेराच्या अंतर्गत ते आले तर बरेचसे प्रश्न सुटण्याचा शक्यता आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग रेरा ॲथॉरिटीशी याबाबत पत्रव्यवहार करू शकतो की, हे प्रकल्प घ्यावेत, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने त्यांच्याशी चर्चा करून यातून कसा मार्ग काढता येईल हे पाहिले. त्यांनी सुचविले आहे की, जेव्हा ओरिजनल एन.ओ.सी. देतात, एल.ओ.आय. देतात त्या वेगवेगळ्या टप्प्यांवर हे अनिवार्य करता येईल. नियमांमध्ये अनिवार्य नसले तरीसुद्धा प्रशासकीय आदेशाने हे सर्व करणे शक्य आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ते करून घ्यावे. समिती याबाबत शिफारस करणार असल्याचे समितीने स्पष्ट केले तसेच समितीने, सांगितलेले आहे की, सन १९९० पासून ज्या लोकांनी विभागाला अतिरिक्त चटई क्षेत्र समर्पित केलेले नाही त्या सर्वांच्या विरोधात काय तक्रार केली, काय गुन्हे दाखल केले याची माहिती द्यावी. रेंटचे किती रुपये देणे बाकी आहेत, तसेच किती क्षेत्रफळ बाकी आहे याची माहिती द्यावी. फर्दर सी.सी. महापालिकेने देऊ नये

असा पत्रव्यवहार महापालिकेसमवेत केला होता काय? केला नसेल तर तो का नाही केला, ज्यांनी तो केला नाही त्यांच्यावर विभागाने कोणती कारवाई प्रस्तावित केली, ते सांगावे. समितीने एक नवीन मुद्दा सांगितला की, समितीला पूर्ण माहिती द्यावी. त्यानंतरचा मुद्दा असा आहे की, जे लोक डिफॉल्टर आहेत त्यांची अटकपूर्व जामीन रद्द करण्यासाठी विभागाने कोणती कारवाई केली? केली नसल्यास कोणती कारवाई करणार आहात, याचीही माहिती द्यावी. त्यांनी अटकपूर्व जामीन घेतली विभागाने एफ.आय.आर. दाखल केला आणि काहीच केले नाही. ज्या लोकांनी हे दिले नाही त्यांना अधिकची कामे परत दिली आहेत. जे लोक डिफॉल्टर आहेत त्यांना तुम्ही ॲडिशनल काम कसे दिले, या पार्श्वभूमीवर त्यांना डिफॉल्टर म्हणून का घोषित करीत नाही, त्यांच्यावर कारवाई का करीत नाही, त्यांची सेल कंपोनंटची ओ.सी. का थांबवित नाही? रिहॅबच्या लोकांसाठी थांबविण्यासाठी सांगणार नाही. परंतु, सेल कंपोनंट थांबला पाहिजे, या दृष्टीने कोणती कारवाई करणार, या सर्व बाबींची माहिती समितीला पाहिजे. भाडे वसूलीची व्यवस्था करण्याबाबतचा मुद्दा मांडला आहे. त्याबाबत काय नियोजन आहे ते सांगावे. ग्रिव्हन्सेस सेल हा मंत्रालय व म्हाडा अशा दोन्ही ठिकाणी उघडावा. लोकांचे ग्रिव्हन्सेसचे काम खूप हेलपाटे घालूनही तोपर्यंत होत नाही जोपर्यंत मिडिएटर नेमले जात नाहीत, ही सुद्धा दुर्दैवी घटना आहे. या सर्व गोष्टींबाबत शासन काय भूमिका घेणार याची माहिती द्यावी, असे समितीने विभागास सूचित केले. विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरण पत्र क्र. ७ वर समाविष्ट)

समितीने पुन्हा दिनांक ६ जून, २०१८ रोजी गृहनिर्माण विभागाचे सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. मागील बैठकीच्या अनुषंगाने विभागाने समितीस माहिती सादर केलेली आहे. परिच्छेद क्रमांक ३.४ बाबत मागील साक्षीमध्ये काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्यापैकीच एक प्रश्न असा होता की, " या विकासकांनी मुंबई इमारत दुरुस्ती व मंडळास अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केले नाही, अशा विकासकांना पुढील सी.सी. देऊ नये." याबाबत खुलासा करावा. समितीला सादर करण्यात आलेल्या उत्तरामध्ये विभागाने काही गोष्टी अत्यंत स्पष्ट केल्या आहेत. जसे की, " या प्रकरणातील विकासक, मालक यांनी त्यांच्याकडील देय सरप्लस क्षेत्रफळ मंडळाकडे सुपूर्द केले नाही. त्याचबरोबर दंडाची रक्कम देखील भरली नाही." हे लोक सदनिकाही देत नाहीत, बांधलेले क्षेत्र देत नाहीत आणि त्यांनी दंड देखील भरला नाही. याबद्दल विभागाची काय भूमिका आहे हे स्पष्ट करण्यात यावे तसेच सदर रक्कम वसूल करण्यासाठी विभागाने कोणती भूमिका घेतली? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणातील पहिली कारवाई म्हणजे मंडळातर्फे २९ विकासकांवर एफ.आय.आर. दाखल केलेला आहे. तसेच संबंधितांना ओ.सी. देण्यात येऊ नये यासाठी एन.ओ.सी. दिलेली नाही आणि तिसरी कारवाई म्हणजे संबंधितांच्या काही मालमत्तांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने या प्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत, परंतु " The N.O.C. holder has not surrendered surplus built up area to MRRB and also not paid " एकूण ३३ सोसायटयांना पुनर्विकासाची परवानगी दिली. त्यापैकी २९ प्रकरणांमध्ये एफ.आय.आर. दाखल केलेले आहेत. एफ.आय.आर. दाखल करून तेथेच थांबलात. सर्वच जण एफ.आय.आर.ची दखल घेत नाहीत कारण त्यांना अटकपूर्व जामीन मिळत असते. एफ.आय.आर. दाखल केला म्हणजे कर्तव्य संपले असे समजून गप्प बसता. या लोकांकडून सुमारे १० हजार ९०० चौरस मीटर एवढा बिल्ट अप एरिया हवा आहे. त्यापैकी सुमारे ६ हजार चौ.मी.एवढे क्षेत्रफळ मिळालेले आहे. उर्वरित लोकांना ओ.सी.मिळू नये किंवा त्यांच्या इतरत्र सुरू असलेल्या बांधकामांवर काय कारवाई करणार आहात? कारण याच नावाने हेच विकासक एस.आर.ए. किंवा इतर योजनांमध्ये काम करीत असतात.त त्यांची जोपर्यंत सर्व ठिकाणी नाकेबंदी करीत नाहीत तोपर्यंत वसुली होणार नाही. याबाबत मागील साक्षी दरम्यान खूप चर्चा झाली होती. याबाबत समितीला सखोल माहिती देणे अपेक्षित होते. महानगरपालिकेने त्यांची सी.सी. थांबविली का ? विदाऊट ओ.सी. प्रॉपर्टी ट्रान्सफर केली जाते, त्या ठिकाणी लोक राहतात, त्यांना पाणी व विजेची जोडणी मिळते. हे सर्व कसे घडते ? ही सर्व वसुली कशी करता येईल याबाबत समितीला माहिती द्यावी, असे समितीने सूचित केले असता, मागील दोन बैठकांमध्ये याबाबत चर्चा झाली होती. एकूण २९ प्रकरणांमध्ये एफ.आय.आर. दाखल झाले असल्याबाबत आता अधिकाऱ्यांनी माहिती दिली. एफ.आय.आर. दाखल करून न थांबता त्याबाबत पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने ई.डी. ला देखील नुकतेच पत्र दिले आहे. पुढील प्रत्येक १५ दिवसांनी याबाबत पाठपुरावा करीत राहू, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मागील बैठकीमध्ये समितीने सूचना केली होती की, " हे लोक एस.आर.ए. मध्ये अजून कामे करीत आहेत व त्यांची माहिती काढण्यात यावी." तशी माहिती काढली आहे का ? ज्यांनी एरिया सरेंडर केलेला नाही व एस.आर.ए. मध्ये काम करीत आहेत, अशा किती एजन्सीज आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, एस.आर.ए. मध्ये या एजन्सींचे काम सुरू आहे किंवा नाही याबाबत माहिती घेऊन ते थांबविण्याबाबतचे आदेश देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबतची माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचे देखील हेच मत आहे की, एक महिना होऊन देखील माहिती येत नाही. सर्व बाबी संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन केल्या आहेत. असे असतानाही एक महिन्यामध्ये माहिती मिळत नाही. समितीने विभागाला मागील बैठकीमध्ये सूचना केल्यानंतर एक महिन्यात माहिती देणे अपेक्षित आहे. परंतु आज पुन्हा तशीच परिस्थिती असेल तर ही बाब दुर्दैवी आहे, असे मत समितीने खेदाने व्यक्त केले तसेच, संबंधितांना किती तारखेला सूचना दिल्या होत्या ? अशी विचारणा केली असता, ज्या दिवशी बैठक झाली त्याच दिवशी संबंधितांना सूचना दिल्या होत्या, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आतापर्यंत किती लोकांना आयडेंटिफाय केले आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सदर अधिकाऱ्यांनी नव्याने कार्यभार स्वीकारलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. अधिकारी नव्याने रुजू झालेले असले तरी त्यांनी अभ्यास करून आले पाहिजे.आपण नवीन अधिकारी आहात.आपल्या खालील सर्व अधिकारी यामध्ये समाविष्ट आहेत. त्यांच्याकडून ही माहिती घेण्याची जबाबदारी अधिकारी म्हणून आपली आहे आणि आपण जर ही माहिती काढत नसाल तर आपण असक्षम अधिकारी आहात असा त्याचा अर्थ होतो. आपण सदर माहिती किती दिवसांमध्ये समितीला सादर कराल ते सांगा. संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. माहिती काढून ज्या-ज्या ठिकाणी शासनाच्या वेगवेगळ्या योजनांमध्ये त्यांची कामे सुरू आहेत ती कामे जोपर्यंत बिल्ट अप एरिया देत नाहीत तोपर्यंत थांबविण्याबाबतची कारवाई किती दिवसांमध्ये करणार आहात? सदर माहिती घेण्याबाबत मागील बैठकीमध्ये देखील समितीला आश्वासित केले होते, अशी विचारणा समितीने केली असता, सर्व प्रकल्प रेरा अंतर्गत नोंदणीकृत आहेत. रेराचा डाटा पाहिला तर काही ठिकाणी विकासकांचे काम सुरू आहे. त्यामध्ये एस.आर.ए., पुनर्विकासाची कामे किंवा इतर कामांचाही समावेश आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना १५ दिवसांमध्ये सूचना देतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अधिकारी खरे सांगत आहेत किंवा नाहीत हे समितीला माहिती नाही, परंतु ही बाब शक्य नाही. हे डेव्हलपमेंट म्हाडाच्या नियम क्रमांक ३३ (९) अंतर्गत दिले होते. एस.आर.ए. मध्ये डी.सी.आर. ३३ (१०) लागू आहे. येथे विकासक तोच असला तरीही इंटरेस्टेड पार्टी वेगळी आहे. समजा झोपडी सरेंडर केली तर त्याऐवजी जागा मिळणार आहे. त्यामुळे यांनी सांगून एस.आर.ए. काम बंद करणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत जी काही वस्तुस्थिती असेल ती सांगावी. कारण आपण सांगून एस.आर.ए. काम बंद करणार नाही. म्हाडाच्याच प्रॉपर्टीवर एस.आर.ए. होत असेल व आपण सांगितले की, या प्रकल्पामध्ये गाळे हस्तांतरित केले नाहीत व त्यामुळे सी.सी. देवू नकात्यामुळे जी सत्य परिस्थिती आहे तीच समितीसमोर मांडावी. हे अधिकारी कितीही म्हणाले तरीही तसे होऊ शकत नाही. दुसरा साधा प्रश्न आहे, कमीत कमी ४ हजार ५०० चौरस मीटर बिल्ट अप क्षेत्रफळ ताब्यात येणे बाकी आहे. म्हणजेच विभागाने एफ.आय.आर. दाखल केलेल्या २९ विकासकांकडून जवळजवळ ४५ हजार चौरस फूट क्षेत्रफळ ताब्यात येणे बाकी आहे. संबंधितांवर एफ.आय.आर. दाखल केले, त्यांनी अटकपूर्व जामीन घेतला. हा आर्थिक गुन्हे शाखेंतर्गत गुन्हा घडत आहे. हा २०-२५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार असून यामध्ये शासनाचे सुमारे १२५ कोटी रुपयांचे नुकसान आहे. सदर प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे किती दिवसांमध्ये वर्ग करणार आहात? सदर प्रकरणातील एफ.आय.आर. सन २०११ साली दाखल करण्यात आलेला आहे. परंतु आर्थिक गुन्हे शाखेला मात्र सन २०१८ मध्ये पत्र दिले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, दिनांक १ जून, २०१८ रोजी आर्थिक गुन्हे शाखेला या प्रकरणाबाबत पत्र देण्यात आले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याचा अर्थ फक्त ४ दिवसांपूर्वी पत्र दिलेले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, यापूर्वी देखील पत्र देण्यात आले होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले. यामध्ये एकच मार्ग आहे तो म्हणजे आर्थिक गुन्हे शाखेमध्ये गेले पाहिजे व संबंधितांना अटकपूर्व जामीन मिळाला नाही पाहिजे. यामध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार असून शासनाचा महसूल बुडाला आहे. तसेच शासनाच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. सन २०११ च्या पूर्वी अशा प्रकारचे करार केले जात नव्हते. आता करार केले जात आहेत. विभागाने संबंधितांचे ओ.सी. थांबविले आहेत, परंतु त्यांना काहीही फरक पडत नाही. ते रेरामध्ये तरी कशाला नोंदणी करतील? जर १०० टक्के फ्लॅट ऑक्युपाईड झाले तर रेरा रेजिस्ट्रेशन करण्याची आवश्यकता नाही, असा कायदा आहे. दुसऱ्या प्रकल्पांना काम थांबविण्याची नोटीस इश्यू करा. परंतु संबंधितांना यामुळे काहीही होऊ शकत नाही. आर्थिक गुन्हे शाखेबाबत जी मागणी करीत आहात त्याबाबतचे पत्र विभागाने समितीला सादर केलेल्या कागदपत्रांसोबत जोडलेले आहे.सदर पत्र विभागाने दिनांक ४ जून, २०१८ रोजी पाठविलेले आहे. आर्थिक गुन्हे शाखेबरोबर बैठक घेऊन या संदर्भातील वेगळे प्रकरण दाखल करणार का? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत सचिव, गृह विभाग यांना विनंती करण्यात येईल. तसेच या प्रकरणाचा पाठपुरावा करण्याबाबत बैठक आयोजित करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

समितीचे असे मत आहे की, आर्थिक गुन्हे शाखेबरोबर बैठक घेण्यात यावी, असे समितीने सूचित केले असता, आर्थिक गुन्हे शाखेने यापूर्वीच एफ.आय.आर. नोंदविलेला आहे. संबंधितांना अटकपूर्व जामिन किंवा जामिन मिळाले असल्याने ते बाहेर आहेत. त्यांचे जामिन फेटाळून त्यांना अटक व्हावी यासाठीच पत्र दिले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. यामध्ये एकच प्रकरण दाखल केलेले आहे की वेगवेगळीप्रकरणे

दाखल केली आहेत? आर्थिक गुन्हे शाखेमार्फत सेंट्रली चौकशी करायची असेल तर १०० कोटी रुपयांपेक्षा जास्तीचा गैरव्यवहार असणे आवश्यक आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने वेगवेगळी प्रकरणे दाखल केली आहेत. आर्थिक गुन्हे शाखेने जर तशी सूचना केली तर ही प्रकरणेएकत्र करू शकतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत वरच्या स्तरावरुन कार्यवाही झाली तरच त्याचा तपास लवकर होईल. पोलीस स्टेशन स्तरावर आर्थिक गुन्हे शाखेला जास्त अधिकार नाहीत, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यामुळेच विभागाने कमिट केले की, सचिव, गृह विभाग यांना त्यांच्या स्तरावर बैठक घेण्याची विनंती करू, असे विभागीय सचिवांनी सांगितले. मुंबई महानगरपालिकेमधील एखाद्या इमारतीला ओ.सी. नसेल तर ते बेकायदेशीर ऑक्युपेंट होतात. याबाबत महानगरपालिका काय कारवाई करते? अशा २२ हजार इमारती आहेत, अशी विचारणा समितीने केली असता, डीम कन्व्हेयन्सबाबत नवीन शासन निर्णय निघाला आहे. अशा सुमारे २० हजार इमारती आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले. मालमत्ता कर दुप्पट होतो. कमीत कमी यांना दुहेरी मापदंड तरी का लावत नाहीत ? असे मत समितीने व्यक्त केले असताओ.सी. नसेल तर सर्व अनधिकृतच असते. म्हाडा म्हणून आम्ही त्यांना विनंती केली होती. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

They are getting additional revenue why will they say, 'öÒNo'. सर्टिफिकेट सादर केले नाही तर दुप्पट कर ॲटोमेटिक आकारला जातो.एस.आर.ए. च्या इमारतींना तशा प्रकारची स्थगिती देता येणार नाही. परंतु यामध्ये विकासकांचा जो भाग आहे तो विकणे तरी थांबवू शकतो की नाही? सेलेबल कम्पोनन्टला स्थगिती देवू शकतो. जोपर्यंत विकासकाचा सदर प्रकल्प क्लिअर होत नाही तोपर्यंत या दोन्ही बाबी वेगवेगळ्या आहेत. एस.आर.ए. चे डेव्हलपमेंट हे डी.सी.आर. ३३ (१०) नियमांतर्गत होत आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, म्हाडा किंवा शासन एस.आर.ए.च्या इमारतींवर कायदेशीररीत्या स्थगिती देवू शकत नाहीत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इमारतींना स्थगिती द्यावी असे समितीचेमत नाही. विकासकाचा सेलेबल कम्पोनन्ट हे प्रकरण सेटल होईपर्यंत विकता येणार नाही, अशी स्थगिती विभाग लावू शकतो का? जर लावू शकत नसू तर नेमकी काय अडचण आहे? अशी विचारणा समितीने केली असता, अशा प्रकारची स्थगिती देण्यासाठी कायद्याचा आधार आवश्यक आहे. कारवाई करण्यासाठी कायद्याचा आधार पाहिजे. कायद्यामध्ये तरतूद नसल्यामुळे एच.पी.सी. बनविण्यात आले. जर हा विषय एच.पी.सी. कडे घेतला तर कदाचित ते काही करू शकतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एच.पी.सी. सुद्धा काहीही करू शकत नाही. म्हाडा प्राधिकरणाने ज्या विकासकाला विकास करण्यासाठी दिले आहे त्यामध्ये म्हाडा, विकासक आणि टेनन्ट असे तीन भाग आहेत. एस.आर.ए. मध्ये स्लम डेव्हलपर्स, एस.आर.ए. ॲथॉरिटी आणि विकासक असे तीन भाग आहेत. या दोन्ही बॉडी वेगवेगळ्या असून दोहोंनाही वेगवेगळा डी.सी.आर. आहे. दोघांच्या प्लॅनिंग ॲथॉरिटी देखील वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे हे दोन्ही मिक्स होऊ शकत नाहीत, unless and until it is given under 33 (10). But it is not part of 33 (10), it was part of 33 (9) or 33 (5), whatever it may be. असेल तर काही करू शकत नाहीत असे जाहीर तरी करा, असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये विभाग स्ट्रॅटेजी करणार आहे. पहिले म्हणजे ई.डी. कडील प्रकरणाचा सतत पाठपुरावा करायचा व दुसरे म्हणजे यांना आज वसूलीचा देखील अधिकार नाही. त्यासाठी मागे सांगितल्याप्रमाणे म्हाडा कायद्यामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठीचा प्रस्ताव तयार करून विभागाकडे पाठविला जात आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागास या २९ प्रकरणांमधून ३९ कोटी ६४ लाख रुपये येणे बाकी आहे. महालेखापरिक्षकांनी आणखी एक आक्षेप घेतला होता तो म्हणजे विभागाने केलेली भाडयाची गणना चुकीची आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाकडे यासंदर्भात काहीही धोरण नसल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणानुसार भाडे आकारण्यात आलेले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सरप्लस एरिया प्रॉपर्टीवर रेडी रेकनरप्रमाणे दर आकारण्यात यावा, असे महालेखाकार यांनी सुचविले होते. त्याप्रमाणे विभागाने परिगणना केलेली नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्याप्रमाणे रेंटल पॉलिसी तयार करावी लागेल. म्हाडाची तशी पॉलिसी नसल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणाप्रमाणे परिगणना केली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने ८ कोटी रुपये वसूल केलेले आहेत. काही प्रकरणांमध्ये सरप्लस एरिया प्रत्यार्पित केलेला आहे. मूळआक्षेप असा आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासनाच्या अनधिकृत टेनन्टला जे भाडे आकारले जाते त्याकरिता रेडी रेकनरचा आधार घेतला जातो. त्या धर्तीवर सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे रेडी रेकनरचा आधार घेऊन रक्कमेची परिगणना केली पाहिजे. We have objected to you applying the rate which is applicable to Government Servants when they overstay, अशी विचारणा महालेखापालांनी समितीच्या माध्यमातून केली असता, गव्हर्नमेंट सर्व्हेंट ओव्हर स्टे चाच दर लावला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

This cannot be applied to Builders who have not surrendered surplus area, असे मत महालेखापालांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, त्यावेळी पॉलिसी नसल्यामुळे शासनाने तशा प्रकारचा निर्णय घेतला, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणतीही पॉलिसी नव्हती, याचा अर्थ विभागाला स्वेच्छाधिकार होता. कमाल दर तुम्ही आकारला पाहिजे होता, असे मत समितीने व्यक्त केले असता, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणाप्रमाणे रेडी रेकनरनुसार आकारणी केली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

म्हाडाची स्थापना कशासाठी झालेली आहे, उद्देश काय आहे हे एकदा समितीला समजावून सांगा. २९ प्रकरणांमध्ये मार्च, २०१८ पर्यंत एकूण थकबाकी किती आहे? याची माहिती समितीला कळवावी. याचबरोबर उर्वरित ४ प्रकरणांमध्ये एफआयआर दाखल केलेला नाही, त्याची स्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, ४ पैकी एका प्रकरणात न्यायालयात दावा दाखल झालेला आहे. उर्वरित तीन प्रकरणात सरप्लस एरिया अनुज्ञेय नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सहपत्र-२ अन्वये पोलीस उपआयुक्त, आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग यांना दिनांक ४ जून, २०१८ रोजी म्हाडाकडून जे पत्र पाठविण्यात आले आहे तो केवळ एक फार्स आहे. ज्यांच्या अनुमतीने हे पत्र पाठविले आहे त्या अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याची गरज आहे. एखादी खाजगी एनबीएफसी असेल किंवा लॅण्डलॉर्डला हक्काची जागा परत द्यायची असेल आणि विकासक जागा न देता निघून गेला असेल तर अशा प्रकारचे पत्र लिहिले जाईल का ? ज्याच्याकडून अशा प्रकारचे पत्र लिहिले जाईल त्याला नोकरीतून काढले जाईल. पुढे म्हटले आहे की, " कृपया उप सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या संदर्भाधीन पत्राचे अवलोकन व्हावे. उप सचिव, महाराष्ट्र शासन संदर्भाधिन पत्राद्वारे विचारणा केलेली परिच्छेद क्र. ३.४ " सहकारी गृहनिर्माण संस्थांना अदेय आर्थिक लाभ " या संदर्भात दि. २.०५.२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये लोकलेखा समितीसमोर अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष होती. सदर साक्षी दरम्यान मा. लोकलेखा समितीच्या सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने सूचना केली की, ज्या विकासकांनी अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळाकडे सुपूर्द केले नाही, त्यांना न्यायालयातर्फे मिळालेली जामिन (अँटीसिपेटरी बेल) रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आपणांस विनंती करण्यात येत आहे. "

या पत्रामध्ये जागेची बाजारभावानुसार किंमत काय आहे याचा कुठेही उल्लेख केलेला नाही. २९ विकासकांविरुद्ध वेगवेगळ्या पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल केला आहे. परंतु या विकासकांनी एकत्रितपणे सरकारची किती रकमेची फसवणूक केली आहे, किती रक्कम येणे बाकी आहे याची आकडेवारी नमूद करणे आवश्यक होते. परंतु या पत्रान्वये समितीने विचारणा केली म्हणून आम्ही पत्र पाठविले असे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने म्हटल्याप्रमाणे डिटेलिंग करून पत्र दिले पाहिजे होते, जेणेकरून प्रकरणाचे गांभीर्य लक्षात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२९ विकासकांकडून एकूण किती अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ येणे बाकी आहे, त्याची बाजारभावाप्रमाणे किंमत किती आहे याचा उल्लेख असणे आवश्यक होते. किती वर्षे ही फसवणूक झाली, न्यायालयातील प्रकरणाचा क्रमांक काय होता, अटकपूर्व जामीन घेतली त्याची तारीख काय होती, त्या तारखेपासून आजपर्यंत पोलिसांनी कोणती चौकशी केली हे सर्व त्यात नमूद करणे आवश्यक होते. ही शुद्ध फसवणूक आहे. विभागाने सहआयुक्त (आर्थिक गुन्हे विभाग) यांच्याबरोबर बैठक घ्यावी. या प्रकरणी तीन महिन्यात चार्जशीट दाखल होऊ शकते. या पत्रामध्ये लोकलेखा समितीच्या बैठकीचा उल्लेख करण्याची काय आवश्यकता होती? हे पत्र अपूर्ण आहे. या पत्राचे पुढील पृष्ठ जोडलेले नाही. सही केल्याविना पत्र पाठविण्यात आलेले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीच्या बैठकीचा संदर्भ दिला तर अधिक ग्रॅव्हीटी येईल असे त्यांना वाटले असावे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लोकलेखा समितीच्या बैठकीचा उल्लेख करण्याची गरज नव्हती. ही रुटीन प्रोसेस आहे. पत्राची अद्ययावत प्रत समितीला सादर करावी, असे समितीने सूचित केले असता, पत्राची प्रत समितीला सादर करण्यात आली. शासनस्तरावरुन ज्या सूचना दिल्या त्यानुसार त्यांनी पत्र पाठविले आहे. विभागामार्फत यापेक्षा अधिक सबळ पत्र सह पोलीस आयुक्तांना पाठविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सर्व प्रकरणे एकत्र करून रकमेचा उल्लेख करावा. In this letter you have requested only to cancel the bail. This letter is not drafted properly. Our intention is not just to reject the bail but our intention is to get ४८०० sq.m. area. ४८०० चौ.मी.जागा दिली पाहिजे, त्याचबरोबर ३९ कोटी रुपये येणे आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, मागील बैठकीत सूचना दिल्याप्रमाणे म्हाडाने पत्र लिहिले आहे. विभागाच्या स्तरावर पत्र पाठवू, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या पत्रामध्ये फक्त अटकपूर्व जामीन रद्द करण्याबाबत उल्लेख केला आहे. मार्च, २०१८ पर्यंतची थकबाकी त्याचबरोबर ४८०० चौ.मी. बिल्टअप एरिया दिला पाहिजे, त्या जागेची बाजारभावानुसार किंमत जी होते, तेवढया रकमेची या २९ लोकांनी शासनाची फसवणूक केली आहे, याबाबतची तक्रार सामुहिकरित्या आर्थिक गुन्हे विभागाकडे सादर करावी आणि त्यांच्याशी चर्चा करून प्रधान सचिव (गृह) यांना विश्वासात घेऊन, विचारविनिमय करून योग्य ती कार्यवाही करावी व त्याचा अहवाल १५ दिवसात समितीला सादर करावा. २०११ पासून मंडळाने फक्त एफआयआर दाखल करण्याशिवाय कोणतीही कार्यवाही केलेली नाही. आणि संबंधित विकासकांनी अटकपूर्व जामीन मिळविला आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी**

**परिच्छेद क्र. ३.४ "सहकारी गृहनिर्माण संस्थांना अदेय आर्थिक लाभ"**

**अभिप्राय**

**३.२** महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास अधिनियम, १९७६ च्या कलम १०३I- (३) मधील तिसऱ्या अनूसूचीमध्ये प्रमाणित केलेल्या मानकानुसार ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना (CHS) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (MBRRB) यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र (NOC) देण्यात आलेले असते त्यांनी जे रहिवाशी एफडीए च्या संक्रमण शिबिरामध्ये राहतात किंवा ज्यांच्या जुन्या उपकरप्राप्त इमारती बांधल्या जाऊ शकत नाहीत अशा रहिवाश्यांना वाटप करण्यासाठी ५ ते ५० टक्के बांधीव क्षेत्र (BUA) प्रत्यार्पित करणे आवश्यक असते.परंतु ज्या ३३ CHS नी नवीन इमारती बांधल्या होत्या, पण अतिरिक्त बांधीव क्षेत्र (BUA) एफडीए ला प्रत्यार्पित केले नव्हते, त्यांच्यावर शास्ती आकारण्याचे निदेश गृहनिर्माण विभागाने महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) यांना दिले. जेव्हा सरकारी कर्मचारी शासकीय निवासात मुदतबाह्य कालावधीसाठी राहतात तेव्हा त्यांच्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयात शास्तीचा जो दर विहीत केला आहे त्याप्रमाणे शास्ती आकारण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार एफडीए ने ३३ पैकी ३० CHS संबंधी जानेवारी १९९२ ते डिसेंबर २०१४ या कालावधीसाठी ११,३१९,२९ चौ.मी. इतके अतिरिक्त BUA प्रत्यर्पित न केल्याबद्दल रु. २१.६८ कोटी शास्ती परिगणीत केली व त्याप्रमाणे मागणी सूचना जारी केल्या.

परंतु MBRRB ने वापरलेली पद्धत (सरसकट दराने आकारणी करण्याची) योग्य नव्हती. कारण ही आकारणी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तीकेच्या परिच्छेद ३८० नुसार सार्वजनिक बांधकाम विभाग मालमत्तांचे (सरकारी व खाजगी दोन्ही) भाडेपट्टीमुल्य ठरविण्यासाठी आणि भाडयाच्या वाजवी दरासंबंधीचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी जे सिद्धगणक दर अवलंबितो त्याच्या आधारावर करण्यात आली नव्हती.संस्थांनी प्रत्यार्पित केलेली अतिरिक्त जागा, अशा इमारती ज्या क्षेत्रात आहेत तेथील बाजारभावाने भाडेपट्टीवर दिली असल्याच्या शक्यतेमुळे शास्तीचा दर प्रगणित करण्यासाठी सिद्धगणकाचा अवलंब करण्याच्या तर्काला पुढे पुष्टीच मिळाली.

लेखापरिक्षेच्या अंदाजानुसार २१ CHS नी प्रत्यार्पित केलेल्या अतिरिक्त BUA पोटी जानेवारी, २००९ ते डिसेंबर २०१४ त्या त्या वर्षाच्या सिद्धगणकाच्या दराप्रमाणे या कालावधीसाठी रु ३५.९९ कोटी इतकी शास्ती प्रमाणित होत होती. परंतु MBRRB ने याच कालावधीसाठी (जानेवारी २००९ ते डिसेंबर २०१४) वापरलेल्या सरसकट दराच्या पद्धतीप्रमाणे या २१ प्रकरणात रु. २३.५७ कोटी इतकी शास्ती परिगणीत होत होती. योगायोगाने या २ प्रकरणात सिद्धगणक दराप्रमाणे मासिक भाडेपट्टी प्रति चौरस फुट रु ३३.७२ (२००९) आणि रु. १५७.८१ (२०१४) होती. जी MBRRB च्या पद्धतीनुसार फक्त रु २५ आणि रु. ५० प्रति महिना प्रति चौ.फुट प्रगणित होत होती. अशा प्रकारे अतिरिक्त बांधीव क्षेत्र प्रत्यर्पित न करण्यावर अयोग्य दराने शास्ती आकारल्यामुळे २१ सहकारी गृहनिर्माण संस्थांना रु. १२.४२ कोटी इतका अदेय आर्थिक लाभ झालाअसे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

यासंदर्भात समितीस सांगण्यात आले की, एकुण ३३ प्रकरणांपैकी मंडळास बांधीव (सरप्लस) क्षेत्रफळ सुपूर्द करावयाच्या २९ प्रकरणांमधील बांधीव क्षेत्रफळाची वसुली तसेच उर्वरित क्षेत्रफळासाठी रेडिरेकनरच्या दराप्रमाणे वसुली तसेच दंडाची वसुली यासंदर्भातील माहिती विभागाने त्यांचे लेखी उत्तरात नमूद केली आहे. त्याअनुषंगाने समितीने या प्रकरणी साक्ष घेतली असता विकासकाने म्हाडास देय असलेले अतिरिक्त बांधीव क्षेत्र हे नविन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, म्हाडास सुपूर्द करणे अपेक्षित आहे.

विकासकांनी पुनर्विकासाचे काम पूर्ण करुन सुद्धा, मंडळास देय असलेले अतिरिक्त बांधीव क्षेत्र सुपूर्द केले नाही व मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेताच भाडेकरु/रहिवाशी यांना नविन पूनर्विकसीत इमारतीत पुनर्वसन केले आहे. अशा ३३ प्रकरणांपैकी २९ प्रकरणांमध्ये मंडळातर्फे (FIR) प्रथम खबर अहवाल स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये सन २०११ मध्ये दाखल करण्यात आलेला आहे. तसेच मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडील माहितीनुसार, ज्या विकासकांनी म्हाडास देय असलेले अतिरिक्त बांधीव क्षेत्र सुपूर्द केलेले नाही व म्हाडाने सन २०११ साली त्यांच्याविरुद्धएफ आय आर दाखल केले आहे. अश्या कोणत्याही विकासकास सन २०१२ नंतर ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही असेही समितीसमोर सांगण्यात आले.

मंडळातर्फे एफआयआर दाखल केल्यानंतर, सदर प्रकरणांमध्ये गुन्हा अन्वेषण विभागातर्फे तपास करुनदोषारोप पत्र दाखल केली आहेत. परंतु यात न्यायालयाने विकासकांना रितसर अटकपुर्व जामिन मंजूर केलेला आहे. सद्य:स्थितीत प्रकरणे न्याय प्रविष्ठ असल्यामुळे, जामिन रद्द करण्याची कार्यवाही ही गुन्हे अन्वेषण विभागातर्फे करणे अपेक्षित असून यासंदर्भात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि. ०१.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये आर्थिक व गुन्हे अन्वेषण विभाग यांना विनंती करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

सद्य:स्थितीत सदर २९ प्रकरणांपैकी ०८ प्रकरणांमध्ये विकासकाने म्हाडास एकूण ७५०.३४ चौ.मी ऐवजी ७६०.०३ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केले आहे. तसेच दंडात्मक रक्कमेपोटी एकूण १,७३,८४,००७ इतक्या रक्कमेचा भरणा केलेला आहे. उर्वरित २१ प्रकरणांमध्ये म्हाडास देय असलेले अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ १०२२९.२२ चौ.मी. इतके आहे त्यापैकी विकासकाने ५४०९.०४ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ म्हाडास सुपूर्द केले आहे व ४८२०.१८ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द करावयाचे आहे.

सदर २१ प्रकरणांमध्ये मे, २०१८ पर्यंत दंडात्मक रक्कम रुपये ४७,७०,७३,८९८ इतकी आहे. त्यापैकी विकासकांनी ८,०६,०९,१११ इतकी रक्कम म्हाडास भरणा केली आहे व उर्वरित रक्कम रुपये ३९,६४,६४,७८७ इतकी रक्कम येणे बाकी आहे.

या वसुली प्रकरणी विकासकांनी केलेल्या सर्व याचिका मा.उच्च न्यायालयाने सर्व बाजू ऐकून दि.०७.०५.२०१५ रोजीच्या आदेशान्वये खारीज केल्या. तदनंतर याचिकाकर्त्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाविरूद्धमा.सर्वाच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (C) क्र.१९७८०/२०१५ दाखल केली होती. परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर याचिका सुद्धा खारिज केली. तदनंतर विकासकांनी पुन्हा मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल केली होती. ती

सुद्धा खारीज करण्यात आली होती. प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्यामुळे दरम्यानच्या कालावधीत मंडळातर्फे विकासकांविरूद्धकोणतीही कार्यवाही करता येणे शक्य झाले नाही.

आता अशा विकासकांची स्थावर अथवा जंगम मालमत्तांबाबतची माहिती सह उपनिबंधक-मुंबई शहर, जिल्हाधिकारी-ठाणे, शहर आणि उपनगरे व विकासकांच्या बँक खात्याबाबतची माहिती रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात आली असून सदर माहिती मंडळास उपलप्रध्द झाल्यानंतर, म्हाडा अधिनियम कलम १८० मधील तरतुदीनुसार सदर माहिती मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडे महसूल वसुली प्रमाणपत्रासाठी (Revenue Recovery Certificate) देण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारशी**

**३.३(१) सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर असून अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी द्यावयाच्या अतिरिक्त बांधीव क्षेत्र प्रत्यार्पित न करणे, त्यासाठीची शास्तीची व दंडाची रक्कम न भरणे अशाप्रकारे या संस्थांना अदेय आर्थिक लाभ देण्यात आला. परिणामी शासनाचे मोठ्या प्रमाणात अतिरिक्त बांधीव क्षेत्रफळ, शास्तीची व दंडाची रक्कम अशा कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे.ज्या विकासकांनी अतिरिक्त बांधीव क्षेत्रफळाची परस्पर विल्हेवाट लावली किंवा त्रयस्थ पक्षाचे अधिकार (Third party interest) निर्माण केले अथवा त्यांची विक्री केली,त्यांचेवर म्हाडाने कोणतीही कारवाई केली नाही. महालेखाकारांनी नमुन्यादाखल केवळ ३३ प्रकरणांची तपासणी केली असता त्यातील २९ प्रकरणांमध्ये या अनियमितता महालेखाकारांच्या निदर्शनास आल्या. सर्वच प्रकरणांची तपासणी केली तर अशा प्रकरणांची व्याप्ती ही निश्चितच अधिक असणार आहे. तसेच महालेखाकारांनी हे आक्षेप सन २०१४-१५ मध्ये नोंदविल्यानंतर देखील नंतर विभागाने या संदर्भात कडक कारवाई करणे अपेक्षित होते. परंतु समितीची साक्ष लागेपर्यंत ही प्रकरणे म्हाडाने गांभीर्याने हाताळली नाहीत.ही सर्व प्रकरणे सन २००९ मधील आहेत. सद्यःस्थितीत सन २०१८ मध्ये रेडिरेकनर मधील दर निश्चितच जास्त आहे. त्यामुळे या वसुलपात्र रकमेमध्ये देखील वाढ होवू शकते. तसेच अतिरिक्त बांधीव क्षेत्र अथवा परिगणित केलेली शास्तीची अथवा दंडाची रक्कम देखील दिलेली नसताना म्हाडाने केवळ बघ्याची भूमिका घेतली. अशा गंभीर प्रकरणी म्हाडाने केवळ एफ.आय.आर. दाखल करण्यापलिकडे कोणतीही पुढील कारवाई केली नाही. केवळ एफ.आय.आर. केला म्हणजे विभागाची जबाबदारी संपत नाही. त्या एफ.आय.आर.चा योग्य तो पाठपुरावा करुन निष्कर्षाप्रत येवून ही वसुली नियमाप्रमाणे करण्याची व दोषींना शिक्षा करण्याची संपुर्ण जबाबदारी म्हाडाची होती. परंतु म्हाडाने ती विनाविलंब व सक्षमरित्या पार पाडली नाही. अतः सदरहू प्रकरणी वसुलपात्र संपुर्ण अतिरिक्त बांधीव क्षेत्राची विभागाने विकासकांकडून तात्काळ वसुली करावी. जिथे ही वसुली शक्य नाही तिथे शास्तीच्या रकमेची वसुली तात्काळ करावी व यावर दंडाची देखील वसुली तात्काळ करण्यात यावी. त्याचप्रमाणे सदरहू प्रकरणी नमुन्यादाखल महालेखाकारांनी केलेल्या केवळ ३३ प्रकरणांपुरती चौकशीची व्याप्ती निश्चित केली आहे. विभागाने अशा सर्वच प्रकरणांची तपासणी करुन आवश्यक ते अतिरिक्त बांधीव क्षेत्र, शास्ती व दंडाची रक्कम वसुल करावी व दोषी विकासकांविरुद्ध FIR देखील दाखल करण्यात यावा.सन २०११ पासून काही विकासकांवर FIR दाखल करण्यात आला आहे. परंतु यासंदर्भात कोणतीही पुढील कार्यवाही विभागाने गांभीर्याने केली नाही. दरम्यान या विकासकांनी न्यायालयाकडून अटकपुर्व जामीन देखील मिळवून घेतला आहे. त्यामुळे या प्रकरणी कारवाईचे कोणतेही गांभीर्य राहिले नाही. विभागाने विकासकांना देण्यात आलेला अटकपुर्व जामीन रद्द करण्याचा प्रयत्न न्यायालयातून करावा व केवळ FIR पुरते न थांबता पुढील आवश्यक ती कारवाई तातडीने करुन ही प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.४(२) ज्या विकासकांकडून ही वसुली न झाल्यास ती तात्काळ जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महसूली वसुली म्हणून वसुल करण्यात यावी. तसेच काही विकासक/मालक हे त्यांच्याकडे प्रलंबित असलेले बांधीव (Surplus) क्षेत्रफळ किंवा संक्रमण शिबिरापोटी द्यावयाच्या भाडयाची रक्कम किंवा इतर रक्कमा भरण्यास तयार नसतात किंवा टाळाटाळ करतात. अशा विकासकांकडून सदरच्या रक्कमा RRC च्या माध्यमातून वसुल करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करावा लागतो. सदरची कार्यपद्धती हि क्लिष्ट असून त्यासाठी बराच कालावधी लागतो. महसूली वसुली प्रमाणपत्रासाठी (RRC) सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या यंत्रणेनुसार केवळ महसूली यंत्रणेवर अवलंबून राहावे लागते व या रकमेच्या वसुलीची कारवाई केवळ जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावरुन होते. परिणामी जिल्हाधिकाऱ्यांकडे असलेल्या कामाची व जबाबदारीची व्याप्ती पाहता वसुलीची कामे प्राधान्याने करणे शक्य होत नाही. सदरहू प्रकरणी तर मालमत्तेचा तपशिल देखील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अद्याप प्राप्त होवू शकला नाही. अशा परिस्थितीत ज्या प्राधिकरणाने वसुलीचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याच यंत्रणेकडे डडक ची वसुली करण्याचे अधिकार दिल्यास ही वसुली अधिक तातडीने होवू शकते. त्याअनुषंगाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने विकासक/ना-हरकत प्रमाणपत्रधारक यांचेवर थेट कार्यवाही करण्यासाठी म्हाडा अधिनियमात सुधारणा करुन हे वसुलीचे अधिकार म्हाडालाच देता येईल किंवा कसे याबाबतच्या शक्यतांचा व पर्यायांचा पुर्ण अभ्यास करुन शासनस्तरावरुन योग्य तो निर्णय तातडीने घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.५(३) ज्या विकासकांनी बांधीव (Surplus)क्षेत्रफळ सुपूर्द केलेले नाही, अशा विकासक / मालकांचे इतरत्र प्रकल्प सुरू असल्यास विहित नियम / कायद्यातील तरतुदीचा वापर करून काम थांबवण्याबाबतचे आदेश देण्याची कार्यवाही मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडून करण्यात यावी अथवा आवश्यक त्या परवानग्या थांबविण्यात याव्यात. तसेचज्या विकासक / मालक यांच्याकडे मंडळाकडे सुपूर्द करण्यासाठी बांधीव (Surplus)क्षेत्रफळ उपलब्ध नाही किंवा त्यांनी Third party rights निर्माण केले असतील, अशा विकासकांकडून संबंधित बांधीव**

(Surplus) क्षेत्रफळाऐवजी कायद्यातील तरतुदीप्रमाणे Ready Reckoner प्रमाणे पैसे वसूल करता येत असल्यास ती रक्कम तात्काळ वसूल करावी. तसेच ही वसुली कोणत्या दराने करावी यासंदर्भात मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडून याबाबत कायद्यात स्पष्ट तरतूद करण्याबाबतचा स्वतंत्र निर्णय तातडीने शासन स्तरावरुन करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.६(४) संक्रमण शिबीरातील गाळेधारक व इतर ठिकाणच्या गाळेधारकांकडून भाडे भरून घेण्यासाठी Online Banking System विकसित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी. तसेच सद्यःस्थितीत Online Payment बाबत उपलब्ध असणाऱ्या विविध आधुनिक साधनांचा वापर करून आवश्यक प्रणाली विकसित करावी. तसेच म्हाडातील विविध समस्यांचे/तक्रारीच्या निवारणासाठी म्हाडा व मंत्रालय स्तरावर तक्रार निवारण कक्ष सुरु करण्यात यावा व प्रकरणांचा नियमित पाठपुरावा व निराकरण करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा तातडीने उभी करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७(५) एसआरए व म्हाडामध्ये जो रिहॅब, फ्री कम्पोन्टंट असतो तो रेराच्या अंतर्गत येत नाही. तो रेराअंतर्गत आल्यास यातील बरेचशे प्रश्न सुटू शकतात. अतः या कम्पोनंटला रेराच्या अंतर्गतअनिवार्यता आणण्याबाबतची आवश्यक ती कारवाई विभागाच्या स्तरावरुन करण्यात यावी. जोपर्यंत अतिरिक्त बांधीव क्षेत्र हस्तांतरीत केला जात नाही तोपर्यंत विकासकाचा सेल कंम्पोन्टंट थांबविण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.८(६) सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने म्हाडाने भाड्याच्या रकमेची केलेली गणना ही चुकीची असून हा दर लावताना शासकीय कर्मचारी वाढीव कार्यकाळासाठी शासकीय निवासस्थानात राहात असल्यास लावावयाच्या दराच्या आधारे ही निश्चिती करण्यात आली. परंतु महालेखाकारांनी या गणनेसाठी रेडीरेकनरचा आधार घेवून ही गणना करणे आवश्यक होते असे आक्षेप त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत. विभागाकडे अशा प्रकरणांसंदर्भात काहीही धोरण नसल्यामुळे ही गणना सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणानुसार करण्यात आली. ज्याअर्थी कोणतेही धोरण अस्तित्वात नव्हते याचा अर्थ विभागाला स्वेच्छाधिकार होता. अशापरिस्थितीत विभागाने स्वतःच्या आर्थिक हिताचा विचार करुन ज्यातून अधिक दर प्राप्त होवू शकेल असा निर्णय घेण्याची आवश्यकता होती. तरीही या दराबाबत शासनाने तात्काळ सुस्पष्ट धोरण निश्चित करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

# परिशिष्ट-अ

परिशिष्ट क्र. ९
साक्षीदार वेळी सादर दि. २८/१/२०१८ ८३

अधिकाधिक माहिती (५)

F.No. 3-6/2012-Desk(MDM)
Government of India
Ministry of Human Resource Development
Department of School Education & Literacy
MDM Division

Shastri Bhavan, New Delhi
24th September, 2012

To

The Secretary
Panchayati Raj Department (Mid Day Meal)
Govt. of Rajasthan
Jaipur

Subject: Payment of Cooking Cost under Mid Day Meal Scheme – reg.

Madam,

With reference to your letter no. 4(5)/26PC/PRD/MDM/Akshaypatra/09/296 dated 29th June, 2012 on the subject mention above and to inform that as per MDM Guidelines 2006, the cooking cost is to be paid to the implementing agency based on the number of children availed mid day meal. The payment of cooking cost has no linkage with utilization of foodgrains.

Yours faithfully

(Gaya Prasad)
Director(MDM)
Tel.: 011-23384253
Fax 011-23382394
Email: gaya.prasad@nic.in

DO.No. ऑडिट/पी.ए.सी. अनुरोध/ 0/355/161

Telephone No.: 022-2205 8500 Fax No. 022-220[illegible]
E-mail: agau.Maharashtra1@cag.gov.in Visit us at: cag.gov.in
प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) - 1, [illegible]
प्रशिक्षा भवन 101, महर्षी कर्वे रोड, मुंबई - 400 020.
PRINCIPAL ACCOUNTANT GENERAL (Audit) - 1, MAHARASHTRA
Prashiksha Bhavan, 101, M. K. Road, Mumbai - 400 020

Dated 14.06.2018

Respected Sir,

Reference is invited to the Performance Audit on Implementation of Mid Day Meal Scheme i.e. paragraph 2.3 of Audit Report 2014-15 on General and Social Sector which was discussed in the PAC meeting held on 29.05.2018. The Hon'ble PAC is already aware of the issues which were discussed regarding sub-para 2.3.4.2 on "Inadequacies in payment of cooking cost and lifting of rice" wherein it was pointed out that the ISKCON was allowed to use 50 gms and 75 gms of rice as against the norms of 100 gms and 150 gms per child per day for providing Mid Day Meal to primary and upper primary students respectively on the condition that the extra quantity of groundnuts and pulses be added to it so that the nutrition value of protein and calories could be maintained as per the Scheme guidelines.

1. The para is based on the 100 per cent failed samples (206), on the meals tested by the MCGM in their own labs. The Mid Day Meal providers i.e. various central kitchens including ISKCON were penalised by MCGM. It is pertinent to note that the sampling was done in a routine manner for last five years and penalty was also recovered from ISCKON for the period 2010-11 to 2014-15 amounting to Rs. 4.72 lakh. Neither ISKCON protested against the levy/recovery of the penalty nor did the MCGM review the causes for failure of the food samples, so as to maintain the calorific value of the meals.

Further, it is seen that the test certificates issued by the MCGM laboratory mentioned about percentage of protein and calories contained per 100 gms of cooked food, without mentioning the weight of the cooked meal (in gms) from where the samples were drawn.

Since the paragraph is under discussion, it is felt that the Government may be asked to clarify its stand on the levy/recovery of penalty from the ISKCON and for not reviewing the causes of failure of samples every year for five years, even after the issues were brought out in the Performance Audit by C & AG.

2. It is seen from the Explanatory Memoranda received on 16 May 2018 that GoM have issued a revised G.R on 27 November 2017 wherein the weight of cooked food was revised after practical examination. It is not known whether the revision made has any scientific basis. The PAC may therefore like to recommend that the revised G.R of November 2017 should be reviewed on scientific grounds or by an independent agency dealing with the nutrition to reconfirm the contents of the G.R regarding weight of the sample.

It is felt that since the sampling for the period 2010-15 was done as per the Scheme norms read with G.R of 2nd February 2011, it would not be correct to apply the G.R of November 2017, retrospectively, since penalty were levied on all the meal providers including ISCKON. The G.R of 27 November 2017, for testing of the samples of the cooked meals may be implemented from the date of its issue by MCGM and other implementing agencies.

3. Further, any deviation by the State in implementation of Central Scheme may be done with the due approval of the GoI so to ensure uniformity and avoid issues/complications like the ones which have surfaced in the instant case.

With Regards,

Yours sincerely,

Sangita Choure

(Sangita Choure)

Shri. Gopaldas Agrawal
Chairman
Public Accounts Committee
Vidhan Bhavan
Mumbai.

# भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.३ "मध्यान्ह आहार योजनेची अंमलबजावणी" यासंदर्भात लोकलेखा समितीसमोर दिनांक ३१/०७/२०१८ रोजी पार पडलेल्या साक्षीच्या अनुषंगाने मा. महालेखापाल यांनी परिच्छेद क्र. २.३.४.२ "शिजविलेल्या आहाराचे नमूने अनुतीर्ण ठरण्याची मोठ्या प्रमाणातील टक्केवारी" च्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबतचे स्पष्टीकरण

| | | |
|---|---|---|
| २.३.४.२ | **स्वयंपाकाच्या खर्चाच्या प्रदानात आणि तांदूळाची उचल / वापर करण्यातील अपर्याप्तता / त्रुटी**<br>१) The Para is based on the 100 per cent failed samples (236), on the meals tested by the MCGM in their own labs. The Mid Day Meal providers i.e. various central kitchens including ISKCON were penalized by MCGM. It is pertinent to note that the sampling was done in a routine manner for last five years and penalty was also recovered ISCKON for the period 2010-11 to 2014-15 amounting to Rs. 4.72 lakh. Neither ISKCON protested against the levy/recovery of the penalty nor did the MCGM review the causes for failure of the food samples, so as to maintain the calorific value of the meals.<br>Further, it is seen that the test certificates issued by the MCGM laboratory mentioned about percentage | १) शालेय पोषण आहार योजने अंतर्गत कार्यरत असलेल्या पर्यवेक्षक-नि-भांडारपाल आणि शाळा मुख्याध्यापकांकडून शिजविलेल्या आहाराचे नमुने २७५ ग्रॅम ते ३०० ग्रॅम आहाराचा प्रमाणात दररोज तपासणीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेत पाठविले जातात. त्यानुसार पालिकेच्या प्रयोगशाळेत पाठविलेल्या आहाराच्या नमुन्यापैकी फक्त १०० ग्रॅम नमुना तपासण्याकरीता प्रयोगशाळेच्या कार्यक्षमतेनुसार घेण्यात येत होता. त्याची तपासणी करून तपासणी अहवाल सादर करण्यात येत होता. तसेच परीगणना करताना १०० ग्रॅम प्रमाणे प्राप्त प्रमाण हे एकूण शासनाच्या निकषाप्रमाणे गुणांकनाचे प्रमाण लक्षात घेऊन परिगणना केली जात होती.<br>दिनांक ०२ फेब्रुवारी,२०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी १०० ग्रॅम तांदुळामध्ये इतर आवश्यक पदार्थ (कडधान्य, भाजीपाला, इत्यादी) मिसळून साधारण वजन २५० ते २७५ ग्रॅम एवढ्या वजनाचे ४५० उष्मांक व १२ ग्रॅम वा त्यापेक्षा जास्त प्रथिनेयुक्त आणि इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी १५० ग्रॅम तांदूळामध्ये इतर आवश्यक पदार्थ (कडधान्य, भाजीपाला, इत्यादी) मिसळून साधारण वजन ३७५ ते ४०० ग्रॅम एवढ्या वजनाचे ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिने वा त्यापेक्षा जास्त |

| | | | |
|---|---|---|---|
| | | of protein and calories contained per 100 gms of cooked food, without mentioning the weight of the cooked meal (in gms) from where the samples were drawn.<br>Since the paragraph in under discussion, it is felt that the government may be asked to clarify its stand on the levy/recovery of penalty from the ISKCON and for not reviewing the causes of failure of samples every year for five years, even after the issues were brought out in the Performance Audit by C& AG. | प्रथिनेयुक्त आहाराचे वितरण करावयाचे होते. पुरवठा करावयाच्या आहाराचे प्रमाण लक्षात घेता, प्रचलित पध्दतीने आहार नमून्यांची तपासणी महापालिका प्रयोगशाळेत केली असता दिनांक ०२ फेब्रुवारी,२०११ रोजीच्या शासन निर्णयातील विहित प्रमाणाप्रमाणे भरत नसल्यामुळे इतर पुरवठादार संस्थांप्रमाणे ईस्कॉन फूड रिलिफ फाऊंडेशन यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. सदरबाबत मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार दिनांक २१ जून,२०१७ रोजी महापालिका प्रयोगशाळेत नमुना आहार तयार करुन पाहण्यात आला. त्यावेळी शासन निर्णयात नमूद वजन व प्रत्यक्षात तयार केलेल्या आहाराचे वजन यात तफावत आढळून आली. यासंदर्भात निर्माण होणारी विसंगती दूर करण्यासाठी प्रयोगशाळेत प्रत्यक्ष बनविलेल्या खिचडीच्या वजनाबाबतचे निकष संदर्भ म्हणून वापरण्यात यावेत अशी शिफारस शिक्षणाधिकारी (बृहन्मुंबई) यांनी केली होती. सदर शिफारशीनुसार दिनांक २७ नोव्हेंबर,२०१७ रोजी शासनाने शुध्दीपत्रक निर्गमित करुन शिजविलेल्या आहाराच्या वजनामधील बदल दिनांक ०२ फेब्रुवारी,२०११ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचे निर्देश दिले. दिनांक २७ नोव्हेंबर,२०१७ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकातील नमूद आहार वजनाप्रमाणे पोषण मूल्याचे परिगणन केले असता २३६ पैकी १९५ नमुने पात्र ठरतात.<br>विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहारातील नमूना प्रयोगशाळेकडे सादर केल्यानंतर प्रयोगशाळेकडून १०० ग्रॅम आहारामध्ये समाविष्ट असलेल्या प्रथिने व उष्मांक परिगणित करुन दिला जातो. तथापि, ज्या शाळेमधून सदर अन्नाचा नमूना तपासणीसाठी सादर झाला आहे तेथे संबंधित अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेने किती प्रमाणात शिजविलेल्या आहाराचा पुरवठा विद्यार्थ्यांना केला आहे, याची माहिती प्रयोगशाळेला असू शकत नाही. |
| | | २) It is seen from the Explanatory Memoranda received of 16 may 2018 that GoM have issued a revised G.R. on 27 November 2017 wherein the weight of cooked food was revised after practical examination. It is not | २) महालेखापरिक्षकांच्या आक्षेपानंतर शासन निर्णय दि. ०२ फेब्रुवारी, २०११ मध्ये नमूद केल्यानुसार महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेत १०० ग्रॅम व १५० ग्रॅम तांदळामध्ये शासनाच्या निकषानुसार इतर साहित्य टाकून शिजविलेले अन्न व त्यामधील प्रथिने व उष्मांके याबाबत पडताळणी करण्यात आली. त्यावेळी शासन निर्णयात नमूद वजन व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | known whether the revision made has any scientific basis. The PAC may therefore like to recommend that the revised G.R. of November 2017 should be reviewed on scientific grounds or by an independent agency dealing with the nutrition to reconfirm the contents of G.R. regarding weight of the sample.<br>It is felt that since the sampling for the period 2010-15 was done as per the Scheme norms read with G.R. of 2nd February 2011, it would not be correct to apply the G.R. of November 2017, retrospectively, since penalty were levied on all the meal providers including ISCKON. The G.R. of 27 November 2017, for testing of the samples of the cooked meals may be implemented from the date of its issue by MCGM and other implementing agencies. | प्रत्यक्षात तयार केलेल्या आहाराचे वजन यात तफावत आढळून आली. यासंदर्भात निर्माण होणाऱ्या विसंगती दूर करण्यासाठी प्रयोगशाळेत प्रत्यक्ष बनविलेल्या वजनाबाबतचे निकष संदर्भ म्हणून वापरण्यात यावेत, अशी शिफारस बृहन्मुबई महानगरपालिकेमार्फत शासनास केली होती. तसेच, शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी त्यांच्या स्तरावरुन याबाबत काही शाळांमध्ये पडताळणी केली असता, शासन निर्णयात नमूद वजन व प्रत्यक्षात शिजविलेले आहाराचे वजन वेगळे असल्याचे दिसून आले. यानुसार दि. ०२ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयामध्ये बदल करावा, असा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता.<br>दि. ०२ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयात शिजविलेल्या अन्नाचे वजन प्रत्यक्षात पडताळणी न करता केवळ अंदाजे परिगणित करुन नमूद केले होते. प्रस्तुत शासन निर्णयात नमूद केलेल्या अंदाजित वजनानुसार शिजविलेल्या आहाराचे नमुने प्रयोगशाळा तपासणीमध्ये परिगणित करण्यात येतील व त्याआधारे अन्न नमुने प्रयोगशाळा तपासणीमध्ये अनुतीर्ण ठरतील याचा अंदाज तत्कालीन परिस्थितीमध्ये कोणालाही आल्याचे दिसून येत नाही. शासन निर्णय दि. ०२ फेब्रुवारी, २०११ मध्ये नमूद केलेल्या पाककृतीनुसार प्रत्यक्षात शिजविलेले आहाराचे वजन सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या वजनापेक्षा जास्त येत असल्याचे शिक्षण संचालक (प्राथ.) व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी शासनाच्या निदर्शनास आणले. त्यामुळे वजनातील विसंगती दूर करण्यासाठी प्रत्यक्षात येणारे वजनानुसार शासन निर्णयात दुरुस्ती करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक २७ नोव्हेंबर,२०१७ रोजी शुध्दीपत्रक काढले आहे.<br>सद्यस्थितीत दि. ०२ फेब्रुवारी, २०११ मध्ये नमूद केलेल्या पाककृतीनुसार शासनाने एकूण २ त्रयस्थ संस्थांकडून प्रत्यक्षात शिजविलेले आहाराचे वजन करुन घेतले असता सदर संस्थांच्या अहवालामध्ये प्राथमिक विद्यार्थ्यांसाठीच्या आहाराचे वजन ४०० ते ४५० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी ७०० ते ७५० ग्रॅम इतके येत असल्याचे दिसून येते. तसेच, सदर प्रकारची तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत उपसंचालक, कन्झुम एज्युकेशन आणि तपासणी केंद्र, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांना कळविण्यात आले |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आहे. तथापि, याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.<br>महानगरपालिकेने शालेय पोषण आहाराचे एकूण २५५ नमुने तपासणीसाठी पाठविले आहेत त्यापैकी १९४ नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत. महिला संस्थांकडून पुरवठा करण्यात आलेल्या एकूण शालेय पोषण आहाराच्या नमुन्यांची संख्या १७९ होती त्यापैकी १६९ नमूने पात्र असून उर्वरीत १० नमुने अपात्र आहेत. तसेच इस्कॅन फुड रिलीफ फाउंडेशन यांचे एकूण १५ आहार नमुनै तपासणीसाठी पाठविण्यात आले होते त्यापैकी १३ नमुने पात्र व २ नमुने अपात्र असल्याचे आढळले. |
| | | 3) Further, any deviation by the State in implementation of Central Scheme may be done with the due approval of the GoI so to ensure uniformity and avoid issues/complications like the ones which have surfaced in the instant case. | ३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक (Calories) आणि १२ ग्रॅम प्रथिने (Proteins) तसेच, इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक (Calories) आणि २० ग्रॅम प्रथिने (Proteins) युक्त दुपारचे भोजन देण्याची तरतूद आहे. तथापि, शिजविलेल्या आहाराच्या वजनाबाबत केंद्र शासनाच्या कोणत्याही मार्गदर्शक सूचना नाहीत. दि. ०२ फेब्रुवारी, २०११ चा शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाच्या स्तरावर निर्गमित करण्यात आला होता. त्यामुळे प्रस्तुत शासन निर्णयात शिजविलेल्या अन्नाच्या वजनाबाबतचा बदल शुध्दीपत्रकाव्दारे राज्य शासनाच्या स्तरावर केला आहे.<br>केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये शिजविलेल्या आहाराच्या वजनाचा उल्लेख नाही. तथापि, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ मधील शुध्दीपत्रकात नमुद केलेले सुधारित शिजविलेल्या आहाराचे वजन ठरविण्याबद्दल केंद्र शासनाची मान्यता घेण्यात येत आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २.३४.२ | **स्वयंपाकाच्या खर्चाच्या प्रदानात आणि तांदूळाची उचल / वापर करण्यातील अपर्याप्तता / त्रुटी**<br>**योजनेत प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गातील प्रत्येक बालकासाठी** अनुक्रमे १०० ग्रॅम आणि १५० ग्रॅम इतका तांदूळ पुरविण्याची तरतूद होती. २००८-०९ पासून प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमधील मुलांना शिजवलेले अन्न देण्याचे कार्य MCGM ने मुंबईतील ISKCON फूड रिलिफ फाउंडेशन वर सोपविले.<br>नोव्हेंबर २०१२ मध्ये (i) GoI चे १०० ग्रॅम आणि १५० ग्रॅम हे प्रमाणक अधिक असल्याच्या सबबीवर प्रती बालक प्रती दिवस सरासरी ४० ग्रॅम तांदूळाची उचल करण्यास परवानगी दयावी आणि (ii) तांदूळ शिजवताना त्यात इतर पदार्थ मिसळले जाणार असल्याने स्वयंपाकावरील खर्चात त्या प्रमाणात कपात केली जाऊ नये अशी ISKCON ने MCGM ला विनंती केली.<br>MCGM ने ही बाब विभागाकडे संदर्भित केली आणि विभागाने त्याचे पुनर्विलोकन केल्यावर GoI ने विहित केलेल्या उष्मांक व प्रथिने घटकांचे प्रमाण कायम रहावे यासाठी तांदूळात डाळी, शेंगदाणे इत्यादी अतिरिक्त पदार्थ मिसळले जाणार असतील तर प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांसाठी प्रती बालक प्रती दिवस अनुक्रमे ५० ग्रॅम व ७५ ग्रॅम तांदूळ वापरण्यास ISKCON ला परवानगी दिली (मे २०१३).<br>MCGM मधील दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की २०१०-१५ दरम्यान MCGM ने ६.८५ कोटी भोजनांच्या स्वयंपाकाच्या खर्चापोटी ISKCON ला ₹. २३.५१ कोटी अदा केले. प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांसाठी रु. १०० ग्रॅम व १५० ग्रॅम शिजवण्यासाठी निश्चित केलेल्या तत्कालीन दराने रु. २३.५१ कोटी इतका स्वयंपाकावरील खर्च अदा करण्यात आला होता. शासनाने सांगितले की, ISKCON ने तांदूळ शिजवताना त्यात इतर पदार्थ मिसळल्याने १०० ग्रॅम व १५० ग्रॅम साठीच्या संपूर्ण स्वयंपाकाचा खर्च अदा करण्यात आला होता.<br>स्वयंपाकावरील रु. २३.५१ कोटीचा संपूर्ण खर्च अदा करणे आणि त्याच्या समर्थनार्थ शासनाने दिलेले स्पष्टीकरण तर्कसंगत नव्हते कारण MCGM ने २०१०-१५ दरम्यान ISKCON च्या मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून प्राप्त केलेले तयार अन्नाचे सर्व २३६ नमूने त्यांच्यातील उष्मांक व प्रथिने घटक GoI | शासन निर्णय दि. १८ जून, २००९ अन्वये प्राथमिकसाठी विविध केलेली पाककृतीनुसार शिजविलेल्या आहाराचे वजन 300 ते ३२५ ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी ४५० ते ४७५ ग्रॅम असे नमूद केले होते.<br>शासन निर्णय दिनांक ०२/०२/२०११ नुसार शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खर्चाचे सुधारित दर लागू करुन मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. प्रस्तुत शासन निर्णयामध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत द्यावयाच्या पाककृतीचा तपशिल परिशिष्ट-अ मध्ये नमूद केला आहे. सदर तपशिलामध्ये विहित पाककृती नमूद करुन पाककृती निहाय तांदूळ व धान्यादी माल वापरण्याचे प्रमाण दिले आहे. सदर शासन निर्णयानुसार इयत्ता १ ली ते ५ वीसाठी १०० ग्रॅम तांदूळ व इतर आवश्यक पूरक पदार्थ (कडधान्य, भाजीपाला) वापरुन प्रतिविद्यार्थी २५० ते २७५ ग्रॅम वजनाचा ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार आणि इयत्ता ६ वी ते ८ वीसाठी १५० ग्रॅम तांदूळ व इतर आवश्यक पूरक पदार्थ (कडधान्य, भाजीपाला) वापरुन प्रतिविद्यार्थी ३७५ ते ४०० ग्रॅम वजनाचा ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त शिजविलेला आहार द्यावयावा आहे.<br>शासनाने विहित केलेली पाककृती व वापरावयाचे धान्यादी मालाचे घटक यानुसार प्रत्यक्षात अन्न शिजविले असता त्याचे वजन प्रस्तुत शासन निर्णयात नमूद केलेल्या वजनापेक्षा जास्त येत असल्याचे दिसून आले आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत शासनाने विहित केलेले पाककृती नुसार अन्न शिजविल्यास त्याचे वजन प्राथमिकसाठी ४२५ ते ४६० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी ७६४ ग्रॅम इतकी येत असल्याचे आढळून आले आहे. शिजविलेल्या अन्नाचे वजन हे त्यामध्ये वापरलेले अन्न, भाजीपाला व पाण्याचे प्रमाण यावर बऱ्याच अंशी अंवलबून असते. | केंद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विहित केलेल्या उष्मांक व प्रथिने या घटकाचे प्रमाण कायम रहावे यासाठी तांदूळात डाळी, शेंगदाणे इ. अतिरिक्त पदार्थ मिसळले जाणार असल्याच्या अटीवर ईस्कॉन या संस्थेस प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गासाठी प्रती बालक प्रति दिवस अनुक्रमे ५० ग्रॅम व ७५ ग्रॅम तांदूळ वापरण्यास परवानगी दिली होती हा विभागाचा खुलासा | केंद्र शासनाने विहित केलेल्या प्राथमिक साठी १०० ग्रॅम व उच्च प्राथमिकसाठी १५० ग्रॅम तांदूळापासून तयार केलेली खिचडी विद्यार्थ्यांना जास्त होत असल्याने पोषण व आरोग्य क्षेत्रातील तज्ञांनी समिती स्थापन करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.<br>त्यानुसार प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाने विहित केलेल्या तांदूळाऐवजी प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांना अनुक्रमे ५० ग्रॅम व ७५ ग्रॅम तांदूळ शिजवून त्यामध्ये डाळी, शेंगदाणे, भाजीपाला इ.प्रमाण वाढविल्यास त्यानुसार केंद्र शासनाच्या निकषानुसार उष्मांक व प्रथिने देता येतील, असे अभिप्राय |

# महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-०८१८/प्र.क्र.३९७/आ-७
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, बी-विंग,
मंत्रालय, मुंबई-४०००२१.
email id:- [illegible]@nic.in
दिनांक - 10/8/18

आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान,
मुंबई.

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या
सन २०१४-१५ या वर्षाच्या सामान्य आणि
सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेदासंदर्भात.
(MDM Performance Audit 2009-10 to 2014-15)

महोदय,

सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या वरील विषयाबाबतच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या पत्रासह सोबत जोडलेली प्रत कृपया पहावी.

२. [illegible] नमूद केल्यानुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.३ "मध्यान्ह आहार योजनेची अमलबजावणी" संदर्भात झालेल्या साक्ष च्या अनुषंगाने लोकलेखा समितीस उपस्थित करावयाच्या मुद्द्यांबाबतची बैठक दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी दुपारी २.३० वा. आयोजित करण्यात आली आहे.

३. सदर मुद्द्यांबाबतची माहिती तात्काळ / आजच शासनास सादर करावी. तसेच, सदर बैठकीस आवश्यक त्या माहितीसह आपल्या कार्यालयातील जबाबदार अधिकाऱ्यास अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात यावेत, ही विनंती.

आपला,

10/8/18

(स. ह. मोसल)
अवर सचिव

सहपत्र :- यादीनुसार.

# महाराष्ट्र शासन

क्रमांक :- लोलेस-७०१८/प्र.क्र.१११/एस.डी.२
राज्य शिक्षण व क्रीडा विभाग,
बादल भाना मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०१ ऑगस्ट, २०१८

प्रति,
मा. प्रधान सचिव,
प्राथमिक व माध्यम शिक्षण,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
पुणे

विषय :- आदरणीय विधानसभा व महाराष्ट्र लोकपरिषदेच्या यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेदासदर्भात
(Action Taken Note on Audit 2009 - 10 to 2014 - 15)
संदर्भ :- लोकलेखा समितीच्या या संदर्भातील झालेली दि. ३१/०७/२०१८ रोजीची साक्ष.

आदरणीय विधानसभा व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.१ "भारतीय आहार योजनेची अंमलबजावणी" यासंदर्भात लोकलेखा समितीच्या मा. सदर मुख्य सचिव (प्राथमिक शिक्षण) यांची साक्ष दि. ३१ जुलै, २०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर साक्षीस आपण स्वत: उपस्थित होता. सदर साक्षीदरम्यान लोकलेखा समितीने उपरोक्त २.१ परिच्छेद मुद्दा क्र. २.३.४.४ (मुलाच्या आरोग्य तपासणीसंदर्भात मुद्दे / प्रश्नावली प्रमाणे मुद्दे) परिच्छेद ६.१ मध्ये नमूद केलेली आकडेवारी राज्य परिस्थितीशी विसंगत असल्याचे निदर्शनास आणून दिले. सदर मुद्दा/परिच्छेदाबाबत, आपले स्तरावरुन माहिती/खुलासा मागविण्यात आला होता. त्यानुसार खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

१) राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ मध्ये एकूण ८१,४१० शाळांपैकी [illegible] शाळांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सन २०१५-१६ मध्ये एकूण [illegible] शाळांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये एकूण [illegible] ८२,१९३ शाळांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सन २०१७-१८ या चालू शैक्षणिक वर्षात एकूण शाळांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत [illegible] शाळांची आरोग्य तपासणी करण्यात आली. [illegible] करण्यात आली.

(डॉ. सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| वर्ष | एकूण शाळा | विद्यार्थी संख्या | आरोग्य तपासणी झालेली शाळा | आरोग्य तपासणी झालेली विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| [illegible] | ८९४५० | ९५७३९२८ | ६४४२८ | ८८०७३४० |
| [illegible] | ८७०९८ | १०३२९७४५ | ६४४६४ | ८८९१५८७ |
| [illegible] | ८४५५३ | १००१४८०६ | ६८९९३ | ९८५१३८९ |

शाळा तपासणी पूर्ण झालेल्या नोंदवहीमध्ये प्रत्येकी ३ लहिन्यातील विद्यार्थ्यांच्या [illegible] नोंद घेऊन नोंद केली जाते त्याप्रमाणे सुधारणा झाल्या परिगणित केल्या जातो.

शालेय पोषण आहार योजनेतील पात्र शाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याबाबत सर्व शिक्षणाधिकारी [illegible] दि.३/१२/२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पात्र शाळांची यादी संबंधित जिल्ह्यांच्या

प्रस्तावना-

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम १ एप्रिल २०१३ पासून लागू करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आंगणवाडी व शालेय बालकांच्या / मुलांच्या आरोग्याचे संवर्धन व विकास साधणेकरिता एक महत्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. बालकांच्या / मुलांच्या आरोग्याची तपासणी, त्यांच्यात आढळणाऱ्या आजारावर वेळीच उपचार करुन पायबंध घालणे हा मुख्य उद्देश डोळयासमोर ठेवण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ० - १८ वर्ष वयोगटातील मुलांची तपासणी होते. ज्यामध्ये ४ D's म्हणजे, जन्मतः व्यंग (Defects) , पोषणमूल्यांची कमतरता (Deficiencies), शारीरिक व मानसीक विकासात्मक विलंब (Developmental Delays), आजार (Diseases) यांचे निदान व उपचार देण्यात येतात.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम हा संपूर्ण महाराष्ट्र राज्यात राबवून राज्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील लाभार्थी, अंगणवाडी स्तरावरील ० ते ६ वयोगटातील सर्व लाभार्थी तसेच शासकीय व निमशासकीय शाळेमधील ७ ते १८ वर्ष वयोगटातील सर्व लाभार्थी यांची तपासणी करणे हे आहे.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम हा मुलांच्या आरोग्याचे संवर्धन व विकास साधण्यासाठी उचललेले अत्यंत महत्वपुर्ण पाऊल आहे. या कार्यक्रमाचा माध्यमातून बालकांच्या आरोग्याची तपासणी व त्यांच्या आढळणाऱ्या आजारांना वेळीच पायबंध घालणे हा मुख्य उद्देश समोर ठेवण्यात आला आहे.

उद्देश व उद्दिष्टे -

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत ० ते १८ वर्ष वयोगटातील मुलांची तपासणी करुन मुलांमध्ये आढळणाऱ्या जन्मत असलेले व्यंग, लहान मुलांमधील आजार, जीवनसत्वांच्या कमतरतेमुळे होणारे आजार व अपंगत्व इत्यादी बाबींचे वेळेवर निदान करुन त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

अंमलबजावणी -

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम या कार्यक्रमाचा लाभ महाराष्ट्र राज्यातील ० ते १८ वर्ष वयोगटातील जवळपास २ कोटी मुलांना होणार आहे. अंगणवाडीस्तरावर ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांची वर्षातून २ वेळेस होणारी आरोग्य तपासणी हा हया कार्यक्रमाचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. या व्यतिरिक्त शासकीय व निमशासकीय शाळेतील ६ ते १८ वर्ष वयोगटातील मुलांनाही या आरोग्य तपासणी कार्यक्रमाचा लाभ होणार आहे. सदर आरोग्य तपासणी दरम्यान मुलांमध्ये आढळून

आलेल्या आरोग्य विषयक समस्या/अडचणीसाठी योग्य ते संदर्भ सेवा व सर्व प्रकारचे वैद्यकिय व शल्य चिकित्सक उपचार पुरविण्यात येणार आहेत. मुलांवर केले जाणारे उपचार हे पुर्णत मोफत पुरविण्यात येतात.

**सेवा देणाऱ्या आरोग्य संस्था -**

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाची पथके प्रत्येक तालुक्यात नियुक्त करण्यात आलेली आहेत. सदर पथकाचे मुख्यालय, ग्रामीण रुग्णालये किंवा संबंधित उपजिल्हा रुग्णालय आहेत.

**मनुष्यबळ -**

महाराष्ट्रात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत एकूण ११९५ पथके सन २०१८-१९ च्या पीआयपी मध्ये मंजुर करण्यात आलेली आहेत. ३१ पथके आदिवासी जिल्हयांमधील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी करण्यासाठी मंजुर आहेत. बृहन्मुंबईसाठी ५५ पथके मंजुर करण्यात आलेली आहेत.

१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीमध्ये अंगणवाडीतील बालकांची आरोग्य तपासणी वर्षातून दोन वेळा आणि शाळेमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून एक वेळा करण्याबाबतचे नियोजन करावे. शाळेच्या सुट्टया व परिक्षांचा कालावधी वगळता वर्षभरात साधारण २२० दिवस आरोग्य तपासणीसाठी शाळा उपलब्ध असतात. तसेच सुट्टया वगळता वर्षभरात साधारण २५० दिवस तपासणीसाठी अंगणवाडी उपलब्ध असतात. सदर बाबींचा विचार करुन जिल्हा व तालुकास्तरावरुन आरोग्य तपासणी कार्यक्रमांचे वेळापत्रक तयार करावयाचे आहे. या करिता शालेय आरोग्य तपासणी पथकाचे जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक व निवासी वैद्यकिय अधिकारी (बाहय संपर्क) हे पुर्णपणे जबाबदार राहतील.

प्रत्येक पथकाने वर्षभरामध्ये ० ते १८ वर्षे वयोगटातील किमान ४४,००० लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करणे अपेक्षित आहे.प्रत्येक पथकामार्फत दर दिवशी अंगणवाडीतील किमान १२५ बालके किंवा शाळेतील किमान २०० विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी करण्यात यावी.

**कार्यक्रमांतर्गत विविध योजना व उपक्रम -**

महाराष्ट्र राज्याच्या ३४ जिल्हयांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम १ एप्रिल २०१३ पासून लागू करण्यात आला. प्रत्येक पथकात १ वाहन, २ वैद्यकीय अधिकारी, १ फार्मासिस्ट, १ अे.एन.एम. औषधी, तपासणी साहित्य, इत्यादी पुरविण्यात आलेल्या आहेत. आरोग्य तपासणी कार्यक्रमाचे गावनिहाय वेळापत्रक शिक्षण आणि महिला व बाल कल्याण विभागांच्या समन्वयाने तयार करुन प्रत्येक पथकास ठराविक वेळापत्रकाप्रमाणे तपासणी करणे अपेक्षित आहे.

संदर्भ सेवा :-

अंगणवाडी व शाळा स्तरावरील बालके/ विद्यार्थ्यांच्या तपासणीदरम्यान लाभार्थ्यांना आढळून येणाऱ्या गंभीर स्वरुपाच्या आजारांवर पुढील योग्य ते उपचार करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय/ उपजिल्हा रुग्णालय/ जिल्हा रुग्णालय/ डीईआयसी व सुपर स्पेशॅलीटी हॉस्पिटलमध्ये संदर्भीत करावे. तसेच तज्ञ डॉक्टरांकडून रोगनिदान निश्चित झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया करुन उपचार पूर्ण केले जातात.

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेदा संदर्भात (MDM Performance 2009-10 to 2014-15)

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुददा</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१)</td><td>राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ मध्ये एकूण ८१४१० शाळांपैकी ६४४२८ शाळांची आरोग्य तपासणी करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ मध्ये एकूण ८२०९८ शाळांपैकी ६४४६४ शाळांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये एकूण ८४५५३ शाळांपैकी ६८९९३ शाळांची आरोग्य तपासणी करण्यात आली म्हणजेच २५ टक्के अधिक शाळांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत तपासणी पथक शाळांमध्ये तपासणी साठी गेलेले नाहीत याची कारणे नमूद करण्यात यावीत.</td><td>
<table>
<tr><th>वर्ष</th><th>एकूण शाळांची संख्या</th><th>तपासलेल्या शाळांची संख्या</th><th>टक्केवारी</th></tr>
